महाराष्ट्रकविवर्यमुक्तेश्वरकृत

# महाभारत.

## २. सभापर्व.

श्रीमुक्तेश्वर कविवर यातें कोण न शुभेच्छु वंदील ? ।
बंदी लक्ष जयाचे, ज्याचें यश भव्य जेंवि मंदील. ॥
मोरोपंत–सन्मणिमाला.

हें


वामन दाजी ओक,

हेडमास्तर, हायस्कूल, रायपूर,


यांनीं अनेक हस्तलिखित प्रतींवरून शुद्ध करून, अर्थनिर्णायक, पुराणेतिहासविषयक व अवांतर माहितीच्या टीपा देऊन तयार केलें.

तें


मुंबईत जावजी दादाजी यांच्या 'निर्णयसागर' छापखान्याचे मालक तुकाराम जावजी यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

१८९४.

किंमत १ रुपया.

*(Registered under Act XXV of 1867.)*

[ All rights reserved by the publisher. ]

महाराष्ट्र भाषेचें व कवितेचें

आस्थापूर्वक अध्ययन

करूं पाहणाऱ्या सज्जनांस

हा ग्रंथ

सप्रेम अर्पण करतों.

'काव्यसंग्रह'कार.

# अनुक्रमणिका.


| अध्याय. | विषय. | ग्रंथसंख्या. | पृष्ठांक. |
|---|---|---|---|
| १ | मंगलाचरण, मयासुरप्रार्थना, मयार्जुनकृष्णसंवाद, सभास्थानविचार, कृष्णाचें द्वारकापुरीं प्रत्यागमन. | ९१ | १–७ |
| २ | मयदानवसभानिर्माण, सभावर्णन, सभाप्रवेश, नारदागमन. | १३३ | ८–२१ |
| ३ | नारदसंभाषण, नारदनीतिकथन. | १९९ | २१–३४ |
| ४ | इंद्रसभा, यमसभा, वरुणसभा, धनदसभा, ब्रह्मसभा, यांचें नारदमुखें सविस्तर वर्णन. | १८६ | ३४–५० |
| ५ | पांडुसंदेशकथन, हरिश्चंद्रयशोवर्णन, नारदप्रयाण, श्रीकृष्णागमन, राजसूययज्ञोपक्रम, जरासंधवधविचार, जरासंधप्रतापवर्णन. | १८१ | ५०–६४ |
| ६ | जरासंधोत्पत्ति, जराराक्षसीभाषण, युधिष्ठिरकृष्णसंवाद, मागधदेशीं कृष्णार्जुनभीमांचें प्रयाण, मागधपुरप्रवेश, कृष्णजरासंधसंवाद. | १६४ | ६४–७६ |
| ७ | युद्धोपक्रम, भीमजरासंधबाहुयुद्ध, जरासंधवध, श्रीकृष्णाचें द्वारकेंत प्रत्यागमन. | ११२ | ७६–८३ |
| ८ | पांडवदिग्विजय, अर्जुनाचा उत्तरदिग्विजय, अर्जुनाचें इंद्रप्रस्थीं प्रत्यागमन, भीमाचा पूर्वदिग्विजय व त्याचें इंद्रप्रस्थागमन, सहदेवदक्षिणदिग्विजय, नीलनृपकन्यावर्णन, अग्निप्रसाद, नकुलकृत पश्चिमदिग्विजय. | १६८ | ८३–९९ |
| ९ | कृष्णागमन, यज्ञसामग्रीसंपादन, आमंत्रणप्रेषण, आमंत्रित राजांचें आगमन, राजसत्कार, राजसूययज्ञसिद्ध्यर्थ कामांची व्यवस्था, यागकरण. | १६६ | ९९–१०८ |

| अध्याय. | विषय. | ग्रंथसंख्या. | पृष्ठांक. |
|---|---|---|---|
| १० | कृष्णाची अग्रपूजा, श्रीकृष्णवर्णन, शिशुपालक्रोध, तत्कृत भीष्मकृष्णाधिक्षेप, युधिष्ठिराशीं भीष्माचें भाषण, सहदेवोक्ति, वृकोदरकोपोक्ति. | १६० | १०८–११९ |
| ११ | शिशुपालभीष्मसंवाद, क्रुद्ध भीमाचें निवारण, भीमभीष्मसंवाद, शिशुपालोत्पत्ति, शिशुपालवध, तत्पुत्राभिषेक, श्रीकृष्णद्वारकागमन, राजसूययज्ञसमाप्ति, राजांचें स्वस्वनगरीं निवर्तन. | १०१ | ११९–१२६ |
| १२ | व्यासागमन, व्यासाचा धर्माला बोध, व्यासप्रयाण, भावी उत्पातसूचना, दुर्योधनसंताप, शकुनिदुर्योधनसंवाद, मयसभेंत दुर्योधनाची विटंबना, दुर्योधनविषाद, शकुनिधृतराष्ट्रसंवाद, कपटद्यूतद्वारा पांडवसंपत्तिहरणविचार, धृतराष्ट्रदुर्योधनसंवाद, पांडवसंपत्तिवर्णन, दुर्योधनस्वसंतापकथन, दुर्योधनक्षोभ. | २५३ | १२६–१४४ |
| १३ | शकुनिधृतराष्ट्रसंवाद, द्यूतानें पांडवसंपत्तिहरणाविषयीं शकुनीची प्रतिज्ञा, धृतराष्ट्रविदुरसंवाद, विदुराचा द्यूतनिषेधपर बोध, धृतराष्ट्राच्या आज्ञेनें विदुराचें पांडवांकडे आगमन, द्यूतसभानिर्माण, विदुरधर्मसंवाद, कुंतीची उक्ति, सकुटुंब धर्मराजाचें हस्तिनापुरीं आगमन, धर्मराजसत्कार. | ८० | १४४–१४९ |
| १४ | द्यूतसभाप्रवेश, द्यूतारंभ, विदुरकृत हितोपदेश, दुर्योधनकृत विदुराची निर्भर्त्सना, पणपूर्वक द्यूतक्रीडा, द्यूतांत धर्माचा पराजय, शकुनिकपटजाल, विदुराचा धृतराष्ट्राला | | |

| अध्याय. | विषय. | ग्रंथसंख्या. | पृष्ठांक. |
|---|---|---|---|
| | उपदेश, दुर्योधनाचा संताप, द्रौपदीपण, शकुनिजय, द्रौपदी कौरवांची दासी. | १७१ | १४९–१६० |
| १५ | विदुरकृत दुर्योधनभर्त्सन, प्रातिकामिदूताचें द्रौपदीला सभेंत आणण्यासाठीं प्रयाण, तिला आणण्यासाठीं दुःशासनाचें प्रयाण, द्रौपदीदुःशासनसंवाद, द्रौपदीकेशाकर्षण, तिची त्यास विनवणी व बोध, द्रौपदीचा भीष्मादिकांस प्रश्न, त्यांचें मौन, विकर्णाची स्पष्टोक्ति, पांडव व द्रौपदी यांच्या वस्त्रांचें हरण, श्रीकृष्णाचा धांवा, तिच्या लज्जेचें रक्षण, द्रौपदीचीं वस्त्रें दुःशासन ओढतो, श्रीकृष्णागमन, विदुराचें धृतराष्ट्रापाशीं भाषण, भीमाची दुःशासनवधप्रतिज्ञा, युधिष्ठिराचें धृतराष्ट्रापाशीं प्रयाण, द्रौपदीला वरलाभ, अर्जुनोक्ति, कर्णाचें निंदापर भाषण, धर्माचें इंद्रप्रस्थीं आगमन, धृतराष्ट्राची धर्माला विनंति. | २९० | १६१–१८१ |
| १६ | दुर्योधनचिंता, पुनर्द्यूतविचार, धृतराष्ट्रचिंता, अपशकुन, उत्पातदर्शन, द्यूतांत शकुनीचा जय आणि धर्माचा पराजय, पांडवांचा द्वादशवार्षिक वनवास व एक वर्ष अज्ञातवास, त्यांची वनांत जाण्याची सिद्धता, धर्मराजा सर्वांचा निरोप घेतो, विदुराचें कुंतीविषयीं पांडवांपाशीं भाषण, कुंतीचा विलाप, तिची द्रौपदीला विज्ञापना, विदुर पांडवांस पोंचविण्यास जातो. | १४० | १८१–१८९ |
| १७ | धृतराष्ट्रविदुरांचा पांडवगमननिमित्त संवाद, | | |

| अध्याय. | विषय. | ग्रंथसंख्या. | पृष्ठांक. |
|---|---|---|---|
| | नारदागमन, भावि कौरववंशनाशकथन, नारदाचें अंतर्धान, दुर्योधनकृत द्रोण-प्रार्थना, विदुरधृतराष्ट्रद्रोणांचा संवाद, संजयधृतराष्ट्रसंवाद, धृतराष्ट्राचे दुःखोद्गार. | ७४ | १९०–१९४ |
| | उपसंहार. | ११ | १९४–१९६ |

एकंदर ग्रंथसंख्या–२७००

# मुक्तेश्वरकृत महाभारत.

## २. सभापर्व.

### अध्याय पहिला.

#### मंगलाचरण.

(ओंव्या.)

**ज**यातें बोलती **प**रमात्मा । [1]**वि**ष्णु [2]**शं**कर अथवा **ब्र**ह्मा ।
जो असेल, तयाची प्रतिमा । व्यक्ताव्यक्त नमियेली. ॥ १ ॥
नमूं [3]**क**रवीरनिवासिनी । जे **म**हालक्ष्मी [4]विश्वजननी ।
जीचा [5]कटाक्षानुग्रहतरणी । नाशी [6]भवतमातें. ॥ २॥
जे [7]चिदादित्याची [8]चित्कळा । दरिद्रवन प्रलयज्वाळा ।
दासवत्सातें स्नेहाळा । कामधेनू कृपेची. ॥ ३ ॥
तीचा [9]लाहोनि वरदहस्त । संत सभेशीं झालों स्वस्थ, ।
जैसा सिंहाश्रयें [10]बस्त । [11]कुंजरमाथां मिरवतु. ॥ ४ ॥
वंदू **सो**नारी **भै**[12]रवें । तेणें दिधला हा गौरव ।
प्रेमें झालें मन कै[13]रवें । पदनखचंद्रीं जयाच्या. ॥ ५ ॥

---

१. आदिपर्वाच्या आरंभीं नमनाचा प्रकार असाच आहे. [आदिपर्व–अ० १ ओंव्या ५-६ पहा.] २. येथें ब्रह्मत्वानें सृष्टि, विष्णुत्वानें पालन, आणि शंकरत्वानें (रुद्रत्वानें) संहार अशा तीन अवस्थांचें वर्णन केलें आहे. ३. कोल्हापुर येथें निवास करणारी देवी. कोल्हापुरची महालक्ष्मी ही मुक्तेश्वरकवीची कुलस्वामिनी होय व कर्नाटकांतील सोनारीचा (सुवर्णपुरीचा) राजा (देव) बहिरोबा (भैरव) हा याचा कुलस्वामी होय. या दोन कुलदेवतांस अनुलक्षून मुक्तेश्वरानें अनेक ठिकाणीं उल्लेख केले आहेत:—'करवीरलक्ष्मी विष्णुभाजा । भैरव सुवर्णपुरींचा राजा । उभय कुळदैवतीं माझा । मस्तक पायीं स्पर्शिला.' ॥ ८ ॥ [मुक्तेश्वर–आदिपर्व-उपसंहार पृ० ४५६.], 'महालक्ष्मी कुलस्वामिनी । भैरवदेव दंडपाणी । त्याचे चरण चिंतितां मनीं । सिद्धी होती वोळगण्या'. ॥ [मुक्तेश्वर–वनपर्व–अ० १ ओंवी ३]. ४. विश्वाची (सकल जगताची) जननी (माता.) ५. दृष्टिरूप कृपासूर्य. 'जीचा कृपानुग्रहतरणी' असा अन्य पाठ आहे. ६. संसारांधकारातें. ७. चैतन्यसूर्याची. ८. चैतन्यकळा. ९. पावून. १०. बकरा. ११. कुंजराच्या (हत्तीच्या) माथां (मस्तकावर). १२. सुवर्णपुरीचा भैरव देव. १३. चंद्रविकासित कमल.

**लीला**[1]**विश्वंभर ईश्वरु । द**[2]**त्तात्रेय जगद्गुरु ।**
ज्याचेनि नामें भवसागरु । मागां तरले असंख्य. ॥ ६ ॥
आणीकही तरतील पुढां । जो ब्रह्मविद्येनें उदार गाढा ।
**ब्र**ह्मादिक ज्याचिये पाडा[3] । तुळितां उणे अपडे. ॥ ७ ॥
ज्याची कृपादृष्टी **भ**गवती, । अनुग्रह तोचि **ग**णाधिपती, ।
बोधप्रकाश गभस्ती[4] । हृदयाकाशीं झळकत. ॥ ८ ॥
जीवीं शिवत्व प्रकाशिलें । **वि**ष्णुमयचि विश्व केलें ।
एवं[5] पंचायतन भलें । म्यां देखिलें गुरुरूपीं. ॥ ९ ॥
तो म्हणे, 'रे ! कविकिंकरा ! । वाचाळपणें न बोले सैरा[6] ।
कथानिरोपणअधिकारा । सेवेसीं आम्हीं नेमिलें. ॥ १० ॥
त्या दाखविल्यानि पंथें चाले । बोलवूं तितुकें बोले ।
कवित्वगर्वाचेनि डौलें । डोलतां निंदा[7] पावसी.' ॥ ११ ॥
'जी ! जी ! प्रसाद[8]' म्हणोनि वेगीं । प्रणम्य[9] केलें साष्टांगीं[10] ।
हेंचि नमन श्रोतियांलागीं । एकचि भावें समस्तां. ॥ १२ ॥

## कथारंभ.

(ओंव्या.)

कवळोनि[11] अभिप्राय सर्व[12] । मागां कथिलें **आदिपर्व** । आतां अपूर्वापूर्व[13] ।
**सभापर्व** परियेसा. ॥ १३ ॥ **मुक्तेश्वरकवि भा**रत । टीका प्रांजळ व्यक्त ।
जेंवी वेदाचा मथितार्थ । श्रुती पुराणें बोलती. ॥ १४ ॥ जो राजयांतें वी-
ररस । विप्रवर्यांतें[14] वेदसारांश । तत्वार्थबोध परमहंस । योगेश्वर भाविती. ॥१५
बुद्धियुक्तींचा सागर । ऐसें मानिती मंत्री चतुर । विलासियातें शृंगार । सुर-

१. मुक्तेश्वरानें आपल्या मातापितरांच्या नांवांचा उल्लेख 'लीलाविश्वंभर' या समस्त पदानें आपल्या ग्रंथांत अनेक ठिकाणीं केला आहे. [आदिपर्व–अध्याय १ ओंवी १९९ पृ० १२; अध्याय २१ ओं० ८८ पृ० १८४; अध्याय २४ ओं० ११३ पृ० २११; अ० २६ ओं० १२२ पृ० २३२.] २. दत्तात्रेय हें याचें दैवत होतें असें दिसतें. ३. बरोबरीला, समतेला. ४. सूर्य. ५. याप्रमाणें, असें. ६. स्वैर, स्वच्छंद. ७. 'दंड' असाही पाठ आहे. ८. आदिपर्व–अध्याय १ ओंवी ९६ पहा. ९. 'प्रणाम केला अष्टांगीं' असा अन्य पाठ आहे. १०. आठ अंगांनीं युक्त असा. अष्टांग नमस्काराचें लक्षण दिलें आहे तें असें:—'जानुभ्यां च तथा पद्भ्यां पाणिभ्यामुरसा धिया । शिरसा वचसा दृष्ट्या प्रणामोऽष्टांग ईरितः ॥.' ११. धरून, घेऊन. १२. आदिपर्व–अध्याय १ ओंवी ९९ पहा. १३. अत्यंतचमत्कारपरिपूर्ण. १४. श्रेष्ठांतें.

तानंदवर्धका. ॥ १६ ॥ विद्याप्रवीण शास्त्रपंडित । कौतुकें मानिती कर्णामृत । दोषादोषीं यांचे [1]आर्त । पुरवी गंगेसारिखे. ॥ १७ ॥ पर्वतांमाजी [2]कनकमेरु । [3]तडागांमाजी क्षीरसागरु । [4]महाराष्ट्रांसी काव्यगुरु । हा गौरवु ये ग्रंथीं. ॥ १८ ॥ [5]व्याससवचन [6]इक्षुदंडु । गाळूनि सुरस सारांश गोडु । [7]देशभाषा वळिले लाडु । [8]नाबदेचे आवडी. ॥१९॥ ते जैसे [9]सुज्ञीं न सेवणें । तैं [10]अग्रहावांचूनि काय म्हणणें ? । [11]कळंकरेखेस्तव चांदणें । काय [12]चकोरीं [13]वाळिजे ? ॥ २० ॥ व्यासग्रंथगिरीचें सोनें । संस्कृत [14]खोटिये गाळूनि [15]मनें । देशभाषा घडिलें [16]लेणें । साहित्यरत्नीं सुजडित. ॥ २१ ॥ तें लेववितां कर्णभूषण । कां हो! परते करावे कान ?। श्रोते हो! तुम्ही विचक्षण । निर्मत्सर विचारा. ॥ २२ ॥ असो [17]उपचाराचिया गोष्टी । [18]संतकृपा अपार गांठीं । असतां अपराधांचिया कोटी । मुक्त असती आमुतें. ॥ २३ ॥ आतां [19]सात्विकभाव पांडवपत्नी । सद्भावना [20]यज्ञसेनी । कामादिक कौरवदुर्जनीं । सभास्थानीं गांजिली. ॥ २४ ॥ अनेक सावधानाचीं वसनें । फेडितां विकल्पदुःशासनें । निश्चय [21]विचारितां श्रीकृष्णें । चढोवाढीं [22]नेसविलीं. ॥ २५ ॥ तेंचि विस्तारें परिसिजे । आलस्य निद्रेतें [23]विसरिजे । [24]तापत्रयातें [25]निरसिजे । कथाश्रवणीं [26]साधकीं. ॥ २६ ॥ [27]आतां द्वितीयपर्वीची

---

१. आवड. २. सुवर्ण. ३. तडाग=तळें. ४. 'महाराष्ट्रकाव्यांसी गुरू' असा अन्य पाठ आहे. ५. कृष्णद्वैपायन व्यास. ६. उंसाचा दंड. ७. आदिपर्वांतही महाराष्ट्रभाषेसंबंधानें मुक्तेश्वरानें कसे उद्गार काढिले आहेत ते पहा. [आदिपर्व–अध्याय १ ओंव्या ८७-९९ पृ० ६.] ८. साखरेचे. ९. 'रसज्ञीं' असा अन्य पाठ आहे. १०. 'संस्कृताभिमानियें दोष देखणें' असा अन्य पाठ आहे. ११. डागाच्या ओळीसाठीं. १२. चकोरपक्षी चंद्रकिरणांचें पान करून राहतात असा कविसमय आहे. १३. टाकिजे. १४. खोट=धातूचा गोळा. (आटविलेल्या जुन्या धातूचा गोळा.) 'खोटीचें भांडें' हा शब्द फार प्रचारांतला आहे. १५. 'यत्नें' असाही पाठ आहे. १६. दागिना. १७. आदरार्थपर उक्तीच्या. १८. साधुकृपा. १९. हें 'रूपक' नामक अलंकाराचें सुंदर उदाहरण आहे. २०. द्रौपदी, यज्ञसेनकन्या. २१. करितां. २२. सभापर्वांतील मुख्य विषयाचें दिग्दर्शन या ओंवींत कवीनें केलें आहे. २३. 'दवडिजे' असाही पाठ आहे. २४. ताप तीन प्रकारचे आहेत ते असेः—आधिदैविक (देवतांच्या क्षोभापासून होणारा–जसा वीज पडणें), आध्यात्मिक (मनाच्या क्षोभापासून अथवा शरीराच्या रोगापासून होणारा–जसा खरूज, ताप), आणि आधिभौतिक (पृथ्वी, आप्, तेज, वायु आणि आकाश या पंचमहाभूतांच्या क्षोभानें होणारा–जसा भूकंप, अतिवृष्टि, समुद्रमर्यादोल्लंघन.) २५. नाशिजे. २६. मोक्षेच्छु भक्तांनीं. २७. 'मुक्तेश्वर भारती कथा' असाही पाठ आहे.

कथा । राजा [1]जन्मेजय [2]परिसता । [3]वैशंपायन विशेष वक्ता । अत्यादरें निरोपी. ॥ २७ ॥ खांडववनदहन महा आगीं । [4]मयदानव जळतां वेगीं । तेथें कृष्णार्जुन दोघीं । प्राणदानें सोडिला. ॥ २८ ॥ आज्ञा देऊनि स्वस्थळाप्रती । धाडितां येरू करी विनंती, । म्हणे, 'मी विद्यासमुद्र सुमती । ऋणें वचनें बांधलों. ॥ २९ ॥ तुमच्या उपकारा उत्तीर्ण । व्हावयालागीं कल्पी मन । जैसें विश्वेश्वरातें दीन । [5]अर्कपुष्पें तोषवी. ॥ ३० ॥ माझी विज्ञापना येकी । तेची मानोनि [6]हारीतकी । दयासमुद्रें कौतुकीं । अंगिकारिली पाहिजे. ॥ ३१ ॥ कांहीं सेवा सांगिजे मुखें । ते मी वंदीन निजमस्तकें । सिद्धी पाववीन [7]निःष्टंकें । स्वल्पकाळें स्वामिया! ॥ ३२ ॥ तुमच्या ठायीं सर्व सौख्यें । तुमचें ऐश्वर्य त्रिजगीं फांके । परी पिकलेंची पिके [8]हस्तोदकें । [9]शालीवन ज्यापरी.' ॥ ३३ ॥ [10]हरिमित्र म्हणे, 'अगा! मित्रा! । सर्व पावलों मी पवित्रा! । स्वगृहा जाऊनि [11]कलत्रा । संतोषवीं सहवासें. ॥ ३४ ॥ कृष्णार्जुनें रक्षिला प्राण । स्वमुखें करिसी गुणकीर्तन । यापरतें उचित कवण । करूं पाहसी सांग पां? ॥ ३५ ॥ आवडी असे आमुच्या ठायीं । तुझें स्मरण आमुच्या हृदयीं । [12]ओंवडी वाटेल ते समयीं । भेटी गोष्टीनें सांभाळीं. ॥ ३६ ॥ विशेष वाढवावया मोहो । करूं भाविसी उचित स्नेहो । तरी जें सांगे [13]रुक्मिणीनाहो । तें त्वां अवश्य करावें.' ॥ ३७ ॥ विचारूनियां यदुनायक । म्हणे, 'तूं [14]शिल्पविद्येचा जनक । तरी स्वहातें सभा एक । करूनि दावीं आमुतें.' ॥ ३८ ॥ ऐकतां कृष्णमुखींचें वचन । मयें केलें साष्टांग नमन, । म्हणे, 'जें इच्छित होतें मन ।

---

१. अर्जुनाचा प्रपौत्र आणि परीक्षितीचा पुत्र. २. श्रोता. ३. वैशंपायन–हा व्यास ऋषीच्या प्रसिद्ध चार शिष्यांपैकीं एक. हा यजुर्वेदाध्यायी होता व ह्यानें याज्ञवल्क्याला यजुर्वेद शिकविला. पुढें ह्या गुरुशिष्यांमध्यें कलह झाला व ह्यामुळें याज्ञवल्क्याला शिकविलेला यजुर्वेद त्यानें परत मागितला. त्या वेळीं याज्ञवल्क्यानें तो ओकून टाकला व वैशंपायनाच्या इतर शिष्यांनीं तित्तिरपक्ष्यांचे रूपानें त्याचें ग्रहण केलें. यावरून या वेदाला 'तैतीर्य' असें नांव पडलें. वैशंपायनाची पुराणवक्ता अशी फार ख्याति आहे. ह्यानेंच जनमेजय राजाला सर्व महाभारत सांगितलें हें सुप्रसिद्ध आहे. [आदिपर्व–अध्याय १ ओंवी ११५ पहा.] ४. मय नामक असुर. [आदिपर्व–अध्याय ५० पृ० ४४७-४५५ पहा.] ५. रुईच्या फुलानें. 'अर्ककुसुमें' असाही पाठ आहे. ६. हिरडा. ७. सर्वस्वी, यथासांग, परिपूर्णपणें. ८. हस्तनक्षत्राच्या उदकानें. ९. भातशेत. १०. अर्जुन. ११. स्त्रीला. [कलत्र=स्त्री. 'कलत्रं श्रोणिभार्ययोः' इत्यमरः.] १२. 'इच्छा' असा पाठभेद आहे. १३. रुक्मिणीचा नाहो (नवरा)=कृष्ण. १४. सभापर्व–अध्याय १ श्लोक ९-१२ पहा.

तेचि आज्ञा दीधली. ॥ ३९ ॥ शिल्पसृष्टीचा अपर[1] ब्रह्मा । मी असुरांचा वि[2]श्वकर्मा, । उभारूनियां दिव्य धा[3]मा । चोज[4] दाऊं जगातें. ॥ ४० ॥ चंद्रतेजाचें आटीव । जांबूनदाचें[5] ओतीव । पाषाण मृत्तिकेचें नांव । स्पर्शों नेदी सर्वथा. ॥ ४१ ॥ स्वहस्तें निर्मूनि सभालय । माजी दावीन भुवनत्रय । जें लक्षितां परम आश्चर्य । स[6]हस्रनयनें पाविजे. ॥ ४२ ॥ क[7]नकाचळातुल्य अ[8]वक्र । माजी रेखीन भूगोलचक्र । जें देखतां म्हणे शक्र, । 'स्व[9]र्ग येथें ठेंगणें.' ॥ ४३ ॥ म्हणाल सुवर्ण आणि रत्नें । ब[10]हुसाळ मिळती कवण्या यत्नें । साध्य होती ज्या प्रयत्नें । तो मी जाणें उ[11]पावो. ॥ ४४ ॥ पूर्वी क्षोभोनि क[12]मलाकांतें । निर्मूळ करितां दा[13]नवांतें । वृ[14]षपर्वे दैत्यनाथें । निजसंपत्ती प[15]ळविल्या. ॥ ४५ ॥ रत्नें भरूनियां सुवर्णघटीं । उत्तरे कै[16]लासगिरीच्या नि[17]कटीं, । मैनाकपर्वताचिये बेटीं । स्थान गूढ लक्षिलें. ॥ ४६ ॥ बिंदुसरोवर या नामें । तुळे सागराचिये उपमे, । त्यामाजी रत्नें उ[18]त्तमोत्तमें । आच्छादिलीं अपार. ॥ ४७ ॥ जांबूनदसुवर्ण लाटा । शैलशिखरा ऐसिया स[19]दटा । प्रवाळ मां[20]दुसमाजी सां[21]टा । लें[22]लामांचा अपार. ॥ ४८ ॥ स्प[23]र्शमणीचिया कोटी । बिंदुसरोवराचिया पोटीं, । निक्षेपि[24]ल्या त्या म्यां दृष्टीं । स्थान असें लक्षिलें. ॥ ४९ ॥ भूगर्भीच्या निक्षेपा[25]तें । द्यावया सामर्थ्य नरेंद्रातें । यालागीं आणावया येथें । शंका कांहीं असेना. ॥ ५० ॥ घेऊनि यक्षगणांचीं शतें । घटिकेमाजी आणीन येथें ।

---

१. दुसरा. २. विश्व हें कर्म ज्याचें तो, शिल्पपंडित मयासुर. [मय—हा असुरांचा शिल्पी आणि विश्वकर्मा हा देवांचा शिल्पी होय. याचें वसतिस्थान दिल्लीनजीक देवगिरीपर्वतावर असे. हा वज्रकामा आणि मंदोदरी यांचा पिता.] ३. गृहा. ४. कौतुक. ५. सुवर्णाचें. ६. इंद्रें. [इंद्रानें अहल्येशीं व्यभिचारकर्म केलें म्हणून तिच्या पतीनें (गोतममुनीनें) 'तुझ्या आंगास हजार (सहस्र) भगें पडतील' असा त्याला शाप दिला. तेव्हां त्यानें मुनीची बहुतप्रकारें आराधना केल्यावर मुनी प्रसन्न होऊन 'तीं भगें नेत्रें होतील' असा त्यास उःशाप दिला. या कारणास्तव इंद्राला 'सहस्रनेत्र' अशी संज्ञा आहे.] ७. मेरुपर्वतासारखा. [कनक+अचळ=सुवर्ण+पर्वत.] ८. सरळ. ९. स्वर्गालाही तुच्छ मानणारें असें. १०. विपुल, पुष्कळ. ११. उपाय. १२. लक्ष्मीपतीनें. १३. दैत्यांतें. १४. असुरांचा अधिपति. या वृषपर्वासुराची कन्या शर्मिष्ठा होय. १५. 'लपविल्या' असाही पाठ आहे. १६. कैलासगिरीच्या उत्तरेस मैनाकपर्वतावर बिंदुसरोवरीं वृषपर्वा नामक दानवानें आपली संपत्ति गदा इत्यादि सर्व अमोलिक वस्तुजात लपवून ठेविलें होतें. १७. समीपभागीं. १८. अतिउत्तम. १९. गच्च. २०. पेटीमध्यें. २१. संग्रह, संचय. २२. भूषणांचा. २३. परिस. २४. पुरून ठेविल्या. निक्षेप=ठेवा. २५. पुरून ठेवलेल्या द्रव्यातें.

आणीकही [1]अनर्घ्य तेथें । वस्तु असती [2]नरेंद्रा ! ॥ ५१ ॥ दैत्य मारूनियां समरीं । [3]मागधराजें आपुले करीं । गदा ठेविली जिच्या प्रहारीं । चूर्ण होती गिरि[4]कूटें. ॥ ५२ ॥ जे चित्रिली [5]कनकोदकें । रत्नरंगीं विचित्र टिबुकें । धरिती मुष्टीवरी माणिकें । महीमौल्य जडियेलीं. ॥ ५३ ॥ ते आणुनी [6]धर्मानुजा । वोपीन भीमा [7]पार्थाग्रजा । आणीकही [8]महाराजा ! । वस्तु एक परियेसीं. ॥ ५४ ॥ देवदत्त नामें शंख । वीरश्रियेचा [9]वर्धक । त्याचेनि घोषें [10]भूगोलक । नादावला दुमदुमीं. ॥ ५५ ॥ तो मी देईन अर्जुनातें । जेंवि कां पांचजन्य देवातें'. । ऐसें बोलोनियां [11]दोघांतें । वंदूनियां निघाला. ॥ ५६ ॥ मय गेलिया बिंदुसरोवरा, । केशव म्हणे कुंतीकुमरा, । 'प्रयाण करणें द्वारकापुरा । ऐसें हृदयीं वाटतसे. ॥ ५७ ॥ वसुदेवदेवकीचे चरण । पहावयालागीं इच्छी मन । तुझें घेऊनि आज्ञावचन । येचि काळीं जातसें.' ॥ ५८ ॥ धर्मराज करी विनंती, । 'जावोनि शीघ्र यावें पुढती । तुझा वियोग लक्ष्मीपती ! । अर्ध क्षण न साहे. ॥ ५९ ॥ आज्ञा द्यावया समर्थ [12]नोव्हे । जावोनि मागुती शीघ्र यावें, । चित्त आमुचें ठेवावें । पादपद्मीं आपुल्या.' ॥ ६० ॥ [13]कुंतीसी करूनि नमस्कार । सन्मानिला युधिष्ठिर । भीमार्जुनासीं उद्गार । प्रेमानंदें न धरवे. ॥ ६१ ॥ पुसोनि द्रौपदीसुभद्रेतें । कृपेनें [14]मौळें स्पर्शिलें हस्तें । आलिंगिलें सहदेवातें । नकुळासहित आवडीं. ॥ ६२ ॥ हृदयीं वसतां ध्यानमूर्ती । बाह्य प्रतिमा होतां परती । तरी वियोगाची खंती । सांडवेना सर्वथा. ॥ ६३ ॥ [15]उच्चैःश्रव्याचे [16]सहोदर चारी । तैसे [17]वाजी जुंपिले [18]रहंवरीं । दारुक सारथी निजकरीं । मनोवेगीं चालवितु. ॥ ६४ ॥ रत्नचाकें सुवर्ण[19]गुढार । माजी शोभला [20]लक्ष्मीवर । गरुडपाचूचे मनोहर । गरुडध्वज [21]झळकतु. ॥ ६५ ॥ धवळ शंख मंगळ[22]तुरें । भक्त गर्जती जयजयकारें । आशी-

---

१. अमोलिक. २. 'महेंद्रा !' असा पाठभेद आहे. ३. जरासंधानें. ४. पर्वतांचीं शिखरें. ५. सुवर्णाचे उदकानें. ६. धर्माच्या अनुजाला (धाकट्या भावाला). ७. अर्जुनाच्या वडील भावाला. ८. हे कृष्णा. ९. वाढिवणारा. १०. 'भूलोक' असाही पाठ आहे. ११. कृष्ण व धर्म यांतें. १२. नाहीं. १३. सभापर्व–अध्याय २ श्लो० २-४ पहा. १४. मस्तक. १५. उच्चैःश्रवा=इंद्राचा अश्व. [उच्चैः श्रवसी यस्य । उच्चैः शृणोति । उच्चैर्महत् श्रवो यशो यस्य । असे भिन्न विग्रह आढळतात. हें हयरत्न श्वेतवर्ण, सप्तमुख, समुद्रजात आणि उन्नतकर्ण होतें असें वर्णन आहे.] १६. बंधु. १७. घोडे. १८. उत्तम रथीं. १९. गुढार=अंबारी. २०. कृष्ण. २१. 'मिरवला' असाही पाठ आहे. २२. वाद्यें.

र्वचनीं ऋषेश्वरें । शुभ कल्याण बोलती. ॥ ६६ ॥ राहवूनि समस्तांतें । प्रयाण केलें लोकनाथें । मार्ग क्रमोनि भोगभरितें । द्वारावती ठाकिली. ॥ ६७ ॥ वैकुंठ मानुनी विराम । जेथील वस्ती [1]सुखाड परम । भावोनि निर्विकार ब्रह्म । सगुण झालें [2]मीरासी. ॥ ६८ ॥ वाराणसी वरील तिसरी । सप्तम मोक्षाची पायरी । ज्ञान स्वरूप तीमाझारी । आत्माराम वसतसे. ॥ ६९ ॥ तें स्थळ वर्णूं जातां तोंडें । निगम आटला खंडविखंडें । [3]पातालकुहरामाजी दडे । लाजोनियां [4]अनंत. ॥ ७० ॥ ध्यानीं कल्पितां नये व्यक्ती । न कळे शास्त्राचिये युक्ती । ते हे प्रत्यक्ष ब्रह्ममूर्ती । जन देखती द्वारके. ॥ ७१ ॥ असो. अंतर द्वारकापुरीं । प्रवेशोनि विवेकद्वारीं । [5]सुधर्मसभेमाझारीं । यादवपंक्ती दे[6]खिल्या. ॥ ७२ ॥ [7]दैवी संपत्तीचे सद्गुण । तेची यादव सुहृज्जन । स्नेहें अवलोकी श्रीकृष्ण । स्वानंद पूर्ण समस्तां. ॥ ७३ ॥ दिव्य मुगुटीं रत्नकिरण । तेणें उजळिले वसुदेवचरण, । नमस्कारोनि उग्रसेन । [8]रेवतीरमण वंदिला. ॥ ७४ ॥ सात्यकी प्रद्युम्न सांब गदु । आलिंगिले पुत्र बंधु । ते वेळे जनाचा [9]आल्हादु । ब्रह्मांडघटीं [10]नं समाय. ॥ ७५ ॥ कामधेनूचिया कांसे । वत्सें निघती [11]अतिसौरसें । तेंवी देवकीनें संतोषें । आत्माराम [12]कवळिला. ॥ ७६ ॥ नमस्कारूनियां जननी । मग प्रवेशला रुक्मिणी[13]भवनीं । जेंवी कां शेषाचिया शयनीं । रमारमण [14]विश्रामे. ॥ ७७ ॥ मयें आणूनि सर्व सामुग्री । सभा निर्मिली कवणे परी । तें निरोपण रसाळ चतुरीं । परमानंदें परिसणें. ॥ ७८ ॥ इति श्रीसभापर्व भारत । मुक्तेश्वरकविविरचित । सर्व दोष दवडूनि देत । सुख [15]सायुज्य श्रोत[16]यां. ॥ ७९ ॥

---

१. सुखदायक. २. वतनदार. ३. पातालगुहेमध्यें. ४. शेष. ५. देवसभेंत. ६. 'बैसल्या' असाही पाठ आहे. ७. दैवी संपत्ति=तेज, क्षमा, धैर्य, शौच, अद्रोह, मानीपणा न धरणें, या गोष्टी दैवी संपत्ति भोगण्याला जो जन्मला आहे त्याला मिळतात असें दैवी संपत्तीचें वर्णन आहे. [भगवद्गीता–अध्याय १६ श्लो० ३.] ८. बळराम. ९. 'आनंदू' असा अन्य पाठ आहे. १०. न मावे. ११. मोठ्या हौसेनें, गोडीनें. १२. आलिंगिला. १३. घरीं. १४. विश्रांति घेई. १५. सायुज्य मुक्तीचें सुख. सलोकता, समीपता, सरूपता व सायुज्यता असे मुक्तीचे चार प्रकार आहेत. उपास्य देवतेच्या लोकीं राहणें ती सलोकता; उपास्य देवतेच्या संनिध राहणें ती समीपता; उपास्य देवतेचें व आपलें स्वरूप व गुण सारखे होणें ती सरूपता; आणि उपास्य देवतेमध्यें (ब्रह्मीं) मिळून लीन होणें ती सायुज्यता. १६. 'इति श्रीमद्भारते शतसहस्रसंहितायां वैयासक्यां सभापर्वव्यासोक्तौ मुक्तेश्वरकृतटीकायां श्रीकृष्णार्जुनमयदानवसंवादो नाम प्रथमोऽध्यायः' असा समाप्तिलेख चार जुनाट पोथ्यांच्या अखेरीस आहे.

## अध्याय दुसरा.

वैशंपायन म्हणे आर्ती[1], । 'जन्मेजया ! विशाळकीर्ती । ऐकें सुजाणा ! च[2]क्रवर्ती । कथा पुढलिया सादरें. ॥ १ ॥ घेऊनि यक्षगणाचा मेळा । मय पा[3]तला मैनाकाचळा, । बिं[4]दुसरोवर देखिलें डोळां । अतिरमणीय साजिरें. ॥ २ ॥ सुवर्णशृंगांचे पर्वत । रत्नशिखरें विराजित । कल्पवृक्ष पारिजात । असंख्यात दाटले. ॥ ३ ॥ सदा पुष्पित तरु फळले, । परिमळें दिग्मंडळ दाटलें, । परम सुकृती सु[5]कृतबळें । पक्षी झाले ते वनीं. ॥ ४ ॥ पूर्वी पवित्र राजेश्वरीं । इंद्रादिक सुरासुरीं । यज्ञ केले ती सामुग्री । उरली अपार पडली असे. ॥ ५ ॥ सुवर्णरत्नांचिया राशी । भव्य दक्षणा देतां ऋषीं । उ[6]बगोनि सांडिलें धनासी । नेता घेता असेना. ॥ ६ ॥ हेमकुंडें हेममंडप । हेम[7]चैत्य हेम[8]यूप । शाला निके[9]तनें अ[10]मूप । हेमरत्नीं बांधिलीं. ॥ ७ ॥ बालार्क कंदा निघाले कोंब । तैसे रत्नमणींचे खांब । विशाळवेदिका शातकुंभ- । [11]जांबूनदें निर्मिले. ॥ ८ ॥ [12]पद्मसहित [13]पद्मनेत्र । तपें आचरोनि पवित्र । स[14]हस्र वर्षें दीर्घ स[15]त्रें । आचरला ते ठायीं. ॥ ९ ॥ पूर्वी तेथेंचि भगीरथ नृपु । तपस्तेजें [16]कं-

---

१. आवडीनें. २. सार्वभौम. [चक्रवर्ती पुरुषाचें लक्षण सामुद्रिक ग्रंथांत आहे तें:—'अतिरक्तः करो यस्य ग्रथितांगुलिको मृदुः । चापांकुशांकितः सोऽपि **चक्रवर्ती** भवेद्ध्रुवम् ॥' (राघवभट्टकृत 'अर्थद्योतनिका' नामक अभिज्ञानशाकुंतलटीका—अंक ७ श्लोक १६ पृष्ठ २४३.) चक्रवर्ती= चक्रे भूमंडले राजमंडले वा वर्तयितुं शीलमस्य। यद्वा चक्रं सैन्यं वर्तयितु सर्वभूमौ चालयितुं शीलमस्य । अवश्यं वा चक्रं वर्तयति । असे या शब्दाचे विग्रह आढळतात.] ३. सभापर्व—अध्याय २ श्लो० ९-१० पहा. ४. "बिंदुसरोवर हें अहमदाबादेपासून ३० कोसांवर सिद्धपूर येथें आहे. त्यास मातृगया ह्मणतात. कारण कीं, येथेंच कपिलमहामुनि यांनीं आपली देवहूती माता इजला ज्ञान सांगून मोक्षास नेलें. तेथें जे तिचे अश्रु पडले त्यांचेंच हें सरोवर आहे असें ह्मणतात. तें लहान आहे. या गांवीं सरस्वती नदी आहे ती फार सुंदर आहे. सिद्धराज जयसिंग ह्मणून जो पाटणचा राजा झाला, त्यानें येथें घांट व रुद्रमाल ह्मणून चमत्कारिक इमारत बांधली आहे. परंतु ती हल्लीं पडित आहे." [लोकहितवादीकृत ऐतिहासिक गोष्टी—भाग २ पृ० ४ पहा.] ५. पुण्याच्या सामर्थ्यानें, पुण्याईच्या जोरावर. ६. कंटाळून. ७. सुवर्णाचें यज्ञस्थान. (अध्याय २ श्लोक १२.) ८. सुवर्णाचा यज्ञस्तंभ. ९. गृहें. १०. पुष्कळ. ११. सुवर्णें. १२. लक्ष्मीसहित. १३. परमेश्वर. १४. 'सहा वर्षे दीर्घ सूत्र' असाही पाठ आहे. १५. पुष्कळ दिवस चालणारें सत्र (यज्ञ). १६. कृश करतां, ओढून काढितां.

षिंतां वपु । प्रसन्न होऊनि [1]कंदर्परिपु । [2]गंगाप्रसाद दीधला. ॥ १० ॥ [3]नरनारायण चतुरानन । यमधर्म [4]महेशान । त्रिश्वपाळणालागीं यज्ञ । [5]तेचि ठायीं आचरले. ॥ ११ ॥ प्रयुत अर्बुद पद्म संख्येत । खर्व निखर्व शतानुशत । हि[6]रण्यदक्षिणेचिया गणित । सृष्टिकर्त्या न करवे. ॥ १२ ॥ असो. ते अपरमित सामोग्री, । रत्नसुवर्णें कोटीवरी । देऊनि यक्षगणांचे शिरीं । मयदानव पातला. ॥ १३ ॥ सूर्यकांत सोमकांत । काश्मीरगर्भ शुद्ध धूत । स्फटिक स्तंभावरी शोभत । [7]स्फटिकफळिया शुद्ध शिळा ॥ १४ ॥ हिरे माणिकें मुक्ताफळें । [8]पुष्कराज गोमेद निळें । [9]पाचू वैडूर्य सुढाळें । [10]नानारत्नें अपार.॥१५॥ स्वयंभू रत्नांचे रांजण । पद्मरागें भरले पूर्ण । ऐसे घेऊनि राक्षसगण । [11]शक्रप्रस्था पातले. ॥ १६ ॥ अष्ट [12]मुक्ताफळाच्या जाती । मेघ मच्छ सर्प हस्ती । वंश शंख वराह शुक्ती । यांपासाव [13]जन्मले कां ॥ १७ ॥ [14]गदा वोपिली भी-

---

१. महादेव. २. भागीरथीरूप प्रसाद. ३. सभापर्व–अध्याय ३ श्लोक १५ पहा. ४. स्थाणु. ५. बिंदुसरोवराच्या ठायीं. ६. सुवर्णदक्षिणेच्या. ७. 'स्फटिक शिळा चौफाळा' असाही पाठ आहे. ८. रत्नविशेष. ९. तेजस्वी, चकचकित. १०. 'नवरत्नें' असाही पाठ आहे. ११. इंद्रप्रस्थग्रामांत. इंद्रप्रस्थ–हिंदुस्थानाच्या उत्तरेकडे दिल्ली म्हणून यमुनेच्या कांठीं जें प्रसिद्ध शहर आहे त्याच ठिकाणीं भारतीयुद्धांत प्रसिद्धीस आलेलें इंद्रप्रस्थ नांवाचें शहर होतें. या शहराच्या सभोंवार खांडवप्रस्थ नांवाचें अरण्य होतें. पांडवांचा आपल्या मुलांबरोबर कलह होऊं नये, म्हणून धृतराष्ट्रानें, 'या ठिकाणीं शहर वसवून राहा,' असें पांडवांस सांगितलें. पुढें पांडवांनीं तें शहर वसविलें व त्याची रचना सर्वोत्कृष्ट झाल्यामुळें, त्याला 'शक्रप्रस्थ' असेंही म्हणूं लागले. भारतांतील प्रसिद्ध गोष्टी ज्या मयासुरसभा आणि राजसूययज्ञ, त्या याच ठिकाणीं घडल्या. हस्तिनापुराप्रमाणें इंद्रप्रस्थ हेंही कुरुदेशाच्या राजधानीचें शहर होतें. (भरतस्थलादर्श–पृष्ठ३१.) (मुक्तेश्वरकृत आदिपर्व–अध्याय ४६ ओंव्या १-२० पहा.) १२. मोत्यांचीं उत्पत्तिस्थानें आठ आहेत:—'करींद्रजीमूतवराहशंखमत्स्याहिशुक्त्युद्भववेणुजानि । मुक्ताफलानि प्रथितानि लोके तेषां तु शुक्त्युद्भवमेव भूरि ॥' [कुमारसंभव–सर्ग १ श्लोक ६ टीका.] या श्लोकाचें पद्यात्मक भाषांतर:–(साक्या) 'वारणिं, शंखीं, जलदीं, वंशीं, सर्पाच्या शीर्षात । वराहिं, मत्स्यीं, शुक्तीमाजी मुक्ता उद्भवतात. ॥ १ ॥ सर्वांमाजी शुक्तिज मुक्ता प्रसिद्ध लोकीं फार । कविसमयां या योजूनि कवितें शोभविती कवि थोर. ॥ २ ॥' याचा भावार्थ:– करींद्र=गजश्रेष्ठ, जीमूत=मेघ, वराह, शंख, मत्स्य, अहि=सर्प, शुक्ति (शिंपा), आणि वेणु=वंश, यांपासून उत्पन्न होणारीं मोत्यें लोकांत प्रसिद्ध आहेत, त्यांत शुक्तिजात मुक्ताफळें पुष्कळ उत्पन्न होतात. १३. 'जे हो कां' असा अन्य पाठ आहे. १४. सभापर्व–अध्याय ३ श्लोक २१ पहा.

मसेना, । देवदत्त शंख दिधला अर्जुना, । मुहूर्त अवलोकोनि रचना । सभामंडपा मांडिली. ॥ १८ ॥ अठरा सहस्र राक्षस बळी । सामुग्री द्यावया तात्काळीं । मयें ठेविले हाताजवळीं । चपळ चतुर जाणते. ॥ १९ ॥ किष्कु[1] म्हणिजे गूढ शब्द । पुरुषहस्तप्रमाण प्रसिद्ध । दाहासहस्र लांब रुंद । सूत्रप्रमाण [2]मंडपा. ॥ २० ॥ [3]ध्वज धूम [4]शुनक [5]वृष । खर कुंजर [6]ध्वांक्ष [7]मृगेश । [8]गृहीं रक्षिजे विशेष । वास्तुविधानीं बोलिजे. ॥ २१ ॥ अष्ट आय साधिले [9]निगुंतीं । अष्टौ [10]लोकपाळांच्या मूर्ती । अष्टकोनीं ठेविल्या दीप्ती । अष्ट आदित्य

१. किष्कु=हात. ['किष्कुर्हस्ते वितस्तौ च' इत्यमरः। 'किष्कुर्द्वयोर्वितस्तौ च सप्रकोष्ठकरेऽपि च' इति मेदिनी.] २. "या अग्निप्रलयापासून अर्जुनानें नमुचीचा बंधु मयासुर याचें रक्षण केलें म्हणून ते उपकार फेडण्याकरितां मयासुरानें मोठ्या कुशलतेनें एक उत्तम सभा (सभामंडप) पांडवांकरितां बांधिली. ती दहा हजार हात चौरस होती व ती बांधण्याचें काम सुमारें चवदा महिने चाललें होतें असें पुढील वचनांत आहेः—'सर्वर्तुगुणसंपन्नां दिव्यरूपां मनोरमाम् । दश किष्कुसहस्रां तां मापयामास सर्वतः ॥ २१ ॥ [सभापर्व—अध्याय ३.] ईदृशीं तां सभां कृत्वा मासैः परिचतुर्दशैः । निष्ठितां धर्मराजाय मयो राजन्न्यवेदयत् ॥ ३७॥ [सभापर्व—अध्याय ३.]' (कै० ज० बा० मोडककृत महाभारतावरील व्याख्यान.) ३. गृहादिक बांधावयाचें असतां जें चतुरस्र क्षेत्र साधितात त्याच्या क्षेत्रफळास आठांनीं भागून जें शेष राहतें त्यास ध्वजादिक 'आय' अशी संज्ञा आहे. वर जे आय सांगितले आहेत ते अनुक्रमानें नाहींत. हे 'मुहूर्तचिंतामणि'ग्रंथांत (१) ध्वज (२) धूम (३) सिंह (४) श्वान (५) वृषभ (६) खर (७) कुंजर (८) ध्वांक्ष या क्रमानें आहेत. आतां या आठांतून विषमस्थानचे आय गृहादिक बांधण्यास शुभ आणि समस्थानचे अशुभ म्हणजे पहिला, तिसरा, पांचवा, सातवा हे शुभ आणि दुसरा, चौथा, सहावा, आठवा हे अशुभ असें आहे. 'मुहूर्तमाला' नामक ग्रंथांत या आयांचा क्रम असा आहेः—'ध्वजधूमसिंहकुकुरवृषखरगजवायसा अष्टौ । आयास्तेषां विषमः श्रेष्ठस्तं कल्पयेदिष्टम्. ॥ [मुहूर्तमाला—वास्तुप्रकरण—श्लोक ७ पृष्ठ १९५.] याचा भावार्थः—ध्वज, धूम, कुकुर (कुतरा-श्वान), वृष (बैल), खर (गर्दभ) आणि वायस (कावळा) असे आठ आय आहेत. त्या आठ आयांमध्यें ध्वजसिंहादिक जे विषम आय आहेत ते श्रेष्ठ होत, यास्तव वास्तुनिर्माणकार्यांत विषम स्थानीं इष्ट आय कल्पावा. वराहमिहिरकृत '**बृहत्संहिते**'च्या त्रिपंचाश (त्रेपन्नाव्या) अध्यायांत 'वास्तुविद्ये'विषयीं चांगली माहिती दिली आहे ती इष्ट तर पहावी. [बृहत्संहिता—पृष्ठ २८१-३०३.] ४. कुतरा. ५. बैल. ६. कावळा. ७. सिंह. ८. गृह बांधण्याच्या कामीं. ९. यथार्थ, निभ्रांत. १०. दिक्पाल हे आठ आहेत. ['इंद्रो वन्हिः पितृपतिर्नैर्ऋतो वरुणो मरुत् । कुबेर ईशः पतयः पूर्वादीनां दिशो क्रमात् ॥.' १ इंद्र (पूर्वेचा), २ वन्हि (आग्नेयीचा), ३ यम (दक्षिणेचा), ४ निर्ऋति (नैर्ऋतीचा), ५ वरुण (पश्चिमेचा), ६ वायु (वायवीचा), ७ कुबेर (उत्तरेचा), ८ ईश (ईशान्यीचा).]

पैं जैसे. ॥ २२ ॥ [1]पाया शोधूनि धरातळीं। तळवट बांधिला रत्न[2]प्रवाळीं । त्यावरी स्फटिकांचिया ओळी । विशाळ पौळिया उभविल्या. ॥ २३ ॥ सप्तरंगीं विशाळ शिळा । कोरीव टेंकिल्या अंतराळा । त्याबाहेर जनाच्या डोळां । चित्र विचित्र [3]भासती. ॥ २४ ॥ [4]नवरत्नांचिया चिरियावरी। जडित जोडिल्या कळा[5]कुसरीं । जेंवि उगवली ये[6]कसरीं । रविमंडळें आकाशीं. ॥ २५ ॥ इंद्रनीळाचे अखंड हस्ती । गाड्या रचिल्या [7]चक्राकृती । त्यावरी मांडिली आयती । मंडपाची विचित्र. ॥ २६ ॥ [8]पद्मरागाचे तोळंबे । पायीं दडपिले [9]मरगजस्तंभें । म्हणऊनि वज्रमणीचे क्षोभें । वरी उथाळीं [10]वळंघती. ॥ २७ ॥ जांबूनदाचे तुळवट । गरुडपाचूच्या किलचापाट । [11]पेरोजांचे उंबरवट । कनकोदकें चित्रिले. ॥ २८ ॥ पुष्कराजाच्या सुरेखा । चौकटी जडल्या अमोलिका । माणिकाच्या विनायका । अष्ट भुजीवरौते. ॥ २९ ॥ घोंटीव पाचूचे पाषाणीं । चौक साधिला मंडपांगणीं । ढाळोनि सोनियाचें पाणी । [12]कमळवेली रेखिल्या. ॥ ३० ॥ गोमे[13]दांचिया [14]मजालसा । वरी बैसका राजहंसा । कामाविल्या आकृती ठसा । मुक्ताफळीं सोज्वळ. ॥ ३१ ॥ वदनीं विद्रुमराजहंस । धरिले मुक्ताफळांचे घोंस । नीळ रत्नाचे डोळस । [15]नीळकंठ चित्रांग. ॥ ३२ ॥ शुद्ध पाचूचीं पाखरें । मुखीं माणिकें मनोहरें । रत्नमणीचीं [16]सालंकारें । जंबूफळें कर्पिलीं. ॥ ३३ ॥ हस्तलाघवकळेची थोरी । मयूर नाचती किंकारीं । पुतळिया गाती [17]सप्तस्वरीं । नृत्य करिती [18]सुताळें. ॥ ३४ ॥ सभानायकाचें चोज । पुत-

---

१. पाया कसा घालावा इत्यादि वर्णन बृहत्संहितेंतील 'वास्तुविद्या' नामक अध्यायांत आहे. २. प्रवाळ=पोंवळें. ३. 'आभासे' असा अन्य पाठ आहे. ४. नऊ रत्नें हीं—'मुक्ताफलं हिरण्यं च वैडूर्यं पद्मरागकम् । पुष्परागं च गोमेदं नीलं गारुत्मकं तथा । प्रवालयुक्तान्युक्तानि महारत्नानि वै नव ॥'; दुसरा पाठ—'मुक्तामाणिक्यवैदूर्यगोमेदा वज्रविद्रुमौ । पद्मरागो मरकतं नीलश्चेति यथाक्रमम् ॥.' ५. कुशलपणानें. ६. एकदम. ७. 'चित्राकृति' असा अन्य पाठ आहे. ८. पद्मराग=एक प्रकारचें माणिक. ९. मरगज=मरकत=पाच. १०. आश्रय करतात. ११. रत्नविशेषाचे. १२. 'कमलवल्ली' असा दुसरा पाठ आहे. १३. गोमेद=रत्नविशेष. १४. राजांगण. १५. मोर. १६. 'साकारें' असा अन्य पाठ आहे. १७. सात स्वर आहेत:—'निषादर्षभगांधारषड्जमध्यमधैवताः । पंचमश्चेत्यमी सप्त तंत्रीकंठोत्थिताः स्वराः ॥' (अमरकोश.) 'षड्जं रौति मयूरस्तु गावो नर्दंति चर्षभम् । अजाविभे च गांधारं क्रौंचो नदति मध्यमम् ॥ पुष्पसाधारणे काले कोकिलो रौति पंचमम् । अश्वस्तु धैवतं रौति निषादं रौति कुंजरः ॥.' १ नि–निषाद–हा

ळिया करिती चिंतिलें काज । महिष कुंजर जुंझती जुंझ । आज्ञा होतां प्रभूची. ॥ ३५ ॥ मरगजस्तंभीं सिंहमूर्ती । [1]साचारासारख्या हुंकारती । जिव्हा नखें दंत दीप्ती । पद्मरागें झळकती. ॥ ३६ ॥ [2]तोळ मृदंग वाद्यें प्रास । रागोद्धारीं वीणे सुरस । लेपें वाजविती विशेष । कळा विश्वकर्म्याची. ॥ ३७ ॥ कौस्तुभमणी सीमंतमणी । [3]खेवणीं जडिलीं खणोखणीं । यालागीं प्रवर्तल्या [4]रजनी । काज नाहीं दीपाचें. ॥ ३८ ॥ सुवर्णमणीचीं शिखरें । तेंवी शतखणी [5]दामोदरें । प्रवेश करितां [6]जळधरें । सूर्यकिरणें शंकती. ॥ ३९ ॥ मेघीं [7]तळपती [8]सौदामिनी । तैशा पताका झळकती गगनीं । कनककलशांचिया श्रेणी । हिणाविती [9]ग्रहातें. ॥ ४० ॥ पद्मरागाचीं कपाटें । [10]शृंगार श्रियेचीं अधरपुटें । स्तंभ दशनींचे न संठे । तेज फांके उघडितां. ॥ ४१ ॥ ज्योती हिरियाची विशाळ । चित्रशाळा विश्रामस्थळ । [11]वलभीवरी [12]गोळांगुळ । [13]अतिविचित्र शोभती. ॥ ४२ ॥ मोल विसरोनि नामगुणिया । [14]लसणे सूदले पाउठणिया । सुवर्ण सुगंध बैसोनियां । वरी सन्मानें जडियेली.

---

शब्द हत्तीचा, याचें नाभिस्थान; २ रि–ऋषभ–हा शब्द गाईचा, याचें नासिकास्थान; ३ ग–गांधार–हा शब्द शेळीचा, याचें स्थान गाल; ४ सा–षड्ज–हा शब्द मोराचा, याचें नाभिस्थान. ['नासाकंठमुरस्तालु जिव्हां दंतांश्च संस्पृशन् । षड्भ्यः संजायते यस्मात्तस्मात्षड्ज इति स्मृतः ॥' नाक, कंठ, ऊर, तालु, जिव्हा आणि दांत या सहा स्थानांपासून होणारा तो षड्ज.] ५ म–मध्यम–हा शब्द क्रौंच पक्ष्याचा, याचें हृदयस्थान; ६ ध–धैवत–हा शब्द अश्वाचा, याचें ललाटस्थान; ७ प–पंचम–हा शब्द कोकिलाचा–याचें कंठस्थान वसंतकाळांत. [नाभीपासून उत्पन्न झालेला जो वायु, ऊर, हृदय, कंठ आणि मूर्धा यांमधून जातो तो पंचम.] हे सात स्वर तंत्रीपासून आणि कंठांतून उत्पन्न होतात. या स्वरांविषयीं सविस्तर विवेचन भारतीय नाट्यशास्त्र–अध्याय २८ यांत पहावें. १८. 'सुस्वरें' असा अन्य पाठ आहे.

१. खऱ्यासारख्या. (सजीवासारख्या.) २. 'टाळ' असा अन्य पाठ आहे. ३. रत्नविशेष. ४. रात्र. ५. 'गोपुरें' असाही पाठ आहे. ६. मेघें. ७. चकाकतात, शोभतात. ८. विजा. ९. 'नक्षत्रातें' असा अन्य पाठ. १०. 'शृंगारी स्त्रियेचीं' असाही पाठ आहे. ११. घराचे शाकारास आधारभूत जें कडणी, वासा, वगैरे त्याजवर. 'भिंतीवरी' असा पाठभेद आहे. १२. माकडें. १३. 'विचित्र रंगीं खेळती' असा पाठभेद आहे. १४. पेरोज, रत्नविशेष.

॥ ४३ ॥ सुदृढ सुवर्णाचिया भिंती । चतुर्दश[1] भुवनाची आकृती । कुसरिये[2] जडली रत्नदीप्ती[3] । साच कीं चित्र लक्षेना. ॥ ४४ ॥ पाचुरत्नीं विष्णुभुवना । पुष्कराजब्रह्मसदना । हिरे मुक्तें शिवस्थाना[4] । कर्पूरगौर गणेशा. ॥ ४५ ॥ इंद्र चंद्र वरुण कुबेर । यम वायु वन्ही भास्कर । गण गंधर्व यक्ष किन्नर । मनोहर काढिले. ॥ ४६ ॥ मत्स्य कूर्म वराह स्थळें । शेष वासुकी फणिपाळ-कुळें[5] । रेखिलीं सप्तही पाताळें । त्रिविक्रम बळीसीं. ॥ ४७ ॥ द्वीपें खंडें शैल[6] सागर । काननें सरिता[7] मनोहर[8] । छपन्नदेशींचे राजेश्वर । मनुजाकृती विचित्र. ॥ ४८ ॥ लिहिलें रामायण भारत[9] । अवतारचरित्र भागवत । शक्ती-आख्यानें अद्भुत । असुर सुर रेखिले. ॥ ४९ ॥ [10]योगी सिद्ध चौऱ्यांसीं आ[11]-सनें । तितुकीं कामशास्त्राचीं[12] भिन्नें । देखतां अभ्यासमार्गीं मनें । योगीं भोगीं

---

१. चौदा भुवनें=सात लोक किंवा सप्तस्वर्ग आणि सात पाताळ मिळून चवदा भुवनें:—अतल, वितल, सुतल, महातल, रसातल, तलातल आणि पाताल अशीं सात पाताळें; भूर्लोक (मृत्युलोक), भुवर्लोक (पृथ्वीपासून सूर्यापर्यंतचा भाग—येथें मुनि, सिद्ध इत्यादि राहतात), स्वर्लोक (स्वर्गलोक, सूर्यमंडळापासून ध्रुवापर्यंतचा भाग—येथें देवांसह इंद्र राहतो), महर्लोक (सूर्यगोल व इतर तेजस्वी भाग), जनर्लोक (येथें ब्रह्मदेवाचे पुत्र राहतात), तपर्लोक (येथें तपश्चर्या करणारे राहतात), सत्यलोक (येथें ब्रह्मदेव आणि ऋषिजन राहतात). २. कुशलतेनें. ३. 'रत्नमूर्ति' असाही पाठ आहे. ४. 'स्वस्थाना' असा अन्य पाठ आहे. ५. सापाचीं कुळें. ६. पर्वत. ७. नद्या. ८. 'सरोवर' असाही पाठ आहे. ९. व्यासकृत महाभारत नामक ग्रंथ. (या ग्रंथास 'महाभारत' अशी संज्ञा पडण्याचें कारण दर्शविलें आहे तें असें:—'चत्वारश्चैकतो वेदा भारतं चैतदेकतः । पुरा किल सुरैः सर्वैः समस्य तुलया धृतम् ॥ चतुर्भ्यः सरहस्येभ्यो वेदेभ्योऽप्यधिकं यदा । तदा प्रभृति लोकेऽस्मिन्महाभारतमुच्यते ॥.' पूर्वी सर्व देवांनीं मिळून महाभारत आणि वेदचतुष्टय यांचें वजन केलें, तेव्हां वेदांपेक्षां भारत वजनानें ज्यास्त भरलें, तेव्हांपासून महाभारत हें नाम झालें.) १०. 'योगी चौऱ्यांसीं सिद्धासनें' असा अन्य पाठ. ११. बंध=कामशास्त्रविषयक ग्रंथांत वर्णिलेलें आसन. सुरताचे उत्तानक, तिर्यग्, उत्थित, स्थित आणि आनतक असे पांच भेद मानिले आहेत आणि या भेदांचे अनेक प्रभेद आहेत. त्यांसच बंध अथवा आसन असें नांव आहे. नागरबंध, व्योमपादबंध, सैन्यबंध, जृंभितबंध, वीणकबंध असे अनेक बंध आहेत. यांचें सविस्तर निरूपण 'रतिरहस्य', 'अनंगरंग', 'रतिमंजरी', 'पंचसायक' इत्यादि ग्रंथांत पहावें. हे बंध (आसनें) कांहींच्या मताप्रमाणें १६ आहेत व कित्येक तर यांची संख्या ८४ पर्यंत वाढवितात. १२. कामशास्त्र=श्रीवात्स्यायनप्रणीत 'कामसूत्र' नामक ग्रंथ कै० महामहोपाध्याय पंडित दुर्गाप्रसाद यांनीं छापून प्रसिद्ध केला आहे. याजबरोबर

प्रेरिती. ॥ ९० ॥ सोमकांताच्या पाषाणीं । विचित्र वापिका पुष्करणी । माजी पुष्करें नानावर्णीं । विकाशती सुवासें. ॥ ९१ ॥ चिंतामणीचें देवागार । स्पर्शमणीचे नंदिकेश्वर । नाद निधीचे मनोहार । सोमसूत्रीं शिवलिंगें. ॥९२॥ उष्णोदकाच्या वापिका । सुगंधतैलें चर्चून देखा । मंगळस्नानें करितां लोकां । कळा वरी श्रियेची. ॥ ९३ ॥ सुगंधोदकें खंडकुलिया । रत्नें बाणलीं मंचकीं शय्या । आसनें वितानें गादिया । इंद्रगोपवर्णाचीं. ॥ ९४ ॥ स्फटिकभूमिके भ्रमती डोळे । स्थळें तेथें दिसती जळें । वस्त्रें सांवरूनि बळें । चालतां चतुर हांसती. ॥ ९५ ॥ जळ असतां स्थळ भासत । चालतां पडती वस्त्रासहित । बुचकळिया देतां होत । महाविनोद जनांतें. ॥ ९६ ॥ काश्मीरभिंतीवरी अभंग । असोनि पुढें न दिसे मार्ग । मार्ग म्हणोनि चालतां आंग । भिंती-भागीं आदळे. ॥ ९७ ॥ झांकलीं दिसती मुक्त कवाडें । लोटल्या पडती पुढल्या तोंडें । मुक्त म्हणोनि चालतां पुढें । संघट्ट कपाटें आदळती. ॥ ९८ ॥ सोमकांताचें कासारजीवनीं । मच्छकच्छपाची तळपणी । चक्रवाक हंस हंसिनी । क्रीडा करिती विनोदें. ॥ ९९ ॥ माणिकाचीं सुरंग नाळें । नीळ पाचूचीं सुनीळ दळें । सहस्रपत्रीं सुवर्णकमळें । विकासलीं साजिरीं. ॥ ६० ॥ तेथें उद्भव होतो परिमळा । हे अद्भुत दानवी कळा । हारोहारीं मुक्तमाळा । हेमपत्रीं तोरणें. ॥ ६१ ॥ रत्नस्तंभावरी कौतुकीं । वेष्टण केलें कनकलतिकीं ।

---

यशोधरविरचित जयमंगलाख्य टीकाही प्रसिद्ध केली आहे. या ग्रंथाचीं सात अधिकरणें (प्रकरणें) असून प्रत्येकांत कमज्यास्त अध्याय आहेत. या शास्त्रावर औद्दालकि, दत्तक, चारायण, सुवर्णनाभ, घोटकमुख, गोनर्दीय, गोणिकापुत्र, कुचुमार इत्यादि पुरातनतम आचार्यांचे ग्रंथ असावेत असें या ग्रंथावरून समजतें. या ग्रंथाच्या परिशीलनानें गृहस्थव्यापारांचें ज्ञान होऊन पुरुष जितेंद्रिय होतो असें फल याच्या अखेरीस सांगितलें आहे. 'रक्षन्धर्मार्थकामानां स्थितिं स्वां लोकवर्तिनीम् । अस्य शास्त्रस्य तत्त्वज्ञो भवत्येव जितेंद्रियः ॥' [कामसूत्र–पृ० ३७१.]

१. तळें. २. कमळें. ३. प्रफुल्लित होती. ४. चिंतामणि नामक रत्नाचें. ५. देवगृह. ६. परिसाचे. ७. लक्ष्मीची. ८. 'सुगंधोदकें कोठडिया । रत्नदीपमंचकशय्या' असा अन्य पाठ आहे. ९. छतें. १०. 'बुचकळिया घेतां हांसत । महाविनोदें जाणते' असा अन्य पाठ आहे. ११. पक्षिविशेष. ['हंसो विहंगभेदे स्यादर्के विष्णौ हयांतरे । योगिमंत्रादिभेदेषु परमात्मनि मत्सरे ॥' इति विश्वः. 'खगयोगिभिदोर्हंसो निर्लोभनृपसूर्ययोः । विष्णौ प्राणे चात्मनि च' इति मङ्खः.]

मुक्ताफळें आणि माणिकीं । घोंस केले फळांचे. ॥ ६२ ॥ तेथें गरुड पाचूचे कीर । मुखें [1]चुंबिति सुकुमार । सुवर्णपत्रीं पुष्पीं भ्रमर । नीळरत्नीं झळकती. ॥ ६३ ॥ भोंवतीं देवद्रुमाची दाटी । पुष्पीं फळीं करिती वृष्टी । द्विपद [2]षट्पदांचिया कोटी । [3]स्वादामोदीं लोभले. ॥ ६४ ॥ द्राक्षीफळांचे मंडप दाट । तळीं वाहाती रसाचे पाट । अमृत निश्चळ सुस्वादिष्ट । हेमजंबू दाळिंबी. ॥ ६५ ॥ क्षीरबोरी अमृतफळी । रंभाखर्जूरी नारिकेळी । बिल्व आंवळी पोफळी । मातुलिंगी सुफळित. ॥ ६६ ॥ चंपकवनें दवनवनें । कृष्णागरु [4]हरिचंदनें । कर्पूरकेशरकर्दळीवि[5]पिनें । कनक केतकी शोभती. ॥ ६७ ॥ लवंगलतिका [6]नागलतिका । बकुळ शतपत्र मल्लिका । जाती कंकोळ वल्लिका । पारिजातका वेष्टित. ॥६८॥ असो. ऐसी सुखाडभरित । सभा निर्मिली अत्यद्भुत । उपमे तुळितां गगनांत । स्वर्गपारडें वरुतें. ॥ ६९ ॥ विश्वकर्म्यानें धरूनि मुष्टीं । पासंगा घातले तेतीसकोटी । तरी न बैसे तळवटीं । हळुवटपणें अद्यापी. ॥ ७० ॥ जे सभा अवलोकितां दृष्टी । देखिली होय ब्रह्मसृष्टी । नाहीं देखिली ऐसी पोटीं । असोसी कांहीं उरेना. ॥ ७१ ॥ **ब्र**ह्मसभा **इं**द्रसभा । **सु**धर्मा जे **या**दवी सभा । त्याहूनि साजिरी **ध**र्मसभा । **म**यनिर्मित [7]आगळी. ॥ ७२ ॥ चतुर्दशमासां नि[8]रुपम । पूर्ण झालें सभेचें काम. । **ध**र्मा सांगे दानवोत्तम, । 'सभा दृष्टीं पाहीजे.' ॥ ७३ ॥ मित्र बंधु प्रधान कुमर । सवें पवित्र ऋषेश्वर । सुमुहूर्तें करोनी [9]राजेश्वर । सभा पाहों पातला. ॥ ७४ ॥ मंगळघोष गर्जती वाद्यें । [10]मागधवार वाखाणिती ब्रिदें[11], । मार्ग सिंपोनि सुगंधें । पुष्पभार विखुरले. ॥ ७५ ॥

---

१. 'दिसती' असा अन्य पाठ आहे. २. भ्रमर. ३. 'स्वादमदा लोभलिया' असा अन्य पाठ आहे. ४. एक प्रकारचें **म**लयदेशांत होणारें चंदन. यालाच 'गोशीर्ष' असें म्हणतात. [**हरिचंदन**:—(इंद्रस्य विष्णोर्वा प्रियं चंदनं) 'घृष्टं च तुलसीकाष्ठं कर्पूरागुरुयोगतः । अथवा केशरैर्योज्यं **हरिचंदन**मुच्यते' (पद्मपुराण). '**हरिचंदन**मस्त्री स्यात्त्रिदशानां महीरुहे । नपुंसकं तु गोशीर्षे ज्योत्स्नाकुंकुमयोरपि ॥' इति मेदिनी. 'हरि कपिलं तद्वर्णत्वात् । हरेरिंद्रस्य वा चंदनं **हरिचंदनम्**' इति रायमुकुट्याम् । स्तुतिकुसुमांजलि–स्तोत्र ८ पृष्ठ ९५ श्लोक ४ टीका.] ५. अरण्यें. ६. पानवेल. ७. 'निराळी' असा पाठभेद आहे. ८. उपमारहित. ९. धर्मराज. १०. स्तुतिपाठकाचे समूह. ११. 'बिरुदें' असा अन्य पाठ आहे.

सभाद्वारप्रवेशकाळीं । द्विजां[1] वोपिल्या पुष्पांजळी । भक्ष्य भोज्य नानाफळीं । बळी सांडिले अपार. ॥ ७६ ॥ सभा अवलोकितां दृष्टीं । शोभासमुद्र हलावे पोटीं । चक्षु पोहणार उठाउठी[2] । ऐलें[3] कांठीं चुबकले. ॥ ७७ ॥ पावावया पैल प्रांतीं । उडोनि जातां आपुले शक्ती । मनोविहंगम[4] आवर्तीं[5] । ऐलीकडे राहिले. ॥ ७८ ॥ खणोखणीं पहातां नयनें । ब्रह्मांडेंचि दिसती भिन्नें, । बैसका घेतल्या जनमनें । त्या चालतां न चलती. ॥ ७९ ॥ म्हणती, 'स्वर्ग मृत्यु पाताळीं । हे प्रतिमा नाहीं आणिली; । धन्य धन्य गुण याचे करतळीं । ईश्वरी कळा वसतसे.' ॥ ८० ॥ अपार वोपोनि धन संपत्ती । सुहृद्भाव धरूनि चित्तीं । बहुत मानें स्वस्थळाप्रती । मय दानव बोलविला. ॥ ८१ ॥ संतोषोनि राजेश्वर । अनेक देशींचे नृपवर । सोयरे पाचारूनि थोर । महोत्सव मांडिला. ॥ ८२ ॥ दहा सहस्र ब्राह्मणोत्तम । भोजनीं तृप्त केले परम । हेमपात्रीं[6] अमृतोपम[7] । भक्ष्य भोज्यें वोपिलीं. ॥ ८३ ॥ घृत पायस मधु शर्करा । दधी नवनीत[8] दुग्धधारा । फळीं मुळीं ऋषेश्वरां । तृप्त केलें भोजनीं. ॥ ८४ ॥ इच्छाभोजन[9] आलियांतें । इच्छिलें दान याचकांतें । दरिद्रदुःख जगापरतें । धर्मराजें दवडिलें. ॥ ८५ ॥ एकएकातें सहस्र धेनु । सवत्स[10] सालंकृत[11] सगुणु । देता झाला कुरुनंदनु । रत्नमाळा पट्टकूळें[12]. ॥ ८६ ॥ सप्त रात्रीं वाद्यध्वनी । खंडली नाहीं अनुदिनीं । उत्सव देखोनि अमरगणीं । दिव्य सुमनीं[13] वर्षले. ॥ ८७ ॥ मागध[14] सूत[15] वैतालिक[16] । नटवे[17] नाचती[18] परिहासक ।

---

१. धर्मराजानें सभाप्रवेशसमयीं अनेक देशांतून आलेल्या विप्रांस सात दिवस भक्ष्य, चोष्य, पेय, पायस, मधु, फळ, वाराहहारिणमांस इत्यादि द्वारा संतुष्ट केलें असें वर्णन आहे. [सभापर्व–अध्याय ४ श्लोक १-५ बालभारत–सभापर्व–सर्ग १ श्लोक ३३ पहा.] २. लवकर. ३. आलीकडचे. ४. अंतःकरणरूप पक्षी. ५. भोवऱ्यांत. ६. सुवर्णपात्रीं. ७. अमृतासारखें मधुर. ८. लोणी. ९. ब्राह्मणानें इच्छिलेला जो पक्वान्नादिपदार्थ तो सिद्ध करून तद्विशिष्ट इच्छातृप्त जें त्यास भोजन घालितात तें. १०. वत्ससहित. ११. अलंकारसहित. १२. वस्त्रसमुदाय. १३. पुष्पें. १४. मागधनामक स्तुतिपाठक. १५. सूतनामक स्तुतिपाठक. १६. मंगलगीतिवाद्यादिकृत तालानें व्यवहार करणारे जे ते वैतालिक, मंगलस्तुतिपाठक. १७. नट, अभिनयनिपुण नर्तक. १८. अध्याय ४ श्लो० ७ पहा.

[1]गायक [2]वाद्यक भाट [3]कथक । [4]इंद्रजाळ बहुरूपी. ॥ ८८ ॥ वैद्य वैदिक [5]पुराणिक । शास्त्री पंडित ज्योतिषी गणक । सिद्धांतवेत्ते तत्त्वबोधक । अहोरात्र जवळिके. ॥ ८९ ॥ सोडूनि [6]अमरावती सदन । शक्र वसवी नंदनवन । तैसा राजा कुरुनंदन । सभासदनीं विश्रामे. ॥ ९० ॥ भिन्न भिन्न सौदागरीं । सहवर्तमान जायाकुमरीं । सुहृद बंधु सुखनिर्भरीं । वसते झाले जवळिके.॥९१॥ सभासनींची सुखवस्ती । वरी पुण्यश्लोकांची संगती । म्हणोनि ऋषीश्वरांच्या

---

१. गानकुशल, गीतकोविद. २. "पूर्वी भाट, चारण यांची प्रतिष्ठा फार असे. ते राजाचे उपाध्ये असत, आणि राजाच्या वंशाचें वर्णन कवितारूपानें करीत, व तें वर्णन वीररस उत्पन्न करण्याकरितां स्वारींत राजापुढें म्हणत. त्यांस 'वहिवंचे भाट' म्हणतात. राजांची वंशावळ त्यांजवळ लिहिलेली असते, व दरएक राजकुळास नेमलेला भाट असतो. तो वर्षास राजदरबारीं येतो, व त्यास कांहीं द्यावें लागतें. याप्रमाणें भीक मागून ते निर्वाह करितात. जामीन घेणें तरी त्यांस घेत; मुलीबरोबर पाठविणें तरी भाट पाठवीत; त्यांचेसारखा विश्वासू कोणी नाहीं, व तो प्राण दिल्याशिवाय राहावयाचा नाहीं, अशी लोकांची समजूत असे. ते त्रागा करीत म्हणजे त्यांजवर कोणीं जुलूम केला तर ते आपले घरच्या म्हाताऱ्या माणसाचें डोकें मारीत; आणि जो जुलूम करील त्याचे घरीं त्या प्रेतास आणून त्याचें तोरण बांधीत व 'तुझ्यावर ही हत्या पडली' असें म्हणत! मरणाची त्यांस बिलकूल पर्वा नसे. अहमदाबादेंत एका भाटिणीवर सरकारांत खोटी फिर्याद झाली सबब ती आपले पोटांत कटार मारून घेऊन मेली! तिचें देऊळ हल्लीं शाहपुरांत आहे. कोणीं त्यांस नेमणूक वगैरे दिली नाहीं तर ते त्याचें चित्र करून, तें एका उंच काठीवर टांगून त्याजबद्दलचें कवन व निंदा सर्व मुलुखभर दाखवीत फिरत. व याजकरितां राजेसुद्धां त्यांस भीत असत, आणि त्यांचा संतोष राखीत! हल्लीं भाटांमध्यें ज्या अनेक जाती आहेत त्या:—ब्राह्म भाट, बारवटे भाट, वहीवंचे भाट, कंकाली भाट, तुर्की भाट, श्रमण भाट वगैरे. भाट लोक रजपूत लोकांपासून उपजीवन करितात. त्यांच्या कवितेस कुंडली, सवाई, चौपाई, छप्पा, कबीत, छंद, प्रबंध, दोहा, केहेवत, गीत, असें म्हणतात. हे असें म्हणतात कीं, कृतयुगांत वेलंग, वळास व भीमसी हे मोठे भाट झाले; त्रेतायुगीं बळीराजाजवळ पिंगळ नामक भाट होता; रामाजवळ रंपाळ होता; द्वापारयुगांत पांडवांजवळ सूत व संजय हे होते; पृथ्वीराजाजवळ चंद भाट म्हणून होता, त्यानें 'रासा' म्हणून मोठा भारतासारखा ग्रंथ केला आहे; विक्रमाजवळ वेताळ भाट होता आणि तसाच अकबराजवळ गंग भाट म्हणून होता." [लोकहितवादीकृत ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती—भाग २, पृष्ठ ३९.] ३. पुराणेतिहासादिकथक. ४. आहे तें दिसूं नये, नाहीं तें दिसावें, अशी चमत्कारिक मंत्रविद्या. ५. पुराणग्रंथपाठक. ६. अमरावती=जींत अमर (देव) असतात ती अमरावती. 'मतौ बह्वचो न जिरादीनाम्' या सूत्रानें 'अमरा' असा आकार झाला.

पंक्ती । सुखाडल्या नृपसंगें. ॥ ९२ ॥ मूळभारतीं केवीचा नाथ । ऋषी राजे असंख्यात । बोलिला तें बोलतां येथ । अतिविस्तार होऊं पाहे. ॥ ९३ ॥ क्षुद्रसरिता प्राकृतमती । सविस्तार निरोपण जीमूती । रायाकडील लागतां निश्चिती । समुद्रप्राय माजेल. ॥ ९४ ॥ निरोपण सुपथीं आडथळा । पायगोवा वाटे सकळा । यालागीं न पडोनि पाल्हाळा । संकळीत अनुवादे. ॥ ९५ ॥ असित देवळ सर्पमाली । सुमित्र अर्वावसु शुनक बळी । महाशिरा ऋषीमंडळी । आचार्य विप्र प्रसिद्ध. ॥ ९६ ॥ कृष्णद्वैपायन श्रीशुक । सुमंतु जैमिनी पैल देख । व्यासशिष्यांमाजी रंक । मीही एक त्या ठायीं. ॥ ९७ ॥ तैत्तीर्य याज्ञवल्की धौम्य । आणि मांडव्य कौशिक परम । लोमहर्षण ऋषी परम । अग्निहोत्री त्या ठायीं. ॥ ९८ ॥ बकदालभ्य स्थूलशिरा ऋषी । पाराशर्य मौंजायन ऋषी । दामोष्णीश तपोराशी । मार्कंडेय प्रसिद्ध. ॥ ९९ ॥ भालुकी गालव कोपवेगु । हरिदष्ट कौंडिण्य भृगु । पर्वत शांडिल्य गौतम पैंगु । पवित्रपाणी सावर्णी. ॥ १०० ॥ हे मुख्य करूनि असंख्यात । ऋषी तपोधनसमर्थ । दिव्यं कथा परमामृत । राजश्रवणीं वर्षती. ॥ १०१ ॥ छपन्नदेशींचे राजेश्वर । शौणवकुळींचे राजकुमर । प्रीति भक्ती जोडोनि

१. महाभारतीं. २. 'ऋषींचा नाथ' असाही पाठ आहे. ३. श्रीव्यास. ४. 'ग्रंथार्थ' असाही पाठ आहे. ५. लघुनदीरूप प्राकृत जनांची मती. ६. रायाकडील सविस्तर निरोपणरूप मेघ लागतां समुद्रासारिखा (म्हणजे विशालबुद्धी होईल असा भाव होतो.) ७. पायगुंता. ८. संक्षेपानें. 'स्वल्प कांहीं अनुवादे' असाही पाठ आहे. ९. 'ऋषि सत्तम' असाही पाठ आहे. १०. 'विद्या कथा' असाही पाठ आहे. ११. या राजांचीं नांवें सह्याद्रिखंडांत दिलीं आहेत तीं:—अनुज, देवक, पृथु, ऋतुपर्ण, जय, सुभीम, सौवाम, सुमंत, कौंडिण, मंडुक, कुशीक, मार्तंड, कामपतीचे पुत्र सोमवंशी–पद्म, शाम, पृथु, श्रीधर, ब्रह्मज्ञ, चंपक, शार्दूल, नोल, विद्युत्पति, सुरब्रह्म, रघु, माधव, शैल, मान, श्रीपति, शल, नकुल, शैल, भूरथ, यदु, पौंड्रीक, जघव, मन्मथ, पार्थिव, रंधक, प्रघोष, शशी, दान, सारंग, वज्रदंष्ट्र, देव, मंत्रोद्भव, श्रीपाल, मयुरण्य, सुरसेन, नरहरि, मंडुक, भार्गव, सुग्रीव, सप्तसंधर, चैत्र, धर्म, रिपु, शाश्वत, दान, शाल्मली, जायव, विदर्भ, प्राणताथ, वैजयंत, पार्थिव, भूरिसेन, पृषद, वासुकीकीर्तिमान, सुवर, गोत्रज, अतिवार, सुदेष्ण, रुक्मरथ, सुरथ, महाराज, अरिमर्दन, प्रीतिनाम, सहस्रजित, चित्ररथ, सीम, आदि, गज, असीमहीधर, श्वेत, सुक्षेत्र, महाविद्वान्, सुविद्वान्, कामद, श्रीधर, प्रजापाल, देववार, ध्रुववंश, स्वायंभुमनूचा रघुवंश, वैवस्वत मनूचा जनकवंश, पुरूचा कुरुवंश, यदुवंश, सूर्यवंशशिवराज. १२. युवराज, राजबालक. ['कुमारः स्यात् शुके स्कन्धे युवराजेऽश्वचारके । बालके' इति मेदिनी.]

कर । धर्मराजा वोळंगती. ॥ १०२ ॥ मुंजकेतु उग्रसेन । संग्रामजित् कक्षसेन । क्षेमक दुर्मुख जयसेन । कमठ कंपन भूपती. ॥ १०३ ॥ भोज कांबोज भीमरथ । चाणुर श्रुतायुध देवरात । पांड पुंड्रीक कंक किरात । मागधराजा तेठायीं. ॥ १०४ ॥ कुंभ कुनिंद अंग वंग । [1]मद्रक जटासुर कालिंग । [2]अंधक शिशुपाळादी सांग । दास्य करिती धर्माचें. ॥ १०५ ॥ धाकें असुरांचिया पंक्ती । वज्रधरातें उपासिती । तैशा नाना यवनजाती । वोळगती धर्मातें. ॥ १०६ ॥ सुकर्मा सुरथ चेकितान । वैदेह [3]वसुदान केतुमान । अनिरुद्ध अनूप [4]सुदर्शन । क्रमजित् नरेंद्र. ॥ १०७ ॥ सुहृद विष्णूचे नंदन । [5]आहुक विपृथु गद सारण । सांबादी निःशठादि प्रतर्दन । धर्मासंगें तिष्ठती. ॥ १०८ ॥ अक्रूर कृतवर्मा सात्यकी । कैकेय यज्ञसेन रौमकी । व्याकृत्ती भाष्यकी भीष्मकी । धर्मराजाजवळिके. ॥ १०९ ॥ समस्त यादवांचे पुत्र । रुक्मिणीसत्यभामेचे कुमर । अर्जुनापासीं निरंतर । शस्त्रविद्या खेळती. ॥ ११० ॥ धनुर्वेद विद्याधन । साधावया नृपनंदन । पार्थगुरूचे श्रीचरण । अहोरात्र सेविती. ॥ १११ ॥ धनुर्विद्यांच्या घडामोडी । शस्त्रसंधाना कडोविकडी । राजपुत्र अति आवडीं । अभ्यासिती संतोषें. ॥ ११२ ॥ अर्जुनाचा सखा परम । [6]तुंबर सांडोनि स्वर्गधाम । पार्थसंगीं वसे निरोपम । पंच मुख [7]प्रगटावया. ॥ ११३ ॥ गंधर्वराज चित्रसेन । सर्वें अप्सरा किंनरगण । करिती संतोषें गायन । ताल मृदंग सुताल. ॥ ११४ ॥ ऐसा अद्भुत ऐश्वर्यनादु । भरे तेणें माजला सुखसिंधु । उत्साह झाला अनेकविधु । त्रैलोक्याचा ते ठायीं. ॥ ११५ ॥ यावरी चमत्कार झाला । भाग्यासी भाग्योदय पावला । ऐश्वर्यासी [8]तोही जोडिला । ऐश्वर्यलाभ ज्यापरी. ॥ ११६ ॥ अमृतवनावरी माधवी । काशी क्षेत्रावरी जान्हवी । सौरसकमळें ते केशवी । [9]हविष्यगंधें घमघमीत. ॥ ११७ ॥ परीस सदैवासी सांपडे । [10]पायाळातें निधान

---

१. 'केशिक कारुष' असाही पाठ आहे. २. 'कीं राजे अनेक' असाही पाठ आहे. ३. 'वसुदेव' असाही पाठ आहे. ४. 'ऋतवर्ण' असाही पाठ आहे. ५. 'अद्रक' असाही पाठ आहे. ६. सभापर्व–अध्याय ४ श्लोक ३५-३६ पहा. ७. 'वदावया' असाही पाठ आहे. ८. 'ऐश्वर्यो' असा अन्य पाठ आहे. ९. 'हविष्य जैशी शिवातें' 'हा विशेषा विशेष' असे अन्य पाठ आहेत. १०. पायाळु मनुष्याला पुरलेलें धन दिसतें ही समजूत या ग्रंथांत अनेक ठिकाणीं व्यक्त केलेली आढळते.

जोडे । भाविकातें चंद्रचूडें । भेट दीजे आदरें. ॥ ११८ ॥ तैसा नारद महामुनी । भेटी पातला कृपेकरूनी । दिव्यगंधीं दिव्यसुमनीं । जो सुरगणीं अर्चिला. ॥ ११९ ॥ जो आदिकवीचा आदिगुरु । जो सकळसिद्धांचा ईश्वरू । ज्याचा लाहोनि वरदकरू । व्यास वाल्मीक बोलिले. ॥ १२० ॥ चौदा विद्या चौसष्टी कळा । ज्यापासोनि लाधल्या सकळा । स्तवितां विष्णूच्या कौटाळा । जवा आगळा अवगमे. ॥ १२१ ॥ अनुभवापर्यंत ब्रह्मज्ञान । समाधीपर्यंत योगसाधन ।

---

१. शंकरानें. २. 'आवडी' असाही पाठ आहे. ३. ब्रह्मदेवाच्या शरीरापासून—मांडीपासून—झालेला नारद. नार=पाणी, द=देणारा. जो पितरांना पाणी (नार) देतो तो नारद. 'नारं पानीयमित्युक्तं तत्पितृभ्यः सदा भवान् । ददाति तेन ते नाम नारदेति भविष्यति ॥' हरिवंश नामक ग्रंथांत या देवर्षीचें वर्णन खालीं लिहिल्याप्रमाणें केलें आहे:— याची अंगकांति प्रज्वलिताग्नीप्रमाणें देदीप्यमान आहे, नेत्राची चकाकी बालार्कसदृश आहे, मस्तकावर जटाभार उन्नमित करून बांधला आहे. याचें शरीर सुवर्णालंकारानें भूषित केलेलें आहे. सखीप्रमाणें यानें आपल्या कक्षपुटांत एक मोठी वीणा बाळगली आहे. चंद्ररश्मीप्रमाणें शुक्लांबर धारण केलें आहे, कृष्णमृगचर्मनिर्मित उत्तरीयवस्त्रानें आपली काया आच्छादन केली आहे, दंडकमंडलु घेतलें आहे व हा कोणी साक्षात् दुसरा इंद्र आहे असा भास होत आहे, हा जगांतील गुप्त कलहांचा जाणणारा आहे, स्कंदासारिखा ब्रह्मचारी आहे. या महर्षीस कलहप्रिय देखील म्हणत असतात. हा विद्वान् आहे व तसाच गायनकलेंत निष्णात आहे. हा ब्रह्मसूनु आहे व जणूं काय अन्यकलीच आहे, देव व गंधर्व लोकांचा आदिवक्ता व मुनिश्रेष्ठ आहे. हा चारीवेद पठण करणारा आहे व मुख्य मुख्य याज्ञिकांकडून गाइला जाणारा आहे. या ब्रह्मर्षीस नारद म्हणत असतात, हा चिरंजीव आहे व याचा ब्रह्मलोकांत संचार आहे. ४. 'ऋषेश्वरीं' असाही पाठ आहे. ५. चौदा विद्या. ['अङ्गानि वेदाश्चत्वारि मीमांसा न्यायविस्तरः । पुराणं धर्मशास्त्रं च विद्या ह्येताश्चतुर्दश ॥' इति. 'पुराणन्यायमीमांसाधर्मशास्त्राणि अङ्गमिश्रिताः वेदाः । शिक्षा कल्पो व्याकरणं निरुक्तं छन्दज्योतिषम् इति षडङ्गानि । एवं चतुर्दश विद्याः' इति हेमाद्रिः. चार वेद (ऋग्, साम, यजुष्, अथर्वन्) + सहा अंगें (छंद, सूत्र, ज्योतिष्, निरुक्त, शिक्षा आणि व्याकरण)+पुराणें (ब्राह्म, पद्म, वैष्णव, शैव, लिंग, गरुड, नारद, भागवत, अग्नि, स्कंद, भविष्य, ब्रह्मवैवर्त, मार्कंड, वामन, वराह, मत्स्य, कूर्म आणि ब्रह्मांड)+न्यायशास्त्र+पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा+धर्मशास्त्र (गृह्यसूत्रें व मन्वादि स्मृति). अन्य मतें (१) ब्रह्मज्ञान, रसायण, स्वरधर, वेद, ज्योतिष्, व्याकरण, धनुर्विद्या, जलतरण, न्याय, कोक, अश्वारोहण, नट, कृषी, वैद्य, (२) चार वेद (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्वणवेद)+चार उपवेद+सहा शास्त्रें (धर्मशास्त्र, सांख्यशास्त्र, वेदांतशास्त्र, न्यायशास्त्र, योगशास्त्र, कामशास्त्र).] ६. 'प्राप्त' असाही पाठ आहे. ७. 'योगसंपन्न' असाही पाठ आहे.

भक्तिबळें ब्रह्मसंपन्न । सेवा करी जयाची. ॥ १२२ ॥ भूत भविष्य वर्तमान । त्रिकाळज्ञानी चतुरानन । सेर्व सवार्थी सर्वज्ञ । सर्वां श्रेष्ठ देवऋषी. ॥ १२३ ॥ पाठ सिद्धि पैठार्थ सिद्धी । क्रियासिद्धि प्रतीतिसिद्धि । अष्ट दहा पांच सिद्धी । जयापासीं लोळती. ॥ १२४ ॥ ब्रह्मांड रचोनि मोडी पुढतीं । येवढी शक्ती जयाचे हातीं । अवलोकितां अन्याय रीतीं । शिक्षा करी हरिहरा. ॥ १२५ ॥ वेद शास्त्र पुराण श्रवण । इतिहासगायन महदाख्यान । ज्याचे वदनीं वसोनि मान्य । विस्तार त्रिलोकीं. ॥ १२६ ॥ प्रवृत्ति निवृत्ति विचार जाण । सुँरां असुरां समान मान । ईश्वराचेही अवगुण । झांकों नेणें बोलतां. ॥ १२७ ॥ ऐसा देखोनि ऋषिसत्तमा । परम आल्हाद पैार्थधर्मा । सन्मुख धांवोनि पादपद्मा । भाळतिलकें स्पर्शिलें. ॥ १२८ ॥ बैसवूनि कनकासनीं । रत्नें अभिषेकितां मूर्ध्नी । पूजा उपचार समर्पुनी । बद्धहस्तें बोळंगे. ॥ १२९ ॥ साधु पुरुषाचें दर्शन एक । तात्काळ नासे संसारदुःख । ईश्वर आणी मोक्षसुख । प्रसाद देती हस्तकीं. ॥ १३० ॥ अवलोकोनि राजनृपती । किंचित् प्रश्नाची व्यासोक्ती । उपदेशी गर्भी राजनीती । पडताळिली धर्मातें. ॥ १३१ ॥ शुद्धस्वातीच्या चिह्नें । वर्षाव कीजे नारदवचनें । श्रवणशुक्तिकांचीं वदनें । वोढवावी महंतीं. ॥ १३२ ॥ इति श्रीसभापर्व भारत । लीलाविश्वंभर अनुग्रहीत । मुक्तेश्वराचा वचनार्थ । सार्थक श्रोतीं कँरावा. ॥ १३३ ॥

---

## अध्याय तिसरा.

नारद म्हणे, 'मैहाराजा ! । धर्मस्वरूप! धर्मात्मजा ! । नामासारखी सु-

---

१. 'ब्रह्म सगुण' असाही पाठ आहे. २. 'समर्थ' असाही पाठ आहे. ३. 'पाठांतर' असाही पाठ आहे. ४. देवांना 'सुर' म्हणण्याचें कारण त्यांनीं सुरेचें (मद्याचें) ग्रहण केलें हें होयः—'सुराप्रतिग्रहाद्देवाः सुरा इत्यभिविश्रुताः । अप्रतिग्रहणात्तस्या दैतेयाश्चासुरास्तथा ॥.' [वा० रा० बा० कां० सर्ग ४६ श्लोक ३६-३८.] ५. 'राया धर्मा' असाही पाठ आहे. ६. 'श्रोतीं सादर परिसावा' असाही पाठ आहे. ७. 'इति श्रीमहाभारते शतसहस्रसंहितायां वैयासके सभापर्वे व्यासोक्ति मुक्तेश्वरकृत टीकायां मयसभाविस्तरणो नाम द्वितीयोऽध्यायः' असा समाप्तिलेख आहे. 'स्वस्ति श्रीमहाभारते सभापर्वणि सभाविरचिते नारदागमो नाम द्वितीयोऽध्यायः' असा लेख दोन पोथ्यांत आहे. ८. मयासुरानें निर्माण केलेल्या अत्यद्भुत सभेंत सबांधव धर्मराज बसला असतां नारदानें प्रश्नद्वारा जी राजनीति त्यास शिकविली तिचें वर्णन या अध्यायांत आहे. हें वर्णन मूळांतील पांचव्या अध्यायास

तेजा । करणी निर्मळ असे कीं? ॥ १ ॥ ऐश्वर्य लाधल्या संपूर्ण । धर्मीं वर्तत असे कीं मन? । राज्यमदें [1]दुरभिमान । तुज संचरला नाहीं कीं? ॥ २ ॥ न्यायें [2]अर्जिला जो अर्थ । व्यय करिसी कीं धर्मार्थ? । विषयकामलोभानें तुझें चित्त । [3]विटाळलें नाहीं कीं? ॥ ३ ॥ [4]वडील आचरले जो धर्म । तोच चालविसी कीं [5]नेमें? । [6]विहितभंगाचा [7]कर्दम । तुज लेपला नाहीं कीं? ॥ ४ ॥ [8]धर्में अर्थ अर्थें [9]धर्म । [10]धर्ममात्रीं पुरुषोत्तम । चढता वाढता [11]सुखोद्यम । नित्यानित्य करिसी कीं? ॥ ५ ॥ धर्मासी अविरोधी जो काम । [12]तोचि सेविसी कीं सुगम । इंद्रियलो[13]लुंपतेचा भ्रम । प्राप्त झाला नाहीं कीं? ॥ ६ ॥ नित्य नैमित्तिकीं कर्मीं । वर्तत आहेसि कीं नि[14]ष्कामीं । काम्यनिषिद्धांची [15]ऊर्मी । लोटिसी कीं आलिया? ॥ ७ ॥ अनायासीं हो कीं सायासीं । भाग्यें जोडिल्या संपत्तीसी । विभागूनि समस्तांसी । सेविसी कीं सुजाणा? ॥ ८ ॥ अनुकूळ अथवा प्रतिकूळ । [16]अदृष्ट झालियाही [17]विकळ । धर्मापासूनि बुद्धी [18]अचळ । भ्रंश कांहीं न पवे कीं? ॥ ९ ॥ अहोरात्रीं साठघडी । लोटितां पापपुण्याची जोडी । किती झाली हें घडीघडीं । विचारीत असती [19]कीं? ॥ १० ॥ [20]अखंडैकनामस्मरणीं । देव केला असे कीं ऋणी? । जो पावोनि देहमरणीं ।

---

अनुसरून आहे. या नीतीला 'नारदनीति' असें म्हटलें तरी चालेल. 'कच्चित्' (कीं काय) या प्रश्नार्थक संस्कृत अव्ययाच्या द्वारें प्रश्न केले आहेत म्हणून कोणी हिला 'कच्चित्प्रश्न' असेंही म्हणतात. ९. 'धर्मराजा' असा पाठभेद आहे.

१. घातकी गर्व. २. संपादिला. ३. 'विकळ होत नाहीं कीं' असाही पाठ आहे. ४. अध्याय ५ श्लो० १८ पहा. ५. 'सुनेम' असाही पाठ आहे. ६. 'अविहित भोगाचा' व 'अविहित भाग्याचा' असे पाठभेद आहेत. ७. चिखल, डाग. ८. अध्याय ५ श्लो० १९-२० पहा. ९. 'धन' असा पाठ आहे. १०. 'धर्ममार्गीं पुरुषोत्तम' व 'धर्मीं वर्ततसे कीं मन' असे पाठ आहेत. ११. सुख–उद्यम. १२. 'तो न सेविसी' असा पाठ आहे. १३. लुब्धपणाचा. १४. 'निष्कर्मीं' असा पाठ आहे. १५. लाट. १६. दैव. १७. भ्रांत. १८. 'अळुमाळ' असाही पाठ आहे. १९. पुढील ओंव्या, ओंव्या ९-१० यांमध्यें एका पोथींत आढळतात:—'सदन संत रक्षण । असद्गुणी त्यांचें दमन । संपावें सत्यासी दान । हें राजचिन्ह वसे कीं? ॥ १ ॥ हें चिन्ह नसतां पट्टाभिषेक । तो पावी स्व त्यजिती लोक । औषधपुटें बांधितां देख । व्यजन माशा वारिती ॥ २ ॥ संतरक्षणाचें जें चिन्ह । राजया आंगीं नसतां जाण । पटाभिषेकादि बाळव्यजन । हा दुर्गुण नसे कीं? ॥ ३ ॥' या ओव्यांत पुष्कळ भाग अशुद्ध दिसतो म्हणून त्यांची योजना टीपांत करून प्रसिद्धि केली आहे. शुद्ध पाठ मिळाल्यास त्याचा समावेश परिशिष्टांत अवश्य करूं. २०. जो देवाचें सतत नामस्मरण करितो त्याचा देव ऋणी होतो–हा समज भक्तिप्रतिपादक ग्रंथांत फार आढळतो.

[1]दास्य करी निजांगें. ॥ ११ ॥ मोक्षद्वारींच्या द्वारपाळां । आर्जवें भजसी कीं नृपाळा? । जे कां हात धरूनि डोळां । सायुज्यधाम दाविती. ॥ १२ ॥ समता संतोष सद्विवेक । चौथा साधुसंग देख । यांसीं करूनियां सख्य । मित्रभावें असती कीं? ॥ १३ ॥ कामक्रोधलोभत्रया । मोह मद मत्सर यया । वर्जिल्या नियोजिल्या ठाया । जाणसी कीं जाणल्या? ॥ १४ ॥ काम नसावा परस्त्रियेचा, । क्रोध नसावा [2]सत्पुरुषाचा, । लोभ नसावा [3]शरीराचा, । मोह पुत्राचा बाधक. ॥ १५ ॥ मद नसावा सुहृदजातीं । मत्सर नसावा सर्वां[4]भूतीं । तुझी वर्तणुकीची [5]शक्ती । सांग ऐसी आहे कीं? ॥ १६ ॥ काम असावा ईश्वरभजनीं । क्रोध असावा इंद्रियदमनीं । [6]तीर्थप्रसादशेष[7]ग्रहणीं । लोभ अपार असावा. ॥ १७ ॥ मोह असावा सज्जनासीं । मद असावा दुर्जनासीं । मत्सर सदा [8]संसारासीं । असावा तो [9]असे कीं? ॥ १८ ॥ राजचिन्हीं [10]षड्विधगुण । सप्त उपाय परम गहन । बळाबळाचें लक्षण । जाणसी कीं चौदोंही[11]? ॥ १९ ॥ आज्ञाकीर्तिद्विजपालन । दान भोग मित्र[12]संरक्षण । साही गुणीं तव प्रधान । सालंकार असती कीं? ॥ २० ॥ जाणती नाना व्यूहरचना । थोडेनि जिंकिती बहुत सेना । ऐसे तुझे विचक्षणा! । सेनापती असती कीं? ॥ २१ ॥ निर्लोभिये विश्वा[13]सीक । वंशज असती कीं सेवक । जे स्वामीकाजीं देख । देह देती सोडून. ॥ २२ ॥ वेतन भक्षून पवित्र । राजद्रव्य ज्यां अपवित्र । ऐसेनि योगें स्वतंत्र । स्वव्यापारीं असती कीं? ॥ २३ ॥ [14]उत्तम मध्यम कनिष्ठ पदीं । योग्यायोग्य विचारनिधी । परीक्षूनि विशाळबुद्धी । योजिसी कीं नरेंद्रा!? ॥ २४ ॥ अमात्यपदीं दासीपुत्र । अधमस्थळीं परम पवित्र । अपूज्या पूजोनि, सत्पात्र । अवमानीत नाहींस कीं? ॥ २५ ॥ अचाट कार्य साधी भृत्य । वेत[15]नाहूनि कोटिगुणित । द्रव्य देऊनि त्याचें चित्त । तो-

---

१. 'दास्य करिती सर्वस्वीं' असा पाठभेद आहे. २. साधुजनाचा. ३. 'देहाचा' असा पाठभेद आहे. ४. भूत=जीव, प्राणी. ५. 'रीती' असा पाठभेद आहे. ६. पूज्य गुरु (तीर्थ) याच्या प्रसादाचा शेष (अवशिष्ट भाग) घेण्यामध्यें. ७. 'देशग्रहणीं' असा पाठभेद आहे. ८. 'मत्सर संसारशत्रूसी' असा पाठभेद आहे. ९. 'आहे कीं' असा पाठभेद आहे. १०. सहा राजगुणांचीं नांवें:–वक्ता, प्रगल्भ, मेधावी, स्मृतिमान्, नयविद् आणि कवि. ११. अध्याय ५ श्लोक २१ पहा. १२. 'मंत्ररक्षण' असा पाठभेद आहे. १३. श्लोक ५० पहा. १४. श्लोक ४३ पहा. १५. 'वतनाहूनि' असाही पाठ आहे.

षवीत [1]आहेस कीं ? ॥ २६ ॥ आपुले [2]काजीं पावले मरण । त्यांचीं कुटुंबें आश्वासून । आपुल्या कुटुंबासमान । पाळिसी कीं दयाळा ! ? ॥ २७ ॥ दरिद्रकाळींचीं बाळमित्रें । भेटों आलिया [3]स्नेहपात्रें । ओळखी देऊनि [4]दर्शनमात्रें । श्रियावंत करिसी कीं ? ॥ २८ ॥ [5]परगुण परीक्षा जाणणें । चित्त [6]कळवळे [7]परवेदनें । हीं मुख्यप्रभूचीं लक्षणें । तुझ्या ठायीं असती कीं ? ॥ २९ ॥ मंत्रियांच्या [8]राहटी कैशा । देती यश कीं अपेशा । [9]चारमुखें नित्य नरेशा ! । विचारीत अससी कीं ? ॥३०॥ नेमाहूनि [10]आंगळें धन । घेऊन प्रजांतें पीडण । करिते जे [11]अयोग्य प्रधान । ते [12]पदातीत करिसी कीं ? ॥ ३१ ॥ राजद्रव्य देऊनि भाग । भूमीसेवा करिती सांग । न करिती राजाज्ञेचा भंग । प्रजा नेमें असती कीं ? ॥ ३२ ॥ [13]वनचर दूतांचिया गोष्टी । राष्ट्र अवलोकिशी कीं दृष्टीं । नष्टांत[14]तस्करांचिया राहटी । भंगिसी कीं ऐकतां ? ॥ ३३ ॥ तीर्थयात्रे जाती जन । त्यांतें कोंडूनि घेती धन । त्यांचें करूनियां हनन । मार्ग मुक्त करिसी कीं ? ॥ ३४ ॥ सांगावया क्लेशगोष्टी । दुर्बळ येऊं इच्छिती भेटी । तयां येतयां आडकाठी । तुझ्या द्वारीं नाहीं कीं ? ॥ ३५ ॥ परराष्ट्र ध्यावया धाडिसी सैन्य । झुंझती त्यांचें [15]करूनि कंदन । त्यांवांचून प्रजांतें नागवण । तुझेनि होत नाहीं कीं ? ॥ ३६ ॥ पिपीलि[16]का लागे जेथें । तात्काळ हात पावें तेथें । दीनें पावतां दुःखातें । [17]क्लेशांतीत करिसी कीं ? ॥ ३७ ॥ अंगींचें एक रोम[18] उपडे । तें जैसें [19]हृदयांत ठाउकें पडे । तेंवी प्रजा पावतां पीडे । जाणसी कीं तात्काळ ? ॥ ३८ ॥ तुझिया राज्यामाजी प्राज्ञा ! । पुत्र पाळिती पितृआज्ञा । न करितां पुरुषांची अवज्ञा । स्त्रिया स्वधर्मे असती कीं ? ॥ ३९ ॥ शरीर संपत्ती [20]मनोभावा । [21]अर्पून करिती सद्गुरुसेवा । ऐसे शिष्य [22]नरपार्थिवा ! । शि-

---

१. 'अससी कीं' असाही पाठ आहे. २. कामांत. श्लोक ५४ पहा. ३. 'प्रीतिपात्रें' असाही पाठ आहे. ४. 'क्षणमात्रें' असाही पाठ आहे. ५. 'पराचित्त' असाही पाठ आहे. ६. 'जाकळे' असाही पाठ आहे. ७. दुसऱ्याच्या दुःखानें. ८. वर्तणूकी. ९. दूतांच्या (हेरांच्या) मुखानें. १०. अधिक. ११. 'नियोगी' असाही पाठ आहे. १२. पदच्युत, भ्रष्टपद. १३. 'गुप्ताचाराच्या' असा अन्य पाठ आहे. १४. चोरांच्या. १५. 'करावया' असाही पाठ आहे. १६. मुंगी. १७. नष्टक्लेश. १८. केश. १९. 'तें जेंवि देहासि' असा अन्य पाठ आहे. २०. 'मनोभावें' असाही पाठ आहे. २१. 'अर्पण करिती गुरुसवें' असाही पाठ आहे. २२. 'मनोभावें' असाही पाठ आहे.

ष्यधर्मे असती कीं ? ॥ ४० ॥ [1]संधी [2]विग्रह [3]यान [4]आसन [5] । [6]द्वैधीभाव [7]आश्रय जाण । हेचि साही राजगुण । विचक्षण बोलती. ॥ ४१ ॥ साम दान दंड भेद । इंद्रजाळ [9]मंत्रौषध । [10]संतोपाय ऐसे [11]सुबुद्ध । पंडितवर्य बोलती. ॥ ४२ ॥ [12]आपपराचें [13]बळाबळ । इहींसीं [14]चौदों [15]भेदें कुशळ । बोलती हें गूढ प्रांजळ । करूनि तूतें दाविलें. ॥ ४३ ॥ अथवा आणीक एक प्रकार । चौदा भेद ग्रंथ[16]प्रकार । बोलती ते सविस्तर । मागुतेनि परियेसीं. ॥ ४४ ॥ अंगबळ, सेनाबळ, । कोशबळ, दुर्गबळ, । शस्त्रबळ, [17]मंत्रप्रधानबळ, । सुहृद्बळ आठवें.

---

१. ह्या ओंव्या, ओंव्या ४०-४१ यांमध्यें एका पोथींत आढळतातः—'संधींत अमित्रासी मित्र करणें । विग्रह फावल्या रिपूतें पीडणें । मनीं रिपूवरी चाली करणें । सहा चिन्हें अवधारी ॥ १ ॥ बलिष्ट रिपूतें देखतां । शरीरसंपत्ती तयाधीनता । या नांव स्वस्थता । चौथा गुण जाणिजे ॥ २ ॥ आसन या पदाचें व्याख्यान । शत्रु सांडावा उपेक्षुन । तो असावध होऊन । मग समूळ प्राशावा ॥ ३ ॥ आतां एक द्विविधभावा । शत्रूचा आप्त कोंडून पाहावा । त्याचेनि हातें धांव डावा । करुनी वैरी वधावा ॥ ४ ॥ हीं अमोघ साही राजचिन्हें । जीं नेमिलीं नीतिकारणें । तया गुणी धनवानें होणें । ते तुझ्याठायीं वसती कीं ? ॥ ५ ॥' २. तह, सख्य. ३. वैर, लढाई. ४. शत्रूवर स्वारी करणें. ५. 'शासन' असाही पाठ आहे. ६. सुरक्षित ठिकाणीं बसून असणें. ७. फितूर. ८. बलिष्ठाचा आश्रय. ९. मंत्रोपाय आणि औषधोपाय. १०. 'उपायाः सप्त सामदानभेददंडमंत्रौषधेन्द्रजालाख्याः' [महाभारत–सभापर्व– अ० ५ श्लो० २१ टीका पहा.] ११. 'प्रसिद्ध' असा पाठ आहे. १२. ओंव्या ४२-४३ यांमध्यें ह्या ओंव्या जास्ती आढळतातः—'साम प्रेमें करावें कीं जाण । दान अर्थ अपार दंडन । भेद परजना क्लिष्ट करून । निजगृहातें पर पीडणें ॥ १ ॥ हा माया उपाय त्रिविध भेद । उपेक्षा चिन्ह अगाध । ··············· । उपेक्षा करणें रिपूची ॥ २ ॥ करूनियां इंद्रजाळ । रिपु जिंकावा सबळ । आणि वाचें वपावें बळाबळ । हें चिन्ह तव देहीं वसत कीं ? ॥ ३ ॥' १३. शत्रूचें आणि आपलें साम्य आहे किंवा हीनत्व आहे किंवा कांहीं कमज्यास्तपणा आहे असें बळाबळ पाहणें. हें बलाबल त्रिविध आहे. [टीका पहा.] १४. 'जाणोनियां अत्यंत कुशळ' असा पाठभेद आहे. १५. बळाबळ पाहण्याचीं स्थानें चौदा आहेत; तीं हींः—१ देश, २ दुर्ग (किल्ला), ३ रथ, ४ हत्ती, ५ घोडे, ६ योद्धे, ७ अधिकारी, ८ अंतःपुर, ९ अन्नगणना, १०. अश्वरथादिकांचा पुरवठा, ११ नीति, १२ जमाखर्चाचा हिशेब (आयव्ययनिर्णय), १३ द्रव्याचा पुरवठा, आणि १४ गुप्तशत्रु (आसव–मद्याप्रमाणें अपकार करणारे प्रच्छन्नशत्रु). या संबंधानें टीकेंत पुढील श्लोक आहेतः—'देशो दुर्गं रथो हस्तिवाजियोधाधिकारिणः । अंतःपुरान्नगणनाः शास्त्रलेख्यधनासवाः ॥ परीक्ष्या हयाधिपास्तेषां चतुर्दश नरेश्वरैः ॥' इति. अधिकारी=देशपाल, सेनापति इत्यादि. १६. 'चतुर' असाही पाठ आहे. १७. 'यंत्र' असाही पाठ आहे.

॥ ४५ ॥ वेदत्रय[1] बुद्धिबळ । ब्राह्मणशेषसुकृतबळ[3] । अन्य रायाचें साह्यबळ । ऐसीं चौदा जाणावीं. ॥ ४६ ॥ जिये गुणोदकीं तीर्थीं मन । सुस्नात होतां पावें स्नान[4] । यालागीं तीर्थाटिन[5] अभिधान । द्वैपायन बोलिला. ॥ ४७ ॥ स्वामी अमात्य सुहृद् कोश । राष्ट्र दुर्गबळ विशेष । शयनाशयनीं विशेष । राजपुत्र कळत्र[6] ॥ ४८ ॥ आतां वैशेषिक संस्थान । विहार विकल्प हे जाण । अरि मित्रामित्रारी भिन्न । अष्टादश[7] परपक्षी. ॥ ४९ ॥ राजपुत्र कळत्र सुहृद । तिन्हीं भिन्न करूनि विशद । स्वकीयपक्षी विचारविद । पंचादश जाणती. ॥ ५० ॥ आपुलेनी मरणें यया मरण । यालागीं तीनें करूनियां भिन्न । उरले पंध्रा विचक्षण । आपुला पक्ष लक्षिती. ॥ ५१ ॥ भृगु विशाळ अंगिरा मुनी । ऐसे प्रगट वदले वाणी । या वेगळे काय ते गुणी । द्वैपायन स्वयें जाणे. ॥ ५२ ॥ वर्ष कार्य एक मास । मासाचें तें एक दिवस । दिवसकार्य एक निमिष्य । संपादीत असशी कीं? ॥ ५३ ॥ व्यास बोलिला गूढार्थ । म्यांही न बोलतां प्रगटार्थ । चतुर[12] श्रोतियांचें चित्त । संतोषेल[13] कैसेंनीं? ॥ ५४ ॥ प्रज्ञा कुळ दमश्रुत । पराक्रम आणी मितभाषित[14] । यथाशक्ती दान[15] हें सत्य । कृतघ्नता नाठवी. ॥ ५५ ॥ अष्टौगुणप्रतीकार । ऐसे बोलती विचारचतुर । याचें सेवन निरंतर । अत्यादरें करिसी कीं? ॥ ५६ ॥ शुश्रूषा श्रवण ग्रहण धारण । ऊहापोह अर्थविज्ञान । तत्वज्ञानेंसिं आठही गुण । सेविसी[16] कीं सुजाणा? ॥ ५७ ॥ [17]श्रोत्रिय कुटुंबी निर्धन । साधु सात्विकवृत्ति क्षीण । त्यांचें परिहरूनि दैन्य । सदा पाळण करिसी कीं? ॥५८॥ दरिद्रब्राह्मणाची जाया[18] । तारुण्यकाळीं अंतरे, राया! । ऐकोनि त्याचिया विवाहकार्या । साह्य संपूर्ण करिसी कीं? ॥ ५९ ॥ रोगें प्रवासें पडिलें[19] । का-

---

१. आयुर्वेद, धनुर्वेद आणि गांधर्ववेद. २. 'दैवत मंत्र' असाही पाठ आहे. ३. 'सुंदर बळ' असाही पाठ आहे. ४. 'ज्ञान' असाही पाठ आहे. ५. 'तीर्थ हें' असाही पाठ आहे. ६. स्त्री. ७. ह्यांचें वर्णन पुढें ओंव्या ११६-११८ यांत पहा. ८. 'नीती' असाही पाठ आहे. ९. मंत्री, पुरोहित आणि युवराज. १०. 'सुरगुरू' असाही पाठ आहे. ११. 'प्रगटार्थ' असाही पाठ आहे. १२. 'तरी' असा अन्य पाठ आहे. १३. ही ओंवी, ओंव्या ५४-५५ यांमध्यें जास्ती आढळते:—'स्वपक्ष पंचदश हें लक्षण । याचा प्रगटार्थ, यथामति करून । सांगीतला श्रोतयांलागुन । पुढें नारदोक्ती परिसिजे ॥ १ ॥.' १४. नियमितभाषण. 'नीती भारत!' असा अन्य पाठ आहे. १५. 'धन' असाही पाठ आहे. १६. 'सुबुद्धीसी सेविसी' असाही पाठ आहे. १७. वैदिक. १८. स्त्री. जीमध्यें पुत्ररूपानें पति जन्म घेतो (जायते) ती 'जाया.' १९. 'प्रवासी पीडिले' असाही पाठ आहे.

रागृहीं जे कां आटकले । ते[1] ते सांभाळूनि भले । क्लेशातीत करिसी कीं ? ॥ ६० ॥ गृहा पावलिया क्षुधापीडितें । ते तृप्त होऊनि [2]पंचामृतें । आशीर्वचनीं स्वस्थळातें । तुजपासूनि जाती कीं ? ॥ ६१ ॥ लोकलाजें त्यजिती प्राण । अधना धनलुब्धाचें ऋण । त्या उत्तमाचें ऋणमोचन । अतिसाक्षेपें करिसी कीं ? ॥ ६२ ॥ आवडीचें निज [3]आप्त । गुणी जामात श्रियावंत । तया ऐसे परम [4]आर्त । याचकांतें करिसी कीं ? ॥ ६३ ॥ तुझे ऋत्विज श्रुतिपारग । सांग संपादिती [5]याग । तूंतें नेणतां कर्म व्यंग । कदां होत नाहीं कीं ? ॥ ६४ ॥ [6]वाजपेयादि [7]पुंडरीक । अनेक क्रतु क्रिया याज्ञिक । घृतावदानीं यज्ञपुरुख । सदां तृप्ती करिती कीं ? ॥ ६५ ॥ ब्राह्मण स्थापिले वृत्तिक्षेत्रीं । ते ते अक्षयीं [8]राजपत्रीं । [9]भातें भक्षूनि पुत्रपौत्रीं । विहित धर्मे असती कीं ? ॥ ६६ ॥ दुष्ट गृहीं उघडितां मुख । शांतिक करिसी कीं तात्काळिक ? । त्रिकाळज्ञानी ज्योतिषी गणक । शुभसूचक असती कीं ? ॥ ६७ ॥ [10]निरांपेक्ष असती कीं [11]भांडारी । क्लीब रक्षक अंतःपुरीं । शुची आप्त तृप्त जठरीं । पाककर्ते असती कीं ? ॥ ६८ ॥ विषम देशाचिया संधीं । अविचार शूर ठेविले युद्धीं । दुर्ग पर्वतीं स्थिरबुद्धीं । धैर्यवंत असती कीं ? ॥ ६९ ॥ बोलों जाणती समयोचित । चतुर जे कां शास्त्रपंडित । ते ते इष्ट साधनार्थ । योजिसी कीं नरेंद्रा ! ॥ ७० ॥ जितेंद्रिय ज्ञानवंत । परमपवित्र साधु संत । [12]सदाचारी सभेआंत । [13]निकटवर्ती असती कीं ? ॥ ७१ ॥ दुष्ट दुर्जन [14]क्षुद्र कोपी । वाग्मि निष्ठुर परमसंतापी । पैशून्यवादी महापापी । सभास्थानीं त्यजिले कीं ? ॥ ७२ ॥ [15]अपमानिती संत साधु । द्विजां देवां दोष शब्दु । बोलती त्यांच्या जिव्हाछेदु । तत्काळिक करिसी कीं ? ॥ ७३ ॥ नरक मोक्ष पापचिन्ह । जिताचि जाणशी सज्ञान । जनाचे मुखीं निंदा स्तवन । हें तंव जाणत अससी कीं ? ॥ ७४ ॥ जागा होओनि अपररातीं । सारासारविचार

---

१. 'नीति' असाही पाठ आहे. २. 'परमामृतें' असाही पाठ आहे. पंचामृत=दूध, दहीं, तूप, मध, साखर. ३. 'आपत्य' असाही पाठ आहे. ४. 'आप्त' असा अन्य पाठ आहे. ५. 'कर्ममार्ग' असाही पाठ आहे. ६. 'अनेक क्रतु याज्ञिक याग । घृतावदानीं संतुष्टे' असाही पाठ आहे. ७. वाजपेय आणि पुंडरीक हीं यज्ञाचीं नांवें होत. ८. सनद. ९. 'वेतन' व 'स्वस्थान' असे पाठभेद आहेत. १०. निरिच्छ. ११. खजीनदार. १२. 'सभाचारी' असा पाठभेद आहे. १३. समीपभागस्थ. १४. 'शीघ्रकोपी' असाही पाठ आहे. १५. 'अप' मानाया' असाही पाठ आहे.

नीती । मोक्षोपायें भवनिवृत्ती । विचारीत असती कीं ? ॥ ७५ ॥ अजिंक्य शत्रूतें जिंकावे । जिंकिल्यांतें प्रतिपाळावें । शरणागतातें रक्षावें । ऐसें करित असती कीं ? ॥ ७६ ॥ वर्ष पालटूनियां जीर्ण । दुर्गपर्वतीं नूतन धान्य । [1]यंत्र औषधी अक्षयीं [2]जीवन । [3]संग्रहीत असती कीं ? ॥ ७७ ॥ पडले खचले जेथें जेथें । तात्काळ सरिसे करिती तेथें । ऐसे शिल्पीकारभृत्ये । वेतनभोक्ते असती कीं ? ॥ ७८ ॥ पशु पीडती पर्जन्यें । गळती गाईचीं गोठणें । [4]वेंढाळें चरती [5]शालीवनें । ऐसें होत नाहीं कीं ? ॥ ७९ ॥ मठ वापिका देवागार । भंगल्या [6]करूनि जीर्णोद्धार । दीप नैवेद्य निरंतर । चालवीत असती कीं ? ॥८०॥ क्षुधित वृद्ध दरिद्रमेळीं । पीडोनि रोड दीन दुर्बळीं । [7]कर्दमपंथें वर्षाकाळीं । मार्ग चालत नाहीं कीं? ॥ ८१ ॥ आपलें महत्व होईल शून्य । म्हणोनि पुरोहित प्रधान । श्रेष्ठ पातलिया दर्शना विघ्न । करिती ऐसें नाहीं कीं ? ॥ ८२ ॥ आप्तसुहृदां देती त्रास । संत साधू पावती क्लेश । ऐसिया दुर्गुणी-यांचा त्रास । तुज तंव झाला नाहीं कीं ? ॥ ८३ ॥ पर्वकाळीं स्त्रीमैथुन । सूर्योदयीं निद्रासंपन्न । एकल्या पंक्तीं मिष्टान्न । भक्षण घडत नाहीं कीं ? ॥ ८४ ॥ चहुंवर्णी आपुले पुत्र । विहित विद्ये अतिपवित्र । अनालस्य अहो-रात्र । अभ्यासवीत असती कीं ? ॥ ८५ ॥ उग्रकामी स्त्रीधनहर्ता । कुळवंताही त्यागिती भर्ता । तैसे तूतें धरत्रीनाथा ! । प्रजांहीं त्यागिलें नाहीं कीं ? ॥८६॥ याचक त्यागिती पतितातें । कुळें [8]वाळिती जातिभ्रष्टातें । तेंवी सर्वलोकीं [9]तूंतें । उपेक्षिलें नाहीं कीं ? ॥ ८७ ॥ [10]सहस्र मूर्खांतें दवडून । एक पंडित ज्ञानसं-पन्न । [11]संग्रहूनि त्याचें मन । स्वस्थ ऐसें करिसी कीं ? ॥ ८८ ॥ एका दु-ष्टाची संगती । यश लाभ सुख संपत्ती । नासूनि भोगवी अपकीर्ती । ऐसें जाणत असती कीं? ॥ ८९ ॥ आढ्य व्यसनी अनुरक्त । मित्र उदासीन शत्रु अमात्य । या सातांचें [12]चिंत्तीकर्षित । जाणसी कीं सुजाणा! ? ॥ ९० ॥ तुवां अथवा तव प्रधानीं । रहस्य बोलिजे एकांतस्थानीं । तें बाहेर लोकांचे कर्णीं । प्रगट होत नाहीं कीं ? ॥९१॥ दुष्ट बळिष्ट आज्ञारहित । तदर्थी अपाय विचार

---

१. लढाईच्या प्रसंगीं उपयुक्त अशीं यंत्रें. २. पाणी. ३. 'शीघ्र करीत' असाही पाठ आहे. ४. निर्बंध गुरें (मोकार जनावरें) वोढाळ गुरें. ५. भाताचीं शेतें. ६. 'जाणोनि' असाही पाठ आहे. ७. चिखलाच्या वाटेनें. ८. वाळीत टाकतात. ९. 'तुज उत्तमातें' असा पाठभेद आहे. १०. श्लोक ३५ पहा. ११. बाळगून. (पंडितास बाळगण्याचें कारण संकट प्राप्त झालें असतां तो त्यांतून मुक्त करतो.) १२. चित्तांत आणलेलें.

गुप्त । प्रगटल्या नाश करिती बहुत । हें तंव जाणत अससी कीं ? ॥ ९२ ॥ एक उघड बोलिजे जनीं । एक [1]प्रेरिजे महंतकर्णीं । एक ठेविजे [2]मनींचे मनीं । हें जाणत आहेस कीं ? ॥ ९३ ॥ वैरिवर्गाचें वर्तन । क्षणक्षणा व्हावया ज्ञान । गुप्त ठेवून [3]चारगण । विचारीत अससी कीं ? ॥ ९४ ॥ तुजसीं दावूनि आप्तता । शत्रूसी पावविती वार्ता । ऐसे कोण ते तत्वतां । वोळखोनि अससी कीं ? ॥ ९५ ॥ वार्ता आणिती वार्तिक । ते नेणती एकाएक । [4]निर्त्यानित्य अनोळख । [5]प्रेरिसी कीं सुजाणा ! ? ॥ ९६ ॥ बहुत लाधे स्वल्प यत्नीं । तेथें आलस्य नसे कीं मनीं । स्वल्प लाभें बहुत हानी । तेथें उद्योग नसे कीं ? ॥ ९७ ॥ राज्य रक्षिती [6]झुंझारबळी । संपूर्ण अथवा [7]नियमकाळीं । वेतन पावोनि तुझ्या [8]दळीं । एक चित्तें असती कीं ? ॥ ९८ ॥ ज्याचेनि कार्यसाधन पुढें । ते पावतां वेतनपीडे । समयीं महा अनर्थ घडे । हें जाणशी कीं नरेंद्रा ! ? ॥ ९९ ॥ अर्थसंग्रह पाहोनि जोडीं । चतुर्थांशें वेतनें दवडीं । सकळ वेचूनि हस्त झाडी । हे तुज खोडी नाहीं कीं ? ॥ १०० ॥ [9]आयव्ययाचे अधिकारी । गणक लेखक प्रथम प्रहरीं । सिद्ध पत्रें धरूनि करीं । उभे सन्मुख असती कीं ? ॥ १०१ ॥ आरूढलीया [10]भद्रासनीं । राजदर्शना येईजे जनीं । टिळा माळा वस्त्राभरणीं । देखसी कीं साजिरें ? ॥ १०२ ॥ [11]रक्तांबरी [12]खड्गधार । किरीटकुंडलीं साळंकार । सुहृद क्षत्रियांचे भार । [13]उभयभागीं असती कीं ? ॥ १०३ ॥ श्रेष्ठ सत्पात्रीं वोपितां दान । योगियां विशेष अर्पितां धन । दुष्ट पुरोहित प्रधान । विघ्नकर्ते नसती कीं ? ॥ १०४ ॥ नगर रक्षावयाकारणें । कीजेत ग्रामाचीं पट्टणें । घोष घोष ग्रामतुल्य करणें । ऐसें करीत अससी कीं ? ॥ १०५ ॥ पर्वतसंधी घांट बेटा । वोस रानें पाहोनि

---

१. 'बोलिजे' असा पाठ आहे. २. 'आपुले' असाही पाठ आहे. ३. सेवकसमूह. गुप्त बातमीदारांचा समुदाय. ४. 'तीन तीन' असाही पाठ आहे. ५. 'परिसिसी कीं' असा पाठभेद आहे. ६. योद्धे वीर. ७. 'नेम' असा पाठभेद आहे. ८. सैन्यांत. ९. जमाखर्चाचे अधिकारी. (श्लो० ७२.) १०. सिंहासन. भद्रासनाचें लक्षण 'देवीपुराणां'त आहे तें असें:—'हैमं च राजतं ताम्रं क्षीरवृक्षमयं च वा । भद्रासनं प्रकर्तव्यं सार्धहस्तसमुच्छ्रितम् ॥ सपादहस्तमानं च राज्ञो मांडलिकांतरात्.' याचें लक्षण वराहसंहितेंत आहे:—'त्रिविधस्तस्योच्छ्रायो हस्तः पादाधिकोऽर्धयुक्तश्च । मांडलिकानंतरजितसमस्तराज्यार्थिनां शुभदः ॥' [रंगनाथकृत विक्रमोर्वशीयनाटकटीका—पृष्ठ १३९ पहा.] ११. रक्तांबरधारी. (श्लो० ८७.) १२. खड्गहस्त. १३. संरक्षणासाठीं.

चोखटा । तेथें वसवूनियां पेटा । मार्ग निर्भय[1] करिसी कीं ? ॥ १०६ ॥ नापेक्षितां मेघजळें । सर्वदां पिकें पिकती सकळें । अभंग तडागें पाटस्थळें । पैं निर्मिलीं[2] असती कीं ? ॥ १०७ ॥ कृषीवलें खंगलीं भणंगें । धनधान्य ओपूनि अंगें । शेताचेनि राजभागें । पाळिशी कीं नरेंद्रा ! ? ॥ १०८ ॥ लुब्ध तस्कर लेखनकारी । राजस्त्रिया राजकुमरी । प्रजालागीं बळात्कारीं । [3]पीडित नाहींत कीं ? ॥ १०९ ॥ हिंसक [4]आततायी सिद्ध । त्यांचा श्रवणीं पडतां शब्द । आधीं करूनियां वध । मग विचार करिसी कीं ? ॥ ११० ॥ उदरपीडेच्चिया महामारीं । उत्तमेंही करितां चोरी । धरूनि. आणितां राजहेरीं । मानें मुक्त करिसी कीं ? ॥ १११ ॥ अष्ट भोगी श्रीरंजन । बाह्य अंतरीं संरक्षण । करूनि गुज अनुवादन । स्त्रीजनासीं नाहीं कीं ? ॥ ११२ ॥ [5]उगाणितां परराजातें । जे जे वस्तु लाधली ज्यातें । ते ते [6]मुक्त करोनि त्यातें । तोषवीत अससी कीं ? ॥ ११३ ॥ [7]औषधनेम शरीरांतें । वृद्धसेवन मानसातें । दोंप्रकारें आपणातें । रक्षिसी कीं सुजाणा ! ? ॥११४॥ अवलोकुनी आपपरातें । तदनुसार त्यां कर्मातें । प्रयोजनीं मग आठातें । सेविसी कीं [8]सुजाणा ! ? ॥ ११५ ॥ पराच्या पक्षीं [9]अष्टादश । आपुले

---

१. 'मुक्त' असाही पाठ आहे. २. 'निर्मळ' असाही पाठ आहे. ३. 'पीडा करित नसती कीं' असाही पाठ आहे. ४. वध करण्याविषयीं उद्युक्त. ५. जिंकितां. ६. माफ, बक्षीस. ७. श्लोक ८९ पहा. ८. 'सुविद्या' असाही पाठ आहे. ९. शत्रुपक्षाचे अष्टादश (अठरा) अधिकारी आणि स्वपक्षीय पंचदश (पंधरा) अधिकारी ह्यांच्या वर्तनाविषयीं राजानें बातमी सदां ठेवावी म्हणजे तो कृतकृत्य होतो, असें नीतिशास्त्रांत सांगितलें आहे. ह्या अधिकाऱ्यांस येथें 'गुण' असें म्हटलें आहे परंतु नीतिशास्त्रांत यांस 'तीर्थें' अशी संज्ञा आहे. 'तीर्थ'शब्दाविषयीं कोशपंक्तिः–'योनौ जलावतारे च मंत्र्याद्यष्टादशस्वपि' इति हलायुधः. [महाभारत–सभापर्व, अध्याय ५ श्लोक ३८ टीका पहा.] 'तीर्थें' म्हणजे मंत्री, उपाध्याय असा अर्थ आहे. ['तीर्थं शास्त्राध्वरक्षेत्रोपायनारीरजःसु च । अवतारर्षिजुष्टाम्बुपात्रोपाध्यायमंत्रिषु ॥' इति मेदिनी.] 'तीर्थें' म्हणजे 'गुरु' म्हणून हे अधिकारी इतर सर्व अधिकाऱ्यांमध्यें मान्य, थोर, आणि उपयुक्त होत व याच कारणास्तव त्यांस 'तीर्थें' अशी संज्ञा आहे. यांचीं नांवें:—'मंत्री पुरोहितश्चैव युवराजश्चमूपतिः । पंचमो द्वारपालश्च षष्ठोऽन्तर्वेशिकस्तथा ॥ १ ॥ कारागाराधिकारी च द्रव्यसंचयकृत्तथा । कृत्याकृत्येषु चार्थानां नवमो विनियोजकः ॥ २ ॥ प्रदेष्टा नगराध्यक्षः कार्यनिर्माणकृत्तथा । धर्माध्यक्षः सभाध्यक्षा दंडपालस्त्रिपंचमः ॥ ३ ॥ षोडशो दुर्गपालश्च तथा राष्ट्रांतपालकः । अटवीपालकांतानि तीर्थान्यष्टादशैव तु ॥ ४ ॥ चारान्विचारयेत्तीर्थेष्वात्मनश्च परस्य च । पाखंडादीनविज्ञातानन्योन्यमितरेष्वपि. ॥ ५ ॥' [सभापर्व–अध्याय ५ श्लोक ३८ टीका.] याचा भावार्थः—१

१४९१८।म०५।३१

पक्षीं पंचदश । गुण बोलिले ते विशेष । जाणसी कीं नरेंद्रा!? ॥ ११६ ॥ द्यूत निद्रा अन्नपान । स्त्रीसंयोग व्यय व्यसन । काळ पाहोनि विचक्षण । करिती तैसें करिसी कीं? ॥ ११७ ॥ अष्टांग चतुर्विध बळें । शत्रु जिंकिजे बुद्धिकुशळें । व्यसनीं क्षीणले आगळे । आदरें वश्य करिसी कीं? ॥ ११८ ॥ परहितार्थ संत साधु । जे सांगती बुद्धिवादु । ते मानूनि परम बंधु । वर्तसी कीं तदाज्ञा? ॥ ११९ ॥ अंतःकरण आणी शरीर । नियमीं न पावे विकार । शब्द तो सजीव गिरिवर । न चळे न ढळे नुखळे कीं? ॥ १२० ॥ ज्ञाता गुरु देवप्रतिमा । यज्ञमंडप चैत्यद्रुमा । देखतां क्षणीं राजोत्तमा! । नमस्कार करिसी कीं? ॥ १२१ ॥ वृद्ध तापस ब्राह्मणपंक्ती । अश्व भांडार भद्रजाती । ध्वजा प्रसाद पवित्रक्षिती । देखतां वंदन करिसी कीं? ॥ १२२ ॥ दंडित्यातें प्रत्यक्ष यम । पूज्याप्रती परम सौम्यं । परीक्षोनि अधमोत्तम । वर्तसी कीं शहाणिया!? ॥ १२३ ॥ कार्यसाधनीं अति नेटकें । त्यांचें स्तवन क-

---

मंत्री, २ पुरोहित, ३ युवराज, ४ सेनापति, ५ द्वारपाल, ६ अंतर्वेशिक (राजाची भेट करविणारे), ७ कारागाराधिकारी (तुरुंगावरचा अध्यक्ष), ८ द्रव्यसंचयकृत् (जामदार), ९ विनियोजक (योग्यायोग्य पाहून द्रव्य खरचणारा), १० प्रदेष्टा (मसलत देणारा), ११ नगराध्यक्ष (कोतवाल), १२ कार्यनिर्माणकृत् (घरें, रस्ते वगैरे बांधणारे), १३ धर्माध्यक्ष, १४ सभाध्यक्ष, १५ दंडपाल (न्यायाधीश), १६ दुर्गपाल (किल्लेदार), १७ राष्ट्रांतपालक (सरहद्दीवरचा संरक्षक) आणि १८ अटवीपालक (अरण्यसंरक्षक). ह्या अठरांपैकीं मंत्री, युवराज, आणि पुरोहित हे तीन कमी करून स्वपक्षीय १५ समजावे. या पंधरांकडील बातमी काढून राजानें स्वप्रजांचें अनुरंजन करावें आणि परप्रजांला अभय देऊन स्वराष्ट्रवृद्धि करावी असें सांगितलें आहे. [श्लोक ३८ टीका पहा.]

१. श्लोक ६९ पहा. २. सैन्याचीं अंगें आठ आहेतः—'रथा नागा हया योधाः पत्तयः कर्मकारकाः । चारा दैशिकमुख्याश्च ध्वजिन्यष्टांगिका मता ॥.' याचा भावार्थः—१ रथ, २ हत्ती, ३ घोडे, ४ वीर (योद्धे), ५ पायदळ, ६ कर्मकार (रस्ता साफ करणें इत्यादि कामें करणारे), ७ चार (गुप्त बातमीदार) आणि ८ दैशिकमुख्य (राज्यांतील ठिकठिकाणचे प्रमुख लोक) अशीं आठ अंगें आहेत. [अध्याय ५ श्लोक ६३ टीका.] ३. सैन्य चतुर्विध (चार प्रकारचें) समजतातः—१ मौल (मूळापासूनचे, पिढीजादे शिपाई), २ मैत्र (स्नेहास्तव शिपाईगिरी पत्करलेले), ३ भृत्य (दरमहा देऊन ठेवलेले) आणि ४ आटविक (रानटी). [अध्याय ५ श्लोक ६३ टीका.] ४. 'आंगबळें' असाही पाठ आहे. ५. 'मानें मुक्त' असाही पाठ आहे. ६. पवित्र स्थळीं उगवलेला अथवा पार बांधलेला उंबर. ७. भद्रजाति–ही हत्तीमध्यें एक जात आहे. ८. दंडास योग्य अशातें. ९. यमाप्रमाणें क्रूर. (श्लोक ८८.) १०. विनयवान्.

टिळक ग्रंथसंग्रहालय
दा. क्र. 14918
294.5921 MVK

रिसी मुखें । सभामंडपीं नानाधिक्यें । गौरवीत असशी कीं? ॥ १२४ ॥ अग्नी सर्प चोर व्याघ्र । रोग राक्षस कां [2]परचक्र । यांपासूनि आपुलें राष्ट्र । रक्षिसी कीं बळिष्ठा!? ॥ १२५ ॥ [3]अंध मुके पंगु व्यंग । [4]आतुर [5]संन्यासी [6]अध्वांग । पितयाऐसें सांगोपांग । पाळण त्यांचें करिसी कीं? ॥ १२६ ॥ नास्तीक्य अनृत सक्रोधता । [7]प्रमाद आणी [8]दीर्घसूत्रता । कार्यी आलस्य [9]क्षिप्रवत्ता । निश्चिताचा नारंभु. ॥ १२७ ॥ ज्ञानीयाचें अदर्शन । अज्ञानाचें दृढचिंतन । अनर्थी [10]एकनिष्ठ मन । [11]अरक्षण [12]मंत्राचें. ॥ १२८ ॥ [13]मंगळाचा [14]अप्रयोग । विषयाचा [15]अतिप्रयोग । चौदों [16] दोषीं तुझे अंग । सांग [17]स्पर्शलें नाहीं कीं? ॥ १२९ ॥ निद्रा आलस्य भय क्रोधता । [18]मार्दव आणी दीर्घसूत्रता । साही अनर्थांचिया माथां । पाय देऊनि असशी कीं? ॥ १३० ॥ [20]सफळ दास, सफळ वित्त, । सफळ वेद, सफळ श्रुत, । तुझें असे कीं निश्चित ।

---

१. अध्याय ५ श्लोक १२३ पहा. २. शत्रुसैन्य. ३. अध्याय ५ श्लोक १२४ पहा. ४. पीडित, अबांधव, निराश्रित. ५. विरक्त, प्रव्रजित. ६. अंगानें विकल अथवा विहीन, अंगहीन. ७.गर्व, अनवधानता, दुर्लक्ष्य. ८.चेंगटपणा. ९. घाई, त्वरा. १०.एकाग्र. ११. जो मंत्र (मसलत) सांगितला त्याप्रमाणें न वागणें. १२. राज्यकारभारांतील गुप्त मसलत, विचार. १३. देवांचा उत्सव इत्यादि मंगलकार्य न करणें. १४. 'अप्रिय योग' असाही पाठ आहे. १५. 'विषयाचा अतिप्रसंग' असाही पाठ आहे. १६. चौदा राजदोषांचीं नांवें:—'नास्तिक्यमनृतं क्रोधं प्रमादं दीर्घसूत्रताम् । अदर्शनं ज्ञानवतामालस्यं पंचवृत्तिता ॥ एकचिंतनमर्थानामनर्थज्ञैश्च चिन्तनम् । निश्चितानामनारंभं मंत्रस्यापरिरक्षणम् ॥ मंगलाद्यप्रयोगं च प्रत्युत्थानं च सर्वतः । कच्चित्त्वं वर्जयस्येतान् राजदोषांश्चतुर्दश ॥' [अ० ५ श्लो० १०७-१०९ पहा.] याचा भावार्थ:—१ नास्तिक्य (परलोकाचा अपलाप), २ अनृत (असत्य), ३ क्रोध, ४ प्रमाद (अनवधानता), ५ दीर्घसूत्रता (चिरक्रियत्व), ६ ज्ञानवंतांचें अदर्शन (ज्ञानी जनांची भेट न घेणें), ७ आलस्य, ८ पंचवृत्तिता (पंचेंद्रियांची परवशता), ९ सर्वार्थांचें (सर्व प्रयोजनांचें) एकचिंतन, १० विपरीतार्थदर्शी जनापासून अर्थाचें चिंतन (अर्थप्राप्तीविषयीं मसलत—मंत्र), ११ निश्चित कार्याचा अनारंभ, १२ मंत्राचें (मसलतीचें अपरिरक्षण (गुप्त न राखणें), १३ मंगल कार्याचें (उत्सव—देवपूजादिक) अननुष्ठान (मंगलकार्यें न करणें), १४ प्रत्युत्थान (सर्व दिशांस राहणाऱ्या शत्रूंवर सर्व बाजूंनीं दंडाच्या इच्छेनें एककालीं स्वारी करणें) असे चौदा राजदोष आहेत. [अध्याय ५ श्लोक २१ टीका पहा.] १७. 'वर्तलें' असा अन्य पाठ आहे. १८.श्लोक १२५ पहा.१९. काठिण्य.२०. श्लोक ११० पहा. यांत चार प्रश्न आहेत व त्यांचीं उत्तरें पुढच्या दोन ओंव्यांत आहेत. अग्निहोत्रफल वेद, दत्तभुक्तफल धन, रतिपुत्रफल दारा आणि शीलवृत्तफल श्रुत हीं चार उत्तरें आहेत. (श्लो० ११२.) अग्निहोत्र घेणें हें वेदाचें फळ होय, दान करणें व उपभोग घेणें हें धनाचें फळ होय, रतिसुख आणि पुत्रलाभ हें स्त्रियांचें फळ होय, शील व वृत्त (उत्तम वर्तन) हें श्रुताचें (शास्त्रज्ञानाचें) फळ होय.

हें प्रगटार्थ परिसे पां. ॥ १३१ ॥ सफळ दारा रति पुत्र । सफळ वेद अग्निहोत्र । दत्तभुक्तीनें पवित्र । सफळ वित्तें जाणसी कीं? ॥ १३२ ॥ श्रुत्यर्थ बोधला जो अर्थ । त्या नांव 'श्रुतज्ञान' म्हणत । याचें फळ शीलवृत । त्या आचारें असती कीं? ॥ १३३ ॥ परद्वीपींच्या अमोल्य वस्ता । वणिक[1] आणिती इच्छूनि अर्था[2] । त्यांच्या पुरवूनि मनोरथा । लाभ चौगुणीं देसी कीं? ॥ १३४ ॥ देशावरा पातले अर्थी[3] । द्रव्य देऊनि त्यांचे आर्ती । जगीं जोडावी सत्कीर्ती । हे तुज इच्छा असे कीं? ॥ १३५ ॥ विषम काळास्तव पातले । कलत्र पुत्र वंशज भले । ते ते मानूनि आपुले । आपणा ऐसे करिसी कीं? ॥ १३६ ॥ वैद्य चिकित्सक मर्दक । हडपी सैंाळी[4] नापिक[5] । निकटवर्ती विश्वासिक । हितकारक असती कीं? ॥ १३७ ॥ शत्रुनाशालागीं आघवे । विष[6]प्रयोग जाणसी बरवे । वासपुष्पफळांसवें । प्राण घेसी परांचे कीं? ॥ १३८ ॥ निर्दोषियां दोषारोप । निर्धनियां धनसंकल्प । दुर्गुणियांचा दुर्गुणलोप । तुझ्या नगरीं नाहीं कीं? ॥ १३९ ॥ आचार दाऊनि लोकदृष्टी । [7]अंतरीं अनाचार राहटी । ऐसे दांभिक तुझ्या निकटीं । वर्तणारे नसती कीं? ॥ १४० ॥ तोंडें [8]बोलोनियां ब्रह्म । भंगिती सदाचारधर्म । प्रशंसिती अविचारकर्म । ते संसर्गी त्यजिले कीं? ॥ १४१ ॥ दाऊनि योगियाचें चिन्ह । पोसिती उदर आणी तन । त्यांच्या ठायीं तुझें मन । विश्रामत नाहीं कीं? ॥ १४२ ॥ धनिक वेंची धनातें । दरिद्री नाचरे तपातें । शास्त्रज्ञ चालतां कुपंथें । दंडिसी कीं निजाज्ञा? ॥ १४३ ॥ मातापिता दवडूनि दूरीं । श्वशुरवर्ग सांठवी घरीं । ऐसा कुश्चिताचार, परी । तुझ्या देशीं नाहीं कीं? ॥ १४४ ॥ सुना छळिती सासुवांतें । पुत्र अव्हेरिती पित्यातें । सेवक अवगणिती स्वामीतें । ऐसें होत नाहीं कीं? ॥ १४५ ॥ [9]एवं सर्वांपरी जाण । राजा असावा सावधान । हेंचि विस्तारें निरोपण । पुण्यश्लोका! बोधिलें. ॥ १४६ ॥ जो कां राजा ऐसियापरी । [10]चहूं वर्णांचें पालन करी । पृथ्वी भोगूनि लोकांतरीं । शक्रसायुज्य स्वयें पावे[11][12]. ॥ १४७ ॥ ऐसे परीचे उत्तम गुण । तुझे ठायीं असावे पूर्ण । ऐसें आमुचें

---

१. वाणी, व्यापारी. २. नफा, लाभ. ३. याचक. ४. कोष्टी. ५. न्हावी. ६. श्लोक १२२ पहा. ७. 'वर्तें' असाही पाठ आहे. ८. 'बोलती' असाही पाठ आहे. ९. त्यागिती. १०. 'ऐसें' असाही पाठ आहे. ११. 'सर्वे' व 'उंच' असेही पाठभेद आहेत. १२. 'भोगवी' असाही पाठ आहे.

इच्छी मन । 'किंचित्प्रश्न' या नांवें. ॥ १४८ ॥ 'किंचित् कामप्रवेदने'। ऐसें बोलती पंडित शहाणे । तेचि विस्तारूनि मनें । तुजकारणें बोलिलों.' ॥ १४९ ॥ ऐकोनि नारदाचें वचन । आश्चर्य करी कुरुनंदन । म्हणे, 'केवढा विचक्षण । होय सर्वज्ञ देवऋषी.' ॥ १५० ॥ पुढती पार्थिवाचेनि प्रश्नें । लोकपालसभासदनें । व्यास गुरु वर्णील वदनें । तें सज्जनीं परिसावें. ॥ १५१ ॥ सभापर्वीं 'नारदनीति' । उद्योगपर्वीं 'विदुरनीति' । भीष्मपर्वीं 'कृष्णनीति' । 'भगवद्गीता' ज्या नांव. ॥ १५२ ॥ भारतकथा संक्रमणीं । निरोपणरूपें तीळवर्णी । वाटितां म्हणतसे अवदानीं । लाहाणें असो श्रोतयां. ॥ १५३ ॥ लीलाविश्वंभरपादाब्जीं । मुक्तेश्वर षट्पद सहजीं । गुंजारव करितां रुंझी । भारतकथा प्रगटली. ॥ १५४ ॥ इति श्रीसभापर्व भारतीं । पुढें अवधान द्यावें श्रोतीं । 'किंचित्प्रश्ना'ची समाप्ती । तृतीयाध्यायीं बोलिलों. ॥ १५५ ॥

---

## अध्याय चवथा.

नमस्कारूनि ऋषिचरणा । राजा म्हणे, 'सर्वज्ञा ! । जे जे स्वामींनीं केली आज्ञा । तेचि रीती वर्ततसें. ॥ १ ॥ पूर्वे उगवूनि छायारंग । पश्चिमे चाले

---

१. 'कश्चित्प्रश्न' असाही पाठ आहे. 'किंचित्प्रश्न' हें वाक्य मूळच्या संस्कृत 'कचित् कामप्रवेदने' ह्या वाक्याचा अपभ्रंश होऊन झालें आहे. ह्याचा अर्थ 'अमुक गोष्ट अशा प्रकाराची असावी अशी आपली इच्छा असून ती तशी आहेना असा दुसऱ्यास प्रश्न करावयाचा असतां 'कचित्' ह्या प्रश्नार्थक अव्ययाची योजना करावी' असा आहे. कवीनेंही हा अर्थ मागच्या ओंवींत सांगून त्यास आधार अमरसिंहाचें वाक्य दिलें आहे, असें दिसतें. (नवनीत.) २. संक्रांत. ३. 'हो श्रवणीं' असाही पाठ आहे. ४. तीळगुळ. ५. भ्रमर. ६. हा अध्याय मूळांतील पांचव्या अध्यायाच्या आधारानें रचिला आहे. याला 'नारदप्रश्नमुखेन राजधर्मानुशासन' असें नांव मूळांत आहे. या अध्यायांतील ओंव्यांचा क्रम मूल अध्यायांतील श्लोकांस अनुसरून नाहीं. पुष्कळ ठिकाणीं मागें पुढें केलेलें आहे असें दिसून येतें. हा प्रकार मुक्तेश्वरानें केला असावा असें दिसत नाहीं. लेखकप्रमादामुळें यांत फारच फेरफार झाला असावा असें वाटतें. हा अध्याय अनेक कारणांनीं मोठ्या महत्त्वाचा आहे. पण त्यांत बरेच अपपाठ असल्यामुळें त्याचें महत्व कांहींसें कमी झालें आहे. मूळांतील बराच भाग गाळला आहे व कोठें कोठें कवीनें नवीन स्वतःच्या पदरची भर घालून रचना केली आहे असें जो कोणी उभय प्रकरणें ताडून पाहील त्यास कळून आल्याशिवाय राहणार नाहीं. ह्या अध्यायाची शुद्ध आणि परिपूर्ण प्रत मिळाल्यास तिचा उपयोग परिशिष्टांत करूं. ७. येथें 'लोकपालसभाख्यानपर्वा'ला आरंभ होतो. ८. हे नारदा !

अवक्रमार्ग । कीं त्रिंबकींहूनि गौतमीओघ । प्राचीं उजू चा[1]मके. ॥ २ ॥ हेही एथें नघडे युक्ती । स्वामींनीं निरोपिली जे नीती । त्यामाजी कांहीं यथाशक्ती । घडे न घडे नेणवे. ॥ ३ ॥ आमुचा विभाग श्रवणीं सुख, । करणीनें समर्थ तुम्ही एक, । तुमचे कृपानुग्रहें रंक । योग्य होईल योग्यते. ॥ ४॥ आतां एक इच्छिजे चित्तें । तें सादर कथिजे मातें, । करतलप्राय विश्व तूतें । दृष्टी असे, या हेतु. ॥ ५ ॥ मयकृत सभे हो! सारखी । आणीक सभा आणीक लोकीं । असे कीं नसे हें कौतुकीं । सांगीतलें पाहिजे. ॥ ६ ॥ लोकत्रयीं तुझी राहटी । सत्यलोककैलासवैकुंठीं । तुझिया गमना आडकाठी । येतां जातां असेना.' ॥ ७ ॥ ऐकोनि हासिन्नला देवऋषी । म्हणे, 'परियेसीं सावकाशीं । मनुष्यलोकामाजी ऐसी । सभा आ[3]न असेना. ॥ ८ ॥ लोकपाळ सभास्थानें । निरोपीन आपुल्या वचनें । जें ऐकतां प्रत्यक्ष नयनें । देखिलें ऐसें अ[4]वगमे. ॥ ९ ॥ इंद्रसभा यमसभा । वरुणसभा कुबेरसभा । पांचवी ते ब्रह्मसभा । अनुक्रमें अ[5]वधारीं. ॥ १० ॥ दे[6]वराज श[7]चीरमण । त्रिया मंडित सहस्रनयन । त्याचें प्रथम सभास्थान । विस्तारेसी परियेसीं. ॥ ११ ॥ शतयोजनें रुंद लांब । चौधार रत्नमणीचे खांब । आटोनियां शा[9]तकुंभ । गगनमुखें वोतिले. ॥ १२ ॥ उंची प्रमाण श[10]तयोजनें । तेजें लाजवी सूर्यकिरणें । मंदारपारिजातकविपिनें[11] । क[12]ल्पद्रुम चौफेरीं. ॥ १३ ॥ हंसयुक्त विमानपंक्ती । हंसतुळिका रत्नदीप्ती । चित्रासनावरी शोभती । वोटांगणे विचित्र. ॥ १४ ॥ मंगळवाद्यें गायनवाद्यें । निरंतर वाजती सुनादें, । गंधर्व विद्याधर विनोदें । मंदहास्यें वर्तती. ॥ १५ ॥ नाहीं दिवसरात्रीचा योग । नाहीं चंद्रसूर्याचा [13]पांग । विषाद चिंता खेद उद्वेग । शक्रसभेसी असेना. ॥ १६ ॥ जिये स्थळींचा लागतां वातु । क्षुधा तृषा जन्म मृत्यु । तात्काळ हारपे, जैसें द्वैतु[14] । ब्रह्मबोधें पारुषें. ॥ १७ ॥ जें जें इच्छिजे भोगसुख । तें तें पाविजे तात्का-

---

१. जाई. २. अध्याय ६ श्लोक ८ पहा. ३. अन्य. ४. वाटे. ५. अध्याय ६ श्लोक १०-१३ पहा. ६. इंद्र. ७. 'सविस्तर' असाही पाठ आहे. ८. अध्याय ७ श्लोक २ पहा. ९. सोनें. [शातकुंभ=शतकुंभे पर्वते भवम्=शातकुंभम्.] १०. 'पांच' असाही पाठ आहे. ११. वनें. मंदार आणि पारिजातक हे दोन देवतरु (देववृक्ष) आहेत. हे एकंदर पांच आहेत:–१ मंदार २ पारिजातक ३ संतान ४ कल्पवृक्ष ५ हरिचंदन. १२. कल्पवृक्ष=संकल्पित अर्थाचा द्रुम (वृक्ष). 'कल्पाचा द्रुम' ही जन्यजनकभावसंबंधदर्शक षष्ठी आहे. १३. अडचण. १४. द्वैतभाव.

ळिक । ऐसा शक्र समर्थ देख । शक्रसभेसी देखिला. ॥ १८ ॥ [1]स्वयेंचि परिमळाची खाणी । सुगंधवाटी जे दिव्यसुमनीं । निर्माल्य सांडितां मूर्ध्नीं । मळयाचळ वोढवी. ॥ १९ ॥ नाहीं [2]तापत्रयाचा वारा । नाहीं शोक रोग जरा । कोणी नातळे [3]षड्विकारा । शक्रसभेमाजारी. ॥ २० ॥ पुण्यें करूनि कर्मभुवनीं । जे जे वसती तये स्थानीं । तें तें स्वल्प ऐकें श्रवणीं । सविस्तर [4]नें वदवे. ॥ २१ ॥ दिव्यांबरें [5]दिव्याभरणें । दिव्यमाळा हरिचंदनें । दिव्यस्त्रिया सुधापानें । दिव्यभोग समस्तां. ॥ २२ ॥ पाराशर सावर्णी पर्वत । [6]गालव दुर्वास शंख लिखित । गौरशिरा दीर्घतमा सुनीथ । याज्ञवल्की भालुकी. ॥ २३ ॥ उद्दालक आणि श्वेतकेतु । सांख्यायन हरीत विनतु । गर्विष्ठ हरिश्चंद्र नृपनाथु । घटोदर शांडिल्य. ॥ २४ ॥ पाराशर्य गौतमधाता । काळअंत वीर्यवंता । [7]स्कंध विषात विधाता । विश्वकर्मा तुंबरु. ॥ २५ ॥ सप्तसागर मेधातिथी । वामदेव पुलह पुलस्ती । कृत सुकृत ब्रह्ममूर्ती । दत्त त्वष्टा प्रसिद्ध. ॥ २६ ॥ मरीची स्थाणु कक्षीवान । गौतम आयताक्षी विष्वक्सेन । संवर्त देवहोत्री जाण । हिरण्य प्रदत्त ते ठायीं. ॥ २७ ॥ रुचिक वाल्मीक प्रचेता । काळवृश्चित बाभ्रव्य सविता । मुनी वैश्वानर नाथा । [8]पावक सप्तविंशती. ॥ २८ ॥ श्रद्धा मेधा सरस्वती । धर्म [9]अर्थ काम त्रिमूर्ती । विद्युत जळवाह मेघ पंक्ती । उपासिती शक्रातें. ॥ २९ ॥ [10]आप औषधी [11]वायुव्य । [12]प्राची दिशा मूर्ती सावेव । आदित्य रुद्र साध्य वसव । सेवा करिती शक्राची. ॥ ३० ॥ ब्रह्मऋषी राजऋषी । भृग्वादीक [13]सप्त ऋषी । शुक्र बृहस्पती देव ऋषी । शक्रसभेशी सादर. ॥ ३१ ॥

---

१. 'सुगंध' असाही पाठ आहे. २. पृष्ठ ३ टीप २४ पहा. ३. जायते (उत्पन्न होतो), अस्ति (राहतो), वर्धते (वाढतो), विपरिणमते (तरुण होतो), अपक्षीयते (वृद्ध होतो) आणि विनश्यति (मरतो) हे सहा विकार आहेत. ४. 'वदें न' असाही पाठ आहे. ५. 'दिव्य सुमनें' असाही पाठ आहे. ६. 'मांडव्य धुंधुमार' असा पाठभेद आहे. ७. 'ते ते जाणिजे तत्वतां' असा अन्य पाठ आहे ८. पावक=अग्नि. [हे सत्तावीस आहेत. त्यांचीं नांवें:—अंगिरा, दक्षिण, गार्हपत्य, आहवनीय, निमर्थ्य, वैद्युत, शूर, संवर्त, लौकिक, जाठर, विषग, क्रव्याद् , क्षेमवान्, वैष्णव, दस्युमान्, बलद, शांत, पुष्ट, विभावसु, ज्योतिष्मान्, भद्र, भरत, स्विष्टकृत्, वसुमान्, क्रतु, सोम आणि पितृमान्. अ० ७ श्लो० २१ टीका.] ९. अर्थादिकांच्या अभिमानिनी देवता–असा अर्थ. [अ० ७ श्लो० २० टीका.] १०. पाणी. (अ० ७ श्लो० १९.) ११. वायु. 'वापुत्र' असा अन्य पाठ. १२. 'दैदीप्य मूर्ति' असाही पाठ आहे. १३. अ० ७ श्लो ० २९ पहा.

[१]ग्रह अप्सरा किन्नर तेथें । नृत्य वाद्य [२]गीत संगीतें । रंजीविती देवेंद्रातें । नानाकळा कौतुकें. ॥ ३२ ॥ [३]शची इंद्राणी श्री लक्ष्मी । कीर्ति बुद्धि द्युती या नामीं । शृंगारयुक्त शक्रधामीं । वोळंगती सर्वदां. ॥ ३३ ॥ याही वेगळे लक्षकोटी । अपार पुण्यें बांधोनि गांठी । वसती देवराजानिकटी । ऋषी राजे असंख्य. ॥ ३४ ॥ '[४]पुष्करमालिनी' ऐसी सभा । जे शतक्रतूची [५]वल्लभा. । आतां ऐकें अद्भुत शोभा । [६]पितृराजसभेची. ॥ ३५ ॥ [७]दिवसमणीचा कुळदीपक । सत्वनिष्ठा अतिसात्विक । दुष्टां निष्ठुर दंडक । नीच सेवक हरिभक्तीं. ॥ ३६ ॥ तया यमधर्माचें गहन । श्रवण करी सभासदन । जें ऐकतां म्हणती नयन । प्रत्यक्ष आम्हीं देखिलें. ॥ ३७ ॥ बाळार्क पर्वत श्रीपर्वतीं । लेणें कोरिलें कुशळहस्तीं । स्वल्प उपमा एक युक्ती । कांहीं घडे त्या ठायां. ॥ ३८ ॥ लांबी रुंदी शतयोजनें । घडिलीं [८]जांबूनदसुवर्णें । चितारिलीं राजांगणें । पाटांगणें परिसाचीं. ॥ ३९ ॥ प्रकाशपरिमळाची खाणी । इच्छिल्या स्पर्शिजे शीत उष्णीं । परम आल्हादकारिणी । सुखवर्धनी समस्तां. ॥ ४० ॥ वृक्ष देती इच्छिलीं फळें । शीत उष्ण सुगंध जळें, । सुगंध माळा परिमळें । वस्त्राभरणें समस्तां. ॥ ४१ ॥ [९]दुःख दरिद्र शोक जरा । क्षुधा तृषा पृथ्वीश्वरा ! । क्लेशव्याधी भयाचा [१०]वांरा । तया ठायीं असेना. ॥ ४२ ॥ [११]लेह्य [१२]पेय [१३]चोष्य खाद्य । [१४]भक्ष्य [१५]भोज्य नानाविध । दिव्यरसाचा सुस्वाद । सुधापानें समस्तां. ॥ ४३ ॥ शक्रसभे वसती लोक । त्याहूनि ते त्रिगुणी अधिक । धर्मसभेसी पुण्यश्लोक । अक्षयी सुख भोगिती. ॥ ४४ ॥ ऋषी राजे महामुनी । जे जे वसती तये स्थानीं । त्याचीं नामें तुझे कर्णीं । मुक्ताफळें लेववूं. ॥ ४५ ॥ [१६]त्रसदस्यु भारत सुरथ । कृतवीर्य श्रुतश्रवा मारुत । अरिद्र रेणुबर्ही बृहद्रथ । शक्रवेग [१७]नृपनामा. ॥ ४६ ॥ कृतिर्नीमिनामा प्रतर्दन । शुभ्रमत्स्य पृथुलक्षण । पौंड्र चतुरश्व वसुसेन । आर्ष्टिषेण सदस्योर्मी ॥ ४७ ॥ कार्तवीर्य राजा

---

१. अ० ७ श्लो० २३-२५ पहा. २. 'संगीत संगीतें' व 'नृत्य गीत संगीत संमतें' असे अन्य पाठ आहेत. ३. अ० ७ श्लो० ४-५ पहा. ४. हें इंद्राच्या सभेचें नांव. (अ० ७ श्लो० ३० टीका पहा.) ५. प्रियतमा. ६. यम. ७. यम हा सूर्याचा पुत्र. ८. जंबूनदांत उत्पन्न झालेल्या सुवर्णानें. ९. अ० ८ श्लो० ४-५ पहा. १०. 'थारा' असाही पाठ आहे. ११. चाटण्याजोगें (खंडशर्करादि). १२. पिण्याजोगें. १३. चोखण्याजोगें (इक्षुकांडादि). १४. भक्ष्य (अपूपादि). १५. भोज्य (ओदनादि). १६. एक राजर्षि. १७. 'नृपनाथ पैं' असाही पाठ आहे.

भारत । दिवोदास वसुनाम सुनीथ । अंबरीष भगीरथ । वसुरथ सेनजित ते ठायीं. ॥ ४८ ॥ पृथुश्रवा लोमपार्षद। चक्रवर्ती नळ नैषध । आरय लोहित प्रसिद्ध । पूरु पूर्वज तुमचा जो. ॥ ४९ ॥ नहुष मांधाता ययाती । सोम वरुण ध्वजी रथी । दिलीप उशीर शर्याती । उशीनर शरभादि. ॥ ५० ॥ अंग वरिष्ठ वेन दुष्यंत । संजय भागधरी सुनीथ । करंधम निशीद्वात्वी कुसीरथ । अर्जुन सहदेव या नामें. ॥ ५१ ॥ बाल्हीक मधुक पोतक । आश्वशाख रोमास्त्रणुक । शुक्राश्व महाश्व अलर्क । राज[1] गोरक्षक ते ठायीं. ॥ ५२ ॥ सुद्युम्न[2] प्रद्युम्न । धृष्टद्युम्न [3]इंद्रद्युम्न। पद्म मुचुकुंद कक्षसेन । जनक वैन्य पृथुलाश्व. ॥ ५३ ॥ त्रिगर्ति पुरुष ब्रह्मदत्त । देवराजादी जयद्रथ । आर्ष्टिषेण वारिसेन शतरथ । धृष्टदुर्ग गजपुष्ट. ॥ ५४ ॥ सगर नाभाग उपरिचर । अरिष्टनेमी नरेश्वर । भीमजानु सुकृती[4] थोर । धर्मधामीं देखिले. ॥ ५५ ॥ दाशरथी[5] रघुनंदन । तयाजवळी [6]लक्ष्मण । धर्मसभे सुप्रसन्न । सुखसंपन्न देखिले. ॥ ५६ ॥ जमदग्नी भार्गवोत्तम । क्षत्रियांतक महाभीम । चिरंजीविया नित्य निष्काम । धर्मधाम वसवितू.' ॥ ५७ ॥ यम[7]सभेसी रघुनाथ । ऐसें बोले ऋषी भारत । हें परिसोनि साशंकचित्त । श्रोतृभक्ति न करावें. ॥ ५८ ॥ विश्वव्यापक आत्माराम । अभेदभक्त राजा धर्म । भक्तिभावें पुरुषोत्तम । धर्मधाम वसवितू ॥ ५९ ॥ बळीचे द्वारीं कमळापती । प्रत्यक्ष पुराणें साक्ष देती । धर्मसभेसी केली वस्ती । येथें खंती कायसी ? ॥ ६० ॥ सूर्यवंशीची आराध्यमूर्ती । सभास्थानीं स्थापिली भक्तीं । नारदनयना सत्यप्रचीती । आभासली सद्भावें. ॥ ६१ ॥ कीं अयोध्या वाहोनि विमानीं । स्वधामा जातां धर्मभुवनीं । पूजा घेतां तेच क्षणीं । नारदमुनी पातला. ॥ ६२ ॥ तेवेळीं कौतुक जें देखिलें । तेंचि धर्माप्रती बोधिलें । आतां भजकीं मन आपुलें । स्वस्थ केलें पाहिजे. ॥ ६३ ॥ नारद म्हणे, 'राया ! धर्मा ! । धर्मसभेसी [8]उत्तमोत्तमा । देखिले ते नामा-

---

१. 'गज' असाही पाठ आहे. २. अ० ८ श्लो० २२ पहा. ३. श्लोक २१ पहा. ४. 'सुकीर्ति थोर' असाही पाठ आहे. ५. विष्णुरूपानें. ६. शेषरूपधारी. [अ० ८ श्लो० १८ टीका.] ७. हें वर्णन अ० ८ श्लो० १८ याच्या टीकेस अनुसरून आहे, यावरून मुक्तेश्वर नीलकंठकृत टीका पाहून ग्रंथरचना करी असें दिसतें. ओंव्या ५८-६३ ह्या दाशरथिरामाचें वास्तव्य यमसभेंत कसें झालें याच्या स्पष्टीकरणासाठीं मुक्तेश्वरानें टीकेस अनुसरून घातल्या आहेत. ८. अति उत्तम.

नुक्रमा । असो, किती अनुवादूं? ॥ ६४ ॥ मत्सनामाचे एकशत । महाराजे देखिले तेथ । निरवद्य ब्रह्मदत्त । शत एक ते ठायीं. ॥ ६५ ॥ धृतराष्ट्र नामाचे । एकशत देखिले साचे । येरी जे जे वैरी रायाचे । शत एक देखिले. ॥ ६६ ॥ ऐसी संख्या जनमेजया! । वसती यमसभालया । तुझा पिता प्रतापसूर्या! । पांडु राजा ते ठायीं. ॥ ६७ ॥ शंतनुही तया जवळा । म्यां प्रत्यक्ष देखिला आपुल्या डोळां । याही वेगळे नृपाळा! । असंख्यात धर्मात्मे. ॥ ६८ ॥ अगस्ती मातंग महाऋषी । श्रेष्ठासनीं धर्मापाशीं । दिव्य भोग सुखोल्हासीं । धर्मासंगीं भोगिती. ॥ ६९ ॥ यागकर्ते योगाभ्यासी । सिद्ध पुण्यात्मे तपोरासी । पितृभक्त तीर्थवासी । तया ठायासीं पावती. ॥ ७० ॥ सुकृती सत्यवादी शांत । संन्यासी वानप्रस्थ विरक्त । दक्षिणायनीं पावती मृत्य । ते ते तेथें पावती. ॥ ७१ ॥ अनंतकाळ करूनि तपें । विश्वकर्म्यानें अतिसाक्षेपें । सभा निर्मिली ते स्वरूपें । कर्णद्वारा लाविली. ॥ ७२ ॥ दिव्यदेही दिव्यांबरें । ज्वाळाकुंडलें किरीटधरें । गंधमाळा सुखोपचारें । महा उल्हासें क्रीडतां. ॥ ७३ ॥ अप्सरा वाद्य गीत संगीत । लास्य हास्य उल्हासयुक्त । पुण्यपुरुष शतानुशत । उपासिती धर्मातें. ॥ ७४ ॥ ऐसी वैवस्वताची सभा । कथिली ऐश्वर्य मंडपशोभा । आतां ऐकें अतिदुर्लभा । सभा सलिलरायाची. ॥ ७५ ॥ पश्चिमदिग्वधूचा वर । जलेश जलचरेश्वर । त्या वरुणाची सविस्तर । सभा परिसें सभाग्या! ॥ ७६ ॥ धर्मसभेसमान गुणी । सुविस्तीर्ण शतयोजनीं । समुद्रोदरीं रत्नखाणी । उघडे तैसी भासतु. ॥ ७७ ॥ सूर्यचंद्राचीं मंडळें । अपार उगवलीं एक वेळें । कामावूनि मुक्ताफळें । निर्वाळलीं सुतेज. ॥ ७८ ॥ भोगसुख अतिअमुप । शीग देउनि भरलें माप । तेथें वसती त्यांचें तप । सर्वांहूनि आगळें. ॥ ७९ ॥ दिव्यरत्नाचे विशाळ द्रुम । पुष्पीं फळीं उत्तमोत्तम । रत्नरंगी विहंगोत्तम । मधुरस्वरें कूजती. ॥ ८० ॥ शोक जरा मृत्यु व्याधी । कवणा नाहीं हृदयाधी । जे जे इच्छीजे समृद्धी । ते ते तात्काळ पाविजे. ॥ ८१ ॥ वारुणीसहित राजा वरुण । सिंहासनीं विराजमान ।

---

१. अध्याय ८ श्लोक २२-२३ व त्यांवरील टीका पहा. २. अध्याय ८ श्लोक ३६ पहा. ३. नर्तन. ४. यमाची (विवस्वताच्या पुत्राची, सूर्यपुत्राची). ५. वरुणाची. (अध्याय ९.) ६. पति. (वरुण हा पश्चिमदिशेचा लोकपाल होय.) ७. 'पूर्ण चंद्राचीं' असाही पाठ आहे. ८. अधिक, श्रेष्ठ. ९. अध्याय ९ श्लोक २ पहा. १०. पक्षी. ११. मानसिक व्यथा. १२. वरुणपत्नीसहित. वारुणी=वरुणानी, माध्वी. (श्लोक ६ टीका.) १३. 'भद्रासनीं' असाही पाठ आहे.

सेवा करिती कर जोडून । कोण कोण ते ऐका. ॥ ८२ ॥ द्वादश आदित्य[1] सभास्थानीं । निकट वर्तती येकासनीं । मननशीळ महामुनी । कथाश्रवणीं रंजविती. ॥ ८३ ॥ वासुकी[2] तक्षक[2] ऐरावत[2] । पद्मचित्र[2] कृष्ण[2] लोहित[2] । कंबलाश्वतर[2] नागनाथ । मूषकादी[2] प्रल्हाद[2]. ॥ ८४ ॥ धृतराष्ट्र[2] मणिमान[2] बलाहक[2] । कुंडलाधार[2] कर्कोटक[2] । धनंजय[2] आणि मान-[3]कुंडक । बळवान ते ठायीं. ॥ ८५ ॥ हे मुख्य करूनि महाफणी[4] । जलेश्वराचे[5] सभास्थानीं । [6]वोळंगती बद्धपाणी[7] । देव जैसे शक्रातें. ॥ ८६ ॥ बली वैरोचन नृपती । पृथ्वींजय विप्रचित्ती । दुर्मुख शंख सुमना सुमती । का-[8]लखंज सर्वही. ॥ ८७ ॥ घटोदर महापार्श्व नृप । क्रथनि पिठर विश्वरूप । स्वरूप विटभूत विरूप । महाशिरा ते ठायीं. ॥ ८८ ॥ नरक संन्हाद इंद्रतापन । मेघवासा दशानन । सुग्रीव वाळी बळसंपन्न । दोह आणि दुंदुभी. ॥ ८९ ॥ हे मुख्य करूनी धरत्रीपाळा[9]! । असंख्य दैत्यदानवमेळा । रुचिरकुंडलें वनमाळा । विराजमान शोभती. ॥ ९० ॥ पूर्णकाम मृत्युरहित[10] । सुखसंपत्ती भोगसहित । सभास्थानीं एकचित्त । उपासिती वरुणातें. ॥ ९१ ॥ चारी समुद्र मूर्तिमंत । दिव्यरत्नीं अलंकृत । बद्धहस्तीं विनयवंत । तोयनाथ सेविती. ॥ ९२ ॥ गंगा भोगावती भागीरथी । कालिंदी विदिशा वेत्रवती । चंद्रभागा सरस्वती । ईरावती[11] वितस्ता. ॥ ९३ ॥ शतद्रु विपाशा नरेंद्रा! । विशल्या कावेरी सरिद्वरा । दिव्यदेही जलेश्वरा । आराधिती ते ठायीं.॥९४॥ गोदावरी कृष्णा[12] वेणी । नदी नर्मदा वेगवाहिनी[13] । सिंधु शोणभद्र हे दोन्ही । देहाकृती देखिले. ॥ ९५ ॥ प्रश्रवण[14] सरोवरतीर्थ । कूप पल्वलें[15] तडागें विख्यात । प्रत्यक्ष तेथें देहवंत । दास्य करिती सर्वदा. ॥ ९६ ॥ नवलक्ष जातीचे जलचर । तिमिंगिल राघवादि मगर । सेवेलागीं निरंतर[16] । उभे असती जवळिके ॥ ९७ ॥ गंधर्व अप्सरा महानंदें । नृत्य गीत हास्य विनोदें । नाना

---

१. श्लोक ७ पहा. २. हीं नागांचीं नांवें आहेत. (श्लोक ९-१० पहा.) ३. या नांवाचा नाग मूळांत दाखल केलेला नाहीं. येथें 'मनिमान्' अथवा 'पाणिमान्' असें नांव असावें. (श्लोक ९-१०.) ४. मोठे साप. ५. वरुणाचे. ६. प्रवण होतात. ७. हात जोडलेले. ८. 'कालखंज' नामक सर्व दानव. ९. राजा! १०. श्लोक १६ पहा. ११. 'ईशवंती इतस्ता' असाही पाठ आहे. १२. 'कृष्णवेणा' असें मूळांत आहे. (श्लोक २०.) १३. असेंच विशेषणपद मूळांत आहे. (श्लोक १८.) १४. अध्याय ९ श्लोक २४ पहा. १५. लहान सरोवरें. (श्लोक २५.) १६. 'रजनीचर' असाही पाठ आहे.

ध्वनीचीं मंगलवाद्यें । निरंतर गर्जती[1]. ॥ ९८ ॥ विश्वकर्म्यानें आपुले हस्तीं । कला कौशल्यें वेंचूनि मती । सभा निर्मूनियां वस्ती । वरुणालागीं दीधली. ॥ ९९ ॥ अष्टौ दिशांशीं देवी धरणी । दिव्यस्वरूप तये सदनीं । ऐसी वरुणसभा नयनीं । देखिली ते बोलिलों. ॥ १०० ॥ आतां कुबेर धनेश्वर[2] । त्याची सभा अतिसुंदर । शतयोजनें[3] सविस्तर । रुंद सत्तर योजनें. ॥ १०१ ॥ विश्रवण पावला जनन । त्या विश्रवणाचा वैश्रवण । त्याची सभा करि कां श्रवण । विचक्षण नरवर्या ! ॥ १०२ ॥ तपोबळें निधींच्या नाथें[4] । जे निर्मिली निजसामर्थ्यें । कैलासगिरीचेनि दृष्टांतें । उपमा पावे त्रिलोकीं. ॥१०३॥ शतयोजनें भोवतीं देखा । जांबूनदसुवर्णभूमिका । चिंतामणीचिया वेदिका । हीन पाषाण परिसाचे. ॥ १०४ ॥ रत्नवृक्षाचे मांदोडे । प्रवालवल्लींचे जुंबाडे । वैडूर्यखाणी चहूंकडे । भानुतेजें झळकती. ॥ १०५ ॥ सुधारसाचीं सुपवित्रें । रत्नसरोवरीं विचित्रें । सुवर्णकमळें[6] सहस्रपत्रें[7] । दिव्य[5]गंधें धमघमती[8]. ॥ १०६ ॥ गाळोनि सौदामिनीचें[9] पाणी । चित्रें रेखिलीं सुवर्णवर्णीं[10] । रत्नमणीचीं बाळलेणीं । पालाणिलीं अरुवार[11]. ॥ १०७ ॥ काढोनि मुक्ताफळांचे रस । तेणें वोतिले राजहंस । नीळ रत्नाचे राजहंस । नीळकंठ[12] शुकपक्षी. ॥ १०८ ॥ अग्र[13] आसनें वितानें[14] । दिव्यगंधें ढाळिजे पवनें । शोभासमुद्रीं चंद्रवर्णें । नौका मिरवे ज्यापरी. ॥ १०९ ॥ देव गंधर्व अप्सरागण । नृत्य वाद्यें विनोद गायन । कौतुकें तोषविती मन । तया त्रिनेत्रमित्राचें[15]. ॥ ११० ॥ नक्षत्रयोगिणीमाजी गहन । शोभे कुमुद्वतीचा रमण[16] । तैसा विराजे वैश्रवण । सहस्र[17] स्त्रियांमाझारीं. ॥ १११ ॥ मिश्रकेशी[18] रंभा रमणी । चित्रसेना सुवासिनी । चारुनेत्रा सुरमोहिनी । वोळंगती वित्तेशा. ॥ ११२ ॥ तिलोत्तमा उर्वशी घृताची । मेनिका सहजन्या विश्वाची ।

---

१. 'वाजती' असाही पाठ आहे. २. 'धनद' असाही पाठ आहे. ३. अध्याय १० श्लोक १ पहा. ४. वैश्रवणानें. (नवनिधिनाथें.) ५. 'नाना परिमळ एक चित्तें' असाही पाठ आहे. ६. कमळें. ७. अ० १० श्लो० ४ पहा. ८. 'मगमगितें' असाही पाठ आहे. ९. विजेचें. १०. 'सूर्यकीर्णीं' असाही पाठ आहे. ११. मृदु, कोमल. १२. मयूर. १३. 'गृह' असाही पाठ आहे. १४. छत, चांदवे. १५. शिवाच्या मित्राचें. (कुबेराचें.) कुबेराला 'त्र्यंबकसख' असें नांव आहे. १६. चंद्र. १७. अ० १० श्लो० ६ पहा. कुबेर स्त्रीसहस्रानें वेष्टित असतो—असें वर्णन आहे. १८. हीं अप्सरांचीं नांवें आहेत.

वर्गा सौरभेयी समीची। इरा[1] लता प्रम्लोची[2]. ॥ ११३ ॥ विडा चित्रा विभावरी। पुंजीकस्थळा सुरसुंदरी। बाळव्यजनें धरूनि करीं। जाणविती उपभोग. ॥ ११४ ॥ धनद श्वेतभद्र गुह्यक। मणिभद्रक कशेरक। प्रद्योत महाबळक नंदक। गंडकंडू[3] गंधर्व. ॥ ११५ ॥ पिशाच गजकर्ण विशाळक। वराहकर्ण फळोदक[4]। हंसचूड पिंगलक। प्रवाळक हेमचंड[5]. ॥ ११६ ॥ शिखावर्त विभीषण। शोणितोद पुष्पानन। स्वादौष्ट फळभक्ष अनिकेतन। वृक्षवासी इत्यादी. ॥ ११७ ॥ ऐसे यक्षगणांचे लक्ष। उपासिती धनाध्यक्ष। सकळ सुरीं सहस्राक्ष[6]। आराधिजे ज्यापरी. ॥ ११८ ॥ श्री[7] भगवती नळकूबर[8]। मीही तेथेंच निरंतर। मजसारिखे थोर[9] थोर। देव ऋषी आचार्य. ॥ ११९ ॥ साठसहस्र गणाच्या पंक्ती-। सहित शंकर कृपामूर्ती। कुबेराचिये[10] परमभक्तीं। तेथेंचि वसे सर्वदा. ॥ १२० ॥ पशुपती[11] शूळी[12] शैल्यजारमण[13]। भगनेत्रभिद्[14] त्रिलोचन। शक्ती षण्मुख गजानन। वीरभद्रादिकांसीं[15]. ॥ १२१ ॥ विश्वावसु गंधर्वपती। हाहा हूहू तुंबर सुमती। पर्वत शैलूष चित्ररथी। चित्रसेन ते ठायीं. ॥ १२२ ॥ विद्याधरांचा[16]

---

१. 'अनेक किती इत्यादि' असाही पाठ आहे. २. 'प्रम्लोचा' असें नांव आहे. (अ० १० श्लो० ११.) ३. 'अनेक नाना विविध' असा अन्य पाठ आहे. ४. श्लो० १५-१८ पहा. ५. 'हेमनेत्रा' असाही पाठ आहे. ६. इंद्र. ७. लक्ष्मी. (श्लो० १९.) ८. हा कुबेराचा पुत्र. ९. 'शतसहस्र' असाही पाठ आहे. १०. कुबेर=कुत्सितं बेरं शरीरं यस्य सः कुबेरः=कुष्टत्वानें ज्याचें शरीर दूषिलें आहे तो कुबेर. । 'कुत्सायां क्विति शब्दोऽयं शरीरं बेरमुच्यते। कुबेरः कुशरीरत्वान्नाम्ना तेनैव सोंऽकितः ॥' इति वायुपुराणम्. कुबेर हा विश्रवस् याचा मुलगा; म्हणून यास वैश्रवण असें म्हणतात. हा उत्तर दिशेचा स्वामी, याला तीन पाय आणि आठ दांत असल्यामुळें कुरूपाचें सूचक असें 'कुतनु' हें नांव आहे. हा शिवाचा मित्र म्हणून याला 'ईशसख' असेंही म्हणतात. ११. पशूनां (जीवानां) पतिः=शिवः. ['अयं च सर्वविद्यानां पतिराद्यः सनातनः। अहं वै पतितो येन पशुमध्ये (जीवमध्ये) व्यवस्थितः। अतः पशुपतिर्नाम त्वं लोके ख्यातिमेष्यसि ॥' (वराहपुराण). 'पशुपतिराणवमायीवकार्माख्यपाशत्रयबद्धाः पंचकलाकलिता जनाः पशवस्तेषामीशः' (स्तुतिकुसुमांजलि–स्तोत्र ११ श्लोक ९७ टीका.) १२. शूल धारण करणारा शिव. १३. पार्वतीपति. १४. भग=दक्षयज्ञांतील ऋत्विज्. यानें शिवगणाकडे कोपदृष्टीनें पाहिलें म्हणून शिवानें वीरभद्राकरवीं याचे नेत्र फोडविले–अशी कथा आहे. (भागवत–स्कंध ४ अ० ५.)१५. वीरभद्र= एक शिवपार्षद. यानेंच दक्षयज्ञाचा विध्वंस केला. [वीरभद्रानें दक्षयज्ञाचा विध्वंस केला व त्याचें शिर तोडून पुन्हां दक्षप्रजापतीस मेंढ्याचें शिर लावलें या कथानकास अनुसरून गेल्या शतकांत हेबळीकर मोरेश्वर या कवीनें 'श्रीवीरभद्रचरित्र' नांवाचा ७००० ग्रंथसंख्येचा वीररसपरिपूर्ण असा ग्रंथ केला आहे. हा ग्रंथ ओंवीवृत्तांत रचलेला आहे.]१६. श्लोक २७ पहा.

नायक । चक्रधर्मा नित्य सेवक । किन्नरांचे गण अनेक । दास्य करिती धनदाचें. ॥ १२३ ॥ भगदत्त द्रुमादिक । मेदिनीपाळ मुख्य मुख्य । महाराजे परिसेवक । कुबेराचे तेठायीं. ॥ १२४ ॥ घेऊनि राक्षसांचें सैन्य । नित्य नेमें लंकेहून । आंगें येऊन बि[1]भीषण । सेवा करी [2]बंधूची. ॥ १२५ ॥ हि-

---

१. श्लो० ३०-३१ पहा. २. कुबेर (वैश्रवण) आणि बिभीषण यांच्या बंधुत्वाचा संबंध ह्या वंशवृक्षावरून कळून येईल. पहिल्या वंशवृक्षाप्रमाणें कुबेर बिभीषणाचा चुलता होतो व दुसऱ्याप्रमाणें सापत्न बंधु होतो.

स्वयंभू (विधि.)
|
पुलस्त्य × गो.
|
पुष्पोत्कटा×विश्रवस्×मालिनी+राका.   वैश्रवण (कुबेर.)
(अ० २७५ श्लो० ४)   (अ० २७४ श्लो० १२.)
बिभीषण.   नलकूबर.
कुंभकर्ण.   दशग्रीव.   खर.   शूर्पणखा.

मोरोपंतांनीं वनपर्वांत (अध्याय १० गीति ६-१२ काव्यसंग्रह-वनपर्व पृ० १३९-१४०) असेंच वर्णन महाभारतास अनुसरून केलें आहे. हें वर्णन रामायणांतील वर्णनाशीं जुळत नाहीं. अध्यात्मरामायण—उत्तरकांड (सर्ग १२) यांत हा रावणवंशवृक्ष दिला आहे तो असाः—

प्रजापति (स्वयंभू.)
|
पुलस्त्य × तृणबिंदुकन्या गो.
|   (स० १।३४.)
सुमालिकन्या कैकसी × विश्रवस् × भरद्वाजकन्या देववर्णिनी.
(स० १।३२.)
वैश्रवण (कुबेर)×ऋद्धि.
|
नलकूबर×रंभा.

१ दशग्रीव×मंदोदरी. (स० २।४०.) | मेघनाद.
२ कुंभकर्ण×वैरोचनदौहित्री वज्रज्वाला. (स० २।४१.)
३ शूर्पणखा×विद्युज्जिव्ह.
४ बिभीषण×शैलूषगंधर्वकन्या सरमा.

[1]मवान् विंध्य पारियात्र । [2]कैलास मंदर शैल्य दुर्धर । सुनाभ इंद्रकीळ महेंद्र । गंधमादन [3]महागिरी. ॥ १२६ ॥ मेरु मुख्य करूनि तेथ । मूर्तिमंत महापर्वत । रत्नशिखरीं जोहारित । कुबेरातें सर्वदा. ॥ १२७ ॥ [4]नंदिकेश्वर श्रीभगवान् । [5]महाकाल शंखकर्ण । शंखप्रमुख शंखगण । [6]पारिषद शिवाचे. ॥ १२८ ॥ [7]महापद्म पद्मशंख । मकर कच्छप पांचवा देख । मुकुंद कुंद नीलाष्टक । खर्वादीक नवनिधी. ॥ १२९ ॥ नवही देहवंत तेथें । विनयें भजती वित्तेशातें । वित्तेश सेवी भूतेशातें । वर्ततसे [8]शिवाज्ञा. ॥ १३० ॥ ऐसी [9]कुबेराची येथें । श्रवणद्वारीं दाविली तूतें । आतां दुर्लभ त्रैलोक्यातें । ते [10]ब्रह्मसभा अवधारीं. ॥ १३१ ॥ [11]पूर्वी भूतला एकवेळे । सूर्य पातला सहज लीळे । देखोनि त्याचीं चरणकमळें । [12]काळत्रयें वंदिलीं. ॥ १३२ ॥ स्तवनीं तोषवूनी [13]तरणी । 'ब्रह्मसभा दाखवीं नयनीं' । [14]म्हणतां तेणें नेवोनी । हिमालयामस्तकीं, ॥ १३३ ॥ तेथें सहस्र संवत्सर । [15]तपैश्वर्या करविली तीव्र. । पुढती येऊनि भास्कर । आज्ञावचनीं उठविलें. ॥ १३४ ॥ कृपेनें मातें धरोनि हातीं । नेलें ब्रह्मसदनाप्रती । सभा देखतां देहस्फूर्ती । मावळली आश्चर्यें. ॥ १३५ ॥ तेथील बोलतां प्रमाण । [16]वाग्देवतेनें घेतलें मौन्य । प्रभा अव-

---

१. 'हिमवंतगिरी विंध्याद्रि थोर । कैलास मंदार मान्यवंत दुर्धर' असाही पाठ आहे. २. कैलास=शिवाचें क्रीडास्थान. [कैलास–'कैलासो हिमवांश्चैव उत्तरे वर्षपर्वतौ । पूर्वपश्चायतावेतौ अर्णवान्तरुपस्थितौ ॥' इति ब्रह्मांडपुराणे. 'कैलासः कनकाद्रिश्च मंदरो गंधमादनः । क्रीडार्थे निर्मिताः शंभोर्देवैः क्रीडाद्रयोऽभवन् ॥'. इति शंभुरहस्ये. श्रीकंठचरित–सर्ग ४ कैलासवर्णन पहा. पृ० ४६-५८.] ३. 'महाबळी' असाही पाठ आहे. ४. श्लोक ३४ पहा. ५. 'महाकाळ चंडि भृंगी आदिकरून' असाही पाठ आहे. ६. सेवक. ७. कुबेराच्या नऊ निधींचीं नांवें:—'पद्मोऽस्त्रियां महापद्मः शंखो मकरकच्छपौ । मुकुंदकुंदनीलाश्च खर्वश्च निधयो नव ॥' इति शब्दार्णवः. कुबेराच्या घरीं हे द्रव्याचे नऊ खजिने आहेत अशी समजूत आहे. 'निधि' ही संख्या लक्षाहून कमी असावी असें पुढील मयूरोक्तीवरून दिसतें. ती उक्ति अशी:–'दुर्गे! तूं चरणनतां नव निधि किति? ओपिशील नव लक्ष.' [मोरोपंतकृत स्फुटप्रकरणें–भाग पहिला–काव्यसंग्रह–पृष्ठ १८८.] ८. जेव्हां भव (शिव) कुबेरसभेंत बसतो तेव्हां कुबेर ही त्याची आज्ञा घेऊन तदनुसार त्याच्या निकट बसतो–असें वर्णन आहे. (श्लोक ३८ टीका.) ९. 'ऐसी धनदसभा तेथें' असाही पाठ आहे. १०. पितामहसभा. ११. देवयुगांत, कृतयुगांत. (अध्याय ११ श्लोक २ पहा.) १२. त्रिकाळ. १३. आदित्य. १४. म्यां नारदानें म्हटलें असतां, मला पितामहसभा दाखवा–असें म्हणतां. १५. ब्रह्मव्रत. (श्लोक ९.) १६. सरस्वतीनें.

लोकितां नयन । अंध होती इंद्राचे. ॥ १३६ ॥ [1]स्तंभेविण ते स्वयंभा । ब्र-
ह्मश्रियेची सौभाग्यशोभा । सौंदर्यें चित्सूर्याची प्रभा । श्रेष्ठ सभा [2]स्रष्ट्याची.
॥ १३७ ॥ सकळ आनंदाचें धाम । दुःखशोकाचें न शिवे नाम । तपोबळें
[3]सुकृती परम । ते विश्राम पावती. ॥ १३८ ॥ तेथील वर्णितां वैभव । वरें
ऐश्वर्यें पावले देव । इंद्रादिक [4]विर्बुध सर्व । द्वारदेशीं किंकर. ॥ १३९ ॥ अ-
वलोकितां ब्रह्मसृष्टी । तें भाग्य नाहीं देखिलें दृष्टीं । ऐकिलें नाहीं कर्णपुटीं ।
बोलतां गोष्टी नये ते. ॥ १४० ॥ अमृताहूनि कोटिगुणीं । स्वाद आगळा ते-
थिचे जीवनीं । वृक्षच्छाये बैसतां मनीं । ब्रह्मानंद अवतरे. ॥ १४१ ॥ चंद्र
सूर्य [6]हव्यवाट । असंख्य मी[7]नले येकवट । ब्रह्मसभेमाजी [8]हाळुवट । खद्योत-
प्राय लोळती. ॥ १४२ ॥ सेवितां सुस्वाद परिमळ । हारळ त्यागी [9]मलया-
निळ । वसंत होवोनियां [10]अलिकुळ । फेरे घाली भोंवते. ॥ १४३ ॥ सदां
सर्वांगीं वाढतां । मैथुनानंद [11]वोसंडे चित्ता । तो [12]अ[13]ळुमाळ वोहोट होता । अ-
क्षयानंद अवतरे. ॥ १४४ ॥ सुकृत जोडोनि अमौल्यें । सभाग्य त्या ठायां पा-
तलें । त्यांचिया नामाचीं कुंडलें । तुझें कर्णीं लेववूं. ॥ १४५ ॥ सिंहास-
नारूढ विरिंची । दक्ष प्रचेता पुलह मरीची । कश्यप भृग्वादि मुनींची ।
[14]मांदी पुढां लो[15]ळेत. ॥ १४६ ॥ अत्री वसिष्ठ ऋषी गौतम । अंगिरा पु-
लस्त्य क्रतु कर्दम । प्रऱ्हाद अंगिरा उत्तम । वालखिल्य तेठायीं. ॥ १४७ ॥
[15]अगस्त्य मार्कंडेय जमदग्नी । भरद्वाज संवर्त गुणी । च्यवन दुर्वास तये-
स्थानीं । ऋष्यशृंग देखिला. ॥ १४८ ॥ [16]सनत्कुमार आत्मज्ञानी । असित
देवल [17]जैमिनी । ऋषभ जितशत्रु हे नयनीं । ब्रह्मसभेसी देखिले. ॥ १४९॥
मागां कथिल्या सभा चारी । तेथील स्वामी सहपरिवारीं । नित्य येऊनि जो-
डल्याकरीं । उपासिती ब्रह्यातें. ॥१५०॥ यालागीं एकाचींच नांवें । द्विवार
आलीं स्वभावें । जैसें बोलिले व्यासदेवें । [18]मीही तैसेंच निरोपीं. ॥ १५१ ॥

---

१. 'आतां स्तविन त्या स्वयंभा' असाही पाठ आहे. ह्या सभेला स्तंभ नव्हते असें वर्णन आहे. (श्लोक १४.) २. ब्रह्याची. ३. पुण्यवान्, भाग्यशाली. ४. अमर, देव. ५. उदकांत. ६. अग्नि. ७. जमले. ८. नीच, हलके. ९. मलयपर्वतावरील वायु. १०. भ्रमरसमूह. ११. भरून खालीं सांडतो. १२. अल्प, थोडासा. १३. जमाव. १४. 'खेळत' असाही पाठ आहे. १५. अध्याय ११ श्लोक २२ पहा. १६. वैधात्र, ब्रह्मपुत्र. [सनत्+कुमार=पितामह, द्रुहिण+पुत्र.] १७. 'महामुनी' असा अन्य पाठ आहे. १८. 'म्यांही तैसें नेविदिलें' असाही पाठ आहे.

देवऋषी लोकपाळ । बद्धहस्ती सर्व सकळ । परमेष्ठीचें[1] पादयुगुळ । आराधिती सद्भावें. ॥ १९२ ॥ माया विद्या[2] आदि संकल्प । गुणत्रयादि[3] त्रिविधताप । आकाश[4] वायु तेज आप[5] । धरा[6] साकार तेठायीं.[7] ॥ १९३ ॥ दश[8] इंद्रियें पंच[9] प्राण । पंच[10] विषय प्रत्यक्ष जाण । मन बुद्धी चित्त अंतःकरण । अहंकार मूर्त[11] तेठायीं. ॥ १९४ ॥ छंद रहस्य बीजमंत्र । ॐकारसहित प्रणवमात्र । चारी[12] अवस्था स्वतंत्र । तेथें पवित्र देखिल्या. ॥ १९५ ॥ वेद[13] उपवेद[14] अष्टौमूर्ती[15] । साही अंगें[16] अष्टविकृती[17] । अष्टादश पुराणें[18] अठरा स्फूर्ती[19] ।

१. ब्रह्मदेवाचें. २. श्लोक २० पहा. ३. सत्त्व, रज आणि तम. ४. पंचतत्वें. ५. जल. ६. मही. ७. 'ते जागीं' असाही पाठ आहे. ८. १ मुख, १ ब्रह्मरंध्र, २ घ्राण (नागपुड्या), २ श्रवण (कान), २ नेत्र, १ शिश्न, १ गुदद्वार. ९. प्राण–अन्नप्रवेशन, अपान–गुदस्थळीं मळमूत्रातें करणारा, व्यान–पाचन, उदान–भाषण, समान–डोळा मिटणें व उघडणें. १०. शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध. (श्लोक २१.) ११. 'मूर्तिमंत' असा अन्य पाठ आहे. १२. जागृति, स्वप्न, सुषुप्ति आणि तुर्या. १३. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद. १४. उपवेद=आयुर्वेद (ऋग्वेदाचा), धनुर्वेद (यजुर्वेदाचा), गांधर्ववेद (सामवेदाचा), स्थापत्यवेद (अथर्ववेदाचा). १५. चार वेदांच्या चार मूर्ति व चार उपवेदांच्या चार मूर्ति मिळून आठ मूर्ति. १६. सहा अंगें=वेदांचीं अंगें सहा आहेत. त्यांचीं नांवें:—'शिक्षा कल्पो व्याकरणं निरुक्तं छंदसां चयः । ज्योतिषामयनं चैव वेदांगानि षडेव तु ॥.' १ शिक्षा २ छंदस् ३ व्याकरण ४ निरुक्त ५ ज्योतिष आणि ६ कल्प. [लोकहितवादीकृत स्वाध्याय पृष्ठ ४७-५६.] १७. वेदाच्या मंत्रभागाच्या आठ विकृति आहेत. १ जटा २ माला ३ शिखा ४ रेखा ५ ध्वज ६ दंड ७ रथ आणि ८ घन. 'जटा माला शिखा रेखा ध्वजो दंडो रथो घनः । अष्टौ विकृतयः प्रोक्ता क्रमपूर्वा मनीषिभिः॥.' [स्वाध्याय–'विकृति' पृष्ठ ३३-४०.] १८. पुराणें अठरा आहेत त्यांचीं नांवें:—'ब्राह्मं पाद्मं वैष्णवं च शैवं भागवतं तथा । तथान्यन्नारदीयं च मार्कंडेयं च सप्तमम् ॥ आग्नेयमष्टकं प्रोक्तं भविष्यन्नवमं तथा । दशमं ब्रह्मवैवर्तं लिंगमेकादशं तथा ॥ वाराहं द्वादशं प्रोक्तं स्कांदं चात्र त्रयोदशम् । चतुर्दशं वामनं च कौर्मं पंचदशं तथा ॥ मात्स्यं च गारुडं चैव ब्रह्मांडाष्टादशं तथा. ॥' व अठरा उपपुराणें आहेत तीं अशीं:—'अष्टान्युपपुराणानि मुनिभिः कथितानि तु । आद्यं सनत्कुमारोक्तं नारसिंहमतः परम् । तृतीयं नारदं प्रोक्तं कुमारेण तु भाषितम् । चतुर्थं शिवधर्माख्यं साक्षान्नंदीशभाषितम् ॥ दुर्वाससोक्तमाश्चर्यं नारदोक्तमतः परम् । कापिलं मानवं चैव तथैवोशनसेरितम् ॥ ब्रह्मांडं वारुणं चाथ कालिकाह्वयमेव च । माहेश्वरं तथा शांबं सौरं सर्वार्थसंचयम् ॥ पराशरोक्तं प्रवरं तथा भागवतद्वयम् । इदमष्टादशं प्रोक्तं पुराणं कौर्मसंज्ञितम् ॥ चतुर्धा संस्थितं पुण्यं संहितानां प्रभेदतः ॥.' यांजविषयीं सविस्तर माहिती लोकहितवादीकृत 'ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती–भाग दुसरा' पृ० ४५-५१ यांत आहे ती पहावी. १९. 'अठरा स्मृति', 'अठरा श्रुति' असे अन्य पाठ आहेत.

देहवंत तेठायीं. ॥ १९६ ॥ वेदांतसहित साही[1] शास्त्रें । प्रत्यक्ष सिद्धांत अलोट शास्त्रें । युक्तीं कौतुकें अहोरात्रें । रंजविती ब्रह्मयातें. ॥ १९७ ॥ क्षेण[2] लव मुहूर्त रात्र दिवस । पक्ष अयन[3] द्वादशमास । ऋतु संवत्सर[4] सेवेस । षष्टिसंख्या देखिले. ॥ १९८ ॥ हरिमान्[5] वसुमान् रथांतरे[6] । युग चत्वारी मन्वंतरें । कालचक्र[7] ग्रह नक्षत्रें । प्रत्यक्ष तेथें देखिलीं. ॥ १९९ ॥ आदित्य[8] वसव[9] रुद्रं[10] मरुत[11] । विश्वेदेव[12] साध्य[13] समस्त । राक्षस[14] पिशाच दानव दैत्य । गुह्यक सुपर्ण सर्पादी. ॥ १६० ॥ चौदा[15] विद्या चौसष्टी[16] कळा । नारीस्वरूपें नर-

---

१. शास्त्रें सहा आहेत—सांख्य, योग, न्याय, वैशेषिक मीमांसा, आणि वेदांत. 'सहित' असा अन्य पाठ आहे. २. श्लोक ३७ पहा. ३. षण्मास. ४. प्रभवादिक साठ संवत्सर. [मुहूर्तमाला–पृ० ६-७.] ५. कर्मविशेषांच्या देवता. (श्लोक ३०.) ६. सामविशेषाची देवता. ७. द्वादशराश्यात्मकचक्र. (श्लोक ३८.) ८. आदित्य बारा आहेत. (श्लोक ४४.) 'आदित्या द्वादश प्रोक्ता विश्वेदेवा दश स्मृताः । वसवश्चाष्ट संख्याताः षट्त्रिंत्तुषिता मताः ॥ आभास्वराश्चतुःषष्टिर्वाताः पञ्चाशदूनकाः । महाराजिकनामानो द्वे शते विंशतिस्तथा ॥ साध्या द्वादश विख्याता रुद्राश्चैकादश स्मृताः ॥' [श्रीभानुजिदीक्षितकृत अमरकोषव्याख्या पृ० ८.] ९. वसु आठ आहेत. १०. अकरा रुद्र. ११. मरुद्गण एकुणपन्नास आहेत. १२. विश्वेदेव दहा आहेत. १३. साध्य बारा आहेत. १४. श्लोक ४९-५० पहा. १५. चौदा विद्या=४ वेद (ऋग्, साम, यजुष् आणि अथर्वन्)+६ अंगें (छंद, सूत्र, ज्योतिष्, निरुक्त, शिक्षा आणि व्याकरण)+पुराणें (ब्राह्म, पाद्म, वैष्णव, शैव, लैंग, गारुड, नारदीय, भागवत, आग्नेय, स्कांद, भविष्य, ब्रह्मवैवर्त, मार्कंडेय, वामन, वाराह, मात्स्य, कौर्म आणि ब्रह्मांड)+न्यायशास्त्र+पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा+धर्मशास्त्र (गृह्यसूत्रें व मन्वादि स्मृति). १६. चौसष्ट कलांचीं नांवें:—१ अभिधानकोश, २ अक्षरमुष्टिकाकथन, ३ आकारज्ञान, ४ आकर्षकक्रीडा, ५ आलेख्य, ६ उत्साहन, ७ उदकघात, ८ उदकवाद्य, ९ ऐंद्रजाल, १० काव्यसमस्यापूरण, ११ कर्णपत्रभंग, १२ केशमार्जनकौशल्य, १३ क्रियाविकल्प, १४ क्रौंचमारणयोग, १५ गंधयुक्ति, १६ गीत, १७ चित्रयोग, १८ चित्रशाकापूपभक्तविकारक्रिया, १९ छंदोज्ञान, २० छलितयोग, २१ तंदुलकुसुमबलिप्रकार, २२ तर्ककर्म, २३ तक्षण, २४ दशनवसनांगराग, २५ दुर्वचकयोग, २६ देशभाषाज्ञान, २७ द्यूतविशेष, २८ धातुवाद, २९ नाटकाख्यायिकादर्शन, ३० नाट्य, ३१ नृत्य, ३२ नेपथ्ययोग, ३३ पट्टिकावेत्रबाणविकल्प, ३४ पानकरसरागासवयोजना, ३५ पुष्पवाटिकानिमित्तज्ञान, ३६ पुषास्तरण, ३७ पुस्तकवाचन, ३८ प्रतिमाला, ३९ प्रहेलिकाकूटवाणीज्ञान, ४० बालक्रीडन, ४१ भूषणयोग, ४२ मणिभूमिकाकर्म, ४३ मणिरागज्ञान, ४४ मानसी काव्यक्रिया, ४५ माल्यग्रथनविकल्प, ४६ मेषकुकुटलावकयुद्धविधि, ४७ म्लेंच्छितकविकल्प, ४८ यंत्रमातृकाधारणामातृकासंवाय, ४९ रौप्यरत्नपरीक्षा, ५० वस्त्रगोपन, ५१ वाद्य, ५२ वास्तु, ५३ विशेषकच्छेद्य, ५४ वीणाडमरुवाद्य, ५५ वृक्षायुर्वेदयोग, ५६ वैजयिकविद्याज्ञान, ५७ वैतालिकविद्यादान, ५८ वैनायिकविद्यादान, ५९ श-

शार्दूळा ! । असो हे एकएक वेळां । सर्व तेथें स्वरूपें. ॥ १६१ ॥ धर्म अर्थ काम अर्थ । मद मत्सर मोह द्वेष । लोभ कोपेसी काळपुरुष । अहर्निशीं तेठायीं. ॥ १६२ ॥ क्षुधा तृषा अथवा ग्लानी । कोणी नायके आपले श्रवणीं । मृत्यु काळ कर जोडोनी । उभा तिष्ठे सर्वदा. ॥ १६३ ॥ लक्ष्मीसहित लक्ष्मीपती । तेथेंचि वसे करूनि वस्ती, । [१]शंकरस्वामीसह पार्वती । ब्रह्मासनाजवळिकें. ॥ १६४ ॥ शैववैष्णवगणांचे [२]पाळे । कर जोडूनि उभे जवळें । अनंत सिद्ध गणांचे मेळे । तेथें दृष्टीं देखिले. ॥ १६५ ॥ सहस्र अठ्यायसीं [६]सुविनीत । ऊर्ध्वरेते अतिसमर्थ । पन्नास सहस्र प्रजावंत । ऋषेश्वर तेठायीं. ॥ १६६ ॥ देवऋषी राजऋषी । ब्रह्मऋषी तपोरासी । नमस्कारूनि ब्रह्मयासी । आज्ञेनें जाती स्वस्थाना. ॥ १६७ ॥ एक तेथें अचळ असती । एक नित्य दर्शना येती । एक आज्ञा घेऊनि जाती । स्वलोका मागुते. ॥ १६८ ॥ सावित्री दुर्गतरणी मेधा । श्रुति वाणी [८]सप्तविधा । धृती प्रज्ञा बुद्धी शुद्धा । यश क्षमा सत्कीर्ती. ॥ १६९ ॥ [९]अदिती दिती दनु सुरसा । सुरभी गौतमी नरवरेशा ! । कश्यपस्त्रियांसी दश दशा । सिद्धि सकळ तिष्ठती. ॥ १७० ॥ ब्रह्मसृष्टीमाजी जितुलें । स्थावर जंगम नामाथिलें । तितुके देहवंत देखिलें । ब्रह्मसभेमाझारी. ॥ १७१ ॥ सुकृतें तेथें म्हणियारी । जप तप तिष्ठती यागद्वारीं । पवित्र पुण्यात्मे सुविचारी । मानें नेती त्या ठायां. ॥ १७२ ॥ जन्मोनि नाहीं वदले लटिकें । परान्न सेविलें नाहीं मुखें । परनिंदेच्या [१०]पांपपंकें । लेपले नाहीं स्वप्नींही. ॥ १७३ ॥ अभिलाषाचा अनामिकवाडा । प्रेतपशुच्या मांसहाडां- । सारिखें देखती जे पुढां । परधन आणी परस्त्री. ॥ १७४ ॥ सदाचारावीण सुभटा । चालों नेणती अमार्गवाटा । ब्र-

---

यनरचना, ६० शुकसारिकाप्रलापन, ६१ शेखरापीडयोजना, ६२ सूचीवानकर्म, ६३ सूत्रक्रीडा आणि ६४ हस्तलाघव. हीं कलांचीं नांवें श्रीमद्भागवत–दशमस्कंध–अध्याय ४५ श्लोक ३६ याच्या टीकेंत दिलीं आहेत. तसेंच श्रीवात्स्यायनप्रणीत 'कामसूत्र' नामक ग्रंथाच्या प्रथम अधिकरणाच्या 'विद्यासमुद्देश' नामक तृतीय अध्यायांत सविस्तर दिलीं आहेत.

१. श्लोक २७ पहा. २. श्लोक १३ पहा. ३. श्लोक ५१ पहा. ४. जमाव. ५. श्लोक ५४ पहा. ६. नम्र. ७. ब्रह्मचारी. ८. सप्तविधा=सात प्रकारची; अकार, उकार, मकार, अर्धमात्रा, नाद, बिंदु, शक्ति हे सात प्रकार वाणीचे आहेत. संस्कृत, प्राकृत, पैशाची, अपभ्रंश, ललित, मागध, आणि गद्य असे सात प्रकार वाणीचे आहेत. [श्लोक ३४ टीका.] ९. श्लो० ३९-४० पहा. १०. पापरूप चिखलानें.

ह्मसभेमाजी वांटा । बैसावया तयातें. ॥ १७५ ॥ शतजन्में सदाचार । नेमें चालती पवित्र नर । ब्रह्मसभेमाजी अधिकार । बैसावया तयातें. ॥ १७६ ॥ छळितां नाहीं क्रोधावले । ब्रह्मचर्य नैष्ठिक भले । ते ते त्या ठायां पातले । मान्य झाले हरिहरां. ॥ १७७ ॥ नेवचती निषेधाचिया वाटा । नेणती इंद्रियविकारचेष्टा । तेचि ब्रह्मसभेमाजी श्रेष्ठा ! । श्रेष्ठासनीं बैसती. ॥ १७८ ॥ सर्वभूतीं दयापर । ईश्वरभजनीं दृढ निर्धार । मनें नवचे निर्विकार । त्यां आधार तो लोक. ॥ १७९ ॥ परोपकारीं वेचिती धन । परक्षणीं पावले मरण । सदा हरिहरस्मरण । ते ते स्थानीं पावती. ॥ १८० ॥ ऐसी चतुराननाचिया स्थानीं । सुरां श्रेष्ठ स्वर्गभुवनीं । मनुष्यलोकामाजी मुखरणी । सभा तुझी कुरुवर्या !' ॥ १८१ ॥ ऐकोनि नारदाचें वचन । तृप्त झाले नृपाचे श्रवण । ढेंकर देऊनि म्हणे, 'पूर्ण । धांवूनियां भुकेलों.' ॥ १८२ ॥ यावरी कथा वर्तली कैसी । ते परिसा जी ! सावकाशीं । जन्मविले ते पोसावयासीं । उबगों नका सद्गुरु हो ! ॥ १८३ ॥ इति श्रीभारतकथा गहन । निरोपणरूपें समुद्रमथन । सभाप्रमेय पीयूषपान । दैवयोगें लाधलें. ॥ १८४ ॥ मुक्तेश्वराची वाङ्मोहिनी । दुर्जनदैत्यांतें ठकोनी । सज्जनदेवजनांच्या श्रेणी ।

---

१. न जाती. २. 'श्रेष्ठ होऊनी बैसले' असा अन्य पाठ आहे. ३. 'हरिनामस्मरण' असा अन्य पाठ आहे. ४. प्रमुख. ५. तृप्त होऊन. ६. उबगणें=त्रासणें. ७. 'सज्जन' असाही पाठ आहे. ८. अमृतपान. ९. मोहिनीनें दैत्यांस फसवून देवांना अमृत दिलें या पौराणिक कथेकडे कविकटाक्ष आहे. या ओंव्यांत **'रूपक'** नामक अलंकार झाला आहे. वाक्यांतील अलंकार थोड्या फेरफारानें कसे बदलतात ते पहा:—'हें मुख चंद्रच आहे' असें म्हटलें म्हणजे **रूपकालंकार** झाला. 'हें मुख चंद्रासारखें आहे' यांत **उपमालंकार** झाला. 'हें मुख जणूं काय चंद्रच आहे' यांत **उत्प्रेक्षा** झाली. हें, मुख नव्हे तर चंद्रच' असें म्हटलें म्हणजे **अपन्हुति** झाली. 'हें मुख चंद्र समजून चकोर त्यासभोंवतीं घिरट्या घालतो' यांत **भ्रांतिमान्** अलंकार झाला. 'हें मुख मुखासारखें आहे' **अनन्वय**. 'मुखासारखा चंद्र आहे' **प्रतीप**. 'चंद्राला पाहून तुझें मुख मी आठवतों' **स्मरण**. 'मुखचंद्रानें ताप शमतो' **परिणाम**. 'अहो ! हें मुख आहे किंवा चंद्र आहे' **संदेह**. 'चंद्र असें समजून चकोर आणि कमल असें समजून भ्रमर तुझ्या मुखावर आसक्त असतात' **उल्लेख**. 'हा चंद्र होय' **अतिशयोक्ति**. 'मुखानें चंद्रकमलास जिंकिलें' **तुल्ययोगिता**. 'रात्रौ चंद्र आणि तुझें मुख हर्षतात' **दीपक**. 'तुझ्या मुखावर मी आसक्त आहें, चंद्रावर चकोर आसक्त आहे. **प्रतिवस्तूपमा**. 'आकाशांत चंद्र, भुवनांत तुझें मुख' **दृष्टांत**. 'मुख चंद्रकांति धरितें' **निदर्शना**. 'निष्कलंक मुख चंद्राहून सुंदर असतें.' **व्यतिरेक**. 'तुझ्या मुखाबरोबर चंद्र रात्रौ हर्ष

अमर करीती प्राशनें. ॥ १८५ ॥ विकल्पकाळराहुचें तोंड । नामें करूनि खंडविखंड । पुरवील श्रोतियांचें कोड । तेंचि गोड अवधारा. ॥ १८६ ॥

---

## अध्याय पांचवा.

धर्मराज म्हणे, 'देवऋषी ! । ज्ञानविज्ञानतपोराशी । तुळितां तुझिया सामर्थ्यासी । तुंजसारिखा तूं एक. ॥ १ ॥ तुझिया वाक्यदिव्यांजनें । नेत्रस्वरूपा झालीं श्रवणें । देवसभा पांचनिधानें । बैसले स्थळीं दाखविलीं. ॥ २ ॥ कथापंथीं चालतां सुगम । सुखें लोटले पंचग्राम । एके स्थळीं महाकर्दम । आशंकेचा मज बाधी. ॥ ३ ॥ वैवस्वतसभेसी विशदु । राजलोक कथिला विविधु । नागदैत्येंशी सरितासिंधु । वरुणसभेसी दाविले. ॥ ४ ॥ यक्ष गुह्यक

---

पावतो' सहोक्ति. याप्रमाणें वाक्यांत थोडा फेरफार केला कीं लागलाच अलंकारांतही बदल होतो. [श्रीमदप्पयदीक्षितप्रणीत **'चित्रमीमांसा'** पृ० ५.] १०. 'टाकुनी' असाही पाठ आढळतो. ११. 'सज्जनदेवजनांच्या कर्णी' असा अन्य पाठ.

१. 'तृप्त करील प्राशनें' व 'अमर करील प्राशनें' असे अन्य पाठ आहेत. २. हें **'अनन्वय'** नामक अलंकाराचें उदाहरण आहे. जेथें ज्याची त्यालाच उपमा दिली असते म्हणजे जेथें उपमानत्व आणि उपमेयत्व हीं दोन्हीं एकाच वस्तूवर असतात, तेथें हा अलंकार होतो. जसें:—गगन हें गगनासारखें आहे, रामरावण हे रामरावणोपम होत. याचें लक्षण व उदाहरण—'उपमानोपमेयत्वं यदेकस्यैव वस्तुनः । इंदुरिंदुरिव श्रीमानित्यादौ तदनन्वयः ॥ गगनं गगनाकारं सागरः सागरोपमः । रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरिव ॥'. आणखी प्राकृत उदाहरणें:—(१) झाले बहु, होतिल बहु, आहेतहि बहु, परंतु यासमहा; । यास महादेवा! दे जय, पाहिन कधिं धनंजयास महा ॥ १ ॥ [मोरोपंत—विराटपर्व—अध्याय ४ गीति ७५; काव्यसंग्रह—पृ० ९६] (२) शक्र म्हणे 'बा! तुजसम तूंचि भला विश्वमहिततरशील, । व्यसनातें बंधूंसह निर्दोळुनि सर्व अहित तरशील. ॥ १ ॥ [मोरोपंत—वनपर्व—अध्याय २ गीति ११४; काव्यसंग्रह—पृष्ठ २७]. (३) श्रीरामरावणसमर होय श्रीरामरावणसमरसा । ते वृष्टि जसे न करिति तसि शुचि सशकार रावण समरसा. ॥ १ ॥ [वनपर्व—अध्याय १२ गीति ६६; काव्यसंग्रह—पृष्ठ १७९] (४) होय रामराज्य रामराज्यसेंचि तोखद, व्याधि जो भवाख्य उग्र हें तयासि ओखद । कीं करी प्रकाशुनि स्वसन्महा निरंजन, श्रीश बुद्धिचें हरूनि जन्म हानि रंजन ॥ १ ॥ [पंचचामर रामायण—श्लोक ८१; सर्वसंग्रह—पृष्ठ ४०५] (५) यासम हाचि धनुर्धर म्हणतां उपमन्युसुरतरु रुसेना । रण विसरतिल रिपुचमू जेंवि हरिसमक्ष सुरत रुरुसेना. ॥ १ ॥ [मोरोपंत—कर्णपर्व—अध्याय ४० गीति ५९; सर्वसंग्रह—पृष्ठ १६५]. ३. 'मागध दैत्येंद्र' व 'मग दैत्येंद्र' असे अन्य पाठ आहेत.

नि[1]शाचर । अप्सरा गंधर्व[2] पृथ्वीश्वर । वृषभध्वज श्रीशंकर । धनदसभेसी दाविले. ॥ ५ ॥ पितामहसभेमाझारी । महर्षी लक्ष कोटीवरी । वेदशास्त्र देहे[3]धारी । श्रवणद्वारीं दाविले. ॥ ६ ॥ असंख्य इंद्रसभेआंत । देवगंधर्व भाग्यभरित । एकचि ऋषिराज तेथ । हरिश्चंद्र सांगसी. ॥ ७ ॥ शक्रसभेसी हरिश्चंद्र । [4]अर्धासनीं सुखसमुद्र । माझा पिता पांडु[5] नरेंद्र । यमसभेसी सांगसी. ॥ ८ ॥ तया दोघां समान सुख । किंवा कांहीं न्यूनाधिक । हें मी पुसावया साशंक, । परी तुवां निःशंक वदावें. ॥ ९ ॥ कवण व्रत तप नियम । आचरलासे राजोत्तम? । शक्रसभेसी शक्रासन । हरिश्चंद्र सुख भोगी. ॥ १० ॥ यमसभेसी नसेल तैसें । ऐसें कल्पिजे मम मानसें, । तुवां आपुलें वाक्यप्रकाशें । संशयातें परिहारीं. ॥ ११ ॥ सर्वश्रेष्ठ! सर्वज्ञमुनी! । पंच सभा वर्णिल्या वदनीं । त्या म्यां प्रत्यक्ष देखिल्या नयनीं । ऐसी प्रचीती अवगमे. ॥ १२ ॥ प्रत्यक्ष पांडु[6] भेटला तूतें । कांहीं निरोप धाडिला मातें । तोही सांगोनि चित्त चिंते- । वेगळें करीं सर्वज्ञा! ॥ १३ ॥ सुगम चालतां कथापंथें । अडखळोनि संशयगर्तें[7] । चित्त पडिलें असे त्यातें । कडे काढीं स्वामिया!' ॥ १४ ॥ हांसोनि बोले विरिंचीसुत, । 'मोलासारखी लाहिजे वस्त, । योग्यतेवीण [8]आगळा स्वार्थ । काय करिती जाणते? ॥ १५ ॥ हरिश्चंद्र नर[9]केसरी । येकरथी पृथ्वीवरी । भूपकुंजर[10] कोटीवरी । विभांडूनी[11] प्रतापें. ॥ १६ ॥ मदगर्वाचीं [12]कुंभस्थळें । भेदूनि संपदा मुक्ताफळें । विखुरलीं[13] तीं ब्राह्मणकुळें[14] । अपार नेतां भागलीं. ॥ १७ ॥ नरव्याघ्रें आपुलें आंगें । त्रासूनि भूपाळें कस्तूरीमृगें । कीर्तिकस्तूरी भरली वेगें । या ब्रह्मांडकरंडीं. ॥ १८ ॥ [15]आंव-

---

१. राक्षस. २. 'विद्याधर' असाही पाठ आहे. ३. मूर्तिमान्. ४. अर्धं आसनस्यार्धासनम्= अर्धें आसन. [अर्धासन प्राप्त होणें हें गौरव आणि सन्मान यांचें ज्ञापक आहे. 'हरिच्या अर्धासनीं' या पदानें धर्मोचें श्रेष्ठत्व सुचवून त्याची इंद्रसमानताही दर्शविली आहे. 'इंद्राचें अर्धासन' अशीं पदें संस्कृतांत वारंवार येतात. रघुवंश सर्ग ६ श्लो० ७३, शाकुंतल नाटक अंक ७, इत्यादि पहा. मोरोपंत–वनपर्व–अध्याय ५ गीति ५ यांत हेंच पद योजिलें आहे.] ५. अध्याय १२ श्लोक ७ पहा. ६. अध्याय १२ श्लोक ८-९ पहा. ७. खळग्यांत. (गर्ता-खळगा.) ८. थोर, अधिक. ९. मनुजसिंह. १०. नृपगज. ११. पराभव करून. १२. गजाच्या गंडस्थळांत मुक्ताफळें (मोत्यें) असतात असा कविसमय आहे. १३. पसरलीं. १४. विप्रसमूह. १५. बोलावून, आमंत्रण करून. ['आंवतणें' हा शब्द अध्याय ९ ओवी ९७ मध्येंही आहे.]

तूनि अष्टदिशा[1] बाळी । मळवट रेखिला तिये भाळीं । जे क्षाळितां प्रळयजळीं । प्रक्षाळिले न वचती. ॥ १९ ॥ तेचि श्यामता[2] लोपली गगनीं । गंधविषयें व्यापिली धरणी, । मषीकरूनि सर्वपुराणीं । जे रेखिजे विस्तारें. ॥ २० ॥ यशोधवलिमा[3] चंदनउटी । कलंककस्तूरिका ललाटीं । अर्थनाम संबंधासाठीं । चिन्हद्वय मृगांकीं[4]. ॥ २१ ॥ प्रतापें जिंकोनि महातळीं । राजे आणोनि पायातळीं । संपदा जोडूनि आणी आगळी । ते भूतळीं न[5] समाय. ॥ २२ ॥ उभय दिशाद्वय पारडां । उत्तरमेरू घातला धोंडा । संपदा जोखूनियां दडदडां । याचका[6] उजु सांडिल्या. ॥ २३ ॥ शर्करेचिया महापर्वता । लोटोनि क्षीरघृताच्या सरिता[7] । सागरीं मिळाल्या त्या तत्वतां । घृतसमुद्र क्षीराब्धी. ॥ २४ ॥ हें असो; सभेसीं हरिश्चंद्र । वीर अर्धासनीं[8] सुखस-

---

१. हें रूपकाचें सुंदर उदाहरण आहे. २. काळेपणा. ३. धवलिमन्=(धवल=शुभ्र) शुभ्रपणा. यशाचा रंग पांढरा असतो असा कविसमय आहे. हे कविसमय अनेक आहेत, त्यांचा समावेश पुढच्या पद्यांत केला आहे:—'मालिन्यं व्योम्नि पापे यशसि धवलता वर्ण्यते हासकीर्त्यौ रक्तौ च क्रोधरागौ सरिदुदधिगतं पंकजेंदीवरादि । तोयाधारेऽखिलेऽपि प्रसरति च मरालादिकः पक्षिसंघो ज्योत्स्ना पेया चकोरैर्जलधरसमये मानसं यांति हंसाः ॥,' 'पादाघातादशोकं विकसति बकुलं योषितामास्यमद्यैर्यूनामंगेषु हाराः स्फुटति च हृदयं विप्रयोगस्य तापैः । मौर्वी रोलंबमाला धनुरथ विशिखाः कौसुमाः पुष्पकेतोर्भिन्नं स्यादस्य बाणैर्युवजनहृदयं स्त्रीकटाक्षेण तद्वत् ॥,' 'अह्न्यम्भोजं निशायां विकसति कुमुदं चंद्रिका शुक्लपक्षे मेघध्वानेषु नृत्यं भवति च शिखिनां नाप्यशोके फलं स्यात् । न स्याज्जाती वसंते न च कुसुमफले गंधसारद्रुमाणामित्याद्युन्नेयमन्यत्कविसमयगतं सत्कवीनां प्रबंधे ॥.' [श्रीविश्वनाथकविराजकृत साहित्यदर्पण—सप्तमपरिच्छेद]. दुसऱ्या कांहीं पद्यांत या कविसमयांचा समावेश केला आहे ते असे:—'पादाघातादशोकस्तिलककुरबकौ वीक्षणालिङ्गनाभ्यां स्त्रीणां स्पर्शात्प्रियंगुर्विकसति बकुलः सीधुगंडूषसेकात् । मंदारो नर्मवाक्यात्पटुमृदुहसनाच्चंपको वक्त्रवाताच्चूतो गीतान्नमेरुर्विकसति च पुरोनर्तनात्कर्णिकारः ॥' [मेघदूत—मल्लिनाथकृत संजीवनी नामक टीका, उत्तरमेघ श्लोक १५], 'आलिंगनैः कुरबकस्तिलकः कटाक्षैः शिंजाननूपुरपदाहननैरशोकः । गंडूपसीधुपतनैर्बकुलोऽङ्गनानामभ्येति माधवमये समये विकासम् ॥' [स्तुतिकुसुमांजलि—स्तोत्र ११ श्लोक ११० टीका.], 'करींद्रजीमूतवराहशंखमत्स्याहिशुक्त्युद्भववेणुजानि मुक्ताफलानि प्रथितानि लोके तेषां तु शुक्त्युद्भवमेव भूरि ॥', 'पादाहतस्त्यजति शोकमशोकवृक्षः पुष्पं दधाति बकुली मुखशीधुसिक्तः । आलोकितः कुरुवकः कुरुते विकाशमालोडितस्तिलक उत्कलिको विभाति ॥,' 'सुनूपुररवेण स्त्रीचरणेनाभिताडनम् । दोहदं यदशोकस्य ततः पुष्पोद्गमो भवेत् ॥.' (कुमारसंभव—पंडित नवीनचंद्र विद्यारत्नकृत टीका.) ४. ही अचाट कविकल्पना चिंतनीय आहे. ५. न मावे. ६. श्लोक १५-१६ पहा. ७. नद्या. ८. मागें ८ व्या ओंवीवरील टीप पहा.

मुद्र । ऐसिया सुकृतसामोग्री नरेंद्र । तो शक्रासनीं शोभतु. ॥ २५ ॥ असो; किती बहु बोलणें? । राजसूय महायज्ञानें । हरिश्चंद्रें सुख भोगणें । शक्रासनीं जाण पां. ॥ २६ ॥ शत्रुभाजा अश्रुजीवनीं । अवभृथस्नान झालें राजसूययज्ञीं । याचक कुबेर केले दानीं । शक्रसदनीं मिरवती. ॥ २७ ॥ तपश्चर्येच्या खदिरांगारीं । धूप झाले निजशरीरीं । ते उत्साह धरूनि अंतरीं । शक्र ठेवी जवळिकें. ॥ २८ ॥ शूळदशनाचिया वोळी । खड्गवल्ली जिव्हा सरळी । उभयसेनाची आहाळी । जी पसरिली भ्यासुरें. ॥ २९ ॥ तया संग्रामाचिया तोंडीं । अंगें झाले जे भुतोंडीं । ते चेपोनि मांडिये मांडी । शक्रासनीं शोभती. ॥ ३० ॥ आपलेनि धैर्यवंत । येकल्यावरी असंख्यात । धारातीर्थीं देह देत । त्यांसी बहुमान ते लोकीं. ॥ ३१ ॥ रणचत्वरीं शतसहस्र । नाना शस्त्रीं करिती मार, । न बोलतां करुणोत्तर । प्राण देती समरांगणीं. ॥ ३२ ॥ तयातें शचीचिया वल्लभें । सन्मुख येऊनि समारंभें । सन्मानूनि आपुले सभे । स्वस्थानीं बैसवी. ॥ ३३ ॥ असो; हें करूनि राजसूय यज्ञ । हरिश्चंद्र इंद्रासमान । पांडुलागीं तैसें पुण्य । घडलें नाहीं भूतळीं.' ॥ ३४ ॥ नारद म्हणे, 'कुरुनंदना! । सांगतां विसर पडला मना । आतां ऐकोनि तुझिया प्रश्ना । आठवण मज झाली. ॥ ३५ ॥ हातीं धरूनि पांडुनृपें । निरोप सांगीतला संक्षेपें । तो त्वां परिसोनि सत्यसंकल्पें । सफळ केला पाहिजे. ॥३६॥ 'तूं सकळऐश्वर्यसंपन्न । बंधू असती तुज स्वाधीन । संपादूनियां राजसूय यज्ञ । मज हें स्थान पालटीं. ॥ ३७ ॥ राजे जिंकोनि दारुण । संपादिला राजसूय यज्ञ । म्हणोनि हरिश्चंद्र आपण । एकासनीं शक्राच्या. ॥ ३८ ॥ तुम्हीं समर्थ सर्वोपरी । चक्रवर्तींचिये सरी । राजसूय यज्ञ करुनी करीं । श्रेष्ठ मातें सुरसदनीं. ॥ ३९ ॥ राजसूय यज्ञ पुण्यकोटी । उपायन धाडी शक्रा भेटी । जो नेऊनि आपणा निकटीं । मानें मातें बैसवी. ॥ ४० ॥ मत्कुळकल्पलतेचें फळ । सुरस गुणी गुणरसाळ । ऐसिया तुजपासूनि विफळ । संकल्प माझा नुपेक्षीं. ॥ ४१ ॥ क्षुधित परतोनि जाय मागा । हे अश्लाध्यता महाभागा! ।

---

१. भार्या. २. यज्ञाच्या अखेरीस जें स्नान करतात तें अवभृथ स्नान. ३. आहळ, आहळी=आंच, दाह, तीव्रता, गरमी, आग. ४. भुतांना उंडी (घांस). अल्प आहार, भुतांचा भाग, जसें:–'भुतांला भुतोंडी द्यावी मग निघावें'. ५. रणांगणीं, समरभूमीवर. ६. इंद्राणीच्या नवऱ्यानें. (इंद्रानें.) ७. जे संग्रामांत पळ न काढतां लढतात आणि मृत्यु पावतात त्यांला इंद्रसदन मिळतें. (श्लो० २१.) ८. उत्सुकतेनें. ९. श्लोक २३-२५ पहा. १०. मागें पृष्ठ ८ टीप २ पहा. ११. नजराणा.

म्हणोनि आतां [1]राजसूय यागा । शीघ्रकाळें प्रारंभीं. ॥ ४२ ॥ जैसा मेघ वर्षोनि व्योमीं । वोघ सांठवी समुद्रधामीं । तोच परतोनियां [2]घनागमीं । उदक प्राशीं मनेच्छा. ॥ ४३ ॥ माझिये आशीर्वचनीं कुशळ । वृद्धी पावेल ऐश्वर्य बळ । तेणें माझा काम सुफळ । होवोनि ठाके तुझेनीं'. ॥ ४४ ॥ [3]ऐसी पांडुपितयाची आज्ञा । तुवां ही पाळावी प्रतिज्ञा । परंतु महाकठिण प्राज्ञा ! । माझे दृष्टी दिसताहे. ॥ ४५ ॥ पितयानें पाठविला निरोप । तुवां केलिया कृतसंकल्प । तथापि असाध्य जैसा सर्प । [4]मंत्रहीना न धरवे. ॥ ४६ ॥ [5]दैत्य राक्षस दुराचारी । विघ्नें करिती नानापरी । राजे बळिष्ठ पृथ्वीवरी । घेती देती प्राणांतें. ॥ ४७ ॥ दुष्ट बळिष्ठ असंख्यात । [6]जरासंधादि [7]वक्रदंत । ज्यांचेनि भयें श्रीकृष्णनाथ । [8]सागरोदरीं वसतसे. ॥ ४८ ॥ विवेकें विचारूनि सुमती ! । घडे तें करीं आपुले शक्ती । आज्ञा घेऊनि [9]द्वारकेप्रती । जाणें असे मज आतां.' ॥ ४९ ॥ ऐसें बोलोनियां गुरूचा [10]गुरु । उठता झाला अतिसत्वरु । पळे दावूनियां चमत्कारु । सिद्धपुरुष पैं जैसा. ॥ ५० ॥ निःसंग संगीयांसंगातें ।

---

१. राजानें अभिषेकद्वारा करावयाचा जो यज्ञ तो, अथवा राजा म्हणजे लतात्मक सोम, याचें सवन म्हणजे कंडन करतात ज्यांत तो यज्ञ. २. वर्षाकालीं; घन+आगम=मेघ+येणें. ३. ओंव्या ३७-४४ यांत पांडुनृपानें धर्माला पाठविलेल्या निरोपाचें वर्णन आहे. [मोरोपंत–सभापर्व–अ० १ गी० ४४-४९.] ४. मांत्रिकावांचून अन्य सापाला धरूं शकत नाहीं हा समज फार पुरातन असून सुप्रसिद्ध आहे. ५. श्लोक २९ पहा. ६. जरासंध=मागधदेशाचा बृहद्रथ नामक राजाचा पुत्र. बृहद्रथाला दोन स्त्रिया होत्या. पण पुत्र नव्हता. तेव्हां त्यानें चंडकौशिक ऋषीची सेवा केली. ऋषि प्रसन्न होऊन 'वर माग' असें त्यास म्हणाला. त्यावर राजानें पुत्र मागितल्यावरून कौशिक ऋषीनें आम्रवृक्षाखालीं ध्यानस्थ असतां पडलेलें एक आम्राचें फळ त्यास दिलें; व 'हें आपल्या बायकोला दे म्हणजे ह्यापासून तुला पुत्र होईल' असें त्यास सांगितलें. त्याचे सारखे भाग करून राजानें ते आपल्या दोघी बायकांस दिले. त्यापासून त्यांस गर्भ राहून त्या प्रसूत झाल्या; तेव्हां प्रत्येकीस एका मुलाचा अर्धा भाग याप्रमाणें दोघींस दोन भाग झाले. ते राजानें पाहून, निराश होऊन दूर फेकून दिले. ते जरा या नांवाच्या राक्षसीनें सांधून त्या दोन शकलांचा एक मुलगा केला म्हणून याला जरासंध असें नांव पडलें. (सभापर्व-अ० ८ श्लो० ११.) ७. वक्रदंत=दंतवक्र=हा वसुदेवभगिनी श्रुतदेवा हिचा पुत्र. हा असुरांश असल्यामुळें कृष्णाच्या हातून मरण पावला. (भागवत–स्कंध १० अ० ७८.) ८. द्वारका नगरी प्रथमतः भूमीवरच होती, परंतु जरासंध व कालयवन वारंवार त्रास देत म्हणून कृष्णानें विश्वकर्म्याकरवीं हिची स्थापना सागरांत केली. (भागवत–स्कंध १० अ० ५१.) ९. दाशार्ह नगरी (श्लो० ३२). येथें 'लोकपालसभाख्यानपर्व' संपून 'राजसूयारंभपर्वा'स आरंभ होतो. १०. नारद.

गमन केलिया [1]ब्रह्मसुतें, । विचारसमुद्राआतौतें । चित्त पडिलें नृपाचें. ॥५१॥ पाचारूनियां प्रधान मंत्री । चतुर पंडित षट्शास्त्री । ऋषी ऋत्विज अग्निहोत्री । सारासार जाणते. ॥ ५२ ॥ आप्त सुहृद श्रेष्ठ श्रेष्ठ । वृद्ध बैसवूनियां निकट । हृदयमंत्र केला प्रगट । [2]कर्णानुजें त्यां कर्णीं. ॥५३॥ म्हणे, 'हा [3]नवलाव परियेसा । मृत्युलोकींच्या मज माणसा । स्वर्गींहूनि पूर्वजें ऐसा । निरोप मज पाठविला. ॥ ५४ ॥ राजसूय यज्ञ महामखीं । पुण्य जोडोनियां ब्रह्मांड [4]तुंकीं, । माझा वास स्वर्गलोकीं । हरिश्चंद्रासमान. ॥ ५५ ॥ होय तें करीं पवित्रतनुजा ! । वंशीं उभारीं सत्कीर्तिध्वजा । हें न करितां पुरुषार्थ माझा । वांझवृक्षासारिखा. ॥ ५६ ॥ सुफळ न करितां पितृवचन । माझा देह [5]भग्नभाजन । विधवेचें जेंवि नवयौवन । कोणते ये उपयोगा ? ॥ ५७ ॥ [6]हिंवरतरूची शीतळ छाया, । कीं नटांमाजी नेटकी जाया, । अनुपकारी नराची काया । वृथा पुष्ट ज्यापरी. ॥५८॥ नपुंसकलिंग षोडशांगुळ, । गर्भांधाचें चक्षु विशाळ, । ग्रामथिल्लरींचें जळ निर्मळ । तेंचि निर्जळ पवित्रा. ॥ ५९ ॥ [7]जवादी बिडाळाचे वृषण । मस्तकीं खोंविती श्रीमंतजन । [8]रासभाचे लंबायमान कर्ण । कोणी हातें [9]नातळे. ॥ ६० ॥ इंद्रियभ्रष्टाचा आचार । धनलुब्धाचा तत्वविचार । दरिद्रीयाचा अत्यादर । विश्रांती नेदी श्रांतातें. ॥ ६१ ॥ अदातयाचें उंच सदन । दाट लागलें कंटकवन । असत्यवादियाचें वचन । सर्वही फोल [10]बोलणें. ॥ ६२ ॥ तेंवी पितयाचे मनोरथ । पूर्ण न करितां जन्मची व्यर्थ, । प्रेतप्राय जिवें जित । भूषित हस्त कृपणाचे. ॥ ६३ ॥ पितृवचना साच करणें । न होतां राज्य त्यजूनि जाणें । प्राण पापी हा दवडणें । शरीरग्रामाबाहेरी. ॥ ६४ ॥ सांडणें सांडोनि अपवित्रा । बळी त्यागूनि भंगिती पात्रा । तेंवी प्राणेसहित गात्रा । मी त्यागीन तत्काळीं. ॥ ६५ ॥ आतां वडील हो ! सांगा युक्ती । हें कार्य साधे कवणे रिती ? । पिता तोषवूनियां त्रिजगती । पु-

---

१. नारदानें. (पृष्ठ २० टीप ३ पहा.) २. धर्मानें. ३. नवल, कौतुक, अपूर्व गोष्ट. ४. हालवीं, डोलवीं. ५. फुटकें भांडें. ६. हिंवर=हिवर=हिंवरी=हें एका झाडाचें नांव आहे. या झाडाच्या छायेखालीं बसणें निषिद्ध समजतात. जो पदार्थ दिसण्यांत सुंदर, व मनोहर पण उपयोगांत अहितकारक आणि दूष्य असतो त्याला 'हिंवरतरूची शीतल छाया' असें म्हणतात. ७. जवादी=जवादें=जवादी मांजराची कस्तूरी, मार्जारकस्तूरिका. जवादीबिडाल=गंधमार्जार. ८. गाढवाचे. ९. न स्पर्शे. १०. हें दृष्टांतपर वर्णन मुक्तेश्वराचें स्वतःचेंच आहे. ही ओंवीमाला मुक्तेश्वराच्या उज्ज्वल कल्पनाशक्तीची चांगली साक्ष देते.

त्रत्य माझें वाखाणे. ॥ ६६ ॥ श्रावण पुंडलिक श्रीराम । भगीरथ मारुती

१. 'राखणें' असा अन्य पाठ आहे. २. श्रावण=वैश्यजातीय तपस्वी. हा ताताज्ञापर होता. आपल्या अंध पितरांस कावडींत घालून यात्रेस जात असतां वाटेंत तमसा नदीच्या तीरीं पाणी आणावयास गेला. तेव्हां दशरथानें गजभ्रांतीनें यास बाण घालून मारिलें.(रघुवंश—सर्ग ९ श्लोक ७१-७७.) ३. पुंडलिक बलरामाचा अवतार होय असें समजतात. पुंडलीक हा एक देशस्थ ब्राह्मण होता. याच्या बापाचें नांव जानुदेव आणि मातेचें नांव सत्यवती. हा आपल्या पत्नीसह सुख भोगून मातापितरांस अनेक प्रकारांनीं छळीत असे. तीं काशीयात्रेस जावयास निघालीं तेव्हां हाही स्वपत्नीसह त्यांच्या बरोबर निघाला. मार्गानें यानें आपल्या वृद्ध मातापितरांस पुष्कळ त्रास दिला. काशीस आल्यावर हीं सर्व मनुष्यें कुकुटस्वामी नामक महातापसाच्या आश्रमासमीप उतरलीं होतीं. तेथें रात्रौ पुंडलिकास गंगा, यमुना, सरस्वती या तीर्थदेवतांचा साक्षात्कार झाला. कुकुटस्वामी हे साक्षात् मातृपितृसेवारत श्रावणाचे अवतार होत. यांची गोष्ट त्या देवतांनीं पुंडलिकास सांगून त्याचे डोळे उघडिले व त्याला शुद्धीवर आणिलें. तेव्हां त्याला आईबापांस दुःख दिलें म्हणून परम पश्चात्ताप झाला. त्याला लागलीच उपरति झाली आणि तो मातापितरांच्या आज्ञेंत राहून त्यांच्या एकनिष्ठ सेवेंत सुख मानून राहूं लागला. नंतर तो त्यांच्यासह काशीहून परत आला आणि भीमातटीं गरसळें नामक गांवीं कायावाचामनेंकरून त्यांची सेवा करीत राहिला. पुढें त्याला नारदाचें दर्शन झालें. 'भगवान् श्रीकृष्ण येतील तोंपर्यंत तूं असाच राहून त्या देवाचें नांव 'श्रीविठ्ठल' असें सुप्रसिद्ध कर' असें त्याला सांगून नारद इष्टस्थलास गेले. पुढें रुक्मिणी रुसून आली होती तिची समजूत करण्यासाठीं देव श्रीकृष्ण तेथें आले. तिची समजूत घालून तिच्यासह दिंडीरवनांत पुंडलिकाची झोंपडी होती तेथें देव येऊन उभे राहिले. त्यानें केलेली मातापितरांची सेवा पाहून देवांनीं प्रसन्न होऊन त्याला जन्ममरणबंधमुक्त केलें. 'जे कोणी चंद्रभागेंत स्नान करून श्रीविठ्ठलनामाचा जप करून देवदर्शन घेतील ते संसारपाशमुक्त होतील' असा वरही दिला. प्रत्येक दिवशीं पुंडलिकास भेटण्यासाठीं सर्व तीर्थें येतात अशी भक्तजनांची समजूत आहे. पुंडलिकाचें सविस्तर चरित्र 'भक्तिकथामृत' नामक ग्रंथांत दिलेलें आहे. ४. श्रीरामानें तातवचन पाळण्यासाठीं राज्यत्याग केला इत्यादि वृत्तांत सुप्रसिद्ध आहे. ५. भगीरथानें भागीरथी आणून आपल्या पितरांचा उद्धार केला या वृत्तावर कविकटाक्ष आहे. याची कथा अशी:—पूर्वीं रामाचा पूर्वज सगर नामक राजा होता, त्याला दोन स्त्रिया होत्या. त्याच्या दोन स्त्रियांपैकीं एकीस साठ सहस्र व एकीस एकच पुत्र होता. त्याचें नांव असमंजस. सगरानें नव्याण्णव अश्वमेध यज्ञ करून पुन्हा शंभराव्या यज्ञासाठीं अश्व सोडला. तेव्हां इंद्रास धाक पडला कीं, जर शंभर यज्ञ शेवटास गेले तर यास माझें पद मिळेल. या भीतीनें इंद्रानें तो घोडा पळवून पाताळांत कपिलऋषीच्या आश्रमांत नेऊन ठेविला. सगराचे साठ सहस्र पुत्र अश्वरक्षणास होते, ते अश्व पृथ्वीवर कोठें दिसेना म्हणून पाताळांत पाताळलोकीं त्याच्या शोधार्थ गेले. तेथें कपिलमुनीच्या आश्रमांत घोडा पाहून त्यास ताडन करूं लागले. तेव्हां त्या ऋषीनें डोळे उघडून रागानें पाहतांच ते सर्व सगर एका क्षणांत जळून भस्म

भार्गवोत्तम । यांचे पंक्तीं राजा धर्म । सुपुत्र ऐसें मज म्हणती. ॥ ६७ ॥ कौसल्या देवकी अनुसूया सती । अंजनी रेणुका भगवती । कुंती माता त्यांचे पंक्तीं । पुत्रवती म्हणवेल. ॥ ६८ ॥ सुपुत्रजननी धन्य वचनें । कुशीं कीजेती निंबलोणें । तेचि गर्भवती म्हणणें । रत्न लाहे ज्यापरी. ॥ ६९ ॥ पोटीं घेऊनियां मुक्ताफळें । शुक्तिसंपुटीं भासती स्थूळें । नातरी पोता सुपरिमळें । पवित्र रंभा गर्भिणी. ॥ ७० ॥ तेचि सुपुत्राची जननी । तेचि सगर्भा सौभाग्यखाणी । येरी त्या शूकरी खैरी श्वानी । अपुत्रीच बहुपुत्रें. ॥ ७१ ॥ सभाग्य आणि कीर्तिवंत । पोटीं जन्मेल जरी सुत । तरीच सेजे सेवावा कांत । व्यास म्हणत स्त्रियांतें. ॥ ७२ ॥ शरीर वोपोनियां सुपुरुषीं । कुपुत्र जन्मला जरी कुशीं । त्या पुत्रातें श्रेष्ठ पुरुषीं । प्रेतप्राय लेखिजे. ॥७३॥ जळोदररोगें स्थूळोदरी । तेंवी ते सगर्भा भासे नारी, । विवोनि वंध्या ते संसारीं । कुपुत्रमाता म्हणोनि. ॥ ७४ ॥ सुपुत्रप्रसूतीं पावे जननी । कुपुत्रप्रसवें निघाली कोणीं । एक कुळांतें उजळी गुणीं । एक तो लावी काळिमा. ॥ ७५ ॥ जो जन्मोनि जनकापोटीं । सफळ न करवे त्याची गोष्टी । तो जंतुप्राय जन्मला सृष्टीं । अनुपयोगी अभाग्य. ॥ ७६ ॥ जितां पाळी पितृवचन । वर्षी श्राद्धीं द्विजभोजन । गयेसी वोपी पिंडदान । तो एक धन्य सुपुत्र. ॥ ७७ ॥ पिता गुरू, पिता देवो, । पितृसेवे शरीर जावो, । ऐसा ज्याचा

---

झाले. हें वर्तमान सगरास कळल्यानंतर त्यानें आपला नातू अंशुमान् यास कपिलऋषीच्या सांत्वनार्थ पाठविलें. तेव्हां त्यानें कपिलाला प्रसन्न करून त्याच्या आज्ञेनें घोडा नेऊन सगराचा यज्ञ पुरा केला. व आपल्या चुलत्यांचा उद्धार होण्याविषयीं प्रार्थना केली, तेव्हां 'गंगेशिवाय सद्गति होणार नाहीं' असें कपिलानें सांगितलें. तेव्हां गंगेला खालीं आणण्याकरितां त्यानें तप आरंभिलें, परंतु त्याचा हेतु तडीस न जातां त्यास मृत्यु आला. पुढें त्याचा पुत्र दिलीप यानें तप केलें पण तोही मरण पावला. अखेरीस भगीरथानें अत्यंत कठिण तपश्चर्या करून गंगेस प्रसन्न करून खालीं आणून सगरपुत्रांचा उद्धार केला. गंगेला भगीरथानें आणिलें म्हणून 'भागीरथी' असें म्हणतात–अशी कथा आहे. ६. हनुमान्–हा अंजनेचा पुत्र. यानें आपल्या लोकोत्तर पराक्रमानें आणि भक्तिबलानें श्रीरामास वश्य केलें आणि आपल्या मातेला रामचरितद्वारा स्वपराक्रम सांगून सुप्रसन्न केलें–इत्यादि कथा प्रसिद्ध आहे.

१. परशुरामानें आपल्या बापाच्या वचनास अनुसरून स्वमाता रेणुका हिचा वध केला. २. दत्तात्रेयमाता, अत्रिपत्नी. ३. गर्दभी. ४. देऊन. ५. गया=त्रिस्थळींतील हें एक क्षेत्र होय. येथें पिंडदान करतात. काशीस दंडण, प्रयागीं मुंडण आणि गयेस पिंडण असें या तीन स्थलांचें माहात्म्य आहे.

निश्चय भावो । तो एक धन्य सुपुत्र. ॥ ७८ ॥ पितृवाक्य तें वेदोक्ती । पितृसेवनें अक्षय मुक्ती । चढतां प्रेमें पितृभक्ती । तो एक धन्य सुपुत्र. ॥ ७९॥ नित्य नेमें तीर्थप्राशन । पितृशेष[1] नित्य भोजन । नेमें चरणसंवाहन[2] । करी तो धन्य सुपुत्र. ॥ ८० ॥ अपूर्व तितुकें दे आवडी । वेचूं नेणे जोडिली जोडी, । बहुकाळ वांचो हे गोडी । धरी तो धन्य सुपुत्र. ॥ ८१ ॥ सर्वस्व वोपी दाराकुमरां । दरिद्र भोगवी मातापितरां । त्याचिया भारें उबगे[4] धरा[5] । अधम पुत्र म्हणोनी. ॥ ८२ ॥ असतें पित्यानें मागतां वस्तु । म्हणे, 'तुज कां नुपजे परमार्थु? । जळो तुझा लोभ स्वार्थु' । ऐसा वदे तो पुत्र दुरात्मा. ॥ ८३ ॥ पितृआज्ञेचें उत्तर । मोडोनि दे जो प्रत्युत्तर । पित्यासी म्हणे, 'मी चतुर' । तोचि कुपुत्र दुरात्मा. ॥ ८४ ॥ पित्यानें बोधितां उपदेश । म्हणे, 'तुज झाला बुद्धिभ्रंश'. । दुष्टवचनीं उपजवी त्रास । तोचि कुपुत्र दुरात्मा. ॥ ८५ ॥ जित्या[6] नेदी अन्नवसन । नेदी स्वल्प धन सन्मान, । मेल्या श्राद्धीं शतभोजन,[7] । तोचि कुपुत्र दुरात्मा. ॥ ८६ ॥ कुशब्द बोलोनियां उदंड । हृदय करी खंडविखंड, । मेल्या गये पाडी पिंड । तोचि कुपुत्र दुरात्मा. ॥ ८७ ॥ पिता देखोनि लाजे मनीं । अवमान करी सभास्थानीं, । जो कांटाळे रोगमरणीं । तो एक कुपुत्र दुरात्मा. ॥ ८८ ॥ जितां[8] भोगवी दरिद्रदुःखा । मेल्या रडोनि दाखवी लोका । पीडिल्या औषधासि नेदी रुका[9] । मेलिया मांडी क्रियेतें.[10] ॥ ८९ ॥ असो; हें बोलणें वाउगें । उत्तम वर्तती धर्ममार्गें । करणीहीन[11] तो सांगे । न्याय नीती जगातें. ॥ ९० ॥ बोलिलों पापयुगाची[12] वार्त्ता । प्रस्तुत द्वापार असे आतां । पितृवचनालागीं जीवित्वा। वेचूं करीन सर्वस्वें. ॥ ९१ ॥ पितृवचनालागीं जाणें । करीन राज्याचें सांडणें । प्राणांतही जिणें मरणें । कार्यसिद्धि असिद्धी.' ॥ ९२ ॥ ऐसा सबळ आणि निर्बळ । उभय संकल्पातें विफळ । होवोनियां कुरुभूपाळ । विचार पुसे वडिलांतें. ॥ ९३ ॥ 'विवशी[13] दवडोनियां परती । निधान साधूनि घेइजे हातीं । ऐसी येथें कवण युक्ती । ते आप्त हो! अनुवादा.' ॥ ९४ ॥ '[14]धौम्य द्वैपायनादिक । प्रधान प्रजा-

१. पित्यांनीं भक्षण केल्यावर शिल्लक राहिलेलें. २. पाय चोळणें, पाय चुरणें. ३. हे विचार मूळांत नाहींत. मुक्तेश्वरानें स्वकल्पनेनें योजिले आहेत. ४. त्रासे, कंटाळे. ५. पृथ्वी. ६. जीवंत पित्याला. ७. विप्रशतभोजन. ८. जीवंत असतां, जीवंतपणीं. ९. पयसा, पैसा. १०. उत्तरक्रियेतें. ११. आचारहीन. १२. कलियुग. १३. जखीण. १४. अध्याय १३ श्लोक २९ पहा.

विषयीं लोक । म्हणती, 'राया! आवश्यक । हेंचि आतां [1]अनुष्ठीं. ॥ ९५ ॥ तुझेनि संपूर्ण सर्व सामर्थ्यें । कांहीं अटक नाहीं तूतें । जे इच्छिजे तुझेनि चित्तें । तेंचि फळे तात्काळीं. ॥ ९६ ॥ सर्वांपरी सुफळ काळ । साह्य सोयरे पृथ्वीपाळ । संशय सांडूनियां सकळ । [2]यज्ञ प्रारंभ करावा. ॥ ९७ ॥ विशेष विश्वाचा ईश्वरु । जो जनार्दन जगत्त्रयगुरु । तो श्रीकृष्ण सांगेल विचारु । मान्य सर्वीं करावा.' ॥ ९८ ॥ ऐकोनि सुहृदांची वाणी । राजा आल्हादला मनीं । म्हणे, 'सर्वज्ञ हो! परुषवचनीं । जाणोनि बोलिलों हृदयींचें. ॥ ९९ ॥ जें इच्छिजे माझेनि जिवें । तेंचि वदलेती मनोभावें, । शकुनारंभीं देइजे देवें । [3]उजवें फूल ज्यापरी. ॥ १०० ॥ जो संपन्न सकळ ऐश्वर्यें । धरी धीरत्व ज्याचेनि धैर्यें । तो कृष्ण [4]पावल्या सकळ कार्यें । सुफळ होती तात्काळीं.' ॥ १०१ ॥ शुद्ध भावार्थ निकटवृत्ती । बैसवूनियां निश्चयरथीं । प्रेरिला अंतर द्वारावती । शीघ्र श्रीपती आणावया. ॥ १०२ ॥ मनोगती पावला दूत । निरोपीं उठविला त्रैलोक्यनाथ । म्हणे, 'मज आतांहूनि आप्त । धर्मभेटी इच्छितों. ॥ १०३ ॥ आतांचि केलें पाहिजे गमन', । म्हणोनि उठिला [5]करुणाघन, । संगीं सुवात तैसा सगुण । [6]इंद्रसेन सांगाती. ॥ १०४ ॥ जेथें वसे सात्विकगुण । तेथें वैराग्य आणि ज्ञान । टाकूनि येती, तेंवि श्रीकृष्ण । धर्मभेटी निघाला. ॥ १०५ ॥ अभेदभक्ताचें दर्शन । घ्यावया शंकर नारायण । आदरें येती, तेंवि श्रीकृष्ण। पांडवभेटी चालिला. ॥ १०६ ॥ रथ नेटका निर्मळभजन । चारुवारुचतुष्टय मन । एकनिष्ठेचें वरी आसन । [7]गुढार शोभे समाधी. ॥ १०७ ॥ कुशळ सारथी सुविचारु । [8]नेमरश्मीनें आंवरी वारु । समागमें विवेकचतुरु । अर्धासनीं जवळिकें. ॥ १०८ ॥ शमदमाचीं उभय चाकें । चूर्ण करिती विकल्पखडकें । वासना सरितांचीं तटाकें । उल्लंघिती [9]अवलीळा. ॥ १०९ ॥ ऐसिये रथीं आत्मारामा । बैसका झाली पुरुषोत्तमा । या वेगळी आगळी उपमा । काय द्यावी कवीनें? ॥ ११० ॥ लंघोनि अनेक [10]देशांतरें । पुरंदरप्रस्था यादवेश्वरें । पावतां परिसोनि प्रेमादरें ।

---

१. करीं. २. 'यज्ञारंभ' असाही पाठ आहे. ३. देवाला अथवा देवीला कळा लावतात व उजवा कळा उतरला तर काम होईल असें समजतात–ह्या देवाच्या कौल घेण्याच्या रूढीस अनुलक्षून हें वर्णन आहे. ४. प्रसन्न झाला असतां. ५. दयाघन. ६. हा दूत. ७. आच्छादन. ८. हें रूपकाचें उदाहरण आहे. ९. लीलेनें, सहज. १०. अध्याय १३ श्लो० ४२-४३ पहा.

**ध**र्म धांवे सामोरा. ॥ १११ ॥ क्षेमालिंगन आल्हादकोटी । पुरीं नागरीं पुष्पवृष्टी । मंगळवाद्यांचे बोभाटी । [1]राजालया पातले. ॥ ११२ ॥ पितृभगिनीतें वंदोनी । **भीमा**र्जुना आलिंगोनी । मोहें **मा**द्रीतनय दोन्ही । कोमळहृदयीं कवळिले. ॥ ११३ ॥ **द्रौ**पदी **सु**भद्रा यांचे माथे । [2]स्नेहसंभ्रमें स्पर्शी हातें । ते वेळीं त्यांचिया आनंदातें । पारावार असेना. ॥ ११४ ॥ भोजन सारूनियां स्वपंक्तीं । बैसका घालोनि एकांतीं । **ध**र्म म्हणे, 'सर्वज्ञ मूर्ती ! । विचार सांगें मज आतां. ॥ ११५ ॥ राजसूयक्रतुसुकृतें । **श**क्रसभे बैसवीं मातें, । ऐसें **कुं**तीचेनि कांतें । निरोप नेमें पाठविला. ॥ ११६ ॥ परिसतां देवऋषीचें वचन । भ्रमणचक्रीं भ्रमे मन । ते कार्यसिद्धी वेगळें आन । समाधान पावेना. ॥ ११७ ॥ होऊनि **पां**डूचा नंदन । त्याची इच्छा न करवे पूर्ण, । तैं मी जीतचि प्रेतासमान, । कां पाषाण अपवित्र. ॥ ११८ ॥ यथार्थ ऐकें **पु**रुषोत्तमा ! । न [4]करितां पितृवचन नेमा । **ध**र्म तो मी **अ**धर्म नामा । लोकत्रयीं स्फुरेल. ॥ ११९ ॥ [5]धोत्तूरफळातें [6]कनकफळ । [7]पृथ्वीपुत्राचें नाम **मं**[8]गळ । दि[9]वाभीतालागीं [10]बरळ । [11]**कौ**शिकशब्दें बोलती. ॥ १२० ॥ विषनागाचें नांव [12]अमृत, । कुंभकारातें [13]**भा**र्गव म्हणत, । तेंवी करणीवीण व्यर्थ । [14]नाममहिमा वाउगा. ॥१२१॥ आतां श्री**कृ**ष्णा ! कृपा करीं । हस्त ठेवीं माझिया शिरीं । हे कार्यसिद्धी कवणेपरी । तो मज सांगें उपाव. ॥ १२२ ॥ निर्विकल्प निगमागमा ! । सेवकालागीं साकार ब्रह्मा ! । तुजवांचूनियां आमुच्या भ्रमा । विश्राम कर्ता असेना. ॥ १२३ ॥ लोभ भय दंभ मानार्थ । [15]धातुपोषण बोलती बहुत । तुझें बोलणें शंकेरहित । तेंचि मान्य मजलागीं.' ॥ १२४ ॥ हांसोनि [16]बोले सर्वज्ञमूर्ती, । 'बरवें राया ! धरिलें चित्तीं । स्वल्प कांहीं असे [17]गुंती । तेही तूतें परिसवूं. ॥ १२५ ॥ [18]**भा**र्गवें मारितां उरले क्षिती । पु-

---

१. नृपमंदिरातें. २. कुंतीतें. ३. स्नेहानें आणि संभ्रमानें (संवेगानें) सन्मानें. ४. सफळ न करितां. ५. धोत्र्याचे फळाला. ६. कनक=(१) सोनें, (२) धोतऱ्याचें झाड. ७. महीसुताचें, कुजाचें. ८. मंगल हा ग्रह आकाशांत असूनही त्याला भौम, कुज, महीसुत (पृथ्वीचा मुलगा) असें म्हणतात. ९. घुबड. १०. अज्ञानजन. ११. कौशिक=(१) विश्वामित्र, (२) घुबड. १२. अमृत=विषनाग; (पक्षीं) सुधा. १३. भार्गव=जामदग्न्य मुनि; (पक्षीं) कुंभार. १४. अशींच इतर नांवें आहेत:–भिक्षा मागणाराचें नांव धनपाळ, मेलेल्या मनुष्याचें नांव अमरनाथ–इत्यादि. १५. भुलथापा, गोड गोष्टी, मधुरभाषण. धातुपोषणाचें बोलणें=गुळथापडी, साखर पेरणें. १६. अध्याय १४ पहा. १७. अडचण. १८. जामदग्न्य मुनीनें. (अ० १४ श्लो० २.)

ढती नेणों जन्मले किती । इक्ष्वाकुकुळाची संतती । जे भूपाळ ये काळीं. ॥ १२६ ॥ त्यांचीं कुळें एकशत[१] । देशाधिपत्य नामांकित । चारी दिशा समुद्रप्रांत । व्यापूनि मही भोगिती. ॥ १२७ ॥ कृतीं त्रेतीं राक्षस असुर । तेच द्वापारीं पृथ्वीधर । विष्णुद्रोही म्हणोनि वैर । सदां मजसी चाळविती. ॥ १२८ ॥ कारणेंविण द्वेष करिती । बळात्कारें चालूनि येती । कार्याकारणें धरूनि शांती । सर्व साहता मी झालों. ॥ १२९ ॥ बळेंचि आक्रमिली अवनी[२] । दुष्ट बळिष्ठ पदाभिमानी । सहस्रनयन[३] ज्यांचिया नयनीं । तृणतुल्य अवगमे. ॥ १३० ॥ हेंही असो, कीं इतुली मातु । प्रस्तुत माजला मागधनाथु । जरासंध मदगर्वितु । दृष्टी नाणी काळातें. ॥ १३१ ॥ मिळोनि पृथ्वीचे भूपती । साम्राज्यपदीं चक्रवर्ती । अभिषेकूनि बद्धहस्तीं । उपासिती तयातें. ॥ १३२ ॥ पृथ्वीपाळांमाजी श्रेष्ठ । जरासंध परम दुष्ट । निर्दय दुरात्मा पापिष्ठ । उपमे जैसा रावणु. ॥ १३३ ॥ राजे धरूनियां असंख्यात । तेचि कल्पूनियां बस्त[४] । होम करावया उद्युक्त । झाला असे येकाळीं. ॥ १३४ ॥ मागां केला, नायकिला । अधर्म धर्मत्वीं कल्पिला । अद्भुत अन्याय मांडिला । असे तेणें येकाळीं. ॥ १३५ ॥ राजे होमोनियां हवनीं । तोषवूं पाहे शूलपाणी[५] । जेंवी कां व्याघ्र उपोषणीं । धेनू मारी फळाहारा. ॥ १३६ ॥ कां म्लेंच्छाचिया महासनीं । संहारिती पशूच्या श्रेणी, । कीं बकाचे अनुष्ठानीं । निसंतान मच्छांचें. ॥ १३७ ॥ तेंवी मांडूनि नृपांची हिंसा । तोषवूं पाहे महेशा । परी महेश करील निर्मूळ वंशा । हे पापिष्ठा कळेना. ॥ १३८ ॥ मुळीहूनियां उदंड । आम्हासी चालवी महाद्वंद्व[६], । माझें नाम ऐकतां क्रोध । वन्हिप्राय धडधडी. ॥ १३९ ॥ जरासंधाचिया तनुजा[७] । अस्ती प्राप्ती, सहदेवअनुजा, । त्या होती कंसाचिया भाजा[८] । मातुळपत्न्या[९] आमुतें. ॥ १४० ॥ त्याचिया पापरहाटी । आकांतली सर्वसृष्टी । माता पिता सुहृत्कोटी । बंदिशाळे सूदल्या. ॥ १४१ ॥ शेष घेऊनियां सांगातें । अवतार घेणें मातें । मल्ल मर्दोनि मुष्टिघातें । कंस निर्वंश म्यां केला. ॥ १४२ ॥ कंस निमालिया अंतीं । स्त्रिया गेल्या मागधाप्रती । सूड ध्यावया अहोराती । निस्तेजिती[१०] पितयातें. ॥ १४३ ॥ राजे होवोनियां दास । सेवे तिष्ठती रात्रं-

१. अ० १४ श्लो० ५ पहा. २. पृथ्वी. ३. इंद्र. ४. बोकड. ५. शंकर. ६. वैर. ७. कन्या. अस्ति आणि प्राप्ति ह्या सहदेवाच्या धाकट्या बहिणी. ८. अध्याय १४ श्लोक ३१ पहा. ९. भार्या. १०. निस्तेजणें=मानहानि करणें, पाणउतारा करणें.

दिवस । **चै**द्य **शि**शुपाळ **द**मघोष । सेनापती तयाचे. ॥ १४४ ॥ [1]**हं**स **डिं**-भक दोघे असुर । मंत्री तयाचे महाक्रूर । त्यांचेनि बळें **म**गधेश्वर । 'ईश्वर' म्हणवी आपणा. ॥ १४५ ॥ स्वर्ग पाताळ मनुष्यलोक । एकेक जिंकीन म्हणती एक । ऐसा वीरश्रियेचा ते[2]वक । क्षणक्षणां अवतरे. ॥ १४६ ॥ [3]तीनशतें वर्षेंवरी । युद्ध करितां अहोरात्रीं । तरी आटेना निर्धारीं । **मा**गधसेनासमुद्र. ॥ १४७ ॥ तेवीस अक्षोहिणी कटक । घेऊनि आम्हा दावी अटक, । कामक्रोधादि शत्रुषट्क । जेंवी विवेक विध्वंसी. ॥ १४८ ॥ सत्रावेळां त्रासिला युद्धीं । पुढती पेटली महाद्वंदी । **का**ळयवनांसी दुर्बुद्धी । मागुता आला संग्रामा. ॥ १४९ ॥ पाडोनियां **मु**चकुंदाशीं गांठी । **का**लयवन भस्म केला कपटी । पुढें येऊनियां **य**मुनातटीं । **म**थुरापुरी वेढिली. ॥ १५० ॥ [5]**हं**सनामा असुर जाण । **ब**ळभद्रहस्तें पावला मरण । हें ऐकोनियां **डिं**भकें प्राण । बंधुभ्रमें दीधला. ॥ १५१ ॥ जो कळवळोनियां मोहजाळीं । देह त्यागिला **य**मुनाजळीं । वांचला **हं**स तेकाळीं । हृदय पिटीत पातला. ॥ १५२ ॥ 'मजलागीं मृत्यु पावला बंधु' । म्हणउनि पावला परम खेदु, । पाहोनियां **य**मुना अगाधु । प्राण दीधला तेणेंही. ॥ १५३ ॥ व्यर्थ नि[6]माले प्रधान बंधु । दुःखें उद्विग्न **ज**रासंधु । चतुर्गुणी वाढला क्रोधु । 'मारीन' म्हणे '**कृ**ष्णातें.' ॥ १५४ ॥ **म**थुरेहोनि **प**रिव्राजगिरी । नव्वद एक योजनें दुरी । तेथूनि [7]गदा भवंडोनि करीं । झुगारिली महारागें. ॥ १५५ ॥ ते पडतांचि **म**थुरापुरीं । गृहें गोपुरें झालीं चुरी । नगरवासी पुरुषनारी । हाहाभूत कांपती. ॥ १५६ ॥ **म**थुरा त्यागूनि भयसंकटीं । [8]**कु**शस्थळी समुद्रवेटीं । **रै**वतपर्वताचे निकटीं । ठाव केला वसावया. ॥ १५७ ॥ **द्वा**रावती **गो**मतीतटीं । **स**प्तपुरींत पवित्र सृष्टीं । घेऊनि **या**दवांच्या कोटी । वस्ती करूनि राहिलों. ॥ १५८ ॥ तीस योजनें रचोनि नगर । तीन पौळी पर्वताकार । योजनामाजी शतद्वार । [9]दुर्ग दुर्गम रचियेले. ॥ १५९ ॥ धाक घेऊनि

---

१. अध्याय १४ श्लोक १२-१३ पहा. २. जोर, रग, आवेश. ३. अध्याय १४ श्लोक ३६ पहा. ४. अठरावे संग्रामीं. (श्लोक ४०.) ५. आपला बंधु हंस याला बलरामानें मारिलें (श्लोक ४०-४२) असें ऐकून डिंभकानें यमुनेंत उडी टाकून प्राण सोडला. पण खरा प्रकार हंस मूर्च्छित झाला होता इतकाच होय. ६. मरण पावले. ७. अ० १९ श्लो० २३-२५पहा. जेथें ही गदा पडली त्या स्थळाला 'गदावसान' असें नांव प्राप्त झालें. ८. अ० १४ श्लो० ५० पहा. ९. किल्ले.

**माग**धाचा । आश्रय करूनि **पां**डवांचा । वास करूनि **द्वार**केचा । **याद**-वासीं वसतसें. ॥ १६० ॥ हें सांगावया काय कारण । **जरा**संध अतिदा-रुण । जीवंत असतां तुमचा यज्ञ । सिद्धी न पावे सर्वथा. ॥ १६१ ॥ यालागीं राजसूययज्ञविचारु । तुम्हांसि असाध्य हा निर्धारु । बाळकमाथां पर्वतभारु । ठेवितां क्षेम केउतें ? ॥ ६२ ॥ टिटवी प्राशीन म्हणे सिंधु, । मशक ग्रासीन म्हणे इंदु, । तेंवी मारणें **जरा**संधु । **पां**डवहस्तीं अघटित.' ॥ १६३ ॥ ऐ-कोनि **वा**सुदेवाचें वचन । **ध**र्मराज निस्तेजवदन । हें देखोनियां **भी**मसेन । गदाहातें पडताळी. ॥ १६४ ॥ म्हणे, 'मातें निरोपी काजा, । आतांचि व-धीन **माग**ध राजा, । माझा क्रोधाग्नी सुतेजा। धरा करीन निक्षेत्री. ॥१६५॥ नसती घालोनि आशंका । मोडिसी **ध**र्मांचा आवांका । तुझिया उक्ती **य**दु-नायका ! । मजवीण मान्य समस्तां.' ॥ १६६ ॥ सत्वर उठोनियां **पा**र्थें । रथ सज्जिला प्रतापवंतें । हातीं घेऊनि धनुष्य भाते । उभा ठेला सन्मुख. ॥ १६७ ॥ म्हणे, 'मी मारूनि **माग**धेश्वरा । एथें आणोनि दावीन शिरा । करणें असेल तो पुढारां । विचार करा वडील हो ! ॥ १६८ ॥ निस्तेजोनि राया **ध**र्मा ! । निर्वीर करूनी सांडिलें आम्हा । अधमा स्तविसी पुरुषोत्तमा । लज्जा कैसी असेना.' ॥ १६९ ॥ कोपला देखूनि **ध**र्मानुज । **अ**र्जुना आंगीं वीरश्रीतेज । हें जाणोनियां **अ**धोक्षज । 'स्थीरस्थीर' म्हणतसे. ॥ १७० ॥ सां-गेन त्या ऐका गोष्टी । वर्तेल तें विलोका दृष्टीं । अविचारें कोप केलिया कष्टी । प्राणी होय अविवेकीं.' ॥ १७१ ॥ दोघेही सांडूनिया क्रोधीं । म्हणे, 'बळाहूनि आगळी बुद्धी । जो बुद्धिबळें कार्य साधी । तोचि पावे ज-यातें.' ॥ १७२ ॥ आतां **ध**र्म करील प्रश्न । पुसेल **जरा**संधाचें जनन । **भी**महस्तें त्याचें मरण । विश्वकर्ता करवील. ॥ १७३ ॥ **भार**तामाजी अति-नेटकें । **सभापर्व** रस मोठकें । श्रीकृष्णमूर्तींचीं नाटकें । गुप्त प्रगट परियेसा. ॥ १७४ ॥ **व्या**स वाढितां जगातें । ग्रास लाधला जीर्णकवीतें । त्याचे मुखींचीं उच्छिष्ट शितें । म्यां दुर्बळें वेंचिलीं. ॥ १७५ ॥ तीं सेवो-नियां पावलों तृप्ती । तेणें उद्गारली स्फूर्ती । हे वल्गना संतांप्रती । नेणतपणें करीतसों. ॥ १७६ ॥ कितीएकासीं आग्रह मोठा । नातळों म्हणती कवी

---

१. अध्याय १४ श्लो० ६२ पहा. २. हें अघटितघटनेचें उदाहरण आहे. ३. पृथ्वी. ४. क्षत्रियरहित. ५. पाणउतारा करणें. ६. हें 'अर्थांतरन्यास' नामक अलंकाराचें उदाहरण होय.

उच्छिष्टा । हा समर्थवाद योग्यश्रेष्ठा । ईश्वरकृपा म्हणोनी. ॥ १७७ ॥ मार्गस्था तंतु एकएकु । मिळूनि चिंध्या देवीचा रुखु, । समर्थ म्हणवी तेंवी रंकु । कवि-उच्छिष्टा पावलों. ॥ १७८ ॥ एकएक अक्षरांची भीक । जीर्णकवीतें मागूनि देख । मी सर्वज्ञ कविनायक । ऐसें म्हणविलें लौकिकीं. ॥ १७९ ॥ इति श्रीसभापर्व भारत । मुक्तेश्वरकविविरचित । [१]श्रोतीं होवोनि सावधचित्त । श्रवण केलें पाहिजे. ॥ १८० ॥ व्यासवचन संस्कृत । त्याचेंचि हें प्राकृत । साधुसंतांलागीं सत्य । उघडार्थ कृष्णाज्ञा. ॥ १८१ ॥

---

## अध्याय सहावा.

धर्म म्हणे 'गुणैकधामा ! । भक्तकामकल्पद्रुमा ! । जरासंध [२]केवण तो आम्हा । ज्ञात करीं स्वमुखें. ॥ १ ॥ कैसें वीर्य? कैसें बळ ? । कवण कुळ ! कवण स्थळ ? । जाणावया बळाबळ । विस्तारोनि मज सांगें.' ॥ २ ॥ जो योगियां हृदयजपु । [३]कामिनीकुळातें [४]कंदर्पु । दुष्टदैत्यां सर्पदर्पु । दळणीं स्वामी गरुडाचा. ॥ ३ ॥ तो कृष्ण सांगे सविस्तर, । 'मगधदेशींचा राजेश्वर । बहु संपत्ती बळसागर । तृणप्राय ज्या सृष्टी. ॥ ४ ॥ पर्वतप्राय विशाल रथु । यालागीं नामें बृहद्रथु । त्याचेनि बळें पृथ्वी जितु । सुरांअसुरां नावरे. ॥ ५ ॥ तीनें अक्षौहिणी [६]दळ । तेणें तो अतिप्रबल । न्यायनीतीधर्मशील । प्रजापालक स्वधर्मे. ॥ ६ ॥ [५]काशीश्वराच्या जावळ्या कुमारी । सुलक्षणी गुणसुंदरी । अंगें जिंकोनि स्वयंवरीं । गृहस्वामिणी त्या केल्या. ॥ ७ ॥ ऐश्वर्यै वाढे तो हेमाद्री । परी संततीवीण दिसे दरिद्री । म्हणोनी लागली मनीं [८]चंद्री । सखेदता क्षयरोगु. ॥ ८ ॥ केलीं साधनें अनेक । परी पुत्रप्राप्तीची जवळीक । न लाभेचि तेणें ऐश्वर्यसुख । परम दुःख त्या वाटे. ॥ ९ ॥ म्हणे, 'शरीर नसतां प्राण । कां लावण्य नसतां घ्राण । कृपणाचें अपवित्र धन । तेंचि अधन ज्यापरी. ॥ १० ॥ सुंदर शृंगारें गोरटी । परी एक गळसरी नसतां कंठीं । कां यज्ञोपवीत त्यागूनि वेष्टी । अमोल्य वस्त्रें ब्राह्मण. ॥ ११ ॥ तेणें न लाभे पवित्रता । श्रेष्ठ मानिती सर्व भ्रष्टता । तेंवी संततीवीण वृथा । गृहस्थाश्रम श्रमरूप. ॥ १२ ॥ अरुची मानूनि राज्यभोगीं । उभय वनिता घेऊनि संगीं ।

---

१. 'देशभाषा प्राकृत' असा अन्य पाठ आहे. २. अध्याय १७ श्लोक ११ पहा. ३. स्त्रीजनातें. ४. मदन. ५. अध्याय १७ श्लोक १३-१४ पहा. ६. सैन्य. ७. काशिराजाच्या जुळ्या मुली. ८. चिंता.

वनोपवनें हिंडतां योगी । योगासनीं देखिला. ॥ १३ ॥ काक्षीवान्[1] ऋषीचा पुत्र । गौतमतनयो अतिपवित्र । अचाट भाग्यें ललाटनेत्र[2] । श्रेष्ठ जैसा सर्वार्थी. ॥ १४ ॥ तो चंडकौशिक नामें ऋषी । तपोवनीं प्रकाशरासी । देखतां क्षणीं राजयासी । अष्टौ[3] भाव उदेले. ॥ १५ ॥ नमस्कारूनि लोटांगणीं । चरण क्षाळिले अश्रुजीवनीं[4] । परिमार्जूनि केशवसनीं । संबाहिले[5] सुस्नेहें. ॥१६॥ निर्मळ देखोनि भावार्थ । ऋषीनें उचलिला वरदहस्त । म्हणे, 'तुझा मनोरथ । पूर्ण करीन जाण पां.' ॥ १७ ॥ राजा म्हणे, 'करुणानिधी ! । अपुत्रत्व महाव्याधी । उदेली असे हृदयसंधीं । ती परिहरीं स्वामिया ! ॥ १८ ॥ पुत्र लाधेन संसारीं । तरीच प्रवेश करीन नगरीं । न होतां तपाच्या वैश्वानरीं[6] । देह त्यागीन काननीं[7].' ॥ १९ ॥ करूनि कृपावलोकन । म्हणे, 'व्याकुळ न करीं मन । देऊं न शके चतुरानन[8] । तें मी समर्थ द्यावया. ॥ २० ॥ जाऊं नको दुस्तरवना । तुझी संपूर्ण मनकामना । झाली ऐसें जाणून मना । स्वस्थ राहें स्वस्थानीं.' ॥ २१ । आम्रछाया सुशीतळ । आसनारूढ मुनी दयाळ । अकस्मात सुपक्क फळ[9] । पुढें पडिलें तेकाळीं. ॥ २२ ॥ नसतां वायूचा झडाड । न लागतां शुकादिकांचें[10] तोंड । फळ पडलें रसाळ गोड । घमघमीत[11] सुवासें. ॥ २३ ॥ उचलोनियां कृपाहस्तें । प्रसाद दिधला राजयातें । म्हणे, 'हें भक्षवीं स्त्रियेतें । फळ लाभेल तात्काळीं.' ॥ २४ ॥ प्रसादलाभें पुरलें कोड, । परी दोघी स्त्रियांची सारखी भीड, । यालागीं करूनि दुखंड । उभयहस्तीं वोपिलें. ॥ २५ ॥ शस्त्रेंकरूनि समान फोळी[12] । अर्पिल्या दोघींच्या करतळीं । भक्षण करितांची तात्काळीं । गर्भप्राप्ती[13] स्त्रियांतें. ॥ २६ ॥ आज्ञा देतां चंडकौशिक । नगरीं प्रवेशे नरनायक, । तेवेळीं त्याचा अत्यंत हरिख[14] । ब्रह्मांडघटीं न[15] स-

---

१. अध्याय १७ श्लोक २२ पहा. गौतम काक्षीवताचा पुत्र. २. ललाटस्थानीं नेत्र ज्याच्या असा (रुद्र). ३. अष्ट सात्विक भाव येणेंप्रमाणें आहेत:—'स्तंभः स्वेदोऽथ रोमांचः स्वरभंगोऽथ वेपथुः । वैवर्ण्यमश्रुप्रलयौ अष्टौ भावाश्च सात्विकाः ॥' याचा भावार्थ:—१ स्तंभ=स्तब्धता, २ स्वेद=घाम येणें, ३ रोमांच=आंगावर कांटा उभा राहणें, ४ वेपथु=कंप सुटणें, ५ वैवर्ण्य=तोंडाचा वर्ण बदलणें, ६ अश्रु=डोळ्यांतून पाणी येणें, ७ प्रलय=बेशुद्धि, ८ वैवर्ण्य=स्वर पालटणें. ४. नेत्रोदकांनीं. (अ० १७ श्लो० २५.) ५. संबोधिले. ६. अग्नींत. ७. अरण्यांत. ८. ब्रह्मा. ९. आम्रफळ. (श्लो० २७-२८.) १०. पोपटादिक पक्ष्यांचें. ११. 'मगमगित' असा अन्य पाठ आहे. १२. शकलें. १३. फलप्राशन संभवगर्भलाभ. [अ० १७ श्लो० ३४-३५.] १४. संतोष. १५. न समावे.

माये. ॥ २७ ॥ सानंद गर्भे झाला राजा । फळप्रसादें उभय [1]भाजा । संपूर्णदिवसीं [2]धर्मतनुजा! । कर्मे कैसीं वोढवलीं? ॥ २८ ॥ एकेच क्षणीं एकेचि दिनीं । पूर्णदिवसीं [3]नृपकामिनी । प्रसूति पावतां विचित्र करणी । प्रारब्धाची परियेसीं. ॥ २९ ॥ [4]एक हस्त एक चरण । एक चक्षु एक कर्ण । अर्ध उदर भाळ वदन । खंड एक एकातें. ॥ ३० ॥ जेंवि कां करवतीं विभागिलें । तेंवि समान दोन्ही शकलें । दोघी प्रसवल्या हें झालें । चोज अद्भुत जवळियां. ॥ ३१ ॥ [5]सजीव पाहती एकनयनीं । देखोनि अपवित्र अवलक्षणी । मनें मानूनि उभय जननी । दुरी ठेल्या भयभीत. ॥ ३२ ॥ वनितांसहित वनिताकांत । शोकापासोनि झाला शांत । [6]कपाळ टेकोनि त्यागवीत । नगराबाह्य प्रदेशीं. ॥ ३३ ॥ वस्त्रें [7]वेढोनियां हातें । [8]धात्रीकरीं गुप्तपंथें । [9]चतुष्पथीं त्यागूनि त्यांतें । न पाहतां ते गेली. ॥ ३४ ॥ निशा प्रवर्तली घोर । जरा नामें राक्षसी क्रूर । अवलोकित महाघोर । तया ठायां पातली. ॥ ३५ ॥ शकलें देखोनि कौतुकें । जोडोनि पाहे जंव हस्तकें । तंव तात्काळ झालीं एकें । वज्रातेंही [10]नुखळती. ॥ ३६ ॥ जेंवि वस्त्राचीं उभयखंडें । शिवणी जडितां होती अखंडें, । कीं दोन्ही ओघ मिळतां उघडें । एकरूप नदीचें.॥३७॥ तेंवि लोपोनि द्वैतविचार । स्वरूप झालें एकाकार । सर्वलक्षणीं राजकुमर । अतिसुंदर नेटका. ॥ ३८ ॥ मुखीं फोडितां [11]चंडटाहो । राक्षसीतें उपजला मोहो । पूर्वरूप [12]लोपोनि देहो । दिव्यस्त्रीचा [13]आंगवला. ॥ ३९ ॥ परिसोनि बाळकाचें रुदित । राजा धाविन्नला स्त्रियांसहित । [14]पान्हा दाटला अतिअद्भुत । चहूं स्तनीं मातांतें. ॥ ४० ॥ शक्ति रूपिणी मनोहर । हातीं घेऊनि राजकुमर । म्हणे, 'राजया! घेई वर । माझा आणि ऋषीचा. ॥ ४१ ॥ चंडकौशिकें रत्न दीधलें । तें त्वां मूर्खत्वें हारविलें । तें म्यां शोधोनि वहिलें । तुज

---

१. भार्या. संस्कृतांतील यकाराचा प्राकृतांत 'ज' होतो. जसें:–या=जाणें, यत्र=जेथें, कार्य=काज. २. यमनंदना! ३. भूपस्त्री. [भूयान् कामोऽस्याः सा.] नृपवामलोचना. ४. अ० १७ श्लो० ३६ पहा. ५. श्लो०३७ पहा. सजीव शकलें. ६. 'कपाळ पिटोनी त्यागी वित्त' असा अन्य पाठ. ७. गुंडाळून, वेष्टून. ८. दाई. ९. चार रस्ते जेथें फुटतात अशा ठिकाणीं. चतुष्पथ=चवाठा. १०. वेगळीं होत नाहींत. ११. मुलानें मुखांत मुष्टि घालून मेघासारखी मोठी गर्जना केली तेव्हां राजा व त्याच्या स्त्रिया फार घाबरल्या. [अ० १७ श्लो० ४४-४५.] १२. राक्षसीनें अपुत्रिक राजाला पुत्र देण्यासाठीं मनुष्यरूप धारण केलें. [श्लो० ४८.] १३. 'पावली' असा अन्य पाठ आहे. १४. श्लोक ५० पहा.

वोपिलें सभाग्या ! ॥ ४२ ॥ गृहदेवता मी यक्षिणी । पूजा घेतसें लोकसदनीं । अपुत्रिका पुत्रजननी । होती माझेनि प्रसादें. ॥ ४३ ॥ माझें रूप देखोनि भीती, । प्रतिवर्षीं पूजा करिती । त्यांतें संतती संपत्ती, । देऊनि रक्षीं सर्वदा. ॥ ४४ ॥ जरादत्त जरासंधु । याचि नामेंही प्रसिद्ध । पुत्र घे जैसा इंदु । ऐश्वर्यकळीं वाढता.' ॥ ४५ ॥ जरेनें सांधिली प्रतिमा । यालागीं जरासंध या नामा । ठेवून म्हणे, 'नृपसत्तमा ! । पुत्रसंगीं सुख भोगीं.' ॥ ४६ ॥ ऐसी बोलोनि मंगळ वाणी । अदृश्य झाली राक्षसिणी. । राजा प्रवेशला सदनीं । पुं-[1]त्रकामिनीसमवेत. ॥ ४७ ॥ ध्वज पताका उभविल्या नगरीं । मखरें तोरणें घरोघरीं । गगन गर्जे मंगळतुरीं । कुंजरभेरी [2]त्राहाटिल्या. ॥ ४८ ॥ पुत्रोत्साह-संतोषमनें । द्विजां वोपिलीं रत्नधनें । धेनु वस्त्रें अश्व [3]यानें । भूमिदानें याचकां. ॥ ४९ ॥ जातकर्मादि संस्कार सांग । पावले [4]उपनयनाचें अंग । पुत्रभाग्यें तो सभाग्य, । अभाग्य मानी इंद्रातें. ॥ ५० ॥ वार्ता परिसोनि राजेश्वरा ! । चंडकौशिक पातला नगरा, । राव धांवोनि सामोरा । अतिसन्मानें आणिला. ॥ ५१ ॥ पूजोपचारीं पावूनि तृप्ती । ऋषी म्हणे, 'मागधनृपती ! । तुझा पुत्र हा सर्व [5]जगतीं । राज्य करील एकआज्ञा. ॥ ५२ ॥ श्रेष्ठ होईल सर्व नृप-

---

१. पुत्र (जरासंध) आणि स्त्रिया यांसहवर्तमान. २ वाजविल्या. ३. पालख्या. ४. संस्कारविशेष. हे संस्कार सोळा आहेत, त्यांचीं नांवें आणि संक्षिप्त वर्णन:—ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र या चार वर्णांनीं देहशुद्ध्यर्थ करावे जे गर्भाधान (ऋतुशांति), पुंसवन (गर्भधारणापासून दुसरे किंवा तिसरे महिन्यांत करितात विधि तें), अनवलोभन (गर्भाच्या तिसरे महिन्यांत करितात जो विधि तें), विष्णुबलि (गर्भाच्या सातवे महिन्यांत करावयाचा विधि तो), सीमंतोन्नयन (गर्भाच्या चौथे, सहावे किंवा आठवे महिन्यांत जो विधि करितात तो), जातकर्म (बालक उत्पन्न झाल्यावर नालच्छेदनापूर्वीं बालकाच्या मुखांत मधु घालण्याचा विधि), नामकरण (बालकास नांव ठेवण्याचा विधि), निष्क्रमण (बालकाला तिसरे पक्षांत चंद्रावलोकन करण्याचा विधि), सूर्यावलोकन (बालकाला तिसरे किंवा चौथे महिन्यांत सूर्य दाखविण्याचा विधि), अन्नप्राशन (बालकाला सहावे किंवा आठवे मासांत अथवा दंतोत्पत्ति झाल्यावर अन्न देण्याचा विधि), चूडाकर्म (दुसरे किंवा तिसरे वर्षीं शिखा राखण्याचा विधि), उपनयन (मुंज करण्याचा विधि), महानाम्य (गायत्रीचा उपदेश करण्याचा विधि), समावर्तन (सोडमुंज), विवाह (लग्न), आणि स्वर्गारोहण हे प्रत्येक. याशिवाय भूम्युपवेशन, दुग्धपान, कर्णवेध इत्यादि अंतर्गत विधि करितात. या संस्कारांपैकीं उपनयन, महानाम्य आणि समावर्तन हे तीन शूद्रास वर्ज्य आहेत. ५. पृथ्वीवर.

वरां, । धाक लावील सुरासुरां, । रणचत्वरीं[1] चक्रधरा[2] । हारी[3] आणील **विष्णूतें.** ॥ ९३ ॥ **नरनारायण[4] शिवरूपें** । यत्नीं पडतील साक्षेपें । तरीच मरण, येरवीं कोपें । हा नाटोपे त्रैलोक्या. ॥ ९४ ॥ करील **कृष्णासीं** विरोध । तरीच पावेल प्राणवध, । येऱ्हवीं यासी नाहीं बाध । कल्पांतींही सर्वथा. ॥ ९५ ॥ **कृष्णीं** उपजेल दीर्घ द्वेष । तेवेळीं उदेला जाणावा नाश । यालागीं मित्र हृषीकेश[5] । करूनि अक्षयी असावें. ॥ ९६ ॥ श्रीकृष्णहस्तें [6]**कंसवध** । झाला, यालागीं वैरसंबंध । वाढला म्हणोनि आज्ञाशब्द । ऋषीगुरुचा भंगला. ॥ ९७ ॥ जेथें गुरूचा आज्ञाभंग । तोचि ऐश्वर्यहानीचा मार्ग । शेवीं[7] प्राणाचाही त्याग । होय तात्काळ निर्धारें.' ॥ ९८ ॥ ऐसा बोधोनि विवेक । आश्रमा गेला ऋषिनायक । तेचि काळीं राज्याभिषेक । पित्यानें केला पुत्रातें[8]. ॥ ९९ ॥ निरवूनि पुरोहितप्रधाना । सवें घेऊनि धर्मांगना । प्रवेशोनि तपोवना । तपश्चर्या मांडिली. ॥ ६० ॥ तपें वेंचूनि आयुष्यधना । योगमार्गें त्यजूनि प्राणा । पावोनि अक्षयी[9] स्वर्गभुवना[10] । कृतकृत्य तो झाला. ॥ ६१ ॥ मागें[11] पुत्रें आपुले प्रौढी । सप्तद्वीपें[12] समुद्रथडी । जिंकोनि राजे लक्ष कोडी । कारागृहीं सूदले[13]. ॥ ६२ ॥ **यादव कौरव पांडव** । भिन्न करूनि राजे सर्व । वृषभप्राय[14] नर पार्थिव । एक दावणीं बांधिले. ॥ ६३ ॥ तो हा **जरासंध** जाणा । दळबळें नाटोपे कोणा ।

---

१. रणांगणीं. २. सुदर्शन चक्र धरणारा. ३. पराजित करील. ४. कृष्णार्जुन. ५. कृष्ण. (हृषीक+ईश=इंद्रिय+स्वामी.) ६. अ० १९ श्लो० २२ पहा. ७. अंतीं. ८. जरासंधातें. [अ० १९ श्लो० १८-१९.] ९. अ० १९ श्लो० २० पहा. १०. 'नंदनवना' असा अन्य पाठ आहे. ११. 'मागधराजा आपुले प्रौढी' असा अन्य पाठ. १२. या सात द्वीपांचीं नांवें:— "जंबु–यांतील लोकांना थोड्या आयासानें पाहिजे ती वस्तु प्राप्त होते. प्लक्ष–यांतील लोक एक हजार वर्षें जगतात. उपास्यदेवता सूर्य. शाल्मली–यांतील लोकांची उपास्यदेवता चंद्र. कुश–यांतील लोकांचे कुशल, कोविद, अभियुक्त आणि कुलक असे चार भेद आहेत; उपास्यदेवता अग्नि. क्रौंच–यांतील लोकांचे पुरुष, ऋषभ, द्रविण आणि देवक असे चार भेद आहेत. उपास्यदेवता उदक. शाक–यांतील लोकांचे ऋतव्रत, सत्यव्रत, दानव्रत आणि अनुव्रत, असे चार भेद आहेत. उपास्यदेवता वायु. पुष्कर–यांत मानसोत्तर या नांवाचा मधोमध वाटोळा एक पर्वत आहे. याची उंची व विस्तार दहा हजार योजनें आहे. यांतील लोकांची उपास्यदेवता ब्रह्म (भागवत.)" [संख्यावाचक दुर्बोधकोश–पृष्ठ ४३-४४.] १३. ठेविले. 'घातले' व 'कोंडिले' असे अन्य पाठ आहेत. १४. बैलासारखे.

हा काळवरी कुरुनंदना! । पैं उपेक्षा म्यां केली. ॥ ६४ ॥ येथ[1] आयुष्य झालें पूर्ण । म्हणोनि मांडिला राजसूय[2] यज्ञ । करावया मागधहनन । इच्छा मातें उदेली. ॥ ६५ ॥ जरेनें सांधिला जो सांधा । तो आणिका नुखळे कदां । वर्म ठावुकें मज गोविंदा । नाश पावेल ज्यापरी. ॥ ६६ ॥ वैरद[4] वदला त्रिलोचन[5] । शस्त्रघायीं न पावे मरण । बाहुयुद्धीं[3] याचें कदन । कर्ता कोण मी जाणें. ॥ ६७ ॥ आतां असो शब्दरचना । जाणें असे मागधहनना । आज्ञा देईं भीमार्जुना । दोघां[6] जावया मजसवें. ॥ ६८ ॥ बळिष्ठ[7] शत्रु पेटला कदना । यश अपेश नेणवे कोणा । कुशळ असावें भीमार्जुना । ऐसें[8] मनीं चिंतीं तूं. ॥ ६९ ॥ तरी मनेंकरूनि यांचा त्याग । माझे हस्तीं निवेदीं दोघ । प्रारब्धयोगें घडेल योग । तें जाणसी स्वभावें. ॥ ७० ॥ आम्ही दोघे साक्षीभूत । भीमहस्तें शत्रुनिष्पात । होईल ऐसा निश्चितार्थ । धर्मराजा! जाण पां'. ॥ ७१ ॥ धर्म म्हणे, 'गा पुरुषोत्तमा[9] ! । तुंझी[10] कृपा कवच आम्हा । पांडवरक्षिता[11] ऐसा महिमा । लोकत्रयीं प्रसिद्ध. ॥ ७२ ॥ तया शत्रूचीं शस्त्रें तिखटें[12] । दूर्वांकुरांहूनि हळुवटें । तेथें कायसीं संकटें । अनुमानाचीं जाण पां. ॥ ७३ ॥ तूं कूर्म हे अवयव, । तूं पादप[13] हे पल्लव । कृष्ण आत्मा हे पांडव । पंच प्राण पैं तुझे. ॥ ७४ ॥ जें इच्छिलें तुझेनि जीवें । तें सर्वार्थी होईल बरवें, । आतां कर्तव्य तें करावें । शीघ्रकाळें स्वामिया!' ॥ ७५ ॥ म्हणोनि बोळवी आज्ञापुनी । अनुज[14] लागले धर्मचरणीं । भीमार्जुन चक्रपाणी । कृत्रिमवेषें चालिले. ॥ ७६ ॥ दोघांसी शिष्यत्व अधिकारु । गुरुत्व अवगला जगद्गुरु । दग्ध करावया मागधेश्वरु । अग्नित्रय[15] ज्यापरी. ॥ ७७ ॥ घोर संसारशत्रूचें कदन । करावया वैराग्य विवेक ज्ञान । उठिले तैसे तिघेजण ।

---

१. येथें 'राजसूयारंभपर्व' समाप्त होऊन 'जरासंधवधपर्व' सुरू होतें. २. 'एक' अन्य पाठ. ३. 'बाहुयुद्धें शस्त्राविण' अन्य पाठ. ४. वरदाता. ५. शिव. ६. 'दोघांजणा' अन्य पाठ. ७. 'जातां बलिष्ठ शत्रूच्या कदना । यश अपेश न जाणवे कोणा । परि कुशल असो भीमसेना । ऐसें कांहीं कल्पिशी ॥' असा अन्य पाठ. ८. अ० २० श्लो० ७ पहा. ९. 'ब्रह्मादिपुरुषेभ्यो यो ह्युत्कृष्टः पुरुषोत्तमः' [विवृत्तिसहित विष्णुनामसहस्र. पृष्ठ ३.] १०. 'तुझें करुणावचन आम्हां' अन्य पाठ. ११. 'पांडव रक्षी हा महिमा' अन्यपाठ. १२. 'तिक्त' शब्दाचें 'तिखट' असें रूपांतर वर्णवृद्धि होऊन झालें. १३. वृक्ष. १४. कनिष्ठबंधु. १५. गार्हपत्य, आहवनीय आणि दक्षिण असे तीन अग्नि. अ० २० श्लो० ३ पहा.

**मा**गधहनना चालिले. ॥ ७८ ॥ इष्टि त्रय जातवेदु[1] । साधिजे तैसा **ज**रा-संधु । साधावया श्री**गो**विंदु । संगियांसीं शोभला. ॥ ७९ ॥ **म**दनदहना-लागीं तीन नेत्र । उघडी जैसा **ध**नदमित्र[2] । कीं दोष नाशावया पवित्र । त्रि-पथें[3] **गं**गा चालिली. ॥ ८० ॥ शकुनलाभ सूचला पंथीं । जयाचें फळ दा-विलें हातीं । जेंवि **वि**ष्णुस्मरणग्रंथीं । मोक्ष वाटे बांधिला. ॥ ८१ ॥ झालें **ज**रासंधाचें हनन, । तुटलें नृपांचें बंधन, । सिद्धी पावला राजसूय यज्ञ । ऐसें **ध**र्में मानिलें. ॥ ८२ ॥ वधावया **मा**गधेश । **भी**मांगीं अति आवेश । चंद्र सूर्य आणि हुताश[4] । तैसे त्रिवर्ग भासती. ॥ ८३ ॥ **कु**रुजांगळा मध्य सागरीं । रमणीय पद्मसरोवरीं । **का**ळकूटगिरिपरिसरीं[5] । पुण्यसरिता[6] **गं**डकी. ॥ ८४ ॥ **शों**णभद्र[7] **गं**गातीरें । **श**रयू वोलंडिली त्वरें । पूर्व **को**शलादी न-गरें । लंघोनि **मि**थिला टाकली. ॥ ८५ ॥ तरोनि **च**र्मण्वती[8] नदी । **शो**-णभद्र जैसा उदधी । **गं**गा स्पर्शोनियां नदी । तीथें केलीं सुंदर. ॥ ८६ ॥ **गो**रथगिरीवरी वळंघले । तेथोनि **मा**गधपुर[9] देखिलें, । वृक्ष फळभारें लवि-

---

१. अग्नी. तीन अग्नी इष्टि जशी साधतात तसें. पृ० ४२ टीप ८ पहा. २. महादेव. (कुबे-राचा मित्र.) ३. भागीरथीस 'त्रिपथगा' 'त्रिस्रोता' अशीं नांवें आहेत. जिचे तीन पथ (मार्ग) आहेत ती त्रिपथा अथवा जी तीन मार्गानीं जाते ती त्रिपथगा. याविषयीं महाभारतांत पुढील वचन आहेः—'क्षितौ तारयते मर्त्यान्नागांस्तारयतेऽप्यधः । दिवि तारयते देवांस्तेन त्रिपथगा स्मृता ॥.' ४. अग्नि. ५. परिसर=नदीनगरपर्वतादिकाच्या समीपचा भाग, समीपस्थान. ६. अ० २० श्लो० २८-३० पहा. या नदीचा उगम हिमालय पर्वतांत आहे. हिला 'शा-लिग्रामी' नदी असें नांव आहे; कारण हींत शालिग्रामशिला सांपडतात. तुळजापुरच्या दे-वीची मूर्ति गंडकीच्या काळ्या दगडाची असून मनोहर आहे. ७. नदविशेष. ८. चर्मण्वती—ही नदी दशपुराधीश रंतिदेव नामक राजानें यज्ञांत ज्या अनेक गाई मारल्या त्यांच्या चर्मराशीपासून उत्पन्न झालेल्या रक्तप्रवाहाच्या योगानें झाली म्हणून तिला हें नांव पडलें. रंतिदेवानें गोमेध यज्ञांत शेकडों गाई मारल्या त्यामुळें रक्तनदीच उत्पन्न झाली, अशी पौरा-णिक कथा भारताच्या शांतिपर्वांत (अ० ९० श्लोक १२३) आहे. [गो० र० नंदर्गीकर-प्रकाशित मेघदूत टीपा—पृष्ठ ५२.] ९. जरासंधाला मारण्याकरितां कृष्ण, भीम, अर्जुन हे तिघे धर्माच्या आज्ञेवरून निघाले; त्यांच्या मार्गाचें वर्णन संक्षेपतः असें आहे:—ते कुरुदेशांतून कुरुजांगल, पद्मसर, कालकूट मिथिलेस वलांडून पुढें गंडकी, महाशोण, सदानीरा ह्या एक पर्वतकावरच्या नद्या त्यांनीं वलांडल्या. नंतर शरयू नदी उतरून पूर्वकोसल देशांतून गेले. तेथून माला, व चर्मण्वती ह्या नद्या उतरून गंगा व शोण ह्या नद्या उतरले. नंतर पूर्वेस तोंड करून मागध देशांत गेले. त्यांतील गोरथ पर्वतावर चढले. तेव्हां मागधराजधानी (राजगृहनगरी) दृष्टीस पडली. (अध्याय २०) तेथें ब्राह्मणवेशानें जाऊन 'बंदींत घातलेले

ल्ले । शुद्धोदकें तडागें. ॥ ८७ ॥ पंचशृंगी ¹पंचपर्वत । ²चूतमंडित सुशोभित । गिरिव्रजातें रक्षित । रक्षपाळ पैं जैसे. ॥ ८८ ॥ आरक्तपुष्पी पादपवनीं । सुवर्णगिरिकेचिया खाणी । नेणो ³अरुणसंध्या दोनी । क्रीडों आली त्या ठाया. ॥ ८९ ॥ गौतमऋषीचा आश्रम । पांडवां दाखवी ⁴आत्माराम । तो येथें जाणा उत्तम । योगियांच्या कौतुकें. ॥ ९० ॥ ⁵शूद्रयोनींत आपल्या रेतें । काक्षीवदादी शतपुत्रांतें । गौतमें जन्मविलें येथें । गर्भीं औशीनरीच्या. ॥ ९१ ॥ ⁶अंगवंगादी राजे सकळ । गौतमाश्रमीं सर्वकाळ । ऋषिसहित सदा कुशळ । मागधातें इच्छिती. ॥ ९२ ॥ तपें तोषविल्या हरातें । जें फळ लाधे साधकांतें । तेणें आपुलेनि सामर्थ्यें । काम पुरवी प्रजांचे. ॥ ९३ ॥ सर्पीं सांडोनि पाताळांतें । वनीं क्रीडती संतुष्टचित्तें । आणीकही वसती तेथें । यक्ष किन्नर अप्सरादी. ॥ ९४ ॥ असो. हे तिन्ही पुरुषव्याघ्र । नगरद्वारा पातले शीघ्र । तेही भेदूनियां अव्यग्र । द्वारमाथां वळघले. ॥ ९५ ॥ दैत्य⁷ मारूनियां समरीं । त्यांचेनि चर्में ⁸मढिल्या भेरी । ठेविल्या असती नगरद्वारीं । जरासंधें प्रतापें.॥९६॥ मागधकीर्तीचा महाशब्दु । शतयोजनें गाजवी नादु । तो परिसोनि शत्रूच्या ⁹वधु । गर्भ त्यागिती पोटींचे. ॥९७॥ ¹⁰ईषणात्रय लोटोनि पायें । विरक्त आत्मसाधना जाये । तेंवि बलिष्ठ भीमरायें । तिन्ही भेरी भंगिल्या. ॥९८॥ नगरस्त्रियेचीं सौभाग्यशृंगें । भेदीत गेलीं गगनमार्गें । ज्यांचे ठायीं सप्तरंगें । वोप देती शृंगारें. ॥ ९९ ॥ चंदनलेपन सुगंध चूर्णें । माळा दंडीं विचित्र ¹¹सुमनें । मेरुशिखराचेनि मानें । मध्यभागीं शोभती. ॥ १०० ॥ ऐश्वर्यमदें

---

८६ राजे सोड नाहीं तर युद्धास ये' असें त्यांनीं जरासंधास सांगतांच त्यानें आपला पुत्र सहदेव यास राज्याभिषेक करविला व आपण युद्धास तयार झाला. नंतर भीमाबरोबर त्याचें मल्लयुद्ध कार्तिक शुद्ध १ पासून १३ पर्यंत होऊन १४ वे दिवशीं भीमानें त्यास मारिलें व कृष्णानें सर्व बंदींत असलेले राजे सोडून दिले. नंतर इंद्रप्रस्थीं तिघेजण धर्मराजाकडे आले व कृष्ण धर्मास विचारून द्वारकेस गेला.

१. वैहार, वराह, ऋषिगिरि, चैत्यक आणि वृषभ असे पांच पर्वत. [अ० २१ श्लो०२-५.] २. आम्रवृक्षांनीं शोभित. ३. सूर्ययंता. ४. कृष्ण. ५. औशीनरी नामक शूद्रेच्या ठायीं गौतमानें काक्षीवादिक पुत्रांस उत्पन्न केलें. [अ० २१ श्लो० ५.] ६. अ० २१ श्लो० ७ पहा. ७. ऋषभ नामक दैत्याला मारून बृहद्रथानें त्याच्या चर्माच्या तीन मोठ्या भेरी केल्या होत्या, त्या तिघां पांथांनीं फोडून टाकल्या. [अ० २१ श्लोक १७-१९.] ८. 'बनविल्या' अन्य पाठ. ९. स्त्रिया. १०. पुत्रेषणा, दारेषणा, वित्तेषणा. अथवा वित्तैषणा, दारसुतैषणा व आत्मलोकैषणा. [भागवत–दशमस्कंध अध्याय ८४ श्लो० ३८.] ११. पुष्पें.

जे मातले । देहाभिमानें गर्वा चढले । ते त्रिवर्गी भंगिजेती वहिले । ईश्वर काळ प्रारब्धें. ॥ १०१ ॥ तेंवि त्रिवर्गें महाबळी । शृंगें भंगूनि पाडिलीं तळीं । हें देखोनि जनीं, सकळीं । परम दुश्चिन्ह मानिलें. ॥ १०२ ॥ राजबिदीं चालतां वीर । गंधविक्रयी मालाकार । देखतां करूनि बलात्कार । माला गंध हरितलें. ॥ १०३ ॥ हरिचंदनें चर्चिली उटी । सुमनमाला सूदल्या कंठीं । लोक लक्षितांही दृष्टीं । नेम कोणा न करवे. ॥ १०४ ॥ सुस्नात आणि श्वेत वसनीं । चंदनलेप माळा सुमनी । मार्ग सांडोनि राजसदनीं । प्रवेशले अमार्गें. ॥ १०५ ॥ राजा व्यासक्त यज्ञायतनीं । दीक्षित नेमस्त उपोषणीं । पुरोहित पातला गजयानीं । मंत्रविधानीं आचार्य. ॥ १०६ ॥ सांग संपादूनि होम । स्वस्थासनीं नरेंद्रोत्तम । दूतांसहित यमधर्म । तेंवि तिघे देखिले. ॥ १०७ ॥ कुंजरवनामाजी केसरी, । कीं गोठणीं प्रवेश कीजे व्याघ्रीं, । तैसे तिघे होमागारीं । जरासंधें देखिले. ॥ १०८ ॥ न बोलतां आशीर्वचनीं । स्तंभप्राय उभे मौनी, । रायें देखोनि सन्मानीं । प्रत्युत्थानीं गौरविले. ॥१०९॥ तिघां वोपिलीं कनकासनें । मधुपर्कविधी पूजा विधानें । देतां 'ने घे' म्हणतां वचनें । इच्छा कांहीं असेना. ॥ ११० ॥ कृत्रिम वेष यदुनायक । म्हणे, 'राजया! अल्पसें ऐक । मागणें असे कांहीं एक । तें अविलंबें अनुवादें.

---

१. राजमार्गात. २. अध्याय २१ श्लोक २६ पहा. ३. चंदनागुरूनें. (पृष्ठ १५ टीप ४ पहा). ४. 'धरिल्या' अन्य पाठ. ५. यज्ञस्थानीं. ६. हत्तिरूप अरण्यांत. ७. सिंह. ८. यज्ञशाळेंत. ९. अध्याय २१ श्लोक ३१ पहा. १०. विवाहसमयीं वर वधूच्या द्वारीं आला असतां पादप्रक्षालनादि करून मध, तूप आणि दहीं हीं मिश्रित करून त्यास समर्पून गंध वस्त्र इत्यादिकांनीं त्याची पूजा करणें, या विधिला 'मधुपर्क' म्हणतात. या संबंधानें पुढील वचनें आधारभूत आहेत:—'दधि सर्पिर्जलं क्षौद्रं सितैताभिस्तु पंचभिः । प्रोच्यते **मधुपर्क**स्तु सर्वदेवौघतुष्टये ॥ जलं तु सर्वतः स्वल्पं सिता दधि घृतं समम् । सर्वेषामधिकं क्षौद्रं **मधुपर्के** प्रयोजयेत् ॥' (कालिकापुराण.) याचा भावार्थः—सर्व देवांच्या प्रीणनार्थ दधि घृत जल मधु आणि शर्करा या पांच पदार्थांचें जें मिश्रण करतात त्याला **मधुपर्क** हें नांव आहे. ह्यांत पाण्याचा अंश सर्वांत कमी असतो. साखर दहीं आणि तूप हीं सारख्या प्रमाणानें असतात. परंतु मधुपर्कांत मधाचें परिमाण सर्वांत जास्त असतें. 'राजर्त्विक् स्नातकगुरून्प्रियश्वशुरमातुलान् । अर्हयेन्मधुपर्केण परिसंवत्सरात्पुनः ॥' [मनुस्मृति—अध्याय ३ श्लोक ११९.] याचा भावार्थ:—राजा, ऋत्विक्, स्नातक (वेदाध्ययन करून गुरुगृहापासून आलेला वेदाभ्यासी विद्यार्थी), गुरु, जांवई, सासरा आणि मामा, हे सात घरीं आले असतां गृह्यसूत्रांत सांगितल्याप्रमाणें त्यांची मधुपर्कद्वारा पूजा करावी. एक संवत्सर लोटल्यावर ते पुनः आले तर त्यांची मधुपर्कपूजा पुनः केली पाहिजे. ११. अ० २१ श्लो० ३३-३४ पहा.

॥ १११ ॥ हे दोघे व्रतस्थ मौनी । अर्धप्रमाण लोटतां रजनी । वृत्तांत बोलतील वचनीं । तो त्वां पुढें परिसणें.' ॥ ११२ ॥ होमशाळे स्थापूनि द्विजा । राजगृहीं प्रवेशे राजा, । अर्ध लोटल्या शशांकभाजा । पुढती आला जवळिके. ॥ ११३ ॥ महानुभाव तपस्वी थोर । म्हणोनि गृहीं योगेश्वर । त्यातें अर्पूनि पूजोपचार । सुप्रसन्न करावे. ॥ ११४ ॥ म्हणूनि मागुती मागधेश्वर । आदरें करूनि नमस्कार । काय बोलती मधुरोत्तर । तें उचित परिसावया.॥ ११५॥ अतिथी म्हणती, 'कुशळ राया!' । तो म्हणे, 'देखतां पवित्र पायां. । सकल कल्याण येथोनियां । आशीर्वचनीं स्वामिचिया. ॥ ११६ ॥ कोठोनि येणें कोटवरी? । इच्छा केउती पुढारीं? । आज्ञा असेल, उत्तरीं । प्रगट केली पाहिजे. ॥ ११७ ॥ पाहतां तापसियांचीं सोंगें । वर्ततां देखोनि अविधिमार्गें, । भेरीभंग शृंगभंगें । किमर्थ केले सांगिजे. ॥ ११८ ॥ अमार्गें आलेति राजसदना । हेंही दोषामाजी गणना, । पूजा न घ्यावया कारणा । सांगीतलें पाहिजे. ॥ ११९ ॥ पुष्पगंधें श्वेत सुमनें । कवणा आश्रमाचीं हीं चिन्हें । इच्छा नाहीं तरी कां येणें? । प्रभुप्रती विरक्तीं. ॥ १२० ॥ असो तुमचे गुणागुण, । मागाल तें देईन दान, । या निश्चयें निश्चळ मन । करूनि बोला याचक हो!' ॥ १२१ ॥ तिघांमाजी गुरुत्व मुख्य । तो म्हणे, 'राया! यथार्थ ऐक । जाणतां वर्तती अविवेक । हें अघटित सर्वथा. ॥ १२२ ॥ प्रकट अपकीर्तीचा घोष । यालागीं पवित्रा आला रोष । भेरी भंगिल्या त्याचा दोष । पाहतां कांहीं असेना. ॥ १२३ ॥ 'वाढेल तें पडेल त्वरित' । हाचि जाणावा संकेत । शृंगें भंगिलीं त्याचा अर्थ । ऐसाचि असे शाहणिया! ॥ १२४ ॥ त्यागूनि रज तम दुर्जनें । सत्वसंगें असणें बसणें । म्हणोनि गंधें श्वेतवसनें । शुद्ध सुमनें धरियलीं. ॥ १२५ ॥ मार्गें जाइजे मित्रसदना । अमार्गें येइजे शत्रुस्थाना । नीतिधर्में नरमंडना! । वर्तणूक आमुची. ॥ १२६ ॥ आलों असों आणिके अर्थीं । पूजाप्रतिग्रह नातळों हातीं । जे जे वर्तती धर्मपंथीं । ते ते मित्र आमुचे.' ॥ १२७ ॥ ऐकोनि बोले मागधेश्वर, । 'आम्हां काय ऐसें वैर । कोणे काळीं

---

१. नियमस्थ. २. रात्र. शशांकाची (चंद्राची) भाजा (भार्या). रात्र ही चंद्राची बायको आणि चंद्र हा तिचा वल्लभ—ही समजूत फार जुनी आहे. चंद्राला 'निशापति' असें नांव आहे. ३. यज्ञागारांत. ४. अ० २१ श्लो० ४५ पहा. ५. अद्वारानें. ६. अ० २९ श्लो० ४९-५४ पहा. ७. आपल्या शत्रूच्या घरीं आडमार्गानें जावें असा नियम आहे. [अ० २१ श्लो० ५३]. ८. पूजेचा स्वीकार. ९. न स्पर्शों. १०. धर्ममार्गी.

विरोधाचार । मी आचरलों तुम्हांशीं. ॥ १२८ ॥ नाहीं असत्यापरतें पाप । बोलता तितुका अविचार जल्प । कारणावीण दुष्ट संकल्प । वाहणें हाची अविवेक. ॥ १२९ ॥ अमृतफळा ऐसीं वचनें । अंतर भेदितां वृंदावनें, । कोंळकूटें घोळिलीं अन्नें । केंवी रुचिकर म्हणावीं? ॥ १३० ॥ आतां यथार्थ तेंच सांगा । मागणें तें प्रकट मागा । नसतां कलंक माझिया आंगा । वैरशब्द न लावणें. ॥ १३१ ॥ 'याचक' म्हणतां अनादरु । करूं नये हा शिष्टाचारु, । सांडोनि वक्रोक्तीचा विचारु । नीट बोला, धीट हो! ॥ १३२ ॥ अच्युत म्हणे, 'ऐक वचन, । वैरास कांहीं न लागे यत्न, । दुष्ट ज्याचें आचरण । तोचि वैरी विश्वाचा. ॥ १३३ ॥ राजे धरूनियां लक्षावधी । बैस्त करूनि सूदले बंदीं । त्यांचा होम कवणे विधी । करूं पाहसी सांग पां? ॥ १३४ ॥ हेंचि असह्य तिघां देवां । हेंचि असह्य महानुभावां । हेंचि कारण वैरभावा । आम्हां तुम्हां प्रस्तुत. ॥ १३५ ॥ काया वाचा मनोविकारी । परपीडक हिंसाचारी । भूतद्रोह ज्यामाझारी । तोचि वैरी विष्णूचा. ॥ १३६ ॥ ऐश्वर्यमदें जो अविचारी । इंद्रियकामीं जो अनाचारी । शक्ति असोनि अनुपकारी । तोचि वैरी विष्णूचा. ॥ १३७ ॥ भंगी वेदाज्ञागळसरी । ऐश्वर्यवादें वैधव्य करी । कुश्चिताचारें जो व्यभिचारी । तोचि वैरी विष्णूचा. ॥ १३८ ॥ विष्णुरूप जगशरीरीं । गर्जन तर्जन कठिणोत्तरीं । शस्त्र धारे भेद न करी । तोचि वैरी विष्णूचा. ॥ १३९ ॥ कमला केशवा वागेश्वरी । भेटों भावी धर्मागारीं । कार्पण्यलोभें विघड करी । तोचि वैरी विष्णूचा. ॥१४०॥ जो शिवाचें भजन करी । विष्णुद्रोह ज्याचे अंतरीं । तेणें मस्तक पुजोनि उदरीं । शस्त्र जैसें खोंचिलें. ॥ १४१ ॥ विष्णुनामाची निंदा करी । विष्णुभक्तांचा द्वेष धरी । विष्णूचें गुणकीर्तन अव्हेरी । तोचि वैरी विष्णूचा. ॥ १४२ ॥ विष्णुभक्त मी निर्दोष । म्हणोनि करी शिवाचा द्वेष । त्यातें म्हणे हृषीकेश । मुख्य वैरी तो माझा. ॥ १४३॥ संत महंत महानुभाव । हा विष्णूचा परिवार सर्व । यालागीं सहज वैरभाव । आम्हां तुम्हां योजला. ॥ १४४ ॥ अपाय चिंतूनि परातें । कल्याण इच्छी आपणातें । विष्णुवैरी होवोनि त्यातें । नाश करी सर्वस्वें. ॥ १४५ ॥ आम्हीं धर्मातें स्थापावें । सा-

१. एक जातीचें कडू फळ. २. विषानें. ३. अ० २२ श्लो० ७-२६ पहा. ४. बोकड. ५. घातले. ६. उदारधी नरां. ७. प्राणिद्वेष. ८. लक्ष्मी.

धुसज्जनांतें प्रतिपाळावें । यत्नें दुष्टांतें दंडावें । हेंचि कर्तव्य आमुचें. ॥१४६॥ याचिलागीं येणें जाणें । याचिलागीं देह धरणें । सांगों नये परि सांगणें । पडियेलें येथें ये काळीं. ॥ १४७ ॥ ब्राह्मण अवघा ब्रह्ममूर्ती । याचिलागीं फिरों सर्व जगतीं, । जे जे वर्तती अनीति । शिक्षा त्यांतें करावया. ॥ १४८ ॥ आतां राजे करीं कां मुक्त । हेंचि आमुचें मागणें येथ, । नेदी म्हणसी तरी अनर्थ । येचि काळीं दिसतसे. ॥ १४९ ॥ राजे सोडविल्याविणें । येथोनि सहसा नाहीं जाणें । पैजे प्राण घेणें देणें । द्यूत खेळणें हें येथें. ॥ १५० ॥ हांव न धरिसी संग्रामीं । तरी बळात्कारें उठवूं आम्ही.' । ऐसें बोलतां पराक्रमी । जरासंध क्षोभला. ॥ १५१ ॥ पुसोनियां उभय नेत्र । न्याहाळून पाहे वैक्र, । म्हणे, 'हा पांडवाचा मित्र । होय कीं काय विचारी. ॥ १५२ ॥ जो आटींव जेठिया ऐसा । चढत तेज मुखप्रकाशा । भीमा ऐसा आंगठसा । माझिये दृष्टी भासतसे. ॥ १५३ ॥ तिसरा जो कां आजानुबाहो । तो द्रौपदीचा तिसरा नाहो, । त्रिशुद्धी करूनि खांडवदाहो । तोषविलें त्रिपादा.

१. 'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् । धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥' [भगवद्गीता–अ० ४ श्लो० ८] या श्लोकाचा भावार्थ या ओवींत आहे. २. इच्छा. ३. मुख. ४. नायक. ५. ही कथा अशी आहे:—श्वेतकी नामक एका प्रख्यात राजानें असंख्य यज्ञ केले; शेवटीं शतसंवत्सरात्मक यज्ञ दुर्वास ऋषीच्या आश्रयानें केला. या अनेक यज्ञांत हविर्भक्षण केल्यामुळें अग्नीला इतकें जाड्य आलें कीं, 'त्याचा प्रतिकार कसा करावा?' असें विचारण्यासाठीं त्याला ब्रह्मदेवाकडे जावें लागलें. अनेक वर्षें घृतधारा सेवन केल्यानें अग्नि निस्तेज आणि म्लान झाला. 'खांडववन भक्षण करून अग्नीनें आपलें जाड्य निरस्त करावें' असा उपाय पितामहानें सांगितला. पण हें वन इंद्ररक्षित होतें म्हणून तें अग्नीस सुप्राप्य नव्हतें. तेव्हां पितामहाच्या अनुमतानें अग्नि विप्रवेश घेऊन मनुष्यलोकीं कृष्णार्जुनास शरण आला. त्या उभयतांनीं खांडववन भक्षणार्थ देण्याचें कबूल केलें, पण अर्जुनापाशीं रथादियुद्धसाहित्याची कांहींशी उणीव असल्यामुळें अग्नीनें वरुणापासून मागून घेऊन अर्जुनाला गांडीव धनुष्य, अक्षय्य इषुधि, कपिध्वजयुक्त दिव्यरथ, इत्यादि सामुग्री दिली आणि कृष्णास वज्रनाभ नामक चक्र आणि कौमोदकी नामक गदा देऊन उभयतांस संतुष्ट केलें. नंतर अग्नि तें वन भक्षण करूं लागला, आणि कृष्णार्जुन रथारूढ होऊन वनाच्या दोन्हीं बाजूंस सर्व प्राणिनाश करूं लागले. हें वर्तमान कळतांच इंद्र अग्नीचें निवारण करण्यासाठीं सकलदेवांसह आकाशांत येऊन जलवृष्टि करूं लागला. तेव्हां कृष्णार्जुनांनीं त्याचा पाडाव करून त्यास परत लाविलें. नंतर अग्नि तें वन पंधरा दिवस यथेच्छ भक्षण करून व्याधिनिर्मुक्त झाला. (आदिपर्व–अध्याय २२३-२२५.) ६. अग्नीला. [त्रयः पादाः यस्यासौ त्रिपाद्. अग्नीला तीन पाय (पाद) होते म्हणून त्याला त्रिपाद म्हणत. 'चत्वारि श्रृंगाणि त्रयोऽस्य पादा द्वे शीर्षे सप्तहस्तासो अस्य' असें श्रुतिवचन आहे.]

॥ १५४ ॥ शस्त्रशाधनें बहुत काळ । केलीं याचें वक्ष विशाळ । पाणितळें भासती प्रबळ । तैं सांगती जातीतें. ॥ १५५ ॥ नोव्हे द्विजतेजाचें चांदणें, । क्षात्रतेजाचीं उष्ण किरणें । लागतां सांगती लक्षणें । वर्ण आणी वृत्तीचीं. ॥ १५६ ॥ येरव्हीं ऐसीं वाग्वचनें । बोलिजेतील आणिकें कोणें । तथापि माझिये दृष्टीस तृणें । **कृ**ष्ण आणि **पां**डव. ॥ १५७ ॥ **ज**रासंध असतां जितु । [१]महींद्रमोचनाची मातु । करी ऐसा **वी**रश्रीकांतु । भुवनत्रयीं असेना. ॥ १५८ ॥ मुखाकृती मश्यका ऐसी । पर्वत गिळीन म्हणे मासी । तुमची बोली टिटवी तैसी । आश्चर्य करी आमुतें. ॥ १५९ ॥ [३]ऊर्णनाभी [२]स्वतंतुसूत्रीं । पृथ्वी झांकीन म्हणे वस्त्रीं । [४]वृश्चिक नागियाचे शस्त्रीं । खंडीन म्हणे वज्रातें. ॥ १६० ॥ [५]खद्योत मिरवी रविमंडळा । मुंगी उचली ब्रह्मांडगोळा । तेंवि तुझें बोलणें बरळा! । शक्तीहूनि अचाट. ॥ १६१ ॥ अवलोकोनि आपणाकडे । शक्तीसारिखें बोलिजे तोंडें । याचकें जीविकेचिये चाडें । मागों ये तेंचि मागावें.' ॥ १६२ ॥ ऐसें बोलतां **मा**गधेश्वर । उत्तर देईल **या**दवेश्वर । तेंचि कथील कवीश्वर । उत्तराध्यायीं श्रोतयां. ॥ १६३ ॥ इति श्री**भा**रतकथानुवादें । खंडती जन्ममरणाचीं वृंदें, । **ली**ला**वि**श्वंभरप्रसादें । **मु**क्तेश्वर कवि म्हणे. ॥ १६४ ॥

---

## अध्याय सातवा.

**कं**सारी [६]संसारगजकेसरी । हांसोनि बोले श्री**कृ**ष्ण **शौ**री, । '**पां**डुपुत्र हे निर्धारीं । **भीमा**र्जुन जाण पां. ॥ १ ॥ मागें अपराध केले क्षमा । ते कार्याकारणें पुरुषाधमा! । लोटली मर्यादेची सीमा । शेवटीं फळ भोगीं कां. ॥२॥ [७]सरला सुकृताचा तंतु । आयुष्यतैला झाला अंतु । माझिये हस्तीं व्यजनवातु । **भी**मरूपें उदेला. ॥ ३ ॥ तो झगटतां सत्वरगती । प्राणदीप पंच ज्योती । मालवोनि पडेल क्षिती । गात्र पात्र पालथें. ॥ ४ ॥ असेल वांचावयाची आर्ती । तरी रक्षिल्यां करीं बंधमुक्ती । आम्हां तुम्हां अर्थाअर्थी । वैरसंबंध असेना. ॥ ५ ॥ करीं रायांचें बंधमोचन । कीं युद्धा उठीं न लगतां क्षण ।

---

१. राजांच्या सुटकेची गोष्ट. २. सुतेरा. ३. आपल्या तंतूंच्या जाळ्यानें. ४. विंचू. ५. काजवा. ६. संसाररूप गजाचा (हंता) सिंह. ७. हें रूपकाचें सुंदर उदाहरण आहे. अशीं रूपकें मुक्तेश्वराच्या काव्यांत अनेक आढळतात.

या वेगळा विचार आन । करणें आतां घडेना. ॥ ६ ॥ आतां बोलिलासी वचन । मागाल तें देईन दान । न करितां नृपांचें मोचन । ऊठ वेगीं संग्रामा. ॥ ७ ॥ शस्त्रावीण बाहुयुद्ध । उसण्या घाई करीं कां शुद्ध । जिंकेल तेणें अक्षयी पद । उभयलोकीं भोगावें. ॥ ८ ॥ तिघांमाजी जो आवडे । त्यासींच भिडिजे इडेपाडें.' । मागध म्हणे, 'मूर्खा! तोंडें । जल्प करिसी वाचाटा! ॥ ९ ॥ तूं बहुरूपी खेळसी सोंगें । कोणतें युद्ध जिंकिलें आंगें । वेडीं बागडीं भाविकें भणगें । तुझें शूरत्व त्यांमाजी. ॥ १० ॥ पार्थ पृथेचें सुकुमार बाळ । शस्त्राभ्यासीं गेला काळ । मजसीं अयोग्य परि अळुमाळ । भीम कांहीं दिसतसे. ॥ ११ ॥ तोही मंद जड आळसी । बहुत आहार निद्रा त्यासी । आयुष्य सरलें म्हणून ऐसी । बुद्धि उदेली तुम्हांतें. ॥ १२ ॥ तिघांतें हाणोनि चडकणा । क्षणामाजी मेळवीन मरणा । बळें सर्पाच्चिया सदना । [1]मंडूक वस्ती पावला.' ॥ १३ ॥ 'मंडूक किंवा तिघे गरुड । आतांचि होईल हा निवाड. । समय प्राप्त झालिया वाड । बोल टाकीं माघारा.' ॥ १४ ॥ ऐसें बोलतां [2]चक्रपाणी । उभे ठेले समरांगणीं । जरासंधें राज्यासनीं । [3]अभिषेकिलें सहदेवा. ॥ १५ ॥ प्रधानातें निरोपी मुखें, । 'राज्य रक्षावें अतिविवेकें, । होणार तें होतसे सुखें । निर्भय सर्वीं असावें.' ॥ १६ ॥ सरसावुनी वीरगुंठी । भीम लक्षिला दारुणदृष्टीं । जैसा मदोन्मत्त [4]करटी । सिंहेश्वरें लक्षावा. ॥१७॥ भीमाआंगीं वीरश्रीचा लोटू । धरितां न धरवे अतिउद्भटू । अगस्ती धांवे समुद्र [5]घोटूं । तैसा [6]झगटे पुढारां. ॥ १८ ॥ दोघे पिटिती [7]पाणितळें । [8]जानुमूळें [9]बाहुमूळें । मही ताडितां [10]पादतळें । [11]शैलमौळें [12]थरकती. ॥ १९ ॥ दोघे स्मरती कुळदैवतें । मागध मागे [13]महेशातें, । 'शत्रुयाचकां माझेनि मृत्यें । यशभिक्षा लाधो मज.' ॥ २० ॥ भीमें स्मरोनि श्रीकृष्णचरण । म्हणे, 'होवोनि मागधहनन । सिद्धी पावो राजसूययज्ञ । [14]आर्त पुरो पांडूची.' ॥ २१ ॥ किरीटें[15] काढोनि हस्तकीं । केश आंवळिले मस्तकीं, । [16]चंड गर्जना करिती मुखीं । [17]काळ कांपे चळचळां. ॥ २२ ॥ धांवोनि भीमाची वीरगुंठी । मागधें कवळोनियां मुष्टी । दक्षिणहस्त [18]सूंदला कंठीं । [19]काळपाशासारिखा.

---

१ बेडूक. २. कृष्ण. ३. अ० २२ श्लो० ३१ पहा. ४. हत्ती. ५. पिण्यासाठीं. ६. 'तगटे' असा अन्य पाठ. तगटे=धांवे. ७. तळहातानें. ८. मांड्या. ९. दंड. १०. पायांच्या तळव्यानें. ११. पर्वतशिखरें. १२. थरथर कांपती. १३. शंकरातें. १४. आवड, इच्छा. १५. अ० २३ श्लो० ६ पहा. १६. भयंकर. १७. यमधर्म. १८. घातला. १९. यमाचा पाश.

॥ २३ ॥ दांत खाऊनि करकराटी[१] । गुडघा स्थापिला हृदयपुटीं[२] । सावध म्हणे कृष्ण[३] जगजेठी, । 'बापा! **भी**मा! बळिष्ठा!' ॥ २४ ॥ **भी**में भैरवा[४]कार दृष्टी । हृदयीं वोपिली वज्रमुष्टी[५] । सोडवूनि मगरमिठी[६] । झिंजाडोनि[७] लोटिला. ॥ २५ ॥ तेणें मागुती उठोनि विकळ[८] । पडिला जैसा विशाळ ताळ[९] । पुढती उठोनि उतावीळ । **भी**म मध्यें कवळिला. ॥ २६ ॥ दोन्ही कोंपर दोन्ही मुष्टी । चारी आंघात[१०] वोपिले पृष्टीं । **मा**गध क्षोभोनि उफराटी[११] । हुमणी[१२] हाणी मस्तकीं. ॥ २७ ॥ झोंबी सोडवोनि तवकें[१३] । मस्तका मस्तकें देती थडके, । सहस्रसंख्या लोट भडके[१४] । अशुद्धाचे[१५] चालती. ॥ २८ ॥ मस्तकें फुटोनियां धरणीं । रक्तप्रवाह भरती वदनीं. । **मा**गध म्हणे, 'देहमरणीं । अमृतपान होतसे.' ॥ २९ ॥ हस्त वोढिती तोडावया । पाय कवळती मोडावया । डोळे टोंचिती फोडावया । पाडावया दशनांतें[१६]. ॥ ३० ॥ करप्रहार[१७] लत्ताप्रहार । मुष्टिप्रहार मस्तकप्रहार । मोजोनि मारिती शतसहस्र । 'उसणें घे घे' म्हणोनी. ॥ ३१ ॥ मस्तकीं वाहती करूनि मोट, । भूमीं टाकिती जैसा घट, । तळीं पाषाण होती पिष्ट । आंगलोटें दोघांच्या. ॥ ३२ ॥ बाहु गदा बाहु मुसळें । बाहु[१८] मुद्गल कर त्रिशूळें । एकमेकांचीं मर्मस्थळें । पाहोनियां मारिती. ॥ ३३ ॥ तळवे तळपणें चपेट झडपा, । ताडितां दोघे दाटती धापा । उडिया टाकिती सकोपा । येरयेरा मस्तकीं. ॥ ३४ ॥ व्याघ्रा ऐसे क्रोधानळीं । झोंबों पाहती कंठनाळी । सिंहा ऐसे कुंभस्थळीं । भेदूं म्हणती मस्तकें. ॥ ३५ ॥ नीट उभारोनि बोटें । हाणोनि फोडों पाहती पोटें । काढोनि अंत्रमाळ गोठें । कंठीं घालूं इच्छिती. ॥ ३६ ॥ वर्मस्थळीं लाविती कळे । हस्तपाशीं कर्षती गळे, । दोघांचीही आतुर्बळें । नाटोपती एकएका. ॥ ३७ ॥ सर्पाऐसे फुस्कारिती । सिंहाऐसे हुंगारती । वृषभाऐसे फुंपाटती । उफाळती ईसाळें[१९]. ॥ ३८ ॥ नर[२०] नारी नागरिक लोक । पाहती दोघांचें कौतुक । विमानयानीं वृंदारक[२१] । जय इच्छिती **भी**मातें. ॥ ३९ ॥ मुष्टिघातांचिया ध्वनी । थरथराटें थरके धे[२२]-

१. करकर. २. छातीवर. ३. 'कृष्णकिरीटी' असा अन्य पाठ. ४. भयंकर. ५. वज्रासारखी कठिण मूठ. ६. मगरासारखी घट्ट मिठी. ७. आंसडून. ८. घायाळ. ९. ताडवृक्ष. १०. प्रहार. ११. 'उल्हाटी' असा अन्य पाठ. १२. बुक्की. १३. कोपाच्या आवेशानें. १४. लाल. १५. रक्ताचे. १६. दंतांतें. १७. 'कूर्परप्रहार' असा अन्य पाठ. कूर्परप्रहार=कोंपरखळ्या. १८. 'बाहू कांतिया करवाळें' असा अन्य पाठ. कांतिया करवाळें=पोलादी तरवारी. १९. ब्रह्मराक्षस. २०. अध्याय २३ श्लोक २१ पहा. २१. देव. २२. पृथ्वी.

रणी । [1]वोथरोनि पाताळफणी । मार्ग पाहे पळावया. ॥ ४० ॥ [2]कूर्म आंखडी हात पाय, । [3]वराह म्हणे, 'मांडिलें काय? । दंष्ट्रास्तंभ भंगलिया, [4]भोयें । केंवि थांबे तळवटीं.' ॥ ४१ ॥ निराहार निरुदक, । विसांवा न घेतां पळ एक, । [5]तेरा दिवसपर्यंत देख । युद्ध झालें दोघांसी. ॥ ४२ ॥ [6]कार्तिकाचिया प्रथम दिवसीं । संग्राम मांडला दोघांसीं । लोटलिया त्रयोदशी । [7]निशी झाली झुंजतां. ॥ ४३ ॥ चतुर्दशीचिया राती । मूर्च्छा पावला **मा**गध नृपती, । ते वेळीं संकेत दावी हातीं । [8]**पां**डवातें **मा**धव. ॥ ४४ ॥ 'पाय कवळोनियां करतळीं । चिरोनि करावीं दोन्हीं फळीं । **ज**रेनें सांधिला तो उखळीं । सांधा वेगीं बळिष्ठा! ॥ ४५ ॥ या वेगळा उपाय [10]आन । करितां **मा**गध न पावे मरण, । आतांचि होऊनि सावधान । युद्ध करील मागुती.' ॥ ४६ ॥ ऐसें बोले जंव **मु**कुंद, । तंव सावध झाला **ज**रासंध । धांवला जैसा [11]द्विरद मदांध । झगटे [12]विशालद्रुमासीं. ॥ ४७ ॥ [13]**शं**बरारीवरी **शं**बर, । श्री**रा**मावरी [14]**द**शशिर, । [15]**म**हाशक्तीवरी **म**हिषासुर । महाक्रूर ज्यापरी. ॥ ४८ ॥ **म**हिषासुर **म**हामायेसीं, । **हि**रण्यकशिपु **नृ**सिंहासीं, । जेंवी **म**दन **म**हेशासीं । तेंवी **भी**मासीं **मा**गध. ॥ ४९ ॥ मोहो माजला विवेकासीं, । क्रोध संघटे सात्विकासीं, । खळ बडबडी सर्वज्ञासीं । तेंवी **भी**मासीं **मा**गध. ॥ ५० ॥ प्रवर्तला महामारीं । पतंग जैसा [16]वैश्वानरीं । झगटे, तैसा मुष्टिप्रहारीं । रागें ताडी **भी**मातें. ॥ ५१ ॥ **भी**में रगडोनियां दाढा । मध्यभागीं [17]कैंषिला [18]गोंढा । माथां वाहोनियां [19]भवंडा । चक्राकार दाविला. ॥ ५२ ॥ तेथोनि टाकिला भूतळीं । लात वोपिली [20]वक्षस्थळीं । वज्रें ताडोनियां [21]मौळी । [22]**शं**क्र भंगी प-

---

१. घाबरून. २. कांसव. ३. डुकर. ४. भूमि. ५. अ० २३ श्लो० २९ पहा. ६. कार्तिक शुद्ध प्रतिपदेपासून त्रयोदशीपर्यंत तेरा दिवस मल्लयुद्ध होऊन चतुर्दशीच्या रात्रीं भीमानें जरासंधास मारिलें. (अ० २३ श्लो० २९-३०.) युद्धाचा आणि कार्तिकाचा आरंभ एकाच दिवशीं झाला. [मोरोपंत–सभापर्व–अ० १ गी० ११२.] ७. रात्र. ८. भीमातें. ९. सांधीव. १०. अन्य. ११. हत्ती. [द्वि (दोन) रद (दांत) ज्याला तो. हत्तीला दोन दांत असतात; हत्तीला 'अनेकप' आणि 'द्विप' असेंही नांव आहे.] १२. मोठ्या वृक्षासीं. १३. शंबराचा शत्रु मदन. शंबरासुराच्या वधाची कथा 'कृष्णविजय'–अध्याय ५५ (काव्यसंग्रह–पृष्ठें २९-३९) यांत आहे ती पहा. १४. रावण. १५. कात्यायनी, काली. १६. अग्नींत. १७. धरिला. १८. घट्ट. १९. फेरा. २०. उरावर. २१. मस्तक, शिखर. २२. इंद्र. [इंद्रानें वज्रप्रहारें अनेक पर्वतांचा चुराडा केला–अशी कथा आहे.]

र्वेता. ॥ ९३ ॥ तेंवी पाडोनियां उताणा । वामपादें दक्षिण चरणा । रगडोनि सव्य पाद जाणा । उभयहस्तीं कवळिला. ॥ ९४ ॥ आंसडोनि बळउद्धटें । मधें [1]उंधडिला तडतडाडें । [2]अशुद्धनदीचे खळखळाटे । रंगभूमिके लोटले. ॥ ९५ ॥ जडोनि मागुता उठिला झुंजा । देखोनि आश्चर्य [3]अर्जुनाग्रजा । पुढती धरोनि महाराजा । दुभागिलें हस्तकें. ॥ ९६ ॥ तिसऱ्यानें देहाकार घडिला, । भीम हांसोनि आवेशला, । पायीं कवळोनि वहिला । मस्तकावरी मागुता. ॥९७॥ [4]शतवार देऊनियां फेरे । भूमीं [5]त्राहाटिला अंगभारें । चिरोनि सांडिला द्विकरें । दोहींकडे दे[6]हुडीं. ॥९८॥ ते न लागती एक [7]ठांवा । मागध निःशेष मुकला जीवा । झाला भरंवसा [8]पांडवा । आणि माधवा पार्थासीं. ॥९९ ॥ कथा बोलती [9]ग्रंथांतरीं । संकेत दाविला मुरारीं । खर्जुरीपर्ण धरूनि करीं । मध्यभागीं चिरियेलें. ॥ १०० ॥ सव्य अपसव्य सांडितां करें । मग न जडतीच परस्परें, । परी हें व्यासऋषीश्वरें । कथिलें नाहीं भारतीं. ॥ १०१ ॥ भीमसेनें आपुले हस्तीं । करोनि शकलें टाकिलीं क्षिती । जरासंधा दिधली मुक्ती । कुंतीकुमरें यापरी. ॥ १०२ ॥ तेव्हां भीमें फोडिली हांक, । तेणें घाबरे तिन्ही लोक, । अंगनाअंगीं भरला धाक । गर्भस्राव ओसरला. ॥ १०३ ॥ म्हणती पृथ्वी दुभागिली, । कीं [11]ग्रहांचीं मंडळें खचलीं, । कीं मेरूचीं शिखरें कोसळलीं, । वज्रघात न लागतां. ॥ १०४ ॥ विमानीं गंधर्व करिती शब्द, । 'कृष्णें मारिला जरासंध, । नोहे प्रळय, हा आनंद । लोकत्रयीं माजवा.' ॥ १०५ ॥ जयजयकार करूनि सकळीं । उभयलोकीं पिटिली टाळी । देवीं वोपिल्या पुष्पांजळी । कृष्णभीमामस्तकीं. ॥ १०६ ॥ विजयी झाला भीमसेन । [12]आनंदकंदा आल्हाद पूर्ण । आवडी देऊनि आलिंगन । पाठी हातें थापटिली. ॥ १०७ ॥ म्हणे, 'भीमा ! माझे आर्त । तुवां पुरविले समस्त । निःशल्य झालों आज सुचित्त । सुखें वसों द्वारके.' ॥ १०८ ॥ भीम बोले विनयोत्तरें, । 'वायां वेडींव[13] घेइजे चतुरें, । शस्त्रासि वाखाणिजे शस्त्रधरें । धन्य तूं

१. चिरिला. २. रक्तनदीचे. ३. भीमास. ४. अध्याय २४ श्लोक ६ पहा. ५. आपटिला. ६. राजद्वारीं. ७. प्रेतास. ८. भीमास. ९. या ओंवीवरून व अशाच इतर उल्लेखांवरून मुक्तेश्वर हा मोठा ग्रंथपाठक होता असें दिसतें. 'महाभारतां'त काय आहे काय नाहीं हें नीटपणें पाहून तो ग्रंथरचना करीत असे. पण केवळ 'महाभारत' वाचून त्याची तृप्ति होत नसे असें म्हटलें पाहिजे. १०. अध्याय ३६ श्लोक ९-१० पहा. ११. सूर्यादिक ग्रहांची. १२. कृष्णाला. १३. अजाणपणा.

आज यशस्वी. ॥ ६९ ॥ [1]परीजेणें शस्त्रासि चाळिजे । यश गौरव त्यासीच साजे, । तुमच्या गुह्याचीं धन्य बीजें । आमुतें निमित्त करूनी. ॥ ७० ॥ स्मरणें जोडे मोक्षसदन । त्याचे दृष्टीपुढें मरण, । **ज**रासंधाचें भाग्य पूर्ण । **वि**ष्णुभुवनीं सुखवस्ती.' ॥ ७१ ॥ मरण पावला **मा**गधनाथ । राजद्वारीं पडिलें प्रेत, । प्रजा पाचारूनि समस्त । अभयदानें तोषवी. ॥ ७२ ॥ **स**हदेवातें आलिंगन । आवडी वोपी **य**दुनंदन, । म्हणे, 'तूं **प्र**ऱ्हादासमान । आप्त होसी मज मित्रा ! ॥ ७३ ॥ खेद सांडोनिया मना । राज्य चालवीं माझिये आज्ञा । तुझें अरिष्ट तें मी प्राज्ञा ! । परिहारीन तात्काळ.' ॥ ७४ ॥ प्रजा प्रधानाचिया हातीं । **मा**गधपुत्र निरविला प्रीती, । **स**हदेवें बहु [2]संपत्ती । **कृ**ष्णापायीं अर्पिली. ॥ ७५ ॥ उत्तरकार्याचा निरोप । देवोनि राहविला [3]**मा**गधनृप । राजसूययज्ञा सक्रुप । 'शीघ्र येईं' म्हणतसे. ॥ ७६ ॥ असो. **ज**रासंधाचा रथ । जो त्रैलोकीं विख्यातवंत । त्यावरी बैसोनि [4]रमाकांत । **ता**रकावरी मिरवला. ॥ ७७ ॥ पुढें **वृ**त्रासुराच्या हनना । **श्री**धरें वोपिला [5]**स**हस्रनयना । [6]**श**क्रें मित्रत्व मानोनि मना । **बृ**हद्रथातें दीधला. ॥ ७८ ॥ क्रमेंचि **ज**रासंधासी प्राप्त । तोचि [7]संजोगोनि दिव्यरथ । [8]**पां**डवांसीं श्री**कृ**ष्णनाथ । आरूढोनि चालिला. ॥ ७९ ॥ एकाऊन [9]एकशत । दानवराजे बलोन्मत्त । [10]ज्यांवरी बैसोनि निष्पात । **श**क्रें केला तयांचा. ॥ ८० ॥ तप्त [11]चामीकराची [12]प्रभा । किंकिणी ज्वाळा गाजवी नभा । सूर्यतेजाचे [13]दीप्तीची शोभा । गाळूनि जैसी निर्मल. ॥ ८१ ॥ इंद्रधनुष्यासारिखा ध्वज । दुरोनि दिसे तेजःपुंज । पताका फडकती जैसी वीज । वातें वारी अरीतें. ॥ ८२ ॥ स्मरण करितां मुख [14]सरोजीं । **ग**रुड येवोनि बैसला ध्वजीं । ज्याच्या पक्षांच्या सुतेजीं । [15]झांकोळती रविचंद्र. ॥ ८३ ॥ [16]उच्चैःश्रव्यातें दाविती मार्ग । चारी वारू अतिसवेग । सूर्य-

---

१. परजणें. २. अध्याय २४ श्लोक ४१-४२ पहा. ३. जारासंधि. ४. विष्णु. ५. इंद्राला. ६ इंद्रानें. ७. जोडून, सज्ज करून. ८. भीमार्जुनांसह. ९. नव्याण्णव दानव राजे (अ० २४ श्लोक १९).१०. ज्या रथावर.११.सुवर्णाची.१२.अध्याय २४श्लोक१७-२८ पहा.१३.कांतीची. १४. मुखकमलीं. १५. व्यापून जाती. झांकोळणें=आच्छादित होणें अथवा करणें.१६. इंद्राच्या अश्वातें. उच्चैःश्रवा हा चवदा रत्नांपैकीं एक होय. या चौदा रत्नांचीं नांवें पुढच्या श्लोकांत दिलीं आहेतः—'लक्ष्मीः कौस्तुभपारिजातकसुरा धन्वंतरिश्चंद्रमा गावः कामदुघाः सुरेश्वरगजो रंभादिदेवांगनाः । अश्वः सप्तमुखो विषं हरिधनुः शंखोऽमृतं चांबुधे रत्नानीह चतुर्दश प्रतिदिनं कुर्युः सदा मंगलम् ॥'.

रथातें म्हणती व्यंग । एक चक्र म्हणोनी. ॥८४॥ त्यावरी वळंघोनि[1] मुरारी । उभा ठाकला नगरद्वारीं । लोक गर्जती जयजयकारीं । ब्रह्मानंद ब्राह्मणा. ॥ ८५ ॥ तोडिलीं नृपांचीं बंधनें । ते घोलिती [3]लोटांगणें । पुष्पांजळी भरूनि रत्नें । कृष्णमाथां वोपिती. ॥ ८६ ॥ 'प्राणदात्या पुरुषोत्तमा ! । कांहीं सेवा सांगिजे आम्हां' । कृष्ण म्हणे, 'राया धर्मा । काज असे यज्ञाचें.॥८७॥ काय वाचा मनें धनें । तेथें समस्तीं साह्य होणें । हेंचि सांगणें मागणें । तुम्ही देणें हें एक'. ॥ ८८ ॥ ऐकोनि कृष्णमुखींची गोष्टी । राजे पातले धर्मभेटी, । म्हणती, 'रत्नें सुवर्ण कोटी । धर्मकार्या निवेदूं.[6]' ॥ ८९ ॥ सर्वही पातले इंद्रप्रस्था । परम आल्हाद कुंतीसुता, । विजयी झाला भीमभ्राता । कृष्णनाथप्रसादें. ॥ ९० ॥ नमस्कारोनि अधोक्षजा । सप्रेमभावें केली पूजा । आलिंगनें दिधलीं अनुजां । स्नेहभावें आवडी. ॥ ९१ ॥ बंधनमुक्त राजेश्वर । त्यातें आलिंगी युधिष्ठिर । तींहीं अर्पिले करभार । पर्वत कनकरत्नांचे. ॥ ९२ ॥ राजसूययज्ञा येणें । बोळविले आज्ञावचनें । स्वस्थळा पावोनि सन्मानें । राज्य करिती कृष्णाज्ञा. ॥ ९३ ॥ केशव विनवी धर्मराया, । 'तुझेनि धर्में मागध लया । पावला, आतां यज्ञकार्या । विघ्नकर्ता असेना. ॥ ९४ ॥ तुझे कुळदीपक हे दोन्ही । नेऊनि उजळिले मागधसदनीं । शत्रुतमांतें निरसूनी । सहदेवतंतु उजळीला. ॥ ९५ ॥ कृपापल्लवें झांकूनि पुढती । तुझे वोपिले तुझे हातीं । युद्धवाताचे आवर्तीं । संरक्षिले सुकृतें'. ॥ ९६ ॥ धर्म म्हणे, 'गा ! सर्वोत्तमा ! । कां भेदांगीं भुलविसी आम्हा ? । इंद्रियांसी रक्षी निजात्मा । तो आभार कवणातें ? ॥ ९७ ॥ करें श्रीमुख शृंगारिलें । अथवा चरणप्रक्षाळण केलें । तो उपकार मानूनि बोलें । कोण वाणी ऐक पां ? ॥ ९८ ॥ तुज अ-

---

१. चढून. २. अध्याय २४ श्लोक ३१-३५ पहा. ३. आडवें पडून चक्रासारखें लोटत जाणें. ४. 'हेंचि सांगणें आणि मागणें' असा अन्य पाठ. ५. अध्याय २४ श्लोक ३६-३७ पहा. ६. अर्पण करूं. निवेदणें=(१) सांगणें, निरूपण करणें; (२) देणें. ७. धर्मास. ८. अधोक्षज=विष्णु. याचा विग्रहार्थ असा:—(१) 'अधो न क्षीयते जातु यस्मात्तस्मादधोक्षजः', (२) 'द्यौरक्षं पृथ्वी चाधस्तयोर्यस्मादजायत । मध्ये वैराजरूपेण ततोऽधोक्षज इष्यते ॥', (३) 'अक्षात् इंद्रियाज्जायते इति अक्षजम्=प्रत्यक्षज्ञानम्, तदधरं ग्राहकत्वाभावात् हीनं यस्यः', (४) 'अधःकृतं अक्षजं=इंद्रियज्ञानं येन,' याप्रमाणें या शब्दाचे विग्रह आढळतात. ९. भीमार्जुनांस. १०. हें सुरेख 'रूपक' आहे. ११. कृपापदरें. १२. भोवऱ्यांत. आवर्त=पाण्याचा भोंवरा. 'स्यादावर्तोऽम्भसां भ्रमः' इत्यमरः

मृतसमुद्रा आंत । बुडोनि क्रीडती आनंदभरित । त्यांसी जन्ममृत्यूचा वात । कैंचा स्पर्शे सांग पां?' ॥ ९९ ॥ असो हें. श्रीकृष्ण बोले पुढती, । 'धर्मराजा! विवेकमूर्ती! । बंधु पाठवीं दिशांप्रती । 'पृथ्वीजया[1]' कारणें. ॥ १०० ॥ धराकामधेनूचे[2] स्तन । चहूं दिशांचे भूपाळ जाण । त्यांचें करूनियां दोहन । करभाररूपें गोरस[3] ॥ १०१ ॥ आणूनि कीजे यज्ञारंभ । येथें न करावा विलंब । देवकीदर्शनाचा लाभ । मीही घेऊनि येतसें.' ॥ १०२ ॥ 'अवश्य' म्हणूनि चौघे वीरीं । सवेग ठोकिल्या प्रस्थानभेरी । निघते झाले सहपरिवारीं । देश द्वीपें जिंकावया. ॥ १०३ ॥ जिंकोनि पृथ्वीचे नृपवर । आणोनि कनकाचे गिरिवर । तेणें द्रव्यें ऋषेश्वर । महायोगी गौरवूं. ॥ १०४ ॥ शृंगारूनि मागधरथ । द्वारके चालिला द्वारकानाथ । धर्मापाशीं ठेविलें चित्त । अर्थ जैसा लोभियां. ॥ १०५ ॥ कुंतीसी करूनि नमस्कार । नमिला धौम्य[4] ऋषेश्वर । सन्मानिला युधिष्ठिर । वृकोदरपार्थासी ॥ १०६ ॥ पुसिलें नकुळसहदेवातें । द्रौपदी भगिनी सुभद्रेतें । नमन करितां गोपीनाथें । प्रेमानंद समस्तां. ॥ १०७ ॥ नगरद्वारा पातल्या कृष्णा। पांडवीं केली प्रदक्षिणा । नमस्कारूनियां चरणा। मग माघारें परतले॥१०८॥ द्वारके गेलिया कृष्णनाथ । पुढें वर्तला जो वृत्तांत । जन्मेजयाप्रती सांगत । वैशंपायन तें ऐका ॥ १०९ ॥ व्यासभारतकथेचा अर्थ । सांगतां वांकडें जाईल जेथ । सज्जनीं लावोनियां हात । नीट केलें पाहिजे ॥ ११० ॥ जें कां आपुलें हो नव्हे । तेंचि दूषण स्वभावें । आपुलें झालें तें झांकावें । लाज उघडें देखतां. ॥ १११ ॥ इति श्रीसभापर्व भारत । 'जरासंधवध' समाप्त[5]। पुढां परिसोत श्रोते संत । मुक्तेश्वर कवि वदे. ॥ ११२ ॥

---

## अध्याय आठवा.

अक्षय भाते गांडीवें[6] रथ । सभा लाधली मयनिर्मित । वरी कृष्णाचा पक्षपात । तेणें पार्थ उल्हासे ॥ १ ॥ विशेष मागधा ऐसा वैरी । निमाला निःशल्य झाले उदरीं । आणीक आतां पृथ्वीवरी । समर्थ आम्हां असेना.॥२॥

---

१. दिग्विजयासाठीं. २. पृथ्वीरूप कामधेनूचे. हें रूपक फार मनोहर आहे. ३. दूध. ४. अ० २४ श्लो० ५३-५५ पहा. ५. येथें 'जरासंधवध पर्व' संपून 'दिग्विजय पर्वा'ला आरंभ होतो. ६. अध्याय २५ श्लोक १ पहा.

भूप वृक्षस्वरूप जाळें । झाडुनियां करभार दिव्य फळें । आणोनि भुकेलीं [1]ब्रह्मांडकुळें । तृप्त यागीं करावीं. ॥ ३ ॥ ऐसा हृदयांतील भावो । जाणोनि आज्ञापी **धर्म**रावो । म्हणे, 'जें बोलिला **कृ**ष्णदेवो । तें चौघेही [2]अनुष्ठा. ॥४॥ पूर्व उत्तर आणि पश्चिमे । चौथी जे कां पाळिली [3]**ध**र्में । त्यांप्रती चौघे अनुक्रमें । शीघ्र गेले पाहिजे.' ॥ ५ ॥ अग्रज आज्ञेच्या उल्हासें । **अर्जुन** चालिला [4]उत्तरदिशे । जी पाळिली [5]**ध**नाधीशें । [6]किन्नरेशें **कु**बेरें. ॥ ६ ॥ सवें वीरसेना प्रबळ । जैसे प्रळयाग्नीचे ज्वाळ । कीं प्रतापसिंधूचे कल्लोळ । उत्साहवातें उसळती. ॥ ७ ॥ श्री**कृ**ष्णाज्ञेच्या वरदोत्तरें । **फा**ल्गुन येतसे उत्तरे । तेज रायाचें वोसरे । ऊत उतरे बळाचा. ॥ ८ ॥ कोणी टाकिती युद्धकदना । कोणी शरण येती चरणा । करभार वोपोनि **कु**रुनंदना । समागमें चालती. ॥ ९ ॥ **कु**लिंद **आ**नर्त **का**लकूट । **सु**मंडल करूनियां अवजित । **शा**कलद्वीपाचा नृपनाथ । **प्र**तिविंध्यनामा जिंकिला. ॥ १० ॥ सप्तद्वीपींचा राजसमूहो । **पां**डवासीं करावया कलहो । **शा**कलद्वीपा पातला पहा हो! । तो **अर्जु**नें त्रासिला. ॥ ११ ॥ बाणीं विध्वंसिलें सैन्य । [9]धुरा मारितां पातले शरण । कोटीच्या कोटी रत्नधन । अर्पूनि पायां लागती. ॥ १२ ॥ सवें घेऊनि त्यांचा भार । **प्रा**ग्ज्योतिषं[10] नामें नगर । जेथें **भ**गदत्त नामें राजेश्वर । तेंही स्थान वेढिलें. ॥ १३ ॥ तीन[11] दिवस करितां युद्ध । सेनेसहित पावला खेद । मग [12]म्हणे, 'तूं परम सुहृद । आप्त होसी **अर्जु**ना! ॥ १४ ॥ **इं**द्र माझा परम मित्र[13], । त्याचा वीर्यज तूं सुपुत्र । मित्रपुत्रा प्रीतिपात्र । मातें

१. हें सुंदर रूपक आहे. २. करा. ३. यमधर्में. ४. अर्जुन उत्तरेला, भीमसेन प्राचीला, सहदेव दक्षिणेला आणि नकुल प्रतीचीला असें चौघे चार दिशांला गेले [अ० २५ श्लोक ९-१० मोरोपंत सभापर्व अ० २ गी० १.] ५. अ० २५ श्लो० ४ पहा. कुबेर हा उत्तर दिशेचा स्वामी. हे दिक्पाल आठ आहेत. [इंद्रो वन्हिः पितृपतिर्नैर्ऋतो वरुणो मरुत् । कुबेर ईशः पतयः पूर्वादीनां दिशां क्रमात् ॥ १ इंद्र (पूर्वेचा), २ वन्हि (आग्नेयीचा), ३ यम (दक्षिणेचा), ४ निर्ऋति (नैर्ऋतीचा), ५ वरुण (पश्चिमेचा), ६ वायु (वायवीचा), ७ कुबेर (उत्तरेचा), ८ ईश (ऐशान्यीचा.)] ६. किन्नर+ईशें=यक्ष+अधिपें. ७. अ० २६ श्लो० ४ पहा. ८. अर्जुनासीं. ९. सैन्याचा अग्रभाग. १०. अ० २६ श्लो० ७ पहा. ११. भगदत्ताचें अर्जुनासह आठ दिवस युद्ध झालें असें मूळांत आहे (श्लो० १०.) १२. हें भाषण मूळांतील ११-१३ श्लोकांत आहे. (अ० २६.) १३. 'आप्तमित्र' असाही पाठ आहे.

होसी निर्धारें.’ ॥ १५ ॥ वाजी वारण उष्ट्र यानीं । [1]रत्नमांदुसा सहस्रश्रेणी । वोपोनि बोळवी सन्मानीं । **पा**र्थ निघे [2]पुढारां. ॥ १६ ॥ **अं**तर्गिरी **ब**हिर्गिरी । बळें जिंकिला [3]उपगिरी । करभार लाधले जैसे गिरी । रत्नें आणी कनकाचे. ॥ १७ ॥ कुळपर्वतनिवासी राजे बहुत । युद्धीं झाले हताहत । [4]त्यांहीं भेटी वोपिल्या बहुत । [5]पद्मराग शतकोटी. ॥ १८ ॥ **से**[6]नाबिंदु महारथ । **वा**मदेव धरित्रीनाथ । **सु**नामा [7]**सु**वर्चा पाळित । दे[8]शपंचक जिंकिलें. ॥ १९ ॥ **वि**श्वगश्व **पौ**रव नृपती । पर्वतजातीय तस्करजाती । **उ**त्सव**सं**केत राजे क्षिती । दश सप्तक जिंकिले. ॥ २० ॥ [9]**का**श्मीरराजे जिंकोनि बळें । **लो**हितादी दश [10]मंडळें । **त्रि**गर्त **को**कनद विशाळें । **अ**भिसारी नगरी शोधिली. ॥ २१ ॥ वश्य करोनि **उ**त्तरवासी । [11]वज्र वैडूर्य रत्नरासी । सुवर्णनिष्क पर्वतेसी । तुळती तैसे घेतसे. ॥ २२ ॥ **सिं**[12]हपुरीचा **चि**त्रायुध । **ची**नाचा **सु**दामा प्रसिद्ध । **बा**ल्हीकसह **भो**ज वरद । **प**रमकांबोज जिंकिले. ॥ २३ ॥ [13]**ता**रकामय ऐसा परम । **ऋ**षिकें केला घोर संग्राम, । शेखीं पावोनियां श्रम । ‘भृत्य’ म्हणे ‘मी **पा**र्थाचा.’ ॥२४॥ शुकोदरासारिखीं वर्णें । आठ शतें अश्वरत्नें । मयूरवर्णीं सुलक्षणें । **ऋ**षिकें **पा**र्था दीधलीं. ॥ २५ ॥ सुवर्णनिष्क सहस्र कोटी । पुढां वोपिले पादभेटी । पांच कोटी पेरोज[14]वृष्टी । मेघप्राय वर्षला. ॥ २६ ॥ **हि**मवंत **श्वे**तपर्वत । वोलांडूनि विजयी **पा**र्थ । **किं**पुरुषदेशीं **द्रु**मसुत । राजा युद्धीं जिंकिला. ॥ २७ ॥ तेणें करभार बहुवस । देऊनि पूजिला **पां**डवेश । पुढें [15]**हा**टक नामक देश । जो गुह्यकीं रक्षिला. ॥ २८ ॥ तेणें वंदूनियां चरण । देता झाला बहु सुवर्ण । **गो**रक्षकपर्वतानिकट जाण । जो कांचन प्रसवत. ॥ २९ ॥ पुढें [16]**मा**नस सरोवर । समुद्रप्राय देखिलें थोर । अमृतातुल्य तोय[17] मधुर । **श**रयूपाट जेथींचा. ॥३०॥ भोंवत्या रत्नसुवर्ण खाणी । प्रवालवल्ली उतरल्या [18]जीवनीं ।

---

१. रत्नांच्या पेट्या. २. भगदत्ताला जिंकून अर्जुन पुढें गेला. ३. अ०२७ श्लो०३ पहा. ४. ‘तेणें ओपिले पद्मराग शत । असंख्यात शतकोटी ॥’ असाही पाठ आहे. ५. माणिकें. ६. सेनाबिंदुराजाकडे येण्यापूर्वीं अर्जुनानें उलूकपर्वतवासी बृहंत नामक राजाचा पराभव केला. (अ० २७ श्लो ५-१०.) ७. हें नांव मूळ ग्रंथांत नाहीं. ८. पंचगण नामक देश जिंकले. [श्लो० १२.] ९. काश्मीर वीर (श्लो० १७.) १०. मंडल=क्षुद्रराज्य. (श्लो० १७ टीका.) ११. हिरे. १२. अ० २७ श्लो० २० पहा. १३. देवदानवांचा तारेसंबंधानें झालेला सुप्रसिद्ध संग्राम. तारा=तारका=बृहस्पतिभार्या तारका (तारा) हीच आहे. आमय (रोग, विनाशहेतु) ज्या संग्रामांत (युद्धांत) तो तारकामय संग्राम. [सभापर्व–अ० २४ श्लो० १७.] १४. रत्नवृष्टि. १५. अ०२८ श्लो० ३ पहा. १६. अ० २८ श्लो० ४-५ पहा. १७. उदक. १८. उदकांत.

कर्पूरकर्दळीच्या काननीं । कस्तूरीमृग खेळती. ॥ ३१ ॥ जळीं मुक्ताफळांचे घोंस । सुवर्णकमळीं दिव्य सुवास । स्वेच्छानंदें [1]राजहंस । हंसिणीयुक्त क्रीडती. ॥ ३२ ॥ कोणी नेदिताचि सहजे । आवडे तें तेणें घेइजे । सुवर्ण रत्नें हेमांबुजें । प्रवाळ मुक्तें इत्यादि. ॥ ३३ ॥ पुढें गंधर्वी [2]रक्षिला । तो **गंधर्वदेश** बळें दमिला । त्यांहीं **पार्थ** सन्मानिला । तोषविला करभारें. ॥ ३४ ॥ **ति**-[3]त्तिरि [3]**क**ल्माष वारू सबळ । वायुवेगी महा चपळ । मं[4]डूकाख्य अतिविशाळ । दहा सहस्र दी[5]धले. ॥ ३५ ॥ सुवर्णरौप्याचे पर्वतीं । **पार्थ** पूजिला परमभक्तीं । रत्नें वोपिलीं जीं रातीं । दिसती जैशीं नक्षत्रें. ॥ ३६ ॥ तेथूनि विशेष देश चतुर । उत्तरे **ह**रिवर्ष गंधर्वपुर । टाकिलें तेथें नगरद्वार । गगनातुल्य देखिलें. ॥ ३७ ॥ [6]महाकाय महाविशाळ । उंचिवे जैसा प्रचंड [7]ताळ । द्वारीं असंख्य द्वारपाळ । सुवर्णदंड त्यांहस्तीं. ॥ ३८ ॥ पवन पातल्या पुढारां । लोटोनि घाली माघारां । पुढें देखोनि धनुर्धरा । हास्य करिती विनोदें ॥ ३९ ॥ म्हणती, '**पा**र्था ! कवण हाव । नव्हे मानवां येतां ठाव । जोडिल्या यशाचें वैभव । विशेष मानुनी फिरावें. ॥ ४० ॥ पुढती हांव धरिसी पोटीं । तरी पुढें पाहों न [8]शके दृष्टी । आणि विघ्नकर्तेंही संकटीं । आलियांतें घालिती. ॥ ४१ ॥ [9]वानर पक्षी पर्वताकार । योजनप्रमाण असती विखार । नागिया भेदिती गिरिवर । ऐसे वृश्चिक ते ठायीं. ॥ ४२ ॥ **विष्णुमित्र वा**-सवपुत्र । म्हणोनि देखिलें हें क्षेत्र । आतां आमुचा आज्ञामंत्र । मानूनि मागें फिरावें. ॥ ४३ ॥ येथवरी आलास पुरुषार्थें । हें आश्चर्य बहुत आमुतें । सांग काय इच्छिजे चित्तें । तेंचि पुरवूं पवित्रा !' ॥ ४४ ॥ हांसूनि बोलिजे **सु**भद्रारमणें, । 'बोलसी तितुकीं स्नेहाळवचनें । ज्या लागीं येथवरी झालें येणें । त्या श्रमातें परिहारीं. ॥ ४५ ॥ **धर्में** मांडिलासे याग । तो सिद्धी पावला पाहिजे सांग । अपूर्णसामग्रीची शीग । तुम्ही संपूर्ण करावी.' ॥ ४६ ॥ हें ऐकोनि संतुष्टमनें । दिव्य रत्नें दि[10]व्यांभरणें । दिव्य वस्त्रें दिव्यास्तरणें ।

---

१. मानससरोवरीं राहणाऱ्या हंसास राजहंस म्हणतात. याचे पाय व चोंच तांबडी असून बाकी शरीर पांढरें असतें. 'राजहंसास्तु ते चंचूचरणैर्लोहितैः सिताः'. २. अध्याय २८ श्लोक ५ पहा. ३. हीं घोड्याची नांवें. ४. मंडूक आहे आख्या (नाम) ज्याची असे हयोत्तम (उत्तम अश्व) [श्लो० ६]. ५. गंधर्वनगरानें मंडूक नांवाचे घोडे दिले. ६. अध्याय २८ श्लोक ८ पहा. ७. ताडवृक्ष. ८. मानवांची दृष्टि. ९. हें वर्णन मूळांत नाहीं. (श्लोक ९–१३). १०. अध्याय २९ श्लोक १६ पहा.

क्षौमाजिनें[1] अपार. ॥४७॥ अश्व गज दिव्य रथा। सवें देऊनि गंधर्वसुता[2] । पावतें केलें **इं**द्रप्रस्था । **ध**र्मराजयज्ञार्थ. ॥ ४८ ॥ एवं उत्तरदिशा **पार्थ** । जिंकोनि प्रवेशला **खां**डवप्रस्थ । आणिलें तें संख्येरहित । **ध**र्मापायीं अर्पिलें. ॥ ४९ ॥ एक दिशेंत चारी दिशा । निर्धूत शोधिल्या नरेशा । संपत्ती आणूनि बहुवसा । निवेदिल्यौं[3] **ध**र्मातें. ॥ ५० ॥ धन न सांठे भांडारकोशीं । म्हणोनि नगरबाह्यप्रदेशीं । पर्वत पडले अष्टां दिशीं । रत्नाचे आणि धनाचे[4]. ॥ ५१ ॥आधीं वंदूनि राजा **ध**र्म । पूर्व दिशे चालिला **भी**म[5] । त्याचा विजयी पराक्रम । स्वधर्मशीळ परिस तूं. ॥५२॥ अंतरीं चित्तशुद्धीचें बळ । बाह्य शमदमाचे मेळ । तैसे घेऊनि सबळ दळ । बळसमुद्र निघाला. ॥ ५३ ॥ आले देखोनि[6] **पं**चाळपुरा[7] । **द्रु**पद धांवला सामोरा । कौतुकें भेटोनि जामातवीरां[8] । पूजा अपार अर्पिली. ॥ ५४ ॥ **गं**डकी वोलांडूनि अनयासी । **वि**देह भेटला करभारेंसी । **द**शार्णव राजा गर्वराशी । **सु**धर्मा जो प्रसिद्ध. ॥ ५५ ॥ तो बाहुयुद्धें पीडोनि रणीं[9] । जिंकोनियां[10] सेना[11]श्रेणी। अश्वरथीं महाकिरणीं[12] । **रो**चमान[13] त्रासिला. ॥ ५६ ॥ विभांडोनि **पु**लिंदनगर । वश्य केला **सु**कुमार[14] वीर । [15]मित्र जिंकोनि **वृ**कोदर । **चै**द्यदेशीं पातला. ॥ ५७ ॥ सन्मुख येऊनि दळभारें । **शि**शुपाळ भेटला अत्यादरें । तेरा दिवसें[16] मित्रोपचारें । **भी**म तेथें राहविला. ॥ ५८ ॥ रत्नें वस्त्रें सुवर्णभार । उष्ट्र वाजी रथ **कुं**जर । देऊनि पूजिला **कुं**तीकुमर । म्हणे, ‘हें कार्य आमुचें.’ ॥ ५९ ॥ **को**सलराजा **बृ**हद्बल । **दी**र्घयज्ञ **अ**योध्यापाळ । **गो**पाळकक्ष शोधूनि सकळ । बलुव राजे जिंकिले. ॥ ६० ॥ **हि**मवंतपार्श्वीं देश बहुत । **म**लट शुक्तिमंत पर्वत । **का**शिराजा **सु**बृहद्रथ । महायुद्धीं जिंकिला. ॥ ६१ ॥ **मा**लव **ग**य पशुभूमिक । महीधर सोमप्रिय अटक । वत्सभूमीचे नरनायक । राजे सर्व जिंकिले. ॥ ६२ ॥ **भ**गाधिपती **नि**षधाधिप । **भो**ग **म**णिमंत **द**क्षिणें[16]भूप । करभार घेऊनि अ-

---

१. क्षुमा=अतसी. अतसीतंतुनिर्मित वस्त्र=क्षौम; अजिन=मृगचर्म. २. या हरिवर्षप्रदेशाच्या वर्णनांतील कांहीं भाग मुक्तेश्वराच्या पदरचा दिसतो. ३. दिल्या. ४. येथें अर्जुनोत्तरदिग्विजयाचें वर्णन संपलें. ५. अध्याय २९ पहा. धर्माची आज्ञा घेऊन भीम प्राची दिशेला गेला. ६. ‘ऐकूनि’ ‘असाही पाठ आहे. ७. अध्याय २९ श्लो० ३ पहा. ८. ‘जामातवरा’ असाही पाठ आहे. ९. ‘क्षिती’ असाही पाठ आहे. १०. भीमानें सुधर्मा राजास जिंकून त्याला आपला अधिसेनापति केलें असें वर्णन मूळांत आहे. (श्लो० ६). ११. ‘सेनापती’ असाही पाठ आहे. १२. ‘महारथीं’ असाही पाठ आहे.१३. रोचमान हा अश्वमेध नामक नगराचा राजा. १४. राजाचें नांव. १५. अध्याय २९ श्लोक १६पहा. १६. अध्याय ३० श्लोक ११-१२ पहा.

मूप । दास करूनि स्थापिले. ॥ ६३ ॥ शर्मक वर्मक वैदेहक जनक । इं-
द्रपर्वतीं बहु नायक । किरातरायांचें [1]सप्तक । उभे ठेले करभारें. ॥ ६४ ॥
सुह्मप्रांच सुह्म सपक्ष । मागध दंडधार मुख्य । गिरिव्रजासि येतां दक्ष । जा-
रासंधि भेटला. ॥ ६५ ॥ तेणें आप्तवादें थोर । अपार वोपिले करभार ।
त्यांतें घेऊनि वृकोदर । कर्णदेशा पावला. ॥ ६६ ॥ तो कर्णनामा जिंकोनि
युद्धीं । अपार घेतली धनसमृद्धी । पर्वतवासीय लक्षावधी । पर्वत देती द्रव्याचे.
॥ ६७ ॥ मोदागिरी पांडवराजा । कौशिकीकच्छनिलय [3]अमितौजा ।
[4]वासुदेव जिंकोनि पैजा । वश्य केला वेगेंसी. ॥ ६८ ॥ समुद्रसेन चंद्रसेन ।
ताम्रालिकर्वटाधिपति गहन । वंगराजातें पराभवून । तृतीय सुह्म त्रासिला.
॥ ६९ ॥ समुद्रवासीय म्लेंच्छजाती । नामें सांगतां नेणों किती । तितके ये-
ऊनि बद्धहस्ती । वोळंगती करभारें. ॥ ७० ॥ अनेक रंगाची [5]लेलामें । मा-
णीकजाती उत्तमोत्तमें । कांचन रत्नें नीळ विद्रुमें । शतकोटी संख्या लाधली
॥ ७१ ॥ गजवेलीचीं लोहशस्त्रें । कनक मोलातुल्य विचित्रें । सुवर्णभार वि-
कती वस्त्रें । ऐसीं अपार बहुयानीं ॥ ७२ ॥ जवादीकस्तूरी कृष्णागर । चंदन
पो[6]तांस नागकेशर । तैलनाम मुख्य अपार । सुगंधद्रव्यें अनेक. ॥ ७३ ॥
घेऊनि पातला इंद्रप्रस्था । नमस्कारोनी धरित्रीनाथा । [8]बळीनें वोपिलें श्री-
कांता । तेंवी सर्वस्व अर्पिलें. ॥ ७४ ॥ न शिवोनि वंचकतेचा भाव । अनु-
च्छिष्टद्रव्यें पूजी देव । तेंवी पवित्र भीमराव । धनें अर्पी [9]धर्मातें ॥ ७५ ॥
आतां दक्षिणेप्रती दक्षिणा । ध्यावया माद्रीच्या नंदनां । प्रेरिलें त्या निरूपणा।
कुरुभूषणा! अवधारीं. ॥ ७६ ॥ रूपवंत लेइला लेणें । तेणें सौंदर्य दाखवी
[11]दुणें । तेंवी सहदेव सहसैन्यें । दक्षिणा [12]पर्णू चालिला. ॥ ७७ ॥ शूरसेन

---

१. श्लोक १५ पहा. २. सहदेव. (श्लोक १८).३. मोठा तेजस्वी, महापराक्रमी. ४.पुंड्रा-धिप. ५. भूषणें. ६. सुगंधिद्रव्यविशेष. ७. भीमसेनी कापूर. ८. बळि नामक दैत्यानें विश्वजित् नांवाचा यज्ञ करून इंद्रपद घेतलें. (भागवत, स्कंध ८, अ० १५.) तें पुनः त्यास द्यावें या हेतूनें विष्णूनें वामनाचा अवतार घेऊन त्यापाशीं तीन पावलें (त्रिविक्रम) जमीन मागितली. त्यानें देतों असें म्हणून उदक सोडल्यावर वामनानें विराट्स्वरूप धारण करून, दोन पावलांतच मृत्युलोक आणि स्वर्गलोक व्यापून तिसरें पाऊल बळीच्या मस्तकावर ठेवून त्यास पाताळीं घातलें, अशी कथा आहे. बळी हा मोठा दानशूर होता व त्यानें आपलें सर्वस्व विप्रबटूला दिलें या कथाभागास अनुलक्षून हें वर्णन आहे. ९. येथें भीमदिग्विजयवर्णन संपतें. १०. सहदेवाला. ११. दुप्पट. १२. 'जिंकूं' असा अन्य पाठ आहे. पर्णू=परिणाया. [परिणय=विवाह.]

जिंकोनि आधीं । दंतवक्र दंडिला युद्धीं । करभार घेऊनि स्वपदीं । भृत्य करूनि स्थापिला. ॥ ७८ ॥ मत्स्यपुरीं मत्स्याधिराज । सुकुमार पवित्र कुंतिभोज । निषाद करूनियां निस्तेज । धनें रत्नें घेतलीं. ॥ ७९ ॥ पटच्चर जिंकोनि दुर्धर । श्रेणिमंत नरवर । विनीत होवोनि करभार । कोटीच्या कोटी दीधले. ॥ ८० ॥ तेथोनि चर्मण्वतीच्या तटीं । जंभपुत्रें रत्नें गोमटीं । वोपिलीं अपार मनसंतुष्टीं । माद्रीपुत्रा मस्तकीं. ॥ ८१ ॥ पुढां टाकिलें नर्मदातीर । विंदानुविंद अवंती नगर । अर्पिती कनकाचे संभार । आणिक कोटी रत्नाच्या. ॥ ८२ ॥ भोजकटीं दोन दिवस । रुक्मिया झुंजला बहुवस । यावरी होवोनियां दास । पूजा अपार अर्पिली. ॥ ८३ ॥ दक्षिणकोशल कान्तारक । हेरंबक नाटकेय नाटविक । मारुध रम्यग्राम नीचक । वाताधिप पुलिंद. ॥ ८४ ॥ जिंकोनि किष्किंधा वेढिली । मैंदं द्विविदं गोलांगुलीं । सप्तदिवस क्लेशकालीं । युद्ध केलें अपार. ॥ ८५ ॥ यावरी भेटोनि सन्मानें । वाळीभांडारिचीं रत्नें । आर्पिलीं ज्यांसीं तुळितां उणें । शुक्र आणी सुरगुरु. ॥ ८६ ॥ पुढां माहिष्मती पुरीं । नील राजा राज्य करी, । जो कां शक्राचिये सरी । वन्ही जामात जयाचा ॥ ८७ ॥ नकळत प्रवेशला मंडळ । तंव क्षोभला प्रलयानळ । जाळूं लागला पांडवदळ । वेष्टूनियां चौफेरीं. ॥ ८८ ॥ अश्वरथगजसंघाट । ज्वाळाचक्रीं कोंडूनि वाट । भक्षूं लागला हव्यवाट । धडधडाटें क्षोभला. ॥ ८९ ॥ संकटीं पडिला पांडुकुमर । म्हणे, 'मांडिला अद्भुत संहार । दूरि ठेला यादवेश्वर । आणि अर्जुन बळगाढा.' ॥ ९० ॥ न झुंजतां राजभार । झुंजों लागला वैश्वानर । यातें वारिता प्रकार । नकुळानुजा स्मरेना. ॥ ९१ ॥ वैशंपायना पुसे राजा, । 'वन्ही क्षोभला कवणे काजा ? । धर्में मांडिली यज्ञपूजा । हें कां पावक नेणेची ?' ॥ ९२ ॥ व्यासशिष्य म्हणे, 'नृपती ! । श्रीमंत नगरी माहिष्मती । तेथें चहूं वर्णींच्या युवती । जारकर्मी विमुक्ता.' ॥ ९३ ॥

---

१. अध्याय ३१ श्लोक ३ पाहा. २. नामविशेष. ३. 'कुळीं' असाही पाठ आहे. ४. 'जृंभक मेकळ परमेकळी (?)' असाही पाठ आहे. ५. 'वोपिल्या अपार रत्नांजुळी' असा अन्य पाठ आहे. ६. अध्याय ३१ लोक ११ पहा. ७. वानरराजा. (अध्याय ३१ श्लो० १८). ८. वानरांनीं. ९. देश. १०. प्रलयकाळचा अग्नि. ११. समूह. १२. अग्नी. १३. अग्नि. १४. पारीक्षित, जनमेजय.

होम करितां राजा नीळ । बहुतीं फुंकितां नोव्हे ज्वाळ । हें देखोनि गुणवेल्हाळ । कन्या[1] आली जवळीके. ॥ ९४ ॥ ते आपुल्या लावण्यपुष्टी । शचीसौंदर्य पायीं लोटी । रंभा उर्वशीच्या[2] गोष्टी । पैं आरौत्या[3] अपाडे ॥ ९५ ॥ रातोत्पलाहूनि[4] कोमळ । अधरीं[5] फांके दिव्य परिमळ । तेणें मुखीं फुंकितां अनळ । पंचबाणें[6] ताडिला. ॥ ९६ ॥ म्हणे, 'ईचा वदनानिळ[7] । कृत्रिमकुंडीं[8] उठवी ज्वाळ । बळें डंवचूनि[9] मन्मथव्याल[10] । हृदयवर्मीं लाविला. ॥ ९७ ॥ सुकुमार सुंदर अधर दोन्हीं । चुंबन कीजे उभय वदनीं । आलिंगनास ते पाणी[11] । उल्हासती पैं माझे.' ॥ ९८ ॥ विरहें तापला वन्हिनाथ । ब्राह्मणवेषें पातला त्वरित, । नीळाप्रती प्रेरूनि हात । कन्यादान मागतसे ॥९९॥ राजा अनुमानी[12] अळुमाळ । तंव देहीं धडकला महाज्वाळ । भय पावोनि नीळनृपाळ । म्हणे 'अवश्य' ब्राह्मणा. ॥ १०० ॥ तेवेळीं पाणिग्रहणविधी[13] । कुमारी वोपिली[14] जातवेदीं[15] । संतोषोनि सर्व समृद्धी । देवमुखा[16] दीधल्या ॥ १०१ ॥

---

१. नीलराजाची कन्या. २. उर्वशी—नरनारायण मुनींच्या ऊरुसमीपस्थ भागांपासून (मांड्यांपासून) उत्पन्न झाली म्हणून या स्वर्वेश्येस 'उर्वशी' असें नांव इंद्रानें ठेविलें. हिची कथा पुराणांत वर्णिली आहे ती:—बदरिकाश्रमीं राहून तप करणाऱ्या नरनारायणांचें इंद्रास भय पडलें. तेव्हां त्यांस विघ्न करण्यासाठीं इंद्रानें वसंत, काम आणि देवांगना यांस नित्याप्रमाणें पाठविलें. इंद्राच्या आज्ञेप्रमाणें अप्सरांनीं त्या ऋषींला भुलवून टाकण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु ते काष्ठलोष्ठाप्रमाणें अगदीं निर्विकार होते. याप्रमाणें त्या सर्वांचे प्रयत्न निष्फळ झाले. तेथील स्त्रियांचें लावण्य पाहून काम आणि अप्सरा यांस लाज वाटली. तेव्हां त्यांनीं परत स्वर्गास जाण्याचा बेत केला. हें जाणून नरनारायणांनीं 'इंद्रासाठीं आश्रमांतील स्त्रियांपैकीं एकीस घेऊन जा,' असें सुचविलें. तेव्हां त्यांनीं ऊरुसमीपस्थ स्त्री पाहिजे अशी इच्छा दर्शविली, ती नरनारायणांनीं आपल्या तपःप्रभावानें पूर्ण करून उर्वशीला त्यांजबरोबर पाठविलें. (भागवत स्कंध ११ अध्याय ४ पहा.) ३. अलीकडे. ४. ताम्रकमलाहून. ५. ओष्ठीं. ६. कामानें. मदनाचे बाण पांच आहेत:—['अरविंदमशोकं च चूतं च नवमल्लिका । नीलोत्पलं च पंचैते पंचबाणस्य सायकाः ॥' अथवा 'उन्मादनस्तापनश्च शोषणः स्तंभनस्तथा । संमोहनश्च कामस्य पंचबाणाः प्रकीर्तिताः ॥'] ७. वदन+अनिल=मुखसंबंधीं वायु; फुंकर. ८. 'मनोत्कुंडीं पेटवी ज्वाळ' असाही पाठ आहे. ९. दंशून. १०. मदनसर्प. ११. हस्त. १२. विचारी. १३. विवाहसंस्कारें. १४. अ० ३१ श्लो० ३०-३८ पहा. १५. अग्नीला. [जाते जाते विद्यते इति जातवेदाः तस्मिन् असूनसप्तपर्णादिव वीप्सासमासेनेव प्रतीताः । जातं वेदाः अस्मादिति वा । इति हेमाद्रिः ॥ रघुवंश—सर्ग १२ श्लो० १०४ पहा.] १६. अग्नीला. अग्नि हा देवांचें मुख आहे असें वर्णन प्राचीन ग्रंथांत आढळतें. (श्लो० ४१ पहा.)

स्वमुखें वदे वरद, 'राया! । जारकर्मीं वर्ततां जाया । दोष आतळों नेदी यया । तुझे नगरीं निर्धारें ॥ १०२ ॥ व्यभिचार करितां निर्दोष[1] । पावती पवित्रतेचें यश । मरणानंतरें स्वर्गवास । वरें माझिया भोगिती.' ॥ १०३ ॥ हा आचार अद्यापवरी । केरळ मल्याळ सिंधुपारीं । दक्षिणदेशीं सर्वनारी । स्वेच्छाचारें वर्तती. ॥ १०४ ॥ येथें येतां पारिखें दळ । जाळोनि सांडीन तात्काळ' । ऐसें बोलोनि देव अनळ । आश्वासी नीळातें. ॥ १०५ ॥ रायें लागोनियां पायीं । करूनि ठेविला घरजांवाई । यालागीं प्रवर्तला अपायीं । सहदेवासी ते काळीं. ॥ १०६ ॥ असो, तेवेळीं पांडवेश्वर । सांडोनि आसन रहंवर[2] । अवलोकोनी वैश्वानर । नमस्कार घातला. ॥ १०७ ॥ प्रक्षाळुनी हस्तचरणा । शुचिर्भूत करूनि मना । हृदयपद्मीं कल्पूनि ध्याना । अग्निस्तवन[3] मांडिलें. ॥ १०८ ॥ म्हणे, 'जयजयाजी! चित्रभानु[4]! । सुरेशा[4]! अनळा! बृहद्भानु! । कृशानु[4] ज्वलन[4] हुताशनु । वायुमित्रा[4]! तुज नमो. ॥ १०९ ॥ विभावसो[4]! वीतिहोत्रा[4]! हुताशा! । वैश्वानरा[4]! प्लवंगा[4]! पिंगेशा[4]! । कृष्णवासा[4]! भूरितेजसा[4]! । रोहितकेशा[4]! मज पाहीं. ॥ ११० ॥ तूंचि सकळदेवांचें मुख । पावनत्वें तूं पावक[5] । वेदप्रतिपाद्या वृंदारक । जातवेद[4] तुज म्हणती. ॥ १११ ॥ तूं प्रळयाग्नि हराच्या नयनीं । तूं वडवाग्नी[6] समुद्रजीवनीं[7] । तूं विश्वाच्या हृदयभुवनीं । कर्मसाक्षी जगदात्मा. ॥ ११२ ॥ तूतें देऊनि आमंत्रण । सामग्रीलागीं रानोरान । धांवतां केलें तुवां विघ्न । धन्य विवेक हा तुझा! ॥ ११३ ॥ तुजलागीं मांडिला समारंभ । न मानोनि तो संतोष लाभ, । स्वकार्य नाशा-

---

१. या नगरीमध्यें स्त्रिया यावेळेपासून स्वच्छंदी झाल्या. कोणत्या पुरुषाच्या शरीरांत अग्नि प्रवेश करून स्त्रियांचा उपभोग करील याचा नेम नसल्यामुळें स्त्रियांस त्याचे पति यथेष्ट आचरण करण्याचे कामीं अडकाठी आणीत नसत. २. रथ. ३. अध्याय ३१ श्लोक ४१-४८ यांत सहदेवकृत अग्निस्तव आहे. ४. हें अग्नीचें नांव. ५. अग्नि. (शुद्ध करणारा—असा अर्थ.) ६. समुद्रांत राहून त्याचें जल शोषण करणारा अग्नि. याची कथा अशीः—और्व नामक एक मोठा भार्गववंशोत्पन्न मुनि होता त्यास असें कळलें कीं कार्तवीर्यकुलोत्पन्न राजांनीं भार्गवसंततीचा उच्छेद करून आपल्या कुळांतील स्त्रियांस द्रव्यनिमित्त बहुत पीडा दिली. तेव्हां यानें त्यांच्या नाशासाठीं तपःप्रभावानें भयंकर अग्नि उत्पन्न केला. त्यामुळें क्षत्रियांस फार त्रास झाला, तेव्हां ते और्व पितरांस शरण गेले. नंतर पितरांच्या आज्ञेवरून और्वानें आपला कोपानल समुद्रांत टाकिला. यासच 'वडवाग्नि,' 'वडवानल' असें म्हणतात, कारण याचें मुख वडवे (घोडी) सारखें आहे. ७. समुद्राच्या पाण्यांत.

वया क्षोभ । सांग कैसा उदेला?' ॥ ११४ ॥ ऐसें बोलतां माद्रीकुमर । प्रत्यक्ष[1] झाला वैश्वानर, । हांसोनि, 'दीधला अभयकर । माझा तूतें सर्वदा ॥ ११५ ॥ गुंतलें होतें वरदवाक्य । म्हणोनि दाविलें कौतुक[2] । आतां सुप्रसन्न देख । मी पावक तुम्हातें ॥ ११६ ॥ अर्जुनाचा उपकारभार । माझे मस्तकीं असे थोर, । मी कृष्णाचा आज्ञाधर । वर्ते साचार कृष्णाज्ञा.॥११७॥ श्रीकृष्णरायाचिया भक्ता । मी रक्षिता परि नव्हे दाहिता[3], । लंकेंत रक्षिलें हनुमंता । आणी गांजितां प्रऱ्हादा. ॥ ११८ ॥ गोपाळ रक्षिले यमुनातीरीं । बिभीषणसंपदा लंकापुरीं । तुम्हा रक्षिलें लाखाजोहरीं[4] । तेही आज्ञा कृष्णाची. ॥ ११९ ॥ कृष्णाज्ञेनें पार्थविजयो । करित असतां अरिष्टवायो[5] । लागों न शके आणी लयो । शत्रूंचाही देखाल. ॥ १२० ॥ मातें देऊनि आमंत्रण । मांडिलें असे हें कारण, । हें मी जाणे गा! सर्वज्ञ! । सहसा विघ्न करीना.' ॥ १२१ ॥ स्नेहें देऊनि आलिंगन । प्रसन्न झाला हुताशन । नीळास म्हणे, 'करीं नमन । सहदेवातें आवडी.' ॥ १२२ ॥ कनकमेरूचे निपाडें । करभार वोपिला अपाडें[6] । पुढती द्रव्य पाहिजे पुढें । ऐसी इच्छा नुरेची. ॥ १२३ ॥ नमस्कारूनि यज्ञपुरुषा[7] । आमंत्रिलें नीळनरेशा । पुढां मागुती दक्षिणदिशा[8] । जिंकावया चालिला. ॥ १२४ ॥ त्रिपुर अमितौजाआकृती । कौशिकाचार्या सुराष्ट्रपती । शूर्पारक जिंकोनियां क्षिती । चक्रवर्ती दंडक[10]. ॥ १२५ ॥ सागरद्वीपवासीय[11] बहुत । म्लेंच्छयोनीचे असंख्यात । ज्यांतें बोलती नर प्राकृत । बहुधा नामी[12] एकाळीं. ॥ १२६ ॥ जाबी जंगी फिरंगी । इंग्रेज बहुधा रक्तरंगी । मलेबार नौकामार्गी । विघ्नकर्ते दंडिले. ॥ १२७ ॥ निषाद पुरुषाद कर्णवसनी[13] । काळमुख नरराक्षसयोनी । कोल्लगिरीतें जिंकोनि धरणी । वश केली प्रतापें. ॥ १२८ ॥ सुरभीपट्टण ताम्रद्वीप । रामक पर्वत तिमिंगिल भूप । एकपाद पुरुष विद्रूप । चर्मपाळ

---

१. दर्भाचें आस्तरण घालून अग्निप्रवेश करण्यासाठीं सहदेव सिद्ध झाला तेव्हां अग्नीनें प्रसन्न होऊन त्यास दर्शन दिलें. (श्लोक ५१-५२.) २. कुतूहल. ['कौतुकं नर्मणीच्छायामुत्सवे कुतुके मुदि । पारंपर्यागतख्यातमङ्गलोद्वाहसूत्रयोः' इति हैमः; 'कौतुकं त्वभिलाष स्यादुत्सवे नर्महर्षयोः । कुतूहलेऽपि तत्प्रोक्तम्' इति मेदिनीकारः ॥ 'कौतुकं मङ्गले हर्षे हस्तसूत्रे कुतूहले' इति शाश्वतः.] ३. भस्मकरिता, जाळणारा. ४. लाक्षागृहांत. ५. दुःखरूप वायु. ६. असाधारण, विपुल. ७. अग्नीला. ८. 'दक्षिणदेशा' असाही पाठ आहे. ९. अ० ३१ श्लो० ६१ पहा. १०. हें देशाचें व तत्रस्थ लोकांचें नांव. (श्लो० ६६.) ११. सागरद्वीपांत राहणारे. १२. चांगले. १३. कर्णप्रावरण.

भाळाक्ष ॥ १२९ ॥ संजयंती नामें नगरी । पाषंड जिंकोनि समरीं । करभारद्रव्य घेऊनि शिरीं । कोटीच्या कोटी चालिले. ॥ १३० ॥ करहाटक पांड्य प्रबळ । द्रविड आणी चोळमंडळ । अंध्र ताळवन विशाळ । का[1]ळीक उद्भट उष्ट्रकर्णिक ॥ १३१ ॥ आटवी पुरी यवनपूर । जिंकोनि घेतला करभार । दे[2]त्त करूनि कृपा किं[3]कर । आज्ञेतळीं ठेविले. ॥ १३२ ॥ कच्छ जिंकोनि कांचीपुरी । आपण राहोनि सहपरिवारी । दूत धाडिले त्वरें करी । लंकापुरा पत्रेंसी. ॥ १३३ ॥ पत्र वंदूनि बि[4]भीषण । म्हणे, 'हे सेवा मज भूषण । मीं कृष्णाचा कनिष्ठ दीन । निजसेवक धर्माचा ॥ १३४ ॥ कृष्णें ऐश्वर्य दीधलें रंका । कृष्णाज्ञेनें पाळितों लंका । ज्याचें त्यासी अर्पितां शंका । मातें कांहीं असेना.' ॥ १३५ ॥ रावणभांडारींचीं रत्नें । कुबेराचीं दिव्याभरणें । जंबु[5]शाखीचीं सुवर्णें । जे कां गरुडें [6]अर्पिलीं. ॥ १३६ ॥ सिंधुमथनींचा [7]अनर्घ्य मणी । अमूल्यवस्त्रें सूर्यकिरणीं । नारिकेलें अमृतगुणी । जाती कंकोळ लवंगादी. ॥ १३७ ॥ मत्स्य आणि कुंजरदंत । शृंगें चर्में रोमजात । चंदन कृष्णागरु पर्वत । मत्स्यपीते कस्तुरी. ॥ १३८ ॥ देऊनि राक्षयांचि या माथां । अपार धाडिले माद्रीसुता । ऐसे घेऊनि इंद्रप्रस्था । धर्मानुज पातला ॥ १३९ ॥ नमस्कारूनि कुरुभूपाळ । पादपूजे वोपिलें सकळ । पाडिले सुवर्णाचे [8]अचळ । मंदराचळासा[9]रिखे ॥ १४० ॥ वां[10]सुदेवें पाळिली दिशा । ते पश्चिम नरवरेशा ! । नकुळ चालिला त्या देशा । प्रताप कैसा परियेसीं ॥ १४१ ॥ दां[11]तयापासीं सर्व सुकृतें । नामस्मरणीं सर्व तीर्थें । खेळती तैसें सांगातें । पवित्र सेना चालिली. ॥ १४२ ॥ रोहीतक म[12]त्तमयूरक । मरुभूमीचे ब[13]हु नायक । महेत्थ आक्रोश शैरीषक । देश अनेक जिंकिले. ॥ १४३ ॥ दशार्ण जिंकितां संग्रामीं । लोटांगणें घालिती भूमीं । करभारेसीं दासधर्मी । पुढां उभे तिष्ठती ॥ १४४ ॥ शिबी त्रिगर्त अंबष्ठ । मालव आणि पंचक-

---

१. 'कालिंद' असाही पाठ आहे. २. सर्व तुम्हाला दिलें असें. ३. सेवक. किंकरोमि कुर्याम् वा इति स्वामिनं पृच्छति इति किंकरः । अथवा कुत्सितं करोति इति. 'काय करूं महाराज' असें विचारणारा सेवादक्ष चाकर याला किंकर म्हणावें. किंवा जो काम नीट करीत नाहीं, कारण चाकरच तो म्हणूनही त्याला किंकर म्हणावें. ४. पौलस्त्य बिभीषण (श्लो० ७३.) ५. जंबु वृक्षापासून झालेलीं सुवर्णें. ६. 'आणिलीं' असाही पाठ आहे. ७. अमूल्य. ८. पर्वत. ९. येथें 'सहदेवदक्षिणविजय' वर्णन समाप्त झालें. १०. कृष्णानें. 'वरुणें पाळिली' असा अन्य पाठ. ११. दात्याजवळ. ['दाता' तयास म्हणती दीनाची ज्यास येतसे करुणा ।– विठ्ठल.] १२. मत्तमयूर नामक क्षत्रिय राजे. १३. 'धनिक' असाही पाठ आहे.

पॅट । मध्यमकेय वाटधान उद्भट । द्विजराजे जिंकिले ॥ १४५ ॥ जिंकोनि [1]पुष्करारण्यवासी । गण उत्सवसंकेतासी। सिंधुकुळाश्रितया चौफासी । ग्राम-णीया महाबळी. ॥ १४६ ॥ शूद्र आभीर[2]गण उन्मत्त । जे सरस्वतीतीरा-श्रित । पर्वत पंचनदाश्रित । वश्य केले [3]वाटीवा ॥ १४७ ॥ अमरपर्वतवासी नगर । उत्तरज्योतिष राजेश्वर । दिव्यतट महापूर । द्वारपाळ दंडिले. ॥१४८॥ [4]रामठा हारहूणा प्रबळ । पृथ्वीचे जे राजे सकळ । जिंकोनि माद्रवतीचा बाळ । दूत धाडी द्वारके ॥ १४९ ॥ धर्मराजमुद्रांकित । पत्र देखोनि श्री-कृष्णनाथ । वारंवार हर्षयुक्त । माथां वंदी आदरें. ॥ १५० ॥ हांसोनि कृ-पासमुद्र बोले, । 'आम्हीं धर्माचे अंकिले । जें जें मागतील तें तें वहिलें । अवश्य दिधलें पाहिजे ॥१५१॥ घेऊनि जाई हा करभार । मीही आणीतसें अपार'। रत्नधनाचे डोंगर । पाठविलें नकुळातें ॥१५२॥ पुढां शाकल विशाळ गहनें । रम्य मद्राचीं [5]पुटभेदनें। पावतां परमादरें ज्याणें । [6]मातुळभेटी पातला. ॥१५३॥ शल्यें निःशल्यस्नेहदृष्टी । रत्नें वोपिलीं लक्षकोटी । तेथोनि सागराच्या पोटीं। म्लेंछ दुष्ट दंडिले. ॥ १५४ ॥ पल्हव बर्बर किरात यवन । शकनामाचे बहु दारुण । मद्य मांस नरमैथुन । सदा सेवन जयांतें. ॥ १५५ ॥ पारसी भासीक ताम्रमुख । आरब हुरमुज काळमुख। रूमशाम घोडमुख । नाट पाट पुलिंद ॥ १५६ ॥ तेही दंडिले करभारें । नेमूनि ठेविले आप्तविचारें। सुवर्णकोटी आणि अपारें । अनर्घ्य रत्नें घेतलीं ॥ १५७ ॥ शंखपद्म अर्बु-दातें । निधीच्या निधी नव्हे गणितें । रत्नें द्रव्यें वस्तुजातें । संख्येरहित ला-धलीं. ॥ १५८ ॥ जे जे देशींचे जे मानव । ते ते वेठी धरूनि सर्व । सं-पत्तिसमुद्र नरपार्थिव । शक्रप्रस्था पातला. ॥ १५९ ॥ यापरी करूनि पृथ्वी-जय । जगीं उजळिला प्रतापसूर्य । याचेनि श्रवणें होय प्रळय । दोष आणि दरिद्रा. ॥ १६० ॥ शोधोनि पश्चिमेचें मूळ । इंद्रप्रस्था [7]पातला नकुळ । धर्मीं अर्पूनि सकळ, फळ । झालें म्हणे जन्माचें. ॥ १६१ ॥ झाला दिग्वि-जय चौघांचा । पुढें आरंभ महायज्ञाचा । तो ऐका व्याससर्वज्ञाचा । आदर हो कां सन्मुख ॥ १६२ ॥ [9]चक्रवर्ती आपुल्या सुखें । तापसाश्रमा ये कौतुकें।

---

१. अध्याय ३२ श्लो० ८ पहा. २. गवळ्याचा समुदाय 'अहीरसुत प्रमत्त' असा अन्य पाठ आहे. ३. देशविशेष. ४. अ० ३२ श्लो० १२ पहा. ५. पत्तनें, नगरें (श्लो०१४ टीका.) ६. शल्य. ७. येथें 'नकुलप्रतीचीजय' वर्णन समाप्त झालें. ८. येथें दिग्विजयपर्व समाप्त होऊन राजसूयपर्व सुरू होतें. ९. मागें पृ० ८ टीप २ पहा.

तैं वरपडा होय अरण्यशोकें । कां [1]तृणधान्यभोजना ॥ १६३ ॥ तेंवी हें तु-
म्हासी झालें देवा ! । तरी हें गोड करूनि जेवा । कडु गोड रुची या भावा ।
अंतःकरणीं नाणिजे. ॥ १६४ ॥ पुढें दुर्योधन विषादी । पुढती चातुर्याचा
उदधी । व्यास वदेल म्हणोनि शब्दीं । संक्षेप केला येकाळीं. ॥ १६५ ॥
इति श्रीसभापर्व भारत । 'राजसूययज्ञचरि[3]तामृत' । पवित्र परिसा संत महंत ।
मुक्तेश्वर कवि वदे ॥ १६६ ॥ इति श्रीमन्महाभारते । पांडवदिग्विजयी स-
भापर्व तें । आतां पुढें यज्ञानें । प्रारंभातें करितील ॥ १६७ ॥ मुक्तेश्वराचा
श्रीगुरु । दत्तात्रय हा अवतारु । अष्टमाध्ययीं हा विस्तारु । कृपा करुनि व-
दलासे ॥ १६८ ॥

---

## अध्याय नववा.

अवलोकोनि चौघे बंधु । धर्म बोले उदार शब्दू, । 'तिहीं लोकींचा स-
कळानंदु । येथें वस्तीस पातला. ॥ १ ॥ दशेनें वरिलें भूमंडल । नीति वि-
चारें विवेककुशल । इच्छिले[4]काळीं अमोघ जल । मेघ [5]अक्षयी वर्षतु. ॥ २ ॥
सहस्रवर्षें सहस्रहस्तीं । वेचितां न सरे हे संपत्ती । ते अर्पावी धर्मपंथीं । यज्ञ-
काळीं संभ्रमें ॥ ३ ॥ सर्व सामग्री झाली संपूर्ण । आरंभिला पाहिजे यज्ञ । आप्त
सोयरे सुहृज्जन । शीघ्र येथें पाचारा. ॥ ४ ॥ चहुं दिशामाजी वस्ती । सं[6]तपुरीं
पवित्रतीर्थी । प्रत्यक्ष वेदवन्हीच्या मूर्ती । शापानु[7]ग्रहीं समर्थु. ॥ ५ ॥ देव-
ऋषी ब्रह्मऋषी । [8]ज्ञानवि[9]ज्ञानतपोराशी । पवित्रशि[10]ष्यंसमुदायेसीं । यज्ञमंडपा
आणावे. ॥ ६ ॥ छप्पन्न देशींचे राजेश्वर । [11]शौण्णवकुळींचे [12]राजकुमर । शा-
लक संबंधी श्वशुर । द्रुपदादीक पाचारा. ॥ ७ ॥ द्वारके पाठवूनियां दूत ।
गुरु स्वामी कुळदैवत । यादवेंसी श्रीकृष्णनाथ । आधीं येथें आणवीं[13] ॥ ८ ॥
चौघांमाजी एकजणें । [14]हस्तनापुरालागीं जाणें, । पि[15]तों गौरवूनि मानें । आ-

---

१. नीवार (सांवा इत्यादि धान्य.) २. समुद्र. ३. 'चरितअत्यद्भुत' असाही पाठ आहे.
४. निकामवर्षी. ५. 'मेघ आज्ञेनें' असाही पाठ आहे. ६. 'सप्तपुरीं' असाही पाठ आहे.
७. शाप देण्यास आणि अनुग्रह (प्रसाद, कृपा) करण्यांस समर्थ. ८. शास्त्र. ९. अनुभव.
१०. अ० ३३ श्लो० ३६-३७ पहा. ११. मागें पृष्ठ १८ टीप ११ पहा. १२. पृष्ठ १८ टीप
१२ पहा. १३. 'शीघ्र येथें पाचारा' असाही पाठ आहे. १४. यालाच 'हस्तिनापुर' 'नागपुर'
अशीं अन्य नांवें आहेत. हें शहर पुरुकुलोत्पन्न हस्तिराजा यानें वसविलें, म्हणून यास 'ह-
स्तिनापुर' असें नांव पडलें. दुसरें असेंही आढळतें कीं अत्रिपुत्र सोम अरण्यांत फिरत अ-
सतां, एका हत्तीला एका विहंगमानें उचलून नेलें असें त्यानें पाहिलें; तेंव्हां त्या जाग्यावर

णोनि येथें बैसवा. ॥ ९ ॥ **भीष्म द्रोण शारद्वत** । **बाल्हीक कर्ण द्रोण-सुत** । **शकुनीमामा** बुद्धिवंत । मानें येथें पाचारा. ॥ १० ॥ **दुर्योधन** ऐश्वर्य. सिंधु । एकशत सहोदर बंधु । देऊनि धनीपणाचा शब्दु । स्नेहभावें आणावे- ॥ ११ ॥ आज्ञा होतांक्षणीं त्वरित । लक्षानुलक्ष धांवले दूत । तेचि काळीं यत्नेरहित । दैव कैसें उदेलें. ॥ १२ ॥ वार्ता सांगीतली [१]काठीकरीं । दूरी गर्जती कुंजरभेरी । **द्वार**काराज सहपरिवारीं । **इंद्रप्रस्था** पातले. ॥ १३ ॥ ऐकतां धांवले सामोरे । वीर गर्जती जयजयकारें । परिवारेंसी **याद**वभारें । शोभासमुद्र पातला. ॥ १४ ॥ **द्वार**के ठेवूनि **वा**सुदेव । सर्वे वडील **बळि**भद्र देव । **पां**डवयज्ञा **वा**सुदेव । सामग्रीसीं पातला. ॥ १५ ॥ **सात्यकी अ**निरुद्ध **कं**क **सा**रण । **उ**न्मख षंढ **चा**रुदेष्ण । **सांब प्र**वीर [२]**गे**द **प्र**द्युम्न । हे मुख्य करूनी सर्वही. ॥ १६ ॥ आलिंगूनि **ध**र्मराजें । नमिलीं **कृ**ष्णपादांबुजें, । **कृ**ष्ण म्हणे, ‘तूंच योग्य पूजे । दीक्षाग्रहणीं दीक्षितु.’ ॥ १७ ॥ चौदा सहस्र मत्तकुंजर । पाठीं रत्नें सुवर्णभार । वस्त्रें वाजी [३]रहंवर । लक्ष अपार धेनूचे’ ॥ १८ ॥ **न**कुळा दीधलें तें स्वल्प । त्याहूनि कोटिगुणें अधिक । धन देऊनि **ध**र्म भूप । लोकपूज्यें पूजिला. ॥ १९ ॥ **ध**र्म तो सर्वगुणीं पूज्य । म्हणोनि लोकेंपूज्यातें पूज्य । दुःखशोकां पाडिलें पूज्य । म्हणोनि लोकांतें पूज्य तो. ॥ २० ॥ **न**कुळ जावोनि हस्तनोपुरा । नमस्कारिलें राजेश्वरा, । परम आल्हाद **भी**ष्मा **वि**दुरा । यज्ञशोभा पहावया. ॥ २१ ॥ शिबिकायानीं **प्र**ज्ञा[६]चक्षु । शतपुत्रशाखी मूळवृक्षू । **कौ**रवकुळामाजी मुख्यु । परिवारेसीं चालिला. ॥ २२ ॥ शिबिका सुखासन रथ । अश्वयानीं असंख्यात । [७]चंवरडोलीं मिरवत । वाद्यगजरीं निघाले. ॥ २३ ॥ छत्रें कनकदंडनेटकें । कळसीं भासती सूर्यकेटकें, । वाद्यें वाजती कौतुकें । मेघनादें गर्जती. ॥ २४ ॥ ऐरावत मस्तकीं देख । शोभेनें मिरवे सुरनायक । हस्तनापुराहूनि अधिक । **इंद्र**प्रस्थ त्यावरी.

---

त्यानें एक शहर वसवून त्याला या चमत्कारस्मरणार्थ ‘हस्तिनापुर’ असें नांव दिलें. हें शहर विद्यमान मिरत शहराच्या पूर्वेस गंगाकांठी असावें असें विद्वानांचें अनुमान आहे. १५. धृतराष्ट्र.

१. द्वारपाळानीं. २. अध्याय ३४ श्लो० १६ पहा. ३. रथ. ४. कृष्णातें. ५. अध्याय ३३ श्लोक ५४-५५ पहा. ६. धृतराष्ट्र. ७. हत्तीवर बसावयाचें अंबारीसारखें वितानयुक्त आसन. [डोल हा शब्द आरबी आहे. याचा अर्थ झोंके खात जाणारें पालखी सारखें वाहन. याचा उपयोग अद्यापि हिंदी भाषेंत प्रचलित आहे. जसें:–‘अज आनंतचौरस है. गणेशजीके **डोल** आज निकलें गे’ इत्यादि.] ८. किरणें. ९. ‘मेघ करिती गर्जना’ असाही पाठ आहे.

॥२५॥ हस्तनापूर तें तळवटीं। इंद्रप्रस्थ ऐश्वर्यमुगुटीं । बळें भाग्यें लोकदृष्टी, । नामें साम्य दिसतसे. ॥२६॥ सकळ पातले इंद्रप्रस्था । परम आल्हाद कुंतीसुता,। सन्मुख जावोनि समस्तां । लोटांगणीं वंदिलें. ॥ २७ ॥ आवडी देऊनि आ-लिंगनें । वस्तीलागीं भिन्नभिन्नें । भोगभरित हेमसदनें । स्वर्गोपमें दीधलीं. ॥ ॥ २८ ॥ वार्ता जाणविती दूत । राजे पातले असंख्यात । सवें द्रव्याचे प-र्वत । रत्नाकर रत्नांचे. ॥ २९ ॥ अचल वृषक कर्ण जयद्रथ । शल्य बा-ल्हिक सोमदत्त । भूरिश्रवा बृहद्रथ । धर्मयज्ञा पातले. ॥ ३० ॥ यज्ञसेन पुत्रांसहित । प्राग्‌ज्योतिषींचा भगदत्त । म्लेंछगणीं परिवारित । राजसूययज्ञा पातले. ॥ ३१ ॥ पर्वतीय बृहद्बळ । पौंड्रकवासुदेव सकळ । वंग कालिंग कुंतळ । राजसूययज्ञा पातले. ॥ ३२ ॥ मालव आंध्र द्रविड सिंव्हल । का-श्मीरकुंतिभोज नृपाळ । विराट सहपुत्र महाबल । गौरवाहन पातला. ॥३३॥ शिशुपाळ पुत्रेसीं आपण । येतां मार्गीं दुष्ट शकुन । तितुकें मनीं मानूनि तृण । राजसूययज्ञा पातला. ॥ ३४ ॥ कोटिशिल्पकाराहातीं । चंदनागारें विचित्राकृती । निर्मूनि वोपिलीं सुखवस्ती । धर्मराजें आलियां. ॥ ३५ ॥ विशाळगृहीं एकले वस्ती । म्हणोनि अष्ट भोग संगती । देऊनि तोषविले नृ-पती । संवत्सरपर्यंत ॥ ३६ ॥ प्रजा देशिक महाजन । आणी योगी वणिक् धनसंपन्न । उत्तम मध्यम नानावर्ण । एकें एक पातले. ॥ ३७ ॥ सहदेवातें

---

१. 'साष्टांग नमस्कार घातले' असा पाठ भेद आहे. २. रत्न+आकर=रत्नांच्या खाणी. ३. द्रुपद (श्लोक ९). ४. पौंड्रकवासुदेव–हा पुंड्रदेशाचा राजा होता, हा कृष्णाचा फार म-त्सर करी व आपली प्रसिद्धि व्हावी म्हणून कृष्णासारखींच कुंडलें, गरुडध्वज, कौस्तुभ इ-त्यादि चिन्हें धारण करून मिरवी. एकदां तर त्यानें एका दूताबरोबर कृष्णास असा निरोप पाठविला कीं, 'तूं खरा कृष्ण नसून मीं खरा कृष्ण आहें, म्हणून माझीं चिन्हें धारण करणें तुला योग्य नाहीं. तर तीं चिन्हें धारण न करितां मला शरण ये.' या मूर्खाचा हा निरोप ऐकून सभास्थित कृष्णास व यादवांस फार हसूं आलें व त्यानें त्यास उत्तर पाठविलें कीं, मी तुझी शंका निवारण करण्याकरितां येत आहें.' हा निरोप ऐकतांच तो काशीराजापाशीं गेला. पुढें कृष्णाचें व याचें युद्ध झालें, त्यांत हा व काशीराजा मृत्यु पावले. नंतर कृष्ण यादवांसह द्वारकेस आला. ह्याला **'पौंड्रकवासुदेव'** असें नांव पडण्याचें कारण हा पुंड्रदेशाचा राजा होता व ह्याचें नांव वासुदेव असें होतें. (श्रीमद्भागवत–दशमस्कंध, अ-ध्याय ६६ पहा). ५. अध्याय ३४–श्लोक १३ पहा. ६. सुगंध, वनिता, वसन, गायन, तांबूल, भोजन शय्या आणि द्रव्य हीं अष्ट भोगांचीं नावें होत. ७. गुरु. ८. कुलीन पुरुष, सावकार, व्यापारी, विद्वान पुरुष.

निरोपी धर्म, । 'जे सामग्री सांगेल धौम्य । होमद्रव्यें उत्तमोत्तम । सिद्ध करीं अविलंबें ॥ ३८ ॥ ऋत्विज नेमिला वसिष्ठ । ब्रह्मा झाला व्यास[1] वरिष्ठ, । याज्ञवल्क्य ब्रह्मनिष्ठ । तो अध्वर्यू[2] ते यागीं. ॥ ३९ ॥ वसुपुत्र पैल तेथ । होता[3] झाला धौम्यासहित । वाटे वेद मूर्तिमंत । ऋत्विजरूपें अवगला. ॥४०॥ धनंजय[4] गोत्रीं ऋषेश्वर । जो अग्नीचा मूर्त[5] अवतार । तो सुसामा सामगायनकर्ता मधुर । धर्मयागीं नेमिला. ॥ ४१ ॥ त्याचे पुत्र शिष्यवर्ग । वेदवेदांगश्रुतिपारग । होते झाले तेथें होत्रैग[6] । जाणते सांग विधानें. ॥ ४२ ॥ भीष्म द्रोण धृतराष्ट्र जनक । सोमदत्त कृप बाल्हीक । हे स्वामित्वें मुख्य नायक । सभास्थानीं स्थापिले. ॥ ४३ ॥ बळिभद्र आणि कृष्ण जगजेठी । आदरें बैसऊनि निकटीं । मग जोडिल्या करसंपुटीं । धर्मराज विनवितु. ॥ ४४ ॥ मस्तक ठेऊनि पादपद्मीं । म्हणे 'परियेसीं कृष्णस्वामी! । जें जें चिंतिलें मनोधर्मीं । तें तें स्वामी! सिद्ध झालें ॥ ४५ ॥ तुझिया कृपाबळें येथ । सकळ राजे झाले भृत्य । जोडिले द्रव्याचे पर्वत । समुद्रखाणी रत्नांच्या ॥ ४६ ॥ आतां दृष्टी घालोनि यज्ञीं । सिद्धी पाववीं चक्रपाणी! । कार्याधिकारी विभागूनी । भिन्नभिन्न सांगावे ॥ ४७ ॥ कवणा योग्य कवण काज । हें तूं जाणसी अधोक्षज[7]! । तुझें वाक्य प्रमाण मज । परम मान्य समस्तां ॥ ४८ ॥ बंधुसहित मी किंकर । आज्ञाधारक पादुकाधर । मातें सांगसी अधिकार । तो मी करीन तव आज्ञा' ॥ ४९ ॥ हांसोनि बोलिजे कृष्णनाथें । 'तुझें दैवचि साह्य तूतें । जें तूं म्हणसी सांगसी मातें । तें मी करीन सर्वथा. ॥ ५० ॥ सकळांमाजी नीच कृत्य । तो विभाग माझा येथ । नव्हें नामाचा नृपनाथ ।

---

१. सत्यवतीसुतानें यज्ञांत ब्रह्मत्व केलें (अध्याय ३३-श्लोक ३४). २. यजुर्वेदीऋत्विज. (श्लोक ३५) ३. ऋत्विजविशेष. ४. धनंजय नामक गोत्रांतील श्रेष्ठ असा सुसामा नामक आंगिरस हा सामग होता (श्लोक ३४.) ५. मूर्तिमान्. ६. सप्तसंख्या. ७. अधोक्षज=विष्णु. याचा विग्रहार्थ असाः—(१) 'अधो न क्षीयते जातु यस्मात्तस्मादधोक्षजः', (२) 'द्यौरक्षं पृथ्वी चाधस्तयोर्यस्मादजायत । मध्ये वैराजरूपेण ततोऽधोक्षज इष्यते ॥' (३) 'अक्षात् इंद्रियाज्जायते इति अक्षजम्=प्रत्यक्षज्ञानम्, तदधरं ग्राहकत्वाभावात् हीनं यस्य सः', (४) 'अधःकृतं अक्षजं=इंद्रियज्ञानं येन,' याप्रमाणें या शब्दाचे विग्रह आढळतात. 'द्यौ अक्ष अधः पृथ्वी यांच्यामध्यें विराट स्वरूपानें । झाला म्हणुनि अधोक्षज ऐसें अभिधान घेतलें त्यानें. ॥ १५ ॥ इंद्रियगण अंतर्मुख, झाला असतांच जाणला जातो, । जो यास्तव म्हणति अधोक्षज ऐसें नाम आपणा घेतो. ॥ १६ ॥ नाहीं इंद्रियजन्य, ज्ञान जया दाखवावया शक्त । यास्तव म्हणती झालें, नाम अधोक्षज असें तया व्यक्त. ॥ १७ ॥ [नामार्थदीपिका–पृष्ठ ४६.]

मी खिल्लारी नंदाचा. ॥ ९१ ॥ प्रत्यक्ष मी पार्थाचा सारथी[1] । हें तंव जाणिजे समस्तीं । वेडी[2] आवडीची जाती । म्हणोनि थोरी करीतसां. ॥ ९२ ॥ ब्राह्मणचरणातें क्षाळणें । उच्छिष्टपात्रांतें काढणें । उभय कृत्य म्यां वामनें । अंगिकारिलें आवडी. ॥ ९३ ॥ ऋषींस देऊनि विर्ढारें[3] । तोषवावें सर्वोपचारें । हें कृत्य संपादिजे कुमरें[4] । द्रोणाचेनि द्रोणाज्ञा. ॥ ९४ ॥ व्यय तितुका करावा विदुरें । 'अवश्य' म्हणिजे युधिष्ठिरें । राजपूजनालागीं चतुरें । संजयातें सांगिजे. ॥ ९५ ॥ देऊनि सामग्री अपार । भक्ष्यभोज्यांचे संभार । निपजवावे हा अधिकार । दुःशासना[6] दीधला. ॥ ९६ ॥ दक्षिणादानीं अति पवित्र । कृप योजिला गौतमपुत्र । जो कृपेनें द्ररिद्र मात्र । याचकांचें परिहरी. ॥ ९७ ॥ उँपायनें[7] येती भेटी । धनरत्नाचिया कोटी । दुर्योधनें पाहूनि दृष्टीं । मग भांडारीं रक्षणें. ॥ ९८ ॥ न्यून पूर्ण कृत्याकृत्य[8] । तें अवलोकोनि गंगासुत । वडील वृद्ध बुद्धिमंत । सारासार जाणता. ॥ ९९ ॥ गंध अक्षता परिमल माळा । धूपदीपादि अर्चनसोहळा । हें कार्य निरोपिलें नकुळा । बुद्धिकुशळा केशवें ॥ ६० ॥ यादवकौरवसुहृदातें । ऋषी राजे वृद्ध वडिलांतें । द्रौपदी वाढील उदारहस्तें । अन्नपूर्णा भगवती. ॥ ६१ ॥ स्वइच्छा जेवितां ब्राह्मण । पात्रीं जो जो पदार्थ न्यून । तो तो सहदेवें[9] अवलोकुन । अपूर्ण[10] पूर्ण करावें. ॥ ६२ ॥ प्रतिविंध्यादि राजकुमरीं । रत्नकलश धरूनि

---

१. विष्णूनें कृष्णावतारीं स्वभक्त जो अर्जुन त्याचें सारथ्य केलें ही कथा पुराणांत सुप्रसिद्ध आहे. पंतांनीं ही कृष्णाची मोतद्दारी अनेक स्थळीं वर्णिली आहेः—'असा प्रभुहि सेवकां भजसि खासदारापरी' (केकावलि ७ ), 'अर्जुनतुरंगमातें जो स्वकरानें करी खरारा जी! । श्रीकृष्ण काय बहुधा निजपददासांसि जो खरा राजी. ॥' (३) हरिजन हो! हरि करितो आंगें तुमची बरीक सेवा जी । धुतले धनंजयाचे केवळ अश्लाध्य परि कसे वाजी. ॥ [महद्विज्ञापना.] (४) ज्याच्या श्रीपददास्यें पावे तोखा सदा रमा जाया । हरितो मना नराच्या होउनि तो खास दार माजाया. ॥ [द्रोणपर्व अध्याय १४.] याच प्रकारचें वर्णन इतर कवींच्या ग्रंथांतही आढळतें. २. 'वडिल' असाही पाठ आहे. ३. अ० ३५ श्लो० पहा. ४. बिढार, बिथार=बिऱ्हाड. ५. अश्वत्थामा नामक पुत्रानें (श्लो. अ० ३५ श्लो० ५) विप्रसत्कार करावा. ६. भक्ष्यभोज्याधिकारीं दुःशासनाची योजना झाली. ७. नजराणे. ८. केलें काय व न केलें काय हें पाहण्याचें काम भीष्मद्रोणांकडे होतें. (अ० ३५—श्लो० ६.) ९. हें वर्णन मूळांत नाहीं. सहदेव, प्रतिविन्ध्य, धृष्टद्युम्न इत्यादिकांच्या कामाची वांटणी कवीनेंच केली आहे. १०. 'अन्न' असाही पाठ आहे.

करीं । वेळोवेळां गंधोपचारीं । गंगोदकें अर्पावीं. ॥ ६३ ॥ [1]त्रयोदशगुणी सुवर्णवर्णें । [2]ऐक [3]तांबूल सहस्रपर्णें । कर्पूरचंद्रवर्णचूर्णें । धृष्टद्युम्नें अर्पावीं. ॥६४॥ [4]भणंग आणी [5]चक्रवर्ती । समान मान एकेपंक्ती । हेचि धार्मिकाची रीती । श्रेष्ठ ऐसें जाणिजे ॥६५॥ ऐसी सकळां देऊनि आज्ञा । आरंभ केला दीक्षाग्रहणा । तो संभ्रम कुरुभूष[6]णा ! । व्यास कीं एक मी जाणें ॥ ६६ ॥ पुण्याहवाचनाचेनि मंगलशब्द । नमस्कारिले वडील वृद्ध । जयजयकारें विबुध बुध । उभय लोकीं गर्जती ॥ ६७ ॥ शतसहस्रऋषेश्वरमेळीं । दीक्षाग्रहणीं पांडव बळी । शोभला जैसा ग्रहमंडळीं । तारांगणीं चंद्रमा. ॥ ६८ ॥ वसु घृताचे अवदानीं । तृप्त झाले [7]साही अग्नी । श्वेतकीयज्ञाहूनि दुणी । तुष्टी झाली ह्मणतसे ॥ ६९ ॥ विभागलाभें पावोनि तुष्टी । जयजयकारें सुरांच्या कोटी । गर्जोनि करिती पुष्पवृष्टि । शक्रप्रस्थावरौते ॥ ७० ॥ सुवर्णभूषिता सालंकार । सवत्सधेनु शतसहस्र । एकएकाशी राजेश्वर । देता झाला [8]दक्षिणे ॥ ॥ ७१ ॥ क्षौमांबरें [10]दिव्यंभूषणें । सहस्र [11]निष्कें सहस्र रत्नें । [12]मत्त [13]कुंजर अश्वयानें । शतशत एक एका ॥ ७२ ॥ मागत्याचे इच्छेनें दानें । भोक्तियाचे [14]रुचीनें [15]अशनें । धर्मराजें राजसूययज्ञें । [16]तोषविलें त्रिजगातें ॥ ७३ ॥ ऋषी राजयांच्या कोटी । भोजनें करिती सुवर्णताटीं । अन्नें मागतां अमृतासाठीं । 'नेदुं' ह्मणती देवांतें ॥ ७४ ॥ सर्व समान एकपंक्ती । द्रौपदी वाढी आपुले हस्तीं । कौरवें कल्पूनियां कुमती । बळें कुविद्या मांडिली ॥ ७५ ॥ सहस्र पदार्थ सहस्रजणीं । मागीतले एकेच क्षणीं । सहस्र व्याघ्र गर्जतां वनीं ।

---

१. 'त्रयोदश गुण–कटु, तीक्ष्ण, उष्ण, मधुर, क्षार, कषाय, वातघ्न, कफनाशन, कृमिहर, दुर्गंधिनाशन, मुखभूषण, शुद्धिकरण, कामसंदीपन. २. 'रखितां बोले सहस्रपर्णें' असा ही पाठ आहे. ३. 'त्रयोदशगुणी विडा'–पूगीफल (सुपारी), नागवेलीचीं पानें, चुना. कात, जायफळ, जायपत्री, वेलची, केशर, कंकोळ, कर्पूर, लवंगा, बदाम, पिस्ते किंवा खोबरें. तांबूलाचे गुण वर्णिले आहेत ते असेः—"ताम्बूलं मुखरोगनाशि निपुणं संवर्धनं तेजसो नित्यं जाठरवन्हिवृद्धिजननं दुर्गन्धदोषापहम् । वक्त्रालंकरणं प्रहर्षजननं विद्वत्कृपाप्रेरणे कामस्यायतनं समुद्भवकरं लक्ष्माः सुखस्यास्पदम्" ॥ ४. भिकारी. ५. सार्वभौमराजा. पृ. ८ टी. २ पहा. ६. जन्मेजया. ७. या सहा अग्नींची नामें:–आरंभणीय, क्षत्र, धृति, व्युष्टि, द्विरात्र, आणि दशपेय. [अध्याय ३५-श्लोक १६ टीका पहा.] ८. श्लोक १९ पहा. ९. पाटांवें. १०. 'दिव्यवसनें' असाही पाठ आहे. ११. वक्षस्थलसंबंधीं भूषणें (ज्यांस पदकें असे म्हणतात तीं). १२. 'अनंत' असाही पाठ आहे. १३. गज. १४. 'इच्छेनें' व 'प्रीतीनें' असें पाठभेद आहेत. १५. भोजनें. १६. 'ते शांति संपूर्ण हव्यवाटीं' असाही पाठ आहे.

जेवीं हरणी वोथरे[1] ॥ ७६ ॥ कोणी भक्ष्य कोणी भोज्य । कोणी दुग्ध कोणी आज्य' ह्मणती 'वहिनी! हें काज । तुमचें नोव्हे वाढावया' ॥ ७७ ॥ एक वृषभ[2] एका रुखा[3] । झगडतां थरकती सकळ शाखा । पंच कुंजर भिडतां देखा। ठाव नुरे कर्दळीचा ॥ ७८ ॥ तेवीं तुह्मास झाले राती । यालागीं शरीरीं नाहीं शक्ती । असो आज तुमचे हस्तीं । ऐकादशी[4] आमुतें' ॥ ७९ ॥ घेऊनि सुवर्णपंचपाळें । वाढूं जातां हस्तचपळें । कंचुकीचें तेचिवेळे। बिरडें सु-

१. घाबरे. २. बैल. ३. वृक्षा. ४. उपोषण. ['एकादशी' या शब्दाचा लक्षणेनें 'उपोषण' असा अर्थ घेणें इष्ट आहे. तेव्हां उपोषण हा लक्ष्यार्थ होय. "शास्त्राकारांनीं अर्थाचे तीन प्रकार सांगितले आहेत. **वाच्यार्थ, लक्ष्यार्थ** आणि **व्यंग्यार्थ**. ह्यांचीं लक्षणें व उदाहरणें. **१ वाच्यार्थ**—शब्दांचा जो संकेतित अर्थ त्यास **वाच्यार्थ** किंवा **मुख्यार्थ** असें म्हणतात. जसें गाय, घोडा, बैल काळा, पिंवळा, आकाश, वायु, हंसणें, बोलणें इत्यादि शब्दांपासून व्याकरणादिकावरून जो अर्थ कळतो तो **वाच्यार्थ** होय. **२ लक्ष्यार्थ**—जेव्हां भाषेंतील **रूढी**वरून किंवा कांहीं गूढ अभिप्राय सुचविण्याच्या **निमित्ता**नें वक्ता असे कांहीं शब्द किंवा वाक्यें उच्चारितो कीं, त्यांचा **वाच्यार्थ**च घेतला तर वक्त्याच्या तात्पर्यार्थानें तो बाधित होतो म्हणजे, तात्पर्यार्थास तो जुळत नाहीं, तेव्हां, त्यास जुळेल असा त्या शब्दांचा दुसरा अर्थ कल्पावा लागतो त्यास **लक्ष्यार्थ** म्हणतात. यावरून **लक्ष्यार्थ** करण्यास तात्पर्याचा **बाध** आणि **रूढी** किंवा वर सांगितलेलें **निमित्त** ह्यांपैकीं कोणतें तरी एक कारण, ह्या तीन गोष्टी लागतात, हें चांगलें ध्यानांत ठेविलें पाहिजे. **रूढीने**, जसें-'मी वाड्यावरून घरीं आलों,' असें वाक्य म्हणण्याची भाषेंत **रूढी** आहे. ह्यांत 'वरून' शब्दाचा **वाच्यार्थ** घेतला तर वाड्यावर चढून आलों असा अर्थ होईल. तो वक्त्याच्या तात्पर्यार्थास जुळत नाहीं, म्हणून तो बाधित आहे. ह्याकरितां 'वरून' शब्दाचा 'जवळून' असा अर्थ घ्यावा लागतो हा **लक्ष्यार्थ** होय. तसेंच 'मी हा व्यापारांत बुडालों,' 'इंग्लंडानें हिंदुस्थान डोक्यावर घेतलें,' इत्यादि वाक्यें आणखी **रूढी**चीं उदाहरणें समजावीं. **निमित्ता**नें जसें 'रामा तर आतां गाय झाला आहे,' 'तुम्ही तर फार शाहणे झालां,' ह्या वाक्यांतील पहिल्यांत वक्त्यास—रामाची दीनावस्था, दुसऱ्यांत श्रोत्याची मूर्खता, हा गूढ अभिप्राय सुचविणें आहे, त्याशीं वाक्यार्थ बाधित असल्यानें 'गाय' शब्दाचा गुणासादृश्यावरून 'दीन' आणि 'शाहणे' शब्दाचा 'मूर्ख' असा अर्थ घेतला जातो तो **लक्ष्यार्थ** होय. **३ व्यंग्यार्थ—वाच्यार्थ** आणि **लक्ष्यार्थ** ह्या दोन्ही अर्थांहून भिन्न जो प्रतीत मात्र होणारा अर्थ तो **व्यंग्यार्थ** होय. जसें एक दुसऱ्यास म्हणतो कीं 'तुमच्या तोंडावर मूर्खत्वाचें प्रतिबिंब दिसतें.' हा म्हणतो कीं, 'माझें तोंड कांच आहे तें मला आजच समजलें.' ह्याउत्तरांत 'तूंच मूर्ख आहेस' हा जो अर्थ निघतो हा शब्दांचा संकेतित अर्थ नसल्यामुळें **वाच्यार्थ** नाहीं व येथें तात्पर्यार्थाचा बाध नसल्यामुळें **लक्ष्यार्थ**ही नाहीं. तर, तिसराच प्रतीयमान अर्थ आहे. ह्यास **ध्वन्यर्थ**ही म्हणतात." [रसप्रबोध].

टलें लगबगां ॥ ८० ॥ झाली शंकेची [1]झेंडपणी । लज्जा झोंबिनली [2]येक्षिणी । मर्यादेची माय राणी । उघडूं नेदी दृष्टीतें ॥ ८१ ॥ अन्नपात्रीं गुंतले कर । ढळला मस्तकींचा पदर । तेवेळीं चिंतूनि **याद**वेश्वर । **कृ**ष्णवदन पाहिलें ॥ ॥ ८२ ॥ **म**धूसूदन [3]पंचाक्षरी । स्मरतां संचरला अंतरीं । दोन भुजा भुजांवरी । निघल्या झाल्या तात्काळीं ॥ ८३ ॥ बिरडें घाढूनियां वेगा । पुढें माजविली [4]पीयूषगंगा ॥ **कौ**रवदुर्बुद्धिपापसंगा । भंगावया लोटली ॥ ८४ ॥ **कृ**ष्णकृपेचे सामर्थ्यें । आणीक चमत्कार झाला तेथें । वर्तला तो अति अद्भुतें । **ज**न्मेजया ! परियेसीं ॥ ८५ ॥ एकएका पात्राप्रती । एक एक **द्रौ**पदीची मूर्ती । वाढिती झाली अपराहस्तीं । आवडे तो पदार्थ ॥ ८६ ॥ सूर्यप्रभा सहस्रकरीं । तमातें ताडी मुखावरी । तंव लाजोनी ब्रह्मांडपुरीं । मुख सन्मुख दावीना ॥ ८७ ॥ कीं **स**हस्रशी [5]शेषांचिया शक्ती।[6]हळवट करूनि सांडी क्षिती। कीं **स**हस्रमुखीं [7]**भा**गीरथी । पर्वत लोटी पापांचे ॥ ८८ ॥ [8]**शुं**भ **नि**शुंभाचिये **मौ**ळीं । पाय पिटी **भ**द्रकाळी । तेवीं अवमानी **पां**चाळी । **कौ**रवांची कुविद्या. ॥ ८९ ॥ जोजो पदार्थ आवडे तोंडा । त्याचे पर्वत पाडिले पुढा । **भी**म ह्मणे 'सांडितां मूढा । शिखा उपडीन हस्तकें' ॥ ९० ॥ लाजे झालीं अधोमुखें । तुटलीं अभिमानाचीं [9]तुकें । अंतरें मलिनतेच्या पंकें । तेजहीनें भासती ॥ ९१ ॥ युद्धीं हारी पातल्या सुभटा । कीं [10]दिव्यां न उतरतां होय [11]खोटा । सभेसन्मुख जेवीं म्लानता । आननीं दिसते पुरुषाच्या. ॥ ९२ ॥ **भी**ष्म ह्मणे, 'जोडल्या हस्तीं । वंदा **द्रौ**पदी महासती । प्रत्यक्ष जाणा हे **पा**र्वती । **अ**न्नपूर्णा निर्धारें. ॥ ९३ ॥ हे संतोषलिया

---

१. झांप. २. जखीण. ३. मांत्रिक, पिशाचबाधा घालविणारा मंत्री. ४. अमृतनदी हें रूपकाचें उदाहरण आहे. ५. शेषाचि. (शेषाला, सहस्र शिरें आहेत अशी प्राचीन समजूत आहे.) ६. हलकी, क्षुद्रा. भागीरथी समुद्राला हजर मुखांनीं मिळते या समजूतीकडे लक्ष्य आहे. ७. गंगानदी [भगीरथानें आणलेली म्हणून भागीरथी. गंगेला विष्णुपदी जन्हुतनया, त्रिपथगा इत्यादि अनेक नांवें आहेत. गो. र. न. प्रकाशित मेघदूत–टीपा पृ० ६३–६६]. ८. शुंभ आणि निशुंभ हे दोघे असुर भ्राते होते. यांना पुरुषापासून मरण येणार नाहीं असा ब्रम्हदेवाचा वर होता, म्हणून हे देवांस, लोकपालांस (इंद्रादिकांस) त्रास देऊं लागले. तेव्हां देवांनीं देवीचें स्तवन करून तिजकरवीं कालरात्रि अथवा कालिनामक शक्ति उत्पन्न करविली. या कालीनें मोहक रूप धारण करून त्यांस मोहून टाकण्याचा प्रयत्न केला. पण त्यांत ही देवी आहे–मनोहर स्त्री नव्हे–असें त्यांस कळलें. पुढें देवीचें आणि यांचें युद्ध झालें त्यांत हे दोघे भाऊ मरण पावले–अशी कथा आहे. ९. पारडों. १०. अग्नीतून बाहेर येणें. Ordeal. ११. लहान चोर.

[1]परम मंगळ, । रोषल्या प्रळयाग्नीची ज्वाळ, । कृष्णकृपावल्ली सफळ । ईतें वेष्टुनि वाढली. ॥ ९४ ॥ ईच्याठाईं विपरीत भावो । कल्पितां घडे सध्यां अपावो । दीपकलिका चुंबितां [2]वावो । [3]हव्यास होय मशकाचा' ॥ ९५ ॥ यापरी धर्मयागीं द्रौपदी । [4]निवेदी दिव्यान्न समृद्धी । ते उपमा न वदवे शब्दीं । [5]ब्रह्ममुखासारिख्या ॥ ९६ ॥ परिमळा घेऊनि वसंत । यज्ञागारीं फेरे देत । घमघमा स्वर्गा आंत । [6]आंवेतूं म्हणे अमरांतें. ॥ ९७ ॥ शर्करेचिया वाळवंटीं । घृतसरिता धांवती लोटीं । दुग्धनदीच्या संगमबेटी । [7]पायसान्नें निपजलीं ॥ ९८ ॥ दधिमधूचें सरोवर । समुद्रतुल्य महाथोर । कोरूनि कनकाचे गिरिवर । हेम रांजणीं [8]शिखरिणी ॥ ९९ ॥ [9]ओदनाचे चंद्राचळ । [10]वरान्नाचे [11]कनकाचळ । [12]नवनीताचे हिमाचल । [13]द्रोणाचळ [14]शाकांचे ॥ १०० ॥ [15]आणीक भक्ष्यांचे पर्वत । भंगूं न शके [16]अमरनाथ । तोही [17]अर्जुनरूपें तेथ । वाढावाढी करीतसे ॥ १०१ ॥ वज्र खंडोनि हस्तकीं । दर्शन झाले भोक्तयामुखीं । आवडी वेधले स्वादसुखीं । दिव्य भक्ष्य भक्षावया ॥ १०२ ॥ घारिया ह्मणती, 'अमृत[18]भक्षा । व्यर्थ झालासी सहस्राक्षा ! । [19]आमुचें रूप होवोनि मुक्षा । सेव्य श्रेष्ठा नोहेसी' ॥ १०३ ॥ हृदय वोपोनि भगवंतीं । घारगे घारयाचे प्रीती । येऊनि धर्म यागाप्रती ।

---

१. सर्व मंगळ असाही पाठ आहे. २. व्यर्थ, पोकळ. ३. उद्योग. ४. अर्पण करी. ५. ब्रह्मदेवासारिखीं चारमुखें जाला आहेत त्याला. ६. बोलावूं 'आंवतूं जा अमरावती' असाही पाठ आहे. ७. परमान्न. ८. शिकरण. ९. भाताचे. १०. वरणाचे. ११. मेरुपर्वत. १२. लोण्याचे. १३. द्रोणाचळावर नानाविध औषधी असत. त्यांत मृतसंजीवनी नामक मेलेल्या प्राण्यांस जीवंत करणारी औषधी होती, यास्तव तो पर्वत मारुतीनें उचलून लंकेंत समरांगणीं निश्चेष्ट पडलेल्या लक्ष्मणाचें पुनरुज्जीवन करण्यासाठीं आणिला. अशी या पर्वताची प्रसिद्धि आहे. १४. भाज्यांचें १५. 'अनेक' असाही पाठ आहे. १६. इन्द्र [इन्द्र हा पर्वतांचा शत्रु–नगभिद् ही गोष्ट ध्यानांत असली पाहिजे.] अर्जुन हा इन्द्रप्रसादप्राप्त कुंतीपुत्र, [मुक्तेश्वर–आदिपर्व–पृ. २१९-२२०] तेव्हां तो त्याचा पुत्र होय. पिता पुत्ररूपानें पत्नीच्या उदरीं जन्मास येतो–या श्रुतिवचनानुसारें अर्जुन हा इन्द्ररूप होय. 'अंगादंगात्संभवसि हृदयादधिजायसे । आत्मा वै पुत्रनामासि स जीव शरदां शतम् ॥ हें वेदवचन. जातकर्मसंस्कारसमयीं ब्राह्मण ह्मणतात. पिता पुत्राला संबोधून ह्मणतोः–'हे पुत्रा ! माझ्या प्रत्येक अंगापासून तुझा संभव आहे, तूं हृदयापासून झालास, तूं माझें प्रति बिंब आहेस, यास्तव शंभर वर्षें वांच' असा या वचनाचा भावार्थ. १७. दांत १८. हे अमृत भक्षण करणाऱ्या [इन्द्रा] १९. 'आमुचें दुःख होऊनि मुख्या' असा अन्य पाठ आहे.

प्रिय झाले पितरां ते. ॥ १०४ ॥ स्वाद निघाला महापंथा । [1]मध्यछिद्राचिया सकुमार कंथा । तेथूनि पातला वदनतीर्था । आज्यसायुज्यसंगती. ॥१०५॥ पूर्णचंद्राचीं मंडळें । कथिका [2]वेटक अतिसोज्वळें । प्रेमें द्रवतां अमृतफलें । रूप झालें कथिकेचें. ॥ १०६ ॥ पूर्णचंद्राचिया राती । गगनीं भरे शुभ्र दीप्ती । ते काढोनि कुशळहातीं । रूप केलें मांडिया. ॥ १०७ ॥ भरितें माजला क्षीरसिंधु । माजी पहुडला परमानंदु । तेवीं गुळवरियामाजील सुस्वादु । दे आनंद भोक्तयां ॥१०८॥ [3]मैलमासीं दानासि योग्य । छिद्रसंख्या वरुषें चांग । दानदेत्या दे सौभाग्य । सूर्यलोकीं नांदवी. ॥ १०९ ॥ अंतरीं अनुभवाची गोडी । म्हणोनि लोक दृष्टी मुरडी । कानवले नव्हेची हेविकडी । कींनवले प्रपंचीं. ॥ ११० ॥ बाह्य दिसती येरां ऐसे । परि ते अंतरीं अनारिसे । अनंत सद्गुणी खसखसे । उभयभागीं डवरिले. ॥ १११ ॥ खाज्या करंज्या अमृतफळें । घृतपूरिया हो सकळें । खर्जुरी द्राक्षा जंबूफळें । गोधूमसारें निर्मिलीं. ॥ ११२ ॥ गोडांवीबीजें [5]चारेबीजें । गंगाफळाचीं सोलींव बीजें, । [6]अक्षोटकें उभयबीजें । फणसबीजें वळियेलीं. ॥ ॥ ११३ ॥ लड्डुक देखूनि विनायक । नृत्य करीत प्रसन्नमुख । हस्तशुंडा प्रचंड मोदक । झेलीतसे आवडी. ॥ ११४ ॥ खसखस बदरीफळ बीजाचे । सुकुमार पद्मिणीकंदाचे । तिळवे निःशेष तिळगुळाचे । शर्करेचे बतासे. ॥ ॥ ११५ ॥ सूक्ष्म सेवयाचे सुरसपूर । चणकपिष्टाचे अरुवार । लाडू भक्षितां जेवणार । वेडाविती गणेशा. ॥ ११६ ॥ सत्यवृत्ती पूर्णपोळिया । स्वानंद-बोधें पूर्ण भरलिया । त्यामाजी भजन भूतदया । वेळा मिरीं घमघमीत. ॥ ॥ ११७ ॥ वळवटें वळिलीं कुशलहस्तीं । एक सारंगशृंगाकृती, । एक पैं

---

१. 'शतछिद्राचियां' असाही पाठ आहे. २. वडा. ३. मलः दुष्टो मासः=मलमास= अधिकमास या महिन्यांत धर्मकर्में होत नाहींत म्हणून याला 'मलमास' म्हणतात. "अधि-कमास यास धोंडा, मलमास व पुरुषोत्तममास असें म्हणतात. ते १२ वर्षांत चैत्र, ज्येष्ठ व श्रावण हे अधिक होतात. १८ वर्षांनीं आषाढ अधिक येतो. २४ वर्षांनीं भाद्रपद अधिक येतो. १४१ वर्षांनीं अधिक आश्विनमास येतो. व ७०० वर्षांनीं अधिक कार्तिकमास येतो. आश्विन व कार्तिक हे दोन महिने अधिक आले तरी त्यांस अधिक म्हणत नसून भाद्रप-दापर्यंत मात्र अधिक म्हणतात. ज्या वर्षीं अधिक आश्विन पडतो त्या वर्षीं अधिक पौष-क्षय होतो. आणि याप्रमाणें त्या दोन्ही महिन्यांचीं धर्मकर्मेंही एकाच महिन्यांत करितात. या जोडमासाचें नांव सवसर्प आहे. कार्तिकापुढील चार महिने अधिक नाहींत. व आ-श्विनाचे पूर्वी क्षय मास होत नाहींत." ऐ. गो. भाग २ पृ. १४४] ४. करंज्या. ५. चारोळ्या. ६. अक्रोड.

गंगे अतौती । विकाशलीं शतपत्रें[1]. ॥ ११८ ॥ एक विंधिलीं मुक्ताफळें । एक स्वयंभ सोज्वळें । एक पत्रें सूत्रें मवाळें[2] । दुग्धोदकें धूतलीं. ॥ ११९ ॥ क्षीरसमुद्रीं तारांगणें । बिंबोनि भासती एकवर्णे । कीं ब्रह्मानंदें मुरालीं मनें । देहाकृती वेगळाल्या ॥ १२० ॥ अमृतीं आळली मुक्ताफला । हा दृष्टांत न मने[3] कुशला । तें कठीण हें कोमला । अति अरुवार[4] सेवितां ॥ १२१ ॥ थिजलीं विघरलीं सद्यस्तप्तें[5] । नवनीताची चत्वारी घृतें । दुग्धसारें म्हणती हातें । होय परतें अमृता. ॥ १२२ ॥ बहुसाल ठेवणीं कळकटलें[6] । शिळें म्हणोनि पवित्रीं त्यजिलें । काळकूटाचे तुळणी तुळलें । तें अमृत कायसें? ॥ १२३ ॥ क्षयरोगें सेवितां चंद्रवृष्टी । चाखतां लागे राहुचे कंठीं । पुण्य सरतां उठाउठीं । उलथोनि पाडी लोकांतें. ॥ १२४ ॥ म्हणऊनि अमृताची तुळणा । तुळितां वाटे अयोग्य रसना । स्वेच्छा[7] सेवावया मिष्टान्ना । दैवें भूदेव[8] पैं झालें. ॥ १२५ ॥ अन्नें[9] द्यावें अन्न भक्षावें । अन्नापरतें नाहीं बरवें । अन्न परब्रह्म हें स्वभावें । वेद बोले निश्चिती. ॥ १२६ ॥ अन्नचि एक परब्रह्म । यावेगळा सर्वही भ्रम । अन्नोदकीं सुख विश्राम । त्यावीण श्रम सर्वही ॥ १२७ ॥ उबगोनियां[10] अमृतपाना । अमर इच्छिती कथिकोदना[11] । मृत्यू लोका वेगळी जाणा । तृप्ती नाहीं द्यूलोकीं[12]. ॥ १२८ ॥ स्वर्गा आणि पाताळांत । नाहीं अन्नसुखाची मात । म्हणोनि देवांचा मनोरथ । जन्म इच्छी भूतळीं. ॥ १२९ ॥ अग्नीमाजी घालोनि तोंडें । ग्रास घेती अन्नचाडें, । द्वारीं सांडिलीं तीं कोडें । शितें हातें वेंचिती. ॥ १३० ॥ म्हणोनि दुर्लभ तींहीं लोकां । अन्न ब्रह्मस्वरूप देखा । मुख्य हरिहरब्रह्मादिकां । इच्छा उपजे अन्नाची. ॥ १३१ ॥ दध्योदनालागीं[13] हरी । गोवळा झाला गोवळियांघरीं । अधिकार धरूनि धर्माघरीं । यज्ञउच्छिष्टें काढित. ॥ १३२ ॥ अष्ट वटक[14] अष्ट शिखरिणी । पंच भक्ष पंच वरान्नी[15] । दशप्रकार शाखाश्रेणी । जे कां षड्रस[16] बोलिजे. ॥ १३३ ॥ अनेकपरीच्या कोशिंबिरी । लवणशाखा सहस्रवरी । कुटें आणी सांबारीं । रायतीं तेथें विचित्रें. ॥ १३४ ॥ पापड सांडगे सांडया । तिळवडे कडकणें कुरवडिया । मिरगुंडी मुगवडिया । का-

---

१. कमलें. २. मृदु. ३. न माने. ४. सुंदर. कोमल मृदु. ५. लोणकढीं, ताजीं, ६. कळंकलें. ७. आपुली इच्छा. ८. ब्राह्मण. ९. 'आनन्दाचें अन्न' असाही पाठ आहे. १०. टाकून, त्रासून, कंटाळून. ११, ताकभात. १२. स्वर्गपाताळीं. १३. दहींभातासाठीं. १४. वडे. १५. वरणें. १६. सहारस—रस सहा आहेत त्यांचीं नांवें:—'रसाः स्वाद्वम्ललवणतिक्तोषणकषायकाः । षड् द्रव्यमाश्रितास्ते तु यथापूर्वं बलावहाः ॥ [वाग्भट=सूत्रस्थान—अध्याय १ श्लोक १४-१५]; गोड, आंबट, खारट, कडु, तिखट, तुरट असे द्रव्यांमध्यें सहा रस आहेत.

चरीया सुतळीवा. ॥ १३५ ॥ तक्र शक्रासी दुर्लभ देखा । म्हणोनी ब्रह्म-याचे दिवसा एका । माजी चौदाइंद्र मनुष्यलोका । तक्रपाना धांवती. ॥ १३६ ॥ भूलोकींचें परमामृत । म्हणोनि देव द्वापारांत । गोकुळीं गोपाळ कृष्णासहित । तक्रपाना भूलले. ॥ १३७ ॥ यापरी धर्मराजयज्ञीं । तृप्ती कोंदली त्रिभुवनीं । 'घ्या घ्या भक्षा हेचि ध्वनी' । सर्वांमुखीं ऐकिजे. ॥ १३८ ॥ एक संवत्सरपर्यंत । महोत्सव मांडिला तेथ । न्यून एकची जो दृष्टांत । द्यावया तेथें असेना. ॥ १३९ ॥ उच्छिष्ट काढितां श्रीकृष्ण । सांडोनि थोरपणाचा मान । निरभिमान श्रीभगवान । हें साचार दाखवी. ॥ १४० ॥ खोंवोनि पीतांबराचे सोगे । कौस्तुभमाळ टाकिली मागें । उच्छिष्टें काढी लगबगें । पुढती पंक्ती बैसावया. ॥ १४१ ॥ पात्रें वाढितां सवेगें । षड्रसें लिंपिलीं सर्वांगें । अन्नें ब्रह्म मीं हें आंगें । प्रगट दृष्टी दावितु. ॥ १४२ ॥ कीं विश्वाचा प्रतिपाळिता । मीच सर्वांचा अन्नदाता । ऐसिया दाऊनि संकेता । काढाकाढी करीतसे. ॥ १४३ ॥ एक लक्षाची एक पंक्ती । ऐसिया पंक्ती नेणों किती । संख्या होतां व्योमपंथीं । स्वर्गघंटा घणाणी. ॥ १४४ ॥ कौतुक पहावया त्वरित । शुक योगींद्र पातला तेथ । भीतरी जावया न फुटे पंथ । म्हणोनि बाहेर थोकला. ॥ १४५ ॥ कृष्णहस्तींच्या पत्रावळी । पडल्या उच्छिष्ट बडवाळी । शुक बैसोनि तयांजवळी । उच्छिष्ट शितें वेंचितु. ॥ १४६ ॥ एक शीत घालितां वदनीं । घंटाघोष लागला गगनीं । धर्म म्हणे, 'चक्रपाणी । हें आश्चर्य कायसें'? ॥ १४७ ॥ लक्षा उमटे एक शब्द । आतां अखंड घंटानाद । कृष्ण म्हणे, 'ब्रह्मवृंद । आला असेल एखादा. ॥ १४८ ॥ जाति-

---

१. 'धांवले' असाही पाठ आहे. २. खरोखर, सत्य. ३. 'घर्मे दाटलीं सर्वांगें' असाही पाठ आहे. ४. 'अन्नं वै विराट्' अशी श्रुति आहे. ५. कृष्णानें धर्मराजाच्या यज्ञांत उष्टीं काढण्याचें काम पत्करिलें होतें असें वर्णन पंताच्या काव्यांत अनेक ठिकाणीं आढळतें:— (१) 'तिहीं अमित काढिल्या नृपमखांत पत्रावळी' [केकावली-७]. (२) मोक्षद तीर्थपद प्रभु जो सुरपंक्तीमधें सुधा वाढी । कवि म्हणति तो चतुर्भुज विप्रोच्छिष्टेंहि त्या मखीं काढी. ॥ [मंत्रभागवत—दशमस्कंध.] (३) करिन ब्राह्मणपादप्रक्षालन सांवडीन मी उष्टीं. [सभापर्व— अ० २ गीति ११.] ६. कृष्ण. 'चक्रपाणि' हें तद्गुणसंविज्ञान बहुव्रीहि समासाचें उदाहरण आहे. ज्या वर्णिलेल्या गुणाचें संविज्ञान (चिन्ह, खूण) ज्याच्या विशेष्यांत नित्य सांपडते तो 'तद्गुणसंविज्ञान' बहुव्रीहि समास होय. येथें हातांत चक्र असणें हा जो गुण सांगितला तो कृष्ण या विशेष्यांत नित्य आढळतो. बहुव्रीहि समासाच्या दुसऱ्या प्रकारास 'अतद्गुणसंविज्ञान' असें म्हणतात.

मात्र जे ब्राह्मण । ते एक शत संख्या जाण । त्यांतुल्य एक वेदसंपन्न । ग्रंथत्रयजाणता. ॥ १४९ ॥ वेदपाठक शतगुणी । अर्थज्ञ पंडित जाणता ज्ञानी । त्याहूनि विशेष अनुष्ठानी । क्रियावंत आगळा. ॥ १५० ॥ करणीवंत एकशत । त्या-तुल्य एक इंद्रियजित । सदाचारी शुचिर्भूत । जो शमदमा आगळा. ॥ १५१ ॥ जितेंद्रिय एकशत । त्यां तुल्य एक विष्णुभक्त । निर्मत्सर भेदरहित । सर्वांभूतीं समदृष्टी. ॥ १५२ ॥ त्या शतगुणीं नरपार्थिवा ! । ब्रह्मनिष्ठ वरिष्ठ सर्वां । ऐसा एकादा पांडवा ! । आला असेल या ठाया.' ॥ १५३ ॥ याज्ञवल्कि येथें अध्वर्य । शुक अथवा कपिलाचार्य । आला असेल दत्तात्रय । आतां शोधुनी पाहावा. ॥१५४॥ धर्मराज श्रीकृष्ण दोनी । बाहेर पातले[1] पहात धरणी[2] । उच्छिष्टपत्रावळीच्या भुवनीं । श्रीशुकस्वामी देखिला. ॥ १५५ ॥ धर्में धांवोनि धरिले चरण । श्रीकृष्णें दीधले आलिंगन । मंडपा आणोनिं पूजन । केलें हस्तें आपुलिया. ॥ १५६ ॥ बैसविला व्यासानिकटीं । परम आल्हाद सकळां पोटीं । जैसा पातला धूर्जटी[3] । परमानंद सुरवरां[4]. ॥ १५७ ॥ यापरी सारिलीं सुखभोजनें । तांबूल माळा हरिचंदनें । भीष्म निरोपी धर्मवचनें । अहेर वोपी समस्तां. ॥ १५८ ॥ ते अग्रपूजाप्रसंगीं जाणा । प्रथम मान मधुसूदना । देतां शिशुपाळ दुष्टवचना । वदतां नाश पावेल. ॥ १५९ ॥ तें कौतुक परिसिजे संतीं ॥ सादर श्रवणाचिये आर्तीं । जैसी दुर्बळाची विनंतीं । हृदयीं धरी धर्मात्मा. ॥ १६० ॥ भारतकथाशशिमंडळीं । पर्वें सर्व सकळां सकळी । वाढती त्यामाजी चंद्रमौळी । द्वितीय माथा मिरवतु. ॥ १६१ ॥ तेवीं द्वितीयपर्वीं सहजें । बीज उगवलें भावार्थ-बीजें । म्हणोनि[5] महंतीं मानिजे । मस्तकीं प्रेम आवडी. ॥ १६२ ॥ मुखीं नखीं दोहीं स्तनीं । चंद्रउपमा बोलती ज्ञानी । तेवीं जीर्ण नूतन वाणी । वाग्देवीचा विलासु. ॥ १६३ ॥ श्री आदिकवीचें विरचित । मुगुटीं वंदिती गुरू महंत । मुक्तेश्वराचा वचनार्थ । पदनखचंद्रीं वसोंद्या. ॥ १६४ ॥ जेणें वाढे उत्कट भक्ती[6] । तो तो विशेष लिहिला ग्रंथीं । नावडे तें स्वहस्ती । खोडोनि दूर करावें. ॥ १६५ ॥ इति श्री सभापर्व भारतीं ।

---

१. 'निघाले' असाही पाठ आहे. २. पृथ्वी. ३. महादेव. ४. देवश्रेष्ठां. ५. 'म्हणोनि मस्तकावरि मानिजे । आर्तवंती आवडी' असाही पाठ आहे. ६. या अध्यायाचा उत्तरभाग म्हणजे सुमारें अखेरच्या ९० ओव्यां इतका भाग मुक्तेश्वरानें आपल्या पदरचा घातला आहे असें या ओवीवरून स्पष्ट होतें. भक्तिभावाच्या वृध्यर्थ

यागीं मागध[1] प्रथम आहुती[2]। शिशुपाळ राजा पूर्णाहुती। होमिजेल तें ऐकी[3]. ॥ १६६ ॥

---

## अध्याय दहावा.

मयनिर्मित सभास्थानीं। बैसल्या ऋषि रायांच्या श्रेणी[4]। जैसे शक्राचिया सदनीं। त्रिदशदशे ओथिले[5]. ॥ १ ॥ सूर्यपुटाचीं रातोत्पळें। चांदवा झळकती मुक्ताफळें। दिव्यास्तरणें मृदुवाळें। ओटांगणें गादिया. ॥ २ ॥ उदेयास्तव पीक दानें। तांबूलपात्रें जडितरत्नें। आसनाप्रती भिन्न भिन्नें। प्रकाशमानें झळकती ॥ ३ ॥ हिरे कोरोनि मत्स्याकृती। विडे भरोनि देती हातीं। परिमळपेटिया वोप देती। तेजें आणी सुवासें. ॥ ४ ॥ भीष्म ह्मणे, 'गा! पुत्रै[7]पुत्रा! आचार्य ऋत्विज सुहृत् मित्रा। यथायोग्य अतिपवित्रा। पूजासंभार समर्पी. ॥ ५ ॥ किरीट कुंडलें कंठमाळा। अंगदें[8] कंकणें कटिं मेखळा[9]। करमुद्रिका नरशार्दूळा!। सत्यभूषणें[10] सतांगीं[11]. ॥ ६ ॥ सतांगींचीं[12] नरभूषणें।

---

कवीनें हा मजकूर प्रसंगास अनुरूप असा समजून घातला आहे. याला मूळांत आधार नाहीं. द्रौपदीच्या कंचुकीचें बिरडें सुटणें, तिची द्विजपंक्तीस अन्न वाढीत असतांची धांदल, कौरवांनीं तिचा केलेला उपहास, कृष्णाच्या प्रसादानें तिला भुजद्वयाचा लाभ, प्रत्येक पक्वान्नाची स्वतःच्या अपूर्व गुणांविषयीं प्रौढि, शुकमुनीचें आगमन व भोजन इत्यादि वर्णन हें मुक्तेश्वराच्या कवित्वस्फूर्तीचें द्योतक होय. यांत भोजनाच्या थाटाचें जें वर्णन केलें आहे त्याजवरून मुक्तेश्वराच्या काळीं शिष्ट भोजनप्रसंगीं कोणते पदार्थ आदरार्ह होते याचा बोध होण्यासारखा आहे. मुक्तेश्वरानें ज्या अनेक पक्वान्नांची स्तुति गाइली आहे तीं त्या काळीं चांगलीं प्रचारांतील असलीं पाहिजेत. या देशांतील भोजनसंप्रदायाच्या आणि पाकशास्त्राच्या इतिहासांत कोणते फेरफार झाले आहेत याचें सूक्ष्म निरीक्षण करणाऱ्या शोधकास अशीं वर्णनस्थलें फार उपयुक्त होत.

१. जरासंध. २. पहिला बळि. ३. येथें 'राजसूयपर्व' समाप्त होऊन 'अर्घाहरणपर्वा'स आरंभ होतो. ४. पंक्ती. ५. मिळाले. ६. लोडें. ७. हे धर्मा ८. केयूर='हा एक दंडामध्यें घालण्याचा दागिना आहे. हा बाजुबंदाच्या आकाराचा असून त्याच्या दोन्ही तोंडांस सिंहाचें किंवा दुसऱ्या जनावराचें तोंड करून बसवितात. हाकधीं कधीं जडावयाचा केलेला असतो. त्याला गोंडा नसला म्हणजे 'अंगद' म्हणतात.' (देशी हुन्नर–पृ० ४७ पहा.) ९. कमरपट्टा. १०. 'सप्तभूषणें' असाही पाठ आहे. सभेचीं सप्तांगें–विद्वान्, कवि, भट्ट, गायक, परिहासक, चिकित्सक आणि दैवत–हीं आहेत. हींच सप्तभूषणें कदाचित् असतील. ११. 'सप्तांगीं' असाही पाठ आहे. १२. 'सप्तांगींचीं' असाही पाठ आहे.

मुक्ताफळें [1]पट्टकूलवसनें । निकटासनीं [2]अंगनारत्नें । [3]प्रकृतिपुरुषा गौरवीं. ॥७॥ पादाग्र [4]गुल्फनळिका कंठीं । बोटें मनगटें बाहुवटीं । कंठ नासिक [5]श्रवणपुटीं। भाळ मस्तकीं वेणिका. ॥ ८ ॥ द्वादशांगीं स्त्रीभूषणें । परिधान कंचुकी [6]बुंथी [7]वैरणें । आंतर वासादि पंच [8]वसनें । तकटांबरें अर्पावीं ॥ ९ ॥ कनक पात्रीं भिन्नभिन्नें । यथायोग्य वस्त्राभरणें । पूजासन्मान [9]वायनदानें । विस्तारिलीं भीष्माज्ञा. ॥ १० ॥ आच्छादोनि चित्रांबरीं । तबकें मांडिलीं एकहारीं । जीं देखतां [10]दिनकरीं । येणें कीजे पश्चिमे. ॥ ११ ॥ धर्म म्हणे, 'जन [11]कंजनका ! । विवेककुशला ! कुरुनायका ! । आज्ञा कीजे मज बाळका । प्रथम पूजा कवणातें'? ॥ १२ ॥ भीष्म बोले सुवाचा रोषें, । 'बाळचि म्हणोनि पुससी ऐसें । सचंद्र तारा देखतां [12]नयनेशें । श्रेष्ठ कोण तें विचारसी? ॥ १३ ॥ कृष्णा वेगळा त्रिभुवनीं । विशेष भासे तुझिया नयनीं । तेधवां संशयाची वाणी । योग्य होसील पुसावया. ॥ १४ ॥ वि[13]जनकाचाश्व हा जनक । हरादि वंदिती [14]पाँदोदक, । इंद्रासी इंद्रपदाची भीक । कृपेनें येणें दीधली. ॥ १५ ॥ [15]त्रैलोक्यनगरारंभस्तंभु । विराटतरूचा कोमळ कोंभु । प्रणवशिखरींचा शंभु । ज्ञानदृष्टी पहावया. ॥ १६ ॥ वैकुंठसंपुटा [16]आंतौती । श्रेष्ठें ठेविली अर्चनमूर्ती । हृदय [17]सांबळीमाजी निगुती । सनकादिकीं ठेविली. ॥ १७ ॥ हेंचि हरिहराचें हृदयध्यान । नारदादिकां उपगीयमान । सगुण दिसताहे परि निर्गुण । ब्रह्म चैतन्य श्रीकृष्ण. ॥ १८ ॥ हेंचि मूळमायेचें

---

१. उत्तम वस्त्रें. २. सुंदर स्त्रीया. ३. सांख्यशास्त्रांत प्रकृति आणि पुरुष हे शब्द प्रधान आहेत. प्रकृति आणि पुरुष यांच्या संयोगापासून सकल जड सृष्टिची उत्पत्ति आहे. या शास्त्रांत पदार्थांचे दोन वर्ग केले आहेत. एकांत चेतन पदार्थांचा समावेश केला आहे व दुसऱ्यांत अचेतनांचा. चेतन पदार्थ कायतो पुरुष. प्रकृति इत्यादिकांचा समावेश अचेतनांत होतो. याविषयीं सविस्तर वर्णन '**सरलार्थबोधिनी गीता** पृ० ३१७-३४४ यांत पाहावें. [सरलार्थबोधिनी गीता—पुस्तक २ अंक २-३-४-]. ४. पायांचा घोटा. ५. पुट=कोणत्याही वस्तूचा द्रोणाच्या आकारासारखा करतात जो आकार तो—जसें-अंजलिपुट, कर्णपुट, पर्णपुट. श्रवणपुट. ६. बुरखा, आच्छादन ७. पांघरणें. ८. उत्तम वसनें. ९. व्रताचंगत्वेंकरून फळें, सौभाग्यद्रव्यें, पक्वान्नें इत्यादि ब्राह्मणांस अर्पण करतात तें 'वायन' होय. १०. सूर्यानें [जीं पाहून सूर्य अस्ताचलाकडे लाजून वळला]. ११. पांडुराजाच्या जनका (भीष्मा). १२. उत्तम नेत्रानें. १३ ब्रह्म्याचा. १४. गंगा. १५. त्रैलोक्यरूप नगराच्या आरंभाचा खांब. १६. आंत. १७. देवादिक ठेवण्याची वेताची विणलेली पेटी.

मूळ । निगमवल्लीचें सुपक्व फळ, । कैवल्यगर्भींचें केवळ । निज निधान ठेवणें. ॥ १९ ॥ दर्शनें साधिती सिद्धांत । आग्रहें भाविती जो जो अर्थ । तो हा एकचि अनंत । नानाभावीं भासला. ॥ २० ॥ यासी वेदांती म्हणती 'ब्रह्म' । मीमांसक यालागीं करिती कर्म । ते यातें 'एक ईश्वरनाम । कर्ता म्हणती ययातें' ॥ २१ ॥ सांख्यशास्त्रीं कपिलमुनी । प्रकृति पुरुष जे वाखाणी । ते हे श्रीकृष्णरुक्मिणी । मातापितरें जगाचीं ॥ २२ ॥ भाष्यकार म्हणती 'शब्द' । तो हा जाण पां गोविंद । पातंजली ययोग विशद । याचिलागीं साधिजे. ॥ २३ ॥ शैव म्हणती शंकर स्थाणू । तोचि वैष्णवीं बोलिजे विष्णू । शक्ती गणेश अथवा भानु । नामें याचींच जाण पां. ॥ २४ ॥ साधु म्हणती 'हा प्राणमित्रु' । दुर्जन भाविती 'काळशत्रु' । मूढ म्हणती 'हा परतंत्रु' । परि 'स्वतंत्रु' सामर्थ्यें. ॥ २५ ॥ हा एकचि विश्वव्यापक घटीं । परी सोयरा दिसे तुमचे दृष्टीं । एक म्हणती दुष्ट कपटी । मंदमती दुरात्मे. ॥ २६ ॥ ब्रह्मादिकां आराध्यमूर्ती । तोचि हा पार्थाचा सारथी । जो अनुच्छिष्ट नाम-व्यक्ती । तो यज्ञउच्छिष्टें काढीतसे. ॥ २७ ॥ ऐसिया सांडोनि श्रीकृष्णातें । पूजूं पहासी आणिकातें, । असो, जे परम अभाग्य येथें । जे श्रीष्णीं विकल्पू. ॥ २८ ॥ याचेंचि स्वरूप देवदेवीं । भजक भजती नाना-भावीं । तो प्रत्यक्ष देखतां गोसावीं । संशय तुज कायसा'? ॥ २९ ॥ ऐसें कुरुवृद्ध बोलतां तें । आवेश नधरवे सहदेवातें, । अग्रोदक घेऊनि हातें । उभा ठेला कलशेसीं. ॥ ३० ॥ हृदयीं जाणोनि कार्यमूळ । आग्रह न करीच गोपाळ, । धर्में प्रार्थीतां तात्काळ । पूजासनीं आरूढे. ॥ ३१ ॥ सोमकांत श्वेतचवाई । शेषाकृती शोभली पायीं । वरी आदरें क्षीराब्धिशायी । धर्मराजें बैसविला. ॥ ३२ ॥ चरणक्षालना कनकपात्र । पुढां वोढवी माद्रीपुत्र, । गंधपुष्पेंसीं स्वतंत्र । भीमार्जुन ठाकले. ॥ ३३ ॥ तळवटीं क्षीरोदक उत्तम । वरी शोभला मेघश्याम । जेवीं कैलासा द्यावया क्षेम । नील जीमूत पातला. ॥ ३४ ॥ छत्र चामरें उभय व्यजनु । धरिती

१. वेदरूपवल्लीचें. २. पुरून ठेवलेलें धन, ठेव. ३. स्पष्ट. ४. शंकर (अंचल). ५. सकल इंद्रियांचा स्वामी. ६. स्वच्छ कूपांतून काढलेलें उदक. ७. चवरंग. ८. शेषाची आकृति ज्याच्या पायांवर होती. ९. उत्तम रेशमी वस्त्र १०. मेघ [जीवनस्योदकस्य मूतः पटबन्धो वस्त्रबन्धो जीमूतः । पृषोदरादित्वात्साधुः । मूतः स्यात्पटबन्धेऽपि इति रुद्रः । मेघदूत–पूर्व–श्लो० ४ टीका.] ११. 'श्वेत' असाही पाठ आहे. बृहत्संहिता–अ-

द्रौपदीचे नंदनु । पादुका घेऊनि अभिमन्यु । उभा ठेला जवळिके. ॥३५॥ वाद्यें लागलीं सुस्वरें । भक्त गर्जती जयजयकारें, । भीष्म विदुर प्रेमादरें । उभे ठेले आवडी. ॥ ३६ ॥ वैष्णवकीर्तनाची सरळी । नाचों लागली धुमाळी । विष्णुचरित्रें नामावळी । एक टाळी हरिनामें. ॥ ३७ ॥ देव बैसोनि विमानीं । वर्षाव करिती दिव्य [1]सुमनीं । सनकादिकांचिया नयनीं । आनंदाश्रु लोटले. ॥ ३८ ॥ चरण क्षालितां धर्मातें । धाविन्नलीं त्रिलोकींचीं तीर्थें, । तळीं वोढविती माथें । पवित्रपणा लागोनी. ॥ ३९ ॥ जया चरणामृताची गोडी । लागतां लक्ष्मी झाली वेडी, । दिव्यांगनेनें आवडी । जे न सांडी सर्वथा. ॥ ४० ॥ अरुण संध्याराग दोन्ही । मिनलें बालार्कतेज किरणीं । कीं पद्मराग माणिकमणी । एकत्र पायीं पातले. ॥ ४१ ॥ भूमंडळींचीं रातो[2]त्पळें । रंग वोपितां सहपरिमळें । म्हणोनि चरणपद्मीं पाणितळें । संवा[3]हनितां रंगलीं. ॥ ४२ ॥ चंद्रें शरीर कर्वतीं दिधलें । खंडूनि केलीं दहा शकलें । पादांगुळीं जडोनि जाळें । नखमणी चंद्रासारिखे. ॥ ४३ ॥ ध्वज अंकुश वज्र पद्में । उर्ध्व रेखा अति उत्तमें, । सामुद्रिकें पहातां उपमे । ठाव न दिसे द्यावया. ॥ ४४ ॥ खंडी पापांचे पर्वत । तेंचि वज्र सुशोभित । पद्मचिन्हीं पद्मांकित । पद्मा वसे श्रियेयीं. ॥ ४५ ॥ ऐश्वर्यमदें जे मातले । विषयभोगीं सैर सुटले । ते अंकुशें आवरिले । स्वस्थ केले हरिपायीं. ॥ ४६ ॥ कीं चरणरूप नौका खरी । हेळीं[4] तारी भव दुस्तरी । ध्वजमंडित गुणसाजरि । जीवनावरी जगातें. ॥ ४७ ॥ साधकांतें मनसंघट । लक्षोनि ऊर्ध्वरेखेची वाट, । चहूं मूर्तींचे लंघोनि घाट । निर्गुणब्रह्मीं मिसळती. ॥ ४८ ॥ कीं श्रीकृष्णपादांबुजीं पवित्र । प्रयोगराज[5] तीर्थ क्षेत्र । मिनलीं [6]त्रिवेणी एकत्र । प्रत्यक्ष नयनीं दिसताहे. ॥ ४९ ॥ त-

---

ध्याय ७२ यांत चामरलक्षण आणि अध्याय ७२ यांत छत्रलक्षण सविस्तर सांगितलें आहे. चमरी नामक मृग हे देवांनीं हिमालयाच्या गुहेंत चामर करण्यासाठीं उत्पन्न केले आहेत इत्यादि वर्णन पहाण्यासारखें आहे,

१. पुष्पें. २. रक्त कमळें. ३. मर्दितां. ४. सहज, लीलेनें. ५. प्रयागराजाचें वर्णन असें आढळतें:—'श्रुतिः प्रामणं स्मृतयः प्रमाणं पुराणमप्यत्र परं प्रमाणम् । यत्रैव गंगा यमुना सरस्वती स तीर्थराजो जयति प्रयागः" ब्रह्मदेवानें सर्व तीर्थांचीं तुलना केली तेव्हां प्रयागतीर्थाचें पारडें खालीं बसलें म्हणून त्याला 'तीर्थराज' 'राजतीर्थ' 'प्रयागराज' असें नांव दिलें. ६. सरस्वती यमुना आणि भागीरथी यांच्या संगमास त्रिवेणी संगम म्हणतात. यांतील पहिली नदी ह्या संगमस्थानीं गुप्त आहे असें समजतात.

ळवे आरक्त [1]प्रवाळवर्णी । तेचि [2]सरस्वती सिंदूरवर्णी वांकी सोज्वळ दे[3]वतटिनी। भा[4]गीरथी खळाळे. ॥ ९० ॥ तेथें जडले रक्त मणी । ह्याचि तपोधनाच्या श्रेणी । ज्या देखतां नक्षत्रगणीं । देह धरणीं टाकिजे. ॥ ९१ ॥ सुनीळ कालिंदींचे वोघ । तेंचि [5]जानुद्वय अव्यंग । ध्वज अंकुश चिन्हीं चांग । अक्षयवटसंगमीं. ॥९२॥ योगियांचें मनो[6]मराळ । स्वेच्छा क्रीडती सर्वकाळ । भक्त श्रद्धाळु प्रेमळ । क्षेत्रवासी ते क्षेत्रीं. ॥ ९३ ॥ प्रयागीं मोक्ष पाविजे मरणें । येथें मोक्ष पाविजे श्रवणें । म्हणोनि कवीचें बोलणें । सांगे योग्य दृष्टांत. ॥ ९४ ॥ इंद्रनीलमणी सु[7]ढाळ । तेवीं गुल्फद्वय वर्तुल । जानु जघन सुकुमार सरळ । स्तंभ गरुडपाचूचे. ॥९५॥ मुक्तपालवी मनोहर । परिधान करविला पीतांबर । दुजा वै[8]रणियाचा सुंदर । कनकवर्णी विराजे. ॥ ९६ ॥ देखूनि अमृतघन सांवळा ।

---

१. पोंवळ्यां सारिखे लाल. २. सरस्वती नदी पांच ठिकाणीं प्रसिद्ध असून गुप्त झाली आहे असें म्हणतात:–रुद्रावत कुरुक्षेत्रे श्रीस्थले पुष्करेऽपि वा। प्रभासे पंचमे तीर्थे पंच प्राची सरस्वती॥ (१) रुद्रावर्त हिमालयांत आहे असें म्हणतात, तेथें सरस्वती आहे. (२) कुरुक्षेत्र दिल्लीपलीकडे आहे, तेथें सरस्वती आहे. (३) श्रीस्थल म्हणजे सिद्धपुर हें गुजराथेंत असून तेथें सरस्वती आहे. ती अंबाजीचे डोंगरांतून कोटेश्वरापासून निघाली ती झिंझुवाडा याजवळ गुप्त झाली. म्हणजे, पुढें रेतीचा मुलूख आल्यामुळें त्यांत चालेनाशी झाली. (४) पुष्करतीर्थांतही ती आहे असें म्हणतात आणि (५) प्रयागीं आहे असें म्हणतात. तेथून प्रभासाजवळ प्राची सरस्वती आहे, तिचें पाणी फार विषारी असून त्या ओघांत अधरमाधव म्हणून एक मूर्ति आहे. प्रभास, सोमनाथ व वेरावळ हीं एकाच गांवाचीं नांवें आहेत. प्रभासास यादवांनीं जो आपला नाश करून घेतला तो हिरण्यानदीचे तीरीं झाला असें म्हणतात. जेथें श्रीकृष्णास बाण लागला तें भल्लुका क्षेत्र येथेंच आहे व त्याचा देह पडला तें देहोत्सर्गक्षेत्र आहे. [ऐ० गो० भा० २ पृ० ३५] ३. देवनदी–गंगा. ४. "प्रयाग येथें संगमावर जो एक नैसर्गिक चमत्कार नेहमीं दृष्टीस पडतो तो अगदीं अप्रतिम आहे. गंगाजलाचा रंग धवल असल्यामुळें यमुनाजलाचा कृष्णवर्ण त्यांत मिश्रित झाला म्हणजे तें मिश्रण अत्यंत प्रेक्षणीय होतें. संमेलनवेगानें ह्या उभय सरित्प्रवाहांचे अनेक जलतरंग एकत्र होऊं पहातात. त्या स्थळीं फारच मजा दिसते. ही मजा गंगेपेक्षां कालिंदीप्रवाहांत फारच असते. तिचें दर्शनसुख घेऊं इच्छिणाऱ्या प्रेक्षकांना थोडासा नौकाविहार करावा लागतो, अर्थात् नौकेमध्यें बसून यमुनाप्रवाहांत गेलें म्हणजे तेथें मोठ्या जोरानें वरचेवर येणारे गंगेचे लांब लांब फंवारे फार सुंदर दिसतात. त्यांचा तो शुभ्र वर्ण अवलोकन केला म्हणजे जणों, जाल्हवी शुभ्र कंचुकी परिधान करून आपल्या अनेक करांनीं श्रीयमुनादेवीस प्रेमालिंगन देऊन भेटत आहे असा भास होतो." केसरी–ता० ९ मे १८९३.] ५. दोन मांड्या. ६. राजहंस पक्षी. ७. तेजस्वी, सुंदर. ८. पांघरावयाचा.

उभय विद्युल्लतेंचा मेळा । त्यागोनि चंचलतेचि लीला । निश्चळ ठेला हरिरूपीं. ॥ ५७ ॥ मेखलेचे[1] माणिकमणी । पंक्तिभोजना बैसले तरणी । मध्यान्हा येत ऊर्ध्वकिरणीं । तुळोनि पाहे कौस्तुभा. ॥ ५८ ॥ स्थूळ नितंब मध्यासना । देखोनि वैराग्यपंचानना[2] । लाजोनि दुर्गेचिया वाहना । देह दुःखें दीधला. ॥ ५९ ॥ कौस्तुभसूर्याची नंदिनी[3] । यमुना त्रिवली कृष्णवर्णी । ऊर्ध्वपंथीं हृदयभुवनीं । भेटों आली दिसताहे. ॥ ६० ॥ हृदयीं धरूनियां मान । तथापी न सोडावे चरण । यालागीं आपाद[4] कंठलग्न । वैजयंती[5] विराजे. ॥ ६१ ॥ श्रुतिसागरीं रत्नज्योती । कुंडलें तळपती मकराकृती । नाना कवी गुरु निरोपिती । विनंती सुरासुरांच्या. ॥ ६२ ॥ वदनचंद्राशीं सख्य परम । करावया कस्तुरीरूपें तम । मळवट झाला अति उत्तम । पुरुषोत्तमनिजभाळीं. ॥ ६३ ॥ अंधकार चंद्रमा तरणी । मेळा अपूर्व एकस्थानीं । मुकुट कुंडलें व्यजनें दोन्हीं । वदनचंद्रीं कवळिले. ॥ ६४ ॥ अधर बिंब हिरे दशन[6] । शुकनासिक विशाळ नयन । वदन सर्वानंदवर्धन । कोटिमदन सांडणें. ॥ ६५ ॥ बाहुवटे कीर्तिवदनें । जेथें फांकती प्रकाशकिरणें । करमुद्रिका करकंकणें । अभयदानें झळकती. ॥ ६६ ॥ यमुनाजळावरी जान्हवीजळ । धांवे जैसें शुद्ध धवळ । कीं नीळगगनावरी[7] सोज्वळ । पसरे निर्मळ चांदणें. ॥ ६७ ॥ तैसी पातळ चंदनउटी । तेणें शोभला कृष्ण जगजेठी । जवादी भरूनि पर्णपुटीं[8] । सुगंध चूर्ण उधळिलें. ॥ ६८ ॥ दीप कर्पूर नीरांजनें । फल तांबूल शुद्ध सुमनें[9] । सर्वभावें कुरुनंदनें । सर्वेश्वर पूजिला. ॥ ६९ ॥ उभयनेत्रीं भरूनि रूप । हृदयमंदिरीं रत्नदीप । निश्चय निर्वात निष्कंप । अखंडित ठेविला. ॥ ७० ॥ कांया वाचा मन धना । इंद्रियवृत्ती सांडोनि जाणा । पुष्पांजली कृष्णचरणा । धर्मराजें अर्पिल्या. ॥ ७१ ॥ अर्पूनि सोळाही उपचार[10] । घातला दंडप्राय नमस्कार । मुखें

---

१. कमरेंतील डाबेचे. २. वैराग्यरूप व्याघ्राला. ३. कन्या. ४. पायांपर्यंत. ५. विष्णूच्या माळेला 'वैजयंती' असें नांव आहे. ही माळा कधीं कोमेजत नाहीं, अशी समजूत आहे. 'लारेल' (Laurel) नामक वनस्पतींच्या पुष्पांची माळाही कधीं सुकत नाहीं, सदां टवटवीत असते, असा प्राचीन ग्रीक व रोमन लोकांचा समज होता. ६. दंत. ७. निळ्या आकाशावर. ८. 'कर्णपुटीं' असाही पाठ आहे. ९. पुष्पें. १०. पूजा करण्याचे षोडश (सोळा) उपचार आहेत त्यांचीं नांवें:—'आसनं स्वागतं पाद्यमर्घ्यमाचमनीयकम् । मधुपर्काचमस्नानं वसनाभरणानि च । गंधपुष्पे धूपदीपौ नैवेद्यं वंदनं तथा ॥' या नांवांत क्वचित् फरक आढळतो:—आवाहन, आसन, पाद्य, अर्घ्य, आचमन, स्नान, वस्त्र, यज्ञोपवीत, गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, दक्षिणा, प्रदक्षिणा आणि मंत्रपुष्प.

करूनि जयजयकार । कृतकृत्यता मानिली. ॥ ७२ ॥ झाली अग्रपूजासमाप्ती । श्रवणें श्रोतियां ब्रह्मप्राप्ती । देखत्यांची[१] दुष्टमती । उदेली, ते परियसा. ॥ ७३ ॥ चैद्य कौरव एकपंक्तीं । हस्त मेळवूनियां हस्तीं । क्षुद्रबुद्धी[२] अवलोकिती । कृष्णद्वेषी दुरात्मे. ॥ ७४ ॥ काशीविश्वेश्वराचें लिंग । सुवर्णकमळीं पूजिलें सांग । जें देखतां पावती भंग । महापर्वत पापांचे. ॥ ७५ ॥ तें नूतन-पाखांडी-वैष्णवां[३] । देखतांचि संताप उपजे जीवां । जेवीं कां पूर्वजांचा ठेवा । हिरोनि नेला तस्करीं. ॥ ७६ ॥ नातरी बिंदुमाधवप्रतिमा । शृंगारिली देखोनि अधमा । केश कपाळीं जंगमा । शिरच्छेदनासारिखें. ॥ ७७ ॥ साधु पूजूनि दुर्जनातें । वित्पन्न वोंणितां[४] अयोग्यातें । पवित्र म्हणतां पतिव्रतेतें । व्यभिचारिणी क्षोभती. ॥ ७८ ॥ तेवीं पूजितां कृष्णनाथ । चैद्या[५] प्रगट कौरवां गुप्त, । विषाद उपजला अद्भुत । महा अनर्थसूचक. ॥ ७९ ॥ धर्में पाहोनि भीष्माकडे । म्हणे, 'जी! काज निरोपा पुढें, । आतां पूजा निजनिवाडें । कवणा अर्पूं सांगपां?' ॥ ८० ॥ भीष्में न देतां प्रतिवचन । तंव रोषें दमघोषनंदन । म्हणे 'नीच हो! अववेजण । नेणा महिमा श्रेष्ठाचा. ॥ ॥ ८१ ॥ योग्यायोग्य हा विवेक । गुण न कळतां न्यूनाधिक, । कोणे विचारें हा गोरक्षक[६] । आधीं पूजिला सांगपां? ॥ ८२ ॥ पिता वसुदेव करूनि कडे । पुत्रपूजार्थी निघाला पुढें । त्यांचा विवेक आपुल्या तोंडें । साचार वदा, वडील! हो! ॥ ८३ ॥ पूजा घेत्या[७] दोघे जनक । पूजा कर्त्या[८] तातपंचक । यालागीं दोहींचा विवेक । यथायोग्य दिसतसे. ॥ ८४ ॥ बाळबुद्धी वर्ते धर्मा, । बुद्धिभ्रंश वृद्धा भीष्मा, । म्हणोनि ऐसिया अयोग्य कर्मा । उपदेशोनि करविलें. ॥ ८५ ॥ वृद्ध सांडूनि कुरुनरेश, । ऋत्विज सांडूनि वेदव्यास, । काय म्हणोनि हृषीकेश । यज्ञमंडपीं[९] पूजिला? ॥ ८६ ॥ गुरू सांडोनि कृप द्रोण, । आप्त सांडोनि यांज्ञसेन[१०], । कोणा विचारें हा कृष्ण । येथें पूजिला सांग पां? ॥८७॥ भार्गवशिष्य[११] झुंजार कर्ण । राजगुरु द्रोणनंदन । सार्वभौम दुर्योधन । सांडोनि कृष्ण कां पूजिला? ॥ ८८ ॥ दमघोष रुक्मिया श्रेष्ठ । एकलव्य शल्य वरिष्ठ । ऐसियां सांडोनि स्वधर्मभ्रष्ट । केवीं हा कृष्ण पूजिला? ॥ ८९ ॥

---

१. 'देखतांची' असा अन्य पाठ. २. कुबुद्धी, ३. हें वर्णन मुक्तेश्वराच्या वेळींच्या वस्तुस्थितीचें द्योतक होय. ४. वर्णितां. ५. शिशुपाळ. ६. गोपाल, गवळी (कृष्ण.) ७. कृष्णा. ८. पांडवाला. ९. 'मखमंडपीं' असाही पाठ आहे. १०. द्रुपद. ११. कर्ण ब्राह्मणरूपानें परशुरामापाशीं अस्त्रविद्या शिकत होता—अशी कथा आहे.

करूनि पूज्यांचा अवमान । अपूज्या पूज्य सन्मान । येणें यशकीर्तिला उ-णेपण, । नाम रूपा बुडविलें. ॥ ९० ॥ ऋत्विज नोहे, ना आचार्या । राजा नो[1]हे ना समान राया । [1]चक्रपाणी पूजोनि वायां । अपकीर्ती माथां घेतली. ॥ ९१ ॥ राया देखतां अराजा । रायासमान विशेष पूजा, । घेतां नृपालागीं लज्जा । घ्राणच्छेदनासारिखी. ॥ ९२ ॥ पूजणें होतें जरी कृष्णातें । तरी कां मेळविलें नृपांतें । आणूनि केलें अवमानातें । खळाचार या नांवें. ॥ ९३ ॥ म्यां करभार वोपिला तूतें । तो नाहीं अभयार्थ स्वार्थें । साह्य व्हावें धर्मकृत्यातें । ऐसें धार्मिक बोलती. ॥ ९४ ॥ म्यां करभार वोपिला भक्ती । त्वां मज हे[2]ळसिलें नृपाचे पंक्ती, । भलें गौरविलें उचितीं । धर्मराजा! सर्वज्ञा! ॥ ९५ ॥ करूनि रायांचा अवमान । जरी त्वां गौरविला गोवळा कृष्ण । इ-तुकेनि आम्ही सर्व न्यून । विशेष कृष्ण न मा[3]नी मीं. ॥ ९६ ॥ अरण्यामाजी आमिष पडलें । तें एकें श्वापदें भक्षिलें । इतुकेनि त्या श्रेष्ठत्व आलें । ऐसें श्रेष्ठ न मानिती. ॥ ९७ ॥ क्ली[4]बासि केलें कन्यादान, । अंधासि दाविलें द-र्पण, । तेवीं पूजेसि अयोग्य कृष्ण । जरी त्वां येथें पूजिला. ॥ ९८ ॥ वृ-ष्णिकुळीं उपजोनि मंद । कपटें वधिला जरासंध, । ऐसियासि विवेकअंध । पांडव तुम्हीं भजतसां. ॥ ९९ ॥ तूं धर्मात्मा धर्मपुत्र । ऐसें नाम जें पवित्र, । तें विटाळलें जैसें पात्र । स्प[5]र्श केला मद्यपें.' ॥ १०० ॥ ऐसें बोलोनि क्रोध-दृष्टी । हातीं वसत्री खड्गमुष्टी । घेऊनि राजयांच्या था[6]टी । चैद्य तेथूनि नि-घाला. ॥ १०१ ॥ धर्में धाऊनि धरिला हातीं, । हृदयीं कवळिला परमभक्ती, । म्हणे 'तूं बंधूचिये पंक्ती । सुहृद होसी आमुतें. ॥ १०२ ॥ आम्हीं युक्तायुक्त केलें, । तें तुवां पाहिजे प्रतिष्टिलें, । स्नेहभावें सांभाळिलें । तेंच नेई शेवटा. ॥ १०३ ॥ ऋषी राजे वडील वृद्ध । कृष्णपूजनीं त्यांसी आल्हाद, । तैसाचि तुवां सांडोनि क्रोध । क्षमा कीजे आमुतें. ॥ १०४ ॥ भीष्म जाणतां सर्वज्ञ । त्याचिये आज्ञेनें पूजिला कृष्ण, । तूं कां ठेविसी दूषण । दुष्टभाव सांग पां?

---

१. 'चक्रपाणि' हें तद्गुणसंविज्ञान बहुव्रीहि समासाचें उदाहरण आहे. ज्या वर्णिलेल्या गुणांचें संविज्ञान, (चिन्ह खूण) ज्याच्या विशेष्यांत नित्य सांपडतें तो 'तद्गुणसंविज्ञान' बहुव्रीहि समास होय. येथें हातांत चक्र असणें हा जो गुण सांगितला तो कृष्ण या विशेष्यांत नित्य आढळतो. बहुव्रीहि समासाच्या दुसऱ्या प्रकारास 'अतद्गुणसंविज्ञान' असें म्हणतात. २. अवमानिलें. ३. मानी. ४. नपुंसकास. ५. ह्यावरून प्राचीन काळीं मद्य पिणें निषिद्ध होतें, मग बळराम वगैरे मद्यपान करीत असत हें कसें? ६. 'दाटी' असा अन्य पाठ.

॥ १०५ ॥ तुजहूनि वडील जाणते पुरुष । श्रीकृष्णपूजनें त्यां संतोष । त्यांही स्नेहादर विशेष । कृष्णभजनीं करावा.' ॥ १०६ ॥ धर्मा अवलोकोनि दृष्टी । भीष्म बोले यथार्थ गोष्टी । 'हा शिशुपाळ कुटिल कपटी । दुष्टबुद्धी दुरात्मा. ॥ १०७ ॥ हा योग्य नव्हे शांतवना । कासया करिसी तूं प्रार्थना ? । जें आवडेल त्याचिया मना । तेंचि सुखें करो पां. ॥ १०८ ॥ शिवादिकां परम मान्य । वेदशास्त्रां जो प्रमाण । पूर्ण ब्रह्म सनातन । तो त्वां अच्युत अर्चिला. ॥ १०९ ॥ जगद्गुरु जगत्पिता । जगज्जीवन जगत्राता । तया पूजितां विषादव्यथा । किमर्थ यातें उपजली ? ॥ ११० ॥ केवळ आम्हासचि नाहीं पूज्य । त्रैलोक्यवंद्य अधोक्षज । ब्रह्मादीक पादरज । ज्याचे माथां वंदिती. ॥ १११ ॥ अज्ञानभ्रमें पडिला भ्रमा । नेणे कृष्णमूर्तीचा महिमा । स्वमुखें निंदी पुरुषोत्तमा । आम्हां सकट सर्वांतें. ॥ ११२ ॥ ब्रह्मांड जिंकी एकवेळा । सकळ ऐश्वर्या वेगळा, । त्या सांडोनि मेदिनीपाळा । कवणा आना पूजावें ? ॥ ॥ ११३ ॥ येणें जिंकिलें कवण रायां ? । तोंडें वल्गना करितो वायां, । असो; स्वगृहा पातलिया । अवज्ञा आम्हीं न करावी' ॥ ११४ ॥ ऐसें बोलतां भीष्म धर्मातें । आवेश न धरवे सहदेवातें । गर्जे उभारिले हस्तें । म्हणे 'परिसा वडील हो ! ११५ ॥ त्रैलोक्यनाथ चक्रपाणी । म्यां पूजिला सभास्थानीं, । असो हें न मनी त्याचा मूर्ध्नी । पायांतळीं माझिया. ॥ ११६ ॥ कृष्णीं मानूनि विरोध । वदेल कृष्णनिंदेचा शब्द । तो तात्काळ पावेल वध। माजेनि हस्तें जाणिजे.' ॥ ११७ ॥ निघतां सहदेवमुखींची गोष्टी । जयजयकाराचे बोभाटीं । गगनींहूनि सुमनवृष्टी । तया माथां वोसंरली ॥ ११८ ॥ 'साधु साधु' इहीं वचनीं । अंबरीं गर्जे आकाशवाणी, । टाळी पिटोनि नारदमुनी । म्हणे 'ऐका उत्तम हो ! ॥ ११९ ॥ कृष्णद्वेषिया दुर्बुद्धी । कृष्ण-

---

१. 'कृष्णादर' असाही पाठ आहे. २. 'च्यवनोत्पत्तियुक्तेषु ब्रह्मेन्द्रवरुणादिषु ॥ २३९ ॥ यस्मान्न च्यवते स्थानात्तस्मात्संकीर्त्यतेऽच्युतः । साधर्म्येणावतारेपि ब्रह्मेन्द्रवरुणादिभिः ॥ २४० ॥ न स्वैश्वर्यात्प्रच्युतो यः सोऽच्युतः परिकीर्तितः' ॥ [विवृत्ति-मन्त्रसहस्र-सहितं श्रीविष्णोर्नामसहस्रम् । पृ० २१.] 'ज्याची निजस्वरूपापासुनियां च्युति कदापि होत नसे । त्या शाश्वत देवाला अच्युत हें नाम फार योग्य असे. ॥ १०६ [पृ० ११] नाहीं च्युति स्वरूपा, कीं ज्याला षड्विकार ते नसती । यास्तव अच्युत ऐशी आख्या झाली असें तया म्हणती.' ॥ १८४ [पृ० ३५] [नामार्थदीपिका.] ३. चरणधूली. ४. 'पद्मापाळा' असाही पाठ आहे. ५. अन्यास. ६. 'पुष्प' असा पाठ आहे. ७. 'जाहली' अन्य पाठ.

नाम स्वमुखें निंदी, । तया अनर्थ पदोपदीं । ठाकूनि येती निर्धारें. ॥ १२० ॥ कुबुद्धी सुबुद्धीतें उखळी । काळ आयुष्यातें गिळी । मृत्यू पावोनि तात्काळीं। नाश करी क्षणार्धें ॥ १२१ ॥ प्राणी उपजोनि संसारीं । जो **कृ**ष्णाचें अर्चन न करी । तो प्रेतप्राय नरशरीरीं । संभाषणीं अपवित्र.' ॥ १२२ ॥ ऐकोनि न्यायनिष्ठुर वाणी । **चै**द्य क्षोभला चौंगुणी । सहित राजयांच्या श्रेणी । उभे ठेले संग्रामा. ॥ १२३ ॥ **कृ**ष्णीं जयांची कुटिल मती । **शि**शुपाळाचे मित्र सांगातीं । एकत्र होऊनि पक्षपाती । सिद्ध झाले संग्रामा. ॥ १२४ ॥ '[1]साम्राज्यपदवीचें वैभव । भंगूनि निस्तेज **पां**डव । अग्रपूजेचें गौरव । श्रीकृष्णाचेंही विटंबूं[2]. ॥ १२५ ॥ **या**दव आणि **पां**डव । आजी मारणें सर्व । **कृ**ष्णासहीत माझा गर्व । भस्म करूं **भी**ष्मांचें.' ॥ १२६ ॥ मिळोनि दुर्जनाचा मेळा । कलहा उठिला एकवेळा । जैसा मैराळ[3] देखोनि डोळा । काक करिती कोल्हाळ. ॥ १२७ ॥ डहुळला देखोनि नृपसागर, । **भी**ष्मास पुसे **यु**धिष्ठिर । 'काय करणें येथें विचार । तो मज सांगा सर्वज्ञा ! ॥ १२८ ॥ सांग याग पावला सिद्धी । परी अनर्थ उदेला अवघी । मिळोनि दुर्जनाची मांदी । अपेश देऊं इछिती. ॥ १२९ ॥ **भीं**मार्जुनांचेनि हातें । आपण मुकतील प्राणांतें । अपकीर्ती आणितील मातें । हें दुश्चिन्ह मज बाधी' ॥ १३० ॥ **भी**ष्म म्हणे 'स्वस्थ राहीं । येथें दुश्चिन्ह नसे कांहीं, । समुद्र तरावया बाहीं[4] । **अ**गस्ती करुं विचारु ॥ १३१ ॥ निद्रिस्थ सिंह हा **मु**कुंद । तंव हे जंबूक[5] करिती शब्द, । हा धडकल्या जातवेद[6] । भस्म होतील तृणप्राय. ॥ १३२ ॥ लोटिल्या '**श्रीकृ**ष्णभद्रजाती[7] । **चै**द्यश्वान सैरा पळती । अंतरें टाकूनि शब्द करिती । तेविं हे जाण वल्गना.' ॥ १३३ ॥ व्याळ

---

१. ही चैद्याची दर्पोक्ति आहे. सार्वभौमत्व तीन गुणांनीं येतें, किंवा तिहींपैकीं एका गुणानेंही येतें. ते तीन गुण हे:—१ राजसूय यज्ञ करणें, २ बारा राजांचा अधिपति असणें, ३ सर्व राजांवर आपली सत्ता असणें. ['येनेष्टं राजसूयेन मंडलस्येश्वरश्च यः । शास्ति यश्चाज्ञया राज्ञः स सम्राट् ॥' अमरकोष–२ कांड क्षत्रियवर्ग श्लोक ३ पहा.] २. 'विभांडू' असा अन्य पाठ आहे. ३. हंस. ४. भुजांनीं. ५. कोल्हे. ६. अग्नि, [जाते जाते विद्यते इति जातवेदाः तस्मिन् असून्सप्तपर्णादिव वीप्सासमासेनेव प्रतीताः । जातं वेदाः अस्मादिति वा । इति हेमाद्रिः रघुवंश–सर्ग १२ श्लोक १०४ पहा.] ७. श्रीकृष्णरूप हत्ती. 'भद्र' हें एक जातीच्या हत्तीचें नांव आहे. ['भद्रो रुद्रे वृषे रामचरे मेरुकदंबके । हस्तिजात्यंतरे भद्रो वाच्यवत् श्रेष्ठसाधुनोः ॥' इति विश्वः.] [रघुवंश–सर्ग १४ श्लोक ३१ टीका पहा.]

गरळ सांडितां वदनी । तेविं शिशुपाळ शब्दबाणीं । हृदय भीष्माचें ल-क्षोनी । विंधिता झाला सुवर्मी. ॥ १३४ ॥ म्हणे, 'रे! कुरुकुळामाजी अ-धमा! नाम रूप बुडविलें भीष्मा! । धर्म पावे अपकीर्तिधामा । हा महिमा तुझाची. ॥ १३५ ॥ आम्हीं सृगाल, सिंह कृष्ण । म्हणतां, न लाजे तुझें वदन । पूतना वृद्ध स्त्री वधून । थोर झाला पुरुषार्थी. ॥ १३६ ॥ अश्व वृषभ वत्स बगळा । अचेतन काष्ठशकट विरुळा । मारिले म्हणोनि पृथ्वी-पाळा । माझी वाढीव जल्पसी. ॥ १३७ ॥ वल्मीकप्राय गोवर्धन । उच-लोनि मातुलाचें अन्न । घात केला तयाचा. ॥ १३८ ॥ कपटें जरासंधहनन। छळोनि मारिला कालयवन । त्याची वाणितां आंगवण । जिव्हा कैसी झ-डेना? ॥ १३९ ॥ चोरांमाजी अग्रगणी । जाराचारीशिरोमणी । सकळअव-गुणाची खाणी । विद्यामठ कपटाचा. ॥ १४० ॥ गोवळ्यामाजी कृष्ण श्रेष्ठ । त्यांतें स्तविसी स्वधर्मभ्रष्ट । जैसें शक्ती अंगणीचें कुष्ठ । 'उदो' म्हणूनि ना-चतु. ॥ १४१ ॥ दाऊनि ब्रह्मचर्याची थोरी । हरिल्या काशीश्वराच्या कुं-मरी, । त्यामाजी एक पवित्र नारी । भ्रष्ट केली वधूत्वें. ॥ १४२ ॥ इष्टदाता अधिष्टितयोग । बहु दान दक्षिणा सांग । पुत्रवंताचा पुण्यविभाग । सहस्रगुणीं पावती. ॥ १४३ ॥ जप तप नेम निष्टा दान । संतानहीनाचें सर्व शून्य । त्याचें पाहूं नये वदन । नामस्मरण न व्हावें. ॥ १४४ ॥ मुखें सांगसी धर्म-नीती । तूंचि वर्तसी अधर्मपंथीं, । कपटहंसाचिये रीती । सारखी तुझी मज भासे. ॥ १४५ ॥ समुद्रतीरीं पक्षी अधम । मुखें मिरवी हंसनाम । पक्षियां उपदेशी स्वधर्म । म्हणे 'विवेकें वर्तावें. ॥ १४६ अहिंसा आणि निर्लोभता । हेंचि साधन मुख्य परमार्था । कोणी नाचरती दुष्ट वार्ता । क्लेश भूतातें न

---

१. विष. २. कोल्हे. ३. कंसाचें. ४. स्तवितां. ५. पराक्रम. ६. अंबा, अंबालिका आणि अम्बिका. ७. अंबा या नांवाची काशीराजाची ज्येष्ठ कन्या भीष्मानें विचित्रवीर्याकरितां जिंकून आणिली. परंतु तिचें प्रेम शाल्व राजावर जडलें असल्यामुळें तिला परत पाठविलें. त्यानें अंबा ही परजिता असल्यामुळें तिचा स्वीकार केला नाहीं. तेव्हां ती परत येऊन 'मला वरा' असें भीष्मास म्हणूं लागली. ती गोष्ट भीष्मानें नाकबूल केली. तेव्हां तिनें परशुरामाकडून आपला अंगीकार करण्याविषयीं बोलणें लाविलें. भीष्म परशुरामाचें ऐकेना म्हणून त्या दोघांचें युद्ध झालें. त्यांत परशुरामाचा पराभव झाला. अखेरीस अंबेनें भीष्माला मारण्याकरितां रुद्राचें आराधान करून, त्याच्या प्रसादानें पुढील जन्मीं द्रुपदाचे घरीं शिखं-डिनी कन्यावतार घेतला. हिलाच 'शिखंडी' असें नांव पुरुषत्वलाभानंतर प्राप्त झालें. ८. 'आदित्य' असा अन्य पाठ आहे. ९. 'वाटा' असा अन्य पाठ आहे.

द्यावे.' ॥ १४७ ॥ त्याचा देखोनि पवित्राचारु । सकळ पक्षीयें केला गुरु । त्यातें देऊनि उत्तम आहारु । सेवा करिती सर्वस्वें. ॥ १४८ ॥ त्याचा परमार्थ ऐकोनि तोंडें । पक्षी आपलालीं आंडें । त्यापाशीं ठेवूनि उंदरचाडें । आपण जाती चरावया. ॥ १४९ ॥ तो सकळांतें करूनि चोरी । आंडीं भक्षी अनाचारी, । पुसतां म्हणे, 'निकीं यापरी । असती यत्नें रक्षिलीं.' ॥१५०॥ आत्ताचार सकळ लोपी । लोपोनि आंडीं भक्षी पापी, । एक धूर्त अतिसाक्षेपी । गुप्त ठेला पहावया. ॥ १५१ आंडीं भक्षितां देखिला । तेणें गुह्यार्थ प्रगट केला, । सकळीं मिळोनि तो मारिला । चंचुप्रहारीं निष्ठुर. ॥ १५२ ॥ जैसें गुरूचें आचरित । तैसें शिष्यें केलें उचित । वडील वृद्ध परी अनाप्त । कोण रक्षी मर्यादा? ॥ १५३ ॥ तेविं भीष्म हा कुटिल येथें । वंद्य होय समस्तांतें । कुबुद्धी सांगोनि धर्मातें । बळें अधर्मी घातलें.' ॥ १५४ ॥ ऐसीं कुश्चित निंद्योत्तरें । ऐकोनि क्षोभिजे वृकोदरें । गदा पडताळोनियां करें। उठावला सन्मुख. ॥ १५५ ॥ खैदिरांगार तैसे डोळे । करूनि अधर चाविले बळें । 'राहें दुष्टा!' म्हणे 'एकबळें । संहारीन येकाळीं..' ॥ १५६ ॥ भीष्में धरूनि मनगटीं । भीम आवरिला जगजेठी, । म्हणे 'वर्तेल तें दृष्टीं । कौतुक पाहें निवांत. ॥ १५७ ॥ पुरे आयुष्याची अवधी । तंववरी काळ पाहतसे संधी, । झालिया पापाची समृद्धी । नाश करी ईश्वर. ॥ १५८ ॥ तैसी अपराधांची भरणी । व्हावया पहातसे चक्रपाणी' । पुढें वर्तलें तें श्रवणीं । कथा श्रोते परिसतु. ॥१५९॥ इति भारत सभापर्व । शिशुपालवध अति अपूर्व । श्रवणें हरती दोष सर्व । मुक्तेश्वर कवी वदे. ॥ १६० ॥

---

## अध्याय अकरावा.

शिशुपाल म्हणे, 'रे! भीष्मा! । सोडीं सत्वर, येऊंदे भीमा । पांवक पतंगा करी भस्मा । तेवीं जाळीन क्षणार्धें. ॥ १ ॥ भीमार्जुना आणि गोविंदा । पाचारितसें एकांग युद्धा । विलंब करितां, क्लीबंशब्दा । पात्र होती निर्धारें.' ॥ २ ॥ हेही दुरुक्ती करूनि क्षमा । भीष्म म्हणे, 'ऐक भीमा! ।

---

१. पोट भरण्याच्या इच्छेनें. २. 'प्रेरिलें' असा अन्य पाठ आहे. ३. खदिराच्या निखाऱ्यासारखे. ४. स्वस्थपणानें. ५. 'होतां' असा अन्य पाठ आहे. ६. अग्नि. [अध्याय ४२ श्लोक १९]. ७. 'क्लीब' या विशेषणाला पात्र.

जाणावया नरेंद्रोत्तमा । वर्म तूतें सांगतसें. ॥ ३ ॥ दमघोषरायाची सुपत्नी । [1]श्रुतश्रवा वसुदेवाची भगिनी । पुत्र प्रसवली अवगुणी । शिशुपाल हा दुरात्मा. ॥ ४ ॥ भुजांवरी [2]दोन भुजा सरळी । तिसरा नयन विरूप [3]भाळीं । अवलोकितां जनीं सकळीं । महा [4]अवचिन्ह मानिलें. ॥ ५ ॥ ममता सांडोनियां जननीं । त्यागसंकल्प धरिला मनीं । तंव आकाशीं [5]देववाणी । होती झाली तें ऐका. ॥ ६ ॥ 'सर्वथा न सांडीं हें बाळ । होईल सभाग्य [6]पृथ्वीपाळ । नाम ठेवूनि शिशुपाळ । पालन याचें [7]करावें.' ॥ ७ ॥ माता बोले करूनि नमन, । 'कवणाहातें पावेल मरण? । हें वदावें कृपा करून । देवदूत हो! समर्थ!' ॥ ८ ॥ '[8]जैया देखतां दृष्टीं । [9]भुजा पडती भूतळवटीं । नेत्र जिरेल ललाटीं । [10]ग्रीष्मंतोया सारिखा ॥ ९ ॥ त्याचेनि पावेल प्राणहानी' । ऐसें बोलोनि आकाशवाणी । गुप्त ठेली, तेवेळीं जननी । घेती झाली पुत्रातें. ॥ १० ॥ चतुर्भुज जन्मलें बाळ । ऐकोनि पृथ्वीचे नृपाळ । येती त्याहातीं वेल्हाळ । पुत्र वोपी कौतुकें. ॥ ११ ॥ नानादेशींचे भूपती । [11]चोज देखोनि स्वस्थळा जाती, । देववाणीची [12]प्रतीती । कोणापासीं दिसेना. ॥ १२ ॥ [13]यांदवीपुत्राचा संभ्रम । पाहों पातले कृष्ण राम । पितृभगिनीलागीं प्रेम । [14]भ्रौतृपुत्रांतें देखोनी. ॥ १३ ॥ कनका[15]सनीं अधोक्षजा । बैसवूनि केली पूजा । श्रुतश्रवा [16]म्हणे, 'ममात्मजा । चिन्ह कैसें विलोकीं.' ॥ १४ ॥ कृष्णाअंकीं ओपितां बाळ । भुजा खंडि[17]ल्या तात्काळ । कपाळींचें नयनोत्पल । गुप्त झालें देखतां. ॥ १५ ॥ तेणें उद्वेगली माता । हृदयीं प्रवेशली चिंता । आलिंगूनि कृष्णनाथा । पुत्रदान मागतसे. ॥ १६ ॥ श्रुतश्रवा म्हणे 'गोपाळा! । करुणा करावी दयाळा! । तुवां न मारावें शिशुपाळा। ऐशी भाक मज द्यावी' ॥ १७ ॥ कृष्ण [18]म्हणे, 'ऐकें नेमा । [19]शतें अपराध क-

---

१. 'सत्यवती' असा पाठ दोन पोथ्यांत आढळतो. २. याला चार हात व तीन नेत्र होते [अध्याय ४३ श्लोक १]. ३. मस्तकीं. ४. अपशकुन. हा उत्पन्न झाला तेव्हां यानें गाढवाच्या स्वरासारखा शब्द केला. इत्यादि अपशकुन. ५. अशरीरिणी वाणी. ६. राजा. ७. अध्याय ४३ श्लो० ४–५ पहा. ८. हें आकाशवाणीचें उत्तर आहे. ९. दोन अधिक भुजा श्लोक ९-११). १०. ग्रीष्म ऋतूंतील उदकाप्रमाणें. ११. नवल. १२. बाहुपातादिक निदर्शन (चिन्ह). १३. यदुकुलोत्पन्न जी श्रुतश्रवा तिच्या पुत्राचा (शिशुपाळाचा). १४. रामकृष्णांतें. १५. 'सुवर्णासनीं' व 'भद्रासनीं' असे अन्य पाठ आहेत. १६. कृष्णाला म्हणे. १७. नेत्रकमल, ललाटावरील नेत्र (अध्याय ४३-श्लोक १८). १८. अध्याय ४३ श्लोक २० पहा. १९. सर्व वधार्ह जनांचे शंभर अपराध कृष्णानें क्षमा केले, तेव्हां आतेच्या मुलाचे क्षमा करणें संबंधामुळें आवश्यकच होतें. [टीका श्लोक २४].

रीन क्षमा, । अधिक झालिया मोक्षधामा । बोळवीन हस्तकें.' ॥ १८ ॥ येरी म्हणे, 'मान्य वचन, । शैत अपराध आचरी कोण?' । हृदयीं मानूनि समाधान । बोळवीलें गोविंदा. ॥ १९ ॥ तया अपराधांची गणना । व्हावया पातली, भीमसेना! । आतां शिशुपाळ पावेल निधना । कृष्णहस्तें जाण पां'. ॥ २० ॥ भीष्मवाक्यें घृंतावदानें । धडकिजे शिशुपाळ हुताशनें । ज्वाळामाळी तैशीं वचनें । भीष्मकर्णीं पैंरिसवी. ॥ २१ ॥ म्हैणे, 'रे! भाटा! बंदीजना! । किती वाणिसी गोंवळ्या कृष्णा? । जे जे श्रेष्ठ योग्य स्तवना । न वाणिसी तयांतें. ॥ २२ ॥ बाल्हीक कर्णीक द्रोण । जयद्रथ द्रुपद दुर्योधन । रुक्मया भीष्मक जयत्सेन । दंतवक्र भगदत्त ॥ २३ ॥ कृप यूपकेतु मागध । विराट द्रुपद विंदानुविंद । पांड्य चोलनृप प्रसिद्ध । शल्यादिक वर्णी कां. ॥ २४ ॥ वृषसेन एक लक्षगुणीं । शंख कालिंग राजा शकुनी । आवडे तयातें वर्णी । स्तवना योग्य म्हणोनी. ॥ २५ ॥ गाई राखतां जन्म गेला, । गोरसपानें अति माजला, । गोवळीजन विटाळिला । चौंडाळिला व्यभिचारें. ॥ २६ ॥ वृंदा जालंधराची पत्नी । संबंध पाहतां होय भगिनी, । तीसीं दुराचार अवगुणी । करितां नाहीं शंकला. ॥ २७ ॥ कापट्य आणी परस्त्रीगमन । कर्ता नाहीं या समान, । ऐसियाचें काय स्तवन । वारंवार जैल्पसी? ॥ २८ ॥ वर्णूनियां स्वधर्मभ्रष्टा । बळिष्ठाच्या करिसी चेष्टा ।

---

१. 'पाठवीन तवकेंची' असा अन्य पाठ आहे. २. 'शताग माफ करी कोण' असा अन्य पाठ आहे. ३. तुपाच्या आहुती. ४. 'ऐकवी,' 'स्पर्शती' असे अन्य पाठ आहेत. ५. चेदिपति म्हणे. (अध्याय ४४ श्लोक ६-३२ पहा.) ६. अध्याय ४४ श्लोक १९ पहा. ७. वृंदा—ही जालंधर नामक असुराची भार्या. ही मोठी पतिव्रता होती म्हणून तिच्या पुण्यानें देव आणि राक्षस यांचे युद्धांत जालंधराचा पराभव होत नसे, म्हणून विष्णूनें जालंधराचे रूपानें येऊन वृंदेचें पातिव्रत्य हरण केलें. ह्या पातकामुळें जालंधर युद्धांत मृत्यु पावला. म्हणून तिनें सती जातेवेळेस विष्णूला 'तुला स्त्रीवियोग होईल' असा शाप दिला. पुढें ती सती जाऊं लागली तेव्हां तिचा वियोग विष्णूला सहन होईना. तेव्हां तिनें त्याला असा उःशाप दिला कीं, 'मी सती गेल्यावर माझे चितेवर एक तुळसीचें झाड उगवेल त्यासीं विवाह कर म्हणजे वियोगदुःख नाहींसें होईल.' याप्रमाणें त्यानें केल्यावर त्याची शांति झाली—अशी कथा आहे. ८. 'करितोसी' असा अन्य पाठ आहे.

[१]भूलिंगशकुनीची हे निष्ठा । तुझ्याठायीं दिसतसे. ॥ २९ ॥ [२]हिमवद्गिरिपरिसरीं । विशाल वृक्षाचे [३]कोटरीं । बैसोन मुखें गर्जना करी, । म्हणे, 'समुद्र बुद्धीचा'. ॥ ३० ॥ तो म्हणे, 'यत्न लटिका पाहीं । प्रारब्ध पुरवील बैसले ठायीं । ऐसें पक्षियां तेसमयीं । वडीलपणें उपदेशी. ॥ ३१ ॥ सिंहें निद्रिस्थ पसरोनि वदन। दशनीं अडकले मांसकण । त्याचें करावया भक्षण । मुखामाजी प्रवेशे. ॥ ३२ ॥ तें मांस भक्षलिया सकळ । शेखीं शहाणा नोहेचि बरळ । जिव्हा सुरंग मृदु मवाळ । म्हणऊनि झोंबे भक्षावया. ॥ ३३ ॥ चंचू लागतां तीक्ष्ण । सिंहें मेळविलें वदन । ग्रास झाला तेव्हां ज्ञान । फळा आलें तयाचें. ॥ ३४ ॥ स्तवना योग्य ते स्तवावे, । पूजना योग्य ते पुजावे, । त्यागा योग्य ते त्यागावे, । हा विवेक मुख्यत्वें. ॥ ३५ ॥ स्तवनीं वर्णूनि गोविंद । [४]हेळोनि आम्हां उपजविशी क्रोध, । याचा केला पाहिजे वध । भूलिंगशकुनीसारिखा. ॥ ३६ ॥ ऋत्विज[५] मिळोनि सोळाजण । घेती यज्ञपशूचा प्राण । तेवीं अवघे भूपाळगण । करा हनन भीष्माचें.॥३७॥ तैलकटाह करूनि तप्त । बांधोनि सोडा जिवंत तींत, । सोडोनि शस्त्रांचे सं-

---

१. 'भुवं लिंगतीति भूलिंगो बिलशायी पक्षिविशेषः' हा एक पक्षी आहे. हा बोलतो एक व करतो एक अशी प्रसिद्धि आहे. [अ० ४४ श्लो० २७-२८ टीका.] या भूलिंग शकुनीच्या उल्लेखावरून मुक्तेश्वरानें मूळ ग्रंथ चांगला पाहिला होता असें म्हटलें पाहिजे. **'पंचतंत्रा'**दि ग्रंथांत पशुपक्ष्यांच्या गोष्टी सांगून जसा बोध केला आहे, तसा प्रकार **'महाभारतां'**तील पर्वांमध्येंही आढळतो. मागच्या अध्यायांत चोरून अंडीं खाणाऱ्या पक्ष्याची गोष्ट आहे. [ओंव्या १४५-१५२.] २. हिमाचलाजवळच्या भूमीच्या ठायीं. ३. ढोलींत. ४. हेळणा करून. ५. श्रौत कर्में करणाऱ्या यजमानाला जे साहाय्य करतात त्यांस ऋत्विज् म्हणतात. धनप्राप्तीच्या आशेनें हे यजमानास साहाय्य करणारे याजक होत. सोमसंस्थेंतील यज्ञास सोळा ऋत्विज् लागतात. यांत चार मुख्य असून प्रत्येकाच्या हाताखालीं लहान सान कामें करणारे तीन तीन याजक असतात. असे एकंदर सोळा होतात. **होता, अध्वर्यु, ब्रह्मा,** आणि **उद्गाता** हे प्रमुख होत. होता याजपाशीं मैत्रावरुण, अच्छावाक् व ग्रावस्तोता; उद्गाता याजकाच्या हाताखालीं प्रस्तोता, प्रतिहर्ता व सुब्रह्मण्य; ब्रह्मा याजपाशीं ब्राह्मणाच्छंशी, पोता व आग्नीध्र; आणि अध्वर्युपाशीं प्रतिप्रस्थाता, नेष्टा व उन्नेता, अशी याजकांची व्यवस्था असते. अध्वर्यु यजुर्वेदी असून त्याचें काम अग्नींत आहुति देण्याचें; होता ऋग्वेदी असून त्याचें काम यज्ञांतील देवतांस स्तुतिपूर्वक आव्हान करण्याचें; उद्गाता सामवेदी असून त्याचें काम देवतांच्या संतोषार्थ सामवेदगायन करण्याचें; ब्रह्मा वेदत्रयज्ञ असून त्याचें काम यज्ञांतील सर्व कामावर पैरवी ठेवण्याचें. या सोळा ऋत्विजांशिवाय सदस्य म्हणून एक असतो त्याचें काम न्यूनाधिक काय होतें हें पाहून व्यवस्था ठेवण्याचें. याला विधिदर्शी अथवा न्यूनाधिकविचारक म्हटलें तरी चालेल.

घात । खंड विखंड करावें.' ॥ ३८ ॥ हांसोनि **भी**ष्माचार्य म्हणे, । 'त्याचिया सप्त पूर्वजां उणें । जीं हीं बोलिलासी वचनें । तीं साच करूनि दावि ना? ॥ ३९ ॥ तिखटपणें तृणाचीं अग्रें । तीं खंडूं[1] म्हणती वज्रधारें । **भी**ष्मसिंहाप्रती वानरें । युद्धमात करिताती. ॥ ४० ॥ मुकुट मिरवीतसे माथां । तेथें म्यां ताडिल्या लाता । जरि हा बोलिला बोल आतां । साच करूनि दावीं ना. ॥ ४१ ॥ पशुप्राय प्राणहनन । तैलकटाहामाजी देहपचन । करूं म्हणतसां तें स्वप्न । देखतसां, भ्रांत हो!' ॥ ४२ ॥ पडली काळमृत्यूची छाया । मरणभया मुकली काया, । भंगोनि मर्यादेच्या पायां । **चै**द्य जल्पे भलतेंची. ॥ ४३ ॥ शस्त्र काढोनियां पैजा । **कृ**ष्णासि म्हणे[2], 'उठिजे झुंजा, । अजूनि तूतें नुपजे लज्जा । क्षात्रत्वाची, पामरा! ॥ ४४ ॥ तुझी तुष्टी आणि रुष्टी । दोन्ही तृणप्राय माझिये दृष्टी, । जैसी निर्धनिकाची मुष्टी । झांकली उघडी समान. ॥ ४५ ॥ कुक्कुट डावें उजवें जातां । शकुनापशकुन कायसी कथा? । तुझा क्षोभ प्रसन्नता । तयातुल्य मज वाटे. ॥ ४६ ॥ **रु**क्मिणी मातें संकल्पिली । तेव्हांचि मनीं म्यां भोगिली, । पुनर्भुक्त[3] तुज प्राप्त झाली । मुक्तमाळेसारिखी ॥ ४७ ॥ मनाची क्रिया तेचि खरी, । **भी**मकी माझी अंतुरी[4] । तुवां नेली करूनि चोरी । **द**शाननासारिखी. ॥ ४८ ॥ तुजहूनि **शा**ल्व[5] पवित्र भला । नाहीं **अं**बेसी आतळला[6] । आणिका नेमिलिया बोला । शंकूनियां उत्तम. ॥ ४९ ॥ ज्यालागीं वोगँरिलें[7] ताट । आणिकां नेतां तें उच्छिष्ट । हा धर्म जाणती धर्मिष्ठ । सर्वभ्रष्टा! तुज नकळे.' ॥५०॥ श्री**कृ**ष्ण म्हणे, 'रे! अधमा! । बहुत अन्याय केले क्षमा । शतभरी अपराधांची सीमा । लोटोनि दुरी आलासी. ॥ ५१ ॥ शरीरनिंदेहूनि शतगुणी । मातृपितृनिंदा मानी । त्याहूनि सहस्रसंख्या जनीं । आचार्यनिंदा बोलिजे. ॥ ५२ ॥ पुरुषासन्मुख स्त्रियेची निंदा । ते मानिजे कोटी अपराधा । **रु**क्मिणीतें दोषापवादा । वदतां मृत्यु तात्काळ. ॥ ५३ ॥ शूद्रें इच्छिली वेदश्रुती[8] । तो केंवी लाधे तिची प्राप्ती? । तुज अभाग्या **रु**क्मिणी सती । क-

---

१. 'खड्ग' असा अन्य पाठ आहे. २. अ० ४५ श्लो० २-४ पहा. ३. उच्छिष्ट. ४. स्त्री. 'नोवरी' असा अन्य पाठ आहे. ५. या शाल्व राजाला अंबेनें मनानें वरिलें होतें, परंतु तिला भीष्मानें हरून नेल्यामुळें तिचा स्वीकार (ती परत आल्यावर) शाल्वानें केला नाहीं. ६. शिवला. ७. वाढिलें. ८. हाच दाखला मूळांत आहे. 'शूद्रो वेदश्रुतिम्' असें मूळांत आहे. (श्लो० १५.)

त्यांतींही लाधेना. ॥ ९४ ॥ मागां सौभाचिये[1] संगती । अपार पीडिली द्वारावती.[2] । वसुदेवाचे यागाप्रती । नाना विघ्नें तुवां केलीं. ॥ ९५ ॥ तया अपराधांचें फळ । एकदांचि भोगीं सकळ, । जैसें ग्रहणीं रविमंडळ । राहुवदनीं कोसळे. ॥ ९६ ॥ दोष वदलासि पापमूर्ती । हे धर्म सभा पवित्र तीर्थीं । प्रायश्चित्त आपुल्या हातीं । आजी देईन निर्धारें.' ॥ ९७ ॥ ऐसें बोलोनि मधुसूदन । स्मरिलें चक्र सुदर्शन, । हाता आलें न लगतां क्षण । बाळसूर्यासारिखें. ॥ ९८ ॥ तेणें ताडिला शिशुपाळ । जैसा वज्रें महाशैलें,[3] । मस्तक तुटोनि तात्काळ । गगनमार्गें उसळलें. ॥ ९९ ॥ घोष करीत घनगर्जना । म्हणे, 'म्यां जिंकिलें कृष्णा, । कृष्णत्व लेऊनि मोक्षसदना । स्वामी झालों निर्धारें.' ॥ ६० ॥ शिर उतरोनि भूतळीं । पातलें कृष्णचरणाजवळीं, । मुखापासोन तेचकाळीं । तेजकळिका निघाली. ॥ ६१ ॥ भानुतेजासारिखा[4] प्रबळ । चैतन्यतेजाचा कल्होळ । शत्रुमुखाहूनि तात्काळ । कृष्णमुखीं रिघाला. ॥ ६२ ॥ जीवत्व सामावे ईश्वरीं । त्वंपद[5] तत्पदा[6] माझारीं । तेंवी कृष्णाचे शरीरीं । शिशुपाळतेज बिंबलें. ॥ ६३ ॥ रुसोनि मान मागे आप्त । बाळक आंसुडी हातिंची वस्त । विरोध दावूनि लोकांत । स्वार्थ परमार्थ साधिला. ॥ ६४ ॥ यालागीं वैर अथवा भजन । समान देखे मधुसूदन । शिशुपाळ भक्त गहन । म्हणोनि हृदयीं ठेविला. ॥ ६५ ॥ तेवेळीं चळलें पृथ्वीतळ[7] । आंदोळले कुळाचळ[8] । मर्यादा सांडोनि सिंधुजळ । भूमंडळीं पसरलें. ॥ ६६ ॥ राजे करिती हाहाकार । एक चुरिती उभय कर, । एक[9] मानूनि प्रळय थोर । अधोवदनीं विलपती. ॥ ६७ ॥ एक म्हणती 'वोखटें झालें.' । एक म्हणती, 'शल्य खंडलें,' । कौरव म्हणती, 'उणें पडिलें । बळ आमुचें सर्वस्वें.' ॥ ६८ ॥ देवदुंदुभी लागल्या गगनीं, । सुर वर्षती दिव्यसुमनीं, । जयजयकाराचिये ध्वनीं । भक्त पिटिती टाळिया. ॥ ६९ ॥ यापरी शिशुपाल पावला निधंना,[10] । धर्म आज्ञापी भीमार्जुना, । 'चैद्याचिया देहदहना । पुत्राहातीं करवणें.' ॥ ७० ॥ संस्कारिली शिशुपाळतनू, । राज्यीं स्थापिला[11]

---

१. शाल्वराजाचें विमान. २. यानें द्वारकापुरी दग्ध केली. (अ० ४५ श्लो० ७.) ३. पर्वत. ४. अध्याय ४५ श्लोक २६-२७ पहा. ५. जीव. ६. ब्रह्मीं. ७. श्लोक २९-३३ पहा. ८. कुलपर्वत. हिमवान्, मलय, चित्रकूट, रजताद्रि (कैलास), इंद्रकील (मंदार), किष्किंध. (पृ० ४०.) ९. 'म्हणती अनर्थ झाला थोर,' 'पक्षपाती म्हणती मर मर' असे अन्य पाठ आहेत. १०. मरणा. ११. अध्याय ४५ श्लोक ३६ पहा.

पुत्र सगुणू, । आप्त रायां दिधला मानू । दिव्यवस्त्रीं भूषणीं. ॥ ७१ ॥ ब्राह्मण क्षत्रिय मुख्य करूनी । उचित वोपिलें चहूं वर्णीं, । सुख संपदा अधिक उणी। कोणा हृदयीं असेना. ॥ ७२ ॥ विप्रासि शांती सुखासि वृद्धी । अन्न दक्षिणा बहु समृद्धी । कृष्णें[1] रक्षिला तो सिद्धी । राजसूययज्ञ पावला. ॥ ७३ ॥ अव-[2] भृतस्नानीं सुस्नात नृप । आनंद ब्रह्मांडीं अमूप । दिधले राजयां निरोप । स्वस्वनगरा जावया. ॥ ७४ ॥ हस्त जोडोनि वंदिती चरण, । 'श्लाघ्य केले सेवक दीन, । कृपा करोनि क्षणक्षण । सांभाळिजे[3] समस्तां. ॥ ७५ ॥ न्यून पूर्ण नाणिजे चित्ता, । होणार तें ईश्वर सत्ता[4]. । पांडव आपुले हे आतां । स्नेह हृदयीं असों द्या.' ॥ ७६ ॥ यापरी वदोनि विनयभक्ती । राजे धाडिले स्व-स्थळाप्रती, । आज्ञा मागे रुक्मिणीपती[5], । 'जाणें आतां द्वारके. ॥ ७७ ॥ भाग्यें यज्ञाची समाप्ती । भाग्यें साम्राज्यपदाची प्राप्ती । भाग्यें जाहलासि चक्रवर्ती[6] । सार्वभौम भू-तळीं. ॥ ७८ ॥ स्नेहदृष्टीं पाहें अनुजा । स्नेहें पाळी सकळ प्रजा । बुद्धी विवेकाची भाजा[7] । करूनि आज्ञा वर्तवी.' ॥ ७९ ॥ धर्म म्हणे, 'श्रीकृष्णराया ! । सर्व सामर्थ्य तुझिया पाया । तुझी निजकृपा लाहे तया । अप्राप्त कांहीं असेना. ॥ ८० ॥ आज्ञा द्यावया समर्थ नोव्हें । जावोनि मागुती शीघ्र यावें । माझें चित्त तें र-क्षावें । पादपद्मीं आपुलें.' ॥ ८१ ॥ कुंतीद्रौपदीसुभद्रेतें । तो बोले भीमा-र्जुनातें । पुशिलें नकुळसहदेवांतें, । 'अखंड स्मरणीं असावें.' ॥ ८२ ॥ ते म्हणती, 'त्वां हरिलें मन । आतां स्मरण कर्तें कोण ? । जेथें जेथें तुझे चरण । तेथें मस्तक आमुचें. ॥ ८३ ॥ कृष्णा ! मागणें हेंचि आतां । हृदयांतूनि न वचे परता । भूताकृती अवलोकितां । रूप दावीं आपुलें. ॥ ८४ ॥ श्रवणीं वदनीं वसतां कृष्ण । मावळे वियोगाचें भान, । यापरी पावोनि समाधान । बाहेर कृष्ण बोळविला. ॥ ८५ ॥ स्वस्तिवाचनीं ब्राह्मणवंदनीं । मंगळ वाद्यें नामस्मरणीं, । प्रेमळ भक्तांचिया श्रेणी । जयजयकारें गर्जती. ॥ ८६ ॥ मनो-वेगी चारी वारू । दारुक सारथी अतिचतुरू । रथीं बैसोनि रुक्मिणीवरू । जाता झाला द्वारके. ॥ ८७ ॥ बोळवोनि शार्ङ्गधरा । धर्म परतोनि पातला नगरा, । नमस्कारिलें कौरवेश्वरा । निर्जजनकजनकाशी. ॥ ८८ ॥ भीष्म[8] द्रोण द्रौणी विदुर । प्रज्ञाचक्षू[9] राजेश्वर । पालाणूनि[10] रथ कुंजर । कुंजरपुरा

---

१. 'केशवेन सुरक्षितः' असें मूळांत आहे. (श्लोक ३८.) २. श्लोक ४० पहा. ३. 'संभाळिलें पाहिजे' असा अन्य पाठ. ४. 'कर्ता' असा अन्य पाठ आहे. ५. श्लोक ५२ पहा. ६. मागें पृ० ८ टीप २ पहा. ७. भार्या. ८. भीष्माला. ९. धृतराष्ट्र. १०. सज्ज करून.

बोळविले. ॥ ८९ ॥ बंधूसहित दुःशासन । सवें दीधला भीमसेन । नगरा पावल्या परतोन । इंद्रप्रस्था पातला. ॥ ९० ॥ द्रुपदासवें बोळवीत । धर्में पाठविला पार्थ[1], । विराटासवें परम आप्त । धृष्टद्युम्न धाडिला. ॥ ९१ ॥ शकुनी आणी दुर्योधन । निवाडें पाहूं सभासदन । म्हणोनि राहिले [2]दोघेजण । इतर गेले स्वस्थाना. ॥ ९२ ॥ पुढां मयसभा अवलोकुन । अवमान पावेल दुर्योधन । तेंचि विषादा निज कारण । द्यूतारंभ जाणिजे. ॥ ९३ ॥ द्यूत तेंचि कलहमूळ । क्षय पावेल कौरवकुळ । ऐसी सूचना अर्थकुशळ । पुढां कथेची जाणोत. ॥ ९४ ॥ अवलोकोनि सभासदन । नारदमुनी बोले वचन, । 'धर्मराजा ! सावधान । पुढें दुश्चिन्ह दिसताहे. ॥ ९५ ॥ जितुके आले या अध्वरा । तितुके निमती राजेश्वरा ! । निर्वीर होईल वसुंधरा । तेरावर्षीनंतरें. ॥ ९६ ॥ सुचना सांगोनि मी जातसें, । विशद वदिजे वेदव्यासें । धरिलें पाहिजे त्वां मानसें । सद्गुरुवाक्य म्हणोनी.' ॥ ९७ ॥ ऐसें बोलोनि सर्वज्ञमूर्ती । जाता झाला द्वारकेप्रती । पुढां वर्तलें तें श्रोतीं । श्रवण केलें पाहिजे. ॥ ९८ ॥ राजसूययज्ञसमाप्तीं । शिशुपाल होमिला पूर्णाहुतीं । पुढां द्यूतारंभ निगुती । श्रोते सादर परिसोत. ॥ ९९ ॥ लीलाविश्वंभर किंकर । विनवी कवी मुक्तेश्वर । देशभाषा परी भांडार । साहित्याचें जाणिजे. ॥ १०० ॥ इति श्रीसभापर्व भारत । सर्वशास्त्रांचा मथितार्थ । श्रवणें श्रोतयां मोक्ष देत । नित्य नित्य परिसतां[3]. ॥ १०१ ॥

---

## अध्याय बारावा.

राजसूययज्ञ[5] संपतेकाळीं । द्वारके गेलिया [6]वनमाळी । व्यासदेव शिष्यमेळीं[7] । धर्माजवळीं पातले. ॥ १ ॥ पूजा झाली [8]कनकासनीं । राजा बोले विनयवाणी, । 'गूढ वदला नारदमुनी । तें त्वां [9]प्रगट करावें. ॥ २ ॥ उठला वि-

---

१. श्लोक ४७ पहा. २. श्लोक ६८ पहा. येथें 'शिशुपालवधपर्व' समाप्त झालें. यापुढें 'द्यूतपर्वा'स आरंभ होतो. [मोरोपंत–सभापर्व–अध्याय २ गीति ४५–काव्यसंग्रह पृ० १८.] ३. स्पष्ट. ४. या एकादश अध्यायाला 'शिशुपालवध' असें नांव आहे. अध्याय ४६ श्लोक १ पहा. ५. राज्ञा लतात्मकः सोमः सूयतेऽत्र इति राजसूयम् तन्नामा यज्ञः राजसूययज्ञः । यज्ञविशेष. ६. वनमाली. (वनमाला+इति वनमाला अस्ति अस्य इति)=वनमाला धारण करणारा श्रीकृष्ण. 'आजानुलंबिनी माला सर्वर्तुकुसुमोज्ज्वला । मध्ये स्थूलकदंबाढ्या वनमालेति कीर्तिता ॥.' ७. पुष्कळ शिष्यांसह. ८. सुवर्णाच्या आसनावर. ९. स्पष्ट करून सांगावें.

ग्नाचा उमाळा । त्रिविध[1] केतू दिसती डोळां । अंगा येतसे कंटाळा । क्षणक्षणीं विस्मृती. ॥ ३ ॥ **नारदें** त्रिविध उत्पात कथिले । जितुके राजसूययज्ञा आले । तितुके क्षय पावती वहिले[3] । आमंत्रिले अंतकें.[4] ॥ ४ ॥ उत्पात देखोनियां गगनीं । यालागीं बोलिला **नारदमुनी,** । '**व्यास** सांगेल अर्थ करूनी । ऐसी आज्ञा दीधली ॥ ५ ॥ **व्यास** वदेल याचा अर्थ.' । वदोनि गेला **विरिंचीसुत,**[5] । 'तूंचि सर्वार्थी समर्थ । सर्वज्ञ होसी सांगावया.' ॥ ६ ॥ राजा नेऊनि एकांतीं । **व्यास** वदे निर्जहितार्थीं.[6] । म्हणे, 'पुत्रा! विचित्र गती । प्रारब्धाची कळेना. ॥ ७ ॥ ईश्वर निष्ठुर कीं कृपाळु । काय करील केव्हां **काळु** । याचा निश्चय विवेककुशळु[8] । करूं नेणे[9] सर्वथा. ॥ ८ ॥ नकळे **विष्णुमायेचा** महिमा । जे विचार हिरोनि[10] पाडी भ्रमा, । म्हणोनि **नला** आणि **रामा** । अपाय घडले जाणतां. ॥ ९ ॥ पुण्यमार्गीं खेळतां निखिलें[11] । दुःखें प्राप्त होती प्रबल, । पाप करितां क्षेम कुशल । दिसे येकाळीं वाटतें. ॥ १० ॥ पाप करितां पाविजे दुःख । सुकृतें[12] भोगिजे अक्षयीसुख । ऐसें बोलती **मन्वादिक** । वेदवाक्य प्रमाण. ॥ ११ ॥ नकळे पापपुण्याचें रूप । पापी पुनः पुन्हा करी पाप, । पाप करितांही अमुप[13] । पुण्यफळें भोगिती. ॥ १२ ॥ अधर्मेंचि धर्म एकातें । विहित[14] तें अविहित सर्वांतें । दिसे सर्वत्र बहुतांतें । समाधाना सारिखें. ॥ १३ ॥ यालागीं कांहीं नेणवे मनें । ईश्वराचें ईश्वर जाणे । ऐशा वेदवाक्यप्रमाणें । पुरुष जाणते[15] वर्तती.[16] ॥ १४ ॥ विचारें पाहतां न मिळे साक्षी । म्हणोनि मिळिजे प्रारब्धपक्षीं[17] । जैसा समुद्रीं भ्रमोनी पक्षी । नौकास्तंभीं[18] आरूढे. ॥ १५ ॥ सर्वांस अदृशप्रमाण पाहीं । आणीक वदावया आश्रय नाहीं । ज्ञानदृष्टीं पाहतां देहीं । मिथ्या मायिक कल्पना. ॥ १६ ॥

---

१. तीन. २. प्रकारचीं. दुश्चिन्हें. ३. सत्वर. ४. यमानें. ५. विरिंची(चि)+सुत=ब्रह्मदेव+पुत्र. नारद. ६. आप्तांच्या हिताचें (बऱ्याचें). पांडव श्रीमद्व्यासाचे नातू असल्यामुळें त्यांना त्यांचे निज असें ह्मटलें आहे. ७. बाळा. ८. विचारवान्. ९. जाणत नाहींत. १०. हिसकाऊन घेऊन, विचारशक्तीचा क्षणभर नाश करून. ११. सकल. १२. पुण्यानें. १३. पुष्कळ. १४. शास्त्राला संमत. १५. जाणणारे, शास्त्रज्ञ. १६. वागतात. १७. 'अदृष्टाप्रमाणें व्हायचें तें होतें' असें म्हणणारांच्या पक्षास. १८. डोलकाठीवर. जसा समुद्रांत फिरणारा पक्षी कोठें आधार मिळत नसल्यामुळें समुद्रांतून चालणाऱ्या नौकेच्या डोलकाठीवर बसतो, तसाच एखादी अपूर्व गोष्ट घडली व पुष्कळ विचार केला असतांही तिचें सयुक्तिक कारण कळत नाहीं तेव्हां मनुष्य प्रारब्धपक्षास अनुसरतो—असा ह्या पद्याचा अर्थ आहे.

जीवांसि जीवित्वअभिमान । तैंवचि[1] वर्ते कर्माधीन[2] । स्वरूपीं लागल्या अनुसंधान । सुख दुःख असेना. ॥ १७ ॥ असो युक्तीचें जाळमाळ; । सुचना सांगतसें अळुमाळ[3] । धैर्यापासूनि अचळ । बुद्धी विकळ[4] होऊं नेदी. ॥ १८ ॥ तेरा वर्षेंपर्यंत राया । पडेल अवदशेची छाया । भांडवल उरेल काया[5] । कौपीनेसी दिसतसे. ॥ १९ ॥ होईल ऐश्वर्याचा नाश । चिरकाळ घडेल अरण्यवास । तेथेंही क्षणक्षणा त्रास । दुराचारी देतील. ॥ २० ॥ इतुकें सोसून धरिल्या धीर । कृपा करील जगदीश्वर । होईल शत्रूंचा संहार । पुढती राज्य पावाल. ॥ २१ ॥ दुर्योधनाचेनि अपराधें । भीमार्जुनाच्या बळविषादें । कौरव आणी नृपांचीं[6] वृंदें[7] । क्षया जाती जाण पां. ॥ २२ ॥ पृथ्वी होईल निःक्षेत्री[8] । अशुद्धें[9] रंगेल सर्व धरित्री[10] । मृत्तिका भिजोनि भूमिपात्रीं । गोठोनि होईल गोळिका. ॥ २३ ॥ विवेकबुद्धीनें जितकें टळे । तितकें टाळिजे विवेककुशळें । यालागीं माझीं हीं प्रांजळें[11] । वचनें हृदयीं धरावीं[12]. ॥ २४ ॥ पुढें वोढवूनि प्रारब्धा[13] । जो टाकी प्रयत्नधंदा । तो पुरुष बुद्धिमंदा । माजी गणिती जाणते[14]. ॥ २५ ॥ न कीजे कोणाची हेळना । न बोलावें दुष्टवचना । जाणोनि पराची वेदना । परोपकारा भजावें[15]. ॥ २६ ॥ घ्यावे ऋषींचे आशीर्वाद । भूतीं[16] न करावा विरोध । वर्म[17]स्पर्शाचे कुटिलशब्द । न बोलावे कवणातें. ॥ २७ ॥ उगेंचि न जावें परसदना[18], । विनोदेंही[19] न कीजे परछळणा, । दुरुक्ती बोलतां दुर्जना । प्रत्युत्तर न द्यावें. ॥ २८ ॥ संसर्ग[20] न करावा नीचाचा, । विश्वास न मानावा गोत्रजाचा[21], । क्रोध मद मत्सर यांचा । विटाळ मानी मानसें. ॥ २९ ॥ द्यूतव्यसनीं[22] न धरीं गोडी । हेचि धरूनि सांगे गोडी । द्यूतें नासे पुण्यजोडी[23] । दुःखकोडी भोगणें. ॥ ३० ॥ तथापी वाटेल खेळावें । दुर्योधनासीं न खेळावें । खेळसी तरी न बोलावें । पैजे[24] असें वाणीनें[25]. ॥ ३१ ॥ होडें[26] बोलसील शब्दीं । तरी पणा

---

१. तेव्हांच. २. जन्मांतरीं केलेल्या कर्माप्रमाणें. ३. अल्प. ४. 'विवेक' असाही पाठ आहे. ५. देह. ६. राजांचीं. ७. समूह. ८. क्षत्रियहीन. ९. रक्तानें. १०. पृथ्वी. ११. स्वच्छ. १२. लक्षांत ठेवावीं. हृदयीं धरणें=स्मरणें, मनांत बाळगणें, ध्यानांत ठेवणें. १३. प्रारब्धाला पुढें करून, प्रारब्धावर अवलंबून राहून. १४. शहाणे, व्यवहारज्ञ. १५. करीत जावें. १६. प्राणीमात्राचे ठायीं. १७. वर्माला लागणारे, मनाला टोंचणारे. १८. दुसऱ्याचे घराला. १९. थट्टेनें देखील. २०. संगति. २१. दायाजाचा, दाईजाचा. २२. जुवा. २३. सुकृताचा संचय. २४. पण. २५. तोंडानें. २६. पण, प्रतिज्ञा.

न घालीं द्रौपदी । [1]कर्में चळेल हे बुद्धी । तरी मग पुढां सांगतसें. ॥ ३२ ॥ जो जो प्राप्त होईल भोगें[2] । त्याचा मानूं नको [3]उबग । तेणें सत्वर [4]रमारंग । कृपा करी निर्धारें. ॥ ३३ ॥ विदुर सांगेल ते गुरुबुद्धी । मानून वर्ततां पावाल सिद्धी । आणीक कोणाचे झकवादीं । वावरों नेदीं मानसा. ॥ ३४ ॥ ऐसियापरी बुद्धिसमुद्रा ! । सांडोनि भाग्यपदाची निद्रा । सावधान कुरुनरेंद्रा ! । विष्णुभजनीं असावें. ॥ ३५ ॥ दक्षिणदिशेमाजी स्वप्नीं । दर्शन देईल [5]शूळपाणी । तोचि शत्रूतें निरसुनी । संरक्षील तुम्हांतें.' ॥ ३६ ॥ ऐसें सांगोनि कृपामूर्ती । व्यासदेव कैलासपर्वतीं । जाता झाला; मागें नृपती । [6]चिंतार्णवीं पडियेला. ॥ ३७ ॥ धैर्य अवलंबोनि चित्तीं । व्यास वदला ज्या ज्या युक्ती । निवेदी त्या [7]अनुजांप्रती । भीमार्जुनां एकांतीं. ॥ ३८ ॥ पार्थ म्हणे, 'गुणसंपन्ना ! । कांहीं दुश्चित नाणिजे मना । हृदयीं चिंता श्रीकृष्णचरणा । सर्व कल्याण आमुतें. ॥ ३९ ॥ जेथें श्रीकृष्णकथाश्रवण । मुखीं श्रीकृष्णनामस्मरण । हृदयीं श्रीकृष्णमूर्तीचें ध्यान । तेथें विघ्न स्पर्शेना. ॥ ४० ॥ [10]अदृष्टवाताचेनि बळें । लोटल्या विघ्नाचीं [11]अभाळें । तीं अंगा न लागती सकळें । वितळोनि जाती [12]आपसया.' ॥ ४१ ॥ ऐसें अनुवादोनि सुमती । विचारें चित्त आणिलें शांती । श्वास टाकूनि धर्ममूर्ती । 'ईश्वरेच्छा' म्हणतसे. ॥ ४२ ॥ असो. हे शकुनी दुर्योधना । आच्छादिली विवंचना । मग सर्वपंक्ती कुरुभूषणा । सुखभोजनें सारिलीं. ॥ ४३ ॥ शकुनी बोले विनयवाणी, । 'आवडी दुर्योधनाचे मनीं । मयसभा आपुले नयनीं । विलोकावी निवाडें.' ॥ ४४ ॥ 'अवश्य' म्हणे [13]धरित्रीनाथ । आदरें उठविला आर्तवंत । परमप्रीती धरिला हात । स्वहस्तकें आपुलिया. ॥ ४५ ॥ [14]अजातशत्रू [15]पुण्यश्लोक । बंधु मित्रें[16] प्रधान लोक । पहावया सभेचें कौतुक । समुदायेशीं निघाला. ॥ ४६ ॥ द्रौपदीआदीकरूनि सकळा । चालिला राणियांचा मेळा । पुढें मार्ग केला कुशळा । शिल्पकारसेवकीं. ॥ ४७ ॥ स्थळोस्थळीं [17]स्थिरावती । चित्रें [18]विचित्रें विलोकिती । [19]माथे [20]तुकोनि मानवती । धन्य म्हणती क-

---

१. प्रारब्धबलानें. २. दशा. ३. वीट, कंटाळा. ४. श्रीकृष्ण. ५. शंकर. (शूल आहे पाणीच्या ठायीं ज्याच्या तो शूलपाणि.) ६. चिंतारूप सागरांत. ७. लहान भावांना. ८. 'पैज अथवा पणातें' असाही पाठ आहे. ९. चिंतन करा, ध्यान करा. १०. दैवरूपी वाऱ्याच्या बळानें. ११. अभ्र, ढगें. १२. आपोआप. १३. राजा. (धर्म.) १४. ज्याला शत्रु झाला नाहीं असा धर्मराज. १५. शुद्धकीर्ति. 'पद्ये यशसि च श्लोकः' इत्यमरः. १६. 'मंत्री' असाही पाठ आहे. १७. थांबती. १८. चमत्कारिक. १९. मस्तकें. २०. डोलवून.

तया. ॥ ४८ ॥ द्वार असतां दिसती भिंती । भिंतिभागीं द्वाराकृती । तेथें कुशळडोळसांची मती । स्तब्ध होय चालतां. ॥ ४९ ॥ स्थळें असतां भासती जीवनें[1] । चालतां शंकिजे दुर्योधनें । हस्तें सांवरोनि वसनें[2] । नव्हे म्हणती [3]संगिये. ॥ ५० ॥ स्फटिकवापिका उदकभरित । स्थळाऐसिया नीट भासत । चालतां पडला वस्त्रासहित । निसरोनियां नेणतां. ॥ ५१ ॥ भीमार्जुनासहित सकळीं । हास्य कीजे पिटोनि टाळी । असंख्य प्रमदांसह[4] पांचाळी[5] । हास्य करी विनोदें. ॥ ५२ ॥ नकुळ सहदेव दोघेजणीं । [6]कडे काढिला करें धरूनी । धर्माज्ञेनें सेवकजनीं । [7]नूतन वस्त्रें वोपिलीं[8]. ॥ ५३ ॥ कृत्रिमें झांकिलीं दिसती कपाटें[9] । हातें लोटूं जातां आपटे । पुढें पडतां हस्तनेटें । माद्रीपुत्रें धरियेला. ॥ ५४ ॥ पुढती चालतां सभागारीं । द्वार नसतां रिघाला[10] द्वारीं । वज्रशिळा लागोनि शिरीं । मूर्छा आली दारुण[11]. ॥ ५५ ॥ पुढती हांसोनि बोले भीम, । 'शतपुत्रांत अत्युत्तम । धृतराष्ट्रपुत्र[12] ऐसें नाम । सत्य केलें त्वां एकें.' ॥ ५६ ॥ ऐसीं वर्मोच्चारें भेदतां श्रवणीं । क्रोधें झाला तो प्रळयाग्नी । परी सांवरूनि शूळपाणी[13] । ग्रासी जैसा विषातें. ॥ ५७ ॥ म्हणे, 'मज असेल पुरुषचिन्ह । तरी मी होईन या उत्तीर्ण, । पांडव लागती रानोरान । ऐसें करीन तात्काळीं. ॥ ५८ ॥ स्त्रियांसहित याज्ञसेनी[14] । मज हांसली पापखाणी । याचें फळ सभास्थानीं । भोगवीन अपार. ॥ ५९ ॥ अविचारकोप करितां आतां । होईल शिशुपाळाची[15] कथा । यालागीं बुद्धिबळें घाता । वैरियांचें करावें.' ॥ ६० ॥ ऐसें [16]कुटिलें धरूनि चित्तीं । आज्ञा मागे धर्माप्रती । अजातशत्रु परमप्रीती । अतिसन्मानें बोळवी. ॥ ६१ ॥ [17]जांबूनदकनकाभरणें । [18]अनर्घ्य रत्नें अमूल्य वसनें । दुर्योधनालागीं मानें । धर्मराजें अर्पिलीं. ॥ ६२ ॥ आपण येऊनि बोळवीत । बोळविले शकुनीसहित । मार्गीं[19] दुर्योधन अद्भुत । संतापज्वरें तापला. ॥ ६३ ॥ राजसूययज्ञश्रियेचा खेद । अवमानाचा अतिविषाद । तेणें हृदयीं जांतवेद[20] । क्रोधरूपें धडकला. ॥ ६४ ॥ तप्तलोहउष्णता[21]

---

१. पाणी. २. वस्त्रें. ३. बरोबर असलेले इतर लोक. ४. स्त्रियांसह. ५. द्रौपदी. ६. कांठावर, वर. ७. अध्याय ४७ श्लोक ८ पहा. ८. आणून दिलीं. ९. कवाडें, दारें. १०. शिरला. ११. अध्याय ४७ श्लोक ११-१२ पहा. १२. येथें धृतराष्ट्र या शब्दानें 'आंधळा मनुष्य' असें सुचविलें आहे. १३. शिव. १४. द्रौपदी. १५. शिशुपालाचा जसा अंत झाला तसा अंत. १६. दुष्टानें. १७. जांबूनद नांवाच्या सोन्याचीं भूषणें. १८. अमूल्य. १९. हस्तिनापुरास परत जातांना वाटेंत. [अ० ४७ श्लो० १५.] २०. अग्नि. २१. तापलेल्या लोखंडाची उष्णता.

गात्रीं । खदिरांगाररक्तता नेत्रीं । तीव्र श्वास टाकी वक्त्रीं । काळसर्पासारिखा. ॥ ६५ ॥ नेत्रद्वारा डळमळी नीरें । दांत खाऊनि चावी अधर । मनगटें चावूनि करी चूर । हृदय पिटी आक्रोशें. ॥ ६६ ॥ त्यजिलें दिव्यान्नभोजन । त्यजिलीं अंगनाभोग शयन । अवलंबोनि महामौन्य । स्तंभप्राय तटस्थ. ॥ ६७ ॥ म्हणे, 'धिग् धिग् प्राण्या मूढा ! । वैरियाचा उत्कर्ष गाढा । दृष्टीं देखोनि माकडा ! । काय जीविसी संसारीं ?' ॥ ६८ ॥ अवस्था देखोनि ऐसी । शकुनी पुसे साक्षेपेंसीं, । 'काय व्यथा तुज मानसीं । यथार्थेसीं मज सांगें ?' ॥ ६९ ॥ सुयोधन म्हणे, 'मातुळा ! । शत्रुलक्ष्मी देखोनि डोळां । संताप उपजला तो सकळा । दुःखाचिया मस्तकीं. ॥ ७० ॥ शत्रुश्रियेचा ज्वर अद्भुत । अवमानाचा अशनिपात । झाला तेणें देह त्वरित । पडेल ऐसें मज वाटे. ॥ ७१ ॥ ही केंवि खंडेल महाव्याधी ? । कवण उपाय दिव्यौषधी ? । तें तूं सांगावया उदधी । सुबुद्धीचा मी जाणें.' ॥ ७२ ॥ शकुनी म्हणे, 'दुर्योधना ! । कायसा विषाद मानिसी मना ? । पुण्यादृष्टें प्राणी नाना । ऐश्वर्यातें पावती. ॥ ७३ ॥ अर्पूनि पूर्वपुण्याचा ठेवा । प्राणी पावती अक्षयी दैवा । तेथें करावया हेवा । संबंध कोणा असेना. ॥ ७४ ॥ दैवें भोगितां पुण्यफळातें । यत्नें अपाय चिंतिजे परातें । तरी ईश्वरत्व आपणातें । आलें ऐसें कल्पावें. ॥ ७५ ॥ मागां अपाय जे जे केले । ते अपकीर्तीचेनि फळें फळले । वांचूनि इच्छेसारिखें झालें । कोणतें कार्य सांग पां ? ॥ ७६ ॥ दैवें वांचले लाखोजोहरीं । पुण्यजयवंत स्वयंवरीं । भाग्यें द्रौपदी सुंदरी । दिव्यांगना लाधली. ॥ ७७ ॥ औषधा वोपूनि खांडववन । उपचारिला हुताशन । तेणें रहस्यें पूजे धनुष्यबाण । रथचक्रादि दीधले. ॥७८॥ मय वांचविला जळतां । तेणें सभा निर्मिली उचिता । यक्ष राक्षस सभोंवता । सेवेक झाले तदाज्ञा. ॥७९॥ भाग्यें वडिलांचा विभाग । पा-

---

१. खैराच्या निखाऱ्याची लाली. २. तोंडानें. ३. पाणी, अश्रु. ४. ओष्ठ. ५. मूळांत दुर्योधनाचें संतापप्रेरित भाषण बरेंच लांब आहे. [अ० ४७ श्लो० २१-४०.] यांत त्याच्या संतापाचेंच वर्णन आहे. ६. मोठा. ७. मातुळा (मातुला)=मामा; मातृ+डुलच्. ८. वज्रपात. ९. नाश पावेल. १०. समुद्र. ११. सुदैवानें. [अ० ४८ श्लो० १.] १२. 'भोगिती' असाही पाठ आहे. १३. 'जाणोनि' असाही पाठ आहे. १४. मत्सर. १५. लाक्षागृहांत. १६. पृष्ठ ७५ टीप ५ पहा. १७. पूजिला. १८. गांडीव. [अ० ४८ श्लो० ६.] १९. मय नांवाचा दैत्यांचा शिल्पकार. यानेंच श्रीकृष्णाच्या सांगण्यावरून पांडवांची सभा बांधली. [अ० ४८ श्लो० ८-९.] २०. त्या सभेच्या वहनासाठीं राक्षस नेमून दिले होते.

वोनि भोगिती आपुलें भाग्य। तया सभाग्या अभाग्य। कैंवी करवे सांग पां? ॥ ८० ॥ ईश्वरें केला जो हेमाद्री[1]। त्यातें करीन म्हणे दरिद्री। तैं विवेकब्राह्मणें कुबुद्धी-शूद्री। घरीं घातली जाण पां. ॥ ८१ ॥ दैवें वासुदेव[3] सखा। पांडवांलागीं जोडिला देखा। म्हणोनि काळाच्या मस्तका। पैंदांगुष्ठें[4] लोटिती. ॥ ८२ ॥ ईश्वरेच्छेनें होय सकळ। ऐसें बोलती शास्त्रकुशळ। जाणत जाणतां बुद्धि-बरळ। कासया होसी लौकिकीं? ॥ ८३ ॥ आतां स्पर्धा हेचि देखा। त्याहूनि करणी विशेष लोका। करून दावणें नरनायका!। हाचि पुरुषार्थ बोलिजे. ॥ ८४ ॥ तुजही आम्ही साह्य सकळ। प्रतापें जिंकोनि पृथ्वीतळ। राजसूय-यज्ञ विशाळ। विशेष करूनि दाखवीं. ॥ ८५ ॥ भीष्म[5] द्रोण कर्ण[6] वीर। मी आणि माझे सहोदर[7]। जिंकों पृथ्वीचे नृपवर[8]। जिवें उदार तुजलागीं.' ॥ ८६ ॥ दुर्योधन म्हणे, 'गा! सौबेळा[9]!। बुद्धिवंतांमाजी कुशळा!। वृक्ष[10] सांडोनियां फळा। दृष्टी देती जाणते. ॥ ८७ ॥ राजे जिंकोनि पृथ्वीवरी। संपदा भरली पांडवां घरीं। पांडव जिंकिल्या निर्धारीं। कार्य त्रिशुद्धी साधेल. ॥ ८८ ॥ पृथ्वी जय संपदा सकळ। न करितां राजसूयाचें[11] फळ। प्राप्त झालें असे निश्चळ। जाण मातुला निर्धारें[12]. ॥ ८९ ॥ पांडवीं आपुल्या बाहुबळें। राजे झाडिले जैसे काळे। त्यातें आतां पीडितां फळें। प्राप्त होती क्लेशाचीं. ॥ ९० ॥ ते जिंकिजेति कवणे रिती। हेचि मातें सांगें युक्ती। म्यां योजिलें असे चित्तीं। तें होय कीं न होय? ॥ ९१ ॥ अकरा अक्षौहिणी[13] सेना। साह्य करूनि भीष्म-

---

१. सुवर्णाचा पर्वत; संपत्तिमान्. २. विप्रानें शूद्रीला घरांत बाळगिली, या दृष्टांतावरून ही चाल मुक्तेश्वराच्या काळीं बरीच प्रचारांत असावी असें दिसतें. हा दृष्टांत तत्कालीन लोकव्यवहार पाहून येथें मुक्तेश्वरानें योजिला आहे. ३. वसुदेवाचा मुलगा श्रीकृष्ण. ४. पायाच्या आंगठ्यानें. ५. मूळांत भीष्माचें नांव नाहीं, पण सौमदत्ति आणि अश्वत्थामा यांचीं आहेत. ६. राधेय. (अ० ४८ श्लो० ११.) ७. भाऊ. (अ० ४८ श्लो० १२.) ८. मोठे मोठे राजे. ९. शकुनि. सुबलस्यापत्यं पुमान् सौबलः. १०. हा दृष्टांत मूळांत नाहीं. ११. पृष्ठ ५४ टीप १ पहा. १२. 'निश्चयें' असाही पाठ आहे. १३. २१८७० हत्ती, तितकेच रथ, त्याचे तिप्पट घोडे व पांचपट पायदळ इतकें सैन्य असलें म्हणजे त्याला 'अक्षौहिणी' असें म्हणतात. भारतांत दिलेलेंही प्रमाण असेंच आहे:—'अक्षौहिण्याः प्रमाणं तु खागाष्टैकद्विकैर्गजैः। रथैरेतैर्हयैस्त्रिघ्नैः पंचघ्नैश्च पदातिभिः॥'. या अकरा अक्षौहिणींचा तपशील 'उद्योगपर्वा'च्या १९ व्या अध्यायांत दिला आहे तो असा:—

| दुर्योधनपक्षीय सेना. | | | युधिष्ठिरपक्षीय सेना. | | |
|---|---|---|---|---|---|
| राजनाम. | संख्या. | श्लोक. | राजनाम. | संख्या. | श्लोक. |
| भगदत्त | १ | १५ | सात्यकि | १ | ६ |
| भूरिश्रवा | १ | १६ | धृष्टकेतु | १ | ७ |
| शल्य | १ | १६ | जयत्सेन | १ | ८ |
| कृतवर्मा | १ | १८ | पांड्य | १ | ९ |
| जयद्रथ | १ | २० | द्रुपद | १ | ११ |
| कांबोज | १ | २१ | विराट | १ | १२ |
| विंदानुविंद | १ | २५ | इतर भूप | १ | १३ |
| केकय | १ | २६ | | | |
| इतर भूप | ३ | २७ | | | |
| एकंदर | ११ अक्षौहिणी | | एकंदर | ७ अक्षौहिणी. | |

याप्रमाणें अठरा अक्षौहिणी सैन्य होतें. महाभारतांत या 'अठरा' संख्येविषयीं अनेक चमत्कार आहेत. त्यांचें टांचण कै० ज० बा० मोडक यांनीं आपल्या एका निबंधांत केलें आहे तें अवलोकनीय आहे—"येथें हा ग्रंथ व अठरा ही संख्या यांचा संबंध मोठा चमत्कारिक दिसतो. तो असा. ह्या ग्रंथांत पर्वें अठरा आहेत. यांत ज्या दोन पक्षांचें युद्ध वर्णिलें आहे त्या दोन पक्षांच्या सैन्यांची संख्या अठरा अक्षौहिणी. दोन पक्षांचें जें युद्ध झालें तें अठरा दिवस चालू होतें. ह्या ग्रंथांत भगवद्गीता म्हणून जें एक बोधपर प्रकरण आहे त्याचे अध्याय अठरा. दुर्योधन मृत झाल्यानंतर त्याचा पिता त्याचे पश्चात् अठरा वर्षेंच जगला. ह्या भारत ग्रंथाचा 'जय' असा एक पर्यायशब्द आहे त्याच्या अक्षरांवरूनही अठरा संख्याच उत्पन्न होते ती अशी:—रूपात् कटपयपूर्वा वर्णा वर्णक्रमाद् भवंत्यंकाः । ञनौ शून्ये प्रथमार्थे स्याच्छून्यं ह्रस्वतृतीयार्थे ॥ २ ॥ लघुआर्यसिद्धांत. अ० १. या आर्येंत क, ख, ग, घ, ङ, च, छ, ज, झ, ञ या अक्षरांस अनुक्रमें १, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, ० अशा संज्ञा सांगितल्या आहेत. तसेंच ट, ठ, ड, ढ, ण, त, थ, द, ध, न या अक्षरांस आणि य, र, ल, व, श, ष, स, ह, ळ, क्ष, ज्ञ या अक्षरांस ही त्यास संज्ञा सांगितल्या आहेत. आणि प, फ, ब, भ, म या पांच अक्षरांस अनुक्रमें १, २, ३, ४, ५ या संज्ञा सांगितल्या आहेत. या रीतीनें पाहिलें तर 'जय' ह्या शब्दांपैकीं 'ज' हें अक्षर ८ या संख्येचें वाचक आहे आणि 'य' हें अक्षर १ या संख्येचें वाचक आहे. संस्कृत गणितग्रंथांत 'अंकानां वामतो गतिः' या नियमाप्रमाणें अंक उजवेकडून डावेकडे मांडीत असतात. म्हणून 'जय' या शब्दांतील 'ज' या अक्षरावरून बोध होणारा जो आठांचा अंक तो लिहून त्याचे डावेकडे 'य' या अक्षरावरून समजणारा एक हा अंक लिहिला म्हणजे अठरा ही

द्रोणा । युद्ध करूनि आंगवणा । सपुत्र पांडव मारावे. ॥९२॥ सहज कार्य साधेल येथ । सहज सिद्धी मनोगत.' । शकुनी म्हणे, 'रे! व्यर्थ । मूर्खपणें जल्पसी. ॥ ९३ ॥ सुरांसहित सुरेश्वर । आणी पृथ्वीचे नृपवर । एकत्र पातल्या धनुर्धर । अर्जुन युद्धीं नातुडे. ॥ ९४ ॥ त्रैलोकींचे बळिष्ठ सृष्टी । मिळोनि पातल्या लक्ष कोटी । भीमाचिये हस्तमुष्टी । तळीं होती शतचूर्ण. ॥ ९५ ॥ पांडव आणि सहावा कृष्ण । द्रुपद आठवा धृष्टद्युम्न । एकत्र झालिया त्रिभुवन । तृणप्राय त्यां दृष्टी. ॥ ९६ ॥ यालागीं संग्रामाची मात । बोलसी तो विचार व्यर्थ । पांडव जिंकावया येथ । वर्म एकची जाण पां. ॥ ९७ ॥ न करितां युद्धाची आटाआटी । न पडतां यत्नाचे संकटीं । पांडवशिखा गवसती मुष्टीं । ऐसी कळा मी जाणें. ॥९८॥ त्रेतायुगामाजी नरेशा! । दावूनि मायामृगाचा ठसा । जानकी हरूनि अवदशा । राघवातें भोगविली. ॥ ९९ ॥ तेचि अक्ष होऊनि पुढती । हरिली नळाची संपत्ती । तेंवी कपटपाश माझे हातीं । ऋषीवरें लाधले. ॥ १०० ॥ आरंभिसी द्यूतकर्मा । तरी मी जिंकोनि देईन धर्मा । पांडवांचें ऐश्वर्य तुम्हां । साधे ऐसें करीन. ॥ १०१ ॥ आपण इच्छिला डाव पडे । आणिकां होती ते वांकुडे । ऐसे कपटपाश कुडे । द्यूतकर्मीं मी जाणें. ॥ १०२ ॥ जैसा गारुडीयाचा सर्प । गारुडी धरितां न पावे कंप । आणिकें धरितां साक्षेप । प्राणनाश रोकडा.' ॥ १०३ ॥ ऐसें अनुवादतां शकुनी । दुर्योधन माथा ठेवी चरणीं, । म्हणे, 'पांडवांचा मूर्ध्नी । पायीं रगडे तें करीं. ॥ १०४ ॥ माझी क्लेशावस्था प्रबळ । धृतराष्ट्रातें सांगें

---

संख्या उत्पन्न होते. सारांश भारत ग्रंथाचा पर्यायशब्द जो 'जय' तोही अठरा ही संख्याच दाखवितो. 'जय' हा शब्द भारतनामक इतिहासाचाच वाचक आहे हें 'नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् । देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥' या प्रत्येक पर्वाच्या आरंभीं असणाऱ्या श्लोकावरून स्पष्ट होतें. धर्मराजानें आपल्या राज्याभिषेकापासून स्वर्गारोहणापर्यंत एकंदर छत्तीस वर्षे राज्य केलें ती कालमर्यादा दाखविणारी संख्या ही अठरांच्या दुप्पट आहे. असो. याप्रमाणें हा प्रचंड महाभारत ग्रंथ व अठरा ही संख्या यांचा असा चमत्कारिक संबंध आहे."

१. बडबड करितोस. २. इंद्र. ३. हातीं न लागे. ४. अ० ४८ श्लो० १५-१७ पहा. ५. द्रुपदाचा मुलगा. द्रुपदराजाचा युद्धांत द्रोणाकडून पराजय झाल्यावर द्रोणाच्या नाशार्थ अग्नीला प्रसन्न करून अग्नीपासून प्राप्त करून घेतलेला द्रुपदराजाचा मुलगा. ६. गोष्ट. ७. येती, सांपडती. ८. कनकमृगाचा. ९. मुक्तेश्वरकृत वनपर्व–अध्याय ११-१३ पहा. १०. अ० ४८ श्लो० १९-२२ पहा. ११. मस्तक.

सकळ । खेळावया द्यूतखेळ । तोचि प्रेरील तें करीं.' ॥ १०५ ॥ आज्ञा घे-
ऊनि सौ[1]बळसुत । रायापासीं आ[2]ला त्वरित. । राजा म्हणे, 'अपूर्व मात ।
श्रुत दृष्ट मज सांगें.' ॥१०६॥ शकुनी म्हणे, 'प्रज्ञाचक्षु ! । नव्हेसी आत्मस्वार्थी
दक्षु । पुत्रामाजी वडील मुख्यु । जो कां धनी राज्याचा. ॥ १०७ ॥ जो वं-
शाचा भुवनमणी । ना[3]गायुतबळाची खाणी । बुद्धिसंपन्न परमगुणी । दु-
र्योधन प्रतापी. ॥ १०८ ॥ तो पडिलासे चिंताव्यसनीं । भोगत्यागें बैसला
निर्ध[4]नीं । हें तूं न विचारितां मनीं । स्वस्थ कैसा अससी.' ॥ १०९ ॥ ऐकोनि
घाबरला कौरवराजा । पाचारून ज्येष्ठा[5]त्मजा । आलिंगून वदनांबुजा । पा[6]-
णिस्पर्शें स्पर्शिलें. ॥ ११० ॥ म्हणे, 'प्राणाचिया प्राणा ! । ऐश्वर्य भोगीं श[7]ची-
रमणा- । समान भोगितां तुझिया मना । खेद काय सांग पां ? ॥ १११ ॥ दिव्य-
परमान्नें भोजनें । घृ[8]तपाचित पिशितो[9]दनें । दिव्यवस्त्रें दिव्याभरणें । ले[10]सी देसी
अन्यातें. ॥ ११२ ॥ [11]पद्मिनी जातीच्या तरुणांगी । नित्य नूतन पुरुषासंगीं ।
[12]सुरतानंदीं [13]अष्टभोगीं । स्वेच्छानंदें क्रीडती. ॥ ११३ ॥ सकळपृथ्वीतळींचे
राय । [14]किरीटकिरणीं उजळिती पाय । तुज ऐश्वर्या उणें काय ? । खेद कायसा
मज सांगें. ॥ ११४ ॥ [15]अश्व कुंजर सेना [16]गहन । भीष्म द्रोण तुज आधीन ।
बंधू उभे कर जोडून । वाट पाहती आज्ञेची.' ॥ ११५ ॥ दुर्योधन म्हणे, 'एक
राया ! । सर्पफणीची शीतळ छाया । तेथ मंडूकाची का[17]या । निवोनि पावे वि-

---

१. शकुनि. येथें 'सौबल' याचा 'सुबल' या अर्थीं उपयोग केला आहे. २. 'पातला' असाही पाठ आहे. ३. दहा हजार हत्ती. ४. मरणीं. ५. श्रेष्ठ पुत्रा. (दुर्योधना.) ६. हातानें. ७. इंद्रासमान. ८. तुपांत तळलेलीं. ९. मांसमय अन्नें. १०. आंगावर घालिशी. (अ० ४९ श्लो० ९.) ११. स्त्रियांच्या चार प्रकारांपैकीं एक. पद्मिनी, चित्रिणी, शंखिनी आणि हस्तिनी हे चार प्रकार. पद्मिनीचें लक्षणः—'भवति कमलनेत्रा नासिकाक्षुद्ररंध्रा अविरलकुचयुग्मा दीर्घकेशी कृशांगी । मृदुचरणसुशीला गीतनृत्यानुरक्ता सकलतनुसुवेशा पद्मिनी पद्मगन्धा ॥' (रतिरहस्य). 'प्रांतारक्तकुरंगशावनयना पूर्णेंदुतुल्यानना पीनोत्तुंगकुचा शिरीषमृदुला स्वल्पाशना दक्षिणा । फुल्लांभोजसुगंधिकामसलिला लज्जावती मानिनी श्यामा कापि सुवर्णपंकजनिभा देवादिपूजारता ॥ उन्निद्रांबुजकोशतुल्यमदनछत्रा मरालस्वना तन्वी हंसवधूगतिः सुललितं वेषं सदा बिभ्रती । मध्यं चापि वलित्रयांकितमसौ शुक्लांबराकांक्षिणी सुग्रीवा शुभनासिकेति गदिता नार्युत्तमा पद्मिनी ॥' (अनंगरंग. अ० १ श्लो० ८-९.) १२. 'सुखानंदीं' असाही पाठ आहे. १३. पृ० ९७ टीप ६ पहा. १४. मुगुटांतील रत्नांच्या प्रभेनें. १५. आजानेय अश्व. १६. दुर्भेद्य. १७. देह.

श्रांती. ॥ ११६ ॥ चरणीं काळसर्पाची [1]आढी । ग्रीवा [2]व्याघ्राचे जाभाडीं । तया शर्करामोदक तोंडीं । रुचे केंवि सांग पां? ॥ ११७ ॥ शत्रुऐश्वर्यपर्वता तळा । मस्तकीं अवमानाची शिळा । पडतां साहोनि नृपाळा! । धैर्य धरवे कवणातें? ॥ ११८ ॥ ऐश्वर्य शत्रूचें अमूप । सेवा करिती [3]सकळ भूप । उच्छिष्ट भिक्षाखंड हें स्वल्प । राज्य मातें रुचेना. ॥ ११९ ॥ मरण अथवा देशत्याग । दोंमाजी धरीन एक मार्ग । यावेगळा उपाय [4]चांग । समाधान मज नेदी. ॥ १२० ॥ निर्मूळ करीन **पां**डव वैरी । तरीच जिणें या संसारीं, । दोघां [5]पुरुषां एक नारी । ते मी पृथ्वी भोगीता. ॥ १२१ ॥ आज्ञा [6]देऊनी आपुल्या तोंडें । कौतुक पहावें होऊनि कडे । **पां**डव तृणाचेनि पाडें । मी जिंकीन जाण पां.' ॥१२२॥ **धृ**तराष्ट्र म्हणे, 'रे! ज्येष्ठकुमरा! । कासया [7]उपजविसी वैरा । आपुला विभाग भक्षूनि चतुरा! । सुखें राहें स्वस्थानीं. ॥ १२३ ॥ [8]तिहीं राहोनि आपुले स्थानीं । प्रतापें [9]आक्रमिली [10]धरणी । तुजही करितां तैसी करणी । कोण वारी सांग पां? ॥ १२४ ॥ आपणामाजी सुहृद एक । भाग्यें झाला [11]वंशतिलक । त्याचा [12]आप्तलोकीं [13]हरिख । सांग पां कां न मानावा? ॥ १२५ ॥ देखोनि **पां**डवांची [14]रहाटी । संतोष मानी सर्व सृष्टी । तूं एक विषाद मानिसी पोटीं । हा अविवेक मज वाटे. ॥१२६॥ अंगबळ सेनाबळ । द्रव्यबळ सुहृद्बळ । प्रतापें जिंकोनि पृथ्वीतळ । नांव रूप जोडीं पां. ॥१२७॥ दाटोनि बळिष्ठासीं स्पर्धा । करितां पाविजे परम आपदा । [15]संबंधेंवीण बुद्धिमंदा । वैर वायां वाढविसी. ॥ १२८ ॥ आग्रहें भिडे घालिसी मातें । तरी विचार पुसोनि **वि**दुरातें । प्रत्युत्तर देईन तूतें । पुढें वर्तें त्या ऐसें. ॥ १२९ ॥ [16]**वि**दुर बुद्धीचा सागर । त्याचा मान्य मज विचार । प्रपंचपरमार्थीं साचार । बुद्धिदाता तो मातें.' ॥ १३० ॥ ऐसें बोलतां [17]जनक श्रेष्ठ । हृदय पिटी कुमार ज्येष्ठ, । म्हणे, '[18]संतापहव्यवाट । अधिक तुवां पेटविला. ॥ १३१॥ सभा अवलोकितां नयनीं । भुवन म्हणोनी पडलों [19]जीवनीं । तेथें हांसली **या**ज्ञसेनी ।

---

१. मिठी. २. हे दृष्टांत मूळांत नाहींत. ३. 'सर्वही' असा पाठ आहे. ४. चांगला. ५. दोघे पुरुष जसे एका स्त्रीला भोगीत नाहींत तसेंच तो आणि मी मिळून पृथ्वीचें राज्य करणार नाहीं. ६. 'देणें' असाही पाठ आहे. ७. उत्पन्न करिशी. ८. त्यांनीं, पांडवांनीं. ९. जिंकिली. १०. पृथ्वी. ११. वंशाला शोभा आणणारा. १२. आप्तांनीं, नातलगांनीं. १३. हर्ष. १४. चाल, वागणूक. १५. कारणाशिवाय. १६. अध्याय ४९ श्लोक ४३-४४ पहा. १७. बाप, धृतराष्ट्र. १८. संतापरूप अग्नि. १९. उदकांत.

सहस्र स्त्रियां समवेत. ॥ १३२ ॥ मार्ग म्हणोनि चालतां पंथीं । भाळीं आदळली भिंती । **भीम** म्हणे, 'रे! मंदमती!। पुत्र होसी अंधाचा.' ॥ १३३ ॥ शब्द नव्हे हा शस्त्राघात । दुःखें होतसे प्राणांत । मी [1]मेल्यानंतरें स्वस्थ । [2]**पां**डवासीं सुख भोगीं. ॥ १३४ ॥ विष भक्षीन तात्काळीं । किंवा प्रवेश करीन समुद्रजळीं । वळंघूनि **मेरू**चिये [3]मौळीं । देह टाकीन धरणिये. ॥१३५॥ ऐश्वर्यसमुद्र हा वाढतां । उपहासें हेळणेच्या लाता । देतां ऐकतां सर्वथा । प्राण देहीं न धरवे. ॥ १३६ ॥ **विदुरा** पुसों पाहसी मंत्रें[4] । तो तंव **पां**डवांचा मित्र । त्यांतें स्तवूनि दोषपात्र । सदा करीं आमुतें. ॥ १३७ ॥ वर्ततां **विदु**राचे विचारीं । करूनि शतपुत्रांची बोहरी[5] । तुज लावील **पां**डवद्वारीं । रंकभणगासारिखें. ॥ १३८ ॥ जैसें [6]दुकाळलें पामर । ग्रासभक्षासी वोढवी कर । कीं दग्धवनामाजी वानर । क्षुधानळें तळमळी. ॥ १३९ ॥ तेंवी आम्ही नि[7]मालियापाठीं । विधीनें लिहिलेंसे लल्लाटीं । **पां**डवभिक्षा भक्षूनि पोटीं । सुख मानी जिणियाचें. ॥ १४० ॥ बैसें **पां**डवांचिये छाये । मातें घेऊनि करिसी काय । माझेनि मरणें सुखी होय । जीर्णसर्पासारिखा ॥ १४१ ॥ ब्रह्मसृष्टींत मागें पुढें । ऐश्वर्य धर्माचेनि पाडें । नाहीं नाहीं हें निवाडें । प्रज्ञाचक्षु! जाण पां. ॥ १४२ ॥ भाग्यप्रतापाची सृष्टी । माझेनि न देखवे दृष्टीं । **कुबेरइंद्रा**ची राहटी । [8]रंकप्राय त्यां पुढें. ॥ १४३ ॥ अमर्यादा करूनि **कृष्णें** । सभे **शिशुपाळ** घेतला प्राणें । परी त्यास वारावया वचनें । शक्ती कोणा नव्हेची. ॥ १४४ ॥ संग्राम न करितांचि जाण । **पां**डवकार्य साधी **कृष्ण** । **कृष्ण** तो **पां**डवांचा प्राण । **पां**डव प्राण **कृष्णा**चे. ॥ १४५ ॥ वैश्य अथवा नीच भृत्य । तैसे राजे सभेसी असंख्यात । द्वारदेशीं [9]बद्धहस्त । परी त्यां भेटी असेना. ॥ १४६ ॥ उत्कर्ष देखोनि विशेष । चित्त होतसे कासाविस । हें राज्य घ्यावया प्रयास । स्वल्पहि तया असेना. ॥१४७॥ मधूवरूनि [10]मधुमक्षिका । उडवितां नाहीं जेंवी शंका । तेंवी आमुचा समुदाय देखा । तृणप्राय त्यां दृष्टी. ॥१४८॥ सुवर्णभार रत्नभार । माथां वाहोनि

---

१. अ० ४९ श्लो० ४५-४६ पहा. २. पांडवांसह. ३. शिखरावरून. ४. मसलत, विचार. ५. भस्म. ६. दुष्काळानें पीडिलेलें. ७. मेल्यानंतर. ८. दरिद्र्यासारखी. ९. बद्ध आहेत हस्त (हात) ज्यांचे असे. सार्वभौम राजाच्या भेटीला मांडलिक राजांनीं हात बांधून जावें अशी चाल आहे. त्या चालीला अनुलक्षून ही कव्युक्ति आहे. १०. मध खाणाऱ्या माशा, मधमाशा.

अपार । राजे आणि राजकिंकर । द्वारीं उभे तिष्ठती. ॥ १४९ ॥ नानादेशींच्या मनुजाकृती[1] । भेटी पातले सहसंपत्ती । अमूल्य रत्नाचिया जाती । नक्षत्रराशी तैसिया. ॥ १५० ॥ ऐकाक्ष[2] भाळाक्ष त्रिनयन । द्विपाद त्रिपाद एकचरण । कर्णकेशरोम वसन । पादहीन अपायु. ॥ १५१ ॥ ताम्रमुख श्याममुख । शूकरमुख वानरमुख । रौक्षसमुख[3] अनेक । भृत्यप्राय[4] असती. ॥ १५२ ॥ आले उपायनें[5] द्यावया । देऊनि प्रत्युत्तर घ्यावया । वर्षपर्यंत महाराया । अवकाश नाहीं देखिला ॥ १५३ ॥ आलीं उपायनें घेइजे । घेऊनि भांडारीं[6] ठेविजे । हा नियोगें[7] **धर्म**राजें । मज नेमिला निजाज्ञा. ॥ १५४ ॥ तें वर्ष एक घेतां धन । गणना करूं न शके मन । जैसें समुद्रींचें जीवन । कीं रजःकण पृथ्वीचे. ॥ १५५ ॥ कीं मोजूं येतील मेघधारा । कीं गणूं येतील गगनतारा । परी **धर्मा**च्या रत्नभारा । सुवर्णनिष्क[8] न गणवे. ॥ १५६ ॥ राजसूययज्ञश्रीची थोरी[9] । नांवेक[10] नरनाथा ! अवधारीं । वार्जिलें तरी हे वैखरी[11] । संतापली अनुवादे. ॥ १५७ ॥ कर्दळीगर्भाहूनि कोमळ । नवनीताहूनि मृदु मवाळ । श्वेतरक्तकृष्णकंबळ[12] । पर्वतप्राय गजवोझीं. ॥ १५८ ॥ जांबूनदाचीं ओतींव निखिलें । कीं कनकवल्लीचीं वर्तुळ फलें । लक्ष कुंडलें सोज्वळें । सरळनाळें हिरियांचीं. ॥ १५९ ॥ लक्ष हस्तिणी कृष्ण श्वेत । उष्ट्रें[13] वाजी एक अयुत । घेऊनि पातला **कां**बोज तेथ । प्रवेश द्वारीं असेना. ॥ १६० ॥ ब्राह्मणा वांटावया धनगोमंत[14] । **स**त्यसंधादी राजे समस्त । तीन खर्वें द्रव्य गणीत । अयुतगजीं पाठविलें. ॥ १६१ ॥ स्वर्गीं दुर्लभ देवेंद्रासी । तें मधु[15] सहस्रकळसीं । **व**रुणें धाडिलें संतोषीं । सिंधुमथनीं[16] निपजलें जें. ॥ १६२ ॥ जें अंळुमाळ[17] घालितां वदनीं । पुरुष अथवा कामिनी । जीर्णकाया[18] होत तरुणी । हें आश्चर्य तयाचें. ॥ १६३ ॥ दिव्य शंख दक्षिणावर्त । प्रसवे इच्छिला पदार्थ । समुद्रें दीधला तो मुहूर्त । महानिधी लाधला. ॥ १६४ ॥ अश्व तीर्थकल्माषक । शुकनासिकरंगी एक । दहा सहस्र अमोलिक । हेमाभरणें भूषविलें. ॥ १६५ ॥ उष्ट्र वांमी[19] तीनशतें[20] । रत्नभार भरूनि वरुतें । **ऐ**लादि राजे

---

१. मनुष्यें, लोक. २. नामविशेष. ३. 'घोडमुख, श्वानमुख' असाही पाठ आहे. ४. 'ऋक्षमुख मानव' असा पाठभेद आहे. ५. नजराणे. ६. कोठींत. ७. आज्ञा. ८. सोन्याचीं 'निष्क' नांवाचीं नाणीं. ९. थोरवी, मोठेपणा. १०. क्षणभर. ११. वाणी. १२. अ० ४९ श्लो० १९ पहा. १३. उंट. १४. धनाचा पर्वत. १५. अमृत. १६. समुद्रमंथनांत. १७. किंचित्. १८. वृद्ध. १९. खेंचरें. २०. अध्याय ५१ श्लो० ४ पहा.

धाडिले त्यांतें । राजदर्शन असेना. ॥ १६६ ॥ तरुणजातीच्या पद्मिणी[1] । नवयौवना कंदर्पखाणी । लक्ष दासी कुंजरयानीं । वस्त्राभरणीं मंडित. ॥ १६७ ॥ चतुःषष्टीकळानिपुणा[2] । गीतसंगीतकळाप्रवीणा[3] । ज्यांतें देखोनि देवांगना । नेत्रपातीं[4] न लाविती. ॥ १६८ ॥ कार्पासिकदेशींच्या[5] नृपनाथें । उचितें पाठविलीं धर्मातें । श्वेतहस्ती एकनियुतें । रत्नभारें पदाती[6]. ॥ १६९ ॥ प्राग्ज्योतिषनरेश्वरें[7] । पाषाणपात्रें विचित्राकारें[8] । लक्षहस्तींवरी आदरें । धर्मराजा धाडिलीं. ॥ १७० ॥ प्रयुत[9] रांकाइंदुसोज्वळ[10] । मनोजवी[11] वारु चपळ । द्वारीं प्रवेशावया वेळ । मास एक नलभेची. ॥ १७१ ॥ समुद्रवासीय[12] नाना यवनीं । रत्नें वसनें अनेकवर्णी । विशाळ कांचेच्या रांझणीं । सुविचित्र फळांतें. ॥ १७२ ॥ अजा[13] अवीका[14] गोखरें[15] । उष्ट्र हिरण्यरजतकंबळभार । सिंधुद्वीपींचा मधुर । मधु अपार बहुकलशीं. ॥ १७३ ॥ द्वीपांतरींचे बहुत पक्षी । विचित्ररंगी कोटि लक्षी । उपायनें आलीं तयाचा लक्षी । लक्षिता तेथें असेना. ॥ १७४ ॥ वंक्षुतीरनिवासी । राजे त्रिपद मानव देशीं । शत योजनें एक दिवशीं । चालती जैसे रासभ. ॥ १७५ ॥ कृष्णग्रीव महाकाया । दशसहस्रसंख्या राया! । रत्नभारीं धाडिलें तयां । प्रवेश द्वारीं असेना. ॥ १७६ ॥ एकपाददेशींच्या राजीं । इंद्रगोपवर्णाचे[16] वाजी[17] । शुकाऐसे सुनीळ सहजीं । रत्नाभरणीं मंडित. ॥ १७७ ॥ एक इंद्रधनुष्यऐसे अंगीं । एक वरले संध्यारागीं । नानावर्ण वातवेगीं । असंख्यात पाठविले. ॥ १७८ ॥ सोनें रुपें शस्त्रें वस्त्रें । त्यांची संख्या न वदवे वक्त्रें[18] । अवलोकितां माझिये नेत्रें । भ्रम पाविजे अंधत्वें. ॥ १७९ ॥ [19]शंक तुषार कंक रोमश । शृंगी नादी नृप कर्कश । तिहीं होऊनियां दास । करभार अपार ठेविलें[20]. ॥ १८० ॥ दुर्गमी पर्वताकार । अर्बुदसंख्या मत्तकुंजर[21] । कितीक अश्वजाती सुंदर । सुवर्णपद्मासारिखे. ॥ १८१ ॥ गजदंताचे रथ सुवर्णरथ । कनक

---

१. पद्मिणी जातीच्या. २. चौसष्ट. (पृ० ४७ टी० १६ पहा.) ३. 'विद्याप्रवीणा' असाही पाठ आहे. ४. पापण्या. टक लावून पहातात–असा अर्थ. ५. अ० ५१ श्लो० ८ पहा. ६. पायदळ शिपाई. ७. भगदत्त नामक राजानें. (श्लो० १६.) ८. चमत्कारिक आकाराचीं. ९. दहालक्ष. १०. पूर्णिमेच्या चंद्रासारखे स्वच्छ. (शुभ्र.) ११. अतिवेगवान्. १२. समुद्राचे जवळ राहणारे. १३. शेळ्या. १४. मेंढ्या. १५. अ० ५१ श्लो० १३ पहा. १६. इंद्रगोप नांवाच्या प्राण्याच्या रंगाचे. १७. घोडे. (अ० ५१ श्लो० २१.) १८. तोंडानें. १९. अ० ५१ श्लो० ३० पहा. २०. 'पाठविला' असाही पाठ आहे. २१. हत्ती.

रत्नें प्रवाळ रजत । कीटजें पटजें असंख्यात । आसनें शयनें विचित्रें. ॥१८२॥ रस गंध धूप अपार कळसीं । तीक्ष्णउष्णद्रव्याच्या राशी । लवंगा जाती कंकोळ ऐसीं । पर्वतप्राय पाठविले. ॥ १८३ ॥ द्वारीं वारितां दंडधारीं, । 'घ्या घ्या' म्हणती दीर्घस्वरीं । एक अयन लोटल्यावरी । अवकाश झाला द्यावया. ॥ १८४ ॥ मेरुमंदरमध्यभूमिके । शैलोदानदीप्रवाहोदकें । कीचकवेणुच्छायें लोकें । सुखें सुरवाडे बैसिजेती. ॥१८५॥ खश एकासन प्रदर आर्द । दीर्घवेणव पारद कुलिंद । तंगण परतंगण हे विविध । देश अनेक वसताती. ॥ १८६ ॥ तेथें पिपीलिका काढिती सोनें । जें जांबूनदातें म्हणतें उणें । रत्नें निपजती कृष्णवर्णें । जीं अमूल्य भूतळीं. ॥ १८७ ॥ वेणुवनापासूनि तेथें । मुक्ताफळें पिकती बहुतें । धान्यराशीतुल्य गणितें । कुडवमापीं करिती. ॥ १८८ ॥ तीं बदरीफळप्रमाण तेथें । दहासहस्र उष्ट्रीं ओझें । धर्मा पाठवितां माझें । हृदय झालें दुखंड. ॥ १८९ ॥ तैं कैरातिकानाम सुदेशीं । पर्वतमाथां सुवर्णराशी । पक्षी सांडिती तें दासीं । राजयाचिया आणिजे. ॥ १९० ॥ तें अग्निवर्णासारिखें कनक । सहस्र खंडिकां प्रमाण जोख । घेऊनि आले ते सेवक । द्वारदेशीं तिष्ठती. ॥ १९१ ॥ काचव्यादी काश्मीरभूप । कर्ण प्रावर्णादी नृप । चाळीस राजे तीहीं अमूप । पादपूजा पाठविली. ॥ १९२ ॥ पद्मवर्णीं शैलोपमा । उदयदंतीं जोडिलें हेमा । नित्य मद उत्तमोत्तमा । दानोदकें झिरपती. ॥ १९३ ॥ ते ऐरावतातुल्य करटी । पांचसहस्र पांचां भेटी । कंबळें रत्नें वस्त्रें पाठी । भार अपार चामराचे. ॥ १९४ ॥ चौताळती गगनपंथें । ऐसे वारू चारशतें । गंधर्वराजें चित्ररथें । धर्मराजा धाडिलें. ॥ १९५ ॥ तुंबरेंही एकशत गुणी । सुनीळ आम्रपत्रवर्णीं । हेममाळा रत्नाभरणी । अश्वरत्नें धाडिलीं. ॥ १९६ ॥ कृती राजा शूकरनाथ । रत्नभारी कुंजरशत, । दोन सहस्र मदोन्मत्त । विराटराजें धाडिले. ॥ १९७ ॥ पांसुराष्ट्राहूनी वसुदानें । षट्त्रिंशत गजललामें । दोन सहस्र अश्व हेमें । आच्छादूनि धाडिले. ॥ १९८ ॥ द्रुपदें चौदासहस्र दासी । अयुतदा-

१. रेशमी. २. सहा महिने. ३. अ० ५२ श्लो० २ पहा. ४. हें देशाचें नांव. (अ० ५२ श्लो० ३.) ५. मुंग्या. यांनीं काढलेल्या सोन्याला 'पिपीलक' असें नांव आहे. [अ० ५२ श्लो० ४.] ६. बोराएवढीं. ७. दोन भाग झाले. ८. हत्तीचा मद. ९. हत्ती. १०. चवऱ्यांचे. ११. अ० ५२ श्लो० २३ पहा. १२. तुंबरु हें गंधर्वाचें नांव. १३. शूकर हें देशाचें नांव. (श्लो० २५.) १४. छत्तीस.

सांसह स्त्रियांसीं । हत्ती जुंपिले रथांसी । शतसहस्र पाठविले.॥ १९९ ॥ आज्ञा वंदूनि यादवेश्वर[1] । चौदासहस्र मत्त कुंजर[2] । रत्नधनाचे डोंगर । देता झाला आवडी. ॥२००॥ पांच पांडव पंच प्राण । ऐसा स्नेहें चालवी कृष्ण । नीचसेवकासमान । यज्ञीं उच्छिष्टें काढिलीं. ॥ २०१ ॥ हेमकुंभीं चंदनरस । शस्त्रें सुवर्ण सूक्ष्म वास[4] । मलयकृष्णागर सुवास । लक्ष सुरभी[5] सुदोहा[6]. ॥ २०२ ॥ चोळ पांड्य मल्याळ राजे । घेऊनि करभाराचे पुंजे । द्वारीं दर्शनाचेनि काजें । दीनप्राय तिष्ठती. ॥ २०३ ॥ समुद्रसार[7] वैडूर्यमणी । मुक्ताफळें चंद्रवर्णी[8] । श्याम ताम्र नानावर्णी । ऊर्णाचैलें[9] अमूल्यें. ॥ २०४ ॥ श्वेतहस्ती चतुर्दंत । दहासहस्र सुवासभरित । पद्मिनी नारी एक नियुत । सिंहलराजें धाडिल्या. ॥ २०५ ॥ हिमवंतीचें पुष्पमधु । लोपवी सोमांचा[10] सुस्वाद । पर्वतपाळीं आप्त वाद । धरूनि धर्मा पाठविलें. ॥२०६॥ कच्छदेशींचे म्लेंछ सकळ । भूमंडळीं सर्व भूपाळ । सेवा करिती सर्वकाळ । धर्मद्वारीं देखिले. ॥२०७॥ आल्या रत्नांचीं अभिधानें[11] । आल्या द्रव्याचें गणनें । मी तंव नेणें ऐसें नयनें । ऐश्वर्य नाहीं देखिलें. ॥ २०८ ॥ अन्नें पक्वान्नें तेथ । सेवक भक्षिती त्रिवार नित्य । राया! एकल्याचें गणित । अळुमाळ कांहीं धरिलें तें. ॥ २०९ ॥ अयुत तीन पद्मगणित । अश्वसादी[12] महावंत[13] । अर्बुद एक वहाती रथ । जे सारथी बोलिजे. ॥ २१० ॥ पदातींस नाहीं लेखा[14] । दासी दास गृहसेवका । भणंगा दीना एक रंका । संख्या असंख्य शंखांची. ॥ २११ ॥ अठ्याऐशीं सहस्र ऋषी पवित्रीं । स्नातक[15] सामुग्रीसह कलत्रीं[16] । भोजनें कीजेती सुवर्णपात्रीं । शुभ कल्याण इच्छिजे.॥२१२॥ या वेगळें दहा सहस्र । ऊर्ध्वरेतें[17] योगीश्वर । तृप्त होउनी निरंतर । शुभ कल्याण इच्छिती. ॥ २१३ ॥ सरल्या सकळांचीं भोजनें । विचारूनियां हीनें[18] दीनें । देवद्विजांचे शेषान्नें । तृप्त करी द्रौपदी. ॥२१४॥ तिचे गुणाचें स्तुतिस्तोत्र । उमेरमेतुल्य पवित्र । लोकीं पडतां कर्णपात्र । ओढविती सुरप्रिया. ॥ २१५ ॥ लक्षब्राह्मणांचें गणित । होतां शंखगर्जना होत । ऐसा संवत्सरपर्यंत । नाद

१. भगवान् श्रीकृष्ण. २. गज. ३. उष्ट्रीं. (पृ० १०६ टीप ५ पहा.) ४. वस्त्र. ५. गाई. ६. दुभत्या. ७. मुक्ताफलादि. (श्लो० ३५ टीका.) ८. 'चंद्रकीर्णी' असा पाठ आहे. ९. लोंकरीचीं वस्त्रें. १०. सोमरसाचा. ११. नांवें. १२. घोडेस्वार. १३. तेजस्वी. १४. गणना. १५. सोडमुंज झालेला. (ब्रह्मचारी.)·१६. स्त्रिया. १७. अ० ५२ श्लो० ४७ पहा. १८. आंधळे पांगळे वगैरेंना.

नाहीं खंडला. ॥ २१६ ॥ रायें नेमिल्या निजसेवेतें । तीस दासी एकएकातें। जो जो पदार्थ मागती त्यांतें । तात्काळ आणुनी अर्पिती. ॥ २१७ ॥ हे संपदा युगायुगीं । कोणाही नव्हे त्रिजगीं । पुढें म्हणतां होईल उगी । वाग्देवता होतसे. ॥ २१८ ॥ '[1]चक्रवर्ती' सार्वभौम । ऐसें ठेवूनियां नाम । अभिषेकिला राजा **धर्म** । तें मज भाग्य वदवेना. ॥ २१९ ॥ तया यज्ञाचा सोहळा । कीं [2]अवभृथस्नानकाळींची कळा । **शेष शक्रा**चिया डोळां । भाग्यसंपदा न संठे. ॥ २२० ॥ सुरभी सुदोहा शुभ्रांगी । असंख्य धेनू दक्षिणेलागीं। राजीं आणिल्या हेमशृंगी । रौप्यखुरी सवत्सा. ॥ २२१ ॥ **बा**ल्हीकें आणिला दिव्य रथ । [3]**कां**बोजज हय असंख्यात । **सु**दक्षिण राजें मणिमंडित । माळा कंठीं [4]सूदली. ॥ २२२ ॥ विजयी ध्वज आणिला [5]**चै**द्यें । [6]उष्णीषें समर्पिलीं **माग**धें । रत्नमेखळा स्नेहवादें । [7]**म**त्स्यरायें सूदली. ॥ २२३ ॥ [8]शाठ्यायन भद्रजाती । पट्टासनें दिव्य हस्ती । **व**सुदानें ओपिले हातीं । **ऐ**रावतासारिखे. ॥ २२४ ॥ जडित [9]उपानह जोडा । **ए**कलव्यें [10]टांकिला पुढां । **चे**कितानें ठेविला चापमेंढा । अक्षय [11]भांते दीधले. ॥ २२५ ॥ असी खड्गजडित मुष्टी । रत्नकोश झळके पृष्टीं । आवडी **धर्मा**च्या कटितटीं । **श**ल्यराजें बांधिले. ॥ २२६ ॥ **अ**वंतीच्या [12]नरनायकें । सकळ तीर्थांचीं तीर्थोदकें । रत्नकलशीं भिन्न प्रत्येकें । अभिषेकार्थ आणिलीं. ॥ २२७ ॥ श्वेतच्छत्र महा सुमनहार । **सा**त्यकी भोंवडी चक्राकार । **अर्जु**न आणी [13]**वृ**कोदर । [14]व्यंजनहस्तें शोभले. ॥ २२८ ॥ श्वेतचामरें कनकदंडें । **न**कुळ **स**हदेव दोहींकडे । उभे देखूनि द्विधा खंडे । शोभा चंद्र सूर्याची. ॥ २२९ ॥ **धौम्य नारद व्यास भ**गवान । **अ**सित **दे**वल **जा**मदग्न्य । हे मुख्य करूनि [15]तपोधन । वेदमंत्रें गर्जती. ॥ २३० ॥ **इं**द्रासीं **इं**द्रपदीं मानें । [16]जेणें अभिषेकिलें [17]**च**तुराननें । शंख धाडिला तो **व**रुणें । **धर्मा**लागीं दीधला.

---

१. पृष्ठ ८ टीप २ पहा. २. यज्ञ संपल्यानंतरचें इष्टिपूर्वक स्नान. ३. अ० ५३ श्लो० ५ पहा. ४. घातली. ५. चेदिपतीनें. (अ० ५३ श्लो० ६.) ६. पागोटीं. ७. विराटराजानें. ८. 'शाठ्यायन' हा 'षष्ठिहायन' याचा अपभ्रंश होय. 'षष्ठिहायन' म्हणजे साठ वर्षांचा. (श्लो० ७.) ९. पादुका. १०. 'ठेविला' असाही पाठ आहे. ११. अ० ५३ श्लो० ९ पहा. १२. आवंत्यराजानें. १३. भीम. (श्लो० १३.) १४. पंखा. १५. तपच आहे धन ज्यांचें असे, तपस्वी (ऋषि.) १६. ज्या शंखानें. १७. ब्रह्मदेवानें. यास चार मुखें होती; त्यांचीं नांवें:– दर्दुरमुख–यानें ऋग्वेद जपे. अश्वमुख–यानें यजुर्वेद जपे. जंबुकमुख–यानें अथर्ववेद जपे. श्वानमुख–यानें सामवेद जपे. खरमुख पांचवें तें छेदन केलें.

॥ २३१ ॥ तोचि शंख स्वहस्तकीं । कृष्णें भरूनि अमृतोदकीं । सिंचितां धर्माचे मस्तकीं । [1]उभय लोकीं जयशब्द. ॥ २३२ ॥ विश्वकर्मा येऊनि निकटीं । सहस्र निष्क ओपिले मुगुटीं । जैसें शक्रासी शक्रपाटीं । अभिषेकितां कुबेरें. ॥ २३३ ॥ उत्साहवीरश्रियेच्या रंगीं । शंख स्फुरिला वाद्यांगीं । तें परिसोनि माझे अंगीं । [2]सकंप रोमें [3]उदेले. ॥ २३४ ॥ पांडव आणी धृष्टद्युम्न । सात्यकी आणी आठवा कृष्ण । यांचे शंखाचें गर्जन । होतां ब्रह्मांड [5]कोंदलें. ॥ २३५ ॥ तयां शंखांचिया ध्वनीं । मूर्छित राजयांच्या [6]श्रेणी । भ्रम दाटूनियां माझे नयनीं । प्रेतप्राय मी झालों. ॥ २३६ ॥ पांडव पिटोनियां टाळी । हास्य करिती गदारोळी । म्हणती, 'पामर गोंवळीं । अद्भुत नाहीं देखिलें.' ॥ २३७ ॥ मूर्छा दाटली राजयातें । त्याचे शांतीलागीं तेथें । [7]धवल वृषभांचीं [8]शतें । सुवर्णशृंगीं साजिरीं. ॥ २३८ ॥ अर्जुनें [9]ओपिलीं ब्राह्मणा । रत्नांजुळी बहु दक्षिणा । तें आश्चर्य कुरुभूषणा ! । एकीं वाचें न वदवे.॥२३९॥ रंतिदेव यौवनाश्व मनुभूपती । भगीरथ वैन्य पृथु ययाती । नहुषराजा चक्रवर्ती । धर्मापुढें [10]तृणतुल्य. ॥ २४० ॥ इंद्र वरुण यम कुबेर । भासती धर्माचे किंकर । जेथें अंगें [11]लक्ष्मीवर । दास होऊनि धांवतसे. ॥ २४१ ॥ हरिश्चंद्राहूनि [12]आगळी । संपदा धर्माची भूतळीं । देखोनि संपदा प्रळयानळीं । देह माझा धडकत. ॥ २४२ ॥ आमुचा क्षय त्यांची वृद्धी । [13]कनिष्ठ वाढले ऐश्वर्यमदीं । ज्येष्ठ संपत्ती पडली सांदीं । याहून अनिष्ट कोणतें? ॥ २४३ ॥ हें ऐश्वर्य देखोनि राया ! । दुःखें व्यापिली माझी काया । पांडवसंपत्ती पावेल क्षया । तें मी करीन प्रयत्नें. ॥ २४४ ॥ लौकिकीं न येतां अपकीर्ती । संग्राम न करितां स्वहस्तीं । सुगमोपाय न्यायनीतीं । पांडवसंपत्ती साधतसें. ॥ २४५ ॥ आतां शकुनीचिया संवादीं । म्यां योजिली असे बुद्धी । त्वां आज्ञा न देतां आधीं । प्राण त्यागीन सर्वथा.' ॥ २४६ ॥ ऐसा दुर्योधनाचा क्षोभ । पुढां कपटद्यूताचा आरंभ । ते कथेचा समारंभ । श्रवणदृष्टीं विलोका. ॥ २४७ ॥ प्रार्थनेची परडी भरी । आनंदाचा उदो करी । अवदानाचा मी भिकारी । जोगवा मागें संतातें. ॥ २४८ ॥ मूळपीठ तें तुमचे पाय । आदिस्थान तुमचें हृदय ।

---

१. स्वर्गीं आणि पाताळीं. २. कंपासह. ३. रोमांच. (श्लो० १८.) ४. उठले. ५. भरून गेलें, दुमदुमलें. ६. पंक्ति. ७. शुभ्र. ८. अर्जुनानें संतुष्ट होऊन पांचशें बैल श्रेष्ठ ब्राह्मणांस दिले. (श्लो० २०-२१.) ९. दिलीं. १०. अ० ५३ श्लो० २२ पहा. ११. श्रीकृष्ण. १२. अधिक. १३. लहान. धृतराष्ट्राच्या धाकट्या भावाचे पुत्र असल्यामुळें पांडवांना 'कनिष्ठ' असें म्हटलें आहे.

तुमची कृपा रेणुकामाय । प्रसन्न हो कां आमुतें. ॥ २४९ ॥ निर्मळ मायेचा गवाळा । दावा दीवियाचा [1]उजाळा । नाचती भक्तीचा जिव्हाळा । ऐसें करूं भूतांतें. ॥ २५० ॥ सकळ कवींचा शिरोमणी । विश्वंभर मोक्षजयपाणी । मुक्तेश्वर तयाचे चरणीं । उल्हासत निजमनें. ॥ २५१ ॥ सांडूनि व्यासाची संगती । चालों नये आणिके पंथीं । ऐसें जाणोनियां श्रोतीं । व्यर्थ विस्तार न मानावा. ॥ २५२ ॥ इति श्रीभारते सभापर्वणि । पुढां परिसिजे सुजाणीं । जें वर्तलें वस्त्राहरणीं । कौतुक श्रीकृष्णरायाचें. ॥ २५३ ॥

---

## अध्याय तेरावा.

पुत्रलोभाची [3]सांकडी । भंगूं न शके ममता बेडी । बुद्धि युक्ती झाली [4]कुंडी । धृतराष्ट्राची येकाळीं. ॥ १ ॥ पुत्राचा आग्रह अत्यंतिक । दुजा पांडवबळाचा धाक । लोकापवादाचा कलंक । लागेल म्हणोनि शंकतु. ॥ २ ॥ शकुनीस [5]म्हणे, 'कवणे युक्ती । हरिसी धर्माची संपत्ती?' । तो म्हणे, 'कपटद्युतीं । हारी आणीन निर्धारें. ॥ ३ ॥ द्यूतप्रिय धर्मरावो । पैज घालोनि खेळिजे डावो, । त्याचेनि वचनें त्यासी [6]अपावो । घडे ऐसें करीन. ॥ ४ ॥ लौकिकीं न अपकीर्ती । न पडतां संग्रामाचे [7]गुंतीं । पांच पांडवांसहित संपत्ती । हातातळीं आणीन. ॥ ५ ॥ आतां तुम्हीं एक करावें । शीघ्र विदुरातें [8]प्रेरावें । पांडवां [9]पाचारूं धाडावें । स्नेहभावें भेटीसी. ॥ ६ ॥ आलिया सहज मांडूं खेळ । खेळतां जिंकीन न लागतां वेळ । परी ये विचारीं भाव [10]अंचळ । तुझा असला पाहिजे. ॥ ७ ॥ द्यूतप्रिय [11]पांडवपाळ । बोलतां अंगीकारील [12]खेळ । राज्य [13]सभा ऐश्वर्य सकळ । तुज लाधेल निर्धारें. ॥ ८ ॥ फांसा पाडोनि पांडवांतें । सकळ पृथ्वी [14]सांधीन तूतें । जरी बोलले बुद्धीतें । निश्चयें टळों न देसी.' ॥ ९ ॥ सांगूनि शकुनी गेलियावरी, । [15]रावें विदुरातें पाचारी, । म्हणे, 'पांडव पडले दुरी । क्षणक्षणा आठवती. ॥ १० ॥ चित्त माझें अतिस्नेहाळ । पाहों इच्छी पांचही बाळ, । तुवां जाऊनि उतावेळ । पाचारून आणावे. ॥ ११ ॥ सवें द्रौपदी आणि कुंती । पाचारावी परम-

---

१. उजेड. २. 'वर्तन' असाही पाठ आहे. ३. संकट. ४. वांकडी, खोटी. ५. धृतराष्ट्र म्हणे. ६. अपाय. ७. खटपटींत. ८. पाठवावें. ९. बोलावण्यास. १०. पक्का न ढळणारा. ११. धर्मराज. १२. द्यूत. १३. मयासुरनिर्मित सभा. १४. जिंकून देईन. १५. धृतराष्ट्र राजा.

प्रीती । [१]पंचरात्री क्रमोनि जाती । इंद्रप्रस्था मागुते. ॥ १२ ॥ ऐकोनि धृतराष्ट्राची वाणी । विदुरा [२]धाक रिघाला मनीं, । 'कुळक्षयालागीं दावाग्नी । येथें कोणें पेटविला ?' ॥ १३ ॥ हृदयीं विचारूनि सूचनें । म्हणे, 'बुद्धी दीधली कवणें ? । कोणतें काज भेटवणें । उचंबळलें एकाकीं ? ॥ १४ ॥ नव्हे स्नेहवादाची भेटी । [३]सौबळें कांहीं रचिलें पोटीं । [४]पुत्रशोकाचे हव्यवाटीं । तुज पाडील निर्धारें. ॥ १५ ॥ तूं शकुनीचिये बुद्धी । वर्तों नको विचारनिधी ! । अनर्थीं पडसी दुःखवादीं । प्राणांतींही न खंडे. ॥ १६ ॥ स्वपुत्राचे गुणागुण । जाणोन कासया होसी नेणे । ज्येष्ठपुत्रें न्यून पूर्ण । कथिलें ऐसें मी जाणें. ॥ १७ ॥ अधमव्यापारियाची पदवी । जेंवी त्याची संपदा मोजावी, । मग प्रयत्नीं अपायीं गोंवी । नाश करी सर्वस्वें ॥ १८ ॥ तेंवी जाऊनि त्याचिया [५]मखा । केला संपत्तीचा लेखा । तेंचि असाध्य मानूनि देखा । प्राणनाशा ऊठिला. ॥ १९ ॥ [८]सुहृदभावें पाचारिला । श्रेष्ठासनीं सन्मानिला । तो यापरी उत्तीर्ण झाला । [९]उत्तम पुरुष निर्धारें. ॥ २० ॥ भुजंगा [१०]पांयस पाजिला । व्याघ्र [११]गोठणीं प्रतिपाळिला । तेंवी दुर्योधनाचा [१२]फळला । आप्तभाव पांडवां. ॥ २१ ॥ आतां कोटी नमस्कार । करूनि प्रार्थितों वारंवार । सर्वथा शकुनीचा विचार । कानीं मनीं नातळें. ॥ २२ ॥ चरणीं ठेवूनियां माथा । प्रार्थीतसें तुझिया हिता । बुद्धी पुत्राची सर्वथा । [१३]स्वल्प कानीं नायकें. ॥ २३ ॥ वृद्धपणीं तुझें कष्ट । पाहों न शकें मी अचाट । यालागीं [१४]कळवळी कनिष्ठ । वृद्ध म्हणोनि स्वामिया ! ॥ २४ ॥ कृपा संजया भीष्मद्रोणा । पुसोनि मातें देईं आज्ञा । सुखें नांदतिया विघ्ना । कां चडफड करितोसी ?' ॥ २५ ॥ धृतराष्ट्र म्हणे, 'चतुर राया ! । नसती कल्पना करिसी वांया । सुहृदांमाजी कपट माया । कवण करी कवणातें ? ॥ २६ ॥ राया धर्माचिये खेळीं । मृगया द्यूत चेंडूफळी । आप्त आप्तांचिये मेळीं । [१५]गेंदारोळीं खेळिजे. ॥ २७ ॥ आम्हां तुम्हा भीष्मद्रोणा । असतां अपाय लागे कोणा ? । देहें

---

१. पांच रात्री. २. भय. ३. शकुनीनें. ४. पुत्रशोकरूप अग्नींत. ५. अन्न. ६. यज्ञाला. ७. गणना. ८. स्नेहभावानें, मित्रत्वानें. ९. हें भाषण व्याजस्तुतिरूप आहे. १०. 'पयरस' असाही पाठ आहे. पय=दूध. ११. गोठ्यांत. (गोठण=गोस्थान=जेथें गाई बैल जमा होतात तें स्थान.) १२. अनुभवास आला, दुःखप्रद परिणाम झाला. १३. यत्किंचित् देखील. १४. कळवळतो, दुःख पावतो. १५. मोठ्यानें ओरडून.

अवयवी प्राणें प्राणा । घात कीजे सांग पां[1]? ॥ २८ ॥ वेळ करमावया क्षण । द्यूत खेळती बंधूजन । आम्ही तुम्ही अवघेजण । कौतुक[2] दृष्टीं विलोकूं ॥ २९ ॥ उभयतां माझेच कुमर । येथें कायसें दुश्चित[3] थोर । तुवां नेदितां प्रत्युत्तर[4] । पांडव वेगीं आणावे. ॥ ३० ॥ कुटिल कापट्य नातळे मातें । नाहीं शकुनी मत्पुत्रातें । कुटिल कल्पिजे तुझेनि चित्तें । ऐसें मातें वाटतें.' ॥३१॥ विदुरें पिटोनि ललाट[5] । म्हणे, 'होणार[6] बळकट, । वडील वृद्धाचे हे कष्ट । केंवी दृष्टीं विलोकूं? ॥ ३२ ॥ ज्येष्ठआज्ञेनें करीन गमन । परी अंतरीं अत्यंत उद्विग्न.' । मग स्मरोनि श्रीकृष्णचरण । समाधान कल्पिलें. ॥ ३३ ॥ भीष्मा जाणविली व्यवस्था, । 'मातें पाठवी इंद्रप्रस्था । वृद्धाचिया मनोगता । सहसा कोणा नेणवे.' ॥३४॥ भीष्म म्हणे, 'कळली संज्ञा । होणार न चुके महाप्राज्ञा! । न करितां वडिलाची अवज्ञा । अवश्य गेलें पाहिजे. ॥ ३५ ॥ होईल तें पाहिजे[7] दृष्टीं[8] । कांहीं कल्पूं नको पोटीं । राजाज्ञेनें पांडव भेटी[9] । अवश्य तुवां आणावे'. ॥ ३६ ॥ विदुर जातिये अवसरीं[10] । राव[11] प्रधाना आज्ञा करी, । 'मयसभेहूनि साजिरी । सभा अपूर्व निर्मावी.' ॥ ३७ ॥ सहस्रसुवर्णस्तंभ[12] शिरीं । सहस्रसंख्या मणिगोपुरीं । सहस्रकरमंडळाकारीं[13] । सहस्रखणी विस्तीर्ण. ॥ ३८ ॥ सहस्रसंख्या शिल्पीकार[14] । पाचारूनि कुशल चतुर । सभा करविली मनोहर । इंद्रभुवनासारिखी[15]. ॥ ३९ ॥ कृष्णागरु हरिचंदन । जांबूनद सुवर्ण । कामाऊनि सभासदन । अतिरमणीक उभविलें. ॥ ४० ॥ द्यूत खेळावया कौतुकें । पुढें रायांचे बैसके । आसनें वितानें[16] प्रत्येकें । ओटिंगणें[17] बहुरंगीं. ॥ ४१ ॥ ऐसी करवूनियां रचना । उत्साह राजयाच्या मना । मुखें विदुरा करी आज्ञा, । 'शीघ्र पांडवा पाचारीं.' ॥ ४२ ॥

---

१. 'जाण पां' असाही पाठ आहे. २. कुतूहल. ['कौतुकं नर्मणीच्छायामुत्सवे कुतुके मुदि । पारंपर्यागतख्यातमङ्गलोद्वाहसूत्रयोः ॥' इति हैमः; 'कौतुकं त्वभिलाषः स्यादुत्सवे नर्महर्षयोः । कुतूहलेऽपि तत्प्रोक्तम्' इति मेदिनीकरः, 'कौतुकं मङ्गले हर्षे हस्तसूत्रे कुतूहले' इति शाश्वतः.] ३. खेदाचें अथवा दुःखाचें कारण ४. प्रत्युत्तर देऊन माझें समाधान न करतां. ५. कपाळ. [द्यूत झालें असतां कलह होऊन कुलनाश होईल या भयानें विदुरानें ललाटास हात लाविला.] ६. भवितव्यता बलीयसी आहे. जें व्हावयाचें तें टळावयाचें नाहीं. ७. पहावें. ८. डोळ्यांनीं. ९. भेटीला. १०. जाण्याचे समयीं. [विदुर महाबलाढ्य व सुशिक्षित अशा अश्वांनीं युक्त केलेल्या रथांत बसून पांडवांच्या नगरासमीप आला. अ० ५८ श्लो० १-२.] ११. धृतराष्ट्र. १२. अध्याय ५६ श्लो० २७-३० पहा. १३. सूर्यमंडलाकार. १४. कारागीर. १५. 'नंदनवनासारिखी' असाही पाठ आहे. १६. छत्रें, पडदे. १७. लोडें.

खेद पावोनि **विदुर** क्षत्ता । सवेग पातला **इंद्रप्रस्था.** । **धर्में** परिसोनि वार्ता[1] । वेगें आला सन्मुख[2]. ॥ ४३ ॥ जैसें श्रीकृष्णाचें दर्शन । तैसें **विदुराचें** आगमन, । बंधूसहित कुरुनंदन[3] । सन्मुख भेटी पातला. ॥ ४४ ॥ साष्टांग करूनियां नमन । प्रेमें देऊनि आलिंगन । परमप्रीतीं करीं धरून । राजालया[4] पातला. ॥ ४५ ॥ चरण क्षाळूनि हस्तकीं । उदक[6] वंदिलें निजमस्तकीं । **कुंती द्रौपदी** परमसुखी । **विदुराचेनि** दर्शनें. ॥ ४६ ॥ **धर्म** बोले सप्रेम गोष्टी, । 'स्नेहभावें आलासि भेटी । बाळकें पहावीं ऐसी पोटीं । आवडी तूतें उपजली?' ॥ ४७ ॥ **विदुर** म्हणे, '**कुंतीसुता!** । तुमचे भेटीलागीं आस्था । वडील धाकुटीयां समस्ता । **हस्तनापुरा** अपार. ॥ ४८ ॥ **भीष्म द्रोण कर्ण कृप** । **धृतराष्ट्रराजा** अतिसकृप[7] । **दुर्योधनेंही** आक्षेप[8] । केला असे भेटीचा. ॥ ४९ ॥ पितृवचन करूनि मान्य । माझी यात्रा[9] नव्हे शून्य[10] । ऐसें हृदयीं विचारून । तुम्ही वर्तलें पाहिजे.' ॥ ५० ॥ **धर्म** म्हणे, 'सर्वज्ञराया! । सर्वही विदित तुझिया पाया । आप्तावेगळी मोहमाया[11] । कवण करी आप्तातें? ॥५१॥ सुहृदीं सुहृदां सांभाळावें । क्षणक्षणा विचारावें । भेटी यांचे विचारावें । विहिताचार[12] वडिलांचा. ॥ ५२ ॥ परंतु श्रीगुरु **व्यासाचें** वचन । कोठें नव जावें उचलून[13] । न कीजे दुर्जनसंभाषण । द्यूतकर्मा न शिवावें. ॥ ५३ ॥ कुटील[14] असत्य वर्मस्पर्श । हेळन छळन हास्य उपहास । जेणें पुढिलां होतसे त्रास । ऐसें वाक्य न वदावें. ॥ ५४ ॥ आम्ही असों तयेची रीती । तूं आलासि ईश्वरमूर्ती । तुझी आज्ञा ते निश्चिती । कल्याण कीर्ती आमुतें. ॥ ५५ ॥ मानत असेल तुझिया मना । तरीं आमुतें देईं आज्ञा । **व्यासा**समान तूंही प्राज्ञा! । मान्य होसी आमुतें. ॥ ५६ ॥ कोटी अपराधी राहटे प्राणी । अवचट **हरिनाम** आलिया वदनीं । तरी क्षोभलाही दंडपाणी[15] । अनमान[16] करी दंडावया. ॥ ५७ ॥ तेंवी **दुर्योधनाची** राहटी[17] । लिहितां न पुरे सर्व सृष्टी । तूं आलासी म्हणोनि ओठीं । शब्द न फुटे आमुतें.' ॥ ५८ ॥ **विदुर** म्हणे, '**धर्म**राया! । ईश्वरीं निश्चयो असे जया[18] । एकमार्गीं वर्तती तयां ।

---

१. वर्तमान. २. सामोरा. ३. धर्मराज. ४. राजसदनाला. ५. धुवून. ६. पादोदक. ७. अत्यंत कृपाळु. ८. आग्रह, हट्ट. ९. येणें. १०. व्यर्थ, निष्फळ. ११. 'स्नेहमाया' असा अन्य पाठ. १२. योग्य आचरण, मार्ग. १३. आपलें नगर सोडून. १४. 'अत्यंत कुटिल' असाही पाठ आहे. १५. यम. १६. मागें घेई. १७. वागणूक. १८. ईश्वरावर ज्यांचा निश्चय (विश्वास) आहे त्यांला.

अपाय कांहीं असेना. ॥ ५९ ॥ [1]अपकारियाचें लक्षण अपार । आपण केला [2]कोटी उपकार । न बोले तो उत्तम नर । [3]उत्तम पुरुष बोलती. ॥ ६० ॥ [4]गेलें हृदयीं नाठवावें । केलें मुखीं न बोलावें । सत्य सर्वथा न सांडावें । साधु-वर्तन या नांवें. ॥ ६१ ॥ वडिलीं आदरें पाचारिलें । तें [5]ऐश्वर्यमदें अव्हे-रिलें । हीं अपकीर्तीचीं फुलें । कां मस्तकीं तुरंबिसी?' ॥ ६२ ॥ कुंती म्हणे, 'विचारनिधी ! । [6]विदुरगरुडाचिये खांदीं । वळंघल्या काळकूट बाधी । केंवी [7]कौरवसर्पांचें ? ॥ ६३ ॥ घाय पडतां अंगावरी । पुढें होइजे उभय करीं । तेंवि विदुर आणि श्रीहरी । प्राणरक्षक आमुतें. ॥६४॥ न घडे वडिलांची अवज्ञा पाळिली होय विदुरआज्ञा । तेंचि करणें त्वां सर्वज्ञा ! । हे श्रेष्ठाज्ञा पैं माझी. ॥६५॥ पाळिजे विदुराचें उत्तर । हाचि तुमचा स्वधर्म थोर । [8]अवचट मांडल्या निष्ठुर । तें प्रारब्ध आपुलें. ॥ ६६ ॥ तो शब्द नाहीं आणिकांतें । कृष्णस्म-रणीं हरती [9]दुरितें । अंतीं विकल्प सांडोनि चित्तें । वाक्य पाळीं विदुराचें.' ॥ ६७ ॥ 'अवश्य' म्हणोनि धर्ममूर्ती । भोजनें सारिलीं स्वपंक्ती । विदुरा-सहीत बैसले रथीं । [10]कृष्णाकुंतीसमवेत. ॥ ६८ ॥ मार्गीं अपशकुनाच्या कोटी । कृष्णस्मरणें चालल्या दृष्टी । मनोवेगीं पांडव जेठी । [11]कुंजरपुरा पातले.॥६९॥ वार्ता परिसतां राजेश्वरें । पुत्र पाठविले सामोरें । रथकुंजरवाद्यगजरें । बंधू सर्वही पातले. ॥ ७० ॥ क्षेमालिंगन सुहृदभेटी । नगरवासियां आल्हाद पोटीं । ज-यजयकाराचे बोभाटीं । सभामंडपा पातले. ॥ ७१ ॥ नमस्कारिलें भीष्म-द्रोणा । भाळ स्पर्शिलें [12]पितृव्यचरणा । येरें देवूनि आलिंगना । [13]पाठी हातें थापटी. ॥ ७२ ॥ 'जिंकोनि पृथ्वीचे भूपती । केली [14]यागाची समाप्ती । आ-मुचे कुळीं चक्रवर्ती । धन्य धन्य धर्मा ! तूं' ॥ ७३ ॥ कुंती पूजिली गांधा-रिये । तैसीच द्रौपदी [15]भानुमतीये । कुमारकुमारीचिये माये । देवांगना ज्या-परी. ॥ ७४ ॥ मग सारूनि मंगळस्नान । एकपंक्तीं सुखभोजन । तांबूल सु-

---

१. अपकार करणाऱ्याचें. २. 'मोठा' असाही पाठ आहे. ३. हें उत्तम पुरुषाचें लक्षण ध्यानांत ठेवण्यालायक आहे. ४. गत गोष्ट, होऊन गेलेली गोष्ट. ५. वैभवाच्या तोऱ्यांत. ६. हें सुंदर रूपक आहे. ७. 'वडिलांचें' असाही पाठ आहे. ८. अकस्मात्. ९. पापें, अनिष्टें. १०. द्रौपदी आणि कुंती यांसह. [धर्मराज भ्रात्यांसह व विदुरासह बाल्हिक देशांतील अश्वांस रथास जुंपून हस्तिनापुरास जाण्यासाठीं निघाला. अ० ५८ श्लो० १९-२० पहा.] ११. हस्तिनापुराला. १२. चुलत्याच्या (धृतराष्ट्राच्या) पायांला. १३. हातानें पाट थापटणें हें शाबासकीचें, हुशारीचें, संतोषाचें सूचक आहे. १४. राजसूययज्ञाची. १५. दुर्योधनाच्या बायकोचें नांव भानुमती, तिनें.

मनें हरिचंदन । समस्तांतें अर्पिलीं. ॥ ७५ ॥ दिव्यरत्नाचे अलंकार । अमूल्यरत्नाचे संभार । दुर्योधन राजेश्वर । पांडवांतें अर्पितु. ॥ ७६ ॥ सुखशयनीं क्रमूनि निशी । कार्य वर्तलें येरे दिवसीं । वैशंपायन कुरुरायासीं । निवेदील तें ऐका. ॥ ७७ ॥ सभापर्व समुद्रमथन । आख्यानरत्न भिन्न भिन्न । निवडितां महाविलक्षण । उदित झालें तें ऐका. ॥ ७८ ॥ वस्त्रहरण अचाट । प्रगट होईल काळकूट । तें श्रीकृष्णनीळकंठ । परिहरील प्रतापें. ॥ ७९ ॥ तें व्यासभारत अर्थसंपदे । श्रोते परिसोत मनोविनोदें । लीलाविश्वंभरप्रसादें । मुक्तेश्वर कवि वदे. ॥ ८० ॥

---

## अध्याय चवदावा.

सारोनि विहिताचारनेमा । सभे बैसका झाली धर्मा । कृपाचार्या द्रोणा भीष्मा । श्रेष्ठासनीं बैसविलें. ॥ १ ॥ तयाजवळी कुरुनरेंद्र । धृतराष्ट्र दोंकळीं उणा चंद्र । समीप बुद्धीचा समुद्र । विदुर जैसा सुरगुरु. ॥ २ ॥ दुर्योधनराजा कर्ण द्रौणी । निकट मंत्रियां श्रेष्ठ शकुनी । दुःशासनादिबंधुश्रेणी । कर्ण विकर्ण बैसले. ॥ ३ ॥ बाल्हीक शल्य सोमदत्त । भूरिश्रवा जयद्रथ । हे मुख्य करूनि असंख्यात । पृथ्वीपाळ बैसले. ॥ ४ ॥ दुर्योधन म्हणे, 'गा ! मातुळा ! । निद्राभरें झांकिलें डोळां । आंगमोडे वेळोवेळां । मुखें येती जांभया. ॥ ५ ॥ युगासमान वाटे दिवस । सभारंग न्हवे विरस । अंगीं व्यापिला नसे आळस । ऐसें कांहीं सांग पां.' ॥ ६ ॥ शकुनी म्हणे, 'राजेश्वरीं । चल अचल दोहींपरीं । वेळ क्रमिजेती कुसरीं । राजधर्म परियेसा. ॥ ७ ॥ विटा चेंडू कां पारधी । अश्व फिरविणें बैसोनि खांदीं । बाणसंधान लक्षभेदीं । शस्त्रशूळादी साधनें. ॥ ८ ॥ गजयुद्धें महिषयुद्धें । मेषकुक्कुटब-

---

१. रात्र. २. 'महाविघ्न' असाही पाठ आहे. ३. कालकूट नामक विष. या पद्यांत वस्त्रहरणाला कालकूटाची व वस्त्रहरणापासून झालेल्या अपमानाचा परिहार करणाऱ्या श्रीकृष्णाला विष प्राशन करणाऱ्या महादेवाची उपमा दिली आहे. ४. श्रीकृष्णरूप महादेव. [निळकंठ=विषप्राशनानें ज्याचा कंठ काळा झाला तो.] आटपून. ५. स्नानसंध्यादि कर्में. ६. दोन कलांनीं. दोन डोळ्यांनीं आंधळा असल्यामुळें कविनें 'दोंकळीं' असें म्हटलें आहे. ७. देवांचा गुरु बृहस्पती. ८. द्रोणपुत्र अश्वत्थामा. ९. दुःशासनादिबंधूंची पंक्ति. १०. राजे. ११. या ठिकाणीं वर्णिलेले खेळ, करमणुका आणि युद्धें यांचें दर्शन प्रसंगविशेषीं आमच्या अवशिष्ट राहिलेल्या राजेरजवाड्यांच्या नगरांत घडतें.

कयुद्धें । दृष्टीं पहावीं मल्लयुद्धें[1] । कौतुकें काळ क्रमावा. ॥ ९ ॥ सभेमाजी बैसोनि सहजें । सारीपाट खेळती राजे । परस्परें घालून पैजे । अपार वस्तु जिंकिती. ॥ १० ॥ क्षण क्रमावया वेळ । खेळिजे सारिपाटखेळ । धर्मराज अतिकुशळ । हृदय जाणे अक्षांचें[2]. ॥ ११ ॥ द्यूतें नासे सर्व आळस । चढतां वाढे सुखहव्यास[3] । परी पैजेवीण आवेशरस । सहसा जाण उपजेना. ॥ १२ ॥ जंव जंव डाव हारीं पडे । तंव तंव आगळी[4] हांव चढे । एकमेका ईडेपाडे । जिंकावया इच्छिती. ॥ १३ ॥ हारविलें हर्षें[5] द्यावें । जिंकिलें तें प्रतापें[6] न्यावें । कोणी शेवटावरी[7] न यावें । न बोलावी दुरुक्ती. ॥ १४ ॥ द्यूता युद्धा पाचारिलिया । मागें सरों नये क्षत्रिया । 'नये'[8] म्हणतां वीर्यशौर्या । ये क्लीबत्व[9] कुशब्द.' ॥ १५ ॥ द्यूत[10] खेळावया प्रगट । पुढें ठेविला कनकपट । पांश[11] देखोनियां, भ्रष्ट । बुद्धी झाली सभेची. ॥ १६ ॥ भ्रूसंकेत[12] दावितां नयनीं । सारीपाट मांडी शकुनी । विदुर म्हणे, 'हे निंद्य करणी । पुण्यश्लोका! अयोग्य. ॥ १७ ॥ विष्णुस्मरणीं हरिकीर्तनीं । वेळ क्रमिजे पवित्रजनीं । संजयव्यासाचिये वचनीं । कथा श्रवण करावी. ॥ १८ ॥ द्यूत म्हणजे भ्रष्ट व्यसन[13] । द्यूतें पाविजे महाविघ्न । पाश अपवित्र सज्जन । सहसा हातीं न धरिती.' ॥ १९ ॥ संजय द्रोण विकर्ण भीष्म । कृपाचार्य विदुरोत्तम । यांचे हृदयीं द्यूतकर्म । नाचरावें सर्वथा. ॥ २० ॥ दुर्योधन कर्ण द्रोणसुत । शकुनी दुःशासन जयद्रथ । म्हणती, 'राजे खेळती द्यूत । कपटें पांडव जिंकावे.' ॥ २१ ॥ गुप्त अंधाचे अंतरीं[14] । द्यूतीं पांडव आणिजे हारीं । बाह्य म्हणे, 'विदुर बरी । बुद्धी सांगे ते करीं.' ॥ २२ ॥ कर्ण दुर्योधन जयद्रथ । म्हणती, 'राजे खेळती द्यूत । विदुर बोले तितका पंथ । अभाग्याचा[15] जाण पां.' ॥ २३ ॥ प्राप्त झालिया कळिकाळ । पुण्य निर्बळ, पाप सबळ, । तेंवी विदुरा हेळोनि[16] खळ । द्यूत बळें मांडिलें. ॥ २४ ॥ हस्तसंज्ञा[17] दावी तेक्षणीं । सारिपाट मांडी शकुनी । कपटपाश पहातां नयनीं । मुखस्तंभ[18] सभेचा.॥२५॥ अक्षदर्शनीं श्वेतवर्णें । स्थूळ चौधार वितीप्रमाणें । कनकोदकें अंकचिन्हें ।

---

१. मल्लांच्या कुस्त्या. २. अक्ष=फांसा. ३. इच्छा. ४. अधिक इच्छा. ५. ईर्षेनें. ६. 'प्रतिपाळावें' असा अन्य पाठ आहे. ७. निकरावर. ८. येत नाहीं. ९. नपुंसकत्व. १०. 'खेळ' असा अन्य पाठ आहे. ११. फांसे. १२. भोंवयाची खुण. १३. छंद. १४. मनांत. १५. भिकाऱ्याचा, दैवहतकाचा. १६. अवमानून. १७. हाताची खूण. १८. मुकेपणा.

वरी रेखिलीं साजिरीं. ॥ २६ ॥ मौनास्त्रविद्येचीं बीजाक्षरें । [1]कर्णोक्त मंडित मनोहरें । मृत्युसर्पाचीं [2]देशनाग्रें । दंशावया पातलीं. ॥२७॥ कळिपुरुषाचे तीक्ष्ण शर । लक्षूनि धर्माचें जि[3]व्हार । विंधिलें म्हणोनि बुद्धिविचार । विकळ झाला तेकाळीं. ॥ २८ ॥ कीं पृथ्वीभार फेडावया । धरेसीं वर दीधला राया । त्या विष्णूची महामाया । पाशरूपें प्रगटली. ॥ २९ ॥ म्हणोनि [4]भुली पडली सकळां । कोणीही निषेध न करी खेळा । कलह आणिला कौरवकुळा । कारण झालें लयातें. ॥ ३० ॥ जे दृष्टीं देखतां इच्छा बाधी । हातें धरितां भ्रंशे बुद्धी । ढाळितांचि [5]अप्रमादी । व्यसनीं पाडी जाणत्या. ॥ ३१ ॥ भीष्म बोले, 'उतावेळ । दुर्योधना! तूं परमकुशळ । परी धर्मासीं दुर्धर खेळ । खेळणें हें अनुचित.' ॥ ३२ ॥ दुर्योधन म्हणे, 'सत्य गोष्टी । आम्ही कौतुक पाहों दृष्टीं । धर्मा आणी शकुनी गांठी । यथायोग्य खेळावया.' ॥३३॥ धर्म प्रथम फांसे [6]ढाळी । तंव भीमें फोडिली आरोळी । उभयहस्तें पिटिली टाळी । भूमंडळीं भूकंप. ॥ ३४ ॥ हांक मारितां वृकोदरा, । खोटा डाव झाला खरा, । थरथराटें कांपे [7]धरा । हारी आली कौरवां. ॥ ३५ ॥ पांचवेळ अनुक्रमें । डाव जिंकिला रायें धर्में, । हांक मारितांचि भीमें । कपट होय सपाट. ॥ ३६ ॥ प्रल्हादाचिये स्मरणोत्तरीं । आलें विघ्न होय कैवारी । तेंवी भीमाचिये गजरीं । आली हारी कौरवां. ॥ ३७ ॥ हांकेसरिसा [10]भोंवे पट । कपटफांसे पडती नीट । पिटी दुर्योधन ललाट । कर्म खोटें सुटेना. ॥ ३८ ॥ धर्मासीं नव्हे हा खेळ । मांडलासे प्रळयकाळ । याचे हाकेतळीं भूगोल । फुटों पाहे येकाळीं. ॥ ३९ ॥ थोर हांसे गदगदाटें । फांसे फिरती गरगराटें; । असो हें खेळणें खोटें । सभा वाटे मोडली. ॥ ४० ॥ धर्म म्हणे, 'गा! भीमसेना! । तुवां धरावें अचळ मौन्या । [11]नांवेक रंजवावया मना । खेळ वडिलीं खेळिजे. ॥ ४१ ॥ जैसे श्रेष्ठ मौनें असती । तुवांही रहावें तेच रीती' । ऐसें बोलोनि [12]भद्रेजाती । नेमपाशीं बांधिला.॥ ४२ ॥ दुर्योधन म्हणे, 'धर्ममूर्ती! । फांसे ढाळवीन शकुनीहातीं । याची हारीं अथवा जितीं । हारजिती आमुतें. ॥ ४३ ॥ येणें हारविली पैज । मी [13]ओपीन सकळ राज्य । असत्य असे तरी

---

१. 'वर्णांतर' असा अन्य पाठ आहे. २. दांतांचीं अग्रें. ३. अंतःकरण. ४. भ्रांति, मोह. ५. सावध. ६. टाकी. ७. पृथ्वी. ८. आलेलें विघ्न घातक न होतां साधक (अनुकूल) झालें. ९. कौरवांस हार आली. १०. फिरे. ११. क्षणभर. 'क्षणैक' असा अन्य पाठ आहे. १२. हत्ती. १३. देईन.

पूर्वज । शोकार्णवीं बुडोत कां. ॥ ४४ ॥ बेवीस डावपर्यंत । आम्हीं तुम्हीं खेळावें द्यूत' । 'निकें[1]' म्हणे **कुंतीसुत** । म्हणोनि भार दीधला. ॥ ४५ ॥ कपटपाशांची करणी । जें जें **शकुनी** चिंती मनीं । तें तें **धर्मा**चे अंतःकरणीं । धांवे ऐसें वाटत. ॥ ४६ ॥ **शकुनी** अक्ष[2] धरूनि कोडें[3] । म्हणे, 'पैज बोलिजे तोंडें । आम्हीं जिंकिलिया होडें[4], । नेमिलें दीधलें पाहिजे.' ॥ ४७ ॥ 'हारावळीचा मध्यमणी[5]' । **धर्म** म्हणे 'म्यां नेमिला पणीं । जो जन्मला समुद्रमथनीं[6] । **कौस्तुभा**चा जावळा[7]. ॥ ४८ ॥ **शुक्रबृहस्पती**चें रूप । जया देखोनि पावे लोप । बाळसूर्याचीही ओप[8] । जया पाहतां पारुषे. ॥४९॥ मोलें[9]-गळा त्रिभुवनीं । उपमे उणा **स्यमंत**मणी । तो म्यां देणें प्रथम पणीं । जरी त्वां डाव जिंकिला.' ॥९०॥ फांसे ढाळितां क्षणीं । 'जिंकिलें रे !' म्हणे **शकुनी** । **धर्में** काढून कंठींचा मणी । **दुर्योधन**कंठीं सूंदला[10]. ॥ ९१ ॥ घर्म[11] दाटला आवेशें । म्हणे मागुती, 'ढाळीं फांसे । तुवां जिंकिल्या विशेषें । विजयी[12] रथ म्यां देणें. ॥ ९२ ॥ चक्रें चंद्रसूर्यतेजीं । व्याघ्र[13]चिन्ह मिरवे ध्वजीं । पुढां जुंपिले अष्ट वाजी[14] । उच्चैः[15]श्रव्यासारिखे. ॥ ९३ ॥ सुवर्णशृंखळा किंकिणी[16] जाळीं । सांटा[17] मिरवे रत्नप्रवाळीं । तो रहंवर[18] याचिकाळीं । द्वितीय डावा ओडवी.' ॥ ९४ ॥ फांसे ढाळूनि कौतुकें । **शकुनी** हांक मारी हरिखें[19], । 'जिंकिलें **धर्मा**!' म्हणे मुखें । 'हारी आली जाण पां.' ॥ ९५ ॥ 'सोळा तुळांचा निष्क[20] एक । ऐसे असंख्य सहस्र देख । कुंडीं[21] भरलें शुद्ध कनक[22] । जांबूनद ज्या म्हणती. ॥ ९६ ॥ ऐसीं कुंडें एकशत । अक्षय कोशें[23] माझे येथ । द्रव्य भरलें अपरिमित । जें वेचितां न वेचे. ॥९७॥ जेथें सिद्धाचें वरदान । वेंचिजे तंव भरे पूर्ण । मेघें करितांही प्राशन । सिंधु[24]जळ ज्यापरी. ॥९८॥ तया अक्षयी

---

१. ठीक, बरें. २. फांसे. ३. कौतुकानें. ४. पैजे. ५. उत्तम हारांतील मधला मणि. (हा सर्वांत श्रेष्ठ असावयाचा असा नियम आहे). ६. समुद्राचें मथन देवांनीं केलें, त्यांतून चौदा रत्नें निघालीं. त्यांत कौस्तुभ नामक एक मणि होता, त्याच्या बरोबरच हा मध्यमणि उत्पन्न झालेला होय. [अ० ६० श्लो० ४-५]. ७. जुळा, बरोबर झालेला. ८. प्रभा. ९. किंमतीनें अधिक. १०. घातला. ११. घाम. १२. हा जैत्र रथ. [अ० ६१ श्लो० ४-६.] १३. व्याघ्रचर्मावनद्ध. १४. घोडे. १५. इंद्राच्या अश्वासारखे. १६. क्षुद्र घंटिकांचें जाळें. १७. संचय. १८. रथ. १९. आनंदानें. २०. निष्क=साष्टपलशतं सुवर्णानाम्. (अ० ६१ श्लो० २ टीका.) २१. मूळांत 'भांडिनी' असें पद असून 'कुंडिनी' असाही अन्य पाठ दर्शविला आहे. भांडिनी=मंजूषा, पेटी; कुंडिनी=पात्रविशेष. २२. सोनें. २३. भांडार. २४. समुद्रजल.

भांडारधना । मी देतसें तृतीय पणा.' । जयजयकार करूनि जाणा । शकुनी फांसे ढाळितू. ॥ ५९ ॥ 'म्हणे जिंकिलें' धृतराष्ट्रकुमरा । 'हारी आली युधिष्ठिरा' । हें परिसोनि कुंतीकुमरा । हांव अद्भुत नावरे. ॥६०॥ 'लक्षसंख्या माझिया दासी[1] । गुणलक्षणी लावण्यराशी । उपमे रंभा कीं उर्वशी । मूर्तसिद्धि जैसिया. ॥६१॥ सुवर्णनिष्कमाळा[2] गांठी । रत्नकंकणें माळा कंठीं । कंचुकी वस्त्राच्या परवंटी । मुक्ताफळें झळकती. ॥ ६२ ॥ चंदनचर्चित[3] शरीरीं । कुंददशनी[4] बिंबाधरी[5] । भाळीं कस्तूरी नवकेशरी । सुवास वासें ओपिती. ॥ ६३ ॥ जाणती चतुः-[6]षष्टी कळा । नृत्यगायनीं परमकुशळा । सेवेनें तोषविती सकळां । ऋषिरायां ममाज्ञा. ॥ ६४ ॥ त्या दासींचा नेमिला नेम.' । 'जिंकिलें' म्हणे शकुनी अधम । पंचम डाया राया धर्म । म्हणे, 'ढाळीं अक्षांतें. ॥ ६५ ॥ दासीसंख्या माझे दास । सौंदर्यें सरिसे राजहंस । तारुण्यें पौर्णिमेचा प्रकाश । वदनचंद्रीं सर्वांतें. ॥६६॥ नित्य [7]ओढिती धौतवस्त्रें । रत्नकुंडलेंमंडित [8]श्रोत्रें । हातीं घेऊनि सेवापात्रें । अखंड सेवे तिष्ठती. ॥ ६७ ॥ दक्ष अनुकूळ स्वामिभक्त । प्रज्ञा मेधा शांत दांत[9] । निर्लोभी जे मूर्तिमंत । अहोरात्र जवळिके. ॥ ६८ ॥ ते देतसें पंचम डाया.' । शकुनी फांसे ढाळी लवलाह्यां । 'जिंकिलें' म्हणोनि पिटी बांह्या[10] । हारी आली धर्मातें. ॥ ६९ ॥ सहस्र लक्ष कुंजरश्रेणीं । शृंगारिले हेमाभरणीं । एक एकातें आठ [11]करिणी । समागमें चालती. ॥ ७० ॥ पाठीं सूर्यपुटाचीं वसनें । दशनीं जडिलीं दिव्य रत्नें । ते म्यां षष्टम डाया देणें' । म्हणोनि डाव टाकिला. ॥ ७१ ॥ तोही हारविला डावो । परी लक्षा नाणी धर्मरावो । मग म्हणे, 'पाणितळीं ठावो । सागराचा आठवे. ॥ ७२ ॥ कुंजरसंख्या कनकरथ । हेममंडित सुशोभित । दिव्यपताकीं मिरवत । विद्यु[12]ल्लतेसारिखे. ॥ ७३ ॥ [13]विनीत वाजी त्यां योजिले । सारथी संग्रामकुशळ भले । सहस्र निष्क त्यां नेमिलें । मास वेतन एकएका. ॥ ७४ ॥ युद्ध[14] पडो अथवा न पडो तया । वेतन भक्षूनि असती राया ! । ते मी ओढवीं सप्तम डाया । फांसे ढाळीं म्हणतसें.' ॥ ७५ ॥ धर्म पैजेनें बोलत । शकुनी जिंकूनि करी

---

१. अ० ६१ श्लो० ८-१० पहा. २. सुवर्णपदकांची माळा. ३. चंदनोक्षिता. ४. कुंदपुष्पासारिखे ज्यांचे दांत अशा. ५. पिकलेल्या तोंडल्यासारिखे ओंठ ज्यांचे अशा. ६. चतुःषष्टिकलाविशारद. (पृष्ठ ४७ टीप १६ पहा.) ७. आंगावर घेतात. ओढणें=पांघरणें, आंगावर घेणें. ८. कान. ९. अ० ६१ श्लो० १३ पहा. १०. भुज. ११. हत्तीणी. १२. विजेसारखे. १३. शिकविलेले, नम्र, सुदांत. १४. अध्याय ६१ श्लो० १९-२० पहा.

मात । [1]रहंवर हारविल्या म्हणत । युधिष्ठिर मागुती. ॥ ७६ ॥ 'तित्तिर[2]वर्णें जिंकिती वाता । जे [3]गंधर्वें दीधले पार्था । तयांसहीत असंख्याता । अश्वशाळे हैं[4]यरत्नें. ॥ ७७ ॥ जडित [5]जीन तया पृष्ठीं । सुवर्णशृंखळा माळा कंठीं । अष्टम डाव जिंकिलिया पाठीं । तुज नेमस्त म्यां देणें.' ॥ ७८ ॥ शकुनी जैसें बोले तोंडें । तैसाचि डाव फांसा पडे. । धर्म होऊनि ठाके वेडें । हारी अंगा आलिया. ॥ ७९ ॥ कुटिल बोले कठिणोत्तरीं, । 'द्यूतयुद्धा मी पाचारीं । मागें सरतां आली हारी । क्षात्रधर्मीं धर्मातें.' ॥ ८० ॥ छळोनि बोले सौबळ, । 'वित्त असे कीं सरलें सकळ? । अर्थ असतां धर्मशीळ । लोभें नाहीं न म्हणत.' ॥ ८१ ॥ '[6]शकट उष्ट्र वाजी [7]खर । ओढवीतसें शतसहस्र । यांचे रक्षक हो! अपार । लक्ष सेवक माझे घरीं. ॥ ८२ ॥ भक्षिती सूक्ष्म [8]शाल्योदनें । करिती गोरसघृतपानें । नवमे डावीं म्यां देणें । जरी स्वधर्में जिंकिसी.' ॥ ८३ ॥ फांसे ढाळूनि कपटवंत । 'जिंकिलें' म्हणोनि [9]उभवी हस्त, । 'उरलें असेल जें वित्त । पुढल्या डावा ओढवीं.' ॥ ८४ ॥ विन्मुख झालिया भाग्य सकळ । अवलक्ष्मी घाली माळ । बुद्धियुक्त होय विकळ । स्वहित कांहीं सुचेना. ॥ ८५ ॥ द्यूतमद्यें भ्रमला देहीं । गोड न लागे [10]आंन कांहीं । द्यूतचि एक रुचलें पाहीं । कुपथ्य जैसें रोगिया. ॥ ८६ ॥ अगाध विष्णुमायेचें बळ । कीं विनाशकाळाची विषम वेळ । कीं दुष्टकर्माचें फळ । हें तत्वतां नेणवे. ॥ ८७ ॥ म्हणोनि धर्माची भ्रंशली बुद्धी । हेंचि आश्चर्य न बोलवे शब्दीं । कीं धन्वंतरिया उदेली व्याधी । किंवा भ्रम ब्रह्मयातें. ॥ ८८ ॥ [11]पतंग ज्वाळा देखतां दृष्टी । पांडवां हेचि वासना उठी । कीं सर्व भाग्य देऊनि पाठीं । [12]सती प्रवेशे पावकीं. ॥ ८९ ॥ पक्षिया मरण येतां निकट । फांसियामाजी दिसे वाट । तेंवी अपाय वाटती नीट । कष्टकाळ पातलिया. ॥ ९० ॥ ताम्र घडी [13]लोहबंदी । चारीशत सुवर्णनिधी । पंचद्रौणिक संख्यावधी । द्रव्य भ-

---

१. रथ. २. तित्तिरकल्माष (अश्व). ३. चित्ररथ गंधर्वानें. ४. उत्तम अश्व. ५. खोगीर. ६. रथ, गाडा. ७. गाढव. ८. शालितंडुल. [अ० ६१ श्लो० २७.] ९. उभारी. १०. अन्य. ११. पतंग दिव्याच्या ज्योतीवर स्वेच्छेनें झडप घालतो आणि मरण पावतो–हा दृष्टांत काव्यग्रंथांत वारंवार आढळतो. (अध्याय १५ ओंवी २ पहा.) राजकवि टेनिसन यांच्या सुप्रसिद्ध In Memoriam नामक काव्यांत एक ठिकाणीं असाच उल्लेख आहे.:–

"That not a moth with vain desire
Is shrivel'd in a fruitless fire."

१२. पतिव्रता. १३. ताम्रलोहपरिवृत्त असे निधि. (अ० ६१ श्लो० २९-३०.)

रलें एकेकीं. ॥ ९१ ॥ वेंचितां न सरे संपत्ती । द्वितीय कोश माझा नृपती! । अक्षय म्हणोनि लक्ष्मीपती । देता झाला प्रसाद. ॥ ९२ ॥ ते घेऊनि दहावा डावो । 'जिंकिला' म्हणे गांधाररावो. । कौरव म्हणती, 'कोण देवो । आजी आम्हा ओळला.'[1] ॥ ९३ ॥ ऐसें सर्वोपरी घोर । द्यूत माजलें देखूनि विदुर । न्यायनिष्ठुर[2] हितोत्तर[3] । धृतराष्ट्रातें बोलतू. ॥ ९४ ॥ म्हणे 'राया! विवेकमंदा! । आंत बाहेर विचारअंधा![4] । पुत्रलोभें परम खेदा । आमरणांत[5] पावसी. ॥ ९५ ॥ याचिये[6] जन्मकाळींचीं चिन्हें[7] । देखोनि तूतें बोलिलों वचनें । याचा त्याग करूनि प्राणें । कुळ आपुलें वांचवीं ॥ ९६ ॥ ते बुद्धि नघेसीच माझी । त्याचें फळ पावलें आजी । आजून तरी स्वहितकाजीं । मनोभावें प्रेरी कां. ॥ ९७ ॥ मोडीं कपट द्यूतखेळ । दवडीं परता हा सौबळ[8] । इतुकेनी क्षेम कुशळ । कौरवकुळ अक्षयी. ॥ ९८ ॥ पुत्र नव्हे हा कुलांगार । दुर्गुणी विश्वास[9] विखार । करील सर्वांचा संहार । हा निर्धार जाण पां. ॥९९॥ तक्षकें[10] एकें अन्याय केला । तो गोत्र जाळूनि आपण उरला । हा नासूनि सर्वकुळा । शेखीं[11] प्राणा मुकेल. ॥ १०० ॥ हातें भंगूनि राज्यनौका[12] । बुडोनि बुडवी आप्तलोकां । तुज पाडील नरनायका! । शोकार्णवीं[13] चिरकाळ. ॥ १०१ ॥ यातें हातें वारूनि दुरी । दवडीं शकुनी हा बाहेरी । इतुकेनी अनंतकाळावरी । पुत्रपौत्रीं नांदसी. ॥ १०२ ॥ ऐकें त्यागूनि कुळ [14]रक्षिजे ।

---

१. प्रसन्न झाला, पावला. २. न्यायास्तव निष्ठुर, अन्यथा परमदयाळु असा भाव. ३. हिताचें वचन. ४. नेत्रांध आणि विचारांध. ५. मरणापर्यंत, मरेपर्यंत. आमरण=मरणपर्यंत. ['आ' या उपसर्गाचे अनेक अर्थ आहेत. 'आङ् मर्यादाभिविध्योः'–अष्टाध्यायी २-१-१३. मर्यादा आणि अभिविधि असे दोन प्रमुखार्थ आहेत. आमरण=मरणाच्या मर्यादेपर्यंत, आजन्म=जन्मापासून, आमूल, मूळापासून.] ६. या दुर्योधनाच्या. ७. दुर्योधन जन्मास आला तेव्हां अनेक दुश्चिन्हें घडून आलीं. यानेंच स्वतः गोमायुशब्दासारखा शब्द केला. [अ० ६२ श्लो० २-३.] ८. मोरोपंत–सभापर्व–अध्याय ४ गीति २७ पहा. ९. विश्वाला बाधा करणारा (विषाप्रमाणें.) १०. एका तक्षकानें (सापानें) परीक्षित् राजाला दंश अन्यायानें केला, तेव्हां त्याचा पुत्र जन्मेजय यानें सर्पसत्र करून त्यांत लक्षावधि सर्पांची आहुति दिली–इत्यादि कथा पहा. [मुक्तेश्वर–आदिपर्व–अध्याय १० पृ० ७०-७७.] ११. शेवटीं. १२. अध्याय ६३ श्लो० ४ पहा. १३. दुःखसागरांत. १४. याविषयीं वचनाधारः–'त्यजेत्कुलार्थे पुरुषं ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत् । ग्रामं जनपदस्यार्थे आत्मार्थे पृथिवीं त्यजेत् ॥' (सभापर्व–अध्याय ६२ श्लोक ११. (याचा अर्थः–एका पुरुषाच्या संग्रहेंकरून जर कुळाचा नाश होत आहे तर त्याचा त्याग करून कुळाचें रक्षण करावें. एका कुळाच्या योगेंकरून जर ग्राम नाश पावतो तर तें कूळ

ग्रामालागीं कुळ वोळिजे[1] । देशालागीं[2] ग्राम त्यजिजे । नीतिवंतीं, जाण[3] पां. ॥ १०३ ॥ प्राणालागीं पृथ्वीतळ । त्यागूनि जाती बुद्धिकुशळ । पुत्र त्यागिल्या सौख्य अचळ । उभय लोकीं पावसी ॥ १०४ ॥ मधु[4] देखोनि वळघे कडा[5] । तळीं पात न देखे पुढां[6] । अनर्थ सर्पीं सूदला वेढा । द्यूतधना जवळिकें. ॥ १०५ ॥ तें नेणवे दुर्योधना । जेंवि जंबुक सिंह[7]रसना । मांस म्हणोनि भक्षितां प्राणा । हानी पावे रोकडी. ॥ १०६ ॥ पक्षीपाळकें बिडाळ[8] । गोवळीं[9] गोठणीं शार्दूळ[10] । अजारक्षणीं[11] विशाळ । वृक[12] कळपीं पाळिला. ॥ १०७ ॥ तेंवि हा दुर्योधन कुपुत्र । क्षया नेईल सकळ गोत्र[13] । त्यागीं पात्र हें अपवित्र । मद्यपाचें[14] पैं जैसें. ॥ १०८ ॥ सहज मागत्यांसी मुखें । तरी पांडव प्राण अर्पिती हरिखें[15] । द्यूत मांडून येणें मूखें । मरण मोलें घेतलें.' ॥ १०९ ॥ ऐकोनि विदुराची वाणी । दुर्योधन संतापला मनीं । जैसा प्रळयकाळींचा दावाग्नी । महावातें धडाडी[16]. ॥ ११० ॥ मग म्हणे, 'रे! अविचारिया विदुरा! । अमर्यादें जल्पसी स्वैरा[17]; । श्रेष्ठनिंदा करितां चतुरा! । मानहानी रोकडी.' ॥१११॥ दुर्योधन म्हणे, 'जातिभ्रष्टा! । विचार पुसें श्रेष्ठश्रेष्ठा। कुशब्द काढितां प्रतिष्ठा। उरता मार्ग दिसेना. ॥११२॥ द्वेषें निंदिसी आमुतें । अखंड स्तविसी पांडवांतें, । विषतरु स्नेहामृतें । व्यर्थ वडिलीं वाढविला. ॥ ११३ ॥ बिडाळें अथवा कृष्णव्याळें[18] । भक्षिजेती आपुलीं बाळें । ऐसीं आमुचीं आयुष्यफळें। शठ! निर्फळ त्वां केलीं. ॥११४॥

---

ग्रामांतून काढून लावावें, आणि ग्राम रक्षावा. एका ग्रामामुळें जर देश उच्छिन्न होतो तर तो ग्राम मोडून टाकावा. जर आत्मा नाश पावतो आहे तर पृथ्वीचा त्याग करून आत्मरक्षण करावें.) मोरोपंत–महाभारत–उद्योगपर्व–अध्याय ९ गीति ६२ ही या ओंवीसीं समानार्थक आहे. १५. अ० ६२ श्लो० ११ पहा.

१. टाकावें. २. मुक्तेश्वर–आदिपर्व–अध्याय २६ ओंवी ९४ वी पहा. ३. ही नीति शुक्राचार्यांनें जंभासुराच्या त्यागप्रसंगीं सर्व असुरांना सांगितली. [अ० ६२ श्लो० १२ टीका.] ४. हाच दृष्टांत मूळांत आहे. ५. मूढ पर्वताच्या कड्यावरील मध पाहतो. पण कडेलोट होईल हें पाहात नाहीं–असा भाव. ६. मोरोपंत–सभापर्व–अध्याय ४ गीति १५ पहा. ७. सिंहाची जीभ. ८. मार्जार. ९. गवळ्यानें, जांगळ्यानें. १०. व्याघ्र. ११. मेंढवाड्यांत. १२. लांडगा. १३. कुल. १४. मागें अध्याय १० ओंवी १०० पहा. १५. हर्षानें. १६. पेटे. १७. यथेच्छ. १८. काळसर्पानें.

सुग्रीव अथवा **बि**भीषण । झाले बंधुत्वा उत्तीर्ण । तयां ऐसें सुहृदपण । फळलें प्रज्ञाचक्षूसी. ॥ ११९ ॥ आतां होईल तेंचि पाहीं । विशेष वेल्गना न करीं कांहीं । पडतां निंदेचे प्रवाहीं । शब्द नाहीं आमुतें. ॥ ११६ ॥ बैसवेल तरी बैसावें, । न देखवे तरी उठोनि जावें, । दुरुक्ती बोलतां स्वभावें । येथें शेवट रोकडा. ॥ ११७ ॥ होसी राजाचा अनुज । म्हणोनि रक्षिली लौकिक लाज । आणिकातें वॅन्हिशेज । प्राप्त होती रोकडी. ॥ ११८ ॥ ऐसाच पूर्वी **बि**भीषण । **रा**वणसभेसी पावला अपमान । तयाऐसे तुझे गुण । सदा महिमा न भंगिसी.'॥११९॥ **विदुर** म्हणे, 'अविचारखाणी!। ऐकें मूर्खशिरोमणी! । **धृ**तराष्ट्रातें वृद्धपणीं । पुत्रशोक न पडावा. ॥ १२० ॥ म्हणोनि बोलिलों तुमच्या हिता । पाजिलें सुविचारामृता । तें न जिरे म्हणोनि माझिया चित्ता । खेद अपार होतसे. ॥ १२१ ॥ लाधलासि **पां**डवांचीं वित्तें। म्हणोनि संतोष मानिसी चित्तें । परि हानी तूतें, लाभ त्यातें । झाला ऐसें जाण पां. ॥ १२२ ॥ त्यांची संपत्ती त्यांचिया घरा । जाईल केलिया निर्धारा। निर्वैर होईल वसुंधरा । हा अधिकार दिसतसे. ॥ १२३ ॥ हा सर्वही तव प्रसाद । अपकीर्तिविष्ठेनें लोपला वृद्ध । ईश्वर पहातसे विनोद । तूतें अन्यायी व्हावया. ॥ १२४ ॥ त्यांचें त्यांस द्याल धन । काळांतरीं ओपिल्या प्राण । तुज देतील लेखा करून । फोडीवाडी हस्तकीं. ॥ १२५ ॥ **भीष्म द्रो**ण **श**कुनी **क**र्ण । **श**ल्य वेंचिल्या न फिटे ऋण । खंडा देऊनि आपुला प्राण । खेदित करिसी पितयातें. ॥ १२६ ॥ तें जीर्ण खत पितयाअंगीं । **व्या**साश्रमीं पडेल वेगीं । तरी **पां**डवऋणाची धगी । युगायुगीं खंडेना. ॥ १२७॥ पुरी अथवा सेवितां वन । **पां**डव सभाग्यची जाण । राज्य करितां अवलक्षण । अभाग्य तुम्हीं निर्धारें. ॥ १२८ ॥ श्रेष्ठ वृद्धाचा अपमान । तेंचि अवलक्ष्मीचें स्थान । विघ्नें येती तेथें ठाकून । जेथें दुर्वचन वडिलातें. ॥ १२९ ॥

---

१. उतराई. २. बडबड. ३. धाकटा बंधु. ४. मरण, अग्निशयन. ५. मूर्ख कोणाला म्हणावें हें मोरोपंतानें सांगितलें आहे:—'विद्या नसोनि उद्धत, धन नसतां जो उदारपण वाहे। अर्थासि नीचकर्मे जो संपादावयासि जन पाहे. ॥ ९२ ॥ नसतां लाभ यशाचा दाटूनि करी परार्थ जो यत्न । मित्रार्थी कपट करी, तो साक्षात् 'मूढजनशिरोरत्न.' ॥ ९३ ॥ मित्रत्व दे अमित्रा, जो मित्रद्वेष दुष्टकर्म करी, । तो 'मूर्ख असें' म्हणती; पुरुषपरीक्षा कळे जयांसि बरी ॥ ९४ ॥.' (उद्योगपर्व–अध्याय ३ रा.) ६. 'न धरीं' असा अन्य पाठ आहे. ७. पृथ्वी. ८. धृतराष्ट्र. ९. स्पष्टतापूर्वक, स्पष्टपणें. १०. अपशब्द.

प्राण त्यागितां पापमूर्ती । माझीं वचनें आठविती । आतां[1] असो, हेचि अ-कीर्ती । मूर्खाप्रती बोलणें. ॥ १३० ॥ [2]यालागीं धरूनियां मौन । चरित्र पाहूं उभयनयन.' । ऐसें बोलोनि तो सर्वज्ञ । स्वस्थ आसनीं बैसला. ॥१३१॥ शकुनी [2]म्हणे, 'कुंतीसुता ! । द्यूतयज्ञकर्त्या दीक्षिता ! । पूर्णाहुतीवीण सर्वथा । फळ कर्त्या न पाविजे. ॥ १३२ ॥ [3]कंठपर्यंत पूजा आली । परी मस्तकीं पा-हिजे चढली, । असेल संपदा जे उरली । ते निवेदीं उदारा ! ॥ १३३ ॥ शुभडाव पडलिया उचिता । अवघेंच एकदां येईल हाता । आणी आमुच्याही वित्ता जीविता । सर्वही तुम्हां समर्पूं.' ॥ १३४ ॥ धर्म म्हणे, 'रे ! निर्धना । संख्या नाहीं माझिया धना । [4]अयुत नियुतांची गणना । तृणप्राय माझे घरीं. ॥ १३५ ॥ पद्में खर्वें अर्बुद शंख । महाखर्वें निखर्व देख । कोटी निधीनें नव्हे लेख । समुद्रप्राय जें भरलें. ॥ १३६ ॥ ऐसी माझीं [5]बहुत [7]कोशें । पणा देतसें बहुसंतोषें.' । शकुनी ढाळूनियां फांसे, । 'जिंकिलें रे !' म्हणतसे. ॥ १३७ ॥ 'धेनु महिषी [8]वृषभ श्वेत । [10]अंजा [11]अंबिका नाहीं गणित । पावे [12]पूर्वसिंधूचा प्रांत । तत्र खि[13]ल्लारें भरलासे.' ॥ १३८ ॥ 'तें देतसें' म्हणतां वचनीं । 'जिंकिलें रे ! म्हणे शकुनी । धर्म म्हणे, 'हे [14]मेदिनी । सागरान्त शोभित. ॥ १३९ ॥ देश दुर्गगड गिरिवर । कोश [15]पेली राजा-गार । खेड खेडके मंडप थोर । सहस्र ग्राम ज्या तळीं. ॥ १४० ॥ पेंठा नगरें पुरें पाटणें । रत्न वस्तू निपजतीं स्थानें । द्वीपें द्रोणाख्य संहानें । जीं बंदरें बोलती. ॥ १४१ ॥ ब्राह्मणा दीधली अक्षय वृत्ती । ते भि[16]न्न करूनि सर्व जगती । पणा घालीतसें निश्चिती । अक्ष ढाळीं कपटिया.' ॥ १४२ ॥ 'हा टाकिला डाव तेरावा.' । शकुनी म्हणे, 'धन्य पांडवा ! । हारी नमनीं [17]वांटिवा । हाव धरिसी आगळा.' ॥ १४३ ॥ [18]प्रतिविंध्यादी पांचहीजण ।

---

१. 'आतां' असा अन्य पाठ आहे. २. अध्याय ६५ श्लोक १ पहा. येथें वर्णन अलंकारयुक्त आहे, पण मूळांत तसें नाहीं. ३. 'कटि' असा अन्य पाठ आहे. ४. अध्याय ६५ श्लोक ३-४ पहा. ५. अध्याय ६५ श्लोक ३-४ पहा. ६. 'तृतीय' असा अन्य पाठ आहे. ७. भांडारें. ८. बैल. ९. पांढरे. १०. शेळ्या. ११. मेंढ्यांला. १२. पर्णाशा नदीपासून सिंधुनदापर्यंत जें कांहीं आहे तें माझें धन आहे असें धर्माचें वचन आहे. [अ० ६५ श्लो० ६.] १३. कळप. १४. पृथ्वी. १५. गांव. १६. अध्याय ६५ श्लोक ८ पहा. १७. पुरुषार्थ, पराक्रम. १८. प्रतिविंध्य इत्यादि राजपुत्र. (अ० ६५ श्लो० १०, मुक्तेश्वर–आदिपर्व–अध्याय ४८ ओंव्या ५८-५९ पहा.)

जे कां द्रौपदीचे नंदन । त्यांचा डाव कुरुभूषण । मुखें भूषण बोलिला. ॥ १४४ ॥ बाप लेंकरें विकी दुंकळीं[1] । तैसें झालें तयेकाळीं । विपरीत काळ नेव्हाळी[2] । बळें घडवी नवडे तें. ॥ १४५ ॥ फांसे ढाळूनि अपवित्र । म्हणे, 'म्यां जिंकिले पांडवपुत्र.' । पवित्र म्हणती, 'हें विचित्र । कौतुक दृष्टी देखतसों.' ॥ १४६ ॥ विचार हारपला धर्माचा । डाव घातला बंधुवर्गाचा । आपणासगट पांचाचा । भिन्न भिन्न अनुवादे. ॥ १४७ ॥ श्याम तरुण लोहिताक्ष[3] । सिंहस्कंध बळिष्ठ दक्ष । रूपवंतांमाजी मुख्य । नकुळ माझा प्रियबंधु. ॥ १४८ ॥ शास्त्रीपंडितशिरोमणी । सकळचातुर्याची खाणी । तो सहदेव परमगुणी । पणा ओपी हस्तकें. ॥ १४९ ॥ शत्रुसेना महापूरीं । ऐल पैले उभयतीरीं । रथनौका खेळवी समरीं । वीरश्रीये विनोदें, ॥ १५० ॥ तो अर्जुन प्रतापरुद्र । उपमे तुळिजे श्रीरामचंद्र, । तो देतसें वीर[4]भद्र । क्रूर जैसा क्षोभलिया. ॥ १५१ ॥ दानवदलनीं जैसा इंद्र । राक्षसकदनीं श्रीरामचंद्र । क्षत्रियांतक भार्[5]गवेंद्र । तेंवी भीम शत्रूतें. ॥ १५२ ॥ ज्याचिया बळासमान बळी । पाहतां नतुळे ब्रह्मांडगोळीं । तुज अयोग्य परी येकाळीं । द्यूतभाग्यें लाधला. ॥ १५३ ॥ जो मी वडील चौघांजणां । माझे आज्ञेनें वेंचिती प्राणा । तो मी देतसें आपणा । देहदान स्वहस्तकीं.॥ १५४॥ परी हें काळपुरुषाचें दान । घेतां तात्काळ पावसी मरण, । शांती प्रायश्चित्त विधान.' । शकुनी म्हणे 'मी जाणें'.॥ १५५॥ धर्म म्हणे,'देऊनि अर्थु । मोलें विकत घेतला मृत्यु । तयातुल्य दास मी विक्रीतु । जरी त्वां डाव जिंकिला.' ॥ १५६ ॥ डाव ढाळूनि पांचवेळां । शकुनी म्हणे, 'जिंकिलें सकळां । आतां शेवट आला खेळा । द्रौपदी एक उरलीसे.॥ १५७॥ झाला अ[6]विवेकअशनीपात । घाली द्रौपदीची शपथ । जैसा पिशाच भ्रमें भ्रमित । निर्लज्ज फिरे नागवा. ॥ १५८ ॥ त्रैलोक्यलावण्याची खाणी । स[7]कळाविषयीं कुशळ जनीं । इंद्रनीळकीळवर्णी । जे ओतिली सु[8]ढाळी. ॥ १५९ ॥ सुवर्ण सौंदर्यचंपककळिका । प[9]रिमळमल्याचल [10]मल्लिका । लावण्य-

१. दुष्काळांत. २. नवीनपणा, नवल. ३. लाल डोळे आहेत ज्याचे तो. [अ० ६५ श्लो० १२.] ४. सांबाचे जटेंतून उत्पन्न झालेला पराक्रमी गण. ५. परशुराम. ६. अविचाररूप वज्रपात. ७. धर्मकामार्थसिद्धिदायिनी अशी. [अ० ६५ श्लो० ३६.] ८. सुरेख, बांधेसूद. ९. अध्याय ६५ श्लोक ३४ पहा.· १०. मल्लिकेसारखी सुरभि.

वनीची कनकलतिका । कुचमंडलीं विराजे. ॥ १६० ॥ वेदीमध्या[1] दीर्घकेशी । नित्य नूतना गुणैकराशी । पर्वतकन्येहूनि[2] विशेषीं । कसा आगळी[3] सुकुमारी. ॥ १६१ ॥ करूनि सर्वांचें[4] शांतवन । सर्वांपाठीं करी शयन । सर्वां आधीं सावधान । जगीं होय प्रभातें[5]. ॥ १६२ ॥ ऐसिया[6] पवित्र स्त्रियेचा तेथें । पण घातला प्राणनाथें, । शकुनी हांसोनियां हातें । कपटफांसे ढाळित. ॥ १६३ ॥ फांसे ढाळूनि नरपार्थिवा । डाव जिंकिला विसावा. । हाहाकार झाला तेव्हां । उभयलोकीं सुरवरां. ॥ १६४ ॥ ऋषी पिटिती वक्षस्थळें, । भूपाळ स्पर्शिती कपाळें, । भीष्मद्रोणादिकांचे डोळे । अश्रुपातें डळमळती. ॥१६५॥ लोक शोकें चुरिती कर, । आप्त म्हणती, 'अनर्थ थोर.' । कौरवां आल्हाद अपार । कार्य साधलें म्हणोनी. ॥ १६६ ॥ दुर्योधन कर्ण विकर्ण । शकुनी हांसती दुःशासन । पिटोनि टाळिया दुर्जन । हास्य करिती विनोदें. ॥ १६७ ॥ अंतरीं पावोनियां आनंदा । अंध बोले कुटिलशब्दा[7], । 'जिंकिली धर्माची संपदा । ते अतियत्नें रक्षावी.' ॥ १६८ ॥ बेवीस डावपर्यंत । धर्मराज खेळला द्यूत । त्यांत वीस द्रौपदीसहित । निरोपिले विस्तारें. ॥ १६९ ॥ अरण्यवास अज्ञातवास । दोनी डाव उरले शेष । ते वस्त्रहरणीं व्यासशिष्य[8] । निरोपील भूपातें[9]. ॥ १७० ॥ पवित्रकथानिरूपण । परिसती पवित्रांचे श्रवण[10] । पवित्र मुक्तेश्वराचें वदन । विश्वंभर गुरुनामें. ॥ १७१ ॥

---

१. कृशमध्या. (अ० ६५ श्लो० ३८ टीका; वेदीप्रमाणें कृशमध्या). २. पार्वतीहून. ३. श्रेष्ठ. ४. धर्मादिक पांच बंधूंचें. ५. प्रातःकाळीं. ६. द्रौपदीचें वर्णन महाभारतांत केलें आहे तें असें:–जी ऱ्हस्व व दीर्घ नाहीं, जी अतिकृश अथवा अतिपुष्ट नाहीं, जीचे केश नीलवर्ण आणि कुरळे, शारदोत्पलपत्राक्षी, शारदोत्पलगंधा, शारदोत्पलसेविनी, जी रूपानें लक्ष्मीसमान, रूपसंपत्ति आणि शीलसंपत्ति बायकोची जशी असावी असें पुरुष इच्छितो तशी जीची आहे अशी, सकलगुणसंपन्न, नवऱ्याला अनुकूल, प्रिय भाषण करणारी, धर्मकामार्थसिद्धिसाठीं पुरुषास जशी स्त्री पाहिजे तशी, सर्वांच्या मागून शयन करून सर्वांच्या प्रथम जागृत होणारी, गोपालापासून राजापर्यंत सर्वांच्या कृताकृताची व्यवस्था ठेवणारी, जिचें मुख घर्मबिंदुयुक्त झालें असतां कमलासारखें शोभतें, जिचा मल्लिकापुष्पासारखा सुगंध, वेदीसारखी मध्यभागीं कृश, दीर्घकेशी, ताम्रमुखी, जिच्या आंगावर फार केश नाहींत अशी पांचाली. [अ० ६५ श्लो० ३३-३९.] ७. कपटवाणी. ८. वैशंपायन. ९. जनमेजयातें. १०. कान.

## अध्याय पंधरावा.

**दु**र्योधन [1]म्हणे, ‘गा! **विदु**रा!। [2]जावोनि बोधीं **पां**डवदारा, । आमुची दासी आमुच्या घरा । [3]सामोपचारें आणावी.’ ॥ १ ॥ ऐकोनि **विदुर** चढला कोपा । म्हणे, ‘काय जल्पसी पापरूपा! । बळें पतंग [4]कैंवळी दीपा । तेंवी तूतें झालेंसे. ॥ २ ॥ कैंचें द्यूत? कैंची पैज? । **द्रौ**पदी पांचसिंहांची [5]भाज, । दासी म्हणतां नये लाज । तुज कैसी रे! अपवित्रा! ॥ ३ ॥ आजूनि तरी होईं शहाणा । करी वांचवावयाची सूचना, । **धृ**तराष्ट्राचिया [6]वंशवना । कां दावाग्नी लाविसी?’ ॥४॥ **दु**र्योधन भवंडी नेत्र । [7]म्हणे, ‘हा **पां**डवांचा मित्र.’ । ‘[8]**प्र**तिकामी सारथिपुत्र । पैं सत्वर उठविला. ॥५॥ [9]म्हणे, ‘जाऊनि गृहाआंत । सांगें वर्तला वृत्तांत, । पाचारूनि आणीं येथ । दासी **द्रौ**पदी आमुची. ॥ ६ ॥ सरलें [10]देशादेवीचें वारें । दासी आमुची निजनिर्धारें । गृहा आणोनि बलात्कारें । दासीकामीं योजावी.’ ॥ ७ ॥ येरू प्रवेशोनि [11]सदनीं । म्हणे, ‘परिसें वो! [12]**या**ज्ञसेनी! । **ध**र्में डाव खेळतां [13]पणीं । तुज स्वामिणी! हारविलें. ॥ ८ ॥ पडला दुष्टासीं संबंधू । न चले कोणाचाही शब्दू । सांडूनि हृदयींचा विषादू । सभेसी आलें पाहिजे.’ ॥ ९ ॥ प्रळयवीज तडके शिरीं । कीं डोंगर कोसळे आंगावरी, । तेंवी ऐकुनि घाबरी । **पां**डवपत्नी ते काळीं ॥ १० ॥ म्हणे, ‘ऐकें सारथिपुत्रा! । रजस्वला मी एकवस्त्रा । सभानायकां पवित्रां । **भी**ष्म**द्रो**णां जाणवीं. ॥ ११ ॥ सभेसि नेणें हें अनुचित । म्यांही येऊं नये तेथ । वडील सुहृद सर्व आप्त । असतां ऐसें होऊं नये. ॥ १२ ॥ आणीक एक असे भावो । आधीं जिंकोनि [14]**ध**र्मरावो । मग टाकिला माझा डावो । तोही प्रमाण दिसेना. ॥ १३ ॥ पांचाजणांची मी जाया । पांचाजणीं हारविली काया । तरी संबंध बोलणें वायां । पतिव्रता म्हणोनी.’ ॥ १४ ॥ ऐकोनि **द्रौ**पदीचें वचन । सारथिपुत्र चालिला तेथून । राजसभेमध्यें येऊन । शब्द बोलता जाहला. ॥ १५ ॥ **प्र**तिकामी सभास्थानीं । बोले, ‘**द्रौ**पदी [15]स्त्रीधर्मिणी, । सभेसि बोलाविता हे वाणी । मुखांतूनि न काढावी. ॥ १६ ॥

---

१. अध्याय ६५ श्लोक १ पहा. २. द्रौपदीला. ३. कलह केल्याशिवाय. ४. अध्याय १४ ओंवी ८९ वरील टीपा पहा. ५. भार्या, पत्नी. ६. वंशरूप अरण्याला. (हें रूपकाचें उदाहरण आहे.) ७. हा विदुर. ८. प्रतिकामी हें सारथिपुत्राचें नांव. ९. अध्याय ६७ श्लोक २ पहा. १०. लक्ष्मीचें. ११. गृहांत. १२. हे द्रौपदि! १३. द्यूतीं. १४. अध्याय ६७ श्लोक ७-८ पहा. १५. रजस्वला.

एकवस्त्रा पद्मनेत्री । केंवी बोलावूं राजपुत्री ? । विचारूनि मज पवित्रीं । आज्ञा दीधली पाहिजे.' ॥ १७ ॥ दुर्योधन म्हणे, 'हा नपुंसकू । वाहे पांडवांचा [१]धाकू । न धरी तमोगुणाचा [२]तवकू' । दुःशासना उठविलें. ॥ १८ ॥ म्हणे, '[३]जाऊनि निर्भयचित्तें । द्रौपदी पाचारावी येथें । '[४]नये' म्हणे तरी तुवां तेथें । स्त्रीमर्यादा न धरावी. ॥ १९ ॥ केश कवळूनियां [५]मुष्टी । ओढूनि आणावी गोरटी । तीचिया [६]सतीपणाची राहटी । दाखवूं दृष्टीं जनातें. ॥ २० ॥ मागील पतिव्रता नारी । त्या म्हणे आपल्या किंकरी । आपण पार्वतीचिये सरी । ऐसा गर्व तियेतें. ॥ २१ ॥ शरीर ओढवी पांचांजणां । म्हणवी पवित्र कुंलांगना । आज दाखवीन लोकनयना । वर्तणूक तियेची.' ॥ २२ ॥ ग्रहणीं राहु खवळे गगनीं । कीं व्याघ्र प्रवेशे पशुगोठणीं । तेंवी प्रवेशला सदनीं । दुःशासन दुरात्मा. ॥ २३ ॥ होमशाळेमाजील अन्न । स्पर्शावया धांवे [८]श्वान । तैसा उठिला दुःशासन । पांडवपत्नी आणावया. ॥ २४ ॥ देखूनि मंदाचा आवेशू । द्रौपदी भावी काळपुरुषू । [९]शक्तीअंगीं झगटे [१०]महिषू । तेंवी उभा जवळिके. ॥ २५ ॥ म्हणे, '[११]वहिनी ! [१२]सुकृतमहिमा । तुमचें ऐश्वर्य लाधलें आम्हां । पात्र झालींत दासीधर्मा । पांडवां पाठीं बैसलिया. ॥ २६ ॥ धर्में हारविला डावो । तुम्हां पाचारी [१३]कौरवरावो । सांडूनि संशयाचा भावो । शीघ्र उठिलें पाहिजे.' ॥ २७ ॥ द्रौपदी म्हणे, 'जी ! दुःशासना ! । मी पतिव्रता [१४]पांडवांगना । स्त्रीधर्मिणी एकवसना । केंवी मातें पाचारा? ॥ २८ ॥ तुम्हीं राजे पवित्रगुणी । मानापमानाचे धनी । आगिकें करितां दुष्ट करणी । तुम्ही

---

१. भय. २. जोर, सामर्थ्य, आवेश. ३. अध्याय ६७ श्लोक २५ पहा. ४. येत नाहीं. ५. मूठ. ६. पातिव्रत्याची. ७. कुलशीलसंपन्न स्त्री. ८. कुत्रा. ९. देवीचे अंगाला. १०. महिष नामक असुर. ११. भावाची बायको तिला भगिनीसारखी मानावयाची म्हणून वहिनी असें नांव पडलें. पुष्कळ ठिकाणीं ब आणि व एकमेकांबद्दल येतात. आतां नवऱ्याचे बहिणीस वन्सें म्हणतात त्याची व्युत्पत्ति अशी दिसते कीं, वन्सें हा शब्द भगिनीसम किंवा वहिनीसम यांपासून झाला आहे, कारण तत्सम=तसें, यत्सम=जसें, इत्यादि शब्दांत 'सम्' याचा संक्षेप सें झाला आहे. त्याप्रमाणें वन्सें या शब्दांत 'सें' हा सम् याचा संक्षेप आहे. आणि वन् हा वहिनीचा संक्षेप आहे. देशस्थांत बहुशः वईन्सें म्हणतात यावरून वहिनीसम=वईन्सें=वन्सें झालें असावें. (व्युत्पत्तिप्रदीप-पृष्ठ ४५.) १२. पुण्याचा मोठेपणा. १३. दुर्योधन. १४. पांडवांची अंगना (स्त्री). अंगना=जिचें अंग सुंदर आहे ती स्त्री. अंग शब्दाला 'न' प्राशस्त्यदर्शक प्रत्यय लागून अंगना शब्द झाला आहे.

वर्जिली पाहिजे. ॥ २९ ॥ ज्येष्ठबंधूची [1]अंतुरी । तुम्हांस मान्य सर्वोपरी । स्नेहें गांधारीचिये सरी । मान दीधला पाहिजे.' ॥ ३० ॥ निर्दय [2]म्हणे, 'वो ! वाचाळे ! । ऊठ सत्वर, सांडीं चाळे । ठाकूनि आलें जें कपाळें । भोगिल्यावीण सुटेना. ॥ ३१ ॥ रजस्वला हो [3]शुचिष्मंता । एकवस्त्रा हो वस्त्ररहिता । सभेसि नेल्यावीण सर्वथा । मी तत्वता न सोडीं.' ॥ ३२ ॥ हरिणी सांडोनियां पाशां । पळों पाहे दूरदेशा । तेंवी द्रौपदी [4]राणीवसा । प्राणधाकें संचरे. ॥ ३३ ॥ वृद्धस्त्रियांची दाटी । भयें प्रवेशे [5]गोरटी । तंव लगबगां धांवे पाठीं । दुष्ट कपटी दुरात्मा. ॥ ३४ ॥ हात घालूनियां [6]कुरळीं । आंसडूनि पाडिली पायांतळीं । जैसी उलथे [7]कर्पूरकदळी । मत्त करीनें ताडितां. ॥३५॥ हांक मारितां [8]याज्ञसेनी । कंपे थरारली [9]मेदिनी । खचोन पडों पाहे [10]तरणी । चंद्रतारासहीत. ॥ ३६ ॥ [11]आंदोळला गिरि कैलास । ढळला वैकुंठींचा कळस । [12]देवांगना मानूनि त्रास । शोक करिती आक्रोशें. ॥ ३७ ॥ उमा रमा रेणुका सती । लोपामुद्रा अरुंधती । क्षोभोनि उदक घेती हातीं । शाप मुखें वदावया. ॥ ३८ ॥ शंकरनयनींचा प्रळयाग्नी । उसळोनि स्त्रवों पाहे [13]धरणी । कौरवकुळाचिया काननीं । बीज निर्मूळ करावया. ॥ ३९ ॥ कपिलादिक सिद्ध पुरुष । तयां नावरे अद्भुत [14]रोष । म्हणती, 'क्षमा करील ईश । परी आमुतें न करवे.' ॥ ४० ॥ तयां शांतवी [15]पद्मयोनी, । 'पांडवरक्षक चक्रपाणी । तुम्ही क्षमा करूनि मनीं । कृष्णकौतुक विलोका.' ॥ ४१ ॥ जेंवी व्याघ्रें धरूनि गाये । [16]थारियाप्रती घेऊनि जाये । तेंवी ते आणिली पापियें । राजसभे द्रौपदी. ॥ ४२ ॥ रोदन करितां अधोमुखें । भूमी शिंपिली [17]नेत्रोदकें । संत महंत परम दुःखें । नेत्रकमळें झांकिती. ॥ ४३ ॥ खेद पक्षिया तरुवरा । बैसका भंगिल्या गिरिवरा । रक्तोदकाच्या सागरा । [18]लोटे आला अद्भुत. ॥४४॥ सभेसि आणितां याज्ञसेनी । अश्रुपात सकळां नयनीं । शकुनी कर्ण दुर्योधना मनीं । परमानंद न [19]संठे. ॥ ४५ ॥ मग परस्परें पिटोनि टाळी । हास्य करिती गदारोळी । म्हणती, 'पहा हो ! पांचाळी । रूपलक्षणें नेटकी. ॥४६॥

---

१. स्त्री. २. अध्याय ६७ श्लोक ३४ पहा. ३. शुद्ध, पवित्र. ४. अंतःपुरांत. ५. सुंदरी. ६. केशीं. ७. एक जातीची केळ. हिच्यापासून कापूर उत्पन्न होतो. ८. द्रौपदी. ९. पृथ्वी. १०. सूर्य. ११. कंपित झाला. १२. देवस्त्रिया. १३. पृथ्वीवर. १४. राग, कोप. १५. ब्रह्मदेव. १६. थारा=स्थान. १७. अश्रुपातानें. १८. पूर. १९. न मावे.

गौर जानू कटिं मेखळा । उदरीं त्रि[1]वळी कुच [2]वर्तुळा । नयन [3]घ्राण अधर-प्रवाळा । सुकोमळा साजिरी.' ॥ ४७ ॥ **कर्ण** म्हणे, 'हो! **द्रौ**पदी! । तुटलीस **धर्मा**चे संबंधीं । **दुर्यो**धनाचे राज्यपदीं । तूं स्वामिणी सर्वस्वें.॥४८॥ पट्टमहिषी मुख्य राणी । होऊनि आरुढें [4]अंकासनीं । भोग भोगीं हेमसदनीं । [5]**श**क्रमणीसारिखे.' ॥ ४९ ॥ हे ऐकोनि पापवाणी । पवित्र बोटें घालती [6]कानीं, । म्हणती, 'यातें प्राणहानी । [7]निकट आली जाण पां.' ॥ ५० ॥ क्षोभोनियां **पद्म**नयना । क्रोधदृष्टी **भीमा**र्जुना । अवलोकितां **भी**मसेना । [8]हृदयस्फोट होतसे. ॥ ५१ ॥ रगडोनियां [9]अधर दांत । गदामुष्टी घातला हात । म्हणे, 'हे पापी समस्त । [10]निर्दाळीन येकाळीं. ॥ ५२ ॥ असंख्य [11]कुंजरांचिया [12]थाटीं । एकला सिंह आंगें [13]निवटी, । कीं [14]अजाविकांचिया कोटी । व्याघ्र एकटा [15]विभांडी. ॥ ५३ ॥ तेंवी **कौ**रवांचिया [16]श्रेणी । निर्दाळीन येचक्षणीं, । जेंवी प्रळयीं [17]**शू**ळपाणी । नाश करी विश्वातें.' ॥ ५४ ॥ उसळोनियां [18]**ग**दापाणी । मिसळों पाहे गदाकंदनीं । हें देखोनि आज्ञावचनीं । **धर्म** वारी **भी**मातें. ॥ ५५ ॥ म्हणे, 'क्रोध नावरे तुझिया चित्ता । तरी गदा ओपीं माझिये माथां । परी असत्य दोष **कुं**तीसुता । स्पर्शे ऐसें न करावें. ॥ ५६ ॥ सत्य रक्षावया श्री**रा**में । अरण्य सेविलें [19]**पु**रुषोत्तमें । पिता प्राणें गेलिया, सीमे । नुलंघीच मर्यादा. ॥ ५७ ॥ लटिकें [20]सांच करूनि स्वप्न । राज्य ब्राह्मणा दिधलें दान । तया [21]**ह**रिश्चंद्राचें कथन । ग्रंथकर्ते बोलती. ॥ ५८ ॥ कपोत श-

---

१. तीन ओळी (कंसाच्या). २. वाटोळे. ३. नाक. ४. मांडीवर. ५. इंद्राच्या स्त्रियेसारखे, शचीसारखे. ६. कानांत बोटें घालणें=अभद्र, अपवित्र शब्द न ऐकण्याची व्यवस्था करणें. हा शब्दसमूह कोशकारांनीं पाहण्यासारखा आहे. ७. समीप. ८. हृदयाचा भंग. ९. ओंठ. १०. मारीन. ११. हत्ती. १२. समुदायांत, कळपांत. १३. मारी. १४. शेळ्या आणि मेंढ्या यांच्या. [अजा=शेळी; अवि=मेष.] १५. मारी. १६. पंक्ति. १७. शंकर. १८. ज्याच्या हातांत गदा आहे तो. (भीम.) १९. सकल पुरुषांमध्यें श्रेष्ठ अशा (रामानें). ['पुरुषांमध्यें उत्तम, उत्तम किंवा क्षराक्षराहून । तो पुरुषोत्तम जाणा व्हा धन्य तयास चित्त वाहून.' ॥ २४ ॥ नामार्थदीपिका—पृ० ३.] २०. सत्य. २१. हरिश्चंद्राची कथा मुक्तेश्वरानें स्वतःच वनपर्वांत वर्णिली आहे—अ० ६-१० पहा.

रणागत पातलें । शिबीनें निजमांस छेदिलें, । दधीचीऋषीनें दीधलें । देहदान द्विजातें. ॥ ५९ ॥ पार्वतीचिया प्राणनाथें । सत्वें छळिलें श्रियाळातें । पुत्र वधोनि स्वहस्तें । मांस दीधलें भोजना. ॥ ६० ॥ तैसें येथें अवघड कायी? । विचारूनि तूं आपुल्या हृदयीं । सत्यनिष्ठातें अपायीं । ईश्वर न घाली सर्वथा. ॥ ६१ ॥ द्यूतीं हारविला पण । येथें याचा अन्याय कोण? । धर्मवंतीं नियमवचन । कीर्तीलागीं रक्षावें. ॥ ६२ ॥ बाप शांतिक्षमेचा सिंधू। विचारें वारिले दोघे बंधू । 'साधु साधु' म्हणती साधु । यासी मुकुंद नुपेक्षी. ॥ ६३ ॥ नावेक क्रोधसिंधूचा लोट । न धरवे आवेश उद्भट । म्हणे, 'सहदेवा! हव्यवाट । प्रदीप्त करीं येकाळीं. ॥ ६४ ॥ छेदूनि धर्माचे द्वय हस्त ।

---

१. शिबी–हा सोमवंशीय उशीनर राजाचा ज्येष्ठ पुत्र. या राजाविषयीं दोन कथा महाभारतांत आहेत, त्यांतून पहिलीचा येथें उल्लेख आहे ती अशीः–शिबिराजाची परीक्षा करण्याकरितां इंद्रानें श्येनाचें रूप घेतलें व अग्नीनें कपोताचें रूप घेतलें. नंतर श्येन आपले पाठीस लागला आहे अशा मिशानें कपोत शिबि राजाजवळ आश्रयार्थ आला. त्यास आश्रय मिळाला हें पाहून 'माझा भक्ष्य मला दे' असें श्येन म्हणूं लागला. तेव्हां कपोताचे भारंभार शिबि राजानें आपल्या शरीराचें मांस श्येनास देण्याचें कबूल केलें. परंतु शरीराचा बराच भाग तोडून तराजूंत घातला तरी कपोत जडच येऊं लागला, तेव्हां शिबि स्वतःच पारड्यांत बसला. तें पाहून उभयतां संतुष्ट होऊन आपलीं रूपें प्रगट करून वर देऊन गेले. (महाभारत–वनपर्व–अध्याय १३०-१३१.) याप्रमाणें प्रथम कथा झाली. द्वितीय कथा आहे ती अशीः–या राजाचें सत्व पाहण्यासाठीं ब्रह्मदेव विप्ररूपानें आला आणि त्यानें राजाच्या पुत्राचें (बृहद्गर्भाचें) मांस खावयास मागितलें. राजानें मांस शिजवून तयार केलें, पण विप्र कोठें दिसेना, तेव्हां मांसपात्र मस्तकावर घेऊन राजा विप्राचा शोध करीत फिरूं लागला. तो विप्र राजमंदिरास आग लावीत आहे असें यानें पाहिलें. पण मनांत विकल्प न धरतां राजानें विप्राची प्रार्थना करून 'सिद्ध केलेलें मांस स्वीकारावें' अशी विनंति केली. 'मी तें खात नाहीं, तूंच तें खा' असें प्रत्युत्तर विप्रानें केलें. त्याप्रमाणें राजा तें मांस खाणार तों ब्रह्मदेव प्रसन्न होऊन, स्वरूप प्रकट करून, राजास आशीर्वाद देऊन, त्याचा पुत्र पूर्ववत् सजीव करून अंतर्धान पावला–अशी कथा आहे. (महाभारत–वनपर्व–अध्याय १९४-१९८.) २. दधीचि–हा एक मोठा ऋषि होता. वृत्रासुराशीं इंद्राचें युद्ध चाललें असतां, यानें देवाच्या प्रार्थनेस अनुसरून वज्र करण्यासाठीं आपल्या अस्थि दिल्या. त्या अस्थींचें विश्वकर्म्यानें वज्र केलें, आणि इंद्रानें तें वृत्रासुरावर टाकतांच तो मरण पावला. (महाभारत–वनपर्व–अध्याय १००.) ३. शंकरानें. ४. शिवलीलामृत–अध्याय १४ पहा. ५. संकटीं. ६. प्रतिज्ञावचन. ७. क्षणभर. ८. शूर, मोठा, दांडगा. ९. अग्नि. [अध्याय ६८ श्लो० ६.] मोरोपंत–सभापर्व–अ० ५ आर्या ३६ पहा.

भस्म करीन अग्नीआंत । वर्जितां खेळोनियां द्यूत । महाव्यसनीं पाडिलें. ॥६५॥ राज्यहानी ऐश्वर्यहानी । हा खेद नाहीं माझे मनीं । परी द्रौपदीचे अवलोकनीं । हृदय झालें दुखंड.' ॥ ६६ ॥ गदा उचलितां हातीं । [1]धनंजयें धरिला पुढतीं । [2]म्हणे, 'भीमा! अधर्मपंथीं । चळों नेदीं मानसा. ॥६७॥ गुरु स्वामी वडीलबंधू । पवित्र सात्विक धर्मसिंधू । येणें नेमे गोंविला शब्दू । तोचि प्रमाण आमुतें. ॥ ६८ ॥ लाधलासी बळाची प्रौढी । त्याची काय हेचि जोडी? । धर्मासी मारूनि ब्रह्मांडीं । अपकीर्तिशब्द उरवणें. ॥ ६९ ॥ सत्यसन्मार्गी वर्ततां नर । त्याचा कैवारी जगदीश्वर । त्याचें कार्य [3]शार्ङ्गधर । आपण आंगें संपादी. ॥ ७० ॥ स्वप्नप्राय संसार क्षणिक । लटिकें न साच साधनें ऐक । सत्य धर्म सद्विवेक । साधूनि जाती जाणते. ॥ ७१ ॥ यालागीं वरूनि शांती भाज । मौन्य धरूनि पाहे चोज[6] । तुवां करावें तें काज । ईश्वर करील निर्धारें.' ॥ ७२ ॥ ऐसें अर्जुनें अनुवादोन । विझविला संतापहुँताशन । क्षमा धरूनि भीमसेन । स्वस्थानीं बैसविला. ॥ ७३ ॥ केशीं कवळितां दुःशासनें । झोंके मारितां बेळसत्राणें । द्रौपदी म्हणे, 'व्यथा प्राणें । साहवेना सर्वथा.' ॥ ७४ ॥ रजस्वला हो एकांबरा । ढळतां वक्षःस्थळींच्या पदरा । पाणीतळें पयोधरा । आच्छादूनि आक्रंदे. ॥ ७५ ॥ राजसूययज्ञाच्या शेवटीं । अवभृथस्नानें जे [12]वीरगुंठी । सिंचली ते पापमुष्टी । दुःशासनें धरिलीसे.॥७६॥ [13]झोंटी धरूनि हस्तकें । दुःशासन आंसुडी तवकें, । कृष्णा प्रलापोनि दुःखें । भीष्मद्रोणा विलोकी. ॥ ७७ ॥ म्हणे, 'पांचाचिये वचनीं । पुरुष वरिती [16]पाणिग्रहणीं । तेंवी तुम्हां वडिलांचिये वचनीं । अंगिकारीन मी यातें. ॥७८॥ परी यांचिये प्रबळपीडे । साहों न शकें सभेपुढें । यालागीं साधु हो! वदा

---

१. अर्जुनानें. २. अर्जुन म्हणतो. [अध्याय ६८ श्लो० ७-९.] मोरोपंत–सभापर्व–अ० ५ गीति ३७-४२. काव्यसंग्रह–पृ० ४१ पहा. ३. कृष्ण. ['राहे शार्ङ्ग धनु जयापाशीं जें इंद्रियाद्यहंकार । म्हणऊनि शार्ङ्गधन्वा नाम तया सर्वदा नमस्कार.' ॥९६॥ नामार्थदीपिका–पृ० १११.] ४. ही सत्यप्रशंसा किती तरी प्रगल्भ आणि उदात्त आहे. हा एक नीतिबोधाचा उत्तम मासला आहे. असे प्रगल्भ विचार मुक्तेश्वराच्या काव्यांत कोठें कोठें चमकतात; हें नव्यानें सांगितलें पाहिजे असें नाहीं. या वर्णनास मूळ महाभारतग्रंथांत आधार नसावयाचा, कारण हे खुद्द मुक्तेश्वराच्या मनांतील उद्गार आहेत. ५. भार्या, स्त्री. ६. चमत्कार. ७. अग्नि. ८. द्रौपदीचे केश. ९. जोरानें आणि वेगानें, आवेशानें. १०. एकवस्त्रा. ११. स्तनाला. १२. बळकट गांठ. १३. डोईचे लांब केश. १४. जोरानें. १५. अध्याय ६७ श्लो० ३३ पहा. १६. विवाहांत.

तोंडें । दासी मी होय यथार्थें ? ॥ ७९ ॥ देव ब्राह्मण वेद वन्ही । साक्षी करूनि पिता जननी । कन्या ओपिती पाणिग्रहणीं । वराहातीं स्वधर्मे. ॥८०॥ तेंवी सत्य स्मरोनि वचनें । तुज जिंकिलें दुर्योधनें । हें त्रिसत्य वदा वचनें । पुढें होणार होतसे. ॥ ८१ ॥ स्मरूनियां हृदयवासी । पंचभूतें पवित्र ऋषी । यांतें यथार्थ मानें ऐसी । आज्ञा वदा वडील हो!' ॥ ८२ ॥ भीष्म म्हणे, 'ज्ञानसरिते! । धर्माचें तत्व गहन माते! । नेणवे म्हणोनियां मातें । मौन्य पडिलें बोलतां. ॥ ८३ ॥ त्रैलोक्यराज्य अथवा प्राण । गेलिया धर्म मानी तृण । परी सांडील सत्य वचन । हें सर्वथा घडेना. ॥ ८४ ॥ हा आपुलेनि मुखें म्हणे, । 'तुज जिंकिलें दुर्योधनें'। तेथें आम्हीं वदावीं वचनें । काय कैसीं सांग पां?' ॥ ८५ ॥ द्रोण म्हणे, 'शुभकल्याणी! । देह सांडिल्या पंचप्राणीं । तेथें जैशी न फुटे वाणी । तेंवी मी असें जाण पां.' ॥ ८६ ॥ हें देखोनि वीर विकर्ण । गर्जोनि बोले कोपायमान, । 'शंका सांडोनि सत्य वचन । बोलों कोणी न शकती. ॥ ८७ ॥ आज्ञा देतां हो! न देतां । एक मी बोलेन तुमच्या हिता । कोप मानिती ते सर्वथा । पुण्यपरमार्थी नागवती. ॥ ८८ ॥ द्यूतीं द्रौपदी जिंकिली । हे तों सर्वथा असत्य बोली । ईश्वरानमनें ते वर्तली । करणी न वचे उत्तम. ॥ ८९ ॥ ही निश्चयें अन्यायसभा । मुकली ही उभयलाभा । ईश्वर पावोनियां क्षोभा । बळें अन्याय करवीतसे. ॥ ९० ॥ धृतराष्ट्र सत्वें सांडवला । पुत्रमोहें भ्रमें भुलला । भीष्मही स्वधर्मा भ्रंशला । सत्य साचार न बोले. ॥ ९१ ॥ त्रिवाचा गर्जोनियां हाके । द्रौ-

---

१. अध्याय ६७ श्लोक ३७-४१ पहा. २. हे ज्ञाननदि! ३. धर्माची गति अतिसूक्ष्म आहे, त्याचा निर्णय करतां येत नाहीं, म्हणून प्रश्नाचें उत्तर देण्यास मी समर्थ नाहीं. [अ० ६७ श्लो० ४७-४८.] मोरोपंत–सभापर्व–अध्याय ५ गीति २२-२४ पहा. ४. 'हृदि प्राणो, गुदेऽपानः, समानो नाभिमंडले, । उदानः कंठदेशे स्याद्, व्यानः सर्वशरीरगः ॥ १ ॥ अन्न-प्रवेशनं, मूत्राद्युत्सर्गो, ऽन्नादि-पाचनम्, । भाषणादि, निमेषाश्च, तद्-व्यापाराः क्रमादमी' ॥ २ ॥ हृदयस्थानीं प्राणवायु, मळद्वारीं अपान, बेंबीच्या ठिकाणीं समान, गळ्याच्या ठिकाणीं उदान, आणि सर्व शरीरांत व्यानवायु होय. अन्न गिळणें, मळमूत्र टाकणें, अन्न इत्यादि पचविणें, बोलणें, आणि पापण्या हलविणें हीं पांच अनुक्रमानें त्यांचीं कामें होत. ('नामलिंगानुशासन'–पृष्ठ ८.) ५. विकर्ण हा धृतराष्ट्राचा पुत्र, हा 'नयनिपुणनायक' होता म्हणून दुर्योधनादिकांस प्रिय नसून पांडवांस प्रिय होता. ६. मोरोपंत–सभापर्व–अ० ५ गी० ४५-५३ पहा. ७. अंतरतात, मुकतात. ८. त्यागिला.

पदी जिंकिली हें लंटिकें[1] । जिंकिली म्हणतां पातकें । लिप्त होती निर्धारें. ॥ ९२ ॥ अनंत युगीं अनंत राजे । लावूनि कुळस्त्रियेतें पैजे । द्यूत खेळोनि कोण वोजे । क्षेम कल्याण पावला? ॥ ९३ ॥ ध्यावया समस्तांचे प्राण । द्यूत खेळला **दु**र्योधन । **श**कुनीरूपें हुताशन[2] । **धृ**तराष्ट्रगृहा लागला. ॥ ९४ ॥ नाहीं **द्रौ**पदीसी संबंधू । कुळक्षय बोलतां शब्दू । स्पर्शतां हो अप्रमादु । तें सर्वथा नेणवे.[3]'॥९५॥ ऐकोनि **वि**कर्णाची वाणी । गर्जिन्नल्या संतश्रेणी,[4] । 'धन्य रे! धन्य तुझी जननी। तुज एका प्रसवली.' ॥ ९६ ॥ जयजयकार करूनि सुरीं[5] । पुष्पांजुळी[6] ओपिल्या शिरीं । माथे तुकोनी[7] ऋषेश्वरीं । 'भला रे भला' म्हणती त्या. ॥ ९७ ॥ न्याय बोलतां **वि**कर्ण । अत्यंत क्रोधा चढला **क**र्ण[8] । दक्षिण हस्त उभारून । क्रोधदृष्टीं विलोकी. ॥ ९८ ॥ 'सकळां देखतां सभास्थानीं । हारविली **या**ज्ञसेनी । सकळ ऐश्वर्य जिंकिलें पणीं । धर्मन्यायें **सौ**बळें[9]. ॥ ९९ ॥ तें हा सर्व करूनि निर्फळ । म्हणे, 'असत्यवादी सकळ, । आणीक बोलतां तरी तात्काळ । दंड पावता मजहातें. ॥१००॥ पुरुष म्हणती हारविली । **द्रौ**पदी सत्य दासी झाली। ते हे असत्य करूनि बोली । न्याय सांगे आमुतें. ॥ १०१ ॥ बाळ वडिलातें मूर्ख म्हणत । हाचि मर्यादाभंग येथ । दासी आणितां सभेआंत । दोष कांहीं असेना. ॥ १०२ ॥ एका स्पर्शतां पवित्र गृहिणी[10] । दोघां स्पर्शतां जारिणी । तिघां गुह्य देखतां नयनीं । पण्यांगना[11] बोलिजे. ॥ १०३ ॥ नित्य अनुभवी पंच पुरुष। स्पर्श करितां नाहीं दोष । हरा **पां**डवांचें वांस[12] । नग्न करा पांचही'. ॥ १०४ ॥ ऐसीं ऐकतांचि वचनें । पांचहीजणीं सांडिलीं वंसनें । वेढोनियां वल्कलाजिनें[13] । सभांगणीं बैसले. ॥ १०५ ॥ कर्दळीस्तंभप्राय सुकुमार । सरळ जानू विशाळ सुंदर । **दु**र्योधन कामातुर । **पां**चाळीतें दावितू. ॥१०६॥ पापबुद्धी **दु**र्योधनू । उघडी करूनि दावी जाँनू[14] । गदा उचलोनि **भी**मसेनू ।

---

१. खोटें. २. अग्नि. ३. अध्याय ६८ श्लो० १२-२४ पहा. धर्मराजाचें व्यसनित्व, जितत्व, परप्रवर्तितत्व आणि द्रौपदीचें साधारणत्व या चार कारणांनीं द्रौपदी जित नाहीं असें सिद्ध होतें असें विकर्णाचें भाषण आहे. ['सभ्या! भयं किं भवतां विभाव्य धर्मक्रमं ब्रूत यथार्थमेव । जितेन राज्ञा पणिता जितासौ न स्याद्ध्रुवं पंचवशा हि कृष्णा' ॥ श्रीमदमरचंद्रसूरिप्रणीत बालभारत–सभापर्व–सर्ग ५ श्लो० ४२.] ४. सज्जनांची मंडळी. ५. देवांनीं. ६. पुष्पांची ओंजळ. ७. डोलवून. [मस्तक डोलविणें हें पसंतीचें ज्ञापक आहे.] ८. अध्याय ६८ श्लो० २७-३८ पहा. ९. शकुनीनें. १०. स्त्री, पतिव्रता. ११. वेश्या, वारांगना. १२. वस्त्रें. (अ० ६८ श्लो० ३९.) १३. झाडांच्या सालींचीं वस्त्रें व मृगचर्में. १४. मांडी.

हस्ततुळणा दावीतसे. ॥ १०७ ॥ 'हेचि जानू रणचत्वरीं[1] । चूर्ण करीन गदाप्रहारीं । जैसा क्षोभल्या वज्रधारी[2] । शृंग भंगी पर्वताचें.[3]' ॥ १०८ ॥ हें देखोनि दुराचारी । म्हणे, 'वो द्रुपदाचे कुमरी! । येऊनि बैसें मांडीवरी । होयीं अंतुरी[4] पट्टाची.' ॥ १०९ ॥ पापशब्द पडतां कानीं । हृदयीं धडकला क्रोधाग्नी, । म्हणे, 'दुरात्मिया, ही वाणी । जळो तुझी पापिष्टा! ॥११०॥ प्रळयवीज माथां पडो, । दृष्टी जळोनि जिव्हा झडो, । कायेपासूनि प्राण विघडो, । तात्कालीक पैं तुझा.॥१११॥ भीमाकरीं जे केळवली । गदानोवरी सगुणाथिली। वाग्निश्चयें तुज नेमिली । गोत्र घटित[5] निर्धारें. ॥ ११२ ॥ बाहुलें[6] योजिलें रणतळवट । आयुष्य अवधीचा अंत्रपाट[7] । हातें सारूनि बळी वरिष्ठ । लग्न लावील स्वहातें. ॥ ११३ ॥ रक्तहरिद्रा[8] तनुलेपनी । माथां अक्षता पायपिटणी[9] । स्त्रियांप्रलाप[10] वाद्यध्वनी । सुखसोहळा भोगिसी. ॥ ११४ ॥ ते गदा घेऊनि मांडीवरी । रणमंचकीं[11] निद्रा करीं । प्राण पारखे[12] दवडूनि दुरी । मग एकांतीं[13] पहुडें कां. ॥ ११५ ॥ पुढती जागा नव्हसी कदा.' । ऐकोनि शापोक्तीअनुवादा । दुर्योधन चढला क्रोधा । काळ[14] खवळे ज्यापरी. ॥ ११६॥ म्हणे, 'जिव्हा छेदा शस्त्रें । खंड विखंड करा गात्रें[15] । नग्न करा हिरोनि वस्त्रें । पांचही पुरुषांदेखतां.' ॥ ११७ ॥ दुःशासना प्रेरी वचनीं । म्हणे, 'तूं काय पहासी नयनीं ? । वस्त्र हिरोनि याज्ञसेनी । नग्न दावीं सभेतें.' ॥ ११८ ॥ वाम हस्त तो वेणिये । सव्य सूदला[16] वस्त्रनिरिये । इतुक्यामाजि द्वारावतिये । मनोदूत धाडिला. ॥ ११९ ॥ झाली सर्वांची निराशा । सांडिली आप्तवर्गाची आशा, । म्हणे, 'सोयरिया! द्वारकाधीशा! । कृष्ण! परेशा! मज एक.' ॥ १२० ॥ लाऊनियां नेत्रपातीं । हृदयीं चिंतिली कृष्णमूर्ती । म्हणे, 'धांव धांव गा! श्रीपती! । ये आकांतीं स्वामिया! ॥ १२१ ॥ पडती बहुतांचीं कारणें । करितां बहुतांचें धांवणें, । सर्व सांडोनि मजकारणें । ये आकांतीं[17] पावावें. ॥ १२२ ॥ कृष्णा! मी तंव तुझीच कुमरी । यथार्थ जन्मलें तुझेच

---

१. रणांगणांत. २. इंद्र. ३. इंद्र वज्रानें पर्वतांचा भेद करतो म्हणून त्याला 'गोत्रभिद्' अशी संज्ञा आहे. ४. स्त्री, पट्टमहिषी, मुख्य राणी. ५. वधूवरांच्या जन्मकालावरून ज्योतिःशास्त्रवेद्य जो परस्परांचा अनुकूल भाव आहे असें म्हणतात तें घटित असें समजावें. ६. हें 'रूपक' नामक अलंकाराचें सुंदर उदाहरण आहे. ७. वधूवरांच्या मध्यें विवाहसमयीं जें धरतात तें वस्त्र. ८. रक्तरूप हळद. ९. लाथा मारणें. १० स्त्रियांचे विलाप. ११. रणरूप पलंगावर. १२. परके. १३. रतिसुखाला एकांतवास अनुकूल समजून कवीनें ही योजना केली आहे. १४. यम. १५. अवयव. १६. घातला. १७. संकटीं.

उदरीं, । स्नेहें सुभद्रेचिये सरी[१] । बहिण म्हण मी पाठींची. ॥ १२३ ॥ परी मज येवढें भाग्य कैंचें ? । मी दासी किंकरी साचें[२], । पादुकातळीं मृत्तिकेचे । कण लागले जरी म्हणूं. ॥ १२४ ॥ तेही दुर्लभ सनकादिकां । तेथें मी किती यदुनायका ! । मस्तक ओढवी पादोदका । शंकर आपण निजांगें. ॥ १२५ ॥ पक्षियातें तुझें नाम । ठेवूनि कुंटिणी[३] स्मरे राम । तियेलागीं वैकुंठधाम । वस्तीस तुवां दीधलें. ॥१२६॥ पाय स्पर्शोनियां मुरारी । शिळा[४] केली दिव्य नारी । तिये अहल्येचिये सरी । मज उद्धरीं श्रीरंगा ! ॥ १२७ ॥ सहस्र व्याघ्रांमाजी गाय । सांपडतां जेंवी बोभाय[५] । तेंवी तूतें मोकलिली धाय[६] । कृष्णा ! धांवें म्हणउनी. ॥ १२८ ॥ हरिसी भक्तांचीं संकटें, । सांडिसी दासांचीं दुर्घटें, । तो पुरुषार्थ आजी कोठें । आच्छादिला सांग पां ? ॥ १२९ ॥ सर्वीं सर्वत्र तूं अनंत । जाणसी जीवींचें मनोगत । माझा नकळेचि वृत्तांत । हें काय अज्ञान तुज आलें ? ॥ १३० ॥ कृष्णा !

---

१. सरी=बरोबरी. [मोरोपंत वर्णन करतात–'जीहुनि नसे सुभद्रा तुज बहुमान्या, अकीर्ति हे तीची । धांव दयाब्धे ! होते विश्वांत तुझ्या अकीर्ति हेतीची. ॥' सभापर्व–अ० ५ गी० ७१.] २. खरें. ३. मिथिलापुरींतील पिंगला वेश्या हिनें एक पोपट पाळिला होता. त्याचें नांव तिनें 'राघोबा' ठेविलें होतें. पुढें मरणसमयीं त्या राघोबा पोपटाचा तिला निदिध्यास लागल्यामुळें त्याच्या नामोच्चारानें ती तरली–या कथेचा उल्लेख येथें आहे. [मोरोपंतानें एके ठिकाणीं म्हटलें आहे;–'अभिधान शुकासि तुझें पढवुनियां, मोक्ष पिंगला लाहे,' वेंकटेशप्रार्थना–६३; आनंदतनयकृत काव्यें–गणिकोद्धार, काव्यसंग्रह–पृष्ठ ५५-५६ पहा.] ४. येथें अहल्येच्या कथेकडे कविकटाक्ष आहे. "गौतमपत्नी अहिल्या हिचा इंद्रानें पातिव्रत्यभंग केल्याची कथा रामायणांत व इतर पुराणांतही आहे. परंतु प्राचीन ऋषींनीं पूज्य मानलेल्या देवाधिदेवांवर असला घाणेरडा आरोप करण्यास काय आधार आहे, ह्याचा कोणीच विचार केला नाहीं. वस्तुत: या कथेचें मूळ ऋग्वेदांत येणारा 'अहिल्याजार' हा शब्द होय; व त्याचा अर्थविपर्यास झाल्यानें पुढील कथा उत्पन्न झाली. ऋग्वेदांत 'अहनि लीयमाना' म्हणजे दिवसांत लुप्त होणारी असें उषेला किंवा प्रात:संध्येला पुष्कळ ठिकाणीं विशेषण देण्यांत येतें. व 'तां जरयति नाशयति' म्हणजे आपल्या प्रखर तेजानें संधिप्रकाश नाहींसा करितो तो सूर्य असा 'अहिल्याजार' शब्दाचा अर्थ स्पष्ट आहे. पण पुढें ह्या व्युत्पत्तीचा पौराणिकांस विसर पडला. 'जार' शब्दाचा 'पति' अथवा 'उपपति' असाही क्वचित् अर्थ होतो. कारण तोही स्त्रीचें कौमार्य हरण करितो. तेव्हां 'अहिल्याजार' म्हणजे 'अहिल्या नामक ऋषिपत्नीचा जार' असा अर्थ केला, व इंद्राचें व सूर्याचें तादात्म्य असल्यामुळें तें विशेषण इंद्राकडे लावून दिलें. अर्थात् सूर्याचे सहस्र किरण इंद्राचे सहस्र नेत्र झाले." [ग्रामसंस्था–पृ० ५ टीप ३.] ५. हंबरडा फोडते. ६. धाय मोकलणें=मोठ्या स्वरानें विलाप करणें.

तूंच जनक जननी । वित्त गोत चक्रपाणी ! । तुजवेगळा न दिसे कोणी । मज निर्वाणीं सोइरा. ॥ १३१ ॥ तूंचि गे ! माझी कुळस्वामिणी । मानसतुळजापूरवासिनी । कौरवमहिषासुरमर्दिनी । धांवें धांवें धांवणिया. ॥ १३२ ॥ कौरवसभापाणीथडी । नक्रदुःशासनें घातली आढी, । काया करोनि कडोविकडी । ओढीताडीं पीडियेलें. ॥ १३३ ॥ तयालागीं तूं घालिसी उडी । फेडी दीनाचीं सांकडीं[1] । धांवें पावें गा ! तांतडी[2] । कृपाळुवा गोविंदा ! ॥ १३४ ॥ दुःशासन शंख[3] वहिला । स्मरतां संतोषवेद हारविला । कौरवसागरीं बुडविला । तो कवणातें न काढवे ? ॥ १३५ ॥ मत्स्यरूपिया नारायणा ! । धांवें पावें मधुसूदना ! । विभांडूनि याचिया वचना । समाधान मज द्यावें. ॥ १३६ ॥ माझा स्वधर्ममंदरागिरी । कौरवसमुद्रीं पडिला फेरीं । तया बुडतया उद्धरीं । कांसव होई केशवा[4] ! ॥ १३७ ॥ कांसवदृष्टीं विलोकावें । मातें पोठीसीं[5] घालावें । पाय पोटीं न धरावे । धांवें पावें येकाळीं. ॥ १३८ ॥ माझी लाज हे धरित्री[6] ! । रसातळा नेतो वैरी । यज्ञवराहरूपिया हरी ! । दाढें धरीं प्रतापें. ॥ १३९ ॥ माझा भाव तो प्रल्हाद । निष्ठुरीं गांजितां पावला खेद, । शत्रुअहंकारस्तंभभेद । करूनि प्रगटे नरहरी. ! ॥ १४० ॥ कौरवअहंता महीतळी । वामनरूपिया वनमाळी ! । दाटी त्रिपादपायांतळीं । बळीबंधना ! पावावें. ॥ १४१ ॥ माझा भाव आणी भक्ती । तेची जमदग्निरेणुकासती । कुशब्दशस्त्रीं कौरवदैत्यीं । संत्रासिली अवनिये[7] ! ॥ १४२ ॥ ते निवटूनि धराभारा । फेडीं भार्गवपरशुधरा ! । द्रौपदी सती वसुंधरा । पांडवद्विजा अर्पी कां. ॥ १४३ ॥ लाज हरिली दुःशासनें, । तेचि सीता या रावणें । हरिली ते तुवां रघुनंदनें । प्रतापरुद्रें रक्षावी. ॥ १४४ ॥ आतां कृष्णा ! आठविया । तूंच आ-

---

१. संकट. २. लवकर. ३. शंखासुर. ४. केशव याचा अर्थ असा आहे:—'केशीला मारणारा तो केशव किंवा 'क' (ब्रह्मा) 'अ' (विष्णु) व 'ईश' (महादेव, शंकर) ह्या तीन मूर्ति ज्याच्या तंत्रानें वागतात तो कशव;' अशी श्रीमच्छंकराचार्यांनीं विष्णुसहस्रनामटीकेंत व्युत्पत्ति दिलेली आढळते. "उत्तम केश जयाचे किंवा हरिहरविधीहि वश ज्याला । अथवा केशिनिहंता, यास्तव 'केशव' असें म्हणति त्याला ॥ २३ ॥ [पृ० ३.] सूर्यादिकांत असती, जे अंशू केश ते असति ज्याला । यास्तव सर्वज्ञानीं 'केशव' हें नाम योजिलें त्याला ॥४८॥" [पृ० ७३] [नामार्थदीपिका.] ५. पाठीशीं घालणें=संरक्षण करणें, आधार देणें. ६. हे धरित्रि ! ७. पृथ्वी.

मुच्या विसाविया । कौरवअहंकारकाळिया । पायातळीं रगडीं कां? ॥१४५॥ बौद्धरूपिया जगदीशा! । कौरवीं मांडिली माझी हिंसा । करुणाकरा! कृष्णा! परेशा! । प्राणरक्षक मज होईं. ॥ १४६ ॥ सांडूनि निष्ठुरतेचें वसन । दिशा वेढीं काय करून । मातें न देखतां नग्न । वस्त्रप्रद मज होईं. ॥ १४७ ॥ वेळंघोनि प्रतापाचा घोडा । परजीं सुदर्शन काळखंडा । कौरवम्लेंच्छ वधूनि होडा । निष्कलंक मज करीं. ॥ १४८ ॥ कौरवदुरुक्ती शिळाधारीं । मेघवृष्टी होतसे भारी । अचळकृपेचा गोवर्धनगिरी । मजवर धरीं गिरिधरा! ॥ १४९ ॥ माझें मानससरोवर । प्रेमकेल्हारीं सुमनहार । राजहंसरुक्मिणीवर । सदा स्वानंदें क्रीडतु. ॥ १५० ॥ आजी गेलास कवणे ठाया? । मुक्त मुक्ताफळें चरावया । गोविलासि म्हणोनि माया । माझी तुवां सांडिली! ॥ १५१ ॥ वृंदावनींचे विहारिणी । कृष्णसखिये सांगातिणी! । धांव पाव मायबहिणी! । वेळ न लावीं स्नेहाळे! ॥ १५२ ॥ सगुणउपासकाचे पुजे । कीं योगियांचे समाधिशेजे । विश्रामलीस म्हणोनि माझें । स्मरण तूतें नव्हेची? ॥ १५३ ॥ तेंवी धांवा करितां तुझा । हृदयस्फोट झाला माझा, । कंठ शोषला अधोक्षजा! । तुज बाहातां आकांतीं. ॥ १५४ ॥ तरी जागी नोव्हेसी माये! । सांग आतां मी करूं काये? । प्राण धाडूं द्वारावतीये । प्रेत ओपूं पापिया? ॥ १५५ ॥ सर्वीं सर्वत्र तुझे कान । सर्वदेखणे तुझे नयन, । आज नायकसी वचन । एवढें व्यसन न देखसी? ॥ १५६ ॥ तुझें व्यापकत्व काय झालें? । माझें हृदय कां सांडिलें? । एवढें निर्वाण कां मांडिलें? । अहो! कृष्णे! जननिये! ॥ १५७ ॥ कृष्णा! तूं स्नेहाळ माउली । तूंचि कृपेची साउली । तुवां उपेक्षा जरी केली । मग जिणें कायसें? ॥ १५८ ॥ म्हणोनि अपराध पाप बहुत । तेणें झालीस दयारहित । तुझेनि नामें एकें त्वरित । पर्वत जळती पापाचे. ॥ १५९ ॥ देखोनि सहस्रनामस्तोत्र । जिव्हा केली पुस्तकपत्र । यालागीं भक्तातुल्य पवित्र । भुवनत्रयीं असेना. ॥ १६० ॥ नाम घेतां तुझी मूर्ती । उभी ठाके स्मरे त्याप्रती । ते तुझी ब्रीदावळी श्री-

---

१. यमुनेंत दंडिलेला कालियनामक सर्प. २. चढोनी. ३. शस्त्रा. ४. होडा=हुंडा=सशृंग पशु. ५. कमळ. ६. पुष्पांचा हार. ७. ज्यांचे चंचुचरण लोहित असून जे शुभ्र हंस त्यांस राजहंस म्हणतात. ८. सोबतिणी. ९. संकट. १०. निर्वाण=संकटसमय, अंत, शेवट ११. यशाची पंक्ति.

पती ! । गळोनि पडली केउती ? ॥ १६१ ॥ वस्त्रें हिरोनियां अवकळा । येथें झालिया गोपाळा ! । तुझे पाय याचि डोळां । कोण्या मुखें विलोकूं ?' ॥ १६२ ॥ ऐसा द्रौपदीमुखयंत्रींचा । यंत्रगोळा उसळला साचा । करुणातेजें सुतेजाचा । बाळभानु ज्यापरी. ॥ १६३ ॥ तो झगटोनि कृष्णश्रवणीं । आदळला हृदयभुवनीं । तेणें सुखनिद्रेचिये सदनीं । जागरोनी खडतरला. ॥ १६४ ॥ निर्गुणद्वारकापुरपाटणीं । निर्विकल्पतरुउद्यानीं । ध्यान स्वरूपीं रत्नसदनीं । शेजे मिरवे समाधी. ॥ १६५ ॥ वैराग्यवसंताचें स्थान । चिन्मय प्रकाश दैदीप्यमान, । श्रीकृष्णस्वानंदाचें सदन । जैंवी कां मन शिवाचें. ॥ १६६ ॥ मंगळाचें मंगळागार । सुकृततरूचा सुखागार । मुक्तिदासी राखिती द्वार । तें मंदीर हरीचें. ॥ १६७ ॥ शुद्धसत्वाची हंसतुळिका । उन्मनी अरुवार क्षीरोदका, । घनचैतन्य सुमनकलिका । अरळ निगुती बाणलें. ॥ १६८ ॥ तेथें सुखनिद्राविश्रामें । पहुडे श्रीकृष्ण आरामें, । शांतीरुक्मिणी पायपद्में । संवाहितां विश्रामली. ॥ १६९ ॥ आरक्तता चरणतळीं । तो रंग बाणला पाणियुगुळीं । अरुणसंध्यारागमेळीं । जो मीनला हस्तकीं. ॥ १७० ॥ ते रूपप्रकाश नयनीं । दिसती ब्रह्मांडाचिया श्रेणी । तें ऐश्वर्य देखोनि नयनीं । देहभाव तटस्थ. ॥ १७१ ॥ तेथें क्षीराब्धिशेषशयन । स्वइच्छा पहुडे नारायण । लक्ष्मी रूपें आपण । चरणसेवा करीतसे. ॥ १७२ ॥ असो; लक्षितां कृष्णचरणातें । चरणसेवा करिती तीर्थें, । योगियांचीं अचळ चित्तें । क्षेत्रसंन्यासें राहिलीं. ॥ १७३ ॥ अंगीं चंदनसुपरिमळें । तळवा लोपूनि पाणितळें, । मर्दन करितां कुचयुगुळें । सुखानंदें निवतसे. ॥ १७४ ॥ इंद्रगोपवर्णीवास । चांदवा दावी सुप्रकाश । झळकती मुक्ताफळांचे घोंस । कृत्तिकापुंजासारिखे. ॥ १७५ ॥ उद्धव भक्तराज जवळा । अवलोकून चरणकमळा । विश्वरूप घनसांवळा । अभेदभक्ती अर्चितु. ॥ १७६ ॥ सात्विक अक्रूर करी गहन । विनयतेचा वालव्यंजन । सर्वभूतदयेचा पवन । देवअंगा जाणवितू. ॥ १७७ ॥ ब्रह्मवीणा ब्रह्मकुमर । घेऊनि नाद ब्रह्माकार । निशब्दीं गायन सुस्वर । ब्रह्मानंदा रिझवित. ॥ १७८ ॥

---

१. उदयकालींचा सूर्य. २. खडबडून. उठला. ३. पाटण=नगर. ४. बागेंत. ५. मार्दितां. ६. लाली. ७. हस्तद्वयांत. ८. मिश्रित झाला. ९. विंझणा, पंखा. १०. नारदाच्या वीणेला 'महती' असें नांव आहे. तुंबरुवीणा=कलावती; विश्वावसुवीणा=बृहती; सरस्वतीवीणा=कच्छपी. ११. नारद.

निजभाव एकनिष्ठें । **गरुड** सर्वदा सादर तिष्ठे । तंव **द्रौ**पदीकरुणेचा झगटे । नाद श्रवणीं पडियला. ॥ १७९ ॥ कीं ते सुशब्दराजहंसी । उड्डाण करूनि चिदाकाशीं । रिघोनि **कृ**ष्णाच्या मानसीं । निद्रामृत[1] डेहुळलें[2]. ॥ १८० ॥ कीं **द्रौ**पदीवाक्चापींचे बाण । करुणातेजें अतितीक्ष्ण । **कृ**ष्णश्रवणीं रिघोनि पूर्ण । हृदयवर्मी खडतरले. ॥ १८१ ॥ जागृत होतां **ज**नार्दन । आंसुडिला दक्षिण[3] चरण, । **रु**क्मिणी म्हणे, 'हें निधान । कां हातींचें निष्टलें?' ॥१८२॥ मुखावरूनि पीतांबर । काढूनि उठला जगदीश्वर, । पाठी मोकळे कबरीभार । दिव्य सुमनें सांडिती. ॥ १८३ ॥ पुसिला कस्तूरीमळवट । कौस्तुभमाळा सांवरी नीट, । गहिंवरें दाटलासे कंठ । दीनदयाळ म्हणोनी. ॥ १८४ ॥ विश्व अवलोकी विश्वदेखणा । तंव गांजिली देखिली **पां**डवांगना । **दु**ःशासन झोंबे वसना[4] । निरी हातें आसुडित. ॥ १८५ ॥ बाप भक्तांची आवडी मोठी । लगबग धांविन्नला जगजेठी । मंदट म्हणोनि परते लोटी । मना आणी **गरु**-डातें. ॥ १८६ ॥ मन पवन **गरुड** तिघे । सत्वर करती पाठिलाग । तरी नाटोपे **श्री**रंग । टाकोटाकीं जातसे. ॥ १८७ ॥ ऐसिये तांतडीं धांविन्नला । **द्रौ**पदीपाठीं उभा ठेला[5], । कीं हृदयींच प्रगटला । पाठिराखा कैवारी. ॥ १८८ ॥ आला गेला वाटे भक्तां । ज्ञानी म्हणती येथेंचि होता । विश्व-व्यापका अनंता । येणें जाणें असेना. ॥ १८९ ॥ सर्वांतरीं जया असणें । तयालागींच धांवा करणें । प्राणी रहाटे तें जाणें । सर्व करणें मनइच्छा. ॥ १९० ॥ **नारद** पुसे **भी**मकी[6]प्रती, । 'लगबग धांविन्नला **श्री**पती । क-वणे काजातें गुणवती! । जाणसी कीं सुजाणे!' ॥ १९१ ॥ येरी म्हणे, 'जी! निजनिर्वाडें[7] । पडिलें **द्रौ**पदीचें सांकडें । स्नेहें भगिनीचिया चाडें । घाबीरपणें धाविन्नला. ॥ १९२ ॥ अपार प्रेमाचें पिसें । न म्हणे थोर सान[8] ऐसें । नाम स्मरतां अति आवेशें । धांवोनि जाय त्याप्रती. ॥ १९३ ॥ सा-धुजनाचें प्रतिपाळण । सेवकांचें संरक्षण । करावया दुष्टांसी दंडण । नाना अवतार[9] घेतसे. ॥ १९४ ॥ **पां**डवांचे अति आवडी । धांवोनि गेला हो!

---

१. निद्रारूप उदक. २. गढूळ झालें. ३. उजवा. ४. लुगड्याला. ५. राहिला. ६. रु-क्मिणीला. ७. निश्चयें. ८. लहान. ९. 'अवतार' कोणाला म्हणावें हें **पं**तांनीं पुढील अर्थात सांगितलें आहे:–'वर तेज गुण वसे ज्या स्थानीं 'अवतार' तो असें समज. ॥' [मंत्रभागवत–द्वितीयस्कंध–गीति ३८.]

तांतडी.' । असो. अनाथबंधु याप्रौढी । द्रौपदीपाठीं ठाकला. ॥ १९५ ॥ झणी आंसुडील पेटोळा । होईल भगिनीची अवकळा । ऐसिया काकुलती कळवळा । कृष्ण कृपाळू अपार. ॥ १९६ ॥ कैवारियाच्या उभय करीं । पीतांबर टाकिला द्रौपदीवरी । वीज तळपे तयापरी । सभेवरी उजेड. ॥ १९७ ॥ तों सुगंध न संठे गगनोदरीं । आल्हादली द्रुपदकुमरी । म्हणे, 'मज पावला मुरारी । आतां न भीं कळिकाळा.' ॥ १९८ ॥ पीतांबर देखोनि दृष्टी । धर्मा जाणवलें पोटीं । अनुजां खूण दाखवी दृष्टी । म्हणे, 'जगजेठी पावला.' ॥ १९९ ॥ विदुरें देखोनि कृष्णवसन । अश्रुधारा स्रवती नयन । अष्टौ भावें दाटला पूर्ण । मन निमग्न श्रीकृष्णीं. ॥ २०० ॥ भीष्म बोधिला हृदयकमळीं । म्हणे, 'ईस पावला वनमाळी । आज तोंडें होती काळीं । कौरवांचीं निर्धारें.' ॥ २०१ ॥ तंव दुर्योधन चढला क्रोधा । म्हणे, 'रे! दुःशासना! मंदा! । आजून पापिष्ठा! मंदा! । नग्न हातें न करिसी?' ॥ २०२ ॥ तंव तेणें आंसुडिलें वसन । आंत देखे कनकवसन । तळीं आच्छादून चरण । भाळ मस्तक झांकिलें. ॥ २०३ ॥ म्हणती, 'न कळे स्त्रीचरित्र । नेसली वस्त्राआड वस्त्र.' । तेंही फेडिलें तंव विचित्र । किती निघती पाहों पां. ॥ २०४ ॥ रागें फेडिलें तें अंशुक । तंव माझारीं देखें क्षीरोदक । तेंही फेडितां कौतुक । जासवन तयातळीं. ॥ २०५ ॥ तेंही आंसुडितां वेगीं । देखे दाळिंबीकुसुमरंगी, । तया आंतूनि झगमगी । शुद्धरजत पांटाऊं. ॥ २०६ ॥ तेंही फेडी अपवित्र । तंव माझारीं देखे तगटीवस्त्र । जडीत पालवीं विचित्र । हंसमयूरें रेखिलें. ॥ २०७ ॥ हांवे फेडी दुःशासन । रागें अधर चावी दशन । उभयहस्तें प्रसादवसन । लगबगीं आंसुडीत. ॥ २०८ ॥ सभा झाली लिखितचित्र । पातीं ढाळूं विसरले नेत्र । देखती वस्त्राहूनि वस्त्र । मोलोंगळें आभासा. ॥ २०९ ॥ एक पलाश कुसुमवर्णी । सेंदुर कन्हेर गुंजावर्णी । रातोत्पळें कमळवर्णी । माणीकवर्णी पट्टकूळें.॥२१०॥ पंचकेशरपांजणीचें । सुवर्णकेतकीदळरंगाचें । तमाल रसदळवर्णाचें । पंचपदराचीं पाडलीं. ॥ २११ ॥ नीलोत्पलशुकरंगाचे । दुर्वा अतसीपुष्परंगाचे । ऐसी नानापुष्पयातीचे । कारले अपार निघाले. ॥ २१२ ॥ एक मधुकर-

१. उभा राहिला. २. पीतांबर. ३. पाणउतारा, अपमान. ४. चकाके, चमके. ५. न मावे. ६. आकाशांत. ७. सर्वांत ज्येष्ठ असा (अत्यंत बलवान् असा कृष्ण). ८. वाहती. ९. वस्त्र. १०. पांढरें पातळ. ११. बायकांचा पीतांबर. १२. दांत. १३. लिहिलेल्या चित्रासारखी तटस्थ. १४. किमतीनें श्रेष्ठ. १५. उंच वस्त्रें. १६. जातीचें.

वर्णाचें काळें । कंठीं कडलग सोनसळें । पालवी खिळिलीं मुक्ताफळें । वाटोगरा सारिखीं. ॥ २१३ ॥ इंद्रनीळ जांबुळवर्णी । काळें कोकिळ कस्तूरीवर्णी । पदरीं पद्मरागाचे मणी । रत्नकिरणी माणिकें. ॥ २१४ ॥ दुग्धसमुद्रीं ओप दीधली । चंद्रमंडळें सावन केली । तारकाचूर्णें वरी घोळिलीं । जेंवी अभ्रकें झळकती. ॥ २१५ ॥ काश्मीरवर्णे कल्हाईत । कर्दळीगर्भाऐसे श्वेत । क्षीरवर्णी शंकेरहित । वस्त्रें अपार निघालीं. ॥ २१६ ॥ धत्तूरवर्णी पुंडरीकें । शंखवर्णी रुद्र अंशुकें । रौप्यतगटाऐसीं चोखें । हंसढवळीं घमघमिती. ॥ २१७ ॥ सुवर्णतगटी इंद्रगोप । माणिक्यरंगीं रंगलीं अमुप । अष्टदळें दाविती ओप । मौल्यआगळीं वरौतें. ॥ २१८ ॥ चित्रवनखुली कुलडिया । कारले कल्हारे चौकडिया । भरीत साडी चुनडिया । नवसा सेकुसुंबी. ॥२१९॥ मांजिष्ट भोजिष्ट धारिवट । गेटमजातीचे पट निधोट । गोदातटींचे शुद्धवट । चंद्रकिरणासारिखे. ॥ २२० ॥ मुगी पोफळी लाजीवळें । सेवंती बोजाणी सोज्वळें । निकोप तापेचीं पातळें । अतिमवाळें शोभती. ॥ २२१ ॥ अनर्घ्यें कनक पत्रवेलीचीं । विचित्र त्रिमली फुल्यांचीं । मध्येंचि मालती कळ्यांचीं । कृष्णपाचूचीं सांवळीं. ॥ २२२ ॥ बोटधारिया दुधारें । त्रिमिर दुतारे शेलारें । कळवीसुत दहातारें । वैरागराचीं वरी तोंडें. ॥ २२३ ॥ गंगासागरीं चंद्रकाळा । तेजें लोपवी सुवर्णकमळा । नवविधरत्नाचियाकीळा । एकएका सुवस्त्रीं. ॥ २२४ ॥ तैलंग त्रिगुण मल्याणीचीं । सिंहल कोशळवैदर्भींचीं । गौड गुर्जर बंगालीचीं । बहुवर्णाचीं सांवुलीं. ॥ २२५ ॥ सप्तद्वीपवतीचीं वस्त्रें । छपन्नदेशींचीं विचित्रें । कृष्णहस्तींचीं पवित्रें । पर्वतप्राय पडियलीं. ॥ २२६ ॥ विष्णु शंकर सहस्रनामें । रेखिलीं ऐसीं वसनोत्तमें । दृष्टी देखतां विदुरभीष्में । अत्यादरें लक्षिजे. ॥ २२७ ॥ मत्स्य कूर्म वराहव्यक्ती । नरसिंह वामन भार्गवमूर्ती । राम कृष्ण बौद्ध कलंकी । दशरूपांचीं पट्टकूळें. ॥ २२८ ॥ मेरु पृथ्वी द्वीपें खंडें । स्वर्ग पाताळ निवाडें । भूगोल

---

१. मृदु वस्त्रें. २. हें अनेक जातींच्या आणि रंगांच्या वस्त्रांचें वर्णन शोधक पुरुषांस फार उपयुक्त आहे. सांप्रत स्त्रीवेशपरिधानमीमांसा करणारांनीं प्राचीनकाळीं, निदान मुक्तेश्वरकविराजाच्या काळीं, कोणतीं वस्त्रें कोठें होत होतीं व तीं कशा प्रकारचीं होतीं याचा शोध लावण्यास हा सभापर्वांतील लेख कितीसा उपयुक्त होतो हें पहावें. ३. निधोट=परिपूर्ण. ४. अत्यंत मृदु. ५. हिऱ्यांचीं. ६. नऊ प्रकारचीं रत्नें. (पृ० ११ टीप ४ पहा.) ७. लुगडीं. ८. उत्तम वस्त्रें. ९. पाटावें.

सप्तांकित उदंडें । रेखीत वस्त्रें निघालीं. ॥ २२९ ॥ शंकर पार्वती नंदिकेश्वर । गंगा गणेश कु[1]मारवर । रेखिला कैलास गिरिवर । ऐसीं वस्त्रें निघालीं. ॥ २३० ॥ गोपी गोपाळ वत्सें धेनु । यमुना गोकुळ गोवर्धनु । वृंदावनीं वाजवी वेणु । राधिकारमणु लिहिलासे. ॥ २३१ ॥ भक्तसाह्या पातले तेथें । वस्त्रीं दाखवी संकेतें । नेणोनियां भ्रमातें । वस्त्रशोभा भूलले. ॥ २३२ ॥ शंख चक्र गदा पद्मीं । ठसे उमटले वसनोत्तमीं । भारती पडतील ते संग्रामीं । भविष्य चित्रें दाखवीत. ॥ २३३ ॥ महानुभाव बैसले ध्यानीं । योगी चौऱ्यांशी आसनीं । तपश्चर्या करिती मुनी । रेखीत वस्त्रें निघालीं. ॥ २३४ ॥ बाप वेव्हारा चक्रपाणी । आणिल्या पेटारिया भरोनी । स्नेहें बुजाविली बहिणी । विटंबिलें वैरियां. ॥ २३५ ॥ गौरवूनि पांडववनिता । का[2]ळिम आणिला वैरियां माथां । अंगुष्ठ तोही न दिसे रि[3]तां । तेथें मुख केउतें ? ॥ २३६ ॥ ग्राहक देखोनि प्रचंड । सोडिलें ब्रह्मांडींचें दिंड । वस्त्रें ओपितां उदंड । ले[4]खा शेषा न करवे. ॥ २३७ ॥ वैकुंठराज्यपेठींचा चाटा । मोकली वस्त्रांचिया मोटा । द्रौपदी दुःशासनभाटा । वोंवाळणी देतसे. ॥ २३८ ॥ दे[5]वें नेसवी अनंतहस्तीं । दोंभुजांनीं फेडील किती ? । मंदली दुःशासनाची मती । वस्त्रसंपत्ती अनुमानें. ॥ २३९ ॥ गळाला दुर्जनाचा त[6]वक । वस्त्रें गणितां न करवे लेख[7] । उघडें न पडे अंगुष्ठ नख । न दिसे मुख अपवित्रा. ॥ २४० ॥ [8]प्रावरणाचा पीतांबर । शेवटीं नेसवी जगदीश्वर । तेजें ग्रीष्मींचा दि[9]नकर । किंवा वीज प्रळयींची. ॥ २४१ ॥ म्हणे, 'यासी लावितां हात । करीन दुष्टांचा निः[10]पात । सुदर्शन धगधगीत । हातीं वसवी तांतडी. ॥ २४२ ॥ नेत्रीं धडके वैश्वा[11]नर । रक्तदशनीं बिंबाधर । चावूनियां ठु[12]की शिर । कौरवांतें लक्षूनी. ॥ २४३ ॥ हें देखोनि विदुरभक्तें । दाविता झाला कुरुवृद्धातें[13], । भीष्म म्हणे, 'अभाग्यातें । उमज आजूनि न पडेची.' ॥ २४४ ॥ मग म्हणे, 'रे ! अविचारखाणी ! । काय निर्वाण पाहसी आ-

---

१. कार्तिकेय. २. लज्जा. ३. रिकामा, उघडा. ४. गणना. ५. 'अनंत नेसवी अनंत हस्तें चिर जलदिनें.' [भिक्षुकवि.] ६. गर्व, मद. ७. गणना. या प्रसंगाचें वर्णन 'बालभारतां'त असें आहे:—'यथा यथासौ वसनं चकर्ष तथा तथा सूज्ज्वलमाविरासीत् । नवं नवं तत्र सुवृत्तभाजि जवेन वाप्यामिव वारिहारि ॥' [श्रीमदमरचंद्रविरचित बालभारत—सभापर्व—सर्ग ५ श्लो० ४९—काव्यमाला—पृ० १७१.] ८. 'नेसवि प्रावर्णिचा पीतांबर दिव्य तसें जें जुनें.' [भिक्षुकवि.] ९. सूर्य. १०. नाश, विध्वंस. ११. अग्नि. १२. डोलवी. १३. धृतराष्ट्रातें.

जूनी ? । ब्रह्मांडदाहो येचक्षणीं । होता समय पातला. ॥ २४५ ॥ होईं प-
रता दुःशासना ! । नातळें द्रौपदीच्या वसना । आत्मघातक्रिया दुर्जना ।
विष्णुमहिमा नेणवे.' ॥ २४६ ॥ दचक बैसला दुर्योधना, । हातें वारी दुः-
शासना । म्हणे, 'हे वस्त्रभार नाना । भांडारगृहीं ठेवावे.' ॥ २४७ ॥ तंव
एकही न दिसे तेथें । जेंवि कां नि[1]धान अभाग्यातें । किंवा विश्वब्रह्म अज्ञातें ।
भेदभ्रमें लक्षेना. ॥ २४८ ॥ तंव जं[2]बूकउलूकांचे शब्द । य[3]ज्ञशाळे उठिले
विविध । अ[4]वचिन्हें म्हणती ज्यो[5]तिर्विद । महाअरिष्ट दिसताहे. ॥ २४९ ॥
सभानायकीं नगरजनीं । स्तवनीं स्तविली याज्ञसेनी । कौरवांतें निंदावचनीं ।
शाप वदती समस्त. ॥ २५० ॥ कालाग्निरुद्रातुल्य उद्भट । भीमा भरला
क्रोध [6]अचाट । रागें स्फुरती [7]अधरपुट । दांत खात करकरां. ॥ २५१ ॥
[8]म्हणे, 'प[9]रिसा प्रश्नोत्तरा । बोलिला बोल न करीं खरा । तरी [10]अधोगती पि-
तरां । सप्तपूर्वजां माझिया. ॥ २५२ ॥ जेणें स्पर्शली पांचाळी । ते भुजा
उपटूनियां समूळीं । दुःशासनाचे वक्षःस्थळीं । छिद्र पाडीन निघातें. ॥२५३॥
न करीं र[11]क्तोदकप्राशन । तरी जीतचि मी प्रेत जाण । भरतादिकां अधःप-
तन । हो दुसरें न म्हणतसे.' ॥ २५४ ॥ तेथें गजबजली राजश्रेणी । रक्त-
वर्षाव देखती नयनीं । रुदितश्वानशंखध्वनी । रा[12]जसदनीं उदेले. ॥ २५५ ॥
हृदय पिटोनि उभयकरीं । बोले आक्रोशें गांधारी, । 'दुर्योधना ! गदाप्रहारीं ।
नि[13]र्मोलासी नि[14]र्धारें.' ॥ २५६ ॥ भय पावोनि मग अपार । प्रज्ञाचक्षु राजे-
श्वर । मधुरोत्तरीं मनोहर । पांडवांचें करीतसे.॥२५७॥पाचारूनि पांचहीजण ।
आदरें दीधलें आलिंगन, । [15]म्हणे, 'धर्मा ! तुझें मन । कपटरहित मी जाणें.
॥ २५८ ॥ मजलागीं होऊनि स्नेहाळ । नाठवीं मत्पुत्रांचें [16]कौटिल्य, । तुमची
राज्यलक्ष्मी अचळ । असो तुम्हांतें अक्षयी.' ॥ २५९ ॥ पाचारूनि पांचाळी ।
मौळि स्पर्शिलें निजकरतळीं, । म्हणे, 'पवित्रे ! हृदयकमळीं । व्यथा कांहीं न धरावी.

---

१. ठेव. २. कोल्हे व घुबड यांचे शब्द. ३. मोरोपंत-सभापर्व अ० ६ गीति ३३ पहा. ४. अपशकुन. ५. ज्योतिषी. ६. फार. ७. अधरोष्ठ. ८. अ० ७१ श्लो० १४ पहा. ९. ऐका. १०. नरकवास. ११. या प्रसंगाचें वर्णन असें आहेः—'दुःशासनस्यास्य विदार्य वक्षः पिबामि नासृग्चुलुकत्रयं चेत् । लिप्ये तदस्यैव दुराशयस्य पापेन साध्वीपरितापजेन ॥' [बालभारत–स० ५ श्लो० ५२.] १२. राजवाड्यांत. १३. मरण पावलास. १४. निश्चयें. १५. सभापर्व–अ० ७१ श्लो० २५-२६. १६. 'कौटाळ' असा अन्य पाठ आहे.

॥२६०॥ स्नुषांमाजी मुख्य राणी। कौरवकुलतारिणी। तुझे पवित्रनिर्मळगुणीं। मी संतुष्ट सर्वदा. ॥ २६१ ॥ इच्छा जे असेल मानसीं। तो वर मागें मजपाशीं। सकळ ऐश्वर्य गुणैकराशी!। तुझेंचि असे जाण पां. ॥ २६२ ॥ द्रौपदी म्हणे, 'जी! मामा!। कुलपालका! कल्पद्रुमा!। पांचही भ्रतार दासनामा-। पासूनि मुक्त करावे. ॥ २६३ ॥ प्रतिविंध्यादि माझे पुत्र। हे न म्हणावे दासीपुत्र। हा मज देऊनि प्रथम वर। गौरविलें पाहिजे.' ॥ २६४ ॥ 'दिधलें' म्हणोनि बोले राजा,। 'आणीक वर मागें दुजा.'। विचारूनि द्रुपदात्मजा। वाक्य बोले वडिलासी. ॥ २६५ ॥ 'धनुष्यबाणसहीत रथ। द्यूतपणापासूनि मुक्त। पांच पांडव पृथ्वीआंत। स्वेच्छासक्ते विचरोत.'॥२६६॥ 'अवश्य' म्हणोनि कौरवनाथ। तृतीय वर माग वो! त्वरित.'। येरी म्हणे, 'बहुत स्वार्थ। आतां न करीं सर्वथा. ॥ २६७ ॥ वर एक वैश्यवर्णातें। वरद्वय बोलिजे क्षत्रियांतें। वरत्रय क्षत्रियांतें। ब्राह्मणातें शत वर. ॥ २६८ ॥ यालागीं मागणें पुरे आतां' । म्हणोनि चरणीं ठेविला माथा. । राजा म्हणे, 'सौभाग्यसरिता!। अक्षयी जळ प्रवाहो.' ॥२६९॥ उपहासोनि राधेय म्हणे,। 'पुरुषीं वाहतां पुरुषचिन्हें। शक्ती क्षीण झाली जिणें। स्त्रीचेनि उपायें. ॥ २७० ॥ पुरुष वाग्बंधनीं पडले। ते स्त्रीप्रयत्नें मुक्त झाले। ऐशी कीर्ती जोडोनि झाले। तेचि धन्य संसारीं. ॥ २७१ ॥ द्रौपदी नोव्हे हे नौका खरी। अप्रतिष्ठेच्या समुद्रोदरीं। पुरुष पडिले ते निर्धारीं। जिणें अवलीळा तारिले. ॥ २७२ ॥ पुरुष झालिया निर्व्यापारी। जारकर्मा प्रवर्ते नारी। तेणें पुरुषातें पोसी घरीं। हेंही तैसें दिसताहे.' ॥ २७३ ॥ अर्जुन म्हणे, 'रे

---

१. स्नुषा=सून. २. सभापर्व–अ० ७१ श्लो० २७ पहा. ३. सभापर्व–अध्याय ७१ श्लो० २८-३० पहा. ४. हे मामाजी! ५. धर्माच्या पुत्राचें नांव प्रतिविंध्य. ६. विचार करून. ७. धृतराष्ट्र. ८. दोन वर. ९. क्षत्रस्त्रियांनीं दोन वर मागावे, राजांनीं तीन आणि ब्राह्मणांनीं शंभर–असें शास्त्र आहे. [अ० ७१ श्लो० ३५.] १०. कर्ण. ११. अध्याय ७२ श्लो० ३ पहा. १२. सहज लीलेनें. १३. कर्णाच्या भाषणावर भीमानें उत्तर दिलें आहे तें असें आहे:—'अरे कर्णा! देवल नामक ऋषीनें असें सांगितलें आहे कीं, अपत्य, कर्म आणि विद्या हे तीन ज्योतीरूप पदार्थ पुरुषाला प्रकाशित करितात. उत्तम अपत्याच्या योगानें पुरुषाला इहलोकाची व परलोकाची प्राप्ती होते. मरणानंतर हेच तीन ज्योतीरूप पदार्थ पुरुषाला उपयोगी पडतात. ज्या स्त्रीपासून अपत्यरूप ज्योति उत्पन्न होणार तिनें आमचें संरक्षण केलें यांत कांहीं आश्चर्य मानण्यासारखें नाहीं. कारण तिच्याच अपत्यापासून आमचें तारण होणार आहे.'

[1]कौलिकपुत्रा ! । शब्दशरें ताडिसी शस्त्रा । सर्वेही श्लाघ्यता अपवित्रा । तूजचि साजे एकातें. ॥ २७४ ॥ [2]कुष्टी उपहासे [3]रूपसा, । [4]गर्भांध हिणावी डोळसा, । राजहंसातें कोळसा । [5]वायस म्हणे ज्यापरी. ॥ २७५ ॥ स्त्री पुत्र आणि पवित्र विद्या । चुकविती कुत्सित कर्मबाधा । पावविती [6]परमपदा । साक्ष देती पुराणें. ॥ २७६ ॥ [7]क्लीब किंवा पुरुष [8]गाढ । सहज कळों येतील पुढें । अकाळमेघातुल्य [9]तुंडें । काय आतां अनुवादों ? ॥ २७७ ॥ द्वारावतीची कुलदेवता । स्मरूनि नवसिली शत्रुघाता । म्हणे पुरवू मनोरथा । कृष्ण देव दयाळू.' ॥ २७८ ॥ अवलोकूनियां कर्णातें । माथा [10]तुकाविला वीर पार्थें । [11]श्मश्रु स्पर्शोनियां हातें । म्हणे, 'आठव असों दे.' ॥ २७९ ॥ धर्मराज म्हणे, 'ताता! । प्रसन्न मुखें वर ओपिता । तुझी आज्ञा ते तत्वता । वेदशास्त्रा प्रमाण. ॥ २८० ॥ आम्हीं असावें कवणे रीती ? । कवणे स्थळीं करावी वस्ती ? । आपदा संपदा कवणे स्थिती । कोणती आम्हीं भोगावी ?' ॥ २८१ ॥ संतोषोनि [12]कुरुनंदन । करी धर्माचें शांतवन, । म्हणे, 'पुत्रा ! निजनिधान । पुत्रांमाजी मी मानीं. ॥ २८२ ॥ माझ्या ठायीं धरूनि आस्था । स्वस्थ असावी हृदयावस्था । गमन करावें इंद्रप्रस्था । राज्यासनीं आपुलिया. ॥ २८३ ॥ मजवरी ठेवूनियां दृष्टी । कांहीं नाठवावें पोटीं । मज [13]अंधातें धरूनि हातीं । मोक्षपंथीं चालवा. ॥ २८४ ॥ आपुलें राज्य संपदा धन । भोगूनि करीं द्विजपालन । वृद्ध पिता [14]चक्षुहीन । मजवरी करुणा असोंदे. ॥ २८५ ॥ आरूढोनि कनकरथीं । गमन करावें स्वस्थळाप्रती.' । नमस्कारूनि पांचही मूर्ती । [15]शक्रप्रस्था पातले. ॥ २८६ ॥ [16]सहवर्तमान याज्ञसेनी । रथारूढ एकासनीं । गमन करितां देखोनी जनीं । परमाल्हाद मानिला. ॥ २८७ ॥ यापरी संपलें 'पूर्वद्यूत' । आतां कथीन '[17]अनुद्यूत,' । जेंवि कां भोजन झालिया [18]वांत । महाक्लेश उपजवी. ॥ २८८ ॥ लपवूनि जनाचिया दृष्टी । कृष्णा अंतर झाली भेटी, । म्हणे, 'होईल तें दृष्टी । कौतुक माझिये लीलेचें.' ॥ २८९ ॥ अं-

१. कोळ्याच्या पोरा, कर्णा. २. कुष्टरोगी. ३. सुरूप पुरुषाला. ४. जन्मांध. ५. कावळा. ६. मोक्षा, ब्रह्मपदा. ७. नपुंसक. ८. शूर. ९. मुखानें, तोंडानें. १०. डोलविला. ११. मिशा. १२. धृतराष्ट्र. १३. अध्याय ७३ श्लो० १२-१३ पहा. १४. अंध. १५. इंद्रप्रस्थाला. (अ. ७३ श्लो० १८.) १६. 'पृथामाता' असा पाठभेद आहे. १७. मागून झालेलें द्यूत. येथें 'द्यूतपर्व' सरलें व आतां 'अनुद्यूतपर्वा'ला आरंभ होतो. १८. उलटी, वांती.

तरीं भ्रताराचें सुख । बाहेरी सासुरवासाचें दुःख । न वाटे तेंवी तुम्हां हरिख । भोग माझेनी चिंतेनें. ॥ २९० ॥ **सभापर्व** रस विविधें । **व्यासभार**तअर्थवादें । **लीलाविश्वं**भरप्रसादें । **मुक्ते**श्वरकवी म्हणे. ॥ २९१ ॥

---

## अध्याय सोळावा.

राज्य संपदा सुखवैभव । देऊनि बोळविले **पां**डव । हें देखोनि **कौ**रव सर्व । कासावीस मानसीं. ॥ १ ॥ भय थरकंप दुःशासना । येऊनि सांगे **दु**र्योधना, । मेळवूनि **शकुनीक**र्णा । म्हणती, 'मरण पातलें. ॥ २ ॥ कष्टीं साधिलें महाफळ । तें वृद्धें केलें सर्वही निर्फळ । शस्त्रें डवंचूनि महाव्याळ । तोची कंठीं सूदला. ॥ ३ ॥ राज्य सेना शस्त्रास्त्रीं । जीत सोडिले **पां**डव वैरी, । ते पेटोनि महामारीं । निर्मूळ करितील आमुतें.' ॥ ४ ॥ चौघे पातले रायाप्रती, । म्हणती, 'वडीला! तुझे युक्ती । पापकर्में वरिली शांती । झाली हानी कुळातें. ॥ ५ ॥ दुखवूनि सोडिलें तक्षका । पूरीं प्रवेशे भंगोनि नौका । गृहीं लावूनि पावका । माजी जैसें पहुडणें. ॥ ६ ॥ तैसेंच तुज झालें येथें । साधिलें सोडिलें **पां**डवांतें । तुझा वंश तुझेनि हातें । क्षया गेला जाण पां. ॥ ७ ॥ पुढती पाचारूनि **ध**र्मरावो । उरला असे एक डावो । तो जिंकिल्या मग अपावो । आम्हांसि नाहीं कल्पांतीं. ॥ ८ ॥ नेमें द्वादशवर्षेंवरी । अरण्यवास अजिनांबरीं । तेराविया माझारीं । नष्टचर्या असावें. ॥ ९ ॥ जरी अळुमाळ प्रगट होती । तरी तितुकाचि अरण्यवास पुढती । अज्ञातवास क्रमूनि येती । राजनगरा मागुते. ॥ १० ॥ जरी आमुतें आली हारी । तरी नेमिला नेम आमुचे शिरीं, । आतां **ध**र्मातें पाचारीं । विलंबें दुरी अंतरती. ॥ ११ ॥ द्यूतविद्येचीं कपटमतें । **शकु**नी जाणें हारी जितें.' । वृद्ध म्हणे, 'नकळे मातें । आवडे तें करीतसां. ॥ १२ ॥ तुटलें सांधूं नका वैर । विझला पेटवूं नका वैश्वानर, । करूनि अवघियांचा संहार । मजही प्राणें घेतसां. ॥ १३ ॥ **शकु**नी म्हणे, 'ऐक कुशळ । एकें डावें साधीन सकळ । इतुकेनि

---

१. हर्ष. २. माझ्या. ३. अ० ७४ श्लो० २-३ पहा. ४. स्थविर धृतराष्ट्रें. ५. मोठा साप. 'कृष्णव्याळ' असाही अन्य पाठ आढळतो. ६. घातला. ७. जिवंत. ८. सुयोधन, दुःशासन, शकुनि आणि कर्ण. ९. स्वीकारिली. 'चोरिली' असा अन्य पाठ आहे. १०. सापा. ११. निजणें. १२. अपाय. १३. अध्याय ७४ श्लो० १८-२० पहा. १४. थोडें. १५. 'बारा वर्षें वनवास' असा अन्य पाठ आहे. १६. मिटलेलें. १७. अग्नि.

भोग राज्य अचळ । **औ**[1]त्तानपादीसारिखें.' ॥१४॥ वदे **गां**धारी स्वमुखीं[2], । 'पुत्र
नव्हे हा कुळघातकी । राया ! होऊनि तूं विवेकी । द्यूत वर्जी मागुतें. ॥ १५ ॥
याचिये[3] जन्मकाळींचीं चिन्हें । देखोनि **वि**दुर बोलिला वचनें[4] । त्यांची प्र-
चीती पाहिली नयनें । कुलक्षय देखत.' ॥ १६ ॥ **द्रो**ण **बा**ल्हिक **सो**म-
दत्त । **गौ**तम **वि**दुर **द्रो**णसुत[5], । वैश्यापुत्र[6] म्हणे घात । या विचारें सर्वांचे.
॥ १७ ॥ **भू**रिश्रवा **भी**ष्म **वि**कर्ण । वारूनि हातीं धरिती तृण । म्हणती,
'सांडूनि मूर्खपण । **पां**डव नाणा[7] माघारां.' ॥ १८ ॥ बोले **दु**र्योधन निष्टंक[8], ।
'सकळही नेणाच नायक । स्वहित जाणोनि आवश्यक । हेंचि कर्तव्य आमुतें.
॥ १९ ॥ नीती निरोपी **बृ**हस्पती[9] । वैरी बंधावे[10] नानायुक्ती । साधिले शत्रु
जे सोडिती । ते आत्मघाती[11] जाणावे.' ॥ २० ॥ आग्रह देखूनि चौघां मनीं ।
राजा म्हणे, 'ही ईश्वरकरणी । बलात्कारें पडती पतनीं । हा अधिकार क-
र्माचा. ॥ २१ ॥ ईश्वर काळ करूनि पुढें । प्रयत्न कायसे बापुडे । होणार
ओढवलें तें मोडे । हें अघटीत सर्वथा.' ॥ २२ ॥ [12]**प्र**तिकामीलागीं म्हणत, ।
'[13]संबंधु पाचारीं [14]**पां**डुसुत । पुढती खेळोनियां भोगोत । केलें कर्म आपुलें.'
॥ २३ ॥ **प्र**तिकामी धांवोनि वेगें । म्हणे, '**ध**र्मा ! फीर मागें, । [15]वडिलीं
पाचारिलें आंगें । द्यूत पुढतीं खेळावया[16]. ॥ २४ ॥ घातली असे आपुली
आण[17], । तुज तंव ताताज्ञा प्रमाण, । घेऊनि पितयाचें दर्शन । मग रुचे तें
करावें. ॥ २५ ॥ शीघ्रचि गमन घडे पुढती । विकल्प[18] न धरीं ये अर्थी ।
क्लेश उपोषणाचे अंतीं । सुख पारणें स्वभावें. ॥२६॥ द्वादशीनंतर त्रयोदशी ।
ग्रहभोग खंडती अल्पायासीं[19] । न गेल्या लाधेल चतुर्दशी । आजी मुहूर्त प्र-
याणा.' ॥ २७ ॥ **ध**र्मराज पावला खुणे, । म्हणे, 'ईश्वराचें ईश्वर जाणें ।
ज्यालागीं मनुष्यलोका येणें । देह धरणें **कु**रुकुळीं. ॥ २८ ॥ उतरावया
भूभारातें । अवतार धरिला श्री**कृ**ष्णनाथें । तें कार्य **पां**डवांचेनि हातें । संपा-

---

१. ध्रुवासारखें, उत्तानपादपुत्रासारखें. २. 'सदुःखी' असा अन्य पाठ आहे. ३. या दुर्योधनाच्या. ४. विदुर म्हणालाः—या पुत्राला मारून टाका, हा कुलाधम होईल, हा कुलाचा नाश करील. (अ० ७५ श्लो० ३-४.) ५. अश्वत्थामा. ६. युयुत्सु (अ० ७४ श्लो० २५.) ७. द्यूत करण्यासाठीं आणूं नका असें म्हणाले. ८. अव्याहत. ९. देवपुरोहित बृहस्पति. (अ० ७४ श्लो० ७.) १०. अहित करणाऱ्या शत्रूंचा उच्छेद सर्व उपायांनीं करावा असा भाव. (अ० ७४ श्लो० ८.) ११. स्वनाशक. १२. सारथिपुत्र. १३. भीमादि बंधूंसह. १४. धर्मराजाला. १५. धृतराष्ट्रानें. १६. अध्याय ७६ श्लो० २ पहा. १७. शपथ. १८. संशय. १९. 'सायासीं' असा अन्य पाठ आहे.

दिलें पाहिजे. ॥ २९ ॥ यासी कारण कपटद्यूत । वैर तुटोनि सांदलें त्वरित। नेघें म्हणतां न सुटत । जें कां विधीनें लिहिलेंसे.' ॥ ३० ॥ निषेध [1]कीजे भीमार्जुनें । म्हणती, 'पुढती काय जाणें? । काय अनर्थ रचिला तेणें । तें तत्वतां नेणवे.' ॥ ३१ ॥ लटिका मायीक कनकहरिण । जाणतां भ्रमला [2]रघुनंदन । तेंवी परतोनि पांचहीजण । कौरवसभे पातले. ॥ ३२ ॥ प्रवेश करितां अधर्मसभे । कुटिल सन्मानें राहिले उभे । दुर्योधन राज्यलोभें । शकुनीमुखें अनुवादे. ॥ ३३ ॥ 'धर्मराजा! [3]परियेसीं बोला । एक डावें शेवट झाला । हारींजितीं जो नेमिला । तो नेम परिसें पवित्रा! ॥ ३४ ॥ आम्ही हारलिया पणीं । करूनि चर्मांबरवसनीं । द्वादशवर्षें वनोपवनीं । कंदमूळफल [4]आहारूं. ॥ ३५ ॥ [5]त्रयोदशवर्षामागुती । गुप्त असावें स्वजनज्ञाती । प्रगट झाले तरी मागुती । बारा वर्षें वनवास. ॥ ३६ ॥ अज्ञातवास क्रमूनि तेरावें । मग संतोषें नगरा यावें । हेंचि तुम्हीं स्वीकारावें । हारी अंगा आलिया'. ॥३७॥ धर्म विचारी हृदयाआंत, । 'मागां सरतां हीन पुरुषार्थ । होणार पातलें बळिवंत । तेंचि आतां होतसे.' ॥३८॥ शकुनी ढाळितां फांसे । आयुष्य पाणीतळीं घांसे । 'जिंकिलें रे!' म्हणोनि हांसे । गदगदाटें ते काळीं. ॥ ३९ ॥ दुर्जन पिटिती एक टाळी, । कर्ण हांसे गदारोळीं,। 'दुर्योधनाचिया [6]राउळीं' । म्हणती 'गुढिया उभारा.' ॥ ४० ॥ कौरव गर्जती जयजयकारीं । [7]त्राहाटिल्या निशाणभेरी । राज्य झालें एकछत्री । तेणें आल्हाद गोत्रजा. ॥ ४१ ॥ पांडवां पातला पराजयो । [8]काळिमातमें व्यापिला सूर्यो । कल्पांतींचा प्रळयवायो। झडझडाटें सूटला. ॥ ४२ ॥ कांपिन्नली धरासृष्टी । उल्कापात मातला दृष्टी । गगनमार्गें रक्तवृष्टी । होती झाली अपार. ॥ ४३ ॥ संतोष न धरवे दुःशासना । म्हणे, 'रे! कुंतीच्या [9]नंदना! । प्रयाण केलें पाहिजे वना । कां वि-

---

१. केला. २. रामचंद्र. (अध्याय ७६ श्लो० ५.) ३. परिसा, ऐका. ४. भक्षूं. ५. अध्याय ७६ श्लो० १०-१५ यांत या द्यूतप्रतिज्ञेचा उल्लेख आहे. 'राया! आतां द्यूतीं एकचि आम्हीं तुम्हीं करूं पण हो! । 'सर्वस्व हारवावें कीं जिंकावें' न भीरु तूं पण हो. ॥ ९५ ॥ द्यूतीं निर्जित झालों तरि आम्हीं रौरवाजिनें धरुनी । द्वादशवत्सर व्हावें वनवासी सुमुनिवृत्तिला वरुनी ॥ ९६ ॥ अज्ञातवास सजनीं परि वत्सर एक मग करावा हो, । होतांचि ज्ञात पुन्हा पहिला वनवासपथ धरावा हो. ॥ ९७ ॥ जित होतां वर्तावें याचि न्यायें तुम्हीं सदारानीं, । सजनीं वर्षभरि वसा द्वादश वर्षें वसा सदा रानीं. ॥ ९८ ॥ तेरा वर्षें ऐशीं क्रमिल्यावरी लागतांचि चवदावें । राज्य करावें आपण, हा पण; कोणी असत्य न वदावें.' ॥ ९९ ॥ [मोरोपंत–सभापर्व–अध्याय ६; काव्यसंग्रहग्रंथमाला–पृ० ६१.] ६. मंदिरीं, महालांत. ७. त्राहटणें=वाजविणें, ठोकणें. ८. अंधकारानें. ९. धर्मा.

लंब दिसतसे ? ॥ ४४ ॥ फेडूनियां सर्व राजवसनें । अंगीं वेढावीं वल्कल-वसनें । रक्षा[1] लेपूनियां वदनें । निघा वेगीं वनवासा ? ॥ ४५ ॥ ऐश्वर्य इंद्रा-चिये मस्तकीं । देखोनि बोलिजे नरनायकीं । धन्य पांडव हे त्रिलोकीं । उपमे आन असेना. ॥ ४६ ॥ ते आज निर्फळ षंढतिळ[2] । तुच्छ तृण कां अर्कफळ[3] । चर्ममय मृग विशाळ । प्राणहीन ज्यापरी. ॥ ४७ ॥ वंध्या विधवा नपुंसक नरू । भग्नभाजन[4] खांकरतरू । शुष्कतडाग[5] केशभारू । स्मशानभूमिके ज्या-परी. ॥ ४८ ॥ तेंवी आज दिसतसें डोळां । अवदशेनें घातली माळा । अभाग्यवनींच्या गोळांगुळा[6] । समान म्हणती समस्त. ॥ ४९ ॥ विजनीं[7] दरिद्रीयाचें प्रेत । पडल्या कोणी न लावी हात । काक[8] जंबुका[9] होय प्राप्त । तेंवी तुम्हीं क्लेशांतें. ॥ ५० ॥ दरिद्रसमुद्रा आंतौते । पडिले, आतां नये वरुते । ऐसें जाणोनि द्रौपदीतें । हितविचार सांगतसें. ॥ ५१ ॥ शतां-माजी कौरवराया- । वरूनि कां ओपी काया? । म्हणे वनांत जाऊनि वायां । क्लेश कांहीं न भोगीं. ॥ ५२ ॥ बळलावण्य भाग्यवंतें । आम्ही बंधू एकशतें । त्यामाजी आवडेल तयातें । वल्लभ[10] करीं सुजाणे ! ॥ ५३ ॥ तूं सुकुमार राज-कुमरी । कष्ट भोगिसी वनांतरीं । क्लीब दरिद्री प्रेतांसरी[11] । पांडव त्यागीं परौते[12]. ॥ ५४ ॥ पांडव सभाग्य मानूनि सृष्टी । द्रुपदें दीधली गोरटी । ते आजी भणंगची शेवटीं । रंकप्राय भासती.' ॥ ५५ ॥ हें ऐकोनि भीमसेन । सृंगा[13]-लाप्रती पंचानन[14] । गर्जे तैसा दुःशासन । लक्षूनियां बोलत. ॥५६॥ 'कपट-द्यूतविद्याबळें । पांडव जिंकिले सौबळें[15] । हीं श्लाघ्य विषतरूचीं फळें । सेवूनि अमरत्व मानिसी. ॥ ५७ ॥ म्हणोनि मर्यादा नाहीं तोंडा । बोलों नये तें बो-लसी मूढा ! । शक्तीच्या अंगणीं तडतडां । बस्त[16] नाचे ज्यापरी. ॥ ५८ ॥ माझ्या हातींच्या तीक्ष्णशस्त्रें । खंडविखंड होतां गात्रें । त्यांची प्रचीती आपुल्या नेत्रें । देखसी आणी भोगिसी. ॥ ५९ ॥ पुढां संग्रामीं आजी द्यूतीं । जे जे तुमचे पक्षपाती[17] । ते ते निवडूनि गदाघातीं । यमसदनीं बैसवीन. ॥ ६० ॥ शब्दशस्त्रांचीं उसणीं । लोहशस्त्रें[18] फेडीन रणीं । सदंत जिव्हा छेदूनी । फळ

---

१. राख, भस्म. २. नपुंसक. (अफल आणि निर्वीर्य तिलांप्रमाणें. (अ० ७७ श्लो० १४.) ३. रुईचें फळ. ४. फुटकें भांडें. ५. कोरडें तळें. ६. वानर. ७. अरण्यांत. ८. कावळ्याला, ९. कोल्ह्याला. १०. पति. (अ० ७७ श्लो० २-१४.) ११. प्रेताप्रमाणें असलेले. १२. दूर. वेगळे. १३. कोल्ह्याला. १४. सिंह. १५. शकुनीनें. १६. मेंढा. १७. कैवारी, पक्षानुयायी. १८. लोखंडाच्या शस्त्रानें. (अ० ७७ श्लो० १६-१८.)

दावीन निंदेचें. ॥ ६१ ॥ हेंचि देऊनि आठवण। रणीं मारीन अवघेजण। ही माझी प्रतिज्ञाखूण। लिहोनि ठेवीं हृदयपत्रीं.' ॥ ६२ ॥ पांचही पुरुष वल्कलवसनीं। निघते झाले वैनप्रयाणीं। दुःशासनादि बंधुश्रेणी। नृत्य करिती संतोषें. ॥ ६३ ॥ पांचहीजणें चालतां पायीं। कौरव म्हणती, 'गायी रे! गायी। अजाप्राय आतां देहीं। पुरुषार्थातें दाविती.' ॥ ६४ ॥ ऐकोनि आवेश न धरवे भीमा। म्हणे,'रे! धृतराष्ट्रपुत्रा! अधमा!। तुझिया छेदोनि शिरःपद्मा। बळी ओपीन भूतांतें. ॥ ६५ ॥ तुझेनि रक्तोदकें जाण। पृथ्वीलिंगा अभिषिंचन। न करीं तरी भीमसेन। नव्हे नंदन कुंतीचा.' ॥ ६६ ॥ सिंहगती भीमसेन। चालतां मागें दुर्योधन। वांकडे करूनियां चरण। उपहासूनि चालतु. ॥ ६७ ॥ चेष्टा कुचेष्टा वक्र गमन। दाखवी वांकुल्यांचें चिन्ह। हें देखोनि दुर्जन। कौरवपक्षी हांसती. ॥ ६८ ॥ व्याघ्र परतोनि पाहे मागें। तेंवी भीम देखतां रागें। वर्षाकाळीं गर्जिजे मेघें। तेंवी गर्जोनि बोलतु.॥६९॥ 'छेदूनि दुर्योधनाचा मौळी। शीर तुडवीन पायातळीं। जैसी खेळिजे चेंडूफळी। रणांगणीं कौतुकें. ॥ ७० ॥ दुःशासनाचे कंठींचें रक्त। प्राशिल्यावीण तृषा तृप्त। माझी नोव्हे संतृप्त। वारंवार म्हणतसें. ॥ ७१ ॥ त्याचिये रक्तें घेऊनि उटी। तेचि चर्चीन करद्वयतटीं। मोकळ्या केशांची वीरगुंठी। पांचाळीची बांधीन. ॥ ७२ ॥ सुकृतीयाचा लोक उत्तम। कदा न पावे पांडवी भीम। जरी हा बोलिला तो नेम। साच करूनि दावीना. ॥ ७३ ॥ धार्तराष्ट्र पापखाणी। एकएक मारीन रणीं। तेव्हां हृदयींचा क्रोधाग्नी। शांत

---

१. 'उदित' असा अन्य पाठ आहे. २. वनाला जाण्यासाठीं. ३. अ० ७७ श्लो० १९ पहा. ४. 'गायी गायी' म्हणण्याचें कारण असें:–मधुपर्क हा एक प्रकारचा पूजाविधि आहे. कोणी प्रतिष्ठित पाहुणा (अतिथी) घरीं आला असतां हा विधि करतात. गाय अथवा बैल मारून त्याच्या कातड्यावर ज्या पाहुण्याला मधुपर्क द्यावयाचा असेल त्याला बसवावें आणि दहीं दूध मध इत्यादि अर्पण करून स्वागत करावें असा पूर्वीं प्रचार होता. हल्लीं विवाहसमयीं वराला आणि पूजासमयीं देवाला मधुपर्क देतात. तथापि त्यांत मांसाबद्दल दहीं, मध यांची योजना करण्याचा प्रघात आहे. मधुपर्कसमयीं 'गौर्गौर्गौः' असें त्रिवार उच्चारण करून गाईचा वध अथवा उत्सर्ग करीत असत. 'गाय गाय' असें दुःशासन म्हणे यावरून पांडव हे मधुपर्कांतील पशुप्रमाणें मारण्यास योग्य असा भाव दर्शविला. या दुःशासनाच्या दुर्भाषणाचा सूड पुढें भीमानें घेतला आहे.(मोरोपंतकृत कर्णपर्व पहा.) ५. शेळीसारखे. ६. नीचा. ७. अभिषेक. (अ० ७७ श्लो० २०-२२.) ८. बोलता झाला. ९. बुचडा.१०. पुण्यपुरुषाचा.

होईल माझिया. ॥ ७४ ॥ आसनीं चळेल **हि**मालय, । अंगप्रभा[1] सांडील[2] सूर्य, । शैत्य टाकील **रो**हिणीप्रिय,[3] । परी मद्वाक्य चळेना.' ॥ ७५ ॥ हें ऐकूनि **अ**र्जुन वीर । प्रतिज्ञा बोले प्रतापशूर, । 'करीन **क**र्णाचा संहार[4] । हा निर्धार जाण पां. ॥ ७६ ॥ शीर भवंडून अंतराळीं । सांडणें सांडीन भूमंडळीं । तरीच **पं**डुनृपाचे कुळीं । **अ**र्जुननामा बोलिलों.'[5] ॥ ७७ ॥ **स**हदेवें पिटोनि बाहें । म्हणे, 'शकुनी! सावध राहें । माझे हस्तें मरूनि पाहें । **य**मपुरी निवाडें. ॥ ७८ ॥ फांसे ढाळून द्यूतकर्मीं । तितुके बाण हृदयवर्मीं । भेदीन तेव्हां संतापऊर्मी । पश्चात्तापें भोगिसी. ॥ ७९ ॥ नष्टा! भ्रष्टा! अतिपापिष्टा! । तुझा प्राण तो माझा वांटा । साह्य केलिया **नी**ळकंठा । तरी मारीन निर्धारें. ॥ ८० ॥ बंधुसहित शत **गां**धार । करीन सकळांचा संहार । तरीच **मा**द्रवतीकुमर । दास अनुज **ध**र्माचा. ॥ ८१ ॥ निंदणार ऐकणार । प्रेरणार देखणार । जैसे साह्य रक्षणार । तितुके मरतील मजहस्तीं. ॥ ८२ ॥ **दु**र्योधन **दु**ःशासन **क**र्ण **श**कुनी । यांचें अशुद्ध[6] प्राशील धरणी[7] । तें कौतुक देखती नयनीं । सभानायक आतांचे. ॥ ८३ ॥ तेरा वर्षांनंतरें पुढती । राज्य नेदी बरविया[8] रीती । तरी **कौ**रव मारूनि सर्व जगती । एकछत्री मी कर्ता. ॥ ८४ ॥ **भी**मसेन वदला वाणी । तें ब्रह्मवाक्य[9] झालें जनीं । **ह**रि **ह**र अथवा **प**द्मयोनी[10] । कदां भंगू न शकती.' ॥ ८५ ॥ बाहू पिटोनियां **न**कुळ । म्हणे, 'मी मारीन **कौ**रवकुळ, । धान्य क्षेत्रांचें[11] निर्मूळ । कुंजर[12] करी ज्यापरी. ॥ ८६ ॥ **पां**डवांची प्रतिज्ञावल्ली । निर्फळ नोव्हे कदाकाळीं । जींहीं हा रंग देखिला डोळीं । तेचि तोही देखती.' ॥ ८७ ॥ ऐसे बोलोनियां पण । करिते झाले वनप्रयाण. । **धौ**म्यनामा तपोधन । सवें **द्रौ**पदी पवित्रा. ॥ ८८ ॥ वेढूनियां वल्कलाजिनें । सभा अवलोकूनि नयनें । म्हणे, 'आप्त हो! अंतःकरणें । कृपा अपार असों द्या. ॥ ८९ ॥ तुमचिये आशीर्वाददृष्टी । पुढती होईल चरणभेटी[13] । तुमचे पुण्यें वनसंकटीं । ईश्वर आम्हां रक्षील.' ॥ ९० ॥ **भीं**ष्म **बा**ल्हीक **सो**मदत्त । **द्रो**ण **द्रौ**णी **शा**रद्वत[14] । **सं**जय **यु**युत्सु नृपनाथ । **प्र**ज्ञाचक्षू वंदिला. ॥ ९१ ॥ **धृ**तराष्ट्रपुत्र एकशत । त्यांसही

---

१. आपल्या आंगचें तेज. २. सोडील. ३. चंद्र. अ० ७७ श्लो० ३२-३६ पहा. ४. नाश. (अ० ७७ श्लो० ३७-४१.) ५. 'जन्मलों' असा अन्य पाठ आहे. ६. रक्त. ७. पृथ्वी. ८. बऱ्या प्रकारानें. ९. अढळ वचन. १०. ब्रह्मदेव. ११. शेतांतील. १२. हत्ती. १३. 'चरणभेटी' हा समास चिंतनीय आहे. १४. कृप.

पुसे कुं[1]तीसुत, । 'तुमचिये आज्ञे बंधूसहित । वनप्रयाण करितसें.'॥ ९२ ॥ जाणोनि पुढील भविष्य चिन्ह । श्रेष्ठ कोणी न देती वचन । भीष्मद्रोणादिकांचे नयन । अश्रुपातें डळमळती. ॥ ९३ ॥ पवित्रें कल्याण चिंतिजे मनीं । कौरवां कल्पिली महाहानी । इतर लज्जायुक्त मनीं । [2]अधोवदनीं तटस्थ. ॥ ९४ ॥ विदुरें नेत्र पुसोनियां हातीं । म्हणे, '[3]पवित्रा धर्ममूर्ती । वृद्धसुकुमार देवी कुंती । झणीं नेसी वनवासा. ॥ ९५ ॥ माझिया [4]ज्येष्ठ बंधूचि पत्नी । ते मी मानीं सखी बहिणी । सत्यवतीचे आसनीं । वंद्य होय मज पुत्रा.॥९६॥ तीतें ठेवूनि माझे घरीं । तुम्हीं असावें [5]वनगव्हरीं । तेथेंही कृपा करील हरी । पदोपदीं रक्षील. ॥ ९७ ॥ शीत उष्ण [6]क्षुधा [7]तृषा । भोगितां पावेल परमक्लेशा । यालागीं कुंती वनवासा । नेतां खेद मज वाटे.' ॥९८॥ गंगा स्वीकारिली शंकरें, । तेंवी [8]पृथादेवी विदुरें । अंगीकारितां युधिष्ठिरें । लोटांगणीं वंदिला. ॥९९॥ [9]म्हणे, 'तूं गुरू पितादेवो । मज तूं जैसा कृष्णरावो । तुझे चरणीं अचळ भावो । चळों नेदी सर्वथा. ॥१००॥ जें मानेल तुझिया मना । तें मज मान्य परमान्या! । पुढां उपदेश आज्ञा । देसी तैसें वर्तावें.' ॥१०१॥ विदुर म्हणे, 'धर्मराया! । कदा न विसंबें कृष्णपाया । आलीं विघ्नें जाती लया । आपेंआप हरिनामें. ॥१०२॥ [10]अन्यायद्वारा जें [11]आर्जिलें । तेणें अवदशा घेतली [12]मोलें । कोटी अनर्थी [13]अवंतिलें । शिर छेदिलें स्वहस्तें. ॥ १०३ ॥ सर्वदा कल्याण असो तुम्हां । निश्चय जाण पुरुषोत्तमा । धर्मापासून मनोधर्मा । चळों नेदीं मानसा. ॥ १०४ ॥ स्वस्ती असो, कुशळ जावें, । जावोनि [14]पुंढती क्षेम यावें । सत्य सर्वदा संरक्षावें । धैर्य बळें धार्मिकें. ॥ १०५ ॥ तुझें हृदय हरिमंदिर । तेथें चांडाळ अतिनिष्ठुर । तये चिंतेचें [15]बिढार । होय ऐसें न करावें.' ॥ १०६ ॥ ऐसें विदुरें अनुवादोन । मोहें दीधलें आलिंगन, । अश्रुधारा स्त्रवती नयन । प्रेमभावें दोहींच्या. ॥ १०७ ॥ कुंती निरवूनि विदुराहातीं । निघते झाले अरण्यपंथीं । पांचा हंसांचिये संगतीं । जेंवी हंसिणी [16]चामके. ॥ १०८ ॥ तेंवी द्रौपदी एकवस्त्रा । चरणचाली पद्मनेत्रा । दृष्टीं दे-

---

१. धर्म. २. खालीं मान घालून. ३. अध्याय ७८ श्लो० ५-६ पहा. ४. वडील भावाची, पांडूची. ५. वनांतील गुहेंत. ६. भूक. ७. तहान, तान्ह, तान. ८. कुंती. ९. अ० ७८ श्लो० ७-८ पहा. १०. अ० ७८ श्लो० ९-२३ पहा. ११. संपादिलें. १२. मोल देऊन. १३. आमंत्रण दिलें. १४. तेरा वर्षानंतर. १५. बिऱ्हाड, वसतिस्थान. १६. गमन करी.

खोनि सुपुत्रा । कुंती दुःखें आक्रंदे. ॥ १०९ ॥ कुमरीं वेढिलीं वल्कलाजिनें । पाठीं अंगना एकवसनें । दीनप्राय देखतां नयनें । दीर्घरोदनें प्रलापे. ॥ ११० ॥ पिटोनियां वक्षःस्थळीं । अंग घाली भूतळीं । म्हणे, 'द्रौपदी गुणवेल्हाळी । केंवी देखेन मागुती. ॥ १११ ॥ पतिव्रताही शिरोमणी । सुशीळ पवित्रेची खाणी । इचेनि पाडें त्रिभुवनीं । दुजी आन असेना.॥११२॥ हा! कृष्णा! द्वारकावासी! । कवणे ठायीं गुंतलासी ?। पांडव पडले व्यसनफांसीं । हें कां तूतें नकळेची ?॥ ११३ ॥ हा! हा! पंडुमहाराजा! । कुरुवंशाच्या विजयध्वजा! । सद्गुणा तुझिया पवित्रात्मजा । क्लेश ऐसे पातले. ॥ ११४ ॥ तुजसारिखा पवित्र जनक । तुझी बाळकें भोगिती दुःख । ऐसें जाणतां स्वर्गसुख । गोड वाटे तुज कैसें ? ॥ ११५ ॥ भविष्य कळतें जरी मजलागीं । तरी मी राहातें शतशृंगनगीं । पुढां येउनि प्रळयआगी-। माजी पुत्र न घालितें. ॥ ११६ ॥ पांचाळिये! मायबहिणी! । सखिये! सये! सांगातिणी! । मज सांडूनि कुळतारिणी । केंवी जासी वनवासा? ॥ ११७ ॥ धन्य माद्री सौभाग्यसगुणी । पतीसंगतीं स्वर्गभुवनीं । पुत्रांचेंही दुःख नयनीं । नदेखेची सुदैवें. ॥ ११८ ॥ सहदेव माझें तान्हें बाळ । यालागीं मन माझें व्याकुळ । याचा करावया सांभाळ । हेची प्रार्थी जननीये! ॥ ११९ ॥ तुझिया क्रोधदृष्टीचा अनळ । लागतां जळे कौरवकुळ । वांचलें तें पुण्य प्रबळ । गांधारीचें मज वाटे. ॥ १२० ॥ स्वधर्मे राहाटें हो वेल्हाळी । स्नेहें भ्रतारां सांभाळीं ।

---

१. मोरोपंत—सभापर्व अ० ७ गीति ३९-५३ पहा. २. शतशृंगपर्वतावर पांडुराजा मरण पावला तेथें. [सभापर्व—अध्याय ७९ श्लो० १७.] ३. "सुकुमारतया न याश्रमद्भुस्तृणं मौक्तिकमण्डलानि च । रविधाम सहिष्यते कथं भवती खेदलवाश्च सा वने. ॥ ८८ ॥ जगदेकजितोऽपि यान्त्यमी सति सत्यव्रतपालिनो वनम् । प्रतिपालय मामिहैकिकां किमु वत्से त्वमपीति मुञ्चसि ॥ ८९ ॥ भवदीयमुखेन्दुना विना विकसत्कोमलकांतिनामुना । नकुलक कुलैककैरवप्रतिमं मेऽक्षि विकाशमेष्यति ॥ ९० ॥ यदि सत्यमपालि सोदरैर्नियतं पालितमेव तत्त्वया । त्वमिहैव कृतस्थितिः शुचः सहदेव प्रियपुत्र पाहि माम् ॥ ९१ ॥ सकृपः कृतदुर्नयेऽप्यरौ विचयिन्यः समभूः सभाभुवि । अकृपः स कथं स्थितोऽधुना रुदतीं मां न दृशापि पश्यसि ॥ ९२ ॥ जतुमन्दिरतो विकृष्य मां निजपृष्ठेन वहन्नहर्निशम् । किमु भीम गतस्तदा खिदां यदिदानीं रुदतीं विमुञ्चसि ॥ ९३ ॥ निजमौलिमणीगणोन्मृजा शुचिशोभेषु नमन्नहर्मुखे । मम पादनखेषु को युधिष्ठिरकर्ता वदनावलोकनम्. ॥ ९४ ॥" [बालभारत—पृ० १७५.] ४. अग्नि. ५. वाग.

सहदेवाचे हृदयकमळीं । स्नेहें बहुसाल झांकले.' ॥ १२१ ॥ तयेतें म्हणे पांचाळीया । 'नेत्रोदकें क्षालितां पायां । पुढती मोहें झांकलें वायां, । शोक करी आक्रोशें. ॥१२२॥ 'द्रौपदी! त्यागूनियां मातें । जाऊं नको दूर वनातें'. । 'परत' म्हणे सहदेवातें । 'सांडों नको मज पुत्रा !'॥१२३॥ सहदेव कळवळोनी माय । दीर्घस्वरें मोकली धाय । धर्म म्हणे, 'माझें हृदय । नलगे कांहीं सांगणें.' ॥ १२४ ॥ कंठीं कवळिती येर येरीं । शोक करिती दीर्घस्वरीं । सकळ कौरवांचिया नारी । आक्रंदती अतिदुःखें. ॥ १२५ ॥ म्हणती, 'वैधव्य पातलें आम्हां । भुली पडली असे अधमां । ऐश्वर्यमदें माजले, सीमा । आयुष्याची लोटली.' ॥ १२६ ॥ नगरवासी नारी नर । शोकें करिती हाहाकार । भीष्म द्रोण कृप विदुर । अधोवदनें विलापती. ॥ १२७॥ वडील वृद्धां करूनि नमन । करिते झाले वनप्रयाण । वंदोनि पृथेचे श्रीचरण। याज्ञसेनी चालिली. ॥ १२८ ॥ विवेकें शांतवूनि कुंती । विदुरें धाडिली स्वगृहाप्रती । आपण पांडवाचे संगती । बोळवीत निघाला. ॥ १२९ ॥ सगुण सुभद्रा यादवी । द्वारके धाडिली स्नेहभावीं । सांगों विसरला व्यास कवी । परि म्यां स्मरण दीधलें. ॥ १३० ॥ प्रगट झालिया वैराटीं । श्रीकृष्ण घेऊनि आला भेटी । अभिमन्युविवाहा पाठी । उत्तरेसीं योजिला. ॥ १३१ ॥ इतर पांडवांचिया भाजा[1] । पितृगृहा धाडिल्या वोजा । वनवास सरलिया महाराजा । पुरुषभेटी पातल्या. ॥ १३२ ॥ विदुरें जाऊनि बोळवीत । क्रमिला योजनार्ध पंथ । पांडवां बोळवूनि त्वरित । रायानिकट पातला. ॥ १३३ ॥ धृतराष्ट्रा पोटीं परम खेद । देखोनि पुत्रांचा अपराध । म्हणे, 'सेविला विषकंद । क्षेमें कैसें वांचती. ॥ १३४ ॥ राज्य हिरोनि वल्कलवसनीं । चरणचाली दवडिले वनीं । तो वनवास खंडतां क्षणीं । प्राण घेती निर्धारें. ॥ १३५ ॥ सहस्रवर्षांवरी आघात । परी आतांच देखती बुद्धिमंत । यालागीं पुत्रशोकाचे घात । विदारोत हृदयातें.' ॥ १३६ ॥ चित्तीं चिंतेची चटपट । उद्विग्न पाहे विदुरवाट । क्षेत्ता[2] पातलिया निकट । उतावेळ पुसतसे. ॥ १३७ ॥ जो जो संशय बाधो हृदयीं । पुसतां विदुर वदेल कांहीं । तें निरूपण उत्तराध्यायीं । वक्ष्यमाण श्रोतियां. ॥ १३८ ॥ लीलाविश्वंभर जैलधर[3] । वर्षतां सात्विक सरोवर । भरती तेथें मुक्तेश्वर । चातकप्राय निवतसे. ॥ १३९ ॥ इति श्री'सभापर्वे' भारत । यांत परिसलें 'अनुद्यूत' । पुढें धृतराष्ट्राचें चित्त । चिंताभूत तें ऐका. ॥१४०॥

---

१. भार्या. २. विदुर. ३. मेघ.

## अध्याय सतरावा.

**धृ**तराष्ट्र पुसे **वि**दुरसुमती,। ‘**पां**डव गेले कवणे रिती । विषाद किंवा संतोषवृत्ती । बाह्यचिन्ह जाणिजे. ॥ १ ॥ पांचही पुत्रांचें चेष्टित । भिन्नलिंगी अंतर्गत । क्षेम किंवा प्राणघात । सूचक कैसें सांग पां. ॥ २ ॥ कवण दावुनी आकारू । गेली **द्रौ**पदी सुंदरू? । **धौ**म्यनामा ऋषीश्वरू । गेला कैसा सांग पां?’ ॥ ३ ॥ **वि**दुर बोले सखेद वचन,। ‘वस्त्रें [1]आच्छादूनि वदन। **ध**र्में केलें वनप्रयाण । न बोलतां कवणासीं. ॥ ४ ॥ उभारूनि भुजा सरळी । अवलोकीत क्रोधानळीं । हुंकार करीत महाबळी । **भी**म गेला त्यापाठीं. ॥ ५ ॥ वाळुका घेउनि [2]वाममुष्टी । सव्य विखुरीत पृथ्वीतटीं । मस्तक तुळित वीरजेठी । गेला **कि**रीटी वनवासा. ॥ ६ ॥ [3]कर्दमें लेपूनियां मुख । **स**हदेव जातां देखती लोक । जैसा अभ्रपडळें [4]अर्क । आच्छादिला न लोपे. ॥ ७ ॥ मृत्तिका चर्चूनि सर्वांगीं । **न**कुळ गेला **ध**र्मामार्गीं । जैसा योगी सिद्धसंगीं । ब्रह्मतेजें विराजे. ॥८ ॥ केश मोकळे झाडित हस्तीं । गेली **द्रौ**पदी महासती । [5]हृदयानळा अश्रुपातीं । शांतवीत सिंचनें. ॥ ९ ॥ दर्भ मुष्टी धरूनि **धौ**म्य । पढत [6]अंत्येष्टीचें [7]साम । ज्येष्ठकनिष्ठाचीं नामें । आलोटीत तर्पणा. ॥ १० ॥ तोही गेला **ध**र्मापाठीं । बरवें न दिसे माझिया दृष्टी । विशेष कांहीं न वदवे गोष्टी । शोकें सृष्टी [8]आहाळेल.’ ॥११॥ **धृ**तराष्ट्र म्हणे, ‘गा! **वि**दुरा! । प्रगटार्थ निरोपीं चतुरा! । ऐसीं लक्षणें **कुं**तीकुमरां । कारण कोण दावावया?’ ॥१२॥ **क्ष**त्ता म्हणे, ‘नये अनुवादु । तथापि भविष्यार्थ हृदय बोधु । आजूनि तरी विचार नांदु । आत्महिताचा तुजमाजी. ॥ १३ ॥ [9]आपुले नयनें [10]हव्यवाटीं ।

---

१. या प्रसंगाचें वर्णन **पं**तांनीं असें केलें आहे:–“उद्विग्नचित्त होउनि आणवुनि क्षिप्र सुस्वभावातें, । ‘पांडव वनासि कैसे गेले’ ऐसें पुसे स्वभावातें. ॥ ६० ॥ ‘नृप मुख झांकुनि गेला, देता झाला जना न पाहूं तें; । पाहत होता जातां विपिनाशिं वृकोदर स्वबाहूतें. ॥ ६१ ॥ जो सर्वशिष्यवृंदीं द्रोणाला परमतोषकर सिकता, । त्याचा वनासि जातां पेरित होता पथांत कर सिकता. ॥ ६२ ॥ नकुळ रजांहीं मळवुनि सर्वांगाला वनासि गेला हो!। सहदेवेंही जातां सारवुनि मुखेंदु मलिन केला हो. ॥ ६३ ॥ केशांनीं मुख झांकुनि गेली रोदन करीत तव सून, । द्रुपदें विलोकिली जी कन्या देवव्रजासि नवसून. ॥ ६४ ॥ कुशदर्भपाणि भगवान् धौम्य परे गात गात गेला हो!’ । क्षत्ता म्हणे, ‘तुम्हां म्यां श्रुत तद्गमनप्रकार केला हो.’ ॥ ६५ ॥ [मोरोपंतकृत सभापर्व–अ० ७ गी० ६०-६५ पहा.] २. डाव्या हातांत. ३. चिखलानें. ४. सूर्य. ५. हृदयाग्नीला. ६. शेवटील कर्म. (सोळावा संस्कार.) ७. सामवेदांतील मृतकर्मसंबंधीं मंत्र. ८. आहाळणें=पोळणें, खळबळणें. ९. या प्रसंगाचें वर्णन अमरचंद्रविरचित बालभारत नामक महाकाव्यांत असें आहे:—“माहं

भस्म होईल सर्व सृष्टी । म्हणोनि न पाहात दृष्टी । धर्म गेला जाण पां. ॥१४॥ आणीक एक कारण येथें । चौदावर्षी कौरव प्रेतें । पाहों न शकें म्हणोनि हातें । दृष्टी झांके दयाळु. ॥ १५ ॥ दोर्दंड अवलोकूनि क्रूर । संकल्प नेमी वृकोदर । वधोनी धृतराष्ट्राचे कुमर । सार्थक करीन भुजांचें. ॥ १६ ॥ समुद्रींचे वाळुकाकण । इतुके विंधूनियां बाण । करीन कौरवांचें हनन । साह्य संगीं सर्वही. ॥ १७ ॥ म्हणूनि फाल्गुन वीर विचित्र । फाल्गुन मानी पितृव्यपुत्र । पुढती फाल्गुनाचा मंत्र । हा फाल्गुन मी कर्ता. ॥ १८ ॥ माझें दु:ख न कळे कोणा । म्हणोनि चिखल लावी वदना. । सहदेव गेला तेही संज्ञा । कुरुभूषणा! जाण पां. ॥ १९ ॥ माझें सौंदर्य देखतां नयनीं । भुलोनि जाती जन कामिनी । यालागीं नकुळें मृत्तिकाकणीं । तनू घोळिली राजसा ! ॥ २० ॥ अश्रुपातीं चौदावर्षी । हृदय पिटितील मुक्तकेशा । धृतराष्ट्राच्या सर्वही स्नुषा । उदकक्रिया करितील. ॥ २१ ॥ एकशत कौरवनारी । मजहूनि कष्ट भोगिती भारी । ऐसें द्रौपदी सुंदरी । दावूनि गेली वनवासा. ॥ २२ ॥ कौरवांची उत्तरक्रिया । मीच सांगेन धर्मराया । कुश हस्तीं अर्पावया । धौम्यें धरिले जाण पां. ॥ २३ ॥ सुनांसहीत श्रेष्ठ गांधारी । आणी नगरींच्या सकळ नारी । बुडती शोकाच्या सागरीं । तें मी दृष्टी देखेन. ॥ २४ ॥ चिन्हें दावूनियां ऐशीं । वना गेला सत्वराशी । तेवेळीं उत्पात आकाशीं । अत्यद्भुत उदेले. ॥ २५ ॥ रक्तवृष्टी वन्हिवृष्टी । थरथरां कांपि-

---

दृशा कुपितया धृतराष्ट्रदाहपापाय भूवमिति दम्भगृहीतराज्यः । इत्येष चीरपिहितास्यविभासिभूतजीमूतगोपितविधुः प्रचचार राजा ॥ ९७ ॥ कालेन कालकवलीकृतवैरवार्तमेतेन कौरवकुलं कलहोत्कटेन । विस्तार्य बाहुयुगमित्यगमन्निकामकोपारुणोरुनयनः पवनाङ्गजन्मा ॥ ९८ ॥ एवं किरञ्शरकदम्भकमाम्बिकेयसेनासु दुर्धरधनुर्धरधैर्यरोधम् । युद्धे करोम्यहमिति प्रववर्ष गच्छन्विष्वक्शतक्रतुसुतः सिकतावितानम् ॥ ९९ ॥ आच्छिद्य मेमुरदुरोदरदम्भजृम्भमाणप्रभावबलिनं युधि सौबलेयम् । स्यादुक्तमस्य विशदत्वमिति स्वमास्यं लिप्त्वा मषीभिरगमत्सहदेववीरः ॥ १०० ॥ रङ्गत्यरातिनिकरे शिरमङ्गमङ्ग शृङ्गारितं भुजभृतां निभृतं न भाति । इत्यङ्गनाजनमनोरमरूपरोचिर्धूलीविलेपशबलो नकुलो जगाम॥१०१॥ इत्यातुरं विशतु हस्तिपुरं पुरंध्रीवर्गो दिनैः कतिपयैरपि कौरवाणाम् । इत्याललाप बहुशापमवद्धकेशा सा पाण्डुपुत्रसुदती रुदती प्रवासे ॥ १०२ ॥ अल्पैरहोभिरिति कौरवकैरवाक्ष्यो गीतानि बिभ्रतु शपन्निति कोपशोणः । धौम्यो जगौ परिपतन्पथि याम्यरौद्रसामानि नैर्ऋतदिगुद्धृतदर्भपाणिः ॥ १०३ ॥ [बालभारत सभापर्व–सर्ग ५.] १०. अग्नींत.

१. अर्जुन. २. स्त्रिया. ३. शरीर. ४. मोकळे आहेत केंस ज्यांचे अशा. ५. सुना. ६. उत्तरकार्याच्या प्रसंगीं तिलांजलि देतील. ७. धैर्यसागर. (धर्म.)

न्मली सृष्टी, । [1]उल्कापात कडकडाटी । तुटोनि पडले भूतळीं. ॥ २६ ॥ झडझडाटे प्रळयवातू । सुटतां उदेला त्रिविधकेतू । [2]कृतांत भुकेला खातखातू । भक्षीन म्हणे विश्वातें. ॥ २७ ॥ गगनपंथें नारदमुनी । उभा ठेला सभासदनीं । चतुर्दश वर्षांनंतरें हानी । क्षयो होईल कुळातें. ॥ २८ ॥ मरतील पृथ्वीचे भूपती । विधवा होतील राजयुवती । [3]अशुद्धें नाहोनियां [4]जगती । मग वरील धर्मातें. ॥ २९ ॥ दुर्योधनाच्या अपराधपापें । भीमार्जुनाच्या बळप्रतापें । श्रीकृष्णमूर्तीच्या साक्षेपें । भार उतरेल [5]धरेचा.' ॥ ३० ॥ ऐसें वदोनि तत्क्षणीं । अदृश्य झाला सर्वज्ञमुनी । दुर्योधन [6]दुःश्चित्त मनीं । द्रोणाचार्या विनवीत. ॥ ३१ ॥ '[7]पांडवार्णवीं बुडतां आम्हां । तारक तूंचि गुरुसत्तमा! । तुवां पाठीसीं [8]सूदल्या आम्हां । हरिहर तेही तृणतुल्य.' ॥ ३२ ॥ द्रोण म्हणे, 'तुझिया काजा । प्राण वेंचीन महाराजा! । यश साधीन ऐसा माझा । भरवंसा कांहीं न धरणें. ॥ ३३ ॥ करूनि पांडवांचा घात । तुज जोडोनि देईं [9]जैतें । हें न घडे गा! सत्य सत्य । निश्चयेसीं सांगतसें. ॥ ३४ ॥ कृष्णकृपेचें वज्रकवच । पांडवांअंगीं बाणलें साच । तेथें माझे हे [10]नाराच । दर्भप्राय तयांतें. ॥ ३५ ॥ याही वेगळें आणीक एक । स्मरोनि अवमानाचें दुःख । पांचाळपुत्रें हा [11]पावक । प्रसन्न केला प्रयासें. ॥ ३६ ॥ माझें करावया हनन । जन्मलासे [12]धृष्टद्युम्न । तो प्रत्यक्ष हुताशन । मनुष्यरूपें उदेला.॥३७॥ [13]याजोपयाजऋषीच्या वरदें । पुत्रप्रसाद [14]जातवेदें । दीधला म्हणोनियां द्रुपदें । यश [15]पदरीं बांधिलें. ॥ ३८ ॥ यालागीं विरोध सांडोनि मनीं । पांडव पाचारीं परतोनी । पहिल्याऐसे राज्यासनीं । स्थापोनि सुखें असावें. ॥ ३९ ॥ माझिया बळाची दुराशा । सहसा न करीं कौरवेशा! । विधीनें लिहिलें सहसा । पालटेना कल्पांतीं.' ॥ ४० ॥ धृतराष्ट्र म्हणे, 'पवित्र विदुरा! । सवेग

---

१. उल्का=आकाशांतून अग्निरूप जो तारा पडतो तो. २. यम. ३. रक्तानें. ४. पृथ्वी. ५. पृथ्वीचा. ६. खेदयुक्त. ७. पांडवरूप सागरांत. ८. घातल्या. ९. जय. १०. बाण. ११. अग्निदेव. १२. 'धृष्टद्युम्न' या शब्दाचा अर्थ असा:–धृष्ट म्ह० प्रगल्भ आणि द्युम्न म्ह० वित्त (राजाचें बलरूप धन) असा शब्दार्थ होतो. बल, शत्रूत्कर्षासहिष्णुत्व, कवचकुंडलांदिकांसह जन्म, शस्त्रास्त्रशौर्य इत्यादि गुणांनीं संपन्न असल्यामुळें द्रुपदानें या कुमारास धृष्टद्युम्न असें नांव ठेविलें. (आदिपर्व–अ० १६७ श्लो० ५३.) १३. मुक्तेश्वर–आदिपर्व–काव्यसंग्रहग्रंथमाला–अध्याय ३९ पृष्ठें ३४९-३५४ पहा. १४. अग्नीनें. [मोरोपंत–आदिपर्व–अ० ३१ गीति ६-२५ पहा.] १५. मोरोपंत–सभापर्व–अ० ७ गीति ७७-८४ पहा. [काव्यसंग्रहग्रंथमाला–पृ० ७० ]

परतवीं युधिष्ठिरा । बुझावोनि[1] त्याचिया नगरा । राज्यदानें बोळवूं. ॥ ४१ ॥ परतवितां जरी न येती । तरी हस्ती वाजी रथ पदाती[2] । वस्त्रें भूषणें धन संपत्ती । देऊनि तरी पाठवा.' ॥ ४२ ॥ विदुर म्हणे, 'अघटित काज । परतोनि नये धर्मराज । कुळक्षय जाहलिया सहज । समाधानें येतील.' ॥ ४३ ॥ कठीण ऐकोनि विदुरवचन । राजा चिंतार्णवीं निमग्न । मुखीं पडलें दीर्घमौन । देहस्मरण विसरला[3]. ॥ ४४ ॥ संजय म्हणे[4], 'कौरवनृपती! । इच्छिलें फळ जोडिलें हातीं । आजूनि चिंतेचे आवर्तीं[5] । भ्रमसी हें तव अघटित. ॥ ४५ ॥ दूरी दवडूनि पांडव वैरी । राज्य लाधलें एकछत्री । भाग्य भोगी सर्व धरित्री । अनंतकाळ संतोषें. ॥ ४६ ॥ भाष देऊनि गेली पद्मा[6] । कल्पांतींही न सोडीं तुम्हां । काळ म्हणे तुमची सीमा । ब्रह्मकल्पा तुलंघे. ॥ ४७ ॥ ईश्वरें आपुलें ईश्वरत्व । सृष्टिकर्तृत्व सुहृदत्व । दीधलें आतां अपूर्णत्व । काय तूतें सांग पां. ॥ ४८ ॥ इतुका झालिया भरंवसा । आतां कां दुश्चित मानसा? । भोगीं सकळ ऐश्वर्यदशा । दिवसेंदिवस आगळी[7].' ॥ ४९ ॥ खोंचोनि बोले कौरवरावो, । 'काळिजीं घालिसी कां घावो? । पांडवांविषयीं विपरीत भावो । नाहीं मातें सर्वथा. ॥ ५० ॥ मी अंध चक्षुहीन[8], । पुत्र न मानिती माझें वचन, । ऐश्वर्यमदें मातले पूर्ण । शक्रातेंही न गणिती. ॥ ५१ ॥ पवित्र पांडव केले वैरी । आतां कैचें सुख संसारीं? । पडिलों शोकाग्नीचे जोहारीं[9] । जन्मवरी रे! संजया! ॥ ५२ ॥ कंठीं अडकलिया फांसा । तोंड पसरी गोड घांसा । कीं सुळीं ओपिलिया माणसा । अंगभोग कायसे? ॥ ५३ ॥ कंडाहोनि[10] लोटितां तळीं । तो म्हणे तळवटीं शेज मवाळी[11] । तेथें पहुडोनि गदारोळीं । भोग भोगीन स्त्रियेसीं. ॥ ५४ ॥ तेंवी गा! पांडवांसीं वैर । तेथें कैचें सुख साचार[12]? । होईल कुळाचा संहार । हा निर्धार मी जाणें.' ॥ ५५ ॥ संजय म्हणे[13], 'कौरवराया! । तूंचि कारण कुळक्षया । धरूनि निजपुत्राची माया । धर्ममार्गीं चळलासी. ॥ ५६ ॥ सभेसी आणितां सुंदरा । वारिलें नाहीं दुष्टकुमरां. । करें ओढितां वस्त्रभारा । नाहीं हातें लोटिलें. ॥ ५७ ॥ दुरुक्ती बोलतां दुर्योधन कर्णें देतां अनुमोदन । त्या दुष्टांचे दंत भग्न । केले नाहीं निर्बळा! ॥ ५८ ॥ सांडोनि पांचही भ्रतार । द्रौपदी रिघे आमुचें घर । ऐसें बोलतां तुझा कुमर ।

---

१. समजावून, समजूत घालून. २. चतुरंग सैन्य. ३. भान राहिलें नाहीं. ४. सभापर्व—अ० ८१ श्लो० ३ पहा. ५. आवर्त=भोंवरा. ६. लक्ष्मी, श्री. ७. मोठी. ८. अंध. ९. जातुषालयांत. १०. कड्यावरून. ११. नरम, मऊ. १२. खरोखर. १३. सभापर्व—अ० ८७ श्लो० १७ पहा.

मौन्यें तुवां ऐकिलें. ॥ ५९ ॥ देव ज्या देती पराभव । त्याची हरूनि बुद्धि सर्व । अधर्मी धर्मत्वाचा भाव । लावूनि करी नाशातें. ॥ ६० ॥ विषमकाळ पातल्या निकट । ज्ञानी होय विचारभ्रष्ट । अन्याय न्याय मानूनि प्रगट । बळेंचि करिती वारितां. ॥ ६१ ॥ काळ दंड धरूनियां करें । छेदीत नाहीं जनांचीं शिरें । बुद्धी विपरीत झाली निकरें । क्षोभला ऐसें जाणिजे. ॥ ६२॥ भीष्मादिकांनीं वारितां । विदुरें बहु प्रबोधितां । पुत्रें करितां न वारितां । त्वांचि केलें सर्वही. ॥ ६३ ॥ अन्यायें रहाटोनि[1] कोटी । तूंचि सांगसी धर्म-गोष्टी । केलें कर्म तें शेवटीं । भोगणें पडे कर्तया. ॥ ६४ ॥ पतिव्रता याज्ञसेनी । बळें क्षोभविली दुर्जनीं । साधु दरिद्रें दवडिले वनीं । हें कल्याण तुज नव्हे.' ॥६५॥ धृतराष्ट्र म्हणे[2], 'गा! संजया! । यथार्थ बोलसी सर्वज्ञराया !। जाणत जाणतां प्राणियां । पतनीं पडे प्रारब्धें. ॥ ६६ ॥ दोष दूषणें बोलसी जितकीं । माझे ठायीं घडलीं तितकीं । प्राण द्यावा येणें दुःखीं । इतुकें आतां उरलेंसे. ॥ ६७ ॥ द्रौपदीचिया क्रोधनेत्रीं । भस्म होईल सर्व धरित्री । माझी संतती पुत्रपौत्रीं । उरेल कैसी कळेना. ॥ ६८ ॥ सकळ सुनासीं गांधारी । आक्रंदती नगरनारी । उत्पात झाले ते निर्धारीं । नाश करिती कुळातें. ॥ ६९ ॥ कुशब्द बोलिले द्रौपदीतें । ते कृष्ण मानी देवकीतें । तो क्षोभोनि मत्पुत्रातें । संहारील निर्धारें. ॥ ७० ॥ जरासंध नरनायक । बाहुबळें मारविला देख । तेंवी सरती एवढें दुःख । हें कैसेनी घडेल. ॥७१॥ यादव पांचाळ भीमार्जुन । यांतें प्रेरूनि यदुनंदन । करील मत्कुळाचें हनन । हें निश्चयें मी जाणें. ॥ ७२ ॥ विदुर बोलिला प्रत्यक्ष । समान रक्षीं दोन्ही पक्ष । तें मी मूर्खामाजी मूर्ख । पुत्रलोभें न[3] मनींच.' ॥ ७३ ॥ ऐसें धृतराष्ट्राच्या मना । चिंताज्वरें व्यापिलें जाणा । इतुकें झालिया कुरुभूषणा ! । सभापर्व संपलें. ॥ ७४ ॥

## उपसंहार.

(ओंव्या.)

येंपरी[4] अपूर्वापूर्व[5] । इतुकें कथिलें सभापर्व ।
पुढें विशाळ अरण्यपर्व । तेंही परिसिजे पवित्रीं. ॥ १

---

१. वागून, वर्तन ठेवून. २. सभापर्व–अ० ८१ श्लो० १८-३९ पहा. ३. मानिलें नाहीं.
४. मुक्तेश्वर–आदिपर्व–उपसंहार–पृ० ४५५-४५६ पहा. ५. अपूर्वामध्यें अपूर्व.

गोदावरीतटनिवासी । अत्रिगोत्री पवित्र ऋषी ।
चिंतामणी गुणैकराशी-।-पासाव जन्म जयाचा. ॥ २
तो मुद्गल चिंतामणिसुत । लीलाविश्वंभर जगविख्यात ।
व्यासभारतींचा अर्थ । महाराष्ट्र बोलिला. ॥ ३
संस्कृत कार्पास सुपवित्र । प्रमेय विणिलें भाषावस्त्र ।
माजी परमार्थ पटसूत्र । कनकतारा सद्गुणीं. ॥ ४
तें हें उचित ओपितों संतां । कोण्ही पटचि ठेवूनि परता ।
कापुसें आच्छादिती माथा । हेंचि चातुर्य विचित्र. ॥ ५
असो. याचेनि श्रवणें पठणें । अथवा पुस्तकाचेनि पूजनें ।
छेदूनि संसारबंधनें । सुख भोगणें हरिपदीं. ॥ ६
दोन सहस्र सात शतें । अकरा श्लोक आले गणितें ।
संख्या सत्यवतीचेनि सुतें । सभापर्व कथिलेंसे. ॥ ७
बहुत अध्यायांचें गणित । इतुका केवळोनियां अर्थ ।
मीही अनुवादलों येथ । विश्वंभरप्रसादें. ॥ ८
द्वितीय पर्व सतरा अध्यायीं । निवेदिलें सद्गुरूपायीं ।
कृपा वसो संतहृदयीं । दीन आपुलें म्हणोनी. ॥ ९

---

१. मुक्तेश्वर हा अत्रिगोत्रोत्पन्न ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण होता. पैठणाचा राहणारा म्हणून 'गोदावरीतटनिवासी' असें म्हटलें आहे. २. याच्या बापाचें नांव चिंतामणि उर्फ विश्वंभर असें होतें. मुक्तेश्वरानें आपल्या मातापितरांच्या नांवांचा निर्देश 'लीलाविश्वंभर' या सामासिक पदानें अनेक ठिकाणीं केला आहे. [मुक्तेश्वर–रामायण–उपसंहार पृ० १६६.] ३. कापूस. ४. ही फलश्रुति आहे. ५. हें वर्णन पुढील सभापर्वांतील श्लोकांस अनुसरून आहेः—"एतत्सर्वं सभापर्व मयाख्यातं महर्षयः । अध्यायाः सप्तति ज्ञेयास्तथा द्वौ चात्र संख्यया ॥ १ ॥ श्लोकानां द्वे सहस्रे तु सप्तश्लोकशतानि च । श्लोकाश्चैकादश तथा पर्वण्यस्मिन्प्रकीर्तिताः ॥२॥." ६. व्यासें. ७. 'बाहात्तर' असा अन्य पाठ आहे. ८. मूळांत अ० ८१ आहेत. ९. गृहीत करून. १०. बोललों. ११. ही सज्जनप्रार्थना आहे. १२. या ग्रंथाच्या आम्हास एकंदर सात प्रती मिळाल्या. त्यांपैकीं चार संपूर्ण असून बाकीच्या तीन अपूर्ण आहेत. पहिली प्रत रा० रा० मोरेश्वर वासुदेव कर्वे (भिंवडी) यांनीं दिली. हिच्या शेवटीं असा उल्लेख आहेः—"शके १६६७ प्रभव नाम संवत्सरे आषाढ शुद्ध प्रतिपदा शनौ तद्दिने समाप्त. इदं पुस्तकसंग्रह कृष्णाजी गणेश उपनाम गोखले, वास्तव्य वेहरगांव परगणे भद्रावती. हस्ताक्षर राजाराम शुक्ल जयतानेकर." दुसरी रा० रा० पांडुरंग आबा जोशी मोघे, वसईकर, यांनीं दिली. हिच्या शेवटीं असा उल्लेख आहेः—"शके १७२७ क्रोधननाम संवत्सरे चैत्र शुद्ध प्रतिपद्यां इदम् पुस्तकं समाप्तम्." तिसरी व चवथी ह्या प्रती श्रीमंत

इति श्री**सभापर्व भा**रत । सरलिया लागलें अद्भुत ।
**वनपर्व** तें कथीत । **वै**शंपायन रायातें. ॥ १०
तयापासाव विश्वगुरू । वदता झाला अपारू ।
ग्रंथ रचिला अति थोरू । **मुक्ते**श्वरकवि वदे. ॥ ११

१४९१८/का/०५/ ३५

टिळक ग्रंथसंग्रहालय
दा.क्र. 14918
जि. सातारा

---

सरसेनासाहेब सुभे भोंसले सरकार (नागपुर) यांच्या पुस्तकालयांतून मिळाल्या. ह्यांच्या शेवटीं "इति श्रीमन्महाभारते सभापर्वणी मुक्तेश्वरकृत प्राकृत टीका समाप्तः" असा समाप्तिलेख आहे. पांचवी, रा० रा० कृष्णाजी नारायण जोगळेकर (हेद्वी) यांनीं दिली. हिचीं पहिल्या अध्यायाचीं कांहीं पानें व सतरावा अध्याय हीं गहाळ झालीं आहेत. इतर प्रतींपेक्षां ही फार जुनी असून शुद्ध आहे. सहावी, कै० वा० तात्या मोडक यांच्या संग्रहांतील, ही पांच अध्यायांपर्यंत आहे. सातवी, रा० रा० गोपाळराव वासुदेव सहस्त्रबुद्धे (विजापुर) यांनीं दिली. ही दहा अध्यायांपर्यंत आहे. सदरील सात हस्तलिखित प्रती देणारांचे आम्ही फार फार आभार मानितों व 'असेंच साह्य करीत असावें' अशी विनंति करितों

# THE MAHÂBHÂRATA

OF

# MUKTES'VARA.

(THE GREAT MARÂTHÎ POET OF THE MAHÂRÂSHTRA.)

*"Poetry is a speaking picture."*
*SIMONIDES.*

## 2. SABHÂPARVA.

*EDITED WITH*

CRITICAL AND EXPLANATORY NOTES

BY


VÂMANA DÂJÎ OKA.

HEAD MASTER, HIGH SCHOOL, RAIPORE.



PRINTED AND PUBLISHED

BY

TUKÂRÂMA JÂVAJÎ,

PROPRIETOR OF JÂVAJÎ DÂDÂJÎ'S "NIRṆAYA-SÂGARA" PRESS.

Bombay:

1894.

*Price 1 Rupee.*